Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-24**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***December-2021 Volume-12 Issue-24***


*On*

# *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*


| **Chief Editor** | **Editor** |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]**<br>**Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]**<br>**Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]**<br>**Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]**<br>**Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]** | **guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam**<br>**Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]**<br>**Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]**<br>**Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]**<br>**Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]** | **Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]**<br>**Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]**<br>**Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]**<br>**Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]**<br>**Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]** |


**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**CONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'जनता' पाक्षिकातील विचार<br>**प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर** | 1-4 |
| 2 | राजर्षी शाहू महाराजांच्या सभा समारंभातील प्रबोधन<br>**डॉ. यशवंत राऊत** | 5-7 |
| 3 | महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणा विषयक कार्य<br>**प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे** | 8-11 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे** | 12-14 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>**डॉ. सय्यद रब्बानी रशीद** | 15-16 |
| 6 | कृषीच्या शाश्वत विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान – एक भौगोलीक अभ्यास<br>**प्रा. डॉ. महेश म. पवार** | 17-19 |
| 7 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्य चळवळीतील कार्य<br>**प्रा.बप्पासाहेब रामलिंग शेजूळ** | 20-22 |
| 8 | फुले-आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार<br>**समाधान भा. शिंदे** | 23-25 |
| 9 | विचारवंत आणि सुधारकः छत्रपती शाहू महाराज<br>**शेख हाजुमिया फ़त्तुसाहेब** | 26-28 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार व योगदान<br>**प्रा. प्रणाली प्रदिप पाटील** | 29-31 |
| 11 | उस्मानाबाद जिल्हा उमरगा तालुक्यातील जलप्रणालीचा एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. गावित सतिश डी** | 32-34 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार<br>**प्रा. रकटे ज्योती भाऊसाहेब** | 35-37 |
| 13 | संत कबीर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**डॉ सुहास पाठक, रविंद्र प्रि सोनकांबळे** | 38-40 |
| 14 | "डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजपरिवर्तन एक दृष्टीकोन"<br>**प्रा डॉ. गायके एस. के-** | 41-42 |
| 15 | 'महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान'<br>**प्रा.डॉ. संगीता मोरे** | 43-45 |
| 16 | महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार<br>**प्रा. डॉ. जडल मधुकर मार्कंडेय** | 46-50 |
| 17 | महात्मा ज्योतिबा फुले आणि सत्यशोधक समाजाचे कार्य<br>**प्रा. डॉ. पाथरकर एस. व्ही.** | 51-53 |

| | | |
|---|---|---|
| 18 | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व शैक्षणिक विचार<br>**डॉ. एस. एस. देवनाळकर** | 54-55 |
| 19 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक योगदान<br>**प्रा. पांढरे विलास देवराव** | 56-62 |
| 20 | थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>**डॉ.सुधीर ब.गायकवाड** | 63-66 |
| 21 | राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक व आर्थिक कार्य<br>**प्रा. अमोल देविदास दिवटे** | 67-72 |
| 22 | डॉ. आंबेडकरांची पत्रकारीता आणि राजकीय चिंतन<br>**प्रा. डॉ. अरूण विठ्ठल सोनकांबळे** | 73-77 |
| 23 | महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान<br>**प्रा.अरविंद बन्सी इंगळे** | 78-80 |
| 24 | डॉ बी आर अम्बेडकर का आर्थिक विचार और योगदान<br>**डॉ अर्जुन मोहनराव मोरे** | 81-83 |
| 25 | स्त्री मुक्ती आंदोलनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा डॉ अंकुश मारूती सोहनी** | 84-87 |
| 26 | राजर्षी शाहू महाराजांचे समाजपरिवर्तनातील शैक्षणिक कार्य<br>**प्रा. डॉ.खलील न. सय्यद** | 88-90 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण<br>**Suman Kendre** | 91-93 |
| 28 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार<br>**डॉ. गव्हाणे रमाकांत बबनराव** | 94-95 |
| 29 | राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री-उद्धारविषयक विचार व कार्य<br>**श्री योगेश ज्ञानदेव पाटील** | 96-98 |
| 30 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार<br>**डॉ सुरेश त्रिंबकराव सामाले** | 99-102 |
| 31 | छत्रपती शाहू महाराज आणि महिला सक्षमीकरण<br>**डॉ निलेश गोकुळ शेरे** | 103-106 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक आर्थिक विचारांचे अध्ययन<br>**श्री. एच. व्ही. केळे , डॉ. डी. सी. रसाळ** | 107-110 |
| 33 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा तुळशीदास मोकल** | 111-113 |
| 34 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार<br>**प्रा देवशेट्टे सुरेश मनोहरराव** | 114-116 |
| 35 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**रेवडकर गणेश सुभाष** | 117-118 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार<br>**प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे** | 119-121 |

| | | |
|---|---|---|
| 37 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**डॉ नरसिंग भानुदास देशमुख** | 122-124 |
| 38 | जागतिक पातळीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांबद्दलचे असणारे योगदान<br>**प्रा. गीतांजली शंकरराव चव्हाण** | 125-127 |
| 39 | डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित जातिप्रथेचे निर्मूलन: मानवमुक्तीचा जाहीरनामा<br>**प्रा डॉ शैलजा भारतराव बरुरे** | 128-132 |
| 40 | म. जोतीबा फुले यांचे समताविषयक विचार<br>**प्रा. मनोहर आनंदराव गुडधे** | 133-135 |
| 41 | म. जोतीबा फुले यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन<br>**प्रा. विजय शामराव कांडलकर** | 136-138 |
| 42 | विचारवंत आणि सुधारक : छत्रपती राजर्षी शाहू महाराज<br>**डॉ. मधुकर श्रीरंग पवार** | 139-141 |
| 43 | स्त्री मुक्ती चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान<br>**प्रा. धर्मदास वि. घोडेस्वार** | 142-144 |
| 44 | राजर्षी शाहू महाराजांचे सर्वसमावेशक विकास विषयक विचार<br>**प्रा. यादव जे. बी.** | 145-147 |
| 45 | महात्मा फुले यांच्या कृषी विषयक विचारांचे विश्लेषण<br>**प्रा. डॉ. डी. डी. भोसले** | 148-150 |
| 46 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे धोरणात्मक आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे** | 151-155 |
| 47 | अम्बेडकर का आर्थिक चिंतन एवं वर्तमान में उसकी प्रासंगिकता<br>**डॉ. सुरेखा पिपलानी** | 156-159 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य आणि विचाराचा मराठी कवितेवरील प्रभाव<br>**डॉ. वैशाली विजय जावळेकर** | 160-164 |
| 49 | छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणामधील योगदान.<br>**डॉ. जयश्री बारई** | 165-167 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>**डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी** | 168-171 |
| 51 | महात्मा फुले यांचे विचार आणि भटक्या विमुक्त जाती – जमातीतील स्त्रिया<br>**प्रा. सचिन बबन साळवे, सौ. शेख शबाना एम** | 172-175 |
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन<br>**डॉ. प्रभाकर रघुनाथ जगताप** | 176-178 |
| 53 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार<br>**डॉ. अनंत दादाराव मरकाळे** | 179-182 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'जनता' पाक्षिकातील विचार

**प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर**
श्री.आर.आर.पाटील महाविद्यालय,सावळज ता- तासगाव,जि-सांगली.

**प्रस्तावना:-**

भारतातील लोकांना त्यांचे हक्क व त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जीवन समर्पित केले आहे. अस्पृश्य समाजातील लोकांना त्यांचा हक्क व अधिकार मिळावा यासाठी चळवळी व सत्याग्रह केले. तसेच नियतकालिके ,वृत्तपत्रे व पाक्षिक यांच्या सहाय्याने भारतीय जनतेसमोर सत्यस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला. समाजातील तळागाळातील लोकांना शिक्षण मिळावे. या शिक्षणाचा उपयोग त्यांना नोकरीसाठी व्हावा यासाठी त्यांनी कायद्यात आरक्षण तरतूद केली. स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले. यातूनच खाजगी मालमत्तेत स्त्रीला पुरुषांइतकाच समान हक्क मिळावा, मतदानाचा हक्क मिळावा, स्त्रिया नोकरीवर असताना त्यांना प्रसूती रजा मिळावी यासाठी स्त्रियांना न्याय देणारे कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्यात मांडले. पिढ्यानपिढ्या लाचारासारखे जीवन जगणाऱ्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देण्याचे काम केलेले आपणास पहावयाला मिळते. त्याबरोबरच शेतकऱ्यांचे हित जपणारे कायदे आणले. त्यामुळे भारताला विविध उद्योग ,व्यवसायात प्रगती मिळत गेली. धार्मिक रूढी परंपरातून मानव जातीला काळीमा फासणाऱ्या परंपरा त्यांनी मोडकळीस आणलेल्या पहावयास मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्रे व पाक्षिके यातून समाजाचे अज्ञान दूर करून लोकांना ज्ञानाचा दिशेने नेण्याचा प्रयत्न केलेला आहे .त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम या नियतकालिक व पाक्षिकांनी केलेले दिसते. 'मूकनायक', ' बहिष्कृत भारत', 'समता' तसेच 'जनता' ही वृत्तपत्रे काढली. ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' या वृत्तपत्राचा पहिला अंक निघाला. कालांतराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी विदेशात गेले. त्यामुळे 'मूकनायक' बंद पडले. स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यात समन्वय साधला . तसेच पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह केला. महाडच्या 'चवदार' तळ्यातील पाणी कुत्रा व मांजर यासारख्या प्राण्यांनी पिले, तर ते पवित्र आणि अस्पृश्यांनी पिले तर ते अपवित्र मानणाऱ्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्यावर सर्व अस्पृश्य बांधवांना एकत्र करून त्या तळ्याचे पाणी स्पर्श करून सर्वांना हे पाणी पिण्यास उपलब्ध करून दिले. महाडच्या या क्रांतिकारक कृतीचे वर्णन 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रात ३ एप्रिल १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रसिद्ध केले. याच वृत्तपत्रात 'आजकालचे प्रश्न' या नावाने लिहिलेली हे लेखन त्यांच्या विद्वान बुद्धीचे दर्शन घडवते. त्याच बरोबर सांस्कृतिक, धार्मिक , सामाजिक ,शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील स्थिती या वृत्तपत्रातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली जात होती. दलितांच्या, शोषित समाजाच्या बहिष्कृत लोकांना मुक्त करण्याचे काम या मराठी वृत्तपत्र मार्फत केले गेले.

'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रा बरोबर त्याच विषयाचे व आशयाचे 'समता' नावाचे वृत्तपत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली प्रसिद्ध केले जात होते. ४ सप्टेंबर १९२७ रोजी ' समता- समाज संघ' स्थापन झाला. याचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या संघाचे मुखपत्र 'समता' नावाने प्रकाशित होऊ लागले . हे वृत्तपत्र २९ जून १९२८ रोजी सुरू झाले. समाजातील सनातनी विचार संपुष्टात आणून ,स्पृश्य व अस्पृश्य लोकांच्यामध्ये समता निर्माण करण्यासाठी या वृत्तपत्राचा जन्म झाला. कारण या वृत्तपत्राचे संपादक देवराव नाईक होते. हे जन्मताच गोवर्धन ब्राह्मण होते. तर लोकमान्य टिळकांची दोन्ही मुले श्रीधरपंत व रामभाऊ हे या ' समाज- समता संघा'त सामील झाले होते. जातिभेद नष्ट करून सर्वांना समान हक्क समान वागणूक व समान न्याय मिळावा अशाप्रकारचा उद्देश या नियतकालिकाचा होता. ' बहिष्कृत भारत' व 'समता' ही वृत्तपत्रे बंद पडली. गोलमेज परिषदेला गेल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जनता' पाक्षिकाच्या आरंभा बद्दलची माहिती दिली. २४ नोव्हेंबर १९३६ रोजी हे पाक्षिक सुरू झाले. या पाक्षिकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढील प्रमाणे पाहू .

**' जनता' पाक्षिकातील डॉ. बाबासाहेबांचे विचार:-**

समाजातील अस्पृश्य व उपेक्षित वर्गाला न्याय, हक्क, शिक्षण,नोकरी या सुविधांचा लाभ घेता यावा तसेच, या वर्गाला माणूस म्हणून जगता यावे . यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक

,राजकीय, धार्मिक व स्त्रियांच्या हक्कासाठी नियतकालिकातून आवाज उठवलेला होता, यामध्ये 'जनता'मधील त्यांचे विचार थोडक्यात पाहू.

**सामाजिक विचार:-**

समाजातील विविध स्तरातील जाती भेट नष्ट करण्याच्या हेतूने कोणत्याही समाजातील लोकांनी आपल्या पोटजाती लावू नयेत. हा विचार पंजाबातील 'जातपात तोडक मंडळा'ने घेतला होता. केवळ जातीभेद नष्ट करण्याच्या हेतूने सन. १५-१०-१९३० रोजी पाठवले होते . यात हिंदूंनी केवळ हिंदू या जातीचा उल्लेख करायला हवा असे नमूद करावे असे सांगण्यात आले होते. मद्रासमध्ये राहणाऱ्या मोची समाज असो अथवा मुंबईसारख्या महानगरात लोकांच्या कडून घेण्यात आलेल्या पैशातून ज्या इमारती बांधल्या गेल्या. त्यामध्ये डेव्हलपमेंट , इम्प्रूमेंट व म्युनिसिपालिटी यांनी बांधलेल्या चाळींमध्ये वेगवेगळया समाजासाठी वेगवेगळा विभागवार रचना पहावयास मिळतात. त्यामध्ये मांगवाडा, महारवाडा, भंगीवाडा,चांभारवाडा अशा जातीय समाजरचनेच्या भिंती निर्माण झालेल्या पहावयास मिळतात. या भिंती नष्ट करून केवळ सर्वधर्म व सर्वजाती समान व्हाव्यात अशी स्थिती निर्माण होणे गरजेचे आहे.

भारतीय समाजात अनेक वर्णव्यवस्था आहेत. तसेच विविध धर्म आहेत. यात हिंदू व मुस्लिम धर्माचा समावेश आहे .सन १९३० रोजी मुस्लिम समाजाच्या विविध १४ मागण्या होत्या.या मागण्यांची माहिती आपणाला या पाक्षिकात मिळते . लंडनमध्ये झालेल्या राऊंड टेबल परिषदेत अस्पृश्यांच्यावतिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली होते. त्यांनी अस्पृश्य समाजाला न्याय मिळावा ,यासाठी प्रयत्न केले . त्यावेळचे त्यांचे भाषण ऐकून परिषदेतील लोक थक्क झाले. हिंदुस्तान मुसलमान धर्माचे प्रश्न सोडवण्यासाठी एक विशिष्ट कमिटी नेमली गेली होती. महाराष्ट्रात पेशव्यांची सत्ता जाऊन इंग्रजांची राजसत्ता प्रस्थापित झालेली होती. यामुळे केवळ डोक्यावरची पगडी गेली आणि टोपी आली असे म्हणता येईल. कारण वेशभूषा बदलली पण विचार तेच राहिले. इंग्रजी सत्तेमुळे थोड्याफार प्रमाणात समाजातील लोकांचे आचार विचार बदलले पण ब्राम्हणांचे वर्चस्व ,धार्मिक कर्मकांड आहे असेच राहिलेले जाणवते. यामुळे धार्मिक विचारातून सर्वसामान्य, अशिक्षित, गरीब ,अस्पृश्य समाजातील लोकांच्या भावनांशी खेळण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात समाजात रूढ होऊ लागले. ब्राह्मण समाजाचे वर्चस्व कमी होईल आणि ब्राम्हनेत्तर समाजाचे वर्चस्व वाढेल म्हणून जळगाव मध्ये 'अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्य संघ परिषद' या नावाखाली शास्त्रीपंडितांनी सनातनी विचार समाजात धरून रहावे व अस्पृश्यांची पिळवणूक करण्यासाठी धार्मिक रूढी परंपरा त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात लादल्या जावू लागल्या. हा सनातनी विचार समाजातून दूर करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या दृष्टीने समाजाला अन्यायाविरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह केला. ज्या तळयातील पाणी मुकी जणावरे ग्रहण करतात उदा. गाढव, डुक्कर इ. पण हेच पाणी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातील लोकांना पिण्यास बंदी होती. ते पाणी सर्वांना मिळावे यासाठी पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागला. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय कष्ट करावे लागले होते. पण काही सनातनी मंडळी या निकालाविरुद्ध अपील करणार आहेत असे समजतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात प्रश्न निर्माण झाला तो म्हणजे या लोकांचे अंत:करणे व मेंदू ही तरी परमेश्वराने कशाची बनवली असतील बरे?

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशांत श्रम करणाऱ्या, कष्ट करणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या श्रमजीवी लोकांचा विचार व्हावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कोणतेही कार्य तडीस जाण्यासाठी श्रमिक वर्गाचा मोठावाटा आहे. या वर्गाला न्याय देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रयत्न करत होते. शेतकऱ्यांसाठी कायदे तयार केले. आपल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीच्या उन्नतीचे केंद्रस्थान श्रमजीवी वर्गाकडेच असल्यामुळे यांच्या समानतेच्या सहकार्याशिवाय आपणास कोणत्याही क्षेत्रात पुढे पाऊल टाकणे अशक्य आहे. असा श्रमजीवी वर्गाचा विचारही या पाक्षिकात मांडला गेला आहे. त्याच बरोबर वेगवेगळया संघटना, चळवळी, सत्याग्रह यांचे विचार व्यापक असे मांडलेले दिसतात.

**राजकीय विचार:-**

उच्चवर्गीय तसेच परकीय लोकांच्या हातात शेकडो वर्ष राज्याचा राज्य कारभार होता. त्यामुळे त्या लोकांचा मनमानी कारभार समाजातील सर्व स्तरावरील क्षेत्रावर चालू होता. यातून समाजातील वंचित घटकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत होता. त्यांच्यावरील अन्याय दूर होण्यासाठी राजकीय क्षेत्रात वंचित समाजातील एखाद्या पुढाऱ्याची गरज होती. ह्या अस्पृश्य समाजाचे समर्थन करून त्यांच्या हक्कासाठी एखादा प्रतिनिधी पुढे येणे गरजेचे होते. शेटजी, भटजी व दलाल यांच्या हाती राज्याचा कारभार दिला. तर हा अस्पृश्य समाज आणखी भरडला जाईल. ही पिळवणूक कुठेतरी थांबावी. यासाठी जनतेच्या हितासाठी अन्यायाने पीडित व शोषित

समाजातील लोकांच्या हाती राज्यकारभार यावा, त्यामुळे या समाजाला उभारी मिळेल. अशा प्रकारचे राजकारण करून पुढारलेल्या लोकांनी मागास, अस्पृश्य ,बहुजन लोकांच्या हाती सत्ता देण्याचे म्हणजेच मागास लोकांना पाठिंबा देणे गरजेचे आहे. या पाठिंब्यामुळे कोणी ' स्वराज्यद्रोही' होत नाही. अशा विचारांचे राजकीय धोरण 'जनता' मांडले गेले आहे.

हिंदवी स्वराज्यातील राज्यांची राज्यघटना कशी असावी? यासाठी लंडन येथे राउंड टेबल परिषद भरविण्यात आली होती. भारताचे प्रतिनिधी म्हणून मुंबईचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मद्रासचे रा. ब. आर. श्रीनिवास यांची निवड करण्यात आली होती. बहुजन ,कामगार वर्ग ,शेतकरी ,गरीब व त्याचबरोबर समाजातील स्त्री वर्ग यांची प्रगती व्हावी हेतूने परिषदेत अनेक मुद्दे मांडले गेले. परिषेदेत घडलेल्या घडामोडी ऐकण्यासाठी सर्व जनता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण ऐकण्यासाठी आतुर झाली होती. ते आपल्या भाषणात परिषदेपुढे सादर केलेल्या आठ अटींचे मागणे मागितले होते. जातीयता, मतदानाचा हक्क, सरकारी नोकरीत प्रवेश ,या बरोबरच अस्पृश्य समाजाच्या मागण्या मान्य करण्यासाठी त्यांनी गव्हर्नरकडे अपील करावा आणि गव्हर्नरने ऐकले नाही तर व्हाईरायकडे अपील करण्याचा हक्क मिळाला. यासारखे अनेक महत्त्वाचे विषय परिषदेसमोर ठेवण्यात आलेले होते. त्यातून सर्वांना समान हक्काचे नागरिकत्व मिळावे. हा उद्देश होता पुढे ते म्हणतात, ज्या देशात गरिबांचे जगणे सुरक्षित नाही ते स्वराज्य धोक्याचे होय. श्रीमंतांकडून होणाऱ्या होणारे गरिबांची पिळवणूक कुठेतरी थांबली पाहिजे. सरकारच्या वेगवेगळया योजनांचा फायदा गरिबांना न मिळता तो श्रीमंतांना मिळत होता. अशा परिस्थितीत गरीब जनतेला राजकीय क्षेत्रातील विविध योजनांचा लाभ घेता येत नव्हता. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी श्रीमंताच्या घरी अतिशय कष्ट करावे लागत होते. त्यांचे कुटुंब यातूनच जगवत होते. श्रीमंतांच्या घरी गुलामासारखे कामे करावी लागत होती. अतिशय हीन दर्जाची कामे करून लाचारीचे जीवन जगत होते. अशा व्यवस्थेला स्वराज्य कसे म्हणता येईल. ज्या राष्ट्रात गरिबांचे जीव धोक्यात आहेत, गरीब जनता असुरक्षित आहे, ते स्वराज्य धोक्याचे असते असे म्हणता येईल.सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळावा ही मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली होती. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला की, त्यांच्या हातात राज्यकारभार येईल. समाजातील शोषित, गरीब, अस्पृश्यजनतेला न्याय मिळेल. मतदानाचा अधिकार केवळ पुरुषांना न देता तो स्त्रियांनाही मिळावा असे प्रतिपादन करण्यात आले.

**स्त्रियांबद्दलचे विचार:-**

भारतीय स्त्री ही कणखर आहे. कोणत्याही कामात पुरुषांच्या बरोबरीने ती काम करत असतं. परंपरेच्या नावाखाली तिला चिरडले गेले. तिची पिळवणूक केली. प्रत्येक क्षेत्रात तिला डावलले गेलेले पहावयास मिळते. केवळ स्त्री म्हणून तिला नाकारले जात होते. अशा या स्त्री जातीला न्याय मिळावा, त्यांचे हक्क त्यांना मिळावेत, त्यांची होणारी शारीरिक व मानसिक पिळवणूक थांबावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत हिंदू कोड बिल मांडले यामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात समान हक्क मिळावा, वडिलोपार्जित मालमत्तेत मुला-मुलींना समान हक्क मिळावा त्याबरोबरच स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा, नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी प्रसूती रजा मिळावी असे अनेक मुद्दे या 'हिंदू कोडं बिलात' आहेत. स्त्रियांच्या हक्कासाठी ,होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांचे शोषण होऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेतला होता. भारताच्या भावी राज्यघटनेत स्त्रियांचे मूलभूत हक्क यामध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. माहिती आपणाला 'जनता' पाक्षिकात बघायला मिळते. पंजाबच्या श्रीमती सरलादेवी चौधराणी यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल बंगाल स्त्री परिषद' कलकत्ता येथे भरवण्यात आली होती. त्यात हा ठराव पास करण्यात आला. या ठरावात समावेश केलेल्या स्त्रियांच्या हक्काच्या गोष्टी कोणत्या आहेत ते पुढील प्रमाणे पाहू.

**स्त्री वर्गाचे मुलभूत हक्क**

१. पती जिवंत असता त्याच्या संपत्तीवर पत्नीचा कायदेशीर अर्धा हक्क असणे व पतीच्या निधनानंतर त्याच्या इस्टेटीवर त्याच्या संततीप्रमाणे विधवेचा ही कायदेशीररित्या समान हक्क असणे.
२. आईबापाच्या, भावाच्या आगर बहिणीच्या इस्टेटीवर मुलांच्या अगर भावांच्या बरोबरीने मुलींचा अगर बहिणीचाही समान हक्क असणे.
३. आपल्या अज्ञान संततीचा प्रतिपाळ व संरक्षण करण्याचा समान हक्क असणे.
४. सर्व प्रकारच्या सरकारी खात्यात व बहु मानाच्या जागेवर पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही नेमणुकीचे व निवडणुकीचे समान हक्क असणे .नागरिकत्वाचे हक्क जबाबदारी व निर्बंध याबाबतीतही स्त्री-पुरुष हा भेद नसणे.
५. वेश्याव्यवसाय,कुंटणखाने वगैरे अजिबाद बेकायदेशीर ठरवून बंद करणे.

६. स्त्री मजुरांना पुरेसा पगार; नियमित तास काम; शीलाला अगर नीतीला जेणेकरून धक्का पोहोचणार नाही अशा प्रकारचे काम व वातावरण, म्हातारपण व आजारीपणाच्या अवस्थेत संरक्षणाची योग्य तरतूद व गरोदर व बाळंतपणात पुरेशी भरपगारी रजा.

७. बेकार स्थितीत स्त्रियांना उद्योगधंदा देण्याची सरकारने खास काळजी घेणे व व्यवस्था करणे.

८. मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था.

९. स्त्रियांना उच्च शिक्षण देण्याची खास सोय करणे.

१०. ज्या शिक्षण संस्थातून मुला-मुलींना शिक्षण एकत्र देण्यात येत असे त्या संस्थातून व त्यांच्या कार्यकारी मंडळतून स्त्री शिक्षकांची व सभासदांची ठराविक प्रमाणात भरणा करण्याची कायदेशीर योजना असणे.

११. स्त्रियांना मतदानाचा सार्वत्रीक हक्क असणे.

अशाप्रकारे स्त्रियांच्या हक्क व संरक्षणासाठीचे ठराव पास करण्यात आले होते.विविध सामाजिक ,राजकीय,धार्मिक ,आर्थिक,स्त्रीविषयक विषयांची माहिती देणारे तसेच भारत देशात घडणाऱ्या घडामोडींवरील विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जनता'पाक्षिकात माडलेले आहेत.

**संदर्भ ग्रथ:-**

**1.** गायकवाड प्रदीप (संपा):जनता The People,समता प्रकाशन, नागपूर,प्रथमावृत्ती १४ एप्रिल २००७.

# राजर्षी शाहू महाराजांच्या सभा समारंभातील प्रबोधन

**डॉ. यशवंत राऊत**

कर्नाटक विद्यापीठ, धारवाड-३.

**प्रस्तावना**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. त्यांनी १८८२ पासून समाज सुधारणा करण्यास सुरुवात केली होती. तो काळ इंग्रजी अमदानीतील होता. भारतात इंग्रजांचे राज्य होते. इंग्रजांनी भारतीयांचे अनेक हक्क काढून घेतले होते. त्यामुळे भारतीयांना आपले विचार उघडपणे मांडता येत नव्हते. म्हणून लेखक व निबंधकार यांनी मराठी भाषेतून लिहावयास सुरुवात केली होती. 'किचकवध' नाटक हे उत्कृष्ट उदाहरण आहे. तत्कालीन परिस्थितीमध्ये समाजात बहुजन समाजात साहित्यिक निर्माण होत होते. कृ. पा. खाडिलकर, हरिभाऊ आपटे, वि. वा. हडप, वि. सी. गुर्जर इ. कवी केशवसुत, भा. रा. तांबे, राम गणेश गडकरी अशा अनेक कवींनी आपल्या काव्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. समाजात वाढलेली अराजकता घालवून देण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले आहेत. कथा, काव्य, कादंबरी, नाटक, निबंध यांच्या माध्यमातून लेखन केले आहे.प्रस्तुत लेखात राजर्षी शाहूकालीन समाज प्रबोधनाचा विचार करताना त्यांचे विचार हे संपूर्ण समाजाच्या हितासाठीचे होते. समाजासाठी त्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले होते. शाहू महाराजांचे प्रत्येक भाषण म्हणजे समाजाला दिलेली वैचारिक देणगीच म्हणावी लागेल. समाजोद्धाराच्या तळमळीने जगणारा हा राजा होता. त्यांनी आपले विचार प्रत्येक सभेतून मांडले आहेत. राजर्षी शाहू महाराजांना अनेक सामाजिक संघटनांचे निमंत्रण येत होते. अक्धी अध्यक्ष तर कधी प्रमुख पाहूणे म्हणून लोक त्यांना सभेसाठी बोलावत होते. अनेक वेळा त्यांनी वक्त्याची भूमिका पार पाडून आपले विचार लोकांसमोर मांडले आहेत. यामध्ये अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, खामगाव, कामगार मेळावा परळ, मुंबई, आर्य धर्म परिषद, कानपूर, उत्तर प्रदेश, अस्पृश्य वर्गाची परिषद, माणगाव कोल्हापूर, श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतीगृह नाशिक, सोमवंशीय समाज अधिवेशन नाशिक, अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद नागपूर, कर्नाटक ब्राह्मणेत्तर सामाजिक परिषद हुबळी, अखिल भारतीय अस्पृश्य परिषद अशा अनेक ठिकाणी त्यांनी जनतेला मार्गदर्शन व समाज प्रबोधन केले आहे.

शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार समाजोन्नतीचे होते. त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याचे आदेश काढले. तसेच त्यांच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे घेतली होती. तेव्हा इथल्या शेतकरी, अस्पृश्य आणि स्त्रियांची स्थिती अत्यंत वाईट होती. देवधर्म, कर्मकांड, मंत्र-तंत्र, यज्ञयाग यामध्ये बहुजन समाज बुडालेला होता. शिक्षणाची मक्तेदारी प्रस्थापितांकडे होती. बहुजनांच्या अशिक्षितपणाचा फायदा हे भट, प्रस्थापित समाज घेत होते. लोकांना लुटत होते. त्यामुळे शिक्षण ही मागास व बहुजनांसाठी नवसंजीवनी आहे. असे ते स्पष्ट सांगतात.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे ११ वे अधिवेशन खामगाव येथे २७ डिसेंबर १९१७ रोजी भरले होते. त्याचे अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज होते. त्यावेळीच्या आपल्या भाषणात ते म्हणतात, “शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.”१ शिक्षणाचा मक्ता मनू व त्यानंतरच्या शास्त्रकारांच्या हाती होता. मनूच्या धर्मतत्वामुळे अनेक धर्म व जातीवर जाचक बंधने लादली होती. अस्पृश्य लोकांना शिक्षणाचे दरवाजे बंद केले होते. वेद वाचणे-ऐकणे यावर बंधने होती. पुढे शाहू महाराज म्हणतात की, 'इंग्रजांनी मनू प्रमाणे विकासात अडथळा आणला नाही. त्यानीच आमच्या मनात स्वातंत्र्याची बीजे पेरली' या बद्दल ते ब्रिटिश सरकारचे कृतज्ञ आहोत असे मानतात हे खरे आहे. तसेच शाहू महाराजांनी 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' अशा मताचे भाष देताना त्यांनी प्रामुख्याने जातीनिर्मूलन, शिवाजी महाराजांची ध्येयधोरणे चालविणे शेतकरी किंवा सैनिक होण्यापेक्ष उच्च प्रतीचे शिकक्षण घेऊन सरकारी नोकरी करण्यापेक्षा व्यापार धंदे, उद्द्योगामध्ये शिरावी, जेणेकरुन आर्थिक दुर्बलता संपून आर्थिक सबलता आली की, मग लोकांचे कोणतेच प्रश्न वा समस्या रहात नाहीत. शाहू महाराजांनी शिक्षणातील बारीक सारीक विषयांना महत्व दिले. त्यांनी तोफखान्यातील लोकांना चांगल्या प्रकारचे गणिती ज्ञान असायला हवे असे म्हटले आहे. त्यांचा शिक्षणाविषयी दूरदृष्टिकोन किती विशाल होता, हे लक्षात येते. म्हणून शिक्षण हा बहुजन समाज विकासाचा केंद्रबिंदू आहे असे वाटते. शाहू महाराजांचा प्राथमिक शिक्षणावर भर होता. त्यासाठी त्यांनी जाहिरनामा काढला तो असा, “येत्या गणेश चतुर्थीपासून करवीर इलाख्यातील प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आले.”२ तसेच परळ येथे भरलेल्या सभेतील शाहू महाराजांच्या भाषणाबद्दल भगवानराव बापूसाहेब जाधव आपले मत मांडताना म्हणतात, “छत्रपती ब्रिटिश साम्राज्यातील एक संस्थानिक असून देखील भारतीय कामगारांना आपल्या हक्काची जपणूक करण्यासाठी 'संघटने'च्या मंत्राचा उपदेश देत आहेत. जागतिक भांडवलशाहीची रुपरेखा कामगारांच्या भाषेत स्पष्ट

करुन क्रांतीची दिशा दाखवत आहेत."३ अशा प्रकारे शाहू महाराजांनी कामगार व मागासवर्गीयांच्या मनात क्रांतीची दिशा दाखविली आहे.

श्रमिकाच्या प्रश्नाविषयी व श्रमिक विचारासंदर्भात २४ नोव्हेंबर १९१८ रोजी मुंबईतील कामगारांची जाहीर सभा भरली होती. निमित्त महायुद्धात दोस्त राष्ट्रांचा विजय झलयाबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीचे होते. याच वेळी राजर्षी शाहू महाराजांच्या उपदेशानुसार कामगार लोकांनी स्थापन केलेल्या 'पिपल्स युनियन' या संघटनेचे उद्घाटन ही शाहू महाराजांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपले मत व्यक्त केले, "येथे इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजेत व सर्वांस आपले हक्क काय आहेत, ते कळवले पाहिजे. भांडवलवाल्यांत ब्राह्मण व वैश्यवृत्तीच्या लोकांचा भरणा विशेष आहे. त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणे कठीण आहे." 'बळी तो कान पीळी' या न्यायाने भारतात लोकशाही चालू होती. यासाठीच शाहू महाराजांनी कामगार आणि मजूर हेच भांडवलदार व व्यापाऱ्यांचा आधार आहे. मजुरांशिवाय व्यापार, उद्योग चालत नाहीत. शाहू महाराजांचे वडील, आई हे शेतकरी कुटुंबतीलच होते. तसेच अनेक नातेवाईक शेतकरी कुटुंबाती होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये मिसळणे योग्य नाही, असे त्यांच्या जवळचे लोक सांगत होते. मात्र शाहू महाराज म्हणायचे की, 'शेतकरी व मजूर वर्गात माझे कुळ वाढले आहे. त्यांच्या विषयी प्रेम व अगत्य असल्याने कुणी काहीही सांगो, माझ्यावर परिणाम व्हायचा नाही. पुढे ते म्हणतात की, 'माझ्या अंतरंगात शिपायीगिरी व शेतकऱ्याचे रक्त खेळत आहे. एका थोर साधुपुरुषाचे उदाहरण देताना शाहू महाराज म्हणतात, "राजवाड्यापेक्षा गरिबाच्या झोपडीत सद्गुण जास्त सापडतात." ते जनसमुदायास उद्देशून म्हणतात की, इमानीपण, बंधुप्रेम, देशप्रीती, राजनिष्ठा, मत्सराचा अभाव असे अनेक सद्गुण मला आपल्या ठिकाणी दिसतात. अशा प्रकारे त्यांनी आपल्या भाषणातून जनसमुदायास स्वबळावर तयार व्हा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. माणगाव जि. कोल्हापूर २२ मार्च १९२० रोजी अखिल महाराष्ट्र अस्पृश्य वर्गाची मोठी परिषद माणगाव येथे भरली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि प्रमुख राजर्षी शाहू महाराज होते. त्यांनी आपल्या भाषणात आपल्या राज्यात अस्पृश्यांवर अत्याचार करणारी शेकडो वर्षाची हजेरी पद्धती नष्ट केली. याचा वृत्तांत दिला असून वेठबिगार पद्धती नाहीशी करण्याचा मानस व्यक्त केला आहे. अस्पृश्यांनी दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्यामागून न जाता आपल्या जातीचाच पुढारी निवडला पाहिजे. असे प्रतिपादन केले आहे. त्यानंतर महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'पंडित' आणि विद्वानांचे भूषण म्हणून गौरव केला आहे.

जातीभेद मोडून आपण सर्व एक होऊ या. दि. १९ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथे श्री उदाजीराव मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या पायाभरणी प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी केलेले हे भाष आहे. "हिंदुस्थानला हजारो वर्षे ग्रासणाऱ्या गुलामगिरीचे मूळ जातिभेदात असून त्याचा नायनाट झाल्याशिवाय आपल्या समाजाची उन्नत्ती होणार नाही." समाज जर सुधारायचा असेल तर सर्वांनी जातीभेद मोडून एकत्र आले पाहिजे. त्यांनी आपल्या भाषणातून जीवन जगत असताना दूरदृष्टी ठेवून जगावे. स्वत:च्या पायापुरते पाहू नका, जातीभेद नष्ट करण्यातच समाजाचे हित आहे. त्यामुळे समाजामध्ये ऐक्य निर्माण होईल देशाच्या उअन्नतीच्या मार्गात जातीभेद हा अडथळा आहे, असे सांगून शाहू महाराजांनी जपानचे उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, "जपानातील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला. म्हणून जपानमध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नत्ती झाली. त्याप्रमाणे ब्राह्मणांनी जातीमत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही." जपानमधील सामुराई लोकांनी एकी केल्यामुळे हे लोक आज संपूर्ण जगामध्ये सर्वच वरचढ आहेत. त्यामुळे त्यांच्या कडून धडा घ्यावा असेही ते सांगतात. जातीभेद नाहीसा करण्यास आंतरजातीय विवाह आवश्यक' असे भाषण ३० मे १९२० रोजी नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरुन महाराजांनी केले आहे. अस्पृश्यांचा आत्मविश्वास वाढविताना ते म्हणाले होते की, तुम्हास अस्पृश्य माणणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुद्धिवान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी तुम्ही आहात. शिवाय त्यांनी समाजाचे नेतृत्व, धर्माचे स्थान, इंग्रजांची धोरणे, राष्ट्रैक्य, सामाजिक समता, जातिभेद, अस्पृश्यांना समान संधी अशा अनेक प्रश्नांचा एकत्रित ऊहापोह या बहिष्कृत समाज परिषदेत केला आहे. पुढे ते भाषणात म्हणतात की, "आपल्या देशाची प्रगती, जातीभेद ज्या प्रमाणावर नाहीशी होईल, त्यावर अवलंबून असून तो नाहीसा करण्याचा प्रभावी उपाय म्हणजे भिनभिन्न जातीचे शरीरसंबंध विस्तृत प्रमाणावर होणे हा होय." शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाह घडून येणे गरजेचे आहे, असे म्हटले आहे. दोन भिन्न समाजातील स्त्री-पुरुष एकत्र येतील तेव्हा एक समाज दुसऱ्या समाजाशी नातेसंबंधाने जोडला जाऊन किमान दोन समाज एकत्र येऊन, दोघांमध्ये दोन समाजांमध्ये सलोखा निर्माण होईल, अशी इच्छा शाहू महाराजांची होती. तसेच स्वबळावर कोणतेही चांगले निर्णय तुमीच घ्या, कोणावरही अवलंबून राहू नका असे ते म्हणतात. शाहू महाराजांनी या भाषणातून धर्म म्हणजे काय? धर्माचे प्रयोजन कोणते आहे हे सांगितले आहे. "धर्म म्हणजे देवाजवळ पोचण्याचा मार्ग आहे. निरनिराळया देशात व परिस्थितीत उत्पन्न झालेल्या धर्माचाही उद्देश असा की, भिन्न भिन्न रस्त्यांनी मुख्य शहरास पोचणारे लोकांना एकमेकांचा द्वेष करण्याचे जसे कारण नसते, तसेच

निरनिराळे धर्म पाळून ईश्वराजवळ पोचणारे लोकांनी तरी परस्पराचा द्वेष का करावा?" शाहू महाराजांच्या विचारांची पातळी येथे दिसून येते आणि त्यांचा हा विचार शंभर टक्के बरोबर आहे. ईश्वराने सर्व मानव जातीला जन्माला घातले आहे. मात्र मानवाने आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याला गुलाम बनविण्यासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्था स्थापन केली, हे फक्त मानवामधेच आहे. पशू, प्राण्यामध्ये, पक्ष्यामध्ये या गोष्टी दिसून येत नाहीत. ब्राह्मणाला गुलाम पाहिजे होते, म्हणून त्यांनी असा भेद केला होता, हे स्पष्ट होते. शाहू महाराज म्हणतात की, 'इंग्रजांनी काही नोकऱ्या व धंदे हे विशिष्ट समाजापुरते राखीव ठेवले होते. ते मोडीत काढल्याचे सांगतात. सरकारी नोकरीत महार, मांग, ख्रिश्चन आणल्यामुळे ब्राह्मणांचे पित्त खवळले होते. ज्यांची पात्रता होती त्यानाच नोकरीत सामावून घेतल्यामुळे ब्राह्मणांना दु:ख झाले होते. महाराजांना हे अपेक्षित होते की, स्वत:ला उच्च म्हणविणारे हे ब्राह्मण व इतरांनी जातीभेद मोडला पाहिजे. सर्व धर्म, सर्व मान समान हे तत्व अमलात आणावे असेही ते आपल्या भाषणात म्हणतात. शेवटी समारोपाच्य भाषाणात ते म्हणतात, 'रो दुसऱ्यावरी विश्वासला । याचा कार्यभार बुडाला । तो आपणाचे कष्टत गेला ॥ तोचि जाण भला ॥ याप्रमाणे स्वत:चेच भले करुन घ्यावे. वाटेत कायमच काटे असतात म्हणून का वाट चालूच नये? त्या काट्यांचे घाव सोसून चालत गेल्याने ईप्सित साध्य करता येते असे मत आहे.

सामाजिक नीतीमत्तेची वाध हे समाज सुधारणेचे महत्वाचे अंग आहे, असे उद्‌गार कर्नाटक हुबळी येथे दि. २७ जुलै १९२० रोजी भरलेल्या कर्नाटक ब्राह्मणेत्तर सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना शाहू महाराजांनी काढले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या भाषणात ब्राह्मणवर्गाने मत्स्यपुराण, महाभारत इत्यादी धार्मिक ग्रंथात बनावटी कथा घालून हिंदू समाजाचे अध:पतन कसे केले आहे, हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. ब्राह्मणी कावा असा होता की, त्यांच्याकडे खरे असे काहीच नव्हते. जे होते ते संपूर्ण बनावटीचे असून तेच खरे आहे, असे लोकांत सांगून त्यांची अवनती केली. मद्यपान, बालविवाह, जुलमाचे वैवध्य, देवास मूल वाहणे या वाईट प्रथाही त्यांनीच समाजात रुढ केल्या आहेत. यामुळे हिंदू समाजाची सामाजिक, मानसिक, बौद्धिक घसरण झाले. "महाराजांनी त्यांच्या भाषणात पुराण –महाभारतातील अश्लिलता कथन केली आहे. त्याबरोबरच ब्राह्मणांमुळेच जैन व लिंगायत समाजाचे धर्मांतर झाले. सामाजिक नीतिमत्ता सर्वांकडे असायला हवी. "शीलवान नागरिकांशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे या गोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे; परंतु केवळ शारीरिक शौर्य, वीर्य कितीही अंगात असले तरी नीतिमत्तेची अवनती झाल्याबरोबर रोमसारखी बलाढ्य राष्ट्रेही कशी रसातळास मिळाली, हे आपण विसता कामा नये. ब्राह्मणांनी असे सांगितले आहे. देशवासीयांना इतके भोळे भाबडे बनविले होते की, तत्कालीन परिस्थितीपासून आजपर्यंत ब्राह्मण समाजाने अंधश्रद्धा, कर्मकांड, गंडेदोरे इत्यादी मर्गांनी भुलवून त्यांची संवेदनशीलता काढून घेतली होती. त्यांना जागृती आणण्याचे काम शाहू महाराजांनी आपल्या भाषणातून करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी हिंदू-मुसलमान एक आहोत, त्यांनी अलग होऊ नये, तसेच भेदभाव मोडून बंधुप्रेमाने वागावे असे सांगतानाच सामाजिक ऐक्य व धार्मिक सहिष्णुता घडविणे हेच ब्राह्मणेत्तरांचे ध्येय असे मत व्यक्त केले.

शाहू, फुले आणि आंबेडकर या त्रिमुर्तींनी महाराष्ट्र घडविला आहे. जसे शाहूंचे आदर्श फुले, आंबेडकरांचे आदर्श शाहू ही साखली अतुट असल्याचे दिसून येते. शाहू महाराजांनी उच्चवर्णीयांचा रोष्ट पत्करुन अस्पृश्योद्धाराचे कार्य केले आहे. त्यांच्या प्रत्येक सभा, संमेलन, परिषदेतील भाषणामध्ये अस्पृश्योद्धार, प्रामुख्याने दिसून येतो. समाजातील वर्णव्यवस्था, वर्णाश्रमावर आधारित रचना घालविण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. आंतरजातीय विवाह हे जाती व वर्ण नाहीसा करण्याचा मार्ग असल्याचे शाहू महाराजांनी सांगत असल्याचे जाणवते. प्रत्येक समाज एक असून मानवता हा एकच धर्म पाळावा असे सांगताना शाहू महाराज दिसून येतात.

**संदर्भग्रंथ**

1. पवार, जयसिंगराव, 'राजर्षी शाहू स्मारकग्रंथ', कोल्हापूर महाराश्ट्र इतिहास प्रबोधिनी, प्रथमावृत्ती २००१, पृ. ८१७.
2. गायकवाड, प्रदीप संपा., 'राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे', नागपूर, क्षितिज पब्लिकेशन्स, पाचवी आव्रुत्ती, २०११, पृ. १८.
3. जाधव, भगवा, 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे', लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००४, पृ.१२.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक कार्य

**प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे**

प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,वेश्वी,

ता .अलिबाग, जि.रायगड.

milind.ghadge28@gmail.com

**प्रस्तावना –**

भारतामध्ये स्त्री उद्धाराच्या चळवळीची सुरवात प्राचीन काळात गौतम बुद्धानी केली. आधुनिक काळात म्हणजे १८ व्या शतकात युरोपातील प्रबोधनाचे वारे भारतात वाहू लागले. या प्रबोधनात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणेच्या कार्यात वाहून घेतले. राजा राम मोहन रॉय यांनी समाजसुधारणेची सुरुवात केली असली, तरी या बाबतीत महात्मा फुलेंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. केशवचंद्र सेन, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले अशा अनेक नावांची वर्णी लागते, परंतु स्त्री सुधारणेच्या बाबतीत महात्मा फुलेंचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे –

१) महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक सुधारणांचे मूल्यमापन करणे.
२) महात्मा फुलेंचे स्त्री शिक्षणविषयक कार्य समजून घेणे.
३) डॉ. बाबासाहेबांनी स्त्री सुधारणेसाठी केलेले कार्य अभ्यासणे.

## शोधनिबंधाची गृहीतके –

१) वर्णव्यवस्थेतून व जातीव्यवस्थेतून अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या.
२) महात्मा फुलेंनी ब्राह्मणी संस्कृतीला सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून पर्यायी संस्कृती उभी केली.
३) महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर भर दिला.
४) हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना सामान अधिकार प्राप्त झाला.

## विश्लेषण –

### महात्मा फुलेंचा स्त्री- पुरुष विषमतेला नकार –

धर्मग्रंथे, पुराणे यांच्याद्वारा संस्कृती व्यवहाराची उभारणी करून जातीसंस्था व पुरुष प्रधानता यांचे पोषण ब्राह्मण धर्माने केले. महात्मा फुले यांनी या ग्रंथ आणि पुराणांनाच हल्ल्याचे लक्ष बनवले. ब्राह्मणी वर्चस्व, जातीसंस्था आणि स्त्रियांवरचा अन्याय समाजात दृढ करण्यासाठी अनेक प्रकारचे लेख ब्राह्मणांनी धर्म ग्रंथात लिहिले असे त्यांचे विवचन आहे.

१) धाडसी पुरुषांनी आपल्या जातींच्या स्वार्थासाठी बनावट, मतलबी धर्मपुस्तकात स्त्रियांविषयी असे आपमतलबी लेख करून ठेवल्यामुळे स्त्रियांना अन्यायाने वागविले जाते.

२) अशी महात्मा फुलेंची मीमांसा आहे.स्त्रीयांसाठी शय्या, आसन, अलंकार, काम, क्रोध, कुटीलता, द्रोहभाव व दुराचारण या गोष्टी मनुने सांगितल्या.

३) 'स्त्री स्वभाव' व 'स्त्री चरित्र' या रचीतांमधून ब्राह्मणी व्यवस्थेने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना दुर्गुणी व व्यभिचार धार्जिणी ठरवले आहे. याविरोधात महात्मा फुले यांनी स्त्रियांची बाजू घेतली. पुरुषसत्ताक ब्राह्मणी धर्माने पुरुषांच्या सद्गुणी प्रतिमेचा जो भ्रम उभा केला होता तो दूर केला आणि पुरुषांच्या स्वभावातील दोषच चव्हाट्यावर मांडले. स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन जास्ती भयंकर, धाडसी दूष्ट कर्मे आचरणारे आहेत असे सांगून त्या तुलनेत त्यांनी स्त्रियांची मूलतः प्रेमळ, सदाचारी, भिडस्त अशी सद्गुणी प्रतिमा उभी केली.

### महात्मा फुले यांचे स्त्री- शिक्षणविषयक कार्य–

स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करायचे असेल तर तिला आजपर्यंत बंद केलेले शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले पाहिजेत असे महात्मा फुलेंनी ओळखले. त्यामुळे त्यांनी मुलींची पहिली शाळा पुणे येथे ई.स. १९४८ साली सुरु केली.

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व दिले होते. स्त्री शिक्षिका झाली तर तिचा उद्धार होईल, आत्मप्रतिष्ठा लाभेल आणि तिची सर्वांगीण गुलामगिरीतून मुक्तता होईल असा निष्कर्ष महात्मा ज्योतीराव फुले यांनी काढला. स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना फुले उद्गार काढतात. स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले पूर्ण विचारांनी माझे असे मत झाले कि पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांची शाळेची अधिक आवश्यकता आहे.

मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन आईकडून व्यवस्थित होऊ शकते. स्त्रियांना आपल्या कार्तव्याची जाणीव झाली तर देशाची प्रगती झपाट्याने होईल असे म.फुले यांना वाटल्यामुळे त्यांना स्त्री शिक्षणावर भर दिला. स्त्री शिक्षणाचे महत्त्व म. फुले यांनी जाणले होते. इतरांनाही ते पटावे म्हणून आपली पत्नी सावित्रीबाई यांचे शिक्षण सुरु केले आणि मुलींसाठी शाळाही काढली. अशा प्रकारचे कार्य करीत असताना त्यांना फार त्रास सहन करावा लागला. अपमान सहन करावा लागला परंतु ते आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. हिंदू धर्म शास्त्राच्या मतानुसार शूद्रांना व स्त्रियांना विद्या ग्रहण करण्याचा अधिकार नव्हता. स्त्रियांना व शूद्रांना अज्ञानामध्ये ठेवण्यामागे ब्राम्हणांचा स्वार्थ होता. स्त्री व शुद्रातीशुद्र अज्ञानी राहिल्यामुळे ब्राह्मण जे सांगतील त्यावर ते विश्वास ठेवत व दानधर्माचे पालन करत असत, अज्ञाणामुळे व कर्म कांडांमुळे स्त्रियांची अवनती झाली होती.

**महात्मा फुलेंचे स्त्री विषयक इतर कार्य–**

महात्मा फुले यांनी स्त्री शोषणाविरुद्ध आवाज उठवला व ते शोषण थांबवण्यासाठी आपल्या पत्नीला बरोबर घेऊन जीवापाड प्रयत्न केले. स्त्रियांच्या सर्व समस्यांच्या त्यांनी सखोल अभ्यास केला व प्रत्येक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला त्यांनी विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले. सतीप्रथा, केशवपन, स्त्री भृण हत्या, हुंडापद्धती, बहुपत्नीत्व अशा प्रकारच्या स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या प्रथाचा धिक्कार केला. त्यांनी जबरदस्तीने मातृत्व लादल्या गेलेल्या कुमारी मातांचे पुनर्वसन करण्यासाठी खूप प्रयत्न केले. पुरुषांच्या ढोंगीपणा, स्वार्थीपणा यावर हल्ले चढवले. स्त्रियांची वागणूक ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ चांगलीच असते अशा प्रकारचे लेखन म. फुले यांनी केले व स्त्रीवादी इतिहासलेखनाची पायाभरणी केली. त्यांनी स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व गुलामगिरी नष्ट करण्याचा एकच उपाय आहे तो म्हणजे शिक्षण होय असे समजावून देण्याचा प्रयत्न केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक कार्य–**

भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कार्यानेच तर 'महामानव' ठरले अशा ह्या महामानवाने तत्कालीन मनुवादी व्यवस्थेतील स्त्री सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक बंधने व पुरुषप्रधान संस्कृतीतून निर्माण झालेल्या पारतंत्र्यातून वाटचाल करीत होती. या परिस्थितीतून जे दुखः वेदना, समस्या, गुलामी, आणि त्यातून तिचे अधःपतन घडून आले. या मनुवादी व्यवस्थेच्या बंधनातून स्त्रियांची सुटका व्हावी, व तिला सामाजिक, आर्थिक राजकीय शैक्षणिक धार्मिक स्वातंत्र्य मिळावे, तिचे अध:पतनकरणाऱ्याबंधनातून ती मुक्त व्हावी व तिच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, स्वप्रगती करून आनंदी जीवन जगावे त्यातून स्त्रीयांची उन्नतीच नाही तर कुटुंबसमाज व एकुणच देशाची प्रगती झपाट्याने होईल. डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी स्त्री सुधारणेसाठी जे कायदे संमत केले ते अत्यंत महत्वपूर्ण आहेत.बेद्ध धर्म हा स्त्रीयांच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे मत होते त्यांनी स्त्री स्वातंत्र व स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला होता स्त्री उद्धारासाठी स्त्रीयांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न केला.

**स्वावलंबन व स्त्री शिक्षण-**

स्त्री स्वावलंबनाच्या मार्गात परावलंबित्व हा फार मोठा अडथळा आहे. त्यामुळे स्त्रीयांची अधोगती होते. स्त्रियांना स्वाभिमानाने जगण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. समाजाची व राष्ट्राची प्रगती ही स्त्रीयांच्या प्रगतीवर अवलंबून असते. स्त्रियांच्या प्रगतीवरूनच समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. म्हणून स्त्रीशक्ती संघटीत होणे गरजेचे आहे असे डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी महिलांचे नेतृत्व विकसित करण्याच्या प्रयत्न केला. महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानलेल्या डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. त्याचे कारण म्हणजे एक पुरुष शिकला तर एक व्यक्ति सुधारते. पण एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंबाची सुधारणा होते त्यामुळे कुटुंबातून समाज आणि समाजातून राष्ट्र घडले. या दुरदृष्टीनेच त्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली व विद्यालयात जास्त संख्येने मुलींना घेता यावे यासाठी महाविदयालय ते शहर अशी बस सेवा ही उपलब्ध केली. या शैक्षणिक कार्याचा परिणाम म्हणजे जाईबाई चौधरी या स्त्री ने ई.स. १९२५ साली संत चोखामेळा ही मुलींची शाळा काढली. अंजनाबाई देशभ्रतार यांनी आपल्या पतीबरोबर मुलींच्या वस्तिगृहाची धुरा सांभाळली. शांताबाई दाणी यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेऊन बाबासाहेबांच्या स्त्री शिक्षणाला गतिमान केले.आज विविध क्षेत्रात स्त्रिया वेगवेगळ्या पदावर डॉक्टर, वकील, न्यायाधीश, आय.ए.एस, इंजीनिअर,

शिक्षक, सरकारी अधिकारी, पायलट, अशा अनेक महत्त्वपूर्ण जागांवर सन्मानाने सेवा बजावतात. याचे श्रेय डॉ. बाबासाहेबांनी त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्यानेच शक्य झाले.

**स्त्री कामगार विषयक धोरण –**

ई.स. १९४२-१९४६ या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे कामगार मंत्री होते तेव्हा स्त्रीकामगाराचे अनेक प्रश्न मार्गी लावले. स्त्री कामगारांस प्रस्तुती पूर्व रजा आणि आर्थिक सहाय्य संबंधिक भत्ता द्यावा. कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या पुरुष कामगार व स्त्री कामगारांना सामान वेतन देण्यात येईल. खाणक्षेत्रात स्त्रीकामगाराला काम करण्यास मनाई केली होती. परंतु डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या आर्थिक स्थितीचा विचार करून स्त्रीसुद्धा पुरुषांप्रमाणेच काम करू शकते हे सिद्ध केले. त्यामुळे खाण कामगार स्त्रिया आर्थिक सक्षम बनल्या. स्त्री पुरुष समान मजुरी तत्व प्रथमतः कोळसा खाणीतील कामगारांच्या बाबतीत स्वीकारले गेले. कोळसा खाणीत स्त्री कामगारांसाठी कुलुपासह कपाटांनी युक्त अशी स्नानगृहे बांधण्याची मालकावर कायदेशीर बंधने घालण्यासाठी त्यांनी केंद्रीय विधी मंडळ बिल आणले. व ते पास करून घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे तळागाळातील शोषित, पिडीत स्त्रियांना या महान क्रांतीमुळे नवे स्वतंत्र, नवा चेहरा मिळाला. स्त्री मुक्तीला कायद्याचे बळ मिळाले. स्त्री मुक्ती म्हणजे मानवमुक्ती होय.

**हिंदू कोड बिल –**

स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे यासाठी हिंदू कोड बिल म्हणजे भारतीय स्त्रियांच्या समग्र स्वातंत्र्याचा म्याग्नाचार्टाहोते. सर्व जातीधर्माच्या स्त्रियांचा विचार करून अधिकार प्रधान केले. सर्व भारतीय स्त्रीयांना स्वातंत्र्य, सन्मान व हक्क मिळवून दिले ते पुढीलप्रमाणे

१) स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार दिला.

२) नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळावी.

३) व्यक्तीचा एक विवाह कायदेशीर असल्यास व दुसरा विवाह योग्य कारण नसल्यास अवैध ठरून स्त्रीला स्थैर्य दिले.

४) स्त्रीला दत्तक घेण्याचा व दत्तक देण्याचा अधिकार दिला.

५) स्वतःच्या मिळकतीवर स्त्रीला अधिकार दिला.

६) वडिलाच्या मिळकतीत मुलाच्या बरोबरीने मुलींना समान हिस्सा दिला

७) मुलीला वारस होण्याचा अधिकार दिला.

८) आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली.

९) स्त्रीला स्वतःला वारसा निश्चित करण्याचाही अधिकार मिळाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या हिंदु कोड्बिलामुळे भारतीय स्त्रियांचा विकासाचा, प्रगतीचा, उन्नतीचा मार्ग मोकळा झाला.

**सामाजिक चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग –**

सामाजिक चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केले. याचा परिणाम म्हणजे ई.स. १९२७ च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्यागृहात मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा सहभाग झाला. ई.स. १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये ही स्त्रियांनी सहभाग घेतला.

जनता या वृत्तपत्राच्या कार्यकारणीवर सावित्रीबाई बोराडे आणि अंबूबाई गायकवाड या स्त्रियांची निवड करून स्त्रियांनी संघटीत करण्याचा प्रयत्न केला अखिल भारतीय दलित वर्ग परिषद व ई.स. १९०२ च्या नागपूरच्या परिषदेत स्वतंत्र महिलांचे अधिवेशन घेण्यात आले त्या काळात आंबेडकरांचे विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम सुलोचनाबाई डोंगरे, शांताबाई दाणी, मीराताई आंबेडकर, जाईबाई चौधरी, राधाबाई कांबळे, गीताबाई गायकवाड यांनी केले.

**कुटुंब नियोजनाचे महत्त्व –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८० वर्षापूर्वी समाजाला छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देऊन आपल्या दुरदृष्टीची ओळख करून दिली.

**निष्कर्ष –**

१) भगवान बुद्ध, महात्मा फुले, शाहू आंबेडकर त्यांनी स्त्री – स्वातंत्र्याचा पुरस्कार करून स्त्रियांना हक्क मिळवून देण्यासाठी मोठे प्रयत्न केले.

२) स्त्रियांना लादलेले पारंपारिक पारतंत्र्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी झुगारून लावले आणि स्त्रियांना नवस्वातंत्र्याच्या प्रवाहात आणले.

३) म. फुले यांनीही स्त्रीवादी सुधारणा चळवळीमध्ये मोलाचा वाटा उचलला आहे.
४) म. फुलेचा स्त्री सुधारणेचा हा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अधिक गतिमान केला.

**संदर्भ सूची -**

१) आ.ह. साळुंखे, डी आहे- पुस्तके परीक्षण आणि मनुस्मृती, सत्यशोधक मार्क्सवादी फेब्रु, मार्च १९२ मधून उद्धृत
२) डॉ. बगाडे उमेश, महात्मा फुले आणि पर्यायी संस्कृती एम. फ्ली थिसीस, पुणे विद्यापीठ पुणे १९९२ मधून उद्धृत पृ. ६५
३) महात्मा फुले, समग्र वाङ्मय पृ. १०
४) महात्मा फुले, ब्राह्मणांचे कसब पृ. १०
५) तमैव
६) डॉ. डाहाट धनराज (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे व विचार खंड १, संकेत प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. १८
७) गवळी, हिवराळे, गव्हाणे (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९९१, प्र.क्र. ५०१, ५२६
८) डॉ. गाठाळ एस. एस. आंबेडकरी चळवळीच्या इतिहास कैलास पब्लिकेशन औरंगाबाद २०१०, प्र. क्र. २७४
९) डॉ. ठाकूर भगवान आंबेडकरी साहित्य, स्थिती आणि स्थित्यंतरे,आकांक्षा प्रकाशन नागपूर, ११ एप्रिल २००९, प्र. ४७
१0) मागाडे बाळासाहेब (संपा) समग्र बाबासाहेब थिंक टांकपब्लिकेशन सोलापूर २०१६, प्र.क्र. १३२
११) मुन वसंत हरी नरके (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८, भाग २, मुंबई २००२, प्र.क्र. २३७

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, जनविकास महाविद्यालय, बनसारोळा,**ता. केज, जि. बीड.**

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'स्टेट ॲण्ड मायनॉरिटिज' या ग्रंथामधून भारताच्या विकासाची अर्थनिती याबाबतीत विचार मांडलेले ओहत. स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासाची अर्थनीती कशाप्रकारे असली पाहिजे या दृष्टीने आंबेडकरांनी असे स्पष्ट केले आहे की देशाच्या विकास नितीमध्ये प्रामुख्याने गरिबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषणमुक्त समाज या घटकांवर अधिक भर देणे गरजेचे आहे.

सरकारने आर्थिक व्यवहारांचे योग्य प्रकारे नियोजन करावे त्यातून खासगी उपक्रमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त कशी राहील याचा प्रयत्न केला जावा तसेच समाजामध्ये साधनसंपत्तीचे न्याय व समान वाटप होईल असेही त्यांनी मत मांडले. डॉ. आंबेडकरांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. भांडवलाची कमतरता, परंपरागत कृषी, समाज, प्रादेशिक विषमता आणि दारिद्र्य हे आंबेडकरांच्या विकासाच्या अर्थनीतीमधील प्रमुख घटक होत. शेतजमीन आणि अवजड उद्योग यावर मात्र सामुदायिक मालकी असावी आणि लोकशाहीच्या आधारावर उत्पादनाचे वाटप भेदभाव न होता व्हावे अशी त्यांची भूमिका होती. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा व त्याबाबतीतील भूमिकेचा आढावा घेतलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.
2. डॉ. आंबेडकरांच्या शेतीसंबंधी विचारांचा आढावा घेणे.
3. डॉ. आंबेडकरांच्या उद्योगासंबंधीच्या विचारांचा अभ्यास करणे.
4. डॉ. आंबेडकरांची राज्य समाजवादाची संकल्पना अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

1. भारताचा औद्योगिक विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास औद्योगिक प्रगती साध्य होईल परंतु संपत्ती व उत्पादनाचे समानतेने वाटप झाले तरच हे शक्य होईल.
2. भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत जमीनदार व व्यापारी वर्ग हे शेतकऱ्यांचे शोषण करतात.
3. अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेत जमिनीचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करावे आणि सामुदायिक पध्दतीने शेतीच्या लागवड पद्धतीचा अवलंब करवा.

**संशोधनपद्धती :**प्रस्तुत शोधनिबंधासाठी, द्वितीयक स्त्रोतांतर्गत संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र इ. चा आवश्यकतेनुसार वापर केलेला आहे.

**विश्लेषणात्मक बाजू :**

**डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणातून व्यक्त झालेले दिसतात. स्वतंत्र विचार मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यात त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात.

भारतीय रूपयाचा प्रश्न मांडताना भारताचा रूपया आणि इंग्लंडचा पौंड यांच्या संबंधाचा अभ्यास त्यांनी केली. डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी 'रूपयाचा प्रश्न' हा प्रबंध लिहिला यात भारताच्या रूपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मिमांसा सादर केली.''भारतीय रूपयाची जडणघडण ही सुवर्ण परिमाणात असावी की सुवर्ण परिमाणात असावी याबाबत वाद निर्माण झाला हाता. सामान्यपणे सुवर्ण परिमाणात सोन्याच्या नाण्यांचा देवाण घेवाणासाठी वापर करण्यात येतो तर सुवर्ण विनिमय परिमाणात कागदी चलनाचा वापर होतो.''[१]

या दोन परिमाणापैकी कोणते परिमाण भारतासाठी योग्य आहे याबाबत अर्थशास्त्रज्ञात वाद चालला होता. प्रा. किन्स यांनी सुवर्ण विनिमय परिमाणाचा पुरस्कार केला त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाण हे लवचिक असल्याने भविष्यकालीन, अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल. डॉ. आंबेडकरांनी किन्सच्या विचाराला विरोध केला. त्यांनी असा विचार मांडला की सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहू शकत नाही या पध्दतीने लवचिकता हा गुणधर्म जरूर असेल, परंतु यात चलन निर्मितीवर कोणत्याही मर्यादा राहणार नाहीत चलनात वाजवीपेक्षा जास्त वाढ झाली तर त्यामुळे भाववाढ होईल. परिणामी रूपयाची किंमत कमी होईल आणि त्यातून विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान अस्थिर होऊ शकेल हे त्यांनी दाखवून दिले.

डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता की चलन निर्माण करणाऱ्या संस्थेवर अंकुश आवश्यक आहे. नाही तर ही संस्था वाटेल तेवढा चलनाचा पुरवठा करेल. चलन पुरवठा वाढला की, भाववाढ होईल, भाववाढ मोठ्या प्रमाणात

झाली की आर्थिक स्थैर्य धोक्यात येईल. थोडक्यात रूपया आणि पौंड याचा संबंध भारतावर भार टाकणारा होता. तर ब्रिटिशांचा फायदा करणारा होता.

**शेतीसंबंधिचे विचार :**

डॉ. आंबेडकरांनी कृषीविषयक दृष्टीकोन अभ्यासात असताना भारतीय शेतीचे धोरण, क्षेत्र, नापीक व पडीक जमिनीचा विचार, जमीन महसूल, सामुदायिक शेती, सहकारी शेती, महारवतन, खोतीपध्दती इ. घटकांचा समावेश केलेला दिसतो.

**शेतीचे लहान धारण क्षेत्र व त्यावरील उपाय :**

डॉ. आंबेडकरांनी आपल्या १९१८ मध्ये लिहिलेल्या Small Hoding in India and their Remedies या ग्रंथातून भारतीय शेतीमधील लहान धारणक्षेत्राची समस्या व त्यावरील उपाय मांडलेले आहेत. ''लहान धारणक्षेत्रे निर्माण होण्यास वारसा हक्क ही बाब जबाबदार नसून वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा भार हेच प्रमुख कारण आहे. ब्रिटिश राजवटीमध्ये भारतातील अनेक छोटे—मोठे उद्योग तसेच हस्त उद्योग बंद पडल्यामुळे त्यामधील लोकांना पुन्हा शेतीकडे वळावे लागले. त्याचा परिणाम म्हणून शेतीचे तुकडीकरण झाले. मात्र अशा शेतीच्या तुकडीकरणाला ब्रिटिशांचे धोरणच कारणीभूत आहे.''[२] असे डॉ. बाबासाहेबांनी आपल्या विचारातून स्पष्ट केले. जमिनीच्या लहान आकारमानावर एक उपाय सूचवला तो म्हणजे सामुदायिक शेती पध्दतीचा पडीक जमीन लागवडी खाली आणणे व शेतकऱ्यांना जमिनीची मालकी न देता, सरकारने जमिनीच्या मालकी आपल्याकडे ठेवावी.

**खोती पद्धती :**

ब्रिटिश राजवटीमध्ये रत्नागिरी, कुलाबा इ. ठिकाणी जमीन कसण्यासाठीची खोती पध्दती अस्तित्वात होती. त्यात कनिष्ठ जातीच्या कुळाचे व ग्रामीण जनतेचे खोतांकडून अमानुषशोषण होई. खोत हे उच्च जातीतील होते. या खोती पध्दतीत सरकार व जमीन कसणाऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसे त्यामुळे खोती पध्दतीत जमीन महसूल गोळा करण्याचे काम खोत करत व त्यातून सरकारकडे शेतसारा भरत हा खोत शेतकऱ्यांची पिळवणूक करत असे. खोताची अनेक कामे शेतकऱ्यांना करण्यास भाग पाडले जात असे. डॉ. आंबेडकरांनी या खोती पध्दतीविरूध्द आवाज उठवून जमीन कसणाऱ्यांना कूळवहिवाटीचे हक्क मिळावेत व त्या जागी रयतवारी पध्दती आणावी यासाठी त्यांनी मुंबई विद्यापीठात १९३७ मध्ये खोती पध्दती रद्द करण्यासंबंधी विधेयक मांडले.

**जमीन महसूल :**

ब्रिटिश राजवटीमध्ये शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात जमीन महसूल आकारला जात असे. जमीन महसूल आकारताना सर्वांकडून एकाचदराने तो आकारला जात असे हे आंबेडकरांना मान्य नव्हते. त्यांच्या मते जमीन महसूलाची आकारणी शेती उत्पन्नाच्या प्रमाणात केली जावी, कमी शेती उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन महसूल माफ केला पाहिजे. जमीन महसूल अन्यायकारक असल्याने शेती उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो त्यामुळे शेतीचा विकास होत नाही. असे आंबेडकरांचे मत होते.

**उद्योगासंबंधि विचार :**

भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकरण गरजेचे आहे. देशामध्ये उद्योगधंद्याचा विकास करीत असताना औद्योगिकरणातून आर्थिक विषमता व आर्थिक संपत्तिची मक्तेदारी किंवा विकेंद्रीकरण होता कामा नये. तसेच प्रादेशिक औद्योगिक असमतोलकी होता कामा नये. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण झाल्याने त्यावर शासनाचा मालकी हक्क प्रस्थापित झाल्यामुळे त्या उद्योगधंद्यावर शासनाचे नियंत्रण असते. त्यामुळे उत्पादनात वाढ होईल, कामगारांना योग्य वेतन मिळेल, व्यक्तिला सामाजिक, आर्थिक सुरक्षितता मिळेल, असे बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

भारताचा औद्योगिक विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास औद्योगिक प्रगती साध्य होईल. राष्ट्रीय उत्पादनात वाढ होईल त्यामुळे लोकांची आर्थिक स्थिती सुधारून दारिद्र्य कमी होईल. परंतु यासाठी संपत्ती व उत्पादनाचे वाटप समानतेने होणे गरजेचे आहे. उद्योगाचा विकास होवून उत्पादनाचे प्रमाण वाढले परंतु उत्पादित वस्तूचे वितरण समानतेने झाले नाही तर दारिद्र्य दूर होणार नाही केवळ शेतीच्या आधारावर देशाची प्रगती होणार नाही तर त्यासाठी औद्योगिकरण आवश्यक आहे असे मत डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

**राज्य समाजवादी संकल्पना :**

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी विवेकी मार्ग स्विकारला पाहिजे. या मार्गाचा अवलंब करताना संतुलनाचे भान असले पाहिजे. समाजातील एका घटकावरील अन्याय दूर करताना इतरांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व घटकांना विकासासाठी सर्व क्षेत्रांत संधी देणे होय. डॉ. आंबेडकरांना समाजवाद मान्य आहे. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य नाकारणारा, धर्म नाकारणारा, हुकुमशाहीनिष्ट समाजवाद त्यांना मान्य नाही. राज्य समाजवादाच्या संकल्पनेतून समाजातील आर्थिक विषमता दूर होऊन देशाची अर्थव्यवस्था सुधारेल असे स्पष्ट केले.

वरील अभ्यासावरून खालील निष्कर्ष समोर आली.

**निष्कर्ष :**

1. देशातील संपत्ति व उत्पादनाचे समानतेने वाटप झाले तरच औद्योगिक प्रगती होईल तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याने औद्योगिक विकास होईल.
2. चलनवाढीचा परिणाम भाववाढीवर होतो त्यामुळे आर्थिक स्थैर्य धोक्यात येते.
3. सामुहिक शेती पध्दतीचा स्विकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन होईल.
4. देशात औद्योगिकरणावर भर दिल्यास शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होण्यास मदत होईल.
5. भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत जमीनदार व व्यापारी वर्ग हे शेतकऱ्यांचे शोषण करतात.

**संदर्भसूची :**

१. प्रा.ए.आर. रायखेलकर — जून २००५ — ''आर्थिक विचारांचा इतिहास'', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ २७५.
२. डॉ. अनिलकुमार वावरे, संजय धोंडे, डॉ. अनिल सत्रे — जून २०१५ — ''आर्थिक विचारांचा इतिहास'', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ. १२२.
३. प्राचार्य म.ना. कांबळे — २००२ — ''डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि भारतीय जाती समाज'', विश्वकर्मा असोशिएटस, पुणे, पृष्ठ. ६.
४. डॉ. एस.एम. खंदारे — २०११ — ''जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास'', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृष्ठ. ३५०.
५. प्रा.डॉ. शुभांगी राठी — २०१६ — ''भारतीय राजकीय विचारवंत'', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृष्ठ. २३८.
६. प्रा. रायखेलकर/दामजी — २००३ — ''भारतीय अर्थव्यवस्था'', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

**डॉ. सय्यद रब्बानी रशीद**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण ता. कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना:—**

अनेक कारणांनी भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोर अनेक प्रश्नचिन्हे आहेत. आज आपण ज्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थितीतून पुढे जात आहेत त्या स्थितीचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही या संकल्पनेतील आशय आपण कसा गमावत आहोत, याचाच प्रत्यय येतो. डॉ. आंबेडकरांना या देशात राजकीय लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक लोकशाहीची प्रस्थापना करावयाची होती. म्हणूनच ते राजकीय लोकशाहीचे साामाजिक लोकशाहीत परिवर्तन व्हावे यासाठी आग्रही होते. म्हणजेच लोकशाही प्रणालीतून त्यांना या देशातील लोकांच्या जीवनात सामाजिक आर्थिक स्तरावर अमूलाग्र परिवर्तन घडवून आणायचे होते. केवळ निवडणूकीत लोकांना मताधिकार मिळाला म्हणून तेवढयाने यशस्वी लोकशाही साकार होईल, असा भाबडा आशावाद त्यांच्या मनात नव्हता, कारण या देशात अगदी प्राचीन काळापासून जे एक सामाजिक वास्तव अस्तित्वात आहे, ते लोकशाही तत्वांना मारक आहे याची त्यांना जाणीव होती. याच पार्श्वभूमीवर लोकशाहीचा विचार करताना त्यांनी लोकशाहीचे अत्यंत मूलभूत स्वरुपाचे चिंतन वेळोवेळी प्रकट केले. २७ जानेवारी १९१९ रोजी साउथबरो कमिटीसमोर साक्ष देताना केलेल्या निवेदनात डॉ. आंबेकरांनी म्हटले होते की, भारतीय लोक अनेक जातींत व संप्रदायांत विभागले असल्यामुळे मतदान प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो. कोणत्याही प्रादेशिक मतदारसंघात जेव्हा विविध वर्गातील लोकांत निवडणूक होते तेव्हा मतदार हे आपल्या वर्गातील उमेदवारांनाच मतदान करतात. त्यमुळे ज्या वर्गातील मतदारांची संख्या जास्त असते त्याच वर्गातील उमेदवार निवडून येतात. असे उमेदवार इतर वर्गातील लाकांचा विचार करु शकत नाहीत. त्यामुळे आज आपल्या देशात जे प्रभावी राजकीय पक्ष आहेत त्यांचे वारसदार स्वत:ला या देशाचे मालक समजून इतरांना आपले गुलाम समजतात. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना या देशात लोकशाहीची प्रस्थापना करताना धर्म पंथ आणि जातिसमूह या गोष्टी लोकशाही स्थापनेतील धोंड वाटतात. या सर्वांच्या पलीकडे जाउन एक भारतीय मानस घडवले पाहिजे आणि त्यातून देशहिताच्या दृष्टीने उपकारक ठरु शकतील असे निर्णय लोकांकडून घेतले गेले पाहिजे. ही त्यांची भूमिका होती. ते आपल्या विघटनवादी शक्तीचा विरोध करुन भारताच्या एकात्मतेची बाजू मांडताना दिसतात. आपले राजकीय लोक मात्र आपल्या राजकीय मतलबासाठी देशाच्या एकात्मतेला आवश्यक असलेले धर्मनिरपेक्षतेचे तत्व अव्हेरुन जमातवादी राजकारणाचा पुरस्कार करतात.

धर्म आणि जातसमुह यांना राजकारणाचे भांडवल मानून समाजात धृवीकरणाची प्रक्रिया घडवून आणणारे आणि तिला गतिमान करणारे लोक आपली एकात्म भावना खंडित करण्याचे कृत्य करत आहेत, हे राजकारणातील आत्यंतिक व आंधळया भक्तिभावामुळे लोकांच्या लक्षातही येत नाही. उलट पक्षनिष्ठेच्या भूमिकेतून ते त्यासंबंधीचा प्रचंड अभिनिवेश मनात बाळगून असतात. त्यामुळे लोकशाही प्रक्रिया राबवताना राजकीय पक्षांनी त्यांच्या स्वार्थासाठी धर्माचा किंवा जातसमूहाचा वापर करणे हे कसे गैर आहे, ते लोकांना उमगतच नाही. यातून जे मानस लोकांच्या मानसिकतेत आकाराला आलेले असते, ते लोकशाही व राष्ट्हिताच्या दृष्टिने हानिकारक व भयंकर असते. देशहित जपन्याच्या तसेच लोकशाही मूल्यांची बूज राखण्याच्या दृष्टीने म्हणूनच प्रत्येक पक्षाकडे लोल्याणाचा आणि देश व राज्याचा विकासाचा एक निश्चतत कृमिआराखडा हवा. त्या आधारे जनमानस घडवले गेले पाहिजे आणि सत्तेतून तो कृतिकार्यक्रम राबवला गेला पाहिजे. परंतू असे होत नाही. कारण राजकीय पक्षांसह आपले व्यापक जनमानस तसे नाही. प्रजासत्ताक शासनासाठी प्रजासत्ताक समाजाचे असणे आवश्यक आहे. प्रजातंत्राच्या औपचारिम सांगाडयाला काही महत्व नाही. हे वास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या १८ जानेवारी १९४३ रोजीच्या रानडे, गांधी आणि जिना या व्याख्यानात अधोरेखित केले होते.

**संशोधनाची उद्दिष्टे:—**

1. लोकशाहीची व्याख्या अभ्यासणे.
2. लोकशाहीची त्रिसुत्री अभ्यासणे.
3. सहजिवन संकल्पनेचा अभ्यास करणे.
4. राज्यघटना या संकल्पनेचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:—**

कोणतेही संशोधन करण्यासाठी संशोधनाच्या दोन पध्दतीच्या आधारे संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती जमा करावी लागले. प्राथमिक संशोधन पध्दतीमध्ये संशोधनाशी संबंधीत माहिती संशोधन स्वत: गोळा करतो. आणि दुय्यम संशोधन पध्दतीमध्ये संशोधक उपलब्द असलेल्या माहितीचाच उपयोग करतो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधनाच्या दुय्यम साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये संशोधनाशी संबंधीत ग्रंथ, पुस्तके, मासिके, पाक्षिके, त्रैमासिके, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेटवर उपलब्द असलेली माहिती यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**लोकशाहीची व्याख्या:—**

आपली लोकशाहीची व्यख्या व व्याप्ती स्पष्ट करतांना डॉ. आंबेडकरांनी अनेकदा सांगीतले आहे की, लोकांच्या आर्थिक व सामाजिक जिवनात जिच्या द्वारे रक्तपाताशिवाय मुलगामी क्रांतीकारक बदल घडउन आणता येतात असी शासनाची घटण व पध्दती म्हणजे लोकशाही होय. लोकशाही या संकल्पनेचा व पध्दतीचा उदय हा अनियंत्रीत राजेशाह वा हुकूमशाहीच्या विरोधात झालेला असला तरी ती केवळ निशेधत्मक व नकारात्मक स्वरुपातच नांदत नसते. तिची विधायक भूमिका व अशय स्वष्ट करतांना ते म्हणतात की, लोकशाही आपले स्वरुप बदलत असते. एकाच देशात सुध्दा ती आहे त्या परस्थीतीत राहू शकत नाही. तिचे उद्देश बदलात असतात. आधुनिक लोकशाहीचे ध्येय एखादया अनयंत्रीत राजाचे अधिकार कमी करणे एवढेच नसुन लोकांचे कल्यान साधने हे आहे.

**लोकशाहीची त्रिसुत्री:—**

लोकशाही व लोकांचे सार्वभौमत्व या राज्यशास्त्रय संल्पना आसल्या तरी यांच्या प्रस्थापनेसाठी लोकजीवनाच्या सर्व आंगोपांगाची म्हणजे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक अशी सर्वागीन पुनर्रचना, फेरमांडणी आवश्यक आहे, याचेही भान त्यांनी आरंभापासून ठेवले. सर्व मानसे समान आहेत आणि ती समानाधिकारी आहेत. हे वैचारिक सुत्र त्याकाळी स्वत:ला श्रेष्ठ समजनाऱ्या प्रस्थापीतांना व सत्ताधाऱ्यांना ठनकाउन सांगणे आवश्यक आहे. हे जानून त्यांनी आपल्या विद्रोही 'भुमिकांचे दर्शन आपल्या विपुल लिखानातुन, भाषनातुन व शक्य तेव्हा लोकांच्या सामोहीक कृतितून दिलेले आहेच, पण त्याहीपेक्षा या शोषीत दलित बहूजन समाजाला शुदातील क्षुद्रांना या वैचारिक गुलामगीरितून मुक्त होण्याची शक्ती देण्यासाठी त्यांनी शिक्षण, प्रबोधन व आंदोलन या तिनही मार्गाचा अवलंब विलक्षण अशा चिकाटीने, दृड निष्चयाने, धैर्याने केला.

**सहजिवन:—**

डॉ. आंबेडकरांनी भारतातील समज जिवनात लोकशाहीचे चक्र गतिशील राहण्यासाठी आपल्याला सावध राहण्याचा इशारा दिला आहे. ते म्हणतात, लोकशाही म्हणजे केवळ प्रजासत्ताक किंवा सांसदिय सरकार नव्हे, लोकशाहीची मुळे सरकारी पध्दतीत, सांसदिय किंवा दुसऱ्या कुठल्याही पध्दतीत नसतात. लोकशाही म्हणजे सहजिवनाने राहण्याची एक पध्दत आहे. लोकशाहीमुळे सामाजीक संबंधात शोधायची असतात. जे लोक तो समाज बनवितात त्यांच्या सहजिवनाच्या 'संबंधात' सदर्भात तिची मुळे शोधयची असतात.

**इशाराः—**

आपल्या घटनेने स्विकारलेल्या लोकशाहीबदल प्रत्येक भारितीयाला आनंद व अभिमान वाटने स्वाभाविक आहे. व रास्तही आहे. पण त्याचबरोबर त्यांच्या गुंगीत न राहता आपण उपयोगी नाही हे लक्षात आनुण देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जनतेला सावध केले. घटनेचा मसुदा मंजूर झाल्यानंतरच्या तृप्तीच्या वातावरणात अत्यंत महत्वाच्या भाषनात डॉ. आंबेडकर म्हणतात राजकीय लोकशाहीने आपण संतुष्ट राहता कामा नये. राजकीय लोकशाहीचे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजे. २६ जानेवारी १९५० रोजी आपणास राजकीय समता लाभेल पण सामाजिक व आर्थिक जिवनातील असमतोल आहे तसा राहिल. जर ही विसंगती लोकशाही हि जर सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित केले नाही तर ती टिकुच शकनार नाही. कारण सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव याची एक अखंड व अभंग अशी त्रिमुर्ती आहे. जर सामाजिक समता नसेल तर स्वांतंत्रयाचा अर्थ मुठभर लोकांचे, जनतेचे राज्य असणे असा होईल. जर समता हि स्वातंत्र्यशुन्य असेल तर ती व्यक्तीच्या जिवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील. जी बंधुभाव नसेल तर स्वंतत्रय व समता यांची वाढ साहजिकपणे होणार नाही. भारतीय समाजाने हे मान्य केले पाहिजे की त्यामध्ये दोन गोष्टीचा अभाव आहे. या दोन गोष्टी म्हणजे सामाजिक समता व आर्थिक समता या होत. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्याला राजकीय समता लाभेल पण सामाजिक व आर्थिक जिवनातील असमानता राहिल. जर हि विसंगती आपण लवकर नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही तर ज्यांना विषमतेची आच लागलेली आहे ते लोक घटनासमितीने इतक्या परिश्रमाने बांधलेला हा राजकीय लोकशाहीचा मनोरा उध्वस्त करुन टाकल्या शिवाय राहणार नाहीत.

**राज्यघटनाः—**

समाजाच्या सर्वांगीन (प्रगतीसाठी) परीवर्तनासाठी लोकशाही आणि लोकांचे सार्वभैमत्व या संकल्पना म्हणून स्विकारल्या व आचरणात आणल्या गेल्या पाहिजेत असा आग्रह महर्षी फुलेंनी दिडशे वर्षापासुन धरला. त्याला नेमका बांधेसुदपणा देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. नवभारताची राज्यघटना तयार करण्याची संधी मिळताच आपली सारी बुध्दीमत्ता, तपश्चर्या व कुशलता पणाला लावून राज्यघटनेच्या मुलभुत सुत्रात त्यांचा समावेश केला. याप्रकारे डॉ. आंबेडकरांनी भारताच्या राजकीय क्षेत्रात लोकशाही आणि लोकांचे सार्वभौमत्व रुजवन्यात येश मिळवले. भारताच्या स्वातंत्र्य लढयात मोठया प्रमाणावर लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. हाल अपेष्टा सहण केल्या, त्याग केला. त्यामधून राजकीय स्वातंत्र्य आणि लोकशाही यासंबंधी लोकांच्या जानीवाही उंचावलेल्या होत्या. त्यामुळे राजकीय लोकशाही संपत्ती किंवा शिक्षणाच्या अटीचा अडथळा आनूण मर्यादित व संकुचीत करण्याचे उच्च भ्रू प्रस्थापीतांचे प्रयत्न निष्फळ ठरविन्यात डॉ. आंबेडकरांना यश मिळू शकले. मात्र आर्थिक व सामाजिक क्षेत्रासवरही सार्वत्रीक समानतेचा आधार निर्माण करण्याच्या, त्यांच्या भूमिकेला लोकपातळीवरील उठावाच्या अभावी घटनासमितीमध्ये पाठींबा मिळाला नाही. त्यांच्या अभिप्रेत असणारी लोकांच्या सार्वभौमत्वाची संकल्पना त्यांना साकार करता आली नाही. याचा अर्थ या बाबतीत प्रबोधन, संघटन आणि आंदोलने या तिनही आघाडयावरील इतर प्रवाहांना यश आले नाही, हे स्पष्ट आहे. किंबहुना त्यासाठी पुरेशे प्रयत्नही झाले नाहीत असे म्हणने म्हणजे जास्त उचीत ठरेल.

**समारोपः—**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची राज्यघटना लिहीण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतीक पातळीवर एक आदर्श अशी राज्यघटना लिहीण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. त्याअनुशंगाने त्यांचे राजकीय विचार हे अत्यंत महत्वपूर्ण आहेत. देशामध्ये सार्वभौम प्रजासत्ताक राज्य कसे असावे याबाबत त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. राज्यघटना लिहीतांना सर्वसामान्य जनतेचा विचार करुन त्यांनी राज्यघटना लिहीलेली आहे. लोकशाहीची त्रिसुत्री त्यांनी मांडलेली आहे.

**सदर्भसूचीः—**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार — प्रा. म. द. देशपांडे
2. भारतीय राजकीय विचारवंत — प्रा. बी. बी. पाटील.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी — श्री. कृष्णा मेणसे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार — प्रा. सुहास पळशीकर.
5. भारतीय राजकीय विचारवंत — डॉ. रा रं बोराडे.

# कृषीच्या शाश्वत विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान – एक भौगोलीक अभ्यास

**प्रा. डॉ. महेश म. पवार**
भूगोल विभाग छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब
ई मेल - maheshp6848@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जातो. प्राचीन काळापासुन भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. याच भारतीय शेतकरी, कष्टकरी लोकांसाठी मुलगामी योजना आखुन त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य म्हणजेच शाश्वत विकासाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय शेती हि मोसमी हवामानावर अलबुंन असल्याने त्याचा परीणाम शेती उत्पादनावर होतो. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. त्यासाठी शेती, शेतकरी, शेतमजुर, शेती उद्योगधंदे यांचा शाश्वत विकास झाला पाहिजे. त्यासाठी जलसिंचन, ऊर्जा, आधुनिक तंत्र, नैसर्गीक साधनसंपत्तीचे संवर्धन, शेतीला उद्योगाचा दर्जा देणे व कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी भारतीय राज्य घटेनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, राजनितीज्ञ, दलितांचे कैवारी, आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विषयक धोरणात्मक विचारांचा, कृषी विकासासाठी केलेल्या उपाययोजना व त्यांनी राबवलेल्या शाश्वत कृषी विकासाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परीणाम म्हणजेच उद्योग, व्यापार, लोकसंख्या, जमीन, शिक्षण, मजुर, बेरोजगार, अन्नधान्य व शेती समस्यावर झालेले दुरगामी परीणामांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**व्याख्या :-**

1. "कृषी" – मनुष्यबळ, प्राणी, अवजारे व यंत्रे यांच्या साह्याने जमीन कसुन पिके काढणे याला "कृषी" किंवा "शेती" म्हणतात.
2. शाश्वत विकास :- पृथ्वीवर येणाऱ्या भावी पिढ्यांच्या गरजा भागवण्याइतपत पर्यावरणीची गुणवत्ता कायम राखुन वर्तमान पिढ्यांच्या गरजा भागवण्याच्या दृष्टीने साधण्यात येणारा विकास म्हणजेच शाश्वत विकास होय.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विषयक कार्य :-**

**आधुनिक भारताच्या निर्मीतीचा पाया** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी, कष्टकरी, कामगार, अस्पृशता शोषणाच्या विरोधात अनेक चळवळी उभारल्या. मुकनायक, बहिस्कृत भारत, जनता, प्रबुध्दा भारत या वृत्तपत्राचा वापर करुन सामाजीक जाणीव जागृती केली. मानवता, समता या तत्वावर त्यांनी आधुनिक भारताच्या निर्मीतीचा पाया रचला त्यातुनच आज शेतकरीवर होत असणाऱ्या अन्याय चळवळीच्या माध्यमातुन सोडवण्याचे धैर्य, बळ मिळाले. म्हणेजच आजचा शेतकरी विरोधी कायदा (2020) लोकशाही सरकारला माघार घ्यावा लागला त्यातुनच त्यांचा कृषी व अन्यायला वाचा फोडण्याचे शाश्वत कार्य दिसुन येते.

**भारतीय शेतीची उत्पादन वाढवणे :-** भारताचा जगात क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातवा क्रमांक लागतो तर लोकसंख्याच्या दृष्टीने दुसरा क्रमांक आहे. लोकसंख्या वाढीमुळे शेत जमीनीचे तुकडे झाले व त्याचा परीणाम कृषी उत्पादनावर झाला. बेकारी वाढली उत्पादन घटले त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीवर अवलंबुन न राहता शिक्षण, व्यापार, उद्योधंदे यात लक्ष दिले पाहीजे. जगाच्या तुलनेत भारताची उत्पादन क्षमता वाढवायची असेल तर शेतीचा शाश्वत विकास झाला

पाहीजे त्यासाठी अर्थपुरवठा, कर्जपुरवठा, मनुष्यबळा, तांत्रीक, आधुनिक साधनाचा वापर करुन सामायीक पध्दतीने शेती कसली पाहीजे. तसेच शेत मालाला रास्तभाव मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे. सन 1928 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकणातील खोत पध्दती मोडली. त्याच बरोबर पिक पध्दती शेतमाल विक्री भाव, पाणी उपल्बदता बांधबदिस्तापणा साठवण व्यवस्था याबाबत कायदा नियमन करावे हि संकल्पना शेतकऱ्यासाठी अधोरेखीत करणारी आहे.

**शेती ही ग्रामीण भागाचा आर्थीक विकासाचा केंदबिंदू :-** शेती, शेतकरी मजूर, श्रमिक वर्ग हे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ग्रामीण भागात जातीवर आधारीत समाजव्यवस्था बदलायची तर शेतीमध्ये परीवर्तन घडवावे. आर्थीक विषमता कमी झाली तर जातीय भेदभाव कमी होतील. शेतीसाठी कर्जपुरवठा, कर्जमाफी, विमा सारख्या सवलती दिल्याने शेतकरी हा सावकारी पेशातुन मुक्त होण्यास मदत होईल. गावातील लोकांना गावातच रोजगार मिळाला तर स्थलांतर होणार नाही. शेती ही केवळ उपजीवीकेचे साधन नसुन राष्ट्रीय उत्पादनाचा स्त्रोत आहे. हिच शेती आज भारताच्या ग्रामीण विकासात आर्थीक विकासाच केंदबिंदु ठरत आहे. यातुन आज सर्व जाती-जमातीचे जनता शेतीकसत आहेत व शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, कर्जमाफी योजना आज आत्महत्या रोखण्यास मदत होत आहे. हाच शाश्वत विकास होय.

**शाश्वत जलसिंचन :-** भारतीय शेती ही मोसमी हवामानावर आधारीत आहे. शेतीसाठी जलसिंचन सोय झाल्यास शेती उत्पादनातुन वाढत्या लोकसंख्याला पुरेल ऐवठा उत्पादन घेण्यास मदत होईल यातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाठबंधारे मंत्री असताना नदीजोड प्रकल्पास राबण्यात आला. नदीचे पाणी सागराला वाहुन न जाता शेत जमीनीला वापरता आले पाहीजे. त्यातून भाक्रा-नांगल, दामोदर-हिराकुंड, सोन धरणे बांधले कृष्णा, गोदावरी, तापी या एकमेकांना जोडल्या यामुळे नद्यांना विकास व साठवण क्षमता वाढ होण्यास मदत होऊन शेतीला सिंचनाबरोबरच ऊर्जा, जलवाहतुकीमुळे कृषी क्षेत्रात पिक उत्पादनात वाढ झाली. जलउदृयोग, जलप्राधीकरण, नदीखोरे विकास प्रकल्पांची स्थापना करुन कायदयान्वे धोरण ठरवले गेले त्यामुळे आजही जलस्त्रोतावर सरकारची मालकी अस्तित्वात आली. सिंचन यातुन, पाणीप्रश्नाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृतीशील कार्य दिसुन येते.

**ऊर्जा विकास व खनिज निर्मीती :-** कृषी विकासासाठी जलसिंचन बरोबरच ऊर्जाची गरज व आवश्यकता ओळखली शेतीला वीज पुरवठा योग्यरितीने झाला तरच उत्पादन वाढ होण्यास मदत होईल. पावरग्रीड सारखी योजना राबवली. केंद्रात ऊर्जा पुरवठा विभाग सुरु केला. वीज निर्मीतीसाठी पेट्रोल, अल्कोहोल, कोळसा, पाणी यांचा वापर करुन वीज निर्मीती वाढवली व यावर नियंत्रण सरकारचे असावे. वीजबाबत समस्या व उपाय जाणल्या त्यामुन शेतकऱ्यांना शेती उत्पादनाला वीज सवलत देण्यात यावी हि भूमिका मांडली. म्हणजेच आजचा शेतकरी वीजप्रश्न, वीजसमस्या, वीजेची गरज याबाबतची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आजही नाकारुन चालत नाही.

**जमीन महसुल :-** भारतीय शेती निसर्गावर अवलंबीत असल्याने शेतीच्या उत्पादनात तफावत आहे. त्यामुळे उत्पादनावर आधारीत कर रचना असावी. अल्पभुधारक, बहुभुधारक यांच्या बाबत कर नियमनात बदल असावेत जो शेती महसुल कर जमा होतो त्याचा वापर हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जमीन महसुल कर बाबताचे मत अतिशय योग्य दिसून येते म्हणजेच शेतकरी हिताचे कर रचना असावी व त्याचा उपयोग शेतकऱ्यांनाच व्हावा असे विचार मांडले.

**निष्कर्ष :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या आर्थीक नियोजनाचे आणि आर्थीक विकासाचे धोरणाम्तक शिल्पकार होते. त्यांना भारतीय शेतीची जाण होती, कृषीप्रधान देशाला त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले. शेतीला पाणी, वीज, अर्थपुरवठा केला तर समृध्द भारत होण्यास वेळ लागणार नाही. नदीजोड प्रकल्प, कर्जवितरण, वीजवितरण, आत्महत्या या विषयी त्यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण सांगता येते. जल, वीज, रेल्वे म्हणजे दळणवळण

साधनांवर सरकारची मक्तेदारी असल्यास सर्वसामान्य शेतकऱ्यांना याचा फायदा मिळु शकतो. त्यांचा कृषीच्या कार्यातुन शाश्वत पाया रचला गेला.

**संदर्भ :-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड 17 महाराष्ट्र शासन
2. महामानवाचे खंड – नरेंद्र जाधव
3. आंबेडकर चळवळीचा इतिहास - गाठाळ साहेबराव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्य चळवळीतील कार्य

**प्रा.बप्पासाहेब रामलिंग शेजूळ**

सहा.प्राध्यापक, इतिहास विभाग, के.एन.भिसे आर्टस, कॉमर्स ॲण्ड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज, विद्यानगर, भोसरे ता.माढा जि.सोलापूर

bappasahebshejul71@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा विविध जाती-धर्म असलेला देश आहे. तसेच सामाजिक, विषमता, असमानता, वर्णद्वेश, जातीभेद इत्यादी दोष हे भारतीय समाजाचे असल्याचे दिसून येते. या समाजामध्ये असलेल्या रुढी-परंपरा, अनिष्ट चालीरीती दूर करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केले. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, वि.रा.शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचा समावेश होतो. समाजसुधारणेसाठी अनेक चळवळी उभ्या राहील्या. त्या चळवळी पैकीच एक म्हणजे डॉ.बाबासाहेबांनी सुरु केलेली अस्पृश्यांची चळवळ होय.

**उद्दिष्टे :**

1) अस्पृश्य चळवळीची माहीती घेणे.

2) अस्पृश्य चळवळीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेणे.

**व्याप्ती :** प्रस्तुत शोधालेख हा फक्त् डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्य् चळवळीतील कार्याशी निगडीत आहे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत शोधालेखासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे.

**विषय प्रवेश :** प्राचीन भारतात चार्तुवर्ण्य समाज रचना अस्तित्वात होती. त्यामध्ये

1) ब्राह्मण - विद्या जाणणारा उच्च वर्ण,

2) क्षत्रिय - संरक्षण करणारा वर्ण

3) वैश्य – व्यापार-उदीम करणारा वर्ण

4) शुद्र - वरील तीनही वर्गाची सेवा किंवा गुलामी करणारा वर्ण यांचा समावेश होतो.

या शुद्रांना शिक्षणाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार नव्हता. त्यांना प्रत्यक्षपणे समाजामध्ये मिसळू दिले जात नसे, त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने होती. तसेच त्यांना राहण्यासाठी गावाच्या बाहेर जागा दिली जायची. असे हे शुद्र म्हणजेच अस्पृश्य, दलित, हरिजन इत्यादी नावांनी ओळखले जातात. त्यांना माणूस म्हणून तर सोडाच परंतु प्राणी-पशुच्या तुलनेने वागणूक दिली जात असे. अस्पृश्यांचा सर्वात मोठा शत्रु म्हणजे अज्ञान. या अज्ञानामुळेच अस्पृश्य हे शतकानुशतके गुलामीच्या अंधकारात पडलेले होते. त्या अंधकारातून अस्पृश्यांना बाहेर काढण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. स्वातंत्र्यपूर्व भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य चळवळी बरोबरच समाजसुधारणा चळवळ, अस्पृश्यांची चळवळ इत्यादी चळवळी या एका समान पातळीवर चालू होत्या. डॉ.बाबासाहेबांनी प्रज्ञा-शील-करुणेच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या सुधारणेकडे अधिक लक्ष केंद्रित केले. शोषीत, पीडीत समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक प्रयत्न केले. त्यासाठी त्यांना राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांना विशेष मदत केली. त्यांनी कोल्हापूर संस्थांर्गत अस्पृश्यांना मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी

शिष्यवृत्त्या दिल्या आणि आपल्या संस्थानात सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला याचा लाभ घेतेलेले त्यापैकीच एक म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत.

बाबासाहेबांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर समाजकार्यासाठी स्व्त:ला वाहून घेतले. ते चालू असतानाच राजर्षी शाहू महाराज मुंबईला घरी येऊन भेटले. त्यांनी आंबेडकरांना अस्पृश्यांच्या समस्या वृत्तपत्राच्या माध्यमातून सर्व जनतेसमोर मांडण्यासाठी नवीन वृत्तपत्र सुरु करण्यासाठी अडीच हजार रुपयांची मदत केली. त्यामुळे बाबासाहेबांनी 1919 मध्ये 'मुकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले. त्यांनी आपल्या लिखाणातून अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली व हा अन्याय दूर करण्यासाठी ब्रिटीश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. त्याचबरोबर अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांनी सत्ता मिळविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. भारतीय स्वातंत्र्य लढा आणि जातीअंताचा लढा यांना आकार आणि दिशा देण्याचे भरीव कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्याच्या जनजागृती व समाज बांधवाच्या विकासाच्या कार्याने त्यांचे अनुयायी व बांधव एकत्र येवून सभा घेवून व आंदोलने करुन आपल्या राजकीय हक्कांच्या मागण्या इंग्रज सरकारकडे करत होते. त्याचाच एक भाग म्हणून इ.स. 21 मार्च 1920 मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे अस्पृश्यांची परिषद भरली. त्याचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. तर प्रमुख उपस्थिती ही राजर्षी शाहू महाराजांची होती. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांच्या सामाजिक हक्काचे समर्थन केले. त्याचबरोबर शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धारासाठी केलेल्या कार्याचा गौरवही केला. तर शाहू महाराजांनी याप्रसंगी बोलताना एक घोषणा केली की, "तुम्हाला आंबेडकरांच्या रुपाने त्राता मिळाला आहे, ते तुमच्या बेड्या तोडतील असा मला विश्वास वाटतो. एवढेच नव्हे तर एक वेळ अशी येईल जेव्हा आंबेडकर हे आखील भारतीय कीर्ती आणि लोकप्रियता लाभलेले नेते म्हणून चमकतील असे मला माझा सद्सदविवेक हळूच सांगतो आहे." परीषदेच्या शेवटी सर्वांनी एक आंतरजातीय सहभोजन घेतले. त्याचबरोबर मे 1920 मध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे आखील भारतीय अस्पृश्य परीषद भरली होती. आंबेडकरांनी नागपूर परिषदेत असे मत मांडले की, इंग्रज सरकारने अस्पृश्यांना राजकीय व सामाजिक हक्क द्यावेत. अस्पृश्यांचे राजकीय व सामाजिक हक्क हे स्पृश्यांच्या किंवा अन्य कोणाच्याही मर्जीवर अवलंबून असू नयेत असा त्याचा दृष्टीकोन होता. इ.स. मे 1926 मध्ये सातारा जिल्ह्यातील रहीमतपूर येथे बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा महार परिषदेचे अधिवेशन झाले. यामध्ये त्यांनी महार वतनाबद्दल सविस्तर माहिती सांगून अस्पृश्यांना ब्राम्हणी विचारसरणीच्या लोकांपासून सावध राहण्यास सांगितले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी स्व्:ताच्या अध्यक्षतेखाली 20 जुलै 1924 मध्ये 'बहिष्कृत हितकारीणी सभा' ही संस्था स्थापन करुन शिका, 'संघटीत व्हा व संघर्ष करा' असा मूलमंत्र दिला. राजकीयदृष्ट्या अस्पृश्यांना शिक्षण देवून त्यांच्यासाठी वसतीगृहे सुरु करणे, वाचनालये सुरु करणे इत्यादी प्रकारचे कार्य बहीष्कृत हितकारीणी सभेच्या माध्यमातून केले. संपूर्ण देशात अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा, पिण्याचा अधिकार नव्हता, मंदिर प्रवेश करु दिला जात नव्हता. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विविध चळवळी व मोर्चे काढण्यास सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणजे 20 मार्च 1927 चा महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह व 3 मार्च 1930 चा नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश या लढ्यामुळे महाडच्या चवदार तळयाच्या प्रकरणी न्यायालयाने अस्पृश्यांची बाजू योग्य असल्याचे ठरवल्याने त्यांच्या राजकीय चळवळीला मोठी प्रेरणा व शक्ती मिळाली पुढे 8 व 9 ऑगस्ट 1930 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर या ठिकाणी आखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परीषद भरली. यामध्ये बाबासाहेबांना दलितांचे/अस्पृश्यांचे एकमात्र नेता म्हणून घोषीत केले. त्यानंतर बाबासाहेबांनी दलितांचे नेते म्हणून गोलमेज परिषदेत भाग घेतला.

बाबासाहेबांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाची शिफारस पुढे आली. मात्र महात्मा गांधींना ते न आवडल्याने ते पुणे येथे आमरण उपोषणाला बसले. शेवटी पुणे कराराने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागावर समाधान मानावे लागले. पुढे जेव्हा 1942 मध्ये व्हाईसरायने आपल्या कार्यकारीणीचा विस्तार केला तेव्हा त्यामध्ये बाबासाहेबांचा कायदामंत्री म्हणून समावेश केला गेला. तत्कालीन काळातील ही एक अतिशय आनंदी घटना होती. यामुळे अस्पृश्यांमध्ये  एकप्रकारचे नवचैतन्य निर्माण झाले आणि देशामध्ये अस्पृश्यांमध्ये जनजागृती घेवून त्यांच्या परिषदा भरवल्या जाऊ लागल्या याचेच एक उदाहरण म्हणजे जूलै 1942 मधील नागपूर येथे भरलेली आखिल भारतीय बहीष्कृत वर्ग परिषद होय. या परिषदेला 75 हजाराहून पुरुष तर 20 हजाराहून अधिक स्त्रीया भारताच्या सर्व प्रांतातील बहिष्कृत वर्गाच्या प्रतिनिधींनी उपस्थिती प्रथमच दर्शवली होती. बाबासाहेबांनी हिंदू समाजाच्या उन्नतीबाबत आपले मत व्यक्त करताना म्हटले की, “हिंदू समाज तेव्हाच सामर्थ्यवान होवू शकेल जेंव्हा तो आपल्या अनिष्ट रुढी नष्ट करु शकेल आणि स्पृश्यास्पृश्य भेद संपवून समानतेचे व माणुसकीचे वर्तन करु लागेल” त्याचबरोबर त्यांनी हिंदू धर्माचा आधारग्रंथ असलेल्या ‘मनुस्मृती’ चे दहन करताना म्हटले की, “ते (मनुस्मृती दहन) एक दक्षतेचे उचललेले एक आक्रमक पाऊल होते. परंतु ते सवर्ण हिंदूचे लक्ष वेधून घेण्यासाठी उचलले होते. अधुन-मधुन अशा प्रकारचे तीव्र उपाय योजावे लागतील तुम्ही दार ठोठावलेच नाही तर ते कोणी उघडणार नाही. मनुस्मृतीचे सर्व भाग टाकाऊ आहेत आणि त्यात चांगली तत्त्वे मुळीच नाहीत किंवा मनु स्व्त: समाजशास्त्रज्ञ नव्हता, तर केवळ एक मुर्ख माणूस होता, असा त्याचा अर्थ नाही. आम्ही मनुस्मृतीचे दहन केले ते शतकानुशतके आम्ही ज्या अन्यायाखाली चिरडले गेलो त्याचे प्रतिक म्हणून

सारांश रुपाने आपणास असे म्हणता येईल की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या विकासासाठी जे कार्य केले त्याच्यामुळे अस्पृश्यांमध्ये जनजागृती निर्माण झाली नवीन उत्साह निर्माण झाला तसेच शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा या मुलमंत्राच्या माध्यमातून अस्पृश्यांचा चळवळीला एक नवीन दिशा मिळाली.

**निष्कर्ष :** वरील अभ्यासाअंती आपणास खालीलप्रमाणे निष्कर्ष पहावयास मिळतात.

1) अज्ञान हे अस्पृश्यांच्या मागासपणाचे एक प्रमुख कारण होते.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे भारतातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजामध्ये जनजागृती निर्माण झाली.
3) डॉ.बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी ‘शिका, संघटित व्हा व संघर्ष करा’ हा मुलमंत्र दिला.

**संदर्भग्रंथ सूची :**

1) नानकचंद रत्तू, भाषांतर : भास्कर लक्ष्मण भोळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

2) दीपक कुमार (2010), आधुनिक भारत का संपूर्ण इतिहास, राज पब्लिशींग हाऊस, जयपूर

3) कोलाटकार श.गो. (2004), आधुनिक भारत, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर

4) डॉ.बाबासाहेब आंबेडकर Wikipedia

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# फुले-आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार

**समाधान भा. शिंदे**
संशोधक विद्यार्थी डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**गोषवारा**
भारतीय समाजात अनेक स्थित्यंतरे घडून आली. या सर्व स्थित्यंतराच्या मागे समाजसुधारकांची भूमिका महत्वाची आहे. समाजसुधारकांनी समाजाच्या उन्नतीसाठी अनेक चळवळी उभ्या केल्या. या अशाच अनेक चळवळी पैकी स्त्रियांचा उद्धार ही सुद्धा तितकीच महत्वाची चळवळ आहे. तत्कालीन समाज व्यवस्थेत स्त्रियांचे शोषण होत होते. याला विरोध करण्यासाठी फुले-शाहू-आंबेडकर यांनी स्त्री उद्धाराच्या चळवळी उभ्या केल्या. स्त्री अन्यायाला विरोध करण्यासाठी बंड पुकारले. स्त्रीयाही नागरिक आहेत, मानवप्राणी आहेत, त्यांनाही जगण्याचा अधिकार असला पाहिजे, स्त्रियांना स्वातंत्र्य असले पाहिजे अशी महात्मा फुले आणि आंबेडकरांची इच्छा होती. भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार अस्वस्थ करत होते. पितृसत्ताक संस्कृतीचा पगडाही लक्षात येत होता. स्त्रियांच तांच्या मनाविरुद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपण याचाही परिणाम दिसत होता. म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर काम केले. त्यातूनच त्याचे स्त्री उद्धारचे मौलिक विचार पुढे आले. या त्यांच्या विचाराचा समाजावर कसा परिणाम झाला? समाजात कशी स्थित्यंतरे घडत गेली? सामाजिक प्रगती कशी झाली? महिलांची परिस्थिती कशी सुधारत गेली या सर्व प्रश्नाचा अभ्यास फुले-आंबेडकर यांच्या विचारांच्या अनुषंगाने करणे संयुक्तिक ठरेल.

**प्रस्तावना**

जगाच्या पाठीवर अनेक संस्कृती होऊन गेल्या. या मध्ये स्त्रियांना अनन्यसाधारण महत्व होते. प्राचीन काळापासून ते आजतागायत स्त्रियांच्या उद्धारासाठी अनेक स्थित्यंतरे घडून आली. या स्थित्यंतराच्या मागे अनेक समाजसुधारकाची भूमिका महत्वाची ठरलेली आहे. भारतीय इतिहासात डोकावून बघितल्यावर असे लक्षात येते की भारतीय स्त्री अनेक वर्ष निपचित अवस्थेत होती. मात्र त्यांच्या वेदनेला अनेक समाजसुधारकांनी हुंकार दिला. त्यामुळेच आजची स्त्री कुटुंब व्यवस्थेत कणा म्हणून भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडत आहे. याचे फलित हे समाजसुधारकांनी केलेल्या कामामुळे साध्य झाले आहे. स्त्री क्रांतीसाठी सर्व समाजसुधारकांनी आपल्या तत्वाशी तादात्म्य होऊन समाज कार्य केले आहे. त्यामध्ये फुले-शाहू-आंबेडकर यांचे कार्य मोलाचे आहे. त्याचबरोबर त्यांचे समकालीन जे सुधारक होते त्याचे ही योगदान महत्वाचे आहे.

स्त्री शुद्रादी अतिशूद्रांना सन्मानाचे व संपन्नतेचे जिने जगता यावे यासाठी जोतिराव फुले यांनी ध्यास घेतला.स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार त्या काळात इतक्या मूलगामी युक्तिवादाच्या आधारे करणारे महात्मा फुले स्त्री मुक्तीचे आद्य पुरस्कर्ते ठरतात. त्यांनी स्त्रियांना केंद्रस्थानी ठेऊन प्रौढविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन इ. मुद्यांना त्यांनी स्पर्श केला. महात्मा फुल्याचे वेगळेपण असे की त्यांनी स्त्री मुक्तीचा प्रश्न हा वेगळा प्रश्न म्हणून कधीच मानला नव्हता. एकून हिंदू संस्कृतीचा विषमतेच्या उतरंडीवरच समाज रचनेचा एक भाग म्हणून त्यांनी स्त्रियांची बंधमुक्ती होण्याची मुळीच शक्यता त्यांना दिसत नव्हती. स्त्रीयासाठी शाळा उघडणे, स्वत:च्या पत्नीला साक्षर करून त्यांना शाळेत शिकविण्यास सांगणे, विधवांचे केशवपन करणाऱ्या नाव्ही समाजाचा संप घडवून आणणे, कुणाच्या तरी सक्तीला बळी पडून मातृत्व प्राप्त झालेल्या निराधार स्त्रियांसाठी प्रसूतीगृह उघडणे अशी ठोस कामगिरी जोतीरावानी केली व नवसमाज निर्मितीला उर्जा मिळवून दिली. हाच जोतीरावांचा वारसा पुढे आंबेडकरानी चालू ठेवला.

**फुले-आंबेडकरांच्या स्त्री विषयक विचारामागील परिप्रेक्ष्यता**

पूर्वी स्त्रियांना समाजात मोठ्या मानपानाने वागविले जात होते. हे सर्वश्रुत आहे. परंतु कालांतराने धर्माचा पगडा जसा-जसा वाढत गेला तसा त्याचा स्त्रियांवर परिणाम होत गेला. प्रत्येक धर्माने स्त्रियांची आचरसंहिता तयार करून एका चौकटीत बसवली. त्या आचारसंहिते प्रमाणे स्त्रिया वागू लागल्या. वैचारिक बंदिस्तपणात जीवन जगू

लागल्या. एका मर्यादेत त्यांनी स्वत: चे जीवन जगण्याचे मान्य केले. परिणामी त्या रूढी-परंपरेत अडकल्या गेल्या. हा सर्व बदल अर्वाचीन काळात घडून आला.याच काळात सती, बालविवाह, विधवाविवाह बंदी, अशा सारख्या अनिष्ठ प्रथा समाजात डोक वर काढत होत्या. हा स्त्रियांचा प्रश्न समाजासाठी सामाजिक आघात करणारा होता. सामाजिक संस्कृती ढवळून निघाली होती. अशा परिस्थितीत फुले यांनी सामाजिक जाणीवेतून स्त्री विषयक विचार मांडले. विधवेच्या पुनर्विवाहाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात वैदिक काळात, विधवांचा पुनर्विवाह चालू होता. यावरून हे समजून येते की ही परंपरा खूप दिवसापासून चालू होती. डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी सती, बालविवाह, विधवाविवाह बंदी व संन्यास याची मूळ कारणे देलेली आहेत. त्याच्या मागे जातीसंस्था टिकविणे हेच त्याचे मूळ आहे. असे त्यांनी सांगितले. या सर्व प्रश्नाचे उच्चाटन घडवून आणण्यासाठी त्यांनी स्त्री विषयक विचार मांडले. हीच त्यांच्या स्त्री विचारामागची खरी ऐतिहासिक परिप्रेक्ष्यता होती.

**महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार**

महात्मा फुलेकालीन व्यवस्थेत सतीची चाल, वैधव्यव्रत, विधवांचे केशवपन, बालविवाह, संपत्ती वारसा हक्काचा अभाव अशा अनेक रिती रूढ झाल्या होत्या. या रुधीने स्त्रियांची गुलामी पक्की झालेली होती. याला विरोध करायचा असेल तर काय करायचे याचा शोध फुले यांनी घेतला. आणि त्यांना एकच उत्तर मिळाले, ते म्हणजे शिक्षण. ते असे म्हणत की, स्त्रियांना शिक्षण मिळाल की, आपोआपच त्याच्यात अन्यायाला प्रतिकार करण्याची शक्ती येईल. आपल्या देशाची खरी सुधारणा करायची असेल तर स्त्रियांना व अज्ञानी अशा शुद्रादीशूद्रांना शिक्षण मिळाल्यावाचून ती होणार नाही हे त्याच ठाम मत होत. महात्मा फुले फक्त आपले विचार मांडून किवा सांगून थांबले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्षात बायकोच्या सहकार्याने स्त्री शिक्षणावर काम केले. शिक्षणाच्या सामर्थ्यावर त्यांचा इतका विश्वास होता की, या कामाला त्यांनी अग्रक्रमाने प्राधान्य दिले. स्वत: म. फुले यांनी आपल्या एकून आंदोलनात स्त्रीयाच्या लढ्याला शुद्र-अतिशुद्राच्या बरोबरीने स्थान दिले होते. फुल्यांनी स्वत: वैयक्तिकरित्या केलेल्या प्रयत्नातही स्त्री मुक्ती कार्याला प्राधान्य होते. आणि ते आयुष्यभर कायम ठेवले. बऱ्याच लोकांचे म्हणणे असे आहे की, फुले यांनी फक्त स्त्री शिक्षणावर भर दिला परतुं तुलनेने विचार केला असता असे लक्षात येते की, त्यांनी स्त्री शिक्षणापुरते त्यांचे प्रत्यक्ष कार्य थांबले नाही तर प्रौढविवाह, विधवा विवाह, परित्यक्ता यांचे नाजूक प्रश्न त्यांनी पुढाकार घेऊन तडीस नेहले. त्यासाठी त्यांनी संस्था काढल्या, कार्यकर्ते तयार केले, प्रचार केला, जाणीव-जागृती केली. एवढेच नव्हे तर हिंदू जीवनातील सर्वात महत्वाचा संस्कार जो विवाह, त्यांमध्येसुद्धा फुल्यांनी क्रांतिकारक बदल सुचविले आणि ते आमलात आणण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली.

जोतीरावांच्या स्त्रीच्या उद्धाराच्या कार्याचा विचार सावित्रीबाई शिवाय अपूर्णच राहतो. श्रेयाच्या वेळी ही दोन्ही नाव एकत्रच घ्यावी लागतात. सावित्रीबाईची साथ जर फुले यांना भेटली नसती तर त्यांना स्त्री शिक्षणाच्या कार्याला सुरवात करण कठीण गेल असते. विविध प्रकारच्या विटंबना आणि छळ याला भिऊन माघार न घेणाऱ्या सावित्रीबाई जोतीरावांना धीर, प्रोत्साहान देत राहिल्या-सहकार्य करीत राहिल्या. म्हणूनच स्त्री शिक्षणाचा पाया महाराष्ट्रात घातला गेला. समाजात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीन स्थान नव्हत. पुरुषाकडून तिला एखाद्या गुलामासारखी वागणूक मिळत होती या संदर्भात स्त्री ही पुरुषाप्रमाणे निसर्गसिद्ध मानवी हक्काचा उपभोग घेण्यास लायक असताना पुरुषप्रधान संस्कृतीतील निर्बंधामुळेच तिला उपभोक्ता येत नाही. हा एक प्रकारचा सामाजिक अन्यायच आहे. असं प्रतिपादन जोतीरावानी केल. मानवाला बुद्धीचे वरदान आहे. स्त्री पुरुषाच्या बुद्धीमध्ये काही कमी जास्त नाही पण पुरुषांनी स्त्रियांचे नैसर्गिक मानवी हक्क काढून घेतले व स्त्रीला गुलामी बनविले. वास्तविक स्त्री परुषापेक्षा श्रेष्ठ आहे. हे आपल्या लिखाणातून जोतीरावानी वारंवार सांगितले आहे.

**आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार**

महात्मा फुले यांनी स्त्री उद्धाराला सुरवात केली. ही खऱ्या अर्थाने पडलेली वैचारिक चळवळीची पहिली ठिणगीच होती. कालांतराने आंबेडकराने ही स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. फुले आणि आंबेडकर यांच्या समोर अनेक समस्यांच वर्तुळ होत. त्यातीलच एक समस्यां ही स्त्री दास्यत्वाची, स्त्री शोषणाची होती. स्त्रीयाच्या विचाराला, स्वातंत्र्याला एका चौकटीत बांधून ठेवले होते. याला विरोध करण्याचे काम आंबेडकरानी केले. त्यांच्या समाज परिवर्तानाच्या अनेक महत्वाच्या कृत्यामध्ये आधुनिक काळातील भारतीय स्त्री आणि त्यांनी केलेले योगदान अनेक दृष्टीने महत्वाचे ठरते. भारतीय परंपरेच्या पार्श्वभूमीवर स्त्रीयासाठी आंबडेकरानी केलेले कार्य हे खूप वेगळया व सार्वत्रिक पातळीवरचे आहे. स्त्री दास्याचा अंत झाला पाहिजे आणि त्यासाठी भारतीय परंपरेत स्त्रियांचे शोषण ज्या जातीव्यवस्थेद्वारे होते ती जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे. स्त्रिया जातीव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत असे त्यांचे मत होते. गटांतर्गत विवाह करणाऱ्या रूढीने स्वगटांबाहेर लग्न करण्याच्या रूढीवर मिळवलेला विजय म्हणजे जातीची निर्मिती होय. प्रत्येक लोक समूहातील स्त्री पुरुषांचे प्रमाण साधारण समसमान राहावे या

हेतूमुळे सती, वैधव्य लादणे, अल्पवयीन मुलीशी लग्ने अशा प्रथा हेतुपूर्वक अस्तित्वात आणल्या जातात. पुरुषांची भूमिका नियम तयार करणाराची असल्यामुळे स्त्रिया नेहमीच आर्थिक, सामाजिक व आर्थिक नियमांना बळी पडतात. पुरुषजातीचा विकास करायचा असेल तर स्त्रीला मागे ठेवून चालणार नाही, त्यांचाही खांद्यावर जबाबदारीची तेवढीच धुरा सांभाळण्या इतके त्यांना सक्षम केले पाहिजे असे आंबेडकर म्हणतात. अस्पृशता निवारण्याचे काम स्त्रियांनी हाती घेतले तर या कामाची अधिक जोरात प्रगती होईल. या भूमिकेतून त्यांनी अस्पृश्य स्त्रियांच्या वेगळया राजकीय परिषदा आयोजित केल्या. १९४२ साली दलित महिला फौंडेशनच्या अधिवेशनात केलेल्या भाषणात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही पुढे नेले पाहिजे. कारण स्त्रियांनी किती प्रगती केली यावर समाजाची प्रगतीचे मोजमाप करता येते. या त्यांच्या भूमिकेचे त्यांनी जोरदार समर्थन केले. महिलांच्या स्वतंत्र संघटीत संस्था असाव्यात, स्त्रियांनी समतेच्या लढाईत सहभागी झाले पाहिजे. या त्यांच्या आवाहनाला प्रदिसाद देऊन सत्याग्रह, मोर्चे इत्यादी आंदोलनात दलित स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी होत असत.आंबेडकरांचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे हिंदू कोड बिलाची उभारणी. हिंदूचे विवाह कौटुंबिक कायद्याने नियमित करण्याची कल्पना प्रथम इंग्रज राजवटीत अंमलात आली. सती व बालहत्या यांना प्रतिबंध करणारे कायदे, संततीवयाचा कायदा व धर्मांतरित माणसाचा कुटुंबाचा समतेवरील हक्क कायम राखणारा कायदा असे अनेक कायदे ब्रिटीश सरकारने मंजूर केले. कालांतराने आंबेडकरानी धर्मांतराची घोषणा केल्यावर भारतातील निरनिराळया धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला. याच काळात हिंदू कायद्यात सुधारणा करून त्यांचे एकसुत्रीकरण करण्याची स्त्रियांची मागणी पुढे येत होती. तेंव्हा हिंदू धर्मशास्त्रज्ञानी स्त्रियांवर केलेल्या अन्यायाची त्यांना प्रथम जाणीव झाली व त्यांना स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करणे गरजेचे वाटू लागले. याचेच फलित म्हणून आजच्या स्त्रिया सन्मानाने वागत आहेत.

**समारोप**

वर्तमानकाळातील स्त्रियांच्या जीवनात जे आमुलाग्र बदल झाले ते फुले-आंबेडकराच्या वैचारिक क्रांतीतून. स्त्रीयाला उद्धार होण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. याचेच फलित म्हणून आजच्या स्त्रिया सन्मानाचे जीवन जगू लागल्या आहेत.

**संदर्भ सूची**

1. Keer, Dhananjay (1997). Mahatma Jotirao Phule of Indian Socila Revolutiaon, Pune: Popular Publication
2. Bhardwaj, Pawan(1974). The legend of Jyotibha Phule, Delhi: Punit Publication
3. पवार, ना. ग. (२०१४). सावित्रीबाई फुले: अष्टपैलू व्यक्तीमत्व, पुणे: पद्मगंधा प्रकाशन
4. कांबळे, झुंबरलाल व बिवलकर, राम(२००६). म्हाडचा मुक्तीसंग्राम, पुणे: बार्टी
5. चंद, नानक(२०१५). डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, औरंगाबाद: साकेत प्रकाशन
6. सबाने, अरुणा(२००७). डॉ. आंबेडकर आणि स्त्री, नागपूर: आकांक्षा प्रकाशन
7. ऑम्व्हेट, गेल(२०१६). जोतिबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार, मुंबई: लोकवाङ्मय प्रकाशन
8. निकम, गौतम(२०१९). प्राचीन काळातील स्त्रियांचा दर्जा, चाळीसगाव: विमलकीर्ती प्रकाशन

# विचारवंत आणि सुधारकः छत्रपती शाहू महाराज

**शेख हाजुमिया फ़त्तुसाहेब**
स. शिक्षक वसंत प्राथमिक आश्रम शाळा, विद्यानगर (बावी) ता. जि. उस्मानाबाद
e-mail- hajumiyashaikh1983@gmail.com

**प्रस्तावना :**
भारताच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक युध्दे खेळली गेली. प्राताप गडापासून पानिपतपर्यंत सगळी धारार्थी वीराग्रणीच्या रक्ताने रंजित झाली. असेच एक अद्भूगतरम्य युध्द पंचगंगेच्या परिसरात लढले गेले हे युध्द शत्रू विरुध्द नव्हते, मित्रा विरुध्द होते. परकिया विरुध्द नव्हते ते स्वकीयाविरुध्द, स्वधर्मीयाविरुध्द होते. हे युध्द राज्यविस्तारासाठी नव्हते, दौलतीत भर टाकण्यासाठी नव्हते, दिनदलितांच्या परित्राणाच्या, गोरगरिबांच्या रक्षणासाठी, सामाजिक न्यायाच्या मंडनासाठी, अन्यायाच्या खंडनासाठी, प्राणघातक परंपरांच्या निर्मूलनासाठी एका छत्रपतीने प्रस्थापितां विरुध्द पुकारलेले युध्द होते हे युध्द तत्वाचे होते, तलवारीचे नव्हते.राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सामाजिक कार्यासाठी दिलेले बलिदान व त्यांचे जातिभेद नष्ट करण्यासाठी आणि प्राथमिक शिक्षण सुरु करण्यामध्ये असलेलं श्रेय भारतीय इतिहासात अजरामर राहिल. छत्रपती शाहू महाराज आणि सामाजिक समता हे समीकरण फ़ार महत्वाचे आहे. राजर्षी शाहू महाराज आयुष्यभर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि अस्पृष्य-बहुजन समाजाचा उध्दार करण्यासाठी प्राणपणाने लढले. ते एक कृतिशिल आणि प्रयोगशिल राजे, समाजसुधारक, विचारवंत होते. छत्रपती शिवाजी महाराज सोडले तर अनेक राजांचा इतिहास अन्याय-अत्याचार व जुलमी राजवटीचा आहे. एकाधिकारशाहीचा, हुकुमशाहीचा आहे; परंतू छत्रपती राजर्षी शाहू महाराज मात्र याला अपवाद आहेत. हा राजा लोकशाहीचा, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आहे. हे “एक वेळी गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उध्दार करण्याचे कार्य सोडणार नाही” या त्यांच्या वक्त्यव्यावरुन लक्षात येते.

## छत्रपती शाहू महाराजांचा अल्पपरिचयः-

छ.शाहू महाराज यांचा जन्म दिनांकः- 26 जुलै 1874 या दिवशी झाला. कागलच्या थोरल्या पातीचे जहागीरदार श्रीमंत जयसिंगराव घाटगे हे त्यांचे वडील त्यांना आबासाहेब म्हणून सर्वजन ओळखत. या आबासाहेबांचे पुत्र यशवंतराव हे योगायोगाने छत्रपती झाले. कोल्हापूरचे तत्कालीन चौथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अकाली अंत झाला. महारानीसाहेबांनी दिनांकः-17/03/1984 रोजी यशवंतांना दत्तक घेतले आणि त्यांचे नामकरण शाहू छत्रपती असे केले.यशवंतराव हे राजकुटुंबाशी एकनिष्ठ असणा-या एका तत्वनिष्ठ पित्याचे पुत्र होते. ही त्यांची योग्यता विचारात घेऊन त्यांची निवड करण्यात आली. अल्पवयीन अशा या छत्रपतीनी विद्यार्जनाच्या वाटेने चालले पाहिजे असा सर्वांचा आग्रह होता. त्यांना शाळेत पाठविण्याच्या निर्णय झाला. त्या काळी देशातील सर्व संस्थानिकांच्या मुलासाठी राजकोट येथे एक निवासी विद्यालय चालवले जात असे. या विद्यालयात शाहूनी प्रवेश घेतला. 1885 ते 89 या काळात त्यांनी राजकोट येथील विद्यालयात नानाविध विषयांचे अध्ययन केले. मैदानी आणि मर्दानी खेळापासून गणित-संस्कृत अशा गहनगंभीर विषयापर्यंत विद्यार्थ्यांना मजल मारता यावी आणि भविष्यकाळात प्रशासनाची सूत्रे सांभाळता यावीत या हेतूने अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली होती. इंग्लिश भाषा, जगाचा इतिहास, राज्यकारभार आणि अर्थकारण या विषयांचे मुलग्राही ज्ञान संपादन करण्याच्या आकांक्षेने श्री फ्रेझर नावाच्या एका विद्वानांच्या सहवासात महाराज राहिले. फ्रेझर यांच्या मनात महाराजाविषयी ममत्वाची भावना होती. त्यांच्या विद्वतेच्या, व्यक्तिमत्वाच्या आणि चारित्र्यांचा प्रभाव छत्रपतीवर पडला होता. आयुष्यभर महाराज श्री फ्रेझर यांचा उल्लेख ‘माझे गुरु ’ या शब्दात आणि कृतज्ञतापूर्वक करीत असत.विद्यार्थीदशेत त्यांनी इंग्रजी,संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयाचा अभ्यास केला. त्यांना राज्याधिकार 2 एप्रिल 1894 रोजी प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर 1891 मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई व आऊबाई या दोन कन्या झाल्या.

## छत्रपती शाहू महाराजः पुरोगामी विचारवंतः-

छत्रपती शाहू महाराज हे ख-या अर्थाने पुरोगामी विचारसरणीचे होते.त्यांनी आपल्या राज्यात त्यासंबधी कायदेच करुन टाकले होते. महाराज अधिकारपदी विराजमाने झाले तेव्हा देशभर स्वराज्यासाठी

धडपड सुरु झालि होती. महाराष्ट्र, पंजाब, बंगाल, या प्रांतात कडवे क्रांतिकारक बंड करण्याच्या तयारीत होते. हे सर्व दडपून टाकण्यासाठी इंग्रज शस्त्रसज्ज होते. महाराज वयाने लहान होते; पण विवेकी आणि धोरणी होते. इंग्रजांविरुध्द उघड लढा देवून सगळे संस्थान संकटात लोटण्या एवजी सत्तेचे साधन हाती ठेऊन प्रजेचे उत्थान घडवावे असे त्यांना वाटले.

या प्रबोधनकाराने जन्मभर बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचे स्वप्न पाहिले. ते साकार करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. स्वराज्य म्हणजे मुठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे नव्हे, हे ओळखून आखिल समाजातील आबालवृध्दांची मने एकात्मतेच्या सुत्रात गुंफण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले, वसतिगृहे स्थापन केली. बहुजनसमाजाला विद्यादान करुन त्यांची अस्मिता जागृत केली. जातीजातीतील विषमता दूर करुन सर्व व्यवहार समानतेच्या पायावर उभे केले. चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आघात केला. उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीतून समाजाची सुटका व्हावी म्हणून क्षात्रजगद्गु रु या नावाचे नवे धर्मपीठ स्थापन केले. कुलकर्णी वतन नष्ट करुन तलाठी हे पद निर्माण केले. बलुते पध्दती, महारकीचे वतन , वेठबिगारी रद्द करुन मागासवर्गीय पण पूर्वाश्रमी गुन्हेगार गणले गेलेले दुर्भागी लोक हजेरीपासून मुक्त केले. आपल्या राज्यातील पन्नास टक्के शासकीय जागा या वर्गासाठी राखून ठेवल्या मंडल आयोगापूर्वीचा हा शाहू आयोग अधिक क्रांतिकारक होता.

**छत्रपती शाहू महाराजः दूरगामी विचारवंतः-**

भूतकाळामागे पाहिले असता मुख्य व्यवसाय सगळयांचा शेतीच होता. त्या वेळी पाऊससुध्दा भरपूर पडत होता. नद्यावर बंधारेही नव्हते. त्यामुळे शेतीला उन्हाळयात पाणी पुरवठा करणारी, पाणी अडवणारी धरणे नव्हती. त्या वेळी छत्रपती शाहू महाराजांनी शेतक-यांचा दूरगामी विचार करुन काही नदीवर जर धरणे बांधली, तर आपला शेतकरी सुजलाम् सुफलाम, सुखी-संपन्न होईल. अशा बुध्दीवान राजाने त्या काळी राधानगरी येथे भोगावती नदीवर धरण बांधून संपूर्ण भोगावती खोरे व संपूर्ण कोल्हापूरचा संस्थानचा परिसर सुखी केला. एखाद्या वर्षी पाऊस नाही पडला तरी पाणी पिण्यास उपलब्ध होत होते. अशा प्रकारे भेगावती खो-यात बारमाही वाहणारी भोगावती नदी त्या खो-यात जीवनदायिनी बनली होती. त्याचबरोबर गुळाला दर चांगला यावा म्हणून शाहूराजांनी गुळाची बाजारपेठ उभा केली. कोल्हापूरी गुळाची थेट परदेशात निर्यात होऊ लागली. शेतक-यांच्या गुळाला चांगला दर मिळू लागला. तसेच भाजीपाल्यासाठी थेट मुंबई, कोकणसारख्या ठिकाणी जाऊ लागला. त्यामुळे शेतकरी राजा सुखी झाला, तो खरा छत्रपती शाहू महाराजांच्या दूरगामी विचारानेच.

**छत्रपती शाहू महाराजः सुधारक -**

2 एप्रिल 1894 रोजी शाहू राजे यांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर आपल्या वडिलाप्रमाणेच पदयात्रा काढली आणि जनता कशी जगते, याचे डॊळयांसमोरच दर्शन घेतले. जेव्हा त्यांनी राज्यकारभार स्वीकारला तेव्हा त्यांनी म्हटले की, "आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिथे कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमच्या संस्थानातील हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कंट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आपल्या पदरचे सर्व लहानमोठे जहागीरदार, आप्त-सरकार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदी करुन तमाम प्रजाजन शुध्द अंतःकरणापासून मोठ्या राजनिष्ठेने आम्हास साहाय्य करतील,अशी पूर्ण आशा आहे. या जाहिरनाम्यानुसार त्यांनी प्रत्यक्ष कारवाई करुन अंमलबजावणी केली.राजर्षी शाहू महाराजांच्या जन्माच्या वेळीच महाराष्ट्रात या काळात लहान वयातच मुलींची लग्ने लावली जात होती. त्यामुळे मुलींच्या आयुष्याचे नुकसान होत होते. ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी 8 स्पटेंबर 1906 रोजी पुरुषाप्रमाणे स्त्रियांची वयाची 18 वर्षे पूर्ण झाली म्हणजे ती वयात आली असे समजावे, असा हुकूमनामा काढला. कोल्हापूर महानगरपालिकेतील हलक्या दर्जाच्या नोकरांना वृध्दपणात आजाराबाबतीत आर्थिक मदत मिळावी म्हणून त्यांनी 29 आक्टोबर 1909 च्या हुकूमनाम्याद्वारे प्राव्हिडंड फ़ंड योजना लागू केली.

राजर्षी शाहू महाराजांनी दलित समाजातील अनेक लोकांना दरबार आणि खाजगी नोकरीत सामावून घेतले. शाहू महाराजांनी 8 आक्टोंबर 1919 ला एक वटहुकूम काढून सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचा आदेश दिला. "सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, स्टेट हौसेस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणवठे , सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्यप्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही. " या वटहुकूमाची अंमलबजावणी करण्याचा निर्धार काही महार तरुणांनी केला आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कोल्हापूरातूनच करण्याचे ठरले. छत्रपती शाहू महाराज हे खरे समाज सुधारक होते.

**छत्रपती शाहू महाराजः व्यक्तीमत्वः-**

महाराजांचे व्यक्तिमत्व हे लोकोत्तर होते ते रसिक होते, कलाप्रेमी होते, कुस्तीगीर होते, शिकारी होते, माधवराव बागलांना चित्रकलेच्या विशेष अध्ययनासाठी त्यांना शिष्यवृत्ती देऊन मुंबईस पाठवले. प्रबोधनकार

ठाकरे यांना लागेल तो ग्रंथ विकत घेऊन द्या अशी कारभा-यांना कायमस्वरुपी सूचना दिली. विमनस्क आणि निराधार अवस्थेत शाळा सोडून घरी चाललेल्या कर्मवीर भाऊराव पाटलांना त्यांनी वाड्यावर ठेवून घेतले व त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली.छत्रपतीचे राज्य हा गुणसंपदेचा मळा होता. ते कलागुणांचे माहेर घर होते. 1922 मध्ये वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी अल्पकालीन आजाराने छत्रपतीचे देहावसान घडले. पन्नासाव्या वर्षी जग सोडणा-या शिवछत्रपतीचे महाराजांनी अनुकरण केले. छत्रपती ही पदवी त्यांनी सार्थ केली. महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कर्तुत्वाची नोंद के ब्रिज विद्यापिठाने घेतली आणि त्यांना एल.एल.डी. ही सन्माननीय पदवी बहाल केली. ज्ञानाच्या क्षेत्रात त्यांचा बहुमान घडला आणि ते राजर्षी झाले.

**संदर्भ सुचीः-**

1. छत्रपती शाहू महाराज :- नाईक तु.बा. , पुणे 2005
2. रयतेचा राजा छ.शाहू महाराज :-पी.एस.कांबळे, प्रतिक पब्लिकेशन कोल्हापूर
3. राजर्षी शाहूः राजा व माणूस :- सूर्यवंशी कृ.गो., पुणे 1984
4. दैनिक सकाळमधील लेख

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार वयोगदान

**प्रा. प्रणाली प्रदिप पाटील**
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी चेकला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वेश्वी अलिबाग.
pushpkanya651994@gmail.com

**प्रस्तावना**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक श्रेष्ठ अर्थतज्ञ असून त्यांचे विचार, प्रबंध हे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी फार महत्त्वाचे आहे. सरकारला आर्थिक नियोजन व आर्थिक विकासशाश्वत करण्याकरिता राज्यघटनेतआर्थिककायदेअसणे आवश्यक आहे; तसेच त्यांनी भारतीय संविधान तयार करताना आर्थिक धोरणे आणि आर्थिकयोजनांचे फायदे ओळखून संविधानात तसे कायदे बनविले आहेत हे अभ्यासकाला अभ्यासायला मिळते.

### शोधनिबंधाची उद्दिष्टे

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार यांचा अभ्यास करणे.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक योगदान याचा अभ्यास करणे.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विकासासाठीचे धोरण यांचा अभ्यास करणे.

### शोधनिबंधाचे गृहितके

1) संविधान निर्मितीच्या पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था दुबळी व सरकारचे आर्थिक नियोजन हे दुर्लक्षित होते.

2) सरकारकडे आर्थिक नियोजनाचे विचार प्रगत नव्हते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीथोडक्यात कारकीर्द

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कारकिर्दीचे ढोबळमानाने दोन भाग करता येतात. 1921 पर्यंत एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी केलेल्या लिखाणाचा एक कालखंड असून त्यानंतरच या दुसऱ्या कालखंडात ते एक राजकीय नेते म्हणून उदयाला आलेआणि 1956मध्ये महानिर्वाणपर्यंत त्यांनी शोषित पीडित समाजासाठी उदंड कार्य केले.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महत्वाचे प्रबंध

कोलंबिया विद्यापीठात M.A साठी"प्राचीन भारतीय व्यापार" व पीएचडीसाठी "हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थरचनेची उत्क्रांती" असे त्यांचे विषय होते. तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डी एस्सीसाठी त्यांनी "रुपयाचा प्रश्न" हा प्रबंध लिहिला.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरां चामूळ अभ्यास विषय अर्थशास्त्र होता . त्यांनी अर्थशास्त्रविषयी विचार मांडले आहेत. आंबेडकर हे भारतातील श्रेष्ठ अर्थतज्ञांपैकीएक होते. अर्थशास्त्रामध्ये नोबल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन बाबासाहेब आंबेडकरांना अर्थशास्त्रातील गुरू मानतात.भूमिहीन मजूर , लहान जमीन , महारवतन , सामुदायिक शेती, जमीन महसूल आणि जमीनदारशाहीचे उच्चाटन या विषयावर त्यांनी निरनिराळ्या वेळी त्यांचे विचार प्रगट केले होते . अस्पृश्य समाजात भूमिहीन मजुरांचा भरणा अधिक असल्याने त्यांनी या विषयावर मत मांडले. तसेच उद्योगांचे राष्ट्रीयीकरण , धान्य प्रश्न , समाजवाद, सामाजिक समता या विषयावरही त्यांनी प्रासंगिक लिखाण केले. विवेचनाच्या सोयीसाठी त्यांचे लिखाण जमीन प्रश्न, चलन विषयक प्रश्न, सार्वजनिक आयव्यय व संकीर्ण प्रश्न असे विभागले आहेत .स्टेट्स अँड मायनॉरिटीज या नावाने ब्रिटिश सरकारला 1947 आली सादर केलेल्या

टिपणामध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती हे त्यांनी सांगितले होते . अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार करून लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे; तसेच खाजगी उत्पादकांना कोणीही आडकाठी न करता आणि संपत्तीचे समान वाटप होईल अशा रीतीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे दायित्व आहे असे त्यांनी नमूद केले होते. आंबेडकरांच्या म्हणण्यानुसार, आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक धोरण आणि कार्यक्रम हे राज्य घटनेचे अविभाज्य भाग असले पाहिजे. शेतीचे, मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, प्रत्येक नागरिकांसाठी सक्तीचे विमा योजना आणि आर्थिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी खासगी उद्योजकांना वाव देण्याच्या आवश्यकतेचाअंतर्भाव असायला हवा. हे कार्यक्रम शाश्वत, निरंतर होण्यासाठी राज्यघटनेत मूलभूत गोष्टींचा दर्जा असायला हवा म्हणजे अशा कार्यक्रमांना विरोध असलेल्या राजकीय पक्ष्यांना विरोध करता येणार नाही आणि कार्यक्रम त्यांना रद्द करता येणार नाहीत. या योजनेला डॉ.आंबेडकरांनी घटनात्मक शासकीय समाजवाद (कॉन्स्टिट्यूशन स्टेट सोशालिझम) असे नाव दिले.आज-काल विशेषज्ञ प्रॅक्टिससाठी दुसऱ्या देशात प्रवास करतातयाचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते . तसेच राज्यघटनेत दरवर्षी वित्त आयोगाची व्यवस्था सुरू करणारे दुसरे तिसरे कुणी नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

**आर्थिक विकासासाठी धोरण**

गरिबीचे निर्मूलन, विषमता दूर करणे आणि जनतेचे शोषण समाप्त करणे ही आर्थिक विकासाची रणनीती असली पाहिजे. त्यांनी या पैलूमध्येमार्क्सवादी दृष्टीकोन स्वीकारला , परंतु विकासाच्या प्रतिमानावर त्यांची बाजू घेतली नाही. कम्युनिजम विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार त्यांनीत्यांच्या बुद्धिझम आणि कम्युनिझम या निबंधात मांडले आहेत.

**आर्थिक योगदान**

द प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजनल अँड इट्स सोल्युशन या त्यांच्या डी.एस्सी प्रबंधातून हे स्पष्ट होते, चलनाचा सोन्याशी संबंध नसावा हा त्यांचा प्रमुख युक्तिवाद आहे. त्या ऐवजी एक शुद्ध सोन्याचे मानक पाळलेपाहिजे. जेथे सोन्याची नाणी, कागदी चलनासहचलनात आणली जावी हे जॉन मेनार्ड केन्स यांच्या कल्पनेच्या विरोधात गेले. ते म्हणाले होते की , सुवर्ण विनिमय मानकातस्थिरता नाही , जे भारतासारख्या विकसनशील देशांसाठी एक प्रमुख चिंतेचा विषय आहे . त्यांनी शिफारशीचा मसुदा तयार केला आणि तो रॉयल कमिशन ओन करन्सी अँड फायनान्स (हिल्टन यंग कमिशन) कडे सादर केला.

शिफारसी खालीलप्रमाणे होत्या

1) सोन्याचे नाणे व रुपया यांच्यातील गुणोत्तर निश्चित करा.

2) रुपया सोन्यात परिवर्तनीय नसावा व सोन्याचे रुपयात परिवर्तनीय नसावे पण दोन्हीही कायद्याने निश्चित केलेल्या गुणोत्तराने अमर्यादित कायदेशीर निविदा म्हणून प्रसारीत केलेले जावे.

आयोगाला हे पुस्तक आणि शिफारसी एक मूल्य संदर्भ साधन म्हणून आढळल्या आणि अशाप्रकारे केंद्रीय विधानसभेने हे मार्गदर्शक तत्वे RBI Act 1934 म्हणून पारित केले.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार व आर्थिक नियोजन हे मोलाचे होते. सध्याच्या भारतीय अर्थव्यवस्थेत त्यांच्या विचारांचे अनुसरण केले जाते. त्यांनी संविधानात अर्थव्यवस्थेला सहाय्यक होतील असे कायदे बनवले आहेत.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीच्या पूर्वी जातिव्यवस्था जमीनदार पद्धत, आर्थिक विकास, सरकारचे दुर्लक्षित आर्थिक नियोजन असलेले दिसून येते; परंतु त्यांच्या प्रबंध, आर्थिक विचार व संविधान यामुळे भारताला शाश्वत आर्थिक विकास होण्यासाठी मदत होत असलेली दिसून येते.

**संदर्भसूची**

१. कविमंडन, डॉ. विजय(२०१२), 'डॉ. आंबेडकरांचेआर्थिकचिंतन' श्रीमंगेशप्रकाशनपुणे.
२. जाधव, डॉ. नरेंद्र(१९९२) 'डॉ. आंबेडकरआर्थिकविचारवतत्त्वज्ञान' सुगावाप्रकाशनपुणे.
३. मुणगेकर, डॉ. भालचंद्र(२०१२), 'भारततील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टिकोन' सुगावा प्रकाशन, पुणे.
४. झामरे, डॉ. जी. एस.(२०१५) 'भारतीयअर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र' पिंपळापुरे अँड कंपनी पब्लीशर्स, नागपूर.
५. डॉ. भी. रा. आंबेडकर (२०१८)'रुपयाची समस्या त्याचे मूळ व त्यावरील उपाय' सुधीर प्रकाशन
६. भांडारकरपु. ल. (१९९९) 'सामाजिकसंशोधनपद्धती' साईनाथप्रकाशन, नागपूर.

# उस्मानाबाद जिल्हा उमरगा तालुक्यातील जलप्रणालीचा एक भौगोलिक अभ्यास

**प्रा.गावित सतिश डी**
भारतशिक्षण संस्थेचेकलाविज्ञान व वाणिज्य महाविद्यालय माकणीता.लोहारा जि. उस्मानाबाद
gavit79@gmail.com


**प्रस्तावना :**

कोणत्याही प्रदेशातील मुख्य नदी, तिला मिळणा-या सहाय्यकनद्या, उपनद्यांना मिळणा-या सहाय्यकनद्या व सहाय्यकनद्यांना मिळणारे नाले ओढे या सर्व लहान मोठया प्रवाहांचा वाहण्याचा जो विशिष्ट क्रम असतोत्या प्रवाहाच्या जाळयाला जलप्रणाली असे संबोधितकेलेजाते.सह्याद्री पर्वताच्या पूर्वेला विशाल असा पठारी प्रदेश पसरलेला आहे त्यास महाराष्ट्र पठारकिंवादख्खनचे पठारकिंवादेश असे म्हणतात. या पठारावर व सह्याद्री पर्वत रांगेतून महाराष्ट्राच्या पूर्व-आग्नेयदिशेकडे जी डोंगररांगेलेली आहे म्हणजे आंध्रप्रदेशातील हैद्राबाद पर्यंत पसरलेल्या डोंगररांगेस बालाघाट डोंगररांग असे म्हणतात.अभ्यासक्षेत्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा हा तालुका याच बालाघाटच्याडोंगर रांगेत वसलेली आहेत. हि तालुकेगोदावरी नदी व भिमा नदीखोरे वेगळे करतात. बालाघाट हि डोंगररांग सपाट माथ्याच्या प्रदेशाने व्यापलेली आहे. जलप्रणाली हा प्राकृतिक घटकाचा अंत्यत महत्त्वाचा घटक व शेती व्यवसायावर परीणामकरणारा घटक आहे.(चौहान १९८७) वस्तीच्या स्थाननिश्चितीवर नदी प्रणाली हा घटक महत्त्वाची भूमिका बजावितो. प्राचीन वसाहती या नद्यांच्याखो-यात वसलेल्या दिसून येतात. उमरगा तालुक्यातही जलप्रवाह प्रवाहित होतांना आढळून येतात. उमरगा तालुक्यात मोठयानद्या नाहीत अपवाद बेनितुरा नदी सोडली तर फक्त ओढे पाहावयास मिळतात.याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदर संशोधन लेखातकरण्यात आला आहे.

**बीजसंज्ञा:**उपनद्या,नाले, ओढे,बालाघाट डोंगररांग,जलप्रणाली

**अभ्यासक्षेत्राचे स्थान व विस्तार:**

उस्मानाबाद जिल्हा मराठवाडयाच्या अगदी पश्चिमेस असून व महाराष्ट्राच्यादक्षिणेत असलेला अत्यंत महत्त्वपूर्ण असा जिल्हा आहे. सदर संशोधन पत्रिकेत उमरगा तालुक्याचे स्थान उस्मानाबाद जिल्ह्याच्या आग्नेयदिशेस असलेले दिसून येते. उमरगा तालुक्याचे अक्षवृत्तीयविस्तार १७°३८'३२'' उत्तर अक्षवृत्तते १८°०२'१०'' उत्तर अक्षवृत्तदरम्यानवरेखावृत्तीयविस्तार ७६°२४'३०'' पूर्वरेखावृत्तते ७६°४७'१७'' पूर्वरेखावृत्तदरम्यानइतकाविस्तार आहे. उमरगातालुक्याचे क्षेत्रफळ ९९८.६३ चौ. कि.मी.इतके आहे.तरजिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १३.१९ टक्केक्षेत्र व्यापले आहे. उमरगा तालुक्यातएकूण पाच महसूल मंडळे आहेत ते म्हणजे उमरगा, मुरूम, मुळज, नारंगवाडी व दाळिंब असे आहे.



**उद्देश:** सदर संशोधन पत्रिकेत खालील उद्देश डोळयापूढेठेवूनसंशोधन पत्रिकाकरण्यात आले आहे.

१. उमरगा तालुक्यातील भौगोलिक रचना अभ्यासूनजलप्रणालीचा सविस्तर माहिती घेणे.

**माहिती संकलन स्त्रोत व संशोधन पध्दती:**

प्रस्तूत संशोधन पत्रिकेच्याकार्यासाठी मिळवलेली माहिती प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील आहे. यासाठी भारतीय क्षेत्रमापन स्थलनिर्देशकनकाशाक्र. ५६C/१३, ५६C/१४, ५६C/१०, ५६C/६, ५६C/५, ५६B/८, ५६B/१२, व ५६C/९इत्यादीनकाशाचा वापरकरण्यात आला आहे.तसेच गुगल अर्थ या सांकेतिक स्थळाचा सविस्तर अभ्यास करून मोजमाप करण्यात आले आहे.

**उमरगा तालुका प्राकृतिक रचना:**

उमरगा तालुक्याच्या उत्तरेकडील भाग हा डोंगराळ प्रदेशाचा म्हणजे महाराष्ट्राच्या पठाराच्या उंचवटयांचा सपाट माथ्याचा असूनतो प्रदेश कोराळा (समुद्रसपाटीपासूनची उंची ६३१ मी.), काळा निंबाळा (समुद्रसपाटीपासूनची उंची ६१४ मी.), कलदेव निबांळा (समुद्रसपाटीपासूनची उंची ६२४ मी.), कडदोरा (समुद्रसपाटीपासूनची उंची ६२८ मी.), व्हंताळ (समुद्रसपाटीपासूनची उंची ६३१ मी.), पेठसांगवी, बाबळसूर, जवळगा बेट (समुद्रसपाटीपासूनची उंची ६३१ मी.), समुद्राळ (समुद्रसपाटीपासूनची उंची ६४६मी.), सावळसूर (समुद्रसपाटीपासूनची उंची ६५५ मी.), एकुरगावाडी समुद्रसपाटीपासूनची उंची ६१८मी.), कोरेगाव, गुगळगाव, माडज (समुद्रसपाटीपासूनची उंची ६३६ मी.), चिरेवाडी (समुद्रसपाटीपासूनची उंची ६२१ मी.), वागदरी (समुद्रसपाटीपासूनची उंची ६१६ मी.), त्रिकोळी, कदमापूर (समुद्रसपाटीपासूनची उंची ६३१ मी.), कुन्हाळी (समुद्रसपाटीपासूनची उंची ६२२ मी.),आणि पूर्वेकडे हिप्परगाराव (समुद्रसपाटीपासूनची उंची

६२० मी.),धाकटीवाडी(समुद्रसपाटीपासूनची उंची ५७८मी.), थोरलीवाडी (समुद्रसपाटीपासूनची उंची ६०९ मी.), या प्रदेशातून बालाघाट डोंगररांगेच्या सपाट माथ्याचा प्रदेश म्हणजेच टेकडयांचा भाग आहे. म्हणजेच उमरगा तालुक्याच्या उत्तरेकडील भाग हा उंचवटयाचा व दक्षिणेकडील भाग हा कमी उंचीचा सपाट प्रदेश आहे. उत्तरेकडील या उंचवटयामुळे तेरणा नदी खोरे व बेनीतूरा नदी खोरे निर्माण झाले आहे. उमरगा तालुक्यातील भूपृष्टाचा उतार हा दक्षिणेकडे आहे. साधारणपणे या प्रदेशाचा उतार हा सौम्य प्रकारचा आहे. उमरगा तालुक्यात अनेक टेकडया पाहावयास मिळतात जसेकदमापूरची टेकडी, अचलबेट, व्हतांळ, माडज, थोरलीवाडी यासारख्या टेकडया पाहावयास मिळतात. अशा प्रकारे उमरगा तालुक्यातील उंचवटयांची माहिती सांगता येते. उमरगा तालुक्याचे भूपृष्टाचे अवलोकनकेले असता. समुद्रसपाटीपासून सरासरी ५८० मी. पेक्षाकमी उंची असलेल्या प्रदेशाचे समतलकिंवा सपाट मैदानी प्रदेशाचे वर्गीकरणकरण्यात आले आहे. समतलक्षेत्र असलेले १८८.२५ चौ. कि.मी. व्यापलेले आहे. तेतालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळापैकी १८.२५ टक्केक्षेत्र व्यापलेले आहे. उमरगा तालुका उत्तरेला बालाघाटचीडोंगर रांग आणि दक्षिणेला याचा भूपृष्टाचा उतार आहे. या प्रदेशावरून लहान-लहान ओढयानी येथे मैदान निर्माण केलले आहे. या प्रदेशात मोठी नदी नाही एकमात्र मोठी नदी बेनीतुरा ही मोठी नदी आहे पण पाहीजे तेवढी मोठी नाही. ती नदी या अभ्यासक्षेत्राच्या पश्चिमेस व दक्षिणदिशेत वाहताना आढळते व या नदीने व तीच्याउपनदयानी मैदान निर्माण केले आहे. उमरगा तालुक्यातील या उपनद्यांनी व ओढयानी येथील सखल मैदानतयारकेले आहे. ते म्हणजे येणेगूर ओढा, दाळिंब ओढा, बलसूर ओढा, एकूरगा ओढा, येळी ओढा, गुंजोटीनाला, उमरगा नाला, कोळसूर ओढा, तलमोड ओढा, बेनीतुरा नदी, माडज ओढा, कुन्हाळी ओढा यांनी उमरगा तालुक्यात मैदानतयारकेले आहे.

**उमरगा तालुका नद्या, नाले व त्यांची लांबीः**

उमरगातालुक्यातूनमुख्य नदी, तिला मिळणा-या सहाय्यकनद्या, उपनद्यांना मिळणा-या सहाय्यकनद्या व सहाय्यकनद्यांना मिळणारे नाले ओढे प्रवाहित होताना आढळतात त्या नदी/ओढेत्यांचे उगमस्थानत्यांचीउमरगा तालुक्यातलांबी यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. उमरगा तालुक्यातील जलप्रणालीचे अवलोकनकेले असता, उमरगा तालुक्यात मोठी नदी प्रवाहीत होताना आढळत नाही. उमरगा तालुक्याचे स्थान बालाघाटच्याडोंगररांगेवरील सपाट माथ्याच्या प्रदेशात असल्याने उमरगा तालुका दोन मोठयानदयांच्यागोदावरीखोरे व कृष्णा नदी खो-यांना वेगळे करतात. उमरगा तालुक्यात सर्वात मोठी व लांब नदी म्हणजे बेनितुरा नदी होय. बेनितुरा नदी दाळिंब, मुरूम, व उमरगा महसूल मंडळाच्या सिमावर्ती भागातून प्रवाहित होतांना आढळते. बेनितुरानदीचा उगम लोहारा तालुक्यातील भोसगा व देवबेटच्याडोंगररोगेच्या परीसरात होत असून उमरगा तालुक्यात या नदीची लांबी ४५.१७ कि.मी. इतके आढळते. या नदीने आपलेएक वेगळेच खोरे निर्माण केले असून या नदी खो-यात उत्तम प्रकारची शेती या खो-यातकेलीजाते.

**उमरगा तालुका नद्या, नाले व त्यांची लांबी**

| अ. क्र. | नद्यांचीनावे/ओढयाचीनावे | लांबी कि.मी. | उगम / पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | तेरणा नदी | ५.८३ | कवठा | कवठा |
| २ | येणेगूर ओढा | ९.४२ | कोराळ परीसर | येणेगूरच्या पश्चिमेस बेनितुरा नदी |
| ३ | दाळिंब ओढा | १९.८२ | कलदेव निबांळा परीसर | मुरळी, बेनितुरा नदी |
| ४ | येळी ओढा | १२.३७ | कलदेव निबांळा | जकेकूर साठवणतलाव |
| ५ | बलसूर ओढा | १३.०१ | कडदोरा परीसर | जकेकूर साठवणतलाव |
| ६ | एकूरगा ओढा | ७.६४ | बेटजवळगा परीसर | बलसूर ओढा |
| ७ | उमरगा नाला | ११.८४ | कोरेगाववाडी परीसर | पळससगाव साठवणतलाव |
| ८ | मुळज ओढा | १५.६ | कदमापूर व त्रिकोळी | पारसखेडा जवळ बेनितुरा नदी |
| ९ | गुंजोटीनाला | १०.८५ | जकेकूर साठवणतलाव | नागराळ जवळ बेनितुरा नदी |
| १० | कोळसूर ओढा | १५.३९ | कुन्हाळी परीसर | मळगीवाडी जवळ बेनितुरा नदी |
| ११ | तलमोड ओढा | ४.८७ | जगदाळवाडी परीसर | कोळसूर साठवणतलाव |
| १२ | बेनितुरा नदी | ४५.१७ | भोसगादेवबेट (लोहारा) | दगड धानोरा जवळ कर्नाटकात |
| १३ | माडज- कोरेगाव ओढा | ९.९६ | माडज परीसर | उमरगा नाल्यात विलीन |
| १४ | कुन्हाळी ओढा | ९.१४ | कदमापूर परीसर | मुळज येथे मुळज ओढयातविलीन |

स्त्रोतः संशोधकाने अधिकृत माहितीच्या आधारे संकलितकेले आहे.

तेरणा नदी ही गोदावरीनदीची महत्त्वाची उपनदी असून उस्मानाबाद, लोहारा, उमरगा तालुका व लातुर जिल्ह्यातील औसा व निलंगातालुक्यातून वाहते. तेरणा नदी उमरगा तालुक्याच्या उत्तरेकडीलसिमेवरून अगदीकमी भागातुन प्रवाहीत होतांना आढळते. या नदीची लांबी ४.८३ कि.मी.इतकी आहे.ती नारंगवाडी महसूल मंडळातून कवठा या ग्रामीण वसाहतीचे पाणलोटक्षेत्रतेरणा नदी खो-यात येताना आढळते.येणेगूर ओढा हा बेनितुरानदीचाजलप्रणालीचा अत्यंत महत्त्वाचा ओढाकिंवा भाग असून दाळिंब महसूल मंडळातील कोराळा परीसरातून या ओढयाचे पाणलोट होते. हा ओढा पश्चिमेकडून वाहत जाऊन येणेगूरच्या पश्चिमेस बेनितुरानदीला जाऊन मिळतो. यांची लांबी ९.४२ कि.मी.इतके आहे. दाळिंब ओढा बेनितुरानदीचा महत्त्वाचा भाग असून हा उत्तरदक्षिण वाहत जाऊन मुरळी या ग्रामीण वसाहतीजवळ बेनितुरानदीला जाऊन मिळते. या दाळिंब ओढयाचा उगम कलदेव निंबाळा परीसरात होतो. या ओढयाची उगमापासून बेनितुरानदीच्या पात्रापर्यंन्त १९.८६ कि.मी. परीसरातून वाहत जाते. येळी ओढा हा गुंजोटीनाल्याचा अत्यंत महत्त्वाचा ओढा असून या ओढयाचा उगम कलदेव

निंबाळा परीसरात होतो व पुढे प्रवाहित होऊन बलसूर ओढयालाजकेकूर साठवणतलावात जाऊन मिळते. येथुनच पुढे गुंजोटीनाल्याला सूरवात होते. या येळी ओढयाचा उतारदक्षिणदिशेत आहे. बलसूर ओढा हा सुध्दा गुंजोटीनाल्याचा अत्यंत महत्त्वाचा ओढा उत्तरदक्षिण वाहत असून या ओढयाचा उगम कडदोरा परीसरात होऊन १३.०१ कि.मी. वाहत जाऊन येळी ओढा व बलसूर ओढाएकत्र येऊनजकेकूर येथीलतलावात आपल्या पाण्याचे साठवणकरतात. एकुरगा ओढा हा गुंजोटी ओढयाचा महत्त्वाचा व बलसूर ओढयाचा उपओढा आहे. हा ओढाईशान्य-नैऋत्यदिशेने वाहत जातो. या ओढयाचा उगम बेटजवळगा परीसरात होतो. या ओढयाची लांबी बलसूर पात्रापर्यन्त ७.६४ कि.मी. इतके आहे.उमरगा नाला हा बेनितुरानदीचाएक अत्यंत महत्त्वाचा ओढा आहे. हा ओढा उत्तर- दक्षिणदिशेने वाहत जाऊन शेवटी पळसगाव साठवणतलावात गुंजोटीनाला व उमरगा नालाएकत्र येतात. या नाल्याचा उगम कोरेगाववाडी येथील परीसरातून होतो. या नाल्याची लांबी उगमापासूनतर पळसगाव साठवणतलावापर्यन्त ११.८१ कि.मी. इतकी आहे. मुळज ओढा हा बेनितुरानदीचा महत्त्वाचा उत्तर-दक्षिणदिशेत वाहणारा महत्त्वाचा ओढा आहे. या ओढयाचा उगम त्रिकोळी या ग्रामीण वसाहतीच्या पूर्वेस व कदमापूर या ग्रामीण वसाहतीच्या पश्चिमेस होतो व पुढे पारसखेडाजवळ बेनितुरानदीच्या पात्रात जाऊनविलीन होतो. या ओढयाचा उगमापासून मुखापर्यंनची लांबी १५.६ कि. मी.इतकी आहे.

गुंजोटीनाला हा बेनितुरानदीचा व सर्वातजास्त पाण्याचे वहन करणारा महत्त्वाचा नाला आहे. या नाल्याला येळी ओढा व बलसूर ओढाजकेकूर जवळ साठवणतलावातएकत्र येतात व येथूनच या दोन ओढयांचा संयुक्त प्रवाहाला गुंजोटी ओढा असे म्हणतात. हा गुंजोटीनाला नागराळ गु. जवळ बेनितुरानदीला जाऊन मिळतो. याची लांबी जकेकूर साठवणतलावापासून नागराळ गु. जवळील बेनितुरानदीच्या पात्रापर्यन्त १०.८५ कि.मी. इतके आहे.कोरेगाव- माडज ओढा हा उमरगा नाल्याच्या महत्त्वाचा ओढा आहे. या ओढयाचा उगम माडज परीसरात होतो. या ओढयालाकोरेगाव ओढा असेही म्हटलेजाते. हा ओढा उत्तरदक्षिण वाहत जाऊन उमरगा शहराच्या उत्तरेस उमरगा नाल्याला येऊन मिळतो. या ओढयाची लांबी ९.९६ कि.मी.इतकी आहे.कोळसूर ओढा हा बेनितुरानदीचा महत्त्वाचा ओढा आहे. या ओढयाचा उगम उमरगा तालुका व निलंगातालुक्याच्यासिमेवर असलेले कुन्हाळी परीसरातून होतो. व पूढे प्रवाहित होत जाऊन बेनितुरा नदी पात्रात मळगीवाडी जवळ विलीन होतो.याची लांबी १५.३९ कि.मी.इतके आहे.कुन्हाळी ओढा हा कोळसूर ओढयाचाएक महत्त्वाचा ओढा असूनतोकदमापूरच्या पश्चिमेस उगम पावतो व कोळसूर ओढयाला मुळज येथे येवूनविलीन होतो. या ओढयाची लांबी ९.१४ कि.मी. आहे.तलमोड ओढा हा उमरगा तालुक्याच्या पूर्वेस असूनतो कोळसूर ओढयाचा महत्त्वाचा उपओढा आहे. जगदाळवाडी जवळ या ओढयाचा उगम होतो. व कोळसुर ओढयाला येऊन मिळतो.याची लांबी ४.८७ कि.मी. आहे.अशा प्रकारे उमरगा तालुक्यातील जलप्रणालीचा अभ्यास करत असताना अभ्यासक्षेत्रातील भूपृष्टाचा उतार हा दक्षिणदिशेला आहे.

**निष्कर्ष :**उमरगा तालुका हा बालाघाट डोंगररांगेवरीलसपाट माथ्यावर वसलेला महाराष्ट्रातील मराठवाडयातीलकर्नाटकसिमेवरील अंत्यत महत्वाचा तालुका असून सहयाद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशालगत असल्याने येथे पाहिजे तेवढा पाऊस होत नसल्यानेकायमस्वरुपी दुष्काळसदृश्य परीस्थिती असते. या तालुक्यात मोठयानद्याविकसित नाही किंवा प्रवाहीत होत नाही.

**संदर्भग्रंथः**

१. एल. के. कुलकर्णी, भूगोल शब्दकोश (जाने २००९), राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणे.
२. सतिशगावित, उमरगा व तुळजापूर तालुक्यातील ग्रामिण वस्त्यांचे भौगोलिकतुलनात्मक अभ्यास (उस्मानाबाद जिल्हा) (ऑक्टो २०२१), अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध.
३. भारतीय भूस्थलदर्शकनकाशाक्र.५६C/१३, ५६C/१४, ५६C/१०, ५६C/६, ५६C/५, ५६B/८, ५६B/१२, व ५६C/९
४. www.Googleearth.com

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार

**प्रा. रकटे ज्योती भाऊसाहेब**
ग्रंथपाल ज. भ. शि. प्र. मं., कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी, ता. गेवराई, जि. बीड – ४३११४३
jyrakte@gmail.com

**प्रस्तावना –**

आधुनिक भारतीय विचारांच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वाटा मोठा आणि महत्त्वपुर्ण आहे. देशातील सत्तर लक्षांहून अधिक दलितांना समान मानवी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा आग्रह त्यांच्या व्यक्तीत्वाहून मूर्तिमंतपणे साकार झाला. त्यांच्यापूर्वी याच प्रकारचा आग्रह महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारातून आला होता. परंतु आंबेडकरांचे वैशिष्टय असे की, त्यांनी हिंदू सामाजिक श्रेणीतील सर्वात कनिष्ठ अशा एकाच स्तरावर आपले लक्ष केंद्रित केले आणि त्याच्या हक्कांसाठी प्रस्थापितांविरुध्द सर्वच पातळयांवर लढा दिला. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास या विषयांचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. तसेच एक श्रेष्ठ न्यायपंडित, कुशल कायदेपंडित आणि धडाडीचे व बुध्दिमान राजकीय नेते म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. ते एक चांगले घटनातज्ज्ञही होते. या संदर्भातील त्यांच्या कुशाग्र बुध्दीची छाप भारतीय घटनेत स्पष्टपणे दिसते. एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजाला परिवर्तनाचा मार्ग दाखविणारे व स्त्रियांची प्रगती हीच समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. खऱ्या अर्थाने हे स्त्रियांचे आधारकर्ते होते. भारतीय महिलांना आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याचा हक्क, वारसा हक्क, घटस्फोटाचा हक्क, पोटगी मागण्याचा हक्क, मतदानाचा हक्क, मातृत्वलाभ हक्क, महिला कामगारांना पगारी रजा हक्क यासारखे हक्क मिळावेत यासाठी संविधानामध्ये विविध तरतूदी केलेल्या आहेत. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंबाची प्रगती होते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांनी शिक्षण घेण्याच्या बाबतीत सतत प्रयत्नशील होते.

**संशोधनाचे उद्दिष्ट –**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार अभ्यासणे.

**संशोधनाचे गृहितक –**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे शैक्षणिक कार्य समाजाला मार्गदर्शक असे आहे.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला असून प्राथमिक व दुय्यम साधनाव्दारे माहिती संकलित केली आहे. त्यासंबंधी आवश्यक असणारी माहिती संदर्भग्रंथ, मासिके, वृतपत्राव्दारे संकलित करून माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**शिक्षण आणि ज्ञान –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ज्ञानाबाबत खूप व्यापक असा दृष्टीकोन आहे. ज्ञान म्हणजे प्रकाश. हा प्रकाश माणसाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक विकासाचा आधार बनला पाहिजे. ज्ञानाचा संदर्भ सामाजिक असला पाहिजे. 'व्यक्तीना जाणीव करुन देते ते शिक्षण' अशी समर्पक शिक्षणाची व्याख्या करताना बाबासाहेब म्हणतात, 'व्यक्तीला अन्यायाविरुध्द उठाव करण्याचे सामर्थ्य आणि जाणीव केवळ शिक्षणामुळेच होऊ शकते.स्वत:चा उध्दार करावयाचा असेल तर शिक्षण घेणे गरजेचे आहे.' शिक्षण हे हत्यार आहे ज्याच्या साहय्याने माणूस शोषणमुक्त होऊन गुलामगिरी विरुध्द क्रांती घडवू शकतो. 'शिक्षण आणि ज्ञान ज्याच्याजवळ आहे तो शीलवान असेल तर तो इतरांचे संरक्षण करु शकेल अन्यथा तो दुसऱ्याचा घात करेल. शिक्षण व्यक्तीला आत्मस्वातंत्र्यासाठी वापरता येईल तसेच विषमता नष्ट करण्यासाठी, संघर्षासाठी, समतेसाठी, शिस्त व विकासासाठी, चारित्र्य संवर्धनासाठी, मूल्याधिष्ठित समाज परिवर्तनासाठी, स्त्रियांच्या उध्दारासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे नव मानवतावादाला संस्कार करणारे असावे. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोध्दार हे परिणामकारक शिक्षणाचे ध्येय असावे. शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय होऊच शकत नाही. शिक्षण हे सामाजिक क्रांतीच प्रभावी साधन आहे म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यायला हवे. लोक अशिक्षित राहिले तर राष्ट्र आणि समाज नष्ट होईल. डॉ. आंबेडकरांच्या मते ज्ञान हे माणसाला घडवते. ज्ञानाव्दारे स्त्रियांना स्वावलंबी बनवणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचारांचा निकष आजच्या शिक्षण पध्दतीला लावला तर पदरात निराशाच पडेल. बाबासाहेब शिक्षणाच्या व्यापारीकरणाच्या विरोधात होते. त्यांनी त्याविषयी तत्कालीन सरकारवर टीका करताना म्हटले होते, 'आपण कला महाविद्यालयावर जेवढा खर्च करतो त्यापैकी जवळपास ३६ टक्के खर्च विद्यार्थी शुल्कातून करतो. यावरुन डॉ. आंबेडकरांना स्पष्ट करायचे होते की, शिक्षण घेणे हा विद्यार्थ्याचा हक्क असून विद्यार्थ्यांना एवढे शुल्क आकारणे म्हणजे शिक्षणाचे बाजारीकरण होय.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार —**

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्री शिक्षणासंबधीचे कार्य हे केवळ उपेक्षित, वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर देशातील सर्व स्त्रीवर्गाच्या उध्दाराचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. जाती, वर्ग विरहित स्त्रिवर्गाचा सर्वागिण विकास व्हावा यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या लिखाणातून, भाषणातून व चळवळीतून विचार मांडलेले आहेत. एकूणच भारतीय समाजाच्या सर्वागिण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थी दशेपासूनच स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असताना आपल्या वडीलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना न्युयार्क वरुन ४ ऑगस्ट १९१३ रोजी पाठविलेल्या पत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीस्वातंत्र्य व स्त्रिशिक्षणाबद्दलचा उदात्त दृष्टीकोन स्पष्ट होतो. या पत्रात जमेदारांना ते लिहितात, 'आई . बाप आपल्या मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत' असे त्यांचे म्हणणे ठीक नाही. आई . बाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलीच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल. शिक्षण हाच स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचा मार्ग आहे. यासाठी त्यांनी पुढील बाबी सांगितल्या.

**स्त्री . पुरूष समानता —** डॉ. आंबेडकरांना सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर क्षेत्रांमध्ये स्त्री.पुरूष असा भेदभाव मान्य नव्हता. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इ. सर्वच दृष्टीने स्त्री.पुरूष समानतेला ते प्राधान्य देतात. डॉ. आंबेडकरांच्या मते, स्त्री आणि पुरूष यांच्यात समानता असावी. ही समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग त्यांनी सांगितला. स्त्रियांना समाजात व कुटुंबात उत्तम व समान दर्जा मिळाला पाहिजे. स्त्री शिक्षणाने कुटूंब पुढे जाते. घरातील स्त्री अडाणी असली तर कुटुंबाची प्रगती होणे अवघड असते असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या शिक्षणाकडे लक्ष दिल्यास आपोआप सर्व समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल व तिथे स्त्री आणि पुरूष यांच्यात समानता प्रस्थापित होईल.

**स्त्रियांचे कार्यक्षेत्र व्यापक —** भारतीय पूर्वजांनी स्वतःच्या स्वार्थासाठी असा भेदभाव करुन स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढेच मर्यादित करुन ठेवले होते. या कृतीचा डॉ. आंबेडकरांनी विरोध केला. डॉ. आंबेडकरांनी महाड येथे बोलताना स्पष्टपणे सांगितले होते की, ज्ञान आणि अध्ययन हे फक्त मुलांसाठीच नाहीत तर ते मुलींसाठीही आवश्यक आहे. माणगाव येथील चर्चासत्रात बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, 'मुले आणि मुली असा कोणताही भेदभाव न करता त्यांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण द्यावे तसेच प्राथमिक शाळेत शिक्षकासाठीच्या जास्तीत जास्त जागा मुलींसाठी आरक्षित कराव्यात. मुलींना गृहविज्ञानाच्या क्षेत्रात अधिकाधिक पारंगत करण्याचे शिक्षण व प्रशिक्षण त्यांना दिले जावे अशी त्यांची मागणी होती. कोणत्याही समाजाची प्रगती स्त्रियांच्या प्रगतीवर मोजली जाते असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

**समान काम, समान वेतन आणि समान दर्जा —** लोकशाहीत स्त्री . पुरूष समानता असणे आवश्यक आहे. त्यामुळे आंबेडकर स्त्रियांना पुरुषांसारखाच समान दर्जा देण्याचाच पुरस्कार करतात. औघोगिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांसाठी समान काम समान वेतन हा कायदा भारतामध्ये आणणारा पहिला भारतीय म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांच्या मते, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया काम करत असल्याने स्त्रियांना सुध्दा पुरुषांन एवढाच कामाचा मोबदला मिळाला पाहिजे. याच अनुषंगाने संविधानात याची तरतूद केलेली आहे.

**स्त्री शिक्षणाने राष्ट्र विकास —**डॉ. आंबेडकरांनी महिलाच्या आणि देशाच्या प्रगतीसाठी शिक्षणावर भर दिला. स्त्रियांना सुशिक्षित केल्यामुळे कुटुंबात आणि समाजात नितिमत्ता वाढेल तसेच निःस्वार्थी प्रेम, सेवा, सदाचार अशा सद्गुणांची वाढ होऊन समाज आणि राष्ट्र मजबूत बनेल. कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी स्त्रियांना शिक्षण देणे महत्तवाचे असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

**स्त्रियांना उपदेश —**डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना असा उपदेश केला की, भारतीय स्त्रियांनीही चांगले कपडे आणि दागिने घालून आपली श्रीमंती व सौंदर्याचे प्रदर्शन न करता सुशिक्षित होऊन आपली गुणवत्ता वाढवून आपल्या विकासाचे दर्शन लोकांना घडविले पाहिजे. आपल्या मुलांना शाळेत पाठवून चांगले शिक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**अनिष्ट प्रथेला विरोध —**डॉ. आंबेडकरांनी बालविवाह, बहुपत्नी विवाह, हुंडा पध्दती, सतीची चाल अशा अनिष्ट प्रथांना सतत विरोध दर्शविला होता.

**हिंदू कोड बिल —**डॉ. आंबेडकरांनी साठ वर्षापुर्वी कायदे मंडळाचे सदस्य असताना लोकसंख्यावाढ नियंत्रण व कुटुंब नियोजनासंबंधी आपले विचार मांडले होते. त्या काळी या विषयांवर जाहीर बोलणे हे धाडसाचे काम होते. तसेच त्यांनी स्त्रियांसाठी 'हिंदू कोड बिल' तयार केले होते. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची सुरुवात १९३९ पासूनच केलेली होती, हे बिल म्हणजे स्वतंत्र भारतातील एक सर्वात मोठी सामाजिक सुधारणा होती. त्यामध्ये त्यांनी स्त्रियांच्या विकासासाठी त्यांना स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करण्यात यावा असे म्हटले होते. यामध्ये संपत्तीचा अधिकार हा स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा प्रमुख आधारस्तंभ होता. जोपर्यंत महिलांना संपत्तीचा हक्क, वारसा हक्क मिळणार नाही तोपर्यंत त्यांची गुलामगिरी संपणार नाही. हीच महिलांच्या सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे. महिलांना घटस्फोटाचा अधिकार तसेच मुल दत्तक घेण्याच्या बाबतीत कोणत्याही जातीभेदाची बंधन नसू नयेत. महिलांना आंतरजातीय विवाह करता येईल, पतीच्या निधनानंतर पतीच्या संपत्तीतील हक्क हा तिला मिळालाच पाहिजे. एखादया स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाल्यास तिच्या मुलीला तिचा संपत्तीचा हिस्सा मिळाला पाहिजे. या प्रकारच्या प्रमुख तरतुदी या बिलात होत्या. परंतु दुर्दैवाने तथाकथित मंडळींनी त्यावेळच्या

पंतप्रधानांकडे आक्षेप घेतल्याने हे बिज मंजूर झाले नाही. महिलांच्या हिताच्या दृष्टीने आणलेले बिल नामंजूर झाल्याने डॉ. आंबेडकरांनी कॅबिनेट मंत्रिपदाचा राजीनामा दिला. नंतर मात्र या हिंदू कोड बिलाचे चार भागात रुपांतर करुन व त्यात दुरुस्त्या करुन ते मंजूर करण्यात आले. त्यामध्ये हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू वारसा कायदा १९५६, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६ आणि हिंदू उत्तराधिकार कायदा असे वेगवेगळे अधिनियम करुन ते मंजूर करण्यात आले.

**मातृत्वलाभ कायदा (१९२८) –** हा कायदा सुरुवातीला विशेषत: कारखाना महिला कामगारांच्या दृष्टीने केलेला होता. १९२९ मध्ये तो मुंबई मध्ये मंजूर करण्यात आला. विशेषत: गरिबीत जीवन जगणाऱ्या महिला त्या काळात कारखान्यात काम करत होत्या. गरोदर महिलांना प्रसुतीपुर्व आणि प्रसुती पश्चात काही दिवसांची हक्काची रजा मिळाली पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतल्याने हा कायदा मुंबई नंतर मद्रास प्रांतात देखील संमत करण्यात आला.

**मतदानाचा हक्क –**जगातील प्रगत राष्ट्रात वर्षानुवर्षे मतदानाच्या अधिकारासाठी स्त्रियांना रस्त्यावर उतरुन आंदोलने करुन मतदानाचा हक्क प्राप्त करावा लागला. मात्र तोच मतदानाचा अधिकार डॉ. आंबेडकरांमुळे भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय स्त्रीला कसल्याही प्रकारे आंदोलन न करता मिळाला. यानुसार कोणत्याही जाती धर्मातील स्त्री.पुरूषांना सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार मिळाला आहे. स्वातंत्र्यापूर्व काळात मात्र हा मतदानाचा अधिकार फक्त जमिनदार, श्रीमंत व कर भरणाऱ्यांना मिळत होता.

**महिलांच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी विविध तरतूदी–**

पुरुषाच्या बरोबरीने महिलांना समाजात समान वागणूक मिळावी त्यांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५(१)ए २३, २४, ३९ (अ,क,ड), ४२, ४५, ५१(अ), २४३(ड) नुसार महिलांच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी विविध तरतूदी केलेल्या आहेत. जसे–महिला कामगार कल्याण निधी, भविष्य निर्वाह निधी, महिला कामगार संरक्षण कायदा, महिला कामगारासाठी मातृत्व लाभ कायदा, घटस्फोट कायदा, महिलांना खाणीत काम करण्यास मनाई करणारा कायदा, बालविवाह रोखण्यासाठी मुलींसाठी विवाह मर्यादा वय १८, राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समान हक्क आणि संधी, घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा, पोटगीचा अधिकार व्दिभार्या प्रतिबंध कायदा इ. कायदे महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आले.

**निष्कर्ष–**

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या शिक्षणावर जास्तीत जास्त भर दिला होता. डॉ. आंबेडकरांचे विचार सर्व जाती धर्मातील, वर्गातील महिलांच्या प्रगतीतील व न्याय हक्कांच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न होता. त्यांनी लिंग, समानता, शिक्षण व स्वातंत्र्याची गरज यावर भर दिला. शिवाय महिलांना हितकारक अशा कायदेशिर तरतूदी करुन त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचा अट्टाहास त्यांचा होता. महिलांना समान वागणूक आणि समान प्रतिष्ठा दिली तरच खऱ्या अर्थाने सर्व समाजाची प्रगती होईल. त्यासाठी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश त्यांनी समाज आणि राष्ट्रहितासाठी दिला.

**संदर्भ –**

१. कीर, धनंजय. १९६६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई. पॉप्युलर प्रकाशन.
२. गाठाळ, एस. एस. २०१९. महाराष्ट्रातील समाजसुधारक. औरंगाबाद. कैलास पब्लिकेषन्स.
३. गाठाळ, एस. एस. २०१९. आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या विषेश संदर्भात. औरंगाबाद. कैलास पब्लिकेशन्स.
४. डोईफोडे, ज्योती. २००५. मूलभूत सामाजिक विचार. औरंगाबाद. विद्या बुक्स पब्लिशर्स.
५. ढगे, एस. के. आणि हासे पी. एस., २०११. संशोधन पध्दती. पुणे. के. एस पब्लिकेशन.
६. ढोबळे, रमेश. २०१०. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, औरंगाबाद. कैलास पब्लिकेशन्स.
७. राठी, शुभांगी दिनेश. २०१६. भारतीय राजकीय विचारवंत. औरंगाबाद. कैलास पब्लिकेशन्स.
८. http://www.wikipedia.org

# संत कबीर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**डॉ. सुहास पाठक[१] रविंद्र पि. सोनकांबळे[२]**
[१]संशोधक पिएच.डी. मा.शा.संकुल स्वारातीम विदयापीठ, नांदेड
[२]मार्गदर्शक सहयोगी प्राध्यापक मा.शा.संकुल स्वारातीम विदयापीठ, नांदेड

**प्रस्तावना :**

भारत देश हा समाज सुधारकांचा देश म्हणून ओळखला जातो. गेल्या कित्येक दशकापासून या देशावर समाज सुधारकांचा प्रचंड प्रभाव आहे. या देशात अनेक पंथाचे, जाती आणिवंशाचे लोक एक्त्र नांदतात. त्याचे कारण म्हणजे समाज सुधारक देशाच्या जडणघडणीत लोकमान्य टिळक, स्वातंत्रवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, संत कबीर, संत नामदेव, संत गोरा कुंभार बहीणाबाई, संत जनाबाई अशी अनेक समाज सुधारकांचा सहभाग या देशाला लाभला आहे. या समाज सुधारकापैकी महान सुधारक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत कबीर आहेत. या दोन समाज सुधारकांचे आर्थिक विचार सदर संशोधन पेपर मधून मांडण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण आयुष्य संघर्ष व खडतर प्रवास करत ज्ञानसाधनेने समाजाच्या उन्नतिसाठी सर्व आयुष्य संमर्पित केले आहे. संपूर्ण विश्वाला ज्ञात असलेले या समाजशास्त्रज्ञ, दलितोध्दारक, प्रज्ञासुर्य महान पत्रकार शिक्षण संस्थापक म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. खरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे महान विचार आहेत. शोषीतांची दलितांची अस्मीता आहे. मानव जातीसाठी जिवन विषयक दृष्टीकोण असुन जगण्याची शक्ती आहे सामाजिक न्याय व समतेचा पूरस्कार करत लोकशाहीचे मुल्य मानणारे व अन्याया विरूध्द लढण्याची प्रेरणा आहेत. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या ज्ञानाच्या जोरावर तथा अभ्यासाने हजारो वर्ष गुलामगिरीत खीतपत पडलेल्या लोकांना गुलामगिरी विरूध्द लढण्याची ताकद दिली आहे. त्यांचे विचार म्हणजे धगधगता ज्वालामुखी असुन परिवर्तनवादाची लाढ आहे.

**संत कबीर :**

खर तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकाळाच्या अगोदर पासुन या देशात गरिबी, दारीद्रय, अंधश्रध्दा भेदभाव कर्मकांड जातीभेद मुस्लीम सत्तेचे शोषण आशा अनेक समस्यांनी ग्रासलेला देश असुन या कालखंडात संत कबीर यांनी मानव समाजाला परवर्तनाची दिशा देण्याचे बहूमूल्य कार्य केले आहे. भारतातील एक महान संत म्हणजे संत कबीर यांनी समाजात पसरलेल्या अंधश्रध्दा, भेदभाव, चालीरीती दूर करण्यासाठी दोहया माध्यमातुन उपदेश केलेत्र संत कबीर हे वैज्ञानिक दृष्टीकोन व मानवतावादी शिक्षण देणारे शिक्षक होते. संत कबीरांच्या काळात मुस्लीम सत्तेचे प्रंचड शोषण होते. कर्मकांड, जातीभेद अंधश्रध्दा, अज्ञान समाजात संत कबीर यांनी दोहयाच्या माध्यमातुन शिक्षण जनजागृतीचे कार्य केले. म्हणून संत कबीर यांना मानवतावादी शिक्षण देणारे शिक्षकच म्हणतात. संत कबीर यांच्या काळात म्हणजेच मध्येयुगीन काळात कर्मकांड, अंधश्रध्दा, जातीभेद व इस्लाम धर्माच्या शोषणाचे हाहाकार (कळसच गाठला होता.) माजला होता. तेव्हा संत कबीर यांनी दोहयाचा वापर करून समाजाशी संवाद साधताना म्हणतात शिक्षण हे अंधकार दूर करते. अंधश्रध्दा कर्मकांड थोतांड आहेत. समाजा समोर मानवतावादी वैज्ञानीक दृष्टीकोन मुल्यांचे शिक्षण ही काळाची गरज आहे. या वरून हेच सिध्द होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत कबीर यांचे विचार समान होते. अशा हया दोन महामानवांचे अर्थिक विचार मांडण्याचा एक प्रयत्न .....

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. ते एक थोर अर्थशास्त्रज्ञ होते पैशांअभावी पावाच्या एका तुकडयावर भूक भागवून ज्ञानासांठी जगणारा माणूस, पण ज्ञानाची भूक सतत तेवत ठेवणारा महापुरूष, पावाच्या त्याच एक तुकडयावर रात्रभर अभ्यास करून विविध मोठे मोठया पीएचडी, डी. एस्सी. सारख्या पदव्या प्राप्त करणार माणूस आज देशाचा थोर अर्थशास्त्रज्ञ होतो की, खरोखर तमाम भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. स्त्री पुरूष, वंचित, दूर्बल, कामगार, कष्टकरी, शेतकरी, मजूर या सर्वासाठी बाबांनी आपले अर्थशास्त्रीय भाषेतून अत्यंत मोलाचे विचार मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जागतीक दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक झाला आहे. कोलंबिया विद्यापीठात एम.ए. करीत असतांना त्यांनी 'Administration and Finance of the East India Company' ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनिती अशा नावाचा एक प्रबंध लिहिला त्यात ते त्यांनी इ. स. १७७२ ते १८५८ पर्यतच्या काळातील ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय धोरणांचा अभ्यास केला ते म्हणतात की, ईस्ट इंडिया कंपनी ही निवळ व्यापारी दृष्टीकोना ठेवून नफा मिळवत आहे. त्यांच्या हिशेबामध्ये या पुस्तकांच्या माध्यमातुन ब्रिटिश संसदेला इशारा दिला की, ब्रिटिश लोकसभेने कायदा करून कंपनीने आपला प्रशासनाचा व व्यापाराचा हिशोब वेगळा ठेवावा. ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थ व्यवस्थेची उत्क्रांती या पी.एच.डी. साठी लिहिलेल्या प्रबंधास डॉ. बाबासाहेबांनी इ.स. १८३३ ते १९२९ या काळात घटक राज्ये व ब्रिटिशांचे केंद्र सरकार यांच्यातील आर्थिक संबंध कसे कसे सुधारत गेले याचे विस्तृत व विस्तारीत लिखान केले आहे. त्याचबरोबर

बेजाबदार पध्दतीने उधळपट्टी खोर भारतीय जनतेला कसे पिळवटून काढले आहे. हे सुध्दा नमूद केले आहे. या प्रबंधात बाबासाहेबांनी ब्रिटीश सरकारचा हिशोबाचा गोंधळ एकुण चार भागात नमूद केले आहे.[१]

१) स्थानिक स्वराज्य संस्थांचे हिशोब,

२) प्रांतिय हिशोब

३) साम्राज्यवादी हिशोब

४) समाविष्ट न केलेले हिशोब

भारतातील सम्राज्यवादी ब्रिटिश सरकारच्या आर्थिक दूर्दशा कशाने झाली याचे विविचेन बाबासाहेबांनी केले आहे. १८३३ ते १९२१ ते १९३३ या दरम्यान भारतीयांवर जे विविध प्रकारचे कर लादण्यात आले त्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले. ब्रिटिशांनी जमीनीवर जवळजवळ ६६ टक्के, मिठावर ९ ते १४ टक्के, जकात २ ते ६ टक्के या सर्व गोष्टीस केंद्रसरकारच जबाबदार आहे. त्यामुळे जे जूलमीकर आहे ते कमी करावे सर्व भारतात अकांउट व तपासणी समान ठेवावी त्याचबरोबर केद्र सरकारच्या हातात ज्या काही आर्थिक चाब्या आहेत त्यांचे विकेंद्रीकर करण्यात यावे. त्यासाठी जे व्यापार उद्योगांवर कर आहेत घरावर कर आहेत वारसा हक्काने मिळणाऱ्या जमिनीवर कर आहेत. यांचे अधिकार प्रांताकडे देण्यात यावे. डॉ.आंबेडकर यांनी पूढच्या प्रकरणात असे म्हणतात की, प्रांतिक आर्थिक व्यवस्थेच्या मर्यादांची मांडणी केली आहे. ते म्हणतात ही प्रांताला स्वतंत्र्य कर वसूली, स्वतंत्र्य सेवा खाते, स्वतंत्र्य अकांउट असावे. त्यानंतरच्या चौथ्या भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर केद्र सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात की वरीष्ठ व श्रीमंत तसेच जमीनदार मळेवाले, तालुकदार, इत्यादी लोकांना कर माफ होते तर भारताच्या जनतेला मात्र वाऱ्यावर सोडण्या आले असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या त्यानंतरच्या ग्रंथात रूपयाचा प्रश्न उगम व उपाय १९२९ या ग्रंथात आपले आर्थिक विचार मांडताना म्हणतात की सन १८०० ते १८०३ या कालखंडातील भारतीय रूपयाची चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण झाली याचे विवेचन बाबासाहेबांनी या ग्रंथात केले आहे. ते म्हणतात की, रूपयाची आपल्या देशातील क्रयशक्ती कमी होत गेली ही महत्वाची बाबत सत्ताधारी विसरले होते म्हणून आज रूप्याचा प्रश्न निर्माण झाला. सुरूवातीला सुवर्ण परिणाम व रूपयाचे परिणाम अशी दुहेरी चलन पध्दती अस्तीत्वात होती. सन १९३३ दरम्यान इंग्रजांचा भारतात एक कलमी कार्यक्रम सुरू झाल्यावर १८३५ च्या कायद्यान्वये सुवर्ण परिणाम रद्द करून देशभर रूप्याच्या परिमाणाच्या स्वरूपाला चलनपध्दतीचे एक सुत्रीकरण करण्यात आले. त्यानुसार १८० ग्रॅम वजनाचा चांदीचा रूपया प्रचलित झाला पण पुढे चलनाच्या गरजा भागवण्यासाठी ते अपूरे पडू लागले त्याची कारणे ही लष्कराला, सरकारी अधिकाऱ्याला धान्य किंवा जमिनीच्या स्वरूपात दिले जावू लागले. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार वाढल्यामुळेही चलनांचा वापर वाढला सर्वणविनीमयामध्ये लवचिकता जरी असली तरी ते एक हा दूधारी अस्त्र आहे. चलनिर्मिती लवचिक असल्यामुळे ती अतीनिर्बंध होवू शकते त्यामुळे चलनफुगवटा व भाववाढ होत असते. आणि त्यावरूनच रूपयाची किंमत घसरते. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले अर्थिक विचार आज सुध्दा अत्यंत मार्गदर्शक आहे. आज आपल्यासमोर रूपयाची घसरण, भाववाढ, इ. समस्या उभ्या आहेत. डॉ. बाबासहोबांनी सांगितलेले हे विचार आपल्यासाठी अत्यंत दिशा दर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूढच्या आपल्या ग्रंथात म्हणजेच भारतातील लहान शेतजमीनी व त्यावरील उपाय या ग्रंथात शेतीबद्दल अंत्यत मोलाचे विचार मांडतात. ते म्हणतात की, भारतात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. जास्तीत जास्त लोकांच्या उदरनिर्वाह हा शेतीवर चालतो. या आपल्या ग्रंथात डॉ. आंबेडकर शेतकऱ्यांना इशारा देतात की, शेतीचे लहान लहान तुकडयांत विभाजन करने हे अत्यंत धोकादायक आहे. त्याचबरोबर ते शेतकऱ्यांला शेतीबरोबर अनेक जोडव्यवसाय सुध्दा करण्याचा सल्ला देतात. आज अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत या आत्महत्यांवर एकच उपाय म्हणजे बाबासाहेबांनी सांगीलेले विचारांची अंमल बजावनी करने होय परंतू असे की म्हणवयास हरकत नाही की या देशाने बाबासाहेबांचे विचार समजून घेण्याचा प्रयत्नच कधी केला नाही. त्यांना फक्त दलितांचे नेते एवढेच विरूद लावून त्यांनी सांगितलेल्या गोष्टींना डोळे झाक करण्यात आले.[२२]

## अर्थिक विचार (संत कबीर)

ज्या युगात कबीरांचा प्रादुर्भाव झाला त्या काळात धन.संपत्तीला इतके महत्व होते की, त्यामुळे मानवता नामशेष झाली होती. संपत्ती लोलुपतेने उत्प्रेरीत होऊन काही मुसलमान राजे उत्तर–पश्चिम भारतावर अमानुष आक्रमंण करीत होते.. कुटूंबातील व्यक्तीचे केसाने गळे कापले जात होते. धन–संपत्तीच्या लोभापायी अमानवीय कृत्यांनी कहर केला होता. त्याचा परिणाम सर्वस्वी कबीरांच्या मनावर झाला. त्यांच्या मनात प्रतिक्रियात्मक भावना जागृत झाली आणि मग समस्त मानवांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कबीरांची हृदयसंवेदना करूणा व प्रेमाने ओतप्रोत झाली. याच भावनेतून त्यांनी समाधान, संयम, दीनता व क्षमा यांद्वारे सामाजिक जीवनाचा आदर्श प्रस्तुत केला.कबीरांची दृष्टी व्यक्तीवर केंद्रीभूत होती. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या कुत्सित व अध:पतीत भावनांचा परित्याग करूण

१. Max Woman Blog – महामानवाचे आर्थिक विचार लेखक भारतकुमार राउत (www.maxwoman.in)

[2]www.wikipedia.orgवरून घेण्यात आले.

त्याठिकाणी आदर्श भावनांचे सिंचन करणे आणि प्रत्येक मानवामध्ये मानसिक क्रांती निर्माण करूण त्यांना कल्याणगामी मार्गाने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे, हे कबीरांचे जीवनध्येय होते. समाजात प्रत्येक व्यक्तीचे जीवन आदर्शवत कसे असावे यासाठी अर्थातच कबीरांचे जीवन प्रतीक ठरले. त्यांनी आपला आदर्श समाजासमोर ठेवला. समाजातील प्रत्येक व्यक्तीने तसे वागण्यास प्रवृत व्हावे, ही अभिलाषा व्यक्त केली. प्रत्येक व्यक्तीने स्वत:मध्ये क्रांती घडवून आणली तर समष्टीत क्रांती घडून येईल, यावर कबीरांचा दृढविश्वास होता. म्हणून प्रत्येक मानवाने धन–संपत्तीच्या मोहाचा परित्याग करावा आणि इतरांना लुबाडण्याऐवजी स्वत:लाच लुबाडले तर त्याचा काय परिणाम होतो हे कबीरानी दोहयातुन सांगीतले.

**क्बीर आप ठगाइए, और न ठगिए कोय।**
**आप ठग्यां सुख ऊपजै, और ठग्यां दुख होय।।**

'दुसऱ्यांना लुबाडण्याऐवजी प्रत्येकाने स्वत:लाच लुबाडावे. दुसऱ्यांना लुबाडल्यान हृदयपीडा होतात परंतु स्वत:लाच लुबाडल्याने सुख प्राप्त होते.' याचा अर्थ कोणी कोणाचे शोषण करू नये, हा कबीरांचा विचार आजच्या काळातील शोषण प्रक्रियेला पायबंद घालण्यास निश्चितच सहायभूतठरणारा आहे.

**संपत्तीची आवश्यकता :**

संपत्तीसाठी माणूस माण्साची पिळवणूक करीत असतो आणि त्यांतून अनीतिमत्ता जन्मास येत असते. तरीही कबीरांनी संपत्तीचा तिरस्कार केलेला नाही. जीवनासाठी संपत्ती आवश्यक आहे, हेच सूत्र त्यांनी सांगीतले आहे. धनसंपत्तीच्या विनियोगातून मानवी व्यवहार सुरू असतो आणि त्याद्वरे मानव आपल्या आवश्यकतांची पिरपूर्ती करीत असतो. जीवनासाठी धन–संपत्ती आवश्यक तत्व आसल्याचे कबीरांनी मान्य केले. जेव्हा समाजात प्रत्येक व्यक्तीची भावना आतिरिक्त धनसंचयाकडे प्रवृत्त होते त्यावेळी समाजात अनाचार माजतो. म्हणून कबीरांनी धनसंपत्तीची आवयश्यकता जीवनासाठी मान्य केली असली तरी अतिरिक्त धनसंचयाचा त्यांनी कसून विरोध केला, प्रत्येक मानवाने आपल्या जीवनोपयोगासाठी किती धनसंपत्तीचा वापर करावा, यासंबंधी कबीर म्हणतात,

**सांई इतना दीजिए, जामे कुटुम्ब समाय।**
**भुंखा मैं भी न रहूं, सांधु न भुंखा जाय।।**

आपल्या कुटुंबाच्या आवश्यकतांची परिपूर्ती करता येईल, अतिथींचा सत्कार करता येईल, कुणीही उपाशी राहणार नाही आणि साधू लोकांची सेवा करता येईल इतके र्प्याप्त धन प्रत्येक व्यक्तीजवळ असणे आवश्यक आहे, असे कबीरांनी निक्षून सांगितले आहे.

धनसंपत्तीच्या लोभापायी मानवी मन अस्थिर व चंचल बनते. त्यामुळे मानव इतरांची पिळवणूक करून स्वत: अधिकाधिक श्रीमंत बनण्याचा प्रयत्न करतो. एक श्रीमंत दुसऱ्या श्रीमंताला हडपण्याचा प्रयत्न करतो. धनसंपत्तीमुळे मानसिक चंचलता निर्माण होते. त्यातूनच निर्धनाच्या मानत श्रीमंताविषयी द्वेष, घृणा, ईर्षा आदी भाव उत्पन्न होतात. श्रीमंत आधिक श्रीमंत बनण्याच्या ईर्षेने पेटलेला असतो. त्यातूनच समाजात आनाचार, चोरी, कपट आदी दुर्गुणांचा सुळसुळाट होतो. अस्थिर संपत्तीच्या मागे लागून माणसाचे मन अस्थिर व चंचल झालेले असते. या चंचल मनाला लागाम लावण्यासाठी कबीरांनी संपत्तीकडे काना डोळा करण्याचे उपदेश केला,

**सम्पत्ती देखि न हरषिए, विपत्ती देखि न रोई।**
**ज्यू सम्पति त्यूं विपत्ती है, करना करै सुं होई।।**

संपतीकडे बघून आनंदीत होऊ नका. ती गेल्यावर रडत बसू नका. जशी ती संपत्ती आहे तशीच ती विपत्तीही आहे. म्हणूनच संपत्तीकडे सम्यक दृष्टीने बघावे, असे दोहयातून कबीर म्हणतात.[३]

**समारोप:**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आर्थिक विचारांची माडीनी करताना आपले आर्थिक विचार समाजातील सर्व स्थरातील व्यक्तीचा विचार केला असुन त्यांची मांडणी तंत्रशुध्द पध्दतीने केली आहे. तर संत कबीर यांना दोहयांच्या माध्यमातुन आर्थिक विचार मांडताना समाज मनावर होण्यारयामांडणी केली आहे. आज देशाला ७५ वर्ष होत असताना दोन्ही समाज सुधारकांच्या आर्थिक विचारांची अंत्यत गरज आसून येणारया काळात सुध्दा त्यांच्या विचारांची आवश्कता आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

1. Max Woman Blog – महामानवाचे आर्थिक विचार लेखक भारतकुमार राउत (www.maxwoman.in)
2. विकीपिडीया वरून घेण्यात आला आहे.
3. कबीर व्यक्तित्व आणि विचार लेखक डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपुर, पृ. ८८ ते ९०

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजपरिवर्तन एक दृष्टीकोन

**प्रा.डॉ. गायके एस. के.**
समाजशास्त्र विभाग बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज
sandipangaike1967@gmail.com

**प्रस्तावना (Abstract) :**
देशाच्या सामाजिक इतिहासात क्रांतीकारक बदल घडवून आणण्याचे मोठे कार्य ज्या थोर पुरुषांनी केले त्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रथम स्थान येते. आंबेडक यांनी मांडलेले विचार व केलेले उदंड कार्य विसरता येणारे नाही. समाज परिवर्तनाचे काम करत असताना प्रथा, परंपरा रुढी सनातनी विचारधारेशी संर्घष करावा लागला. सामाजिक जाणीव माणसाच्या मनात निर्माण झाली पाहिजे. समाजाच्या विकासाच्या परिवर्तनशिलता आणि प्रगतीच्या मार्गातील मुख्य अडथळा हा समाजातील विषमता आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचाराचे अध्ययन करत असताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते की सामाजिक विचार समाज पुर्नरचनेच्या संदर्भात मांडलेले आहेत. जसे की, जाती, अस्पृश्यता, धर्म, सामाजिक मानवतावाद अशा संबंधाच्या विचार मधून त्यांना एक नवी समाज व्यवस्था निर्माण व्हावी जाती, अस्पृष्यता कालबाहय धार्मिक कृत्य आदीचे त्यांनी विचारातून खंडन केले. इतकेच नव्हे तर, सामाजिक परिवर्तनाची दिशा देखील त्यांच्या विचारांमधून स्पष्ट होते.

**उद्दिष्टये :**

1. विरोध आणि विकास या दृष्टीने मानवी समाजात परिवर्तनाचा शोध घेणे.
2. राजकीय सुधारणापेक्षा सामाजिक सुधारणा या अधिक महत्तवपूर्ण आहेत याचा अभ्यास करणे.
3. स्वातंत्र्य, समता, बंधुता अशा आदर्श समाज व्यवस्थेचा अभ्यास करणे.
4. समाजिक व्यवस्थेच्या रचनेची भूमिका, उपसमूह, प्रमाणके आणि मूल्ये या चार घटकांचा परस्परांशी सबंधाचे विश्लेषन करणे.
5. आर्थिक सुधारणा हि क्रंतीद्वारे राज्यसत्ता प्राप्त केल्याशिवाय येवू शकत नाही असा समाजवादी लोकांच्या सिध्दांताचे विश्लेषन करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक असणारी माहिती ही विविध संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके या द्वितिय तथ्य संकलनाच्या साधनाद्वारे प्राप्त करण्यात आली आहे.

**गृहितके :**

1. सामाजिक सुधारणा मुळे समाजात मुलगामी परिवर्तनास चालना मिळत आहे.
2. डॉ. आंबेडकरांनी चातुवर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर प्रहार करुन सामाजिक परविर्तनाला गती दिली.
3. हिंदू नी विचारांनी आणि कृतीने स्वतंत्र झाल्यामुळे सामाजिक परिवर्तनाला वातावरण निर्माण झाले.

**सामाजिक परिवर्तनाची संकल्पना (Concept of Social Change)**

सामाजिक परिवर्तन हा समाजशास्त्राच्या आरंभापासूनच एक चिंतनाचा विषय आहे. **ऑगस्ट कॉम्तने** समाज परिवर्तन दर्शवणारा तीन आवस्थांचा सिध्दांत मांडला. तर **हर्बट स्पेन्सर** यांनी समाजात सजातीयतेकडून विजातीयतेकडे बदल होतो असे म्हटले तर **कार्ल मार्क्स** यांनी विरोध आणि विकास यादृष्टीने मानवी समाजात परिवर्तन होते याशिवाय **टायलर** व अन्य समाशास्त्रज्ञानी चक्राकार आणी उत्कांतीवादी विचार मांडून समाज परिवर्तनासंबंधीचे विश्लेषन केले आहे. **किंग्जले डेव्हिस** यांनी सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संघटनात अथवा समाज संरचना व प्रकार्यात झालेला बदल होय तर सामाजिक संबंधातील बदलास सामाजिक परिवर्तन म्हणतात असे विचार **मॅक आयव्हर व पेज** यांनी मांडले. तर **हॅरी जॉन्सन** यांनी सामाजिक संरचनेतील बदल महत्वपूर्ण मानला. वरील सर्व व्याख्यांचा परामर्श घेतल्यानंतर हे स्पष्ट होते की, सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाच्या संरचनेत परिवर्तन होय.

समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाचा जो अर्थ अभिप्रेत आहे तोच अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देखील अभिप्रेत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देखील अभिप्रेत असल्याचे स्पष्ट होते. आंबेडकर केवळ याच विचारांपर्यंत थांबले नाहीत तर

त्यांनी समाज व्यवस्थेच्या परिवर्तनाच्या संदर्भात चळवळ उभी केली. समाज संरचना किंवा सामाजिक व्यवस्थेच्या रचनेत भूमिका, उपगट, प्रमाणके, मुल्ये असे चार घटक असतात आणि चारही घटक परस्परांशी संबंधीत आहेत. असे मत त्यांनी मांडले.

**सामाजिक सुधारणा (Social Reform)**

भारतीय समाज सुधारकांचा सामाजिक सुधारणा बाबातचा दृष्टीकोन संकूचीत होता. कॉंग्रेसच्या सुरुवातीच्या काळात सामाजिक परिषद असतित्वात होती या सामाजिक परिषदेचे समाजसुधारक विषयक कार्य केवळ, विधवा, पुर्नविवाह, अल्पवयीन मुलींचे लग्न न करणे या सारख्या सुधारणेपर्यंत मर्यादीत होते. यामुळे सामाजिक परिषदेला विशेष महत्व प्राप्त झाले नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते. सामाजिक सुधारणेपेक्षा राजकीय सुधारणात विशेष प्राधान्य मिळाले आणि सामाजिक परिषदेला आपले अधिवेशन भरविता आले नाही. येथे सामाजिक सुधादणावादयांचा पराजय होवून राजकिय सुधारणावादयांचा विजय झाला. हा या देशातील स्वातंत्र्याच्या आंदोलनापूर्वीचा इतिहास आहे. यावरुन असे लक्षात येते की, कॉंग्रेसच्या सुरुवातीच्या काळात राजकीय सुधारकांचा गट आणि सामाजिक सुधारकांचा गट असे दोन गट असत्तिवात होते परंतु वस्तुनिष्ट दृष्टीने विचार केल्यास राजकीय सुधारणेपेक्षा सामाजिक सुधारणा या अधिक महत्वाच्या आहेत परंतु असे असताना सामाजिक परिषदेचे असतित्व का संपले? याचे कारण नमुद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, सामाजिक परिषदेच्या सुधारणा या राजकिय सुधारणांपेक्षा जास्त महत्वाच्या नव्हत्या. सामाजिक सुधारणाचा अर्थ संकुचित होता समाजाची पुर्नरचना करण्याच्या दुष्टीने असलेल्या समाज सुधारणापेक्षा राजकीय सुधारणांना प्राधान्य देता येणे शक्य नव्हते सामाजिक सुधारणा या समाजात मुलगामी परिवर्तन घडवून आणणाऱ्या असल्या पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळेच तत्कालीन सुधारकांना डॉ. आंबेडकरांचे विचार पटले नाहीत.

**मुलगामी परिवर्तनाची दिशा** : हिंदू समाज रचनेत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने अथवा प्रस्थापित समाजरचना नष्ट करावयाची असल्यास दोन प्रकारचे मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादित केले.

1. पहिला मार्ग म्हणजे या सामाजिक व्यवस्थेवर प्रहार
2. दुसरा मार्ग म्हणजे हिंदूने विचारांनी आणि कृतीने स्वतंत्र झाले पाहिजे

या दोन मार्गांनीच हिंदू समाजाच्या रचनेत परिवर्तन घडून येईल अशी त्यांची खात्री होती. शिवाय हिंदू समाज रचनेतील दोषावर डॉ. आंबेडकरांनी आघात केला त्याचबरोबर सर्व सामान्य लोकांना न्याय मिळेल आणि स्वातंत्र्य, समता, बंधूता असेल अशा आदर्श समाज व्यवस्थेतची कल्पना त्यांनी मांडली.

हिंदू समाजाच्या रचनेत परिवर्तन आणण्याच्या दृष्टीकोनातून डॉ. आंबेडकरांनी चातुर्वण्यव्यवस्थ जातीव्यवस्थेवर सातत्याने प्रहार करणे. अन्य समाज सुधारकांनी अस्पृष्यता वाईट आहे असे मानून अस्पृष्यता निवारणाचे कार्य हाती घेतले होते परंतु अस्पृष्यता निवारणामुळे जातीचा मुळ प्रश्न नष्ट होवू शकला नाही ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनापासून ओळखली होती. त्यामुळे आंबेडकरांनी येथील सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमतेचे उन्मत जातीवादाचे, अस्पृष्यतेचे आणि वर्ण जातीवादी समाज व्यवस्थेचे कबंरडे मोडण्याचा जणू त्यांनी पणच केला होता.

**निष्कर्ष :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमतेचे उन्मत जातीवादाचे, अस्पृष्यतेचे आणि वर्ण जातीवादी समाज व्यवस्थेचे कंबरडे मोडताना दिसूण येत आहे.
2. मणूष्य जसा सामाजिक प्राणी आहे तसाच तो आर्थिक प्राणी देखील आहे. त्याच्या सर्व आकांक्षा व आचार आर्थिक घटकांनी मर्यादीत झालेले आहेत.
3. समाजात विरोध आणि विकास या दृष्टीकोनातून परिवर्तन होते.
4. समाज परिवर्तनात भुमिका, उपसमुह, प्रमाणके आणि मुल्ये हे चार घटक महत्वपूर्ण आहेत.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृष्यता, धर्म, सामाजिक मानवतावाद यांच्या संबंधातून नवीन समाजव्यवस्थेची निर्मिती करण्यात आली.

**संदर्भूची :**


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर “गांधीवाद अस्पृशांना एक अभिशाप” (अनुवाद प्रा. मा. पु. गांजरे) अशोक प्रकाशन, नागपूर.
2. खडसे भा. की. “आधुनिक समाजशास्त्र” मंगेश प्रकाशन, नागपूर, (१९८७).
3. मेश्राम कॉ. योगंद्र “क्रांतीप्रेरणा डॉ. आंबेडकर”, पारमिता साहित्य चळवळ नागपूर, १९८८.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे – शंकरराव खरात.
5. डॉ. आंबेडकरांची भाषणे – (अनुवाद – मा. फ. गांजरेक खंड–१).

# महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान

**प्रा.डॉ. संगीता मोरे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,जनविकास महाविद्यालय, बनसारोळा, ता. केज, जि.बीड

**प्रस्तावना :**

महात्मा फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी 'सत्यषोधक समाजाची स्थापना केली. षेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराश्ट्रातील स्त्री षिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. लोकांनी मुंबईतील सभेत १८८८ मध्ये त्यांना महात्मा फुले ही उपाधी दिली. महात्मा फुलेवर थॉमस पेन यांच्या ष्जीम त्पहीज व ि्डिंद्ष या पुस्तकाचा प्रभाव होता. महात्मा फुले हे १८७६-८२ या कालावधीत पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. समाजाच्या परिवर्तनासाठी समाजरचनेतील धर्मभेदमूलक विद्वेश, जातिभेदमूलक उच्चनीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्म - संस्थेतील मूर्तिपूजा, संस्कृत भाशेतील कर्मकांड इ. गोश्टीचे उच्चाटन केले. तसेच समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रध्देचे निर्मूलन करून, वैचारीक क्रांती करण्याकरिता सत्यषोधक समाजाची स्थापना १८७३ मध्ये फुले यांनी केली. सत्यषोधक समाजाचे सर्व धर्माचे व जातींचे नागरीक सदस्य व्हावेत, अषी योजना केली होती.

महात्मा फुले यांनी प्रतिकुल परिस्थितीत सर्वत्र ब्राह्मणांचे वर्चस्व असताना, षिकणे, षिकविणे याला उच्चवर्णियांचा विरोध असताना बहुजन समाजाला आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची जाणीव व्हावी म्हणून साहित्यलेखन केले आहे. हे खरोखरच महात्मा फुलेचे मराठी साहित्यातील योगदान मोठे आहे. बहुजन समाजावर ब्राह्मणांनी लादलेली ही मानसिक गुलामगिरी स्पश्ट करण्याकरिता, 'ब्राह्मणाचे कसब' (१८६९), 'गुलामगिरी' (१८७३), 'तृतीयरत्न' (१८५५), 'इषारा' (ऑक्टोबर, १८८५), 'सत्सार' अंक-१व२ (१८८५), अखंडादि काव्यरचना १८८७, अस्पृष्यांची कैफीयत, पत्रक, निबंध, पत्र, जाहीर प्रकटन इ. साहित्यरचना फुले यांनी केली आहे.

**उद्दिश्टे :**

1. महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान सांगणे.
2. महात्मा फुले यांनी लिहिलेल्या मराठी साहित्याचा परिचय करून देणे.
3. महात्मा फुले यांच्या साहित्यातील परिवर्तनवादी विचारावर प्रकाष टाकणे.
4. महात्मा फुले यांच्या साहित्यातील क्रांतिकारी भूमिकेचा वेध घेणे.

**महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान :**

महात्मा जोतीबा फुले यांनी अनेक पुस्तके व निबंध लिहिले. तत्कालीन समाजातील जातिभेद, अनिश्ट प्रथा तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरूध्दची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या एकूणच, साहित्यातून उमटलेली आहे. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्षक व प्रेरणादायी ठरले आहेत. समताधिश्टित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.

महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान लाखमोलाचे आहे. त्यांनी असंख्य ग्रंथ, पोवाडे, अहवाल, नाटक, निबंध, पत्रक, निवेदन, काव्यरचना लिहून अनिश्ट प्रथेवर हल्ला व बहुजन वर्गामध्ये वैचारीक बदल घडवून आणला आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यषोधक समाजाचा प्रमाणग्रंथ मानला जातो. हे पूस्तक फुले यांनी अर्धांगाचा झटका आल्यानंतर उजवा हात लुळा झाल्यावर, षरीरातील व्यथा सहन करीत, डाव्या हाताने पूर्ण केला आहे. जोतीबांच्या विश्व-कुटुंब वादाचा 'सार्वजनिक सत्यधमर्थ' हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकषाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विषद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे. प्रस्तुत ग्रंथात स्वातंत्र्य, समता व बंधूभाव या मूलभूत मानवी मूल्यांच्या आधारावर समाजरचना कषी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली, तिच तत्त्वे या पुस्तकात भारतीय समाजरचनेच्या संदर्भात मांडली आहेत. यात सांगितलेला सत्यधर्म 'यूटोपिया'च होय. जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपियन ध्येयवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात- स्त्री अथवा पुरूश जे एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देषाच्या व खंडाच्या

संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड-निवड न करणारे, यासर्व स्त्री-पुरूशांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजूटीने एकमेकांषी सत्यवर्णन करून वागावे. इतकेच काय, एकाच घरात बौद्ध धर्मी बायको, ख्रिस्त धर्मी नवरा, इस्लाम धर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पूत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म. यात आर्थिक समानता व सर्वधर्मी समभाव स्वच्छ, प्रांजळपणाने मांडला आहे.'षेतकऱ्याचा आसूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनीतीचे उत्कृश्ट चित्र **'षेतकऱ्याचा आसूड'** या ग्रंथामध्ये फुले यांनी चित्रित केले आहे. तसेच याच प्रस्तुत ग्रंथात षेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कोणती कारणे आहेत? हे ही सांगितले आहे. भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटिष साम्राज्यषाहीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत, याचेही हृदयद्रावक चित्रण केले आहे. षेतीचा धंदा आधुनिक तंत्रज्ञानावर उभारावा आणि ग्रामीण उद्योगांना आधुनिक तंत्रविद्येचा आधार द्यावा, अषी उपाययोजना प्रस्तुत ग्रंथात फुले यांनी सुचविली आहे. १०० वर्शापूर्वी फुलेंनी सांगितलेला हा विचार आजच्या अर्थव्यवस्थेलाही लागू पडतो, ही गोश्ट लक्षात घेण्याजोगी आहे.

फुले यांनी **'अखंडादि काव्यरचना'** (१८६९) केली आहे, आणि ही काव्यरचना सार्वजनिक पुस्तकामध्येही अखेरीस घातली आहे. यात निर्मात्याने केलेल्या विश्वरचनेबद्दल जिव्हाळा प्रकट झाला आहे. 'अस्पृष्यांची कैफियत' हा ग्रंथ अप्रकाषित आहे. 'तृतीय रत्न' (१८५५) या नाटकातून देवाच्या नावावर अंधश्रद्धा पसरवून (ब्राह्मण हे १८ वर्णाचे गुरू असून षूद्रांनी त्यांना वंदन करावे यातच त्यांना ईश्वरप्राप्ती आहे ही अंधश्रद्धा) ब्राह्मण भिक्षूक माळच्या कुणब्याच्या घरातून संपत्ती कषी लुटीत असत यावर 'तृतीय रत्न' नाटक आधारीत आहे. एका गरीब कुणबी षेतकऱ्याच्या गरोदर पत्नीकडून तिला होणाऱ्या मुलाला ग्रहदषा आहे असे भविश्य कथन करून, यातून सुटका म्हणून तिच्याकडून निरनिराळ्या वस्तू मिळविणे व ब्राह्मण भोजनाचे पूण्य कुणब्याच्या पदरात टाकणे ही या नाटकाची मध्यवर्ती कल्पना आहे. षेतकरी हा अज्ञानी आहे भिक्षूक कुणबी षेतकऱ्याची कषी फसवणूक करतो हे फुले सांगतात, तसेच अज्ञानी कुणबी समाजाला विद्येचे महत्त्व पटवून दिले आहे. अज्ञान हे सर्व पापाचे मूळ आहे, म्हणून ज्ञानी होण्याकरिता जोतीराव फुले यांच्या रात्रीच्या षाळेत मोफत जाण्याकरिता कुणबी व त्याची स्त्री हातात पाटी-लेखणी घेऊन प्रस्थान करतात असे दाखविले आहे. प्रस्तुत नाटकाचा केवळ मनोरंजन करणे हा उद्देष नाही तर विचार परिवर्तनाचा पाया रचणे हा आहे. 'सत्सार' अंक १ व सत्सार अंक २ या दोन छोट्या पुस्तिकेचे लेखन १८८५ साली प्रकाषित केले. या दोन्ही पुस्तिकेतून जोतिबांचा सर्वधर्मसमभाव जसा प्रकट होतो तसेच वेळप्रसंगी सत्यषोधनार्थ स्वकीयावरही टीकास्त्र चालविण्याचे धैर्यही जोतिबा फुले यांनी केले आहे. पंडिता रमाबाई या विदुशीने २९ सप्टेंबर १८८३ रोजी लंडन येथे हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिस्त्री धर्माची दीक्षा घेतली या घटनेबद्दल त्यावेळच्या समाजसुधारणांची तरफदारी करणाऱ्या 'इंदुप्रकाष', 'ज्ञानप्रकाष', 'ज्ञानचक्षु' व 'पुणेवैभव' या वर्तमानपत्रांनी रमाबाईच्या या कृत्यावर अतिषय कडवी टीका केली. त्याटीकेचे समाचार घेऊन त्यातील फोलपणा दाखवून देणे हा 'सत्सार' अंकाचा तात्पुरता उद्देष असला, तरी जोतिबा फुले यांनी सत्सारच्या प्रथम अंकाच्या उपोद्घातमध्ये सांगितलेला सत्सार निर्मितीचा उद्देष जोतिबा फुले म्हणतात, त्याप्रमाणे इंग्रज बाहदरचे राज्याच्या प्रतापाने अज्ञानी षूद्रादि-अतिषूद्रास तुरळक तुरळक लिहिता वाचता येऊ लागले आहे. म्हणून आज हजारो वर्शापासून धूर्त आर्याकडून षूद्रादि-अतिषूद्र सगळीकडून ताडले जातात, याविशयी सत्सार या नावाचे छोटेखानी पुस्तकात नित्य वाटाघाट करून जगद्वेश्टे आर्य ब्राह्मणांची खात्री करावी, म्हणून हा सत्सारचा पहिला अंक वाचकापुढे आणला आहे.

सत्सार अंक २ मध्ये पंडिता रमाबाई व ताराबाई षिंदे वगैरे स्त्रियांवर कडक टीका करणाऱ्या ब्राह्मण व दीनबंधुकर्ते नारायण मेघाजी लोखंडे व कृश्णाजी पांडरंग भालेकर या सहकाऱ्यांचा समाचार घेतला आहे. 'इषारा' या छोट्याषा पुस्तकात महात्मा फुलेंनी षूद्र-अतिषूद्र षेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे दर्षन घडविण्याकरिता व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या 'पूर्वीच्या तीस वर्शापेक्षा हल्ली षूद्र षेतकऱ्यांची स्थिती बरी आहे' या विधानाच्या खंडनाकरिता १ ऑक्टोंबर १८८५ साली प्रकाषित केली. गोड बोलून ब्राह्मण सावकार षूद्र षेतकऱ्यांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन, त्यांना कर्ज देऊन व त्या मोबदल्यात त्याचे पर्यवसान म्हणून त्यांच्या षेतीवर जप्ती कषी आणतात याचेही स्पश्ट चित्र 'इषारा' पुस्तकात आहे.

**'गुलामगिरी'** ग्रंथातून महात्मा फुले यांनी जाती प्रथेविरूद्ध बंड पुकारले आहे. चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील ब्राह्मणांचे वर्चस्व म्हणजे इतर वर्णियांची गुलामगिरी होय, याची स्पश्ट जाणीव फुलेनी करून दिली आहे. या गुलामगिरीचे स्वरूप बहुधांगी होते. षैक्षणिक गुलामगिरी, आर्थिक गुलामगिरी व धार्मिक गुलामगिरी असे या

गुलामगिरीचे स्वरूप होते. ब्राह्मण हे स्वतःला 'आर्य', 'भूदेव' या नावाने संबोधतात. ब्राह्मण हे भारत देषाचे मूळ रहिवासी नव्हेत. ब्राह्मणांनी आपल्या तथाकथित धर्मग्रंथातून देव, दैत्य किंवा राक्षस यांच्या अनेक कपोलकल्पित कथा रसभरित वर्णन करून लिहिल्या आहेत. गंगा नदीच्या खोऱ्यात प्रथम स्थायिक होऊन संपूर्ण भारतभर हळूहळू आपली सत्ता प्रस्थापित केली. स्वतःच्या हिताचे कायदे व तीनही वर्णाची पद्धतषीर पिळवणूक केली. परषुरामने तर प्रचंड प्रमाणात नरसंहार केला. परषुरामने तर प्रचंड प्रमाणात नरसंहार केला. ब्राहमणांनी तीन वर्णावर केलेला अन्याय जोतिबांनी, 'गुलामगिरी' या वर्णन केलेला आहे. 'गुलामगिरी' या ग्रंथाचा उद्देषच ब्राहमणांनी षूद्र अतिषूद्रावर केलेला अन्याय सांगणे हा तर आहेच पण त्याचबरोबर ब्रिटिष अधिकारी सुद्धा ब्राहमणांच्याच मताची "री" ओढून सर्वसामान्य जनतेच्या हिताकडे कसे दुर्लक्ष करीत आहेत हे दाखवून देणे हा सुद्धा आहे.

**सारांष** : महात्मा फुले यांनी साहित्यातून बहुजन वर्ग, अज्ञानी, कुणबी समाज यांना विद्या घेण्याचा संदेष दिला आहे. महात्मा फुल्यांच्या साहित्यात 'स्त्री-पुरूश समानता', ज्ञानार्जन तसेच अंधश्रद्धा निर्मूलन हे घटक प्रामुख्याने आलेले दिसतात. तसेच त्यांच्या साहित्यातून परिवर्तनवादी भूमिका, क्रांतीदर्षी भूमिकाही स्पश्ट झालेली दिसून येते. त्यांच्या एकूणच साहित्याचा उद्देष मनोरंजन करणे हा नाही तर विचार परिवर्तनाचा पाया रचने हाच असलेला दिसून येतो. तसेच त्यांनी आपल्या साहित्यात क्रांतीकारी विचाराचे बीज पेरले आहेत. सर्वधर्मसमभाव समता, स्वातंत्र्य, बंधूभाव फुलेंच्या साहित्यात आलेला दिसून येतो. षेतकऱ्याने ब्राहमणांच्या नादी लागून पूजाअर्चा करू नये, नवससायास करू नये व कर्जबाजारी होऊ नये अषी षिकवण देऊन ज्ञान घ्या यासाठी रात्रीची षाळा सुरू केली आहे. स्त्री-पुरूश समानताही त्यांच्या साहित्यातून आली आहे. मुलींसाठी त्यांनी प्रथम षाळा काढली. जोतीरावांच्या ग्रंथ संपदेत सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, षैक्षणिक आणि ह्या समाजाच्या प्रमुख अंगांचा विचार आहे. त्यांनी आपल्या ग्रंथात परिवर्तनाची दिषा दाखविली आहे.

**निश्कर्श** :

1. महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान लाखमोलाचे आहे. मरगळलेल्या बहुजन समाजाला षिक्षणाची दारे प्रथम त्यांनी खुली करून दिली तसेच मराठी ग्रंथातून अन्याय-अत्याचाराला विरोध करून सर्वधर्मसमभाव, समता, स्वातंत्र्य व बंधूतेचा स्वीकार केला आहे. अनेक मराठी पुस्तिका, पत्रक, पोवाडे, नाटक, कविता, ग्रंथ लिहून, बहुजन समाजामध्ये जनजागृती करून षिक्षण देण्याचा संदेष महात्मा फुलेंनी केले आहे, हे फुलेंचे योगदान आकाषाएवढे आहे.
2. महात्मा फुलेंच्या मराठी साहित्याची ओळख रसिक वाचकांना होते. महात्मा फुलेंचे साहित्य वाचल्यामुळे व्यक्ती स्वतःवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करू षकतो, व एक प्रकारची बंडखोर वृत्ती व्यक्तीमध्ये निर्माण होऊन अन्यायाविरूद्ध आवाज उठवितो.
3. महात्मा फुलेंचे एकूणच, साहित्य क्रांतीदर्षी, परिवर्तनवादी आहे. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, सर्वप्रथम त्यांनी षिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली, मुला-मुलांसाठी षाळा काढल्या, रात्रीच्या षाळा काढून बहुजन वर्गातील मुला-मुलींना व व्यक्तींना षिक्षणाचा परीसस्पर्ष केला आणि सर्व बहुजन वर्गातील व्यक्तीचे आज सोने झालेले आपल्याला दिसून येते. आज बहुजन समाजातील व्यक्ती मोठमोठ्या पदावर रूढ आहेत. महिला भगिनीही प्रत्येक क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत. हा खऱ्या अर्थाने महात्मा फुलेंनी मराठी साहित्यातून परिवर्तनवादाचे चांगले बीज पेरले आहे. समाज परिवर्तनाकडे, विकासाकडे वाटचाल करीत आहे.

**संदर्भ ग्रंथ** :


1. महात्मा फुले समग्र वाङ्मय - महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सुधारित सहावी आवृत्ती - नोव्हेंबर २००६.
2. प्रा.ना.ग.पवार/अविनाष वरोकर - भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले, पदम्गंधा प्रकाषन एरंडवणा, पुणे, प्रथमावृत्ती - १ जानेवारी २०००.
3. डॉ. षाम कदम - महात्मा फुले आणि महाराश्ट्रातील राजकारण, चिन्मय प्रकाषन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : ५ फेब्रुवारी २००८.
4. प्रा.मा.म. देषमुख - महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन, षिवभारती प्रकाषन, नागपूर, पहिली आवृत्ती : मे १९९७.
5. https://maharashtratimes.com>article
6. http://vishwakesh.marathi.gov.in>...

# महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. डॉ. जडल मधुकर मार्कंडेय**
असो.प्रोफे. आणि शिक्षण शास्त्र विभाग प्रमुख
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)

**प्रस्तावना:-**
महाराष्ट्रात सामाजिक क्रांती घडवून आणणारे , दलितांचे उद्धारक व शिक्षणाचे शिल्पकार महात्मा जोतीबा फुले हे पुरोगामी विचाराचे होते. समाजिक न्याय, सामाजिक समता व बंधुत्व यासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणले. समाजातील जुन्या चालीरीती, रूढी, परंपरा यांच्या मगरमिठीतून स्त्रिची मुक्तता केली. स्त्रीला सामाजिक जीवनात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी स्वतःच्या पत्नीला उंबरठ्याच्या बाहेर काढून स्त्री शिक्षणाची दीक्षा दिली. अशा थोर समाज सुधारकाच्या शैक्षणिक विचारांचा परामर्श घेतांना खालील मुद्ध्यांचा विचार करावा लागतो.

**शिक्षण हे समाज सुधारणेचे साधन :-** समाजातील सामाजिक समता आणि बंधुत्वप्रस्थापित करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. शिक्षणामुळे समाजातील जुनी परंपरा, रूढी, प्रथा नष्ट होतात. समाजात सुधारणा करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. म्हणून जोतिबांनी शिक्षण म्हणजे सामाजिक क्रांतीचे एक महत्वाचे साधन मानले. शिक्षणातून नव समाज निर्मिती करता येते असा त्यांचा विश्वास होता. समाजातील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शिक्षणाने समाजातील खालचे वर्ग शहाणे झाले पाहिजेत. शेतकरी, कामगार, दलित व मागासलेले सर्व लोक जोपर्यंत शाळा शिकून शहाणे होत नाहीत तोपर्यंत या लोकांना गुलामासारखे वागविले जाईल. समाज सुधारणा म्हणजे तरी काय?समाजातील खालच्या वर्गातील लोक शहाणे करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे , त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे व त्यांचे जीवन सुखी करणे असा अर्थ समाज सुधारणा या प्रक्रियेचा जोतिबांनी लावला होता. म्हणून जोतिबांना सामाजिक क्रांती करावयाची होती. या दृष्टीने शिक्षण म्हणजे सामाजिक सुधारणेचे सामाजिक साधन असे जोतिबांना वाटे.

**स्त्री शिक्षणासंबंधीचे विचार:-** समाज क्रांतीसाठी स्त्री शिक्षणाची फार आवश्यकता आहे असे जोतिबांना वाटे. खऱ्या अर्थाने जोतिबांचे हे तत्व योग्यच होते. त्यावेळी स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान दिले जात असे. स्त्री शिक्षणासंबंधी कोणीही काहीही करीत नव्हते. उलट स्त्री शिक्षणाची उपेक्षा केली जात होती. सनातनी व धर्म मार्तंडांचा स्त्री शिक्षणाला विरोध होता. स्त्रीने शिकणे म्हणजे एखादे महाभयंकर पाप करणे , असा गैरसमज त्या वेळी प्रचलित होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत जोतीबांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्री शिक्षणासंबंधी जोतिबांचे विचार फार मोठे व दूरदृष्टीचे होते. स्त्रीचे कुटुंबात असणारे महत्वाचे स्थान ओळखून जोतिबांनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरु केली. मुलांवर संस्कार करणाऱ्या , त्यांना योग्य वळण लावणाऱ्या माता सुशिक्षित पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. स्त्रियांना स्वातंत्र्य आहे. त्यासुद्धा मानव आहेत मग त्यांना शिक्षण का नको ? असा प्रश्न त्यांनी विचारला . स्त्री शिक्षणासंबंधी जोतिबांचे विचार पुरोगामी होते.

**अस्पृश्यांच्या शिक्षणासंबंधीचे विचार:-** शिक्षणातून नवसमाज निर्मिती करावयाचीअसेल तर , सामाजिक क्रांती करावयाची असेल तर, त्यासाठी शिक्षण महारवाड्यात जाऊन पोहोचले पाहिजे. शिक्षणाचे दरवाजे दलितांना खुले झाले पाहिजेत. त्याशिवाय त्यांच्यात जागृती होणार नाही असे जोतिबांचे विचार होते. या देशातील अस्पृश्य जोपर्यंत शिक्षण घेउन शहाणा होत नाही तो पर्यंत या देशातील अस्पृश्यांचा कलंक धुऊन जाणार नाही, तोपर्यंत त्यांच्यावरचा अन्याय , गुलामगिरी नष्ट होणार नाही. शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला म्हणजे हरिजन शहाणे होऊन त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव होईल व मग सामाजिक गुलामगिरीचे जे जोखड आहे ते झुगारून देतील. समाजातील वरिष्ठ वर्गाची

मक्तेदारी तेंव्हा नष्ट होईल. त्यावेळी समाजातील जातीभेद नष्ट होईल आणि सामाजिक समता प्रस्थापित होईल. जोतिबांचे हरिजन शिक्षणासंबंधीचे विचार फार उदारमतवादी होते. हरिजनांना सर्वत्र अन्यायाची, गुलामगिरीची वागणूक मिळत असतांना एकटा जोतीबा हरिजन लोकांना , त्यांच्या मुलांना शिक्षण द्या असे म्हणतो व हरीजाजांसाठी शाळा काढतो म्हणजे या कर्मयोगी , ज्ञानयोगी भगीरथाचे धाडस व शैक्षणिक विचार किती उदात्त व मानवतावादी होते ते यावरून दिसून येते . जोतिबांना मेकॉले पुरस्कृत डाऊनवर्ड फिल्टरेशन थेरी मान्य नव्हती. शिक्षण वरच्या वर्गातून झिरपत झिरपत खालच्या वर्गापर्यंत येईल. समाजातील वरचे वर्ग शहाणे झाले, शिकले म्हणजे आपोआप खालचे लोक शिक्षण घेतील. हा विचार त्यांना मान्य नव्हता. वरचे वर्ग शिकून शहाणे झाले तर खालच्या वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष देणार नाहीत . उलट त्यांना गुलाम बनवतील. त्यामुळे सामाजिक विषमता वाढतच जाईल, असे जोतिबांना वाटले म्हणूनच जोतिबांनी खालच्या वर्गातील शिक्षणाकडे लक्ष वळविले.

**लोक शिक्षणाचा विचार:-** समाजातील शेतकरी , कामगार, बलुतेदार यांना शिक्षण मिळावे. त्यांच्या मुलांसाठी

शाळा काढाव्यात, असे जोतीरावांनी आग्रहाने सांगितले. या लोकांना जीवन चरितार्थ चालविण्यास योग्य असे प्रशिक्षण मिळावे असा आग्रह जोतिबांनी सरकारपुढे धरला. या मुलांना धंदेशिक्षण द्यावे म्हणजे ती आपोआपच धंद्याकडे वळतील. कुमार्गाला लागणार नाहीत व परिणामी सामाजिक स्थैर्य धोक्यात येणार नाही. समाजातील अशी मुले गुन्हे करणार नाहीत व त्यामुळे शेवटी धंदे शिक्षणातून राष्ट्रीय उत्पादन वाढण्यास मदत होईल. शेतकरी, कामगार लोकांचे जीवन सुधारेल. समाजात त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होईल म्हणून लोकशिक्षणाचा पुरस्कार जोतिबांनी केला. वरील बाबींचा विचार करता जोतीबा हेच लोकशिक्षणाचे खरे कैवारी होत. त्यांचे शैक्षणिक विचार गरिबांची दुःखे नाहीशी करण्यास, गरिबांना न्याय मिळवून देण्यास मदत करणारे होते. प्राचीन काळापासून चालत आलेल्या पारंपारिक शिक्षणाच्या कल्पनेला जोतिबांनी स्वतःच्या शैक्षणिक विचारांनी जबरदस्त धक्का दिला. शिक्षण फक्त कर्मकांडासाठी, जपतप करण्यासाठी नसून शिक्षण उद्योग धंदे शिकून जीवन चरितार्थ चालविण्याससुद्धा उपयोगी आहे . हा नवा दृष्टीकोन जोतीरावांनी समाजाला दिला.

**शिक्षण सक्तीचे असावे:-** जोतिबांच्या शैक्षणिक विचारांपैकी सर्वात महत्वाचा वसर्वांना

उपयुक्त असा दृष्टीकोन म्हणजे सक्तीचे शिक्षण असावे हा होय.ब्रिटीश सरकार जनतेकडूनकराच्या **,** फंडाच्या रुपातजमीन महसुलाच्या स्वरूपात पैसे घेत. म्हणून देशातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी असे सरकारला ठणकावून सांगणारापहिला कार्यकर्ता म्हणजे महात्मा जोतीबा फुले होय.

भारतातील पुरातन काळापासून चालत आलेल्या रूढी व समाजातील मतलबी, स्वार्थी लोकांनी शिक्षणासंबंधीच्या केलेल्या कल्पना फार विचित्र होत्या. शेतकऱ्यांना असे वाटे की , शिक्षण फक्त ब्राह्मणांनीच घ्यावे. आपण फक्त शेती करावी. त्यामुळे शेतकरी आपल्या मुलांची शिक्षणाची काळजी घेण्यास उत्सुक नसे, त्याला शाळेत पाठवीत नसे. कारण या शेतकऱ्यावर मतलबी लोकांनी तसे संस्कार केले होते. त्यासाठी शिक्षण सक्तीचे करावे. जो शेतकरी आपल्या मुलास शाळेत पाठविणार नाही , त्याला शिक्षा करा, म्हणजे समाजातील खालच्या वर्गातील लोक आपली मुले शाळेत पाठवतील. त्यामुळे शिक्षणप्रसार होईल.

जोतिबांच्या या विचारांना नंतर इतके महत्व आले की, बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड , शिक्षण मंत्री नामदार गोखले यांनी सक्तीच्या शिक्षणासाठी आग्रह पार्लमेंटमध्ये धरला. सरकारशी ते भांडले आणि आपण पाहतो तो सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास झाला. यावरून जोतीरावांचे विचार किती दूरदृष्टीचे होते हे दिसून येते.

**चांगले वाईट समजण्यासाठी विद्या** :-सुप्रसिद्धग्रीक शिक्षण तज्ञप्लेटो याने शिक्षण म्हणजे चागले वाईट

ओळखण्याची क्षमता निर्माण करणे अशी शिक्षणाची व्याख्या केली होती. महात्मा फुले यांनीसुद्धा शिक्षण किंवा विद्या ही मानवाला सुसंस्कृत, शहाणी बनविणारी असावी असे सांगितले. विदयेने मनुष्य चांगलेवाईट यातील फरक ओळखू शकतो. शिक्षणाचा मूळ हेतू तोच आहे. असे जोतिबांचे विचार होते.

**प्राथमिक शाळेतील शिक्षणासंबंधीचे विचार:-** प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असावेत असा त्यांचा

आग्रह होता. मुलांना शिक्षकाने समजावून घ्यावे. हुकुमशाही करून शाळेबद्धल त्यांच्या मनात भीती निर्माण करू नये. त्यासाठी शिक्षक शक्यतो ब्राह्मण वर्गातील असू नयेत. कारण ते खालच्या स्तरातील मुलांना तळमळीने शिकविणार

नाहीत. तसेच असे शिक्षक विद्यार्थ्यांशी मिळून मिसळून वागणार नाहीत. अडचणी समजावून घेणार नाहीत. उलट शिक्षणाबद्धल मुलांच्या मनात भीती निर्माण करतील. समाजातील खालच्या वर्गातील शिक्षक मुलांशी आपुलकीने, जिव्हाळयाने वागतील , त्यांना सांभाळून घेतील. अशा प्रकारे महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार बहुजन समाजाच्या उद्धारास पूरक व सामाजिक समता प्रस्थापित करण्यास उत्तेजन देणारे होते.

**महाराष्ट्रातील हरीजनांसाठी महात्मा फुले यांनी केलेली कामगिरी :-** महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक, दलितांचे उद्धारक व स्त्री शिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक , शैक्षणिक कार्य भारताच्या इतिहासात अजरामर झाले आहे. सामाजिक विरोधाला न जुमानता प्रतिकूल परिस्थितीत समाज सेवेचे व शिक्षण प्रसाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्या वेळच्या सनातनी धर्म मार्तन्डांच्या विरोधला न जुमानता स्त्री शिक्षणाचे नवे पर्व त्यांनी सुरु केले. हिंदू स्त्रीला सार्वजनिक क्षेत्रात महत्वाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे हरीजनांचा उद्धार करण्यासाठी त्यांनी फार कष्ट उपसले . ज्या हरिजन समाजाचा स्पर्श लोक वाईट मानत होते, ज्यांच्या सावल्यादेखील तुच्छ मानल्या जात होत्या. त्या हरिजन समाजाला शिक्षण देणारा पहिला थोर समाजसेवक पुण्यात निर्माण व्हावा ही गोष्ट संपूर्ण देशाच्या दृष्टीने फार महत्वाची आहे. महात्मा फुल्यांच्या अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला खालील मुद्द्यांचा विचार करावा लागेल.

**सामाजिक गुलामगिरीची स्थिती :-**जोतिबांच्या वेळी हरिजन समाजाला अगदी हलक्या प्रतीचे जीवन जगावे लागत होते. वरिष्ठ वर्गाची सेवाचाकरी करूनसुद्धा त्यांना वरिष्ठांकडून अपमानास्पद वागणूक मिळत होती. गावात फिरतांना स्वतःच्या थुंकीसाठी स्वतःचे एखादे मडके गळयात अडकवून फिरणे, स्वतःची सावली वरिष्ठ वर्गावर पडणार नाही , याची स्वतः दक्षता घेणे इत्यादी गोष्टी हरिजनांना कराव्या लागत असत. गावात किंवा शहरात हरीजनांसाठी पाणी पुरवठ्याची वेगळी व्यवस्था होती. अस्पृश्यांचे सर्व सामाजिक हक्क समाजातील वरिष्ठ वर्गाने हिरावून घेतले होते. त्यांच्या मुलांना शिक्षण मिळत नसे. कारण त्यांना सामुदायिक ठिकाणी प्रवेश नव्हता. शाळेत इतर वरिष्ठ समाजातील मुलांच्या बरोबर हरिजन मुले शिक्षण घेउ शकत नव्हती. आर्थिक परिस्थिती अगदीच गरीब असल्यामुळे हरिजन समाज दारिद्र्यात खितपत पडला होता. व्यक्ती स्वातंत्र्याचा लोप, अज्ञान, दारिद्र्य, सामाजिक छळणूक इत्यादी कारणांमुळे हरिजन कुत्र्यामांजरांसारखे जीवन जगात होते. वरिष्ठ वर्ग हरिजनांना अन्याय, जुलूम यापेक्षा काहीच देउ शकत नव्हता.

अज्ञानामुळे दारिद्र्य , दारिद्र्यामुळे गुलामगिरी, गुलामगिरीमुळे सामाजिक छळणूक हे चक्र सतत चालू होते. या चक्रात अस्पृश्य समाज सापडलेला होता. सामाजिक विषमता व वर्णद्वेष यामुळे हरिजनांना मानवतेची वागणूक मिळत नव्हती. पिढ्यानपिढ्या वरिष्ठ वर्गाची सेवाचाकरी करणे , त्यांच्या सुखासाठी आपल्या जीवनाचे मोल देणे व त्यांची अन्यायी वागणूक निमूटपणे सहन करून घेणे या पलीकडे दुसरा मार्गाच हरिजन लोकांना दिसत नव्हता. सामाजिक विषमता व जातीभेद नष्ट करण्यासाठी समाजातील विशेषतः वरिष्ठ वर्गातील कोणी प्रयत्नच करीत नव्हते.त्यामुळे हरिजनाची दुःखे समजावून घेणारा व त्यांना मानवतेची वागणूक देणारा पहिला समाज सुधारक म्हणून महात्मा ज्योतीराव फुल्यांना अग्रस्थान द्यावे लागते.

**सामाजिक गुलामगीरीविरुद्ध झगडण्याची प्रेरणा**:- सामाजिक विषमता ही आर्थिक विषमतेहून भयानक असते. समाजामध्ये वरिष्ठ शूद्र लोकांना प्रतिष्ठेची, मान सन्मानाची वागणूक देत नाहीत. तेंव्हा सामाजिक विषमता शुद्र लोकांना मरणप्राय यातना सहन करण्यास भाग पडते. या सामाजिक विषमतेचा महात्मा फुले यांना विलक्षण तिरस्कार होता. सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा त्यांना एका प्रसंगी मिळाली. ते एका ब्राह्मण मित्राच्या वारातीमध्ये सर्वांबरोबर सहभागी झाले. परन्तु काही ब्राह्मणांनी त्यांचा अपमान केला. या अपमानामुळे महात्मा फुले अधिकच विचारी बनले व सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. वरिष्ठ वर्गाची समाजातील मक्तेदारी नष्ट करायला पाहिजे , असस त्यांनी निर्धार केला. सामाजिक विषमता, जातीभेद, वर्णव्यवस्था , ब्राह्मणाचे वर्चस्व यासाठी झगडायचे महात्मा फुल्यांनी ठरविले. सामाजिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी बहुजन समाज सुशिक्षित झाला पाहिजे. बहुजन समाजासाठी ज्ञानाचे दरवाजे खुले झाल्याशिवाय समाज अज्ञानातून मुक्त होणार नाही. या विचारांनी महात्मा फुले प्रेरित झाले व त्यांनी शिक्षणातून समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक क्रांतीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे हे त्यांनी ओळखले . स्त्रियांना शिकविले पाहिजे, त्याशिवाय वरिष्ठ वर्गाची हुकुमशाही नष्ट

होणार नाही असा त्यांचा दृढविश्वास होता. सामाजिक समता, बंधुत्व या कल्पना शिक्षणातून साकार करता येतील. कोणत्याही समाजाचा केवळ द्वेष करून चालणार नाही . समाजातील धर्म मार्तांडाचा प्रभाव , त्यांच्या जुन्या परंपरा व भ्रामक कल्पना यांना नष्ट करण्यासाठी बहुजन समाज शिक्षणातून सुधारला पाहिजे, अशा प्रकारची प्रेरणा त्यांना मिळाली.

**मिस फेररची समाजकार्याची प्रेरणा:-** जोतिबांना समाज कार्याची प्रेरणा मिस फेरार या ख्रिश्चन मिशनरी बाईने दिली. समाजकार्य करण्याचे व्रत त्यांनी तेंव्हापासून घेतले. अहमदनगर येथे मिस फेरार यांनी चालविलेल्या शाळा जोतीरावांनी पहिल्या. समाजातील दलित, मागासलेल्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य एक ख्रिश्चन मिशनरी बाई तळमळीने करते, त्याप्रमाणे आपणही आपल्या समाजामध्ये काहीतरी केले पाहिजे. असा विचार महात्मा फुले यांनी केला. समाजकार्य म्हणजे सामाजिक विषमता, अज्ञान यासाठी समाज जागृती करणे, शिक्षणाचा प्रसार करणे व बहुजन समजला अन्याय, जुलूम यापासून मुक्त करणे असा विशाल अर्थ महात्मा फुल्यांनी समाजकार्याचा लावला होता. समाजातील अस्पृश्यता समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले . स्वतः महारवाड्यात जाऊन हरिजन मुलांना शिकविले. स्वतःच्या पाण्याचा हौद हरिजन लोकांसाठी खुला केला.

**डाऊनवर्ड फिल्ट्रेशन तत्वाला विरोध:-** भारतातील शिक्षणासंबंधी लॉर्ड मेकॉलेने एक तत्व सुचविले आहे. भारतात शिक्षण प्रसार कसा करावायाविषयी त्यांनी **डाऊनवर्ड फिल्ट्रेशन थेरी** मांडली होती. या तत्वाप्रमाणे समाजातील वरचे वर्ग शिकले की आपोआप खालच्या वर्गातील लोकांकडे शिक्षण झिरपत झिरपत जाते . म्हणून सुरुवातीला समाजातील वरिष्ठ किंवा वरच्या वर्गातील लोक शिकले पाहिजे. मग हळूहळू खालच्या वर्गातील लोक वरच्यांचे अनुकरण करतात व शिक्षणाचा प्रसार होतो,या तत्वामध्ये समाजातील वरच्या वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय फक्त पाहिली जाते. खालच्या वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय सरकार करीत नाही. त्याबाबत उदासीनता दाखविते. भारतात महात्मा फुले यांनी या तत्वाला प्रखर विरोध केला. हे शिक्षणातील तत्व त्यांना मान्य नव्हते.

सामाजिक क्रांतीसाठी शिक्षण खालच्या स्तरांतील लोकांपर्यंत जाउन पोहोचले पाहिजे. . मेकोलेचे शिक्षणविषयक धोरण फक्त वरच्या वर्गातील लोकांना शहाणे करण्यासाठी उपयुक्त होते. या तत्वाप्रमाणे सामाजिक क्रांती घडून शकणार नाही. यावर महात्मा फुले यांचा विश्वास होता. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी समाजातील खालचे वर्ग शिक्षण घेउन शहाणे झाले पाहिजेत. त्यांचे दारिद्र्य, अज्ञान घालविण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. व त्यासाठी हरिजनांना शिक्षण दिले पाहिजे. असा विचार त्यांनी समाजापुढे मांडला व त्या दिशेने पावले उचलली.

**हरिजन शिक्षणाची संकल्पना:-**सामाजिक परिवर्तन करण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. हे जोतिबांनी ओळखले. सामाजिक परिवर्तन होऊन समता, बंधुत्व व स्वातंत्र्य या भक्कम पायावर उभा राहिलेला नवा समाज त्यांना शिक्षणातून अभिप्रेत होता. त्यासाठी हरिजन शिकले पाहिजेत , त्यांच्या ठिकाणी जे अज्ञान आहे , अन्याय सहन करावयाची गुलामगिरी वृत्ती आहे या सर्वांचा शिक्षणाने नाश होईल आणि त्यांना स्वतःच्या हक्काची जाणीव होईल , असा जोतिबांना विश्वास वाटत होता. माणूस म्हणून समाजाने हरिजनांना वागविले पाहिजे, हरीजानांनी शिक्षण घेउन स्वतःच्या पायावर उभे राहावे, जीवन जगण्यासठी उद्योगधंदा करावा, वरिष्ठ लोकांची सेवाचाकरी न करता स्वावलंबी व्हावे. असा नवा दृष्टीकोन महात्मा फुले यांनी ठेवला होता. या दृष्टीकोनातून हरिजन शिक्षणाला प्रारंभ झाला.

**हरिजनांसाठी शाळा:-** महात्मा फुले यांनी हरीनानांसाठी पहिली शाळा इ,स .१८५१ साली काढली. भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा तो क्षण की, ज्यावेळी महात्मा फुल्यांनी हरिजन मुलांना पहिल्यांदाशाळेत शिकविले. अज्ञानात खितपत पडलेल्या दलित लोकांना उजेडात आणण्यासाठी स्वतः शाळाकाढून त्यांचा उद्धार करणारा जोतीराव हा एक ज्ञानयोगी, कर्मयोगी ठरला . पुणे हे जरी विद्येचे माहेरघर होते तरी हरीजनांसाठी पहिली शाळा पुण्यात काढण्याचे श्रेय जोतीराव फुल्यांनाच मिळाले. सध्या आपल्याला कदाचित या गोष्टींचे फरचे महत्व वाटत नाही. पण त्यावेळी प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुले यांनी हे कार्य करून फार मोठा पराक्रम केला. त्यामुळे महात्मा फुले हे शिक्षणाचे शिल्पकार शोभतात . विचार करा, ज्या दलित लोकांची सावली पडली तरी तीनवेळा अंघोळ करणारा त्या वेळचा समाज आणि या समाजातील धर्म मार्तडानी जोतिबांना किती प्रखर विरोध केला असेल त्यांची किती निंदा केली असेल , किती छळ केला असेल पण या सर्वांना न जुमानता हरिजन लोकांच्या मुलांसाठी शाळा काढण्याचे धाडस केले.

हरीजन मुलांच्या या शाळा काढण्यातच महात्मा फुल्यांच्या सामाजिक विचारांचे, समाज कार्याचे , देश प्रेमाचे व त्यागाचे दर्शन होते. धन्य ती महाराष्ट्र भूमी की तिने छत्रपती शिवाजी महाराजांसारखे स्वातंत्र्यप्रेमी , पराक्रमी, व सामाजिक समता निर्माण करून लोक कल्याणकारक राज्य निर्माण कणारे युगपुरुष निर्माण करणारे निर्माण केले. त्याच महाराष्ट्रात जन्माला आलेल्या महात्मा फुल्यांनी सामाजिक समता प्रस्थापित करून शिक्षण महार वाड्यापर्यंत नेण्याचे कार्य केले. पुढच्या काळात महात्मा फुल्यांच्या शिक्षणाचा वारसा राजर्षी छत्रपती शाहू महाराज , विठ्ठल रामजी शिंदे , कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चालविला. आणि देशात महाराष्ट्राचे नांव अजरामर केले,. भारतात शिक्षणाचा नवा इतिहास निर्माण केला म्हणून महात्मा गांधी म्हणतात ," जोतीबा हे खरे महात्मा होते."

**बहुजन समाजाच्या शिक्षणासंबंधीचे विचार:-** थोर समाजसुधारक आणि शिक्षण शिल्पकार महात्मा फुले यांना समाजाच्या उद्धाराची किती तळमळ होती याची कल्पना त्यांच्या शिक्षणासंबंधीचे विचार यातून दिसून येतात..महाराष्ट्र फुले शेतकरी व कामगार यांना उद्धेषून आपल्या "आसूड" या ग्रंथामध्ये म्हणतात

"विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली .
नितीविना शुद्र खचले,
एवढे अनर्थ एका अविद्येने केले."

शेतकऱ्याने आपल्या मुलास शिक्षण दिले नाही , त्या मुलांना शाळेत पाठविले नाही तर ती मुले उनाड होतील , आळशी बनतील. त्यांच्यावर योग्य संस्कार न झाल्याने ती चोऱ्याकरतील. गुन्हे करतील, त्यामुळे सरकार त्यांनाकाळया पाण्याची शिक्षा देईल, मुले दरोडेखोर , चोर, खुनीझाल्यास सरकार त्यांना शिक्षा करून गावोगावी या गुन्हेगार लोकांची धिंड काढील. त्यामुळे गुन्हेगार मुलांच्या नातेवाईकांची किंमत कमी होईल . त्यांना चार माणसात तोंड दाखविता येणार नाही . तसेच ही अडाणी गुन्हेगार मुले गावातील इतर गरीब जनतेला छळतील. गावातील मुलीबालांची अब्रू लुटतील. त्यानुळेहाणामाऱ्या होतील. गाव्च्या गावे बेचिराख होऊन जातील सगळयाला फक्त एकच कारण म्हणजे मुलांना शिकविले नाही. म्हणून सर्व शेतकरी कामगार बंधूंनी आपली मुले शाळेत पाठवून त्यांना शिक्षण द्यावे. अशा प्रकारे जोतिबांनी शेतकऱ्यांना उपदेश केला व बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

**महात्मा फुल्यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन:-** महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे मुल्यान्मापन करतांना आपल्याला महात्माफुल्यांविषयी भारतातील मान्यवर व्यक्तींनी जी मते मंडळी आहेत त्यांच्या विचार करावा लागतो. भारताचेमाजी पंत प्रधान व जगाचे शान्तिदूत पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात "ज्या काळात महात्मा फुले स्त्री शिक्षणासाठी आणि अस्पृश्यता निवारण्यासाठी लढले ते दिवस असे होते की , त्यांना कोणत्याही तऱ्हेची कोठूनही मदत मिळणे अशक्य होते भारताचे माजी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री,पर्देश्मंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यतामंत्री ना. यशवंतराव चव्हाण म्हणतात " ज्ञानेश्वर, शिवाजी, महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक ही महाराष्ट्राची प्रतीके आहेत. महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या जगातील अनेक मान्यवर व्यक्तींनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन केले आहे. जगातील सर्व शिक्षण तज्ञांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. ज्ञानाची गंगा महार वाड्यात आणण्याचे कार्य करणारा हा एक भगीरथ होय. जोतीराव हे लोक शिक्षणाचे खरे शिल्पकार शोभतात. महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पाया जोतिबांनी घातला. त्या पायावर राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी सहीने व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भव्य इमारत बांधली.

**संदर्भ:-**

1. डोईफोडे ज्योती (२०११)- भारतीय समाज संरचणा व परिवर्तन , औरंगाबाद, विद्याबुक्स पब्लिशर्स
2. घोरमोडे के.यु. आणि घोरमोडे कला (२००६)–शैक्षणिक विचारवंतभारतीय आणि पाश्चात्य, नागपूर, विद्या प्रकाशन
3. गाठाळ एस.एस. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास –औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन
4. नरके हरी (संपा) (२०१३)-महात्मा फुले समग्र वांग्मय , मुंबई, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन ,
5. अहिरे प्रतिभा (संपा) (२०१३)–समग्र वांग्मय महात्मा फुले, औरंगाबाद, साद प्रकाशन
6. गुंदेकर श्रीराम (२००४)– महाराष्ट्राचे शिल्पकार महात्मा जोतीबा फुले मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
7. http://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/93093893f92784d926 dated-on-30/01/2019
8. http://www.marathisrushti.com/profiles/jyotiba-phule /dated on-30/01/2019

# महात्मा ज्योतिबा फुले आणि सत्यशोधक समाजाचे कार्य

**प्रा. डॉ. पाथरकर एस. व्ही.**
इतिहास विभाग प्रमुख, शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय, पाली, सुधागड, जिल्हा रायगड
svpatharkar@jnpaliwala.in

**प्रस्तावना**

एकोणीसाव्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाजसुधारकांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी दलित समाज आणि स्त्रियांच्याच उद्धाराचे कार्य केलेले नाही तर त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून त्यामार्फत समाजातील अज्ञान नाहीसे करून समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर प्रतिगामी विचारांच्या समाजाची लढा दिला. त्यानी  समतेसाठी चळवळ सुरू केली. या चळवळीत ते यशस्वी झाले, म्हणूनच समाजक्रांतीचे जनक या नावाने त्यांचा उल्लेख केला जातो. आज मूलभूत हक्क आणि अधिकारासाठी ज्या चळवळी चालू आहेत. त्या चळवळीची पायाभरणी महात्मा फुलेंनी केली आहे.

## महात्मा फुले पूर्वचरित्र

महात्मा ज्योतिराव फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. चिमणाबाई व गोविंदराव फुले हे त्यांचे आई-वडील त्यांचे पूर्वीचे आडनाव गोऱ्हे होते. मात्र घराण्याच्या पारंपारिक फुलांच्या व्यवसाय वरुन पुढे हेच आडनाव रूढ झाले. फुले कुटुंबीय तसे मूळचे कटगुणबे मात्र पुढे व्यवसायामुळे पुण्यात स्थायिक झाले. वयाच्या तेराव्या वर्षी ज्योतिराव यांचा विवाह खंडोजी नेवसे पाटील यांचा ज्येष्ठ कन्या सावित्रीबाई यांच्याशी झाला. सावित्रीबाई त्यावेळी नऊ वर्षांच्या होत्या. ज्योतिराव सावित्रीचे घर पूर्व पुण्यातील गरीब दलित कष्टकऱ्यांच्या वस्तीत असल्याने आजूबाजूच्या सांस्कृतिक वातावरणाचा त्याच्या जडणघडणीत फार मोठा वाटा होता. शिक्षणाचे महती पटत असल्यानेच ज्योतिरावांच्या  वडिलांना सातव्या वर्षीच त्यांना प्राथमिक शाळेत घातले होते. मात्र सनातनच्या तक्रारीवरुन त्यांना ज्योतिरावांचे शिक्षण बंद करावे. ज्योतीरावांची हुशारी ओळखून मुन्सी गफार बेग आणि लीजीट साहेब या गोविंदरावांच्या स्नेह्यांनी त्यांची समजूत काढली व ज्योतिरावांचे शिक्षण पुन्हा सुरू झाले. विद्यार्थी दशेत ज्योतिरावांना थॉमस पेन या डेईस्ट बंडखोर विचारवंताच्या जबरदस्त प्रभावित केले. महात्मा फुले यांची भावी कार्याचे सैद्धांतिक बैठक थॉमस पेन यांच्या विचाराने तयार झाली अन्यायमूलक समाजव्यवस्थेला सुरुंग लावणारा कर्ता सुधारक घडला तो याच विचारातून.

**सत्यशोधक समाजाची स्थापना** - महात्मा फुले यांनी सामाजिक परिवर्तनाचे जे कार्य हाती घेतले ते कोणत्याही व्यक्तीला करणे शक्य नव्हते. या कार्याच्या यशस्वीतेसाठी संघटनात्मक प्रयत्न करणे आवश्यक होते. त्यामुळे महात्मा फुले यांनी सुद्धा समता स्वातंत्र्य बंधुता या कार्यासाठी संघटनात्मक प्रयत्न करण्याचे ठरवले. त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज हा मानवता बुद्धिप्रामाण्य व्यक्तिस्वातंत्र्य यापूर्वी प्रमुख तत्वावर आधारित होता.

**सत्यशोधक समाज** - महात्मा फुले यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्रातील शूद्रातिशूद्र बहुजन समाजाला जागृत करून त्यांना सामाजिक अन्यायाच्या प्रतिकारात सज्ज तयार केले. फुले यांचा विषमता अन्याय व शोषण यावर आधारित समाज व्यवस्थेला विरोध होता. त्या संबंधीची  आपली भूमिका अतिशय स्पष्ट व परखड शब्दात त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म, अस्पृश्यांची कैफियत, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, इत्यादी ग्रंथाद्वारे मांडली आहे. ज्योतिबा फुले यांचे मत असे होते की आपल्या समाजातील वरिष्ठ जातींनी आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, इत्यादी सर्व

क्षेत्रात स्वतःची मक्तेदारी निर्माण करून शूद्रातिशूद्र बहुजन समाजाला गुलाम बनवले आहे. त्यानी असे म्हटले होते की जातीभेदाचे मूळ ब्राह्मणांच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकार आहे. ब्राह्मणांनी खोटे धर्मग्रंथ निर्माण करून कनिष्ठ जातीवर आपली मानसिक गुलामगिरी लादली आणि बहुजन समाजाला अज्ञानात ठेवून स्वतः सर्व सत्तास्थाने बळकावली. धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात तर ब्राह्मणांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. परंतु त्यांच्यावर राजकीय व आर्थिक सत्तास्थाने ही त्यांनी बळकावली अशाप्रकारे वरिष्ठ ब्राह्मण वर्गाने सर्व विषयाच्या अधिकार स्वतःकडे ठेवून कनिष्ठ वर्गाला आपल्या स्वार्थासाठी राबवून घेतले आपल्या गुलामगिरी या ग्रंथात ब्राम्हण लोक तुम्हाला लुटून खात आहेत हे माझ्या शूद्र बांधवांना सांगण्याच्या हेतूने मी या प्रस्तुत ग्रंथ लिहीत आहे, असे ज्योतीबाने म्हटले आहे.

समाजातील शूद्रातिशूद्र कनिष्ठ वर्गानी संघटतीत होऊन आपल्या न्याय हक्कासाठी ब्राह्मणी वर्चस्व विरुद्ध संघर्ष केला पाहिजे असे ज्योतिबांना वाटत होते. याच उद्देशाने महात्मा फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे** - सत्यशोधक समाजाच्या मते ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करून ईश्वराला भेटण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नसल्याचे सांगितले. धर्मकृत्यातील मिथ्याचार व आंधळी रूढीप्रियता यांवर त्यांनी कठोर आघात केला. मनुष्य हा जातीने नाही तर गुणाने श्रेष्ठ ठरतो. तसेच कोणताही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नसल्याचे फुले म्हणतात. सत्यशोधक समाजाचे पुरोहितशाही नाकारून साध्या पद्धतीने हुंड्या शिवाय व कमी खर्चातल्या विवाहाचा कार्यक्रम हाती घेतला. देशाच्या हजारो वर्षातल्या धार्मिक परंपरा नाकारून विधायक विद्रोह करणारे क्रांतिकारी पाऊल या समाजाने उचलले सत्यशोधक विवाह स्त्री शिक्षणाची आणि स्त्रियांना समान हक्क देण्याची प्रतिज्ञा करावयाची असते. ईश्वरावर विश्वास सत्याचा शोध घेणे व नीतीमूल्यांची जोपासना ही या समाजाची प्रमुख तत्वे होती.

**सत्यशोधक समाजाची कामगिरी** - सत्यशोधक समाजाने भरीव स्वरूपाचे कार्य केले तेच क्रांतिकारक ठरले. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरी व सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवून सामाजिक न्यायाची मागणी केली. या समाजाची तत्त्वे उदार होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी महात्मा फुले यांनी घटना बनविली तदनुषंगाने नियमावली तयार केली. मूलत सत्यशोधक समाज एक निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात दिली आहे. महात्मा फुले यांनी दलितांना, स्त्रियांना, कष्टकऱ्यांना त्यांच्या दैन्यावस्थेतून बाहेर पडण्यासाठी लोकशिक्षणाचा उपक्रम प्राधान्याने हाती घेतला. शिक्षण सर्वांना सहज उपलब्ध व्हावे आणि सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न केला. विद्येची महती त्यांनी शेतकऱ्यांच्या आसूड या ग्रंथात चपलख शब्दांत वर्णन केले आहे. ते म्हणतात इतके अनर्थ एका अविद्येने केले.

विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली.
नीतीविना गती गेली.
गतीविना वित्त गेले.
वित्ताविना शूद्र खचले.

अन्यायग्रस्त शूद्रातिशूद्रांच्या शाळांबरोबरच त्यांनी मुलींसाठी ही शाळा काढल्या. त्यासाठी सावित्रीबाईंनी पुढाकार घेऊन शिकवण्याचे काम केले. सत्यशोधक समाजाने लोकशिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांची जमीनदार व सावकार यांच्या मगरमिठीतून सुटका करण्यासाठी अथक प्रयत्न केले. दीनबंधू, दीनमित्र वगैरे वृत्तपत्र मासिकांतून शेतकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी हिरिरीने मांडली. शेतकऱ्यांची आसूड मधून महात्मा फुल्यांनी शासनाच्या नजरेस कृषीवर्गाची दु:स्थिती आणली त्यामुळेच डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट संमत झाला. दीनबंधू वृत्तपत्राने गिरणी कामगारांची स्थिती सुधारण्याचा पहिला प्रयत्न केला. त्याच

बरोबर सत्यशोधक समाजाची सभासदांनी व कार्यकर्त्यांनी विधायक कामांकडे ही लक्ष दिले. सन १८७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला असताना दुष्काळ पीडितांच्या मुलांची सोय करण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या वतीने एक बालकाश्रम उघडण्यात आला. त्याच्या मदतीसाठी सत्यशोधक विनंती करणारे पत्रक फुलेंनी काढले. तसेच बहुजन समाज संघटित होण्यास मदत झाली. बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते सत्यशोधक समाजाचे सभासद झाले. याच कार्यकर्त्यांच्या सहकार्याने विविध शहरात सत्यशोधक समाजाच्या अनेक शाखा सुरू झाल्या. त्याच बरोबर सत्यशोधक समाजाने भरीव स्वरुपाचे कार्य केले व ते पुढीलप्रमाणे.

1. समाजातील जातिभेदाच्या भावना कमी करण्याचा प्रयत्न केला.
2. सत्यशोधक समाजाने ब्राम्हण पुरोहिताशिवाय विवाह लावण्याचा सपाटा सुरू केला.
3. सत्यशोधक समाजाने प्रथमच सामाजिक परिवर्तनासाठी चळवळ सुरू केली.
4. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरी व अन्यायाविरुद्ध सामाजिक परिवर्तनाची मागणी प्रथमच केली.
5. इ.स. १८८८ मध्ये या समाजाने आपल्या झेंड्याखाली पुणे शहरात मोठी मिरवणूक काढली व सामान्य जनतेला एकत्र करण्याचे महत्वाचे कार्य केले.

सत्यशोधक चळवळीकडे एक समाज सुधारणेची चळवळ म्हणून पाहिले जात असले तरी महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या इतर चळवळींहुन सत्यशोधक चळवळ खूपच वेगळी होती. तिने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

**सारांश -** एकोणिसाव्या शतकात स्वतःच्या कर्तुत्वाने स्वयंप्रेरणेने निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणून महात्मा फुलेचे कार्य उल्लेखनीय आहे. पुरोगामी महाराष्ट्रात असणाऱ्या अनेक परंपरेविरुद्ध बंड करणारे ते पहिले क्रांतिकारक होते. समाजातील जुन्या रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली व समाजाच्या पुनर्बांधणीचे कार्य केले. अशा प्रकारे महात्मा फुले हे बहुजन समाजाच्या हितासाठी आयुष्यभर झगडणारे पहिले युगपुरुष खऱ्या अर्थाने महात्मा ठरले.

**संदर्भ सूची :**


1. भिडे, पाटील, थोरात "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास" फडके प्रकाशन कोल्हापूर २००५ पान ७९.
2. कित्ता ८०
3. फडके य. दि. " महात्मा फुले : समग्र, वाडमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई" १९९१ पान १९५
4. जितेंद्र भामरे "आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८ ते १९६० ) शेठ प्रकाशन मुंबई पान ३७
5. कित्ता ३८
6. फडके य. दि. " महात्मा फुले : समग्र, वाडमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई" १९६९ पान १८४
7. डॉ. अनिल कठोर " आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास" विद्या बुक्स प्रकाशन – औरंगाबाद पान ९०
8. कित्ता १०१
9. उमेश बगाडे "महात्मा ज्योतिराव फुले" गंधर्व वेद प्रकाशन पुणे २०१०, पान ७६
10. धनंजय कीर " महात्मा ज्योतीराव फुले" पॉप्युलर प्रकाशन मुंबई पान १६०

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व शैक्षणिक विचार

**डॉ. एस. एस. देवनाळकर**
सहयोगी प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगाजि. लातूर
sdevnalkar44@gmail.com

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात ज्या थोर बहुजन समाजातील व सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणाऱ्या विचारवंतामध्ये महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलेला आहे. राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्रातील एक राजा, परिवर्तनवादी विचारवंत, सामाजिक कार्य करणारा धुरेंदर माणूस म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे एक मानवतावादी व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाच्या प्रत्यक्ष कार्यात प्रारंभ करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा जन्म 26 जुलै, 1874 रोजी कोल्हापूर येथे झाला. राजकुलात जन्मलेल्या शाहू महाराजांनी आपल्या राजसत्तेचा कधीच गर्व केला नाही. समाज परिवर्तनाचे, समाजविकासाचे कार्य अत्यंत तळमळीने करणाऱ्या शाहू महाराजांनी केले.

**शाहू महाराजांचे आर्थिक विचार :**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या आर्थिक विचार मांडतांना शेतीविषयक विचारांना खूप प्राधान्य दिले. ग्रामीण भागाचा खरा विकास करावयाचा असेल तर शेती क्षेत्राचा विकास होणे महत्त्वाचे आहे. देशाचा आर्थिक विकास हा शेती क्षेत्रावर अवलंबून आहे असे त्यांनी प्रांजळ मत मांडले.

**शेतीविषयक विचार :**

शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार कृषितज्ज्ञांच्या तोडीचे होते. त्यांच्या मते, शेतकऱ्यांना अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत असल्यामुळे शेतीची प्रगती करता येत नव्हती, अशावेळी त्यांनी शेतकऱ्यांना संघटित करून व शेतीचा जलद गतीने विकास साध्य करून घेण्यासाठी शेतीही आधुनिक पद्धतीने करावी असे स्पष्ट मत मांडले. शेती विकासात ज्या अनेक अडचणी निर्माण होतात त्यावर प्रभावी उपाययोजना म्हणून खालील पद्धतीचे मत मांडले.

1. शेतीसाठी नवीन लागवडीचे प्रयोग संस्थेमार्फत करून शेतीची प्रती हेक्टरी उत्पादकता वाढवली.
2. अनेक कृषी अवजारे विकसित करून ते भाडे तत्त्वावर शेतकऱ्यांना पुरवली.
3. शाहू महाराजांनी पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिके करून दाखवली त्यामुळे शेतीचा गुणात्मक व संख्यात्मक दर्जा वाढवला.
4. महाराजांनी शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून अनेक तलाव बांधले. विहीतरी खोदल्या, अनेक ठिकाणी बांध घालून जनू जमगच आडवून पाण्याची पातळी उंचावली.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार :**

शाहू महाराजांनी शिष्यवृत्ती, पारितोषक, नवोदय अशा मार्गाने मदत करण्याची भूमिका घेतली. तलाठी निर्माण करण्यासाठी तलाठी शाळा काढल्या, शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची शाहू महाराजांनी सुरु केली. पाटील स्कूल मार्फत गाव कामगार व पोलीस पाटील यांना हिशोबाचे व कायद्याचे शिक्षण उपलब्ध करून दिले.राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचे शैक्षणिक कार्य- राजर्षी शाहू महाराजांनी जे शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले त्या हिताच्या दृष्टीने अलौकिक कार्य केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने

1. विदयार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून दिले.
2. शिष्यवृत्तीची सवलत देण्यावर भर देण्यात आला.
3. विदयार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था करण्यात यावी.
4. विदयार्थ्यांना विविध सोयी सवलती देणे.

राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या शैक्षणिक विचारात खूप मोठे बदल घडवून आणण्याचे कार्य केले आहे. त्यांनी शैक्षणिक चळवळ उभी केली. शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार पुढील प्रमाणे आहेत :

1. **प्राथमिक शिक्षण** : शाहू महाराजाच्या मते प्रत्येक गावात एक शाळा असावी. देवस्थानाच्या निधीतून शाळेचा खर्च करावा. प्राथमिक शिक्षकाचे वय 25 वर्षाच्या आत असावे. त्याची निवड गुणवत्तेर करावी.
2. **तांत्रिक शिक्षण :** तांत्रिक शिक्षण शाहू महाराजांनी फार पूर्वीची ओळखून सुतार काम, लोहार काम, चित्रकला असा प्रात्यक्षिक अभ्यास शिकवला. यातून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याचे शाहू महाराजांचे स्वप्न होते.
3. **स्त्री शिक्षणाचे प्रयत्न :** स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षण घेणाऱ्या मुलीसाठी विविध शिष्यवृत्ती योजना जाहीर केल्या.
4. **कल्याणकारी कार्य :** जनतेच्या हिताचे कार्य कसे करावे याचे आदर्श उदाहरण शाहू महाराजांनी दिले. आरोग्यासाठी दवाखाने, मोफत औषधोपचार, मोफत वस्तीगृहे, दर्जेदार शिक्षक, प्रशिक्षण, गुणवंत विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप, व्यापार व उद्योगासाठी पायाभूत सुविधा, शेती सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना अशा अनेक कल्याणकारी योजना राबवल्या.
5. ज्ञान हे सामाजिक शक्तीचे, समृद्धीचे व सत्तेचे उगमस्थान आहे. राज्यकर्ता हा संयोजनशील, गतीमान व बहुजनहीत प्रणव असला तरच तो आपला राज्यकारभार समाजातील सर्व थरातील लोकांच्या साह्याने यशस्वीरित्या चालवू शकतो हे सत्य जाणणारे स्वत: शाहू महाराज होतो.
6. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षण देऊन त्यांच्यात सुधारणा केल्याविना घडणार नाही असे शाहू महाराजांना वाटत होते याकरिता त्यांनी दुर्बल व निरक्षर मागासवर्गीय व दीन, दलित या बहुजनामध्ये शिक्षणाचा प्रसार केला.
7. खेड्यापाड्यातील मागास व दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणारी पहिली संस्था म्हणजेच सत्यशोधक समाज होय.
8. फुले व शाहू छत्रपती यांनी मागासवर्गीय व दलितातील दलित यामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यास प्रारंभ केला.
9. मागासवर्गीय यांनी आपल्या अधिकाराविषयी जागृत व्हावे तसेच मागासवर्गीयांच्या मार्गातील अडचणी दूर व्हाव्यात यासाठी त्या वर्गामध्ये शिक्षण प्रसार केला.

**संदर्भ :**


1. आर्थिक विचारांचा इतिहास – डॉ. यु. बी. कोठेवार, सौ. स्मिता कोंडेवार
2. आर्थिक विचारांचा इतिहास – गोखले आर. एम.
3. राजर्षी शाहू छत्रपती – धनंजय कीर
4. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ. एस. एस. गाठाळ
5. शाहू छत्रपतीचे अर्थकारण – कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब.श.
6. https://mr.vikaspedia.in/

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक योगदान

**प्रा. पांढरे विलास देवराव**
एम. ए. एम. एड. सेट ( शिक्षणशास्त्र) सेट संस्कृत शिक्षण प्रसारक संस्थेचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय संगमनेर.

**सारांश**

समाज परिवर्तन आणि मानवी विकास यासाठी शिक्षण हे एक अत्यंत प्रभावी साधन आहे हे ओळखून महात्मा फुलेंनी शिक्षणविषयक विचारातून सर्वप्रथम हंटर कमिशन पुढे मांडलेली बाजू ही अतिशय प्रभावी ठरली. त्यामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण असावे, खेड्यापाड्यापर्यंत शिक्षणाची सोय करावी, सर्वसमावेशक असे शिक्षण असावे, त्यामध्ये कोणताही भेदभाव होता कामा नये, असे प्रखडपणे मत व्यक्त केले. तसेच महात्मा फुलेंनी स्त्रीशिक्षणाचा पाठपुरावा करत ग्रामीण भागातील मुला-मुलींना पर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे असे त्यांना वाटत होते व त्यानुसार त्यांनी कृतीवादी दृष्टीकोनातून कार्य करून स्त्री शिक्षणासाठी शाळा काढल्या.

प्राथमिक शिक्षणासंबंधी त्यांनी काही महत्त्वपूर्ण ठोस असे मुद्दे सांगितले प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे, असावे प्रत्येक खेड्यापाड्यात शिक्षणाची सोय करावी, तसेच प्राथमिक शिक्षण हे वयाच्या 12 व्या वर्षापर्यंत सक्तीचे करावे व ते करणे अत्यंत गरजेचे आहे, त्यासाठी शिक्षणाची आवड प्रथम व्यक्तीमध्ये निर्माण करावी. असे ते म्हणत माध्यमिक शिक्षणाबद्दल ते म्हणत माध्यमिक शिक्षण हे कारकून निर्माण करणारे नसावे तर ते सतत काळानुरूप बदल करून त्यामध्ये व्यवसायाच्या संधी निर्माण झाल्या पाहिजे. उच्च शिक्षणाबद्दल त्यांचे मत असे होते की, उच्च शिक्षणात केवळ श्रेष्ठ दर्जाचे ज्ञान, गुणवत्ता, कौशल्य याचा विचार न करता प्रत्येकाला समान संधी उपलब्ध करून द्यावी. समान संधी उपलब्ध करून देतांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आर्थिक हिताचा विचार होणे गरजेचे आहे. व त्यासाठी शिक्षणाची खास सोय असावी. शैक्षणिक ध्येये मध्ये शिक्षणातून व्यक्तीच्या वास्तविक जिवनाची तयारी होणे आवश्यक आहे, शिक्षणाने जीवन सुखी, सफल, व समृद्ध बनले पाहिजे. सामाजिक जबाबदारीची जाणीव करून शिक्षणाचे ध्येये स्वयंविकास साधणारी असावी. शिक्षण संकल्पने मधे ते म्हणत समाज सुधारणेची संजीवनी म्हणजे शिक्षण होय. शिक्षणातून अन्यायाची चीड निर्माण होऊन प्रतिकार करण्याची शक्ती विकसित व्हावी कारण शिक्षण ज्ञान, प्रकाश होय आणि अज्ञान म्हणजे अंधार तर तो अंधार शिक्षणातून नष्ट होऊन प्रत्येक व्यक्तीचे जीवन हे प्रकाशमय झाले पाहिजे. शाळेतील शिक्षक हे प्रशिक्षित असून, त्यांनी विद्यार्थ्यांबरोबर सहानुभूतीने, प्रेमाने वागावे व त्यानुसारच शिकवावे. विद्यार्थ्यांबरोबर कोणताही भेदभाव करू नये. अभ्यासक्रम हा शेती व आरोग्य यावर आधारित असावा. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या कुवतीनुसार व थोड्याफार प्रमाणात कमी असावा, व त्यानुरूप शिक्षणात बदलत्या परिस्थितीनुसार बदल करून अभ्यासक्रम अनुरूप अशी अध्ययन अध्यापन पद्धती वापरावी अशाप्रकारे महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक ध्येय, शिक्षण संकल्पना, अभ्यासक्रम, अध्ययन अध्यापन पद्धती, शाळेतील शिक्षक, प्राथमिक, माध्यमिक, व उच्च शिक्षणाबद्दल त्योगदान आहे.

**प्रस्तावना**

महात्मा फुले हे 19 व्या शतकातील महान समाज सुधारक व शैक्षणिक विचारवंत म्हणून होऊन गेले. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग असे संबोधले जाते. ते एक महान व्यासंगी प्रतिवादी समाजसुधारक होते. जगातील सामान्या पर्यंत, शुद्रा पर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे असे त्यांना वाटत होते. स्त्री शिक्षणासाठी चा पाया घालून त्यांनी स्त्रियांसाठी अनेक शाळा काढल्या. समाजातील श्रमजीवी वर्गाच्या सामाजिक व आर्थिक उत्थापनासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची मीमांसा करून त्यांच्या प्रगतीकरिता एक विधायक व क्रांतिकारक कार्य त्यांनी हाती घेतले. या कार्याने संपूर्ण जगतात ते सुपरिचित झाले . त्यांचे सुपरिचीत वचन देखील सर्वप्रसिद्ध झाले

विद्येविना मती गेली ,
मतीविना नीती गेली ,
नीतीविना गती गेली ,
गतीविना वित्त गेले ,
वित्ताविना शूद्र खचले ,
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

समाजामध्ये असणाऱ्या अज्ञानामुळे व अविद्येमुळे फार मोठा अनर्थ झाला याचा परिचय समाजाला करून देऊन विद्येचे महत्त्व प्रस्तुत केले. महात्मा फुले हे भारतीय समाजक्रांतीचे जनक होते. सामाजिक क्रांतीचे तत्त्वज्ञान हे शिक्षणाच्या तत्वज्ञाना पेक्षा काही भिन्न नाही असे ते म्हणत. त्यांच्या प्रसिद्ध वचनातून दीनदलितांच्या दैन्यावस्थेची ची कारणमीमांसा त्यांनी स्पष्ट केली. या परीस्स्थितीतून जनतेला बाहेर काढण्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण याचा विचार करुन सर्वसामान्यांचा व दीनदलितांच्या शिक्षणाच्या प्रसाराचे काम त्यांनी हाती घेतले. हंटर कमिशन पुढे त्यांनी शिक्षण विषयक विस्तार पूर्ण अशी बाजू मांडली. शिक्षण विषयक विचारामध्ये त्यांनी सर्वांसाठी शिक्षण या विषया बरोबरच प्राथमिक , शिक्षण , माध्यमिक शिक्षण , व उच्च शिक्षण कसे असावे , त्यासाठी कशा प्रकारचा अभ्यासक्रम हवा , त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी शिस्त कशी लावावी , व स्वातंत्र्य किती प्रमाणात असावे याचे विस्तृत विवेचन त्यांनी त्यांच्या शैक्षणिक विचारातून स्पष्ट केले . आणि शिक्षणाचे ध्येय कोणती असली पाहिजेत , अध्ययन अध्यापन पद्धती कोणत्या वापराव्यात, त्यात काळानुरूप कसा बदल करावा, व शिक्षकाचे आदर्शवत वर्तन कसे असावे , याचे विवेचन त्यांनी केलेले आढळते तर वरील सर्व मुद्दे हे त्यांच्या शिक्षणविषयक विचारातून भारताला मिळालेले फार मोठे शैक्षणिक योगदान आहे.

**शिक्षण संकल्पना**

महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातून शिक्षण म्हणजे समाजसुधारणेची संजीवनी म्हणजे शिक्षण होय. अन्यायाची चीड व प्रतिकार शक्तीचा विकास या कृतीतून होतो त्यास शिक्षण असे म्हणतात. शिक्षण ही विकासाची प्रक्रिया आहे .अज्ञान म्हणजे अंधार ज्ञान म्हणजे प्रकाश व शिक्षण होय. शिक्षण हे समता, स्वातंत्र्य बंधुत्व, न्याय , राष्ट्रप्रेम, अभिमान , विश्वबंधुत्व , व मानवता निर्माण करण्याचे साधन आहे. शिक्षण ही एक सामाजिक संस्था असून त्यातून मानव गतिमान

परिवर्तित होऊन व्यक्तीची निर्मिती होते.शिक्षण ही स्वयं विकासात्मक प्रक्रिया असून त्यातून हक्क कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

**हंटर कमिशनपुढे मांडलेली शिक्षणविषयक बाजू**

भारतात सुधारणा करण्यासाठी हंटर यांच्या अध्यक्षतेखाली 1882 साली शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली होती. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे शिक्षणाचे विचार व तळागाळा बद्दल जाणीव, आत्मीयता यावर स्पष्ट विचार मांडून समाजाचा विकास साधला पाहिजे असे प्रखड मत व्यक्त केले.

निर्मिकाने वा ईश्वराने सर्व मानव निर्माण केलेले आहे. त्यांना सर्वांना सारखा अधिकार आहे. कोणीही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, असे स्पष्ट म्हटले. शिक्षण देताना धर्म, वंश, जात, लिंग हा भेद न करता सर्वांसाठी समान शिक्षण असे म्हणत प्रखडपणे त्यांनी आपली बाजू मांडली.

**शैक्षणिक ध्येये**

शिक्षणातून व्यक्तीच्या वास्तविक जिवनाची तयारी करणे अपेक्षित आहे. जीवन सुखी, सफल व समृद्ध बनले पाहिजे. तसेच शिक्षणातून सामाजिक परिवर्तन हे घडलेच पाहिजे. सामाजिक परिवर्तना बरोबरच शिक्षणातून संस्कृती, नैतिक विकास देखील साधावा आणि शिक्षणाने सामाजिक जबाबदारीची जाणीव करून द्यावी, तसेच स्वयंविकास साधत साधत भेदभाव शिक्षणाने नष्ट करणे गरजेचे आहे. मानवतेची भावना जोपासून शिक्षणाने प्रत्येक व्यक्तीमध्ये विश्वबंधुत्वाची भावना विकसित करावी.

**प्राथमिक शिक्षण**

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण असावे. प्रत्येक खेड्यापाड्यात शिक्षणाची सोय करावी. शिक्षणाने खेड्यापर्यंत पोहोचले पाहिजे. असे ते म्हणत तसेच प्राथमिक शिक्षण हे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत सक्तीचे करावे. व ते करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाची आवड प्रथम व्यक्तीमध्ये निर्माण करायला हवी. आर्थिक दुर्बल घटकांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण त्यामधून विद्यार्थ्यांना उत्तेजन व प्रेरणा मिळेल. माध्यमिक शाळा ह्या एकमेकांना जोडलेल्या असाव्यात. जेणेकरून त्यामध्ये उत्तम प्रकारे समन्वय साधला जाईल. व प्राथमिक शिक्षण हे सोयीस्कर व सुलभ होईल. अशाप्रकारे महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षणासंबंधी विचार मांडलेले आहेत.

**माध्यमिक शिक्षण**

माध्यमिक शिक्षण हे कारकून निर्माण करणे यासारखे नसावे, तर सतत काळानुरूप अभ्यासक्रमाची पुनर्रचना होणे अपेक्षित आहे. तसेच माध्यमिक शिक्षणामध्ये व्यावसायिक कौशल्यावर भर देऊन त्यांचा समावेश करणे गरजेचे आहे. देशी शाळा या जुळया गावगाड्याच्या पद्धतीने न चालवता त्यामध्ये तोंडी, लेखन, वाचन तसेच धार्मिक उत्तराचे नैतिक शिक्षण द्यावे. शाळेतील सर्व शिक्षक प्रशिक्षित असणे महत्त्वाचे आहे. त्यांना अनुदान द्यावे अनुदानाची रक्कम ही शाळांना जास्त असावी. असे मत महात्मा फुले माध्यमिक शिक्षणाबद्दल मांडलेले आहे.

**उच्च शिक्षण**

उच्च शिक्षणात श्रेष्ठ दर्जाचे ज्ञान, गुणवत्ता, कौशल्य याचा विचार जास्त न करता प्रत्येक व्यक्तीस समान संधी उपलब्ध करून द्यावी. समान संधी उपलब्ध करून देताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा. गोरगरीब, ग्रामीण जनतेसाठी शिक्षणाची खास सोय असावी. खाजगी अभ्यास करून पदवी परीक्षा देण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी. त्याचबरोबर व्यवसाय करून देखील शिक्षणाची सोय उच्च शिक्षणामध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

**शाळेतील शिक्षक**

प्राथमिक माध्यमिक शाळेतील शिक्षक हे प्रशिक्षित असावेत. शिक्षकाने विद्यार्थ्यांबरोबर सहानुभूतीने व प्रेमाने शिकवावे आणि वागावे देखील. शिक्षकांचे वेतन हे चांगले असणे अपेक्षित आहे. जर निकाल चांगला लागत असेल तर त्यानुसार शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिक द्यावे. तसेच शाळेची दर तीन महिन्यातून एकदा तपासणी करावी. जेणेकरून विकासात्मक दृष्टिकोन वाढीस लागेल. तपासणी ही वरवर न करता मुद्देसूद करावी. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता केवळ विकासात्मक दृष्टिकोन ठेवावा. स्थानिक करा मधील निम्मा निधी शाळेला देवा, व त्यातून देखील शाळेचा विकास साधावा. शिक्षकाने स्ववर्तनावर भर द्यावा. कोणत्याही प्रकारचा भेदभाव शाळेमध्ये करता कामा नये. आर्थिक जबाबदारी ही नगरपालिकांनी घ्यावी. शाळेला सरकारी अनुदान द्यावे. वेतन व विकासासाठी देखील ते अनुदान अतिशय महत्त्वाचे ठरेल.

**अभ्यासक्रम**

अभ्यासक्रम हा शेती व आरोग्य यावर आधारलेला असावा. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम त्यांच्या कुवतीनुसार व थोड्याफार प्रमाणात कमी असावा. तसेच पाठ्यपुस्तकात शेती, ग्रामोद्योग, व विविध कला संबंधीचे विविध पाठ असावेत माध्यमिक शिक्षण हे कारकून निर्माण करण्यापुरतेच राहता कामा नये. अभ्यासक्रमाची काळानुरूप पुनर्रचना होणे अत्यंत आवश्यक आहे. व्यवसायिक कौशल्यावर मोठ्या प्रमाणात भर असावा. तोंडी, लेखन, वाचन, श्रवण याबरोबरच धार्मिक उताराचे नैतिक शिक्षणासंबंधीचा देखील अभ्यासक्रमात समावेश करावा. एकंदरीत अभ्यासक्रमात जीवन, व्यवहार, सामाजिकता, नैतिकता उपयोगी असणे अत्यंत गरजेचे आहे.

**अध्ययन अध्यापन पद्धती**

महात्मा फुले यांनी सांगितलेला वरील प्रमाणे अभ्यासक्रम असल्यास त्यासाठी कशा प्रकारच्या अध्ययन अध्यापन पद्धती असल्या पाहिजे हे देखील त्यांनी सूचित केले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे स्वानुभवातून मिळणे अत्यंत आवश्यक आहे. कारण ते अनुभव कृतीमध्ये उतरत असतात व कृतीतून शिक्षण घडले तर ते चिरकाल टिकून त्याचा तत्क्षणी उपयोग होतो. त्याचबरोबर निरीक्षण आणि परीक्षण या पद्धतीवर भर द्यावा. नैतिक मूल्यातून वर्तन परिवर्तन घडावे. व त्यातून सांस्कृतिक विकास साधावा. व्यवसायिक आणि खाजगी शिक्षण याचे प्रत्यक्ष कृतीद्वारे अध्यापन करावे. तसेच वैचारिक

विषय परत्वे, व्यवसायिक कौशल्यात, अध्यापनामध्ये विविधता साधून त्यानुरूप अध्यापन होणे गरजेचे आहे. अध्यापन हे व्यक्तीच्या जीवन उपयोगी व व्यवहारोपयोगी होऊन त्यानुरूप शिक्षकाने अध्यापन पद्धती वापरावी.

**शिस्त व स्वातंत्र्य**

विद्यार्थ्यास स्वयंशिस्त बरोबरच सामाजिक शिस्त देखील लावावी परंतु ती कडक असता कामा नये त्या शिस्तीमधून प्रेम व्यक्त व्हावे, व आदर निर्माण व्हावा. म्हणजे सहानुभूतीवर आधारीत शिस्त निर्माण व्हावी. स्वातंत्र्य आणि शिस्त यांचे योग्य समायोजन करावे वर्तन-परिवर्तनातून शिस्त निर्माण व्हावी. शिक्षकाने स्वतः आदर्शवत वर्तन करावे जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये कृतीतून शिस्त निर्माण होईल त्याच बरोबर नैतिकतेचे चे धडे देखील द्यावे, म्हणजे नैतीक अध्यात्मिकतेच्या मार्गातून देखील चांगली स्वतंत्र व शिस्त यांचा मेळ घालता येईल.

**अस्पृश्यांचे शिक्षण**

अस्पृश्यांच्या अवनतीचे अधोगतीचे मूळ कारण विद्या किंवा शिक्षणाचा अभाव आहे हे जोतिबांचे स्पष्ट मत होते. त्यांचे याबाबतीत प्रसिद्ध वचन देखील आहे. अस्पृश्यांना हलाख्याच्या स्थितीतून अधोगतीतून दीनदलितांना वर काढायचे असेल, त्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल, त्यांची प्रगती घडवून आणायची असेल, तर सर्वात प्रभावी माध्यम कोणते असेल तर ते म्हणजे शिक्षण अशी महात्मा फुले यांची धारणा होती. कारण शिक्षण हे समाज सुधारणेची संजीवनी आहे. व यातूनच अन्यायाची चीड निर्माण होऊन प्रतिकार करण्याची शक्ती विकसित होते. असे त्यांना वाटत होते. ज्योतिबा फुले कालीन समाजात उच्चवर्णीय व नीचवर्णीय, स्पृश्य अस्पृश्य, असे भेदभाव होते. हीन वर्णीयांना अत्यंत वाईट पशुपेक्षाही वाईट वागणूक मिळत असे हे जोतिबांना मान्य नव्हते व त्यांना हे रुचत देखील नव्हते. हे ओळखून त्यांनी अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. आणि त्यांचा विकास शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी हाती घेतले. आणि समाजात माणुसकीचा खरा धर्म सर्वापर्यंत पोहोहचविला.

**समारोप**

अशाप्रकारे महात्मा फुले यांचे शैक्षणिक योगदान यामध्ये हंटर कमिशनपुढे मांडलेली शिक्षणविषयक बाजू अतिशय प्रभावी ठरली. भारतात सुधारणा करण्यासाठी हंटर यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली होती. त्यामध्ये महात्मा फुले यांनी शिक्षणाचे विचार, तळागाळाबद्दल जाणीव, आत्मियता यावर भर देऊन समाजाचा सर्व समान विकास झालाच पाहिजे असे प्रखड मत मांडले. महात्मा फुले यांच्या दृष्टीकोनातून शिक्षण म्हणजे समाज सुधारण्याची संजीवनी आहे. या शिक्षणात अन्यायाची चीड निर्माण झाली पाहिजे, व प्रतिकारशक्तीचा विकास ज्या कृतीतून होतो त्यालाच खरे शिक्षण म्हणायचे कारण शिक्षण ही विकासाची प्रक्रिया आहे. शिक्षण हे समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, त्याचबरोबर राष्ट्रप्रेम, अभिमान, विश्वबंधुत्व, व मानवता निर्माण करण्याचे साधन आहे असे ते ठामपणे म्हणत. शैक्षणिक ध्येये यामध्ये शिक्षणातून व्यक्तीच्या वास्तविक जीवनाची तयारी करणे अपेक्षित आहे. शिक्षण सुखी, सफल, समृद्ध बनले पाहिजे. तसेच शिक्षणाने सामाजिक परिवर्तन हे घडलेच पाहिजे असे ते म्हणत. प्राथमिक शिक्षणामध्ये महात्मा फुलेंनी शिक्षणाचे सार्वत्रीकरण करून सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण असावे. प्रत्येक खेड्यापाड्यापर्यंत

शिक्षणाची सोय करावी. शिक्षण आणि गावगाड्यापर्यंत पोहचले पाहिजे असे ते म्हणत. तसेच प्राथमिक शिक्षण हे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत सक्तीचेव मोफत करावे असे त्यांचे मत होते. माध्यमिक शिक्षण हे कारकून निर्माण करणे यासारखे नसावे तर सतत काळानुरूप अभ्यासक्रमाची पुनर्रचना होणे अपेक्षित आहे. शिक्षणामध्ये व्यवसायिक कौशल्यावर भर देऊन त्यानुरूप शाळा काढाव्यात शिक्षक हे प्रशिक्षित असणे महत्त्वाचे आहे. त्यांना अनुदानही द्यावे व शाळांना मात्र त्यापेक्षा जास्त अनुदान असावे. उच्च शिक्षण विज्ञान, गुणवत्ता, कौशल्य, याचा विचार जास्त न करता प्रत्येक व्यक्तीला समान संधी उपलब्ध करून द्यावी. समान संधी उपलब्ध करून देतांना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा. व गरीब जनतेसाठी स्वतंत्र शिक्षणाची सोय असावी. शाळेतील शिक्षक हे प्रशिक्षित असावेत शिक्षकाने विद्यार्थ्यांबरोबर अतिशय सहानुभूतीने व प्रेमाने वागावे आणि शिकवावे देखील. शिक्षकाचे वागणे यावरूनच विद्यार्थ्याचे वर्तन घडत असते. त्यासाठी शिक्षकाला वेतनही चांगले असणे अपेक्षित आहे जर शिक्षकाकडून चांगला निकाल लागला गेला तर त्यानुरूप शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिके द्यावीत. शाळेची दर तीन महिन्यातून एकदा तपासणी करणे गरजेचे आहे. जेणेकरून विकासात्मक दृष्टिकोन वाढीस लागेल. तपासणी ही वरचेवर न करता मुद्देसूद करून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न होता केवळ विकासात्मक दृष्टिकोन ठेवावा. अभ्यासक्रम हा शेती व आरोग्य यावर आधारलेला असावा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम त्यांच्या कुवतीनुसार व थोड्याफार प्रमाणात कमी असावा. तसेच पाठ्यपुस्तकात शेती, ग्रामोद्योग, व कला संबंधीचे विविध पाठ असावेत. तसेच अभ्यासक्रमाची काळानुरुप पुनर्रचना व्हावी. असे महात्मा फुले म्हणतात. तसेच अभ्यासक्रमात धार्मिक उतराचे नैतिक शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यास चांगल्या प्रकारे शिस्त निर्माण करावी. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त बरोबरच सामाजिक शिस्त देखील असावी. शिस्तीमधून प्रेम व्यक्त व्हावे, व आदर निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणजे सहानुभूती वर आधारित शिस्त निर्माण होईल. स्वातंत्र्य आणि शिस्त यांचं योग्य समायोजन करावे. तसेच वर्तन परिवर्तनातून शिस्त निर्माण व्हावी. असे महात्मा फुले शिस्त व स्वतंत्र याबद्दल बोलत असत त्याचबरोबर महात्मा फुलेंनी सांगितलेली अध्ययन-अध्यापन पद्धती ही ज्याप्रमाणे काळानुरूप अभ्यासक्रमाची पुनर्रचना होईल त्यानुसार शिक्षकाने आपली अध्ययन अध्यापन पद्धती देखील बदलणे गरजेचे आहे. म्हणजेच अभ्यासक्रमाला अनुरूप अशी बदलत्या काळाला अनुरूप अशीच अध्ययन अध्यापन पद्धती वापरली पाहिजे मातृभाषेतून विद्यार्थ्यांच्या स्तरावर जाऊन शिक्षकाने अध्यापन करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी देखीलमहात्मा फुलेंनी महत्वाचे कार्य केलेले आहे. अस्पृश्यांच्या वर्षांच्या अवनितीचे व प्रगतीचे मूळ कारण काय असेल तर ते म्हणजे विद्या व शिक्षणाचा अभाव आहे. हे जोतिबांचे स्पष्ट मत होते. त्यांचे याबद्दल एक प्रसिद्ध वचन देखील आहे . अस्पृश्यांना हलाखीच्या स्थितीतून वर काढायचे असेल, त्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल, त्यांची प्रगती घडवून आणायची असेल, तर सर्वात प्रभावी माध्यम कोणते असेल तर ते म्हणजे शिक्षण अशी त्यांची ठाम धारणा होती. अशाप्रकारे महात्मा फुले यांनी हंटर कमिशन समोर मांडलेली बाजू, शैक्षणिक ध्येय ,प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, शाळेतील शिक्षक, अभ्यासक्रम, अध्ययन अध्यापन, पद्धती, स्वातंत्र्य व शिस्त, आणि शिक्षण याबाबतीत आपले विचार मांडून भारताला मोठे योगदान दिलेले आहे .

**संदर्भ** :

१) उदयोन्मुख भारतातील समाज शिक्षण व शिक्षक डॉ.अरविंद दूनाखे . नित्य नूतन प्रकाशन.

२) नवीन काळाचे शिक्षण तत्त्वज्ञान

३) डॉ. के. के. जाधव मन प्रकाशन नाशिक

४) शैक्षणिक तत्वज्ञान

५) प्रा. विक्रम सारूक इनसाईड पब्लिकेशन नाशिक

६) www.google.com

७) https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/

६)www.yahoo.com

# थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज

**डॉ.सुधीर ब.गायकवाड**
जालना समाजकार्य महाविद्यालय, रामनगर जालना

**प्रास्ताविक**:

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करण्यात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे ,विठ्ठल रामजी शिंदे ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराजां बद्दल म्हटले होते की," शाहू राजा नुसता मराठा नव्हता ,ब्राह्मणेत्तर ही नव्हता ,तर तो न युगातला सर्वांगपुर्ण पुरुष होता तो महाराष्ट्राचे विकासाचा एक मोठा तरुण होता हे जास्त खरे" असे गौरवोद्गार काढले आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतरही समाजसुधारणा ,समाज कल्याण आणि स्वातंत्र्यासाठी अहोरात्र अथक परिश्रम करणारे राजपुत्र व पैशाचा समाजासाठी वापर करणारे व्यक्तिमत्व म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. समाजाची सर्वांगीण सुधारणा करणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचे शाहू महाराज होते. समाजातील उपेक्षित आणि तळागाळातील समाज सुधारला तर देशभरातील समाज सुधारले असे विचार परंपरेतील समाजसुधारकांचे मत होते. इतर राजकीय नेते जीवन राजकीय स्वातंत्र्याचा प्रयत्न करत होते तेव्हा छत्रपती शाहू महाराज लोकांची मने स्वतंत्र झाल्याशिवाय स्वातंत्र्य कसे मिळेल, स्त्रियांना मुक्त केल्याशिवाय या देशात लोकशाही कशी येईल, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा भेद नष्ट केल्याशिवाय या देशात लोकशाही कशी येईल, सामाजिक सुधारणा घडवून न आणता राजकीय सुधारणा कशी होणार ,यातून पुन्हा पेशवाई निर्माण होईल हे विचार शाहू राजांनी मांडले होते. आधुनिक भारतातील राजर्षी शाहू महाराज हे अष्टपैलू आणि महान व्यक्तिमत्व होऊन गेले.कलोपासक, ज्ञानोपासक मल्लविद्येचे पुरस्कर्ते, शेतकऱ्यांचे उद्धारक अशा महत्त्वाच्या भूमिका शाहू राजांनी बजावल्या .इंग्रजी सत्तेचा दबदबा आणि स्थानिक ब्राह्मणवादी वर्ग यातून राजश्री शाहू महाराजांनी जे बहुजन उद्धारक कार्य केले. भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यासारखे आहे. दलित-शोषित ,शेतकरी ,स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य म्हणजेच देशोद्धार याचे कार्य करणे असे राजर्षी शाहू महाराज मानत असत. जे पुरुष सामाजिक स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी जीवाची पर्वा न करता हयातभर धडपडत असतात ते महापुरुष ठरतात राजर्षी शाहू महाराज अश्या महा पुरुषांचे पैकीच एक होते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी महात्मा फुले यांची समाजप्रबोधनाची मशाल हाती घेऊन एक समाजिक क्रांतिकारक दृष्ट नेता म्हणून जे कार्य केले ते महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला पुढे घेऊन जाणारे आहे त्यांचा विचार व त्यांची कार्य आजच्या एकविसाव्या शतकातही अत्यंत उपयुक्त ठरतात आजच्या राज्यकर्त्यांनी शाहू राजांच्या विचार व कार्याचे अनुकरण केले तर आपला देश जागतिक महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही यासाठीच त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण:-** सर्वसामान्य लोकांच्या बुद्धीवर ज्ञानाला जुलमी धार्मिक जी बंधने लागली होती ती झुगारून देण्याची शक्ती बहुजनांच्या अंगी येण्यासाठी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे शाहु

राजांना वाटले आणि 1912 मध्ये एक आदेश काढून प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले .भारतीय मुलांची यादी करून त्यांना शाळेत दाखल केले शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकांनी गॅरेजवर कामाला पाठवले तर त्यांना दंड करण्यात येऊ लागला परंतु समाजाच्या सामाजिक व आर्थिक व्यवस्थेचा विचार करून आई-वडिलांच्या अत्यावश्यक कामासाठी मुलांच्या मदतीची जरुरी असल्यास काही दिवस मुलांना घरी ठेवता येईल अशी तरतूद करण्यात आली. शाहू महाराज एवढ्यावरच थांबले नाही तर गोरगरिबांचे शिक्षण हालाखीच्या परिस्थितीत होऊ शकत नाही याची जाणीव ठेवून 25 जुलै 1917 रोजी प्राथमिक शिक्षण मोफत केले. रंजल्या-गांजल्या समाजाला सुशिक्षित करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे यासाठी प्रत्येक समाजाने आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे शाहू महाराजांना वाटत असेल म्हणून शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला.

**जातिभेद निर्मूलन:-** माणसा माणसांत भेद करणारी कोणतीही समाजव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. अस्पृश्यता हा समाजाचा कलंक आहे. पशु व्यक्तींना माणसासारखे जमीन नाकारणाऱ्या वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्थेबद्दल त्यांना तिटकारा होता ते म्हणत मी सर्वांचा राजा आहे महार मांग चांभार ढोर भंगी बेडर इत्यादी जाती सुद्धा माझ्या प्रजा आहेत त्यामुळे त्यांचा हवामान शाहू महाराजांना सहन होत नसेल त्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी सर्वांशी संबंध येतील असे उद्योग काढून दिले उदा. गंगाराम कांबळे यांना मध्यवस्तीत हॉटेल काढून दिले त्या हॉटेलमध्ये शाहूमहाराज होता आपल्या लवाजम्यासह चहा घ्यायला येत असत लक्ष्मण मास्तर व गणपा पवार यांना शिलाई व्यवसाय करण्यास मदत केली त्यांना लागणारे साहित्य स्वतः शाहूमहाराज मुंबईहून आणून देत असत.

**दुर्बल घटकांचे कैवारी:-** मागास जातींना अस्पृश्य दुर्बल घटकांना कित्येक शतके प्रशासना पासून दूर ठेवण्यात आले होते मागासवर्गीयांच्या उन्नतीचे सूत्र महात्मा ज्योतिबा फुले यांच्या आरक्षण धोरणात आहे या धोरणानुसार मागासवर्गीयांनी उच्च शिक्षण घ्यावे व त्यामुळे त्यांना सरकारी खात्यात पूर्वीपेक्षा अधिक नोकऱ्या मिळतील असे शाहू महाराजांचे मत होते म्हणून त्यांनी प्रत्यक्ष कृती करून 26 जुलै 1902 रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध करून मागासवर्गीयांना पन्नास टक्के जागा सरकारी कार्यालयात राखीव ठेवण्याचा आदेश काढला कारण जेव्हा शाहू महाराजांकडे राज्याची सूत्रे आली तेव्हा सर्वत्र सुशिक्षित समाजाचे वर्चस्व होते मागास जातीचा एकही नोकर दिसत नव्हता म्हणून मागासवर्गीयांना नोकरीत देण्याचे धोरण शाहू महाराजांनी आखले आणि ती प्रत्यक्ष कृती रुप आणले.

**बहुजनांच्या शिक्षणावर भर:-** महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाज परिवर्तनाचे हात्यार शिक्षण असे सांगितले होते." विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली नीतीविना गती गेली ,वित्ताविना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले" असे महात्मा फुले यांनी बहुजनांच्या अविद्या चे कारण शिक्षण आहे असे सांगितले होते. शाहू राजांनी सर्व समस्यांचे मूळ अज्ञानात आहे असे सांगितले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिक्षणाशिवाय तरनोपाय नाही .शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती होऊ शकत नाही .अज्ञानात बुडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी कधीच घडणार नाही, म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी शिक्षणाची सोय निर्माण करणे गरजेचे आहे याची जाणीव होऊन राजाराम कॉलेज व त्याला जोडून एक वस्तीग्रह निर्माण केले. वस्तीग्रह राहण्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये जातीची एकातमता निर्माण व्हावी हा त्यांचा उद्देश होता. शाहू महाराजांनी जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्व समाज एकसंघ व्हावा ही इच्छा होती. आपल्या भाषणात जातिभेद हा भारताला झालेला रोग आहे तो नष्ट होणे आवश्यक आहे असे सांगितले. सर्व जातीच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी जवळजवळ पंचवीस वेगवेगळी जातीची वस्तीग्रह स्थापन केली.

**छत्रपती शाहू महाराजांनी सुरू केलेल्या जातीनिहाय वसतिगृहांची यादी पुढीलप्रमाणे**

1) सार्वजनिक वस्तीग्रह 896 2) मराठा वस्तीगृह 1901 3) जैन वस्तीग्रह 1901 4) मुसलमान वस्तीग्रह 1902 5) लिंगायत वस्तीगृह 1907 6) अस्पृश्य वस्तीग्रह 1908 7) सोनार वस्तीग्रह 1908 8) श्री नामदेव शिंपी वस्तीगृह 1911 9) पांचाळ ब्राह्मण वस्तीग्रह 1912 10) सारस्वत ब्राह्मण वस्तीग्रह 1915 11) कायस्थ प्रभू वस्तीग्रह 1912 12) इंडियन क्रिश्चन वस्तीग्रह 1915 13) आर्य समाज वस्तीग्रह 1981 14) कर्नल वूड हाऊस वस्तीग्रह 1920 15 ) सरदार वस्तीग्रह 1921 16) वैश्य समाज वस्तीगृह 1918 17) इंदुमती राणीसाहेब वस्तीग्रह 1919 18) मिस क्लार्क वस्तीग्रह 1912 19) शिवाजी वैदिक वस्तीग्रह 1920 20 ) कारस्कर वस्तीग्रह 1920 21) देवान वस्तीग्रह 1921 22) सुतार वस्तीग्रह 1921 23 ) नाशिक वस्तीग्रह 1921 24) बोहरी वस्तीग्रह 1921 .वरील वस्तीग्रहांच्या यादीवरून हेच स्पष्ट होते की ,शाहू महाराजांनी सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरू केली होती एवढेच नव्हे तर त्यांच्या संस्थांना बाहेर आहे ही पंढरपूर ,धारवाड ,नाशिक, नगर आदी ठिकाणी शाहू महाराजांनी विद्यार्थी वस्तीग्रह सुरू केली होती ,यावरून त्यांचा दूरदृष्टी पणा लक्षात येतो.

**अस्पृश्यांच्या उद्धरासाठी कार्य:-** अस्पृश्य हिंदू समाजातील अगदी शेवटचा वर्ग सर्व गोष्टी पासून दूर असलेला हजार वर्षापासून या वर्गावर कायमची गुलामगिरीला देण्यात आली होती. अस्पृश्यता ही देवाने निर्माण केलेली असल्यामुळे ती टिकविणे आवश्यक आहे, असे धार्मिक शिक्षणही दिले जाई. गावाच्या बाहेर ज्यांच्या वस्त्या आहेत त्यांचा नव्हे तर त्यांच्या सावलीचा ही विटाळ होत असे त्यांनी जमिनीवर थुंकू नये यासाठी गळयात मडके बांधले जात असे, जमिनीवरुन चालताना जागा लगेच खराट्याने स्वच्छ करावी लागेल मडकी व खराटा धर्ममार्तंडांनी त्यांना बांधलेल्या श्रंखला. होत्या शिक्षण घेणे तर दूरच त्यांनी ज्ञान ऐकण्याचा ही प्रयत्न केल्यास कानात शिसे ओतावे व जीभ छाटावी अशी शिक्षा ही मनुस्मृतीत सांगितलेली आहे या अस्पृश्य वर्गाच्या उदाहरणासाठी त्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था शाहू राजांनी केलेली आपल्या संस्थानात अस्पृश्यांसाठी पाच शाळा उघडल्या 1919 मध्ये त्यांची संख्या 27 झाली अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या अस्पृश्य निरक्षर असल्यामुळे त्यांना नोकरी मिळत नसत . थोडी शिकलेल्या अस्पृश्यांना शिक्षक, तलाठी कारखान्याच्या पदावर नेमले संस्थानातील सर्व दवाखान्यात इतर जातीच्या रुग्णां यांच्याबरोबर येणे अस्पृश्यांना अस्पृश्य मानतात सुशृषा करावी तसेच सार्वजनिक इमारती धर्मशाळा विश्रामगृहे सरकारी अन्नछत्रे नदीची पाणवठे सार्वजनिक विहिरी या ठिकाणी कोणालाही अस्पृश्यता पाळता येणार नाही असे झाल्यास कामगार, तलाठी ,पाटील यांना जबाबदार धरले जाईल, असे जाहीर केले .माणसाने माणसा प्रमाणे वागावे असा धर्माचा अर्थ सांगतो नंतर अशीच संबंधीची स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत करण्यात आले.

**प्रशासनाचा जाहीरनामा**:- 2 एप्रिल 1894 रोजी छत्रपती शाहू महाराजांनी प्रशासनाची सूत्रे हाती घेतली यानिमित्ताने त्यांनी केलेल्या आपल्या भाषणात भावी कार्याची रूपरेषा सांगितली व आपले राज्य सामान्यांसाठी कल्याणकारी होणार याची ग्वाही दिली .आमची प्रजा सुखी आणि संपन्न व्हावी संतुष्ट असावी दिवसेंदिवस तिचे कल्याण व्हावे आणि आमच्या राज्याच्या चहुबाजूंनी विकास व्हावा अशी आमची इच्छा आहे असा मनोदय व्यक्त केला. त्यांनी काही आज्ञापत्रे काढली ती आजच्या राज्यकर्त्यांनी जरूर वाचून विचार करून अंमलबजावणी करण्यासारखी आहे.

अ) सरकारी अधिकारी दौऱ्यावर असताना त्यांना काही वस्तूंची गरज वाटल्यास त्यांनी गावकऱ्यांकडून पैसे देऊन विकत घ्याव्यात व त्याची पावती घ्यावी.

आ) दिवानी दाव्याने सावकारने शेतकऱ्यांच्या गुराढोरांचा लिलाव करू नये

इ ) सावकारी पाशातून शेतकऱ्यांना सोडवण्यासाठी अल्प व्याजाच्या दराने दीर्घ मुदतीच्या व सुलभ हप्त्यांनी कर्ज देण्यात यावे

ई ) वेठबिगारी पद्धत त्वरित बंद करण्यात यावी

उ) जंगलात जनावरांना विचारण्याची परवानगी देण्यात यावी.

अशा पद्धतीने प्रशासकीय जाहीरनामा राजर्षी शाहू राजांनी अवलंबला होता

**स्त्री शिक्षणास प्रोत्साहन** :- कोणती परिवर्तन सहजासहजी घडून येत नाही त्यासाठी अनेक योजना आखाव्या लागतात हीच युक्ती शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणासाठी केली मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या.

8) प्रौढ महिलांसाठी शिक्षण

9) विधवा पुनर्विवाह कायदा जुलै 1917

10) अंतर धर्मीय व आंतरजातीय विवाह कायदा जुलै 1919

असे अनेक महत्त्वपूर्ण कार्य शाहू राजांनी केले या कार्यामुळे महाराष्ट्र प्रगतीपथावर होता आणि आज जे काही महाराष्ट्राची आणि देशाची प्रगती आहे त्यात शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा खूप मोठा सहभाग आहे हे विसरता कामा नये .त्यांचा आदर्श पुढे ठेवून महाराष्ट्राची जडणघडण करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील अनेक सुधारणावादी पुरोगामी विचारवंत समाजसुधारक राज्यकर्ते यांच्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू राजे यांचे कार्य हे अतुलनीय आहे त्यांच्या विचारांचा व कार्याचा अवलंब आजच्या राज्यकर्त्यांनी केला तर भारत महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ:-**


1) डॉ. जयसिंग पवार -राजर्षी शाहू छत्रपती -सुमेरू प्रकाशन डोंबिवली
2) प्रा.मोहित फडके- समाजशास्त्रीय विचारवंत- प्रकाशन कोल्हापूर
3) धनंजय कीर -राजश्री छत्रपती शाहू
4) ओम प्रकाश गायकवाड (संपादक)- लोक राजा राजर्षी शाहू महाराज
5) मीना कुलकर्णी- राजर्षी शाहू महाराज गुरु ग्रंथ
6) डॉ.आर.एस.कोंडकर - रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज -अरुण प्रकाशन लातूर
7) डॉ.वाघमारे एस पी ( संपादक )21 व्या शतकातील राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची प्रासंगिकता- राजवीर प्रकाशन परभणी.
8) प्राचार्य डाॅ. रा.नु.भगत - राजर्षी शाहू छत्रपती जीवन शिक्षण कार्य.

# राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक व आर्थिक कार्य

**प्रा. अमोल देविदास दिवटे**
वसंतराव काळे महाविद्यायलय,ढोकी , ढोकी ता. जि. उस्मानाबाद.
amoldiwte@gmail.com

**घोषवारा:**
हिंदुस्थानातील थोर समासुधारक, प्रबोधनकार, बहुजन समाजाचे उद्धारक , स्त्री शिक्षणाचे प्रवृतक तसेच विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे आद्य क्रांतिवीर छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक, शैक्षणीक व आर्थिक असे बहुमोल कार्य याचे अनन्य साधारण महत्व आहे.

**प्रस्तावना :**

कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज हे अहमदनगर येथे इंग्रजाच्या कैदेत असताना १८८३ मध्ये मृत्यू पावले. त्यांना औरस पुत्र नसल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी कागल घराण्याचे जयसिंगराव (आबासाहेब) घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यास दत्तक म्हणून घेतले. १७ मार्च १९८४ रोजी दत्तक विधान झाल्यानंतर त्यांचे नाव शाहू असे ठेवण्यात आले. शाहू महाराजांचे प्रारंभीचे शिक्षण फिटझिराल्ड्स या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या देखरेखी खाली पूर्ण झाले. त्यांच्या सोबत बंधू बापूसाहेब आणि दत्ताजी इंगळे हे सहाध्यायी होते. पुढील शिक्षण १८९० ते १८९४ या कालावधीत सर स्टूअर्ड फ्रेजर व रघुनाथ व्यंकोजी सबनवीस यांच्या मार्गद्शनाखाली धारवाड येथे पूर्ण केले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी राजकोट येथील राजकुमार कॉलेज मध्ये प्रवेश घेऊन राज्य- कारभार आणि इतिहास या विषयात सखोल ज्ञान मिळवले. संस्थानाचा राज्यकारभार आणि जनतेची जीवनशैली याचा अभ्यास करून 2 एप्रिल १८९४ रोजी संस्थानाची अधिकार सूत्रे आपल्या हाती घेतली. तत्कालीन परिस्तीतील समाजकंटक लोकांच्या वागण्याने तसेच त्यांना आलेल्या कटू अनुभवामुळे त्यांनी सत्येचा वापर उपेक्षित बहुजनांच्या कल्याणासाठीच करण्याचा निर्णय घेतला. समाज सुधारणेचा वारसा वडील आबासाहेब घाटगे यांच्याकडून शाहू महाराजांना मिळाला होता. ब्रिटिश सरकारने आबासाहेब याना कोल्हापूर संस्थानाचे रिजेंट म्हणून नेमणूक केली असता कागल येथे आबासाहेबांनी शाळा स्थापन केली होती.

खऱ्या अर्थाने महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यानंत्तर बहुजन समाजासाठी भरीव असे योगदान राजर्षी शाहू महाराज यांचे असल्याचे आपणाला दिसून येते. त्यांनी अर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना विविध व्यवसाय सुरू करून दिले. त्यासाठी मदत म्हणून असंख्य योजनांची अमलबजावनी केली. राजर्षी शाहू महाराज यांचे असे मत होते की जोपर्यंत शैक्षणिक सुधार घडून येणार नाही तोपर्यंत आर्थिक विकास साध्य होणार नाही त्यासाठी त्यांनी शिक्षणाच्या विविध योजना

राबवल्या. “बहुजन हिताय बहुजन सुखाय” या युक्ती प्रमाणे त्यांनी जास्तीत जास्त लोकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहचावण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक शाळा स्थापन केल्या आणि ८ सप्टेंबर १९१७ रोजी प्राथमिक शिक्षण सर्वासाठी मोफत व सक्तीचे केले. भारतीय समाजकारणातील एक उत्सुंग व्यक्तिमत्त्व म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व आर्थिक कार्य अभ्यासने अत्यंत महत्वाचे ठरते.

**संशोधन उद्धिष्टे :**

1. राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक कार्याचा आढावा घेणे.
3. राजर्षी शाहू महाराजांचे सहकार क्षेत्रातील योगदान नमूद करणे.

**संशोधन गृहितके:**

1)राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणीक कार्य पार पाडले.

2)राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक कार्य पार पाडले.

3)राजर्षी शाहू महाराजांनी सहकार क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत.

**संशोधन पद्धति :**

सदरील संशोधन कार्य हे दुतीय माहितीच्या आधारावर तयार केले आहे. तरी माहितीचा स्त्रोत हा सरकारी प्रसिध्दी पत्रके, मासिके, वृत्तमानपत्रे, जेष्ठ विचारवंतचे पुस्तके तसेच काही वेब साईट यांचा आधार घेण्यात आला आहे. कोल्हापूर संस्थानाचे अधिपती आणि थोर साजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांनी केलेल्या शैक्षणिक आणि आर्थिक कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येतो.

**शैक्षिणक कार्य :**

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात शिक्षण ही फक्त उच्च वर्गाचीच मक्तेदारी बनली होती. शिक्षण हा विषय सामान्य माणसाच्या आवाकयाबाहेर होता. त्याला उपाय म्हणून शाहू महाराजांनी शिक्षणाच्या विविध योजना राबविल्या. निरंतर शिक्षण प्रकिया सुरू राहावी व मुबलक वित्त पुरवठा व्हावा म्हणून शाहू महाराजांनी डॉक्टर, मोठे व्यवसायिक, उद्योजक यांच्याकडून त्यांच्या उत्पन्नाच्या २% शिक्षण अधिभार आकरण्यात आला. स्वतः त्यांनी संस्थांच्या एकूण महसूला पैकी ६% इतकी रककम शिक्षणावर खर्च करण्याचे ठरवले.

**वसतिगृह सुविधा** :

शाहू महाराजांच्या महत्वाकांक्षेमुळे कोल्हापूर संस्थानामध्ये शिक्षणाचे वारे वाहू लागले. विद्यार्थ्यंसाठी राहणे आणि जेवणे याची सोय व्हावी यासाठी वसतिगृहाची निर्मिती करण्यात आली. त्यातही त्यांनी वेगवेगळया जाती, जमाती, धर्म तसेच अस्प्रश्य मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृहे बांधून दिली. त्याची सुरूवात म्हणून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यासाठी १८ एप्रिल १९०१ मध्ये “व्हीक्टोरिया मराठा बोर्डिंग” ची

स्थापना केली. त्यानंतर १९०६ – मुस्लिम, १९०८ – अस्पृश्यासाठी मिस क्लार्क, १९१५ – ख्रिस्ती, १९१९ – ढोर चांभार यांच्यासाठी वसतिगृह असे क्रमाने सुरूवात करण्यात आली. शाहू महाराजांनी त्यांच्या शासन काळात २६ वसतिगृहची स्थपणा केली म्हणूनच महाराजांना भारतातील वसतिगृहाचे अद्य जनक असे म्हटले जाते.

**शाळाची स्थापना :**

शाहू महारजांनी शाळा स्थापनेला चालना देण्यासाठी सन १९१३ मध्ये " गाव तेथे शाळा" असा अध्यादेश काढला. त्याला पूरक अनुकरण करत कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक शाळा सुरू केल्या. त्यात त्यांनी १९१८ मध्ये करवीर तालुक्यातील चिखली या गावी मोफत व सक्तीचे शिक्षण देणारी शाळा सुरू केली. पाठोपाठ इतर प्रमुख विषयासाठी देखील शाळा सुरू करण्यात आल्या जसे सत्यशोधक समाजाची शाळा, तलाठी शाळा, सैनिक शाळा, बालवीर शाळा, उद्योग निर्मिती शाळा इत्या. १५ नोव्हें.१९०६ रोजी किंग एडवर्ड मोहमेडण एज्युकेशन सोसायटी ची स्थापना करण्यात आली.

नवीन शाळा सुरू करत असताना शाहू महाराज त्या संबधित शाळेवर योग्य आणि प्रशिक्षित शिक्षकाची नेमणूक करत. तसेच त्यांना उचित मानधन मिळेल याची खात्री करून घेत असत. पौरोहित्य करणाऱ्या वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी महाराजांनी ६ जुलै १९२० रोजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा सुरू केली. या शाळेच्या माध्यमातून बहुजन समाजातील मुले पण वैदिक पठण करू शकत होती. व्यवसायीक शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी १९०३ मध्ये जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेमार्फत लोहारकाम, गवंडीकाम सुतारकाम इत्य. व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जात असे. देवालय बांधले जात असताना शेजारी शाळेसाठी वर्ग खोल्या बांधण्याचे आदेश देण्यात आले होते. स्त्री शिक्षणासाठी अत्यंत महत्वाचे निर्णय घेण्यात आले स्त्रियांच्या शिक्षिकेसाठी असणारे "फिमेल ट्रेनिंग स्कूल" यासाठी शिक्षिका म्हणून रखमाबाई केळवळकर यांची निवड करण्यात आली. राजाराम महाविद्यालयात मुलींसाठी मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचा पाठपुरावा करत मुलींसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केली. जे पालक आपल्या मुलां – मुलींना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना प्रति महिना १रू इतका दंड आकारण्याचा आदेश देण्यात आला होता.

**शिष्यवृत्ती योजना :**

बहुजन समाजासातील गरजू विद्यार्थ्याला अखंडित शिक्षण घेता यावे म्हणून शाहू महाराजांनी शिष्यवृत्ती योजना सुरू केली. 20 मे १९११ रोजी अक जाहीरनामा तयार करण्यात आला त्यानुसार शाळेत येणाऱ्या १५% विद्यार्थ्याला नादारी देण्यात आली. यात सर्वप्रथम गरीब विद्यार्थ्याला प्राधान्य दिले. राजकन्या आक्कासाहेब यांच्या विवाह प्रीत्यर्थ इ. ४ थी वर्गातील मुलींसाठी प्रत्येकी ४०रू च्या ५ शिष्यवृत्त्या सुरू केल्या.

**शैक्षणीक देणग्या :**

कोल्हापूर संस्थानातील शाळा आणि महाविद्यालय यांना शाहू महाराजांनी शैक्षणीक देणग्या जाहीर केल्या. नवीन शैक्षणिक उपक्रम राबवणे तसेच पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आवश्यक असल्याने महाराजांनी त्यासाठीही आर्थिक मदतीची तरतूद करून ठेवली होती. उल्लेखनीय म्हणजे व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग साठी प्रारंभी ५५० रू अनुदान मंजूर केले. नंतर त्यात वाढ करून वार्षिक २०००रू इतके केले. स्थायी स्वरूपाची ४७०००रू इतकी देणगी देऊ केली. महाराजांनी हिंगणे येथील महिला आश्रमास ५००रू ची मदत केली. त्याही पुढे जाऊन त्यांनी १९१२ मध्ये मराठी ब्रदरहूड या संस्थेला हायस्कूल काडण्यासाठी १५००रू ची देणगी दिली. पं.मदनमोहन मालवीय यांच्या विनंति नुसार बनारस विश्व विद्यालयाला १ लाख रूपये ची देणगी देण्यात आली. प्रोत्साहन मदत म्हणून पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाला २०००रू तर दिल्ली व नागपूर येथील अस्पृश्य वसतिगृहाला पाच हजार रूपये देऊ केले. या सर्व बाबींचा विचार करता शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे अतुलनीय व कौतुकास्पद असल्याचे आपणाला दिसून येते.

**आर्थिक मदत कार्य :**

ज्या प्रमाणे महाराजांचे शैक्षणिक कार्य उल्लेखीय आहे त्याच प्रमाणे महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी अनेक वर्ष आर्थिक विकास व मदत कार्य हाती घेतले आणि ते पूर्णत्वास नेले. प्रामुख्याने आपणाला शेती, उद्योग तसेच सहकार क्षेत्रातील सुधारणा अधोरेखित करता येतील.

**शेतीविषक कार्य :**

भारतातील बहुसंख्य लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यांचा प्रमुख उत्पन्नाचा स्रोत हा शेती व्यवसाय हाच आहे. राजर्षी शाहू महाराजांनी प्रथम शेती क्षेत्राशी निगडित कार्य हाती घेतले. शेतकरी सधन व्हावा म्हणून अर्थीक मदतीच्या योजना सुरू केल्या. शेती व्यवसाय संबंधी संपुर्ण माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून ठीकठकानी प्रदर्शने आयोजित केली. स्वतः ते त्या ठिकाणी उपस्थित राहून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देत असत. शेती विषयी असलेल्या अज्ञानातून आलेले मागासलेपण दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानासाठी सन १९०२ मध्ये सार्वत्रिक पाठबंदारे धोरण राबवण्याचे जाहीर केले. त्यावर खास पाठबंदारे अधिकारी यांची नेमणूक केली. त्यांच्या मार्फत संबधित क्षेत्रातील नद्या, विहिरी, तलाव व बंधारे यांच्या नोंदी ठेवणे तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे इत्यादि कामे केली जात असत. कोल्हापूर संस्थानासाठी वरदान ठरलेलं राधानगरी धरण शाहू महाराजांच्या मदतीने बांधण्यात आले. या धरणातील जलाशयामुळे शेती क्षेत्राचा विकास होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. ऐका राधानगरी धरणामुळे शेतीसाठी वार्षिक सुमारे ६०० दशलक्ष घनफूट पाणीसाठा उपलब्ध झाला. पुढे शाहू महाराजांनी आर्थिक मदत करून कोल्हापुरात २०००० इतक्या विहिरी व ४०तलाव बांधण्यात आले. संस्थांनामध्ये सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी शाहू महाराजांनी सन १९१२ मध्ये किंग एडवर्ड एग्रीकल्चरल इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन केली. त्या मार्फत शेतीची आधुनिक अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते यांची संपूर्ण माहिती व पुरवठा केला गेला.

शेतकऱ्याच्या अडचणी लक्षात घेऊन महाराजांनी अल्प मुदतीची स्वस्त कर्जे वाटप केली. तसेच चहा, कॉफी यासारख्या नगदी पिकांचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**उद्योग आणि व्यवसाय संबंधी कार्य :**

राजर्षी शाहूंनी शेती सोबतच उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध प्रकारच्या आर्थिक मदत योजना सुरू केल्या. व्यापार वाढीसाठी १८८५ मध्ये उपयुक्त असे शाहुपूरी नावाने व्यापार पेठ स्थापन केली. रोजगारा निमित्त मम्बई पुणे येथे होणारे कामगाराचे स्थलांतर थांबवण्यासाठी शाहूंनी सन १९०६ रोजी “शाहू छत्रपती स्पिनिंग आणि व्हिविंग मिल” स्थापन करण्यात आली. तंबाखू व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी महाराजांनी जयसिंगपूर वसाहत स्थापन केली. छोट्या व्यवसायिकाना आर्थिक मदत देऊ केली. गंगाधर कांबळे या व्यक्तीला चहाचे हॉटेल सुरू करून दिले तसेच कोणीही जातीव्यवस्था मानू नये म्हणून स्वतः ते त्याठिकाणी चहा पीत असत. गणपतराव पवार व लक्ष्मण मास्तर या दलीत व्यक्तींना शिलाई मशिन घेऊन दिली. केशवराव पाटील यांना मित्र भोजन गृह सुरू करून दिले. १९०६ रोजी महाराजांनी डी.एस. शालीग्राम या व्यक्तीची उद्योग निरीक्षक म्हणून नेमणूक केली. यांच्या नियंत्रणाखाली संस्थांनामध्ये जंगल संपत्तीवर आधारित सुगंधी तेल व औषधी घटक उत्पादन घेण्यास सुरुवात झाली. सर्व मदत कार्यामुळे संस्थानातील लोकामध्ये आत्मविश्वासाचे वातावरण तयार झाले. शाहू महाराजांची दुरदृष्टी लाभलेले कोल्हापूर शहर व परिसर मोठ्या दिमाखात सजलेला आहे. त्यांनी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधाचा उपयोग आजही तेथील नागरिकांना होत आहे.

**सहकार क्षेत्रातील योगदान :**

राजर्षी शाहू महाराज हे हिंदुस्तानातील सहकाराचे अद्य पुरस्कर्ते होते. त्यांनी सहकार तत्वाचा उपयोग करून अनेक उद्योग उभारले होते. कोल्हापूर येथे कापड गिरणी स्थापनेच्या वेळी त्यांनी असे अहवान केले की शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग उभरण्या ऐवजी लोकांनी एकत्र येऊन सहकार तत्वाद्वारे उद्योग उभारले पाहिजे. शाहू महाराजांनी सन१९१२ मध्ये सहकार तत्वास कायद्याचे स्वरूप दिले. हा कायदा ‘ सहकारी संस्था विषयक कायदा ‘ म्हणून ओळखला गेला. सहकार संस्थांची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी सहकार निबंधकाची नेमणूक करण्यात आली. सन १९१३मध्ये कोल्हापूर येथे “द कोल्हापूर अर्बन को ऑपरेटिव्ह सोसायटी लि.” ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली. कोल्हापूर येथे त्यांच्याच प्रेरणेने सहकारी दूध उत्पादक संस्था स्थापन करण्यात आल्या.

महाराजांनी केलेल्या कार्याची पोच पावती म्हणजे संस्थानांतील अनेक लोकांना रोजगार मिळाला. तसेच त्यांचे उत्पन्न वाढल्याने राहणीमानाचा दर्जा ही सुधारला.

**समारोह :**

छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थानातील लोकांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला. त्यांना कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय महासभेतर्फे “राजर्षी” ही मानाची पदवी देण्यात आली.

इतकेच नव्हे तर महाराष्ट्र सरकारने शाहू महाराजांचा जन्मदिवस २६ जून हा सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. महाराजांच्या शिक्षण विषयक कार्याची दाखल घेत केंब्रिज विद्यापीठाने त्यांना एल.एल.डी. हा सन्मान दिला. शाहू महाराजांचे समकालीन असलेले थोर कायदे पंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील त्यांच्याबाबत गौवोद्गार काडले आहेत. बहुजन समाजातील पिछाडलेल्या लोकांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले आहे. एकंदरीत त्यांचे शैक्षणीक आणि आर्थिक कार्य अद्वितीय आहे.

**संदर्भ :**

1)डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू महाराज : जीवन व कार्य ,मेहता पब्लिशिंग हाउस

2) के. सागर ग्रंथ महाराष्ट्रातील समासुधारक

3) डॉ.रमेश जाधव प्रकाशन राजकमल ग्रंथ लोकनेता शाहू छत्रपती

4) महाराष्ट्र टाईम्स वर्तपत्र स्मृतिदिन विशेष लेख दि.६ मे २०२१

5) वेब साईट- www.recentscientific.com

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. आंबेडकरांची पत्रकारीता आणि राजकीय चिंतन

**प्रा. डॉ. अरूण विठ्ठल सोनकांबळे**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख छ. शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस्  अँन्ड कॉमर्स, सोलापूर
इ. मेल : arunsonkamble6126@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतात ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर, पाश्चात्य आचार-विचारांच्या संपर्कामुळे भारतीय सार्वजनिक जीवनात तीन प्रकारचे नव वर्ग उदयास आलेले दिसतात. त्यापैकी पहिला वर्ग होता, पाश्चात्य संस्कृतीचे आहे तसे अंधानुकरण करणारा 'पाश्चात्यवादी' वर्ग' आणि दुसरा यथाचित्त्वादी, 'प्रतिगामी वर्ग.' या वर्गांचे आधुनिक भारत देशाच्या बांधणीशी काहीएक देणे-घेणे नव्हते. तिसरा वर्ग होता, 'आधुनिकवादी वर्ग.' भारतीय परंपरांचे चिकित्सकपणे आत्मपरिक्षण करणारा, विवेक आणि तर्काच्या जोरावर तावून-सुलाखुन स्वत:च्या बुद्धीप्रामाण्यवादाच्या कसोटीवर तपासून भारतीय संस्कृतीतील चांगले काय आहे ते अबाधित ठेवणारा, सोबतच पाश्चात्य व इतरत्र जे चांगले आहे हे भारताच्या अनुरूपतेनुसार स्वीकार करणारा हा वर्ग होता. यास 'पुरोगामी वर्ग' असेही संबोधले जाते.

आधुनिकवादी वर्गाचे पुढे दोन शकले पडतात एक 'सुधारणावादी वर्ग', दुसरा संपूर्ण 'परिवर्तनवादी वर्ग'. पहिल्या वर्गात सवर्ण जातीतील समाज व धर्म प्रबोधनातुन चळवळ उभी करणारा वर्ग होता. पुढे या वर्गाने राष्ट्रीय चळवळीच्या माध्यमातून आपली चळवळ इंग्रजांविरूद्धचा स्वातंत्र्य लढा आणि त्यासंबंधीचे राजकीय विचारांपूर्तीच सिमित ठेवली. दुसरा वर्ग होता ब्राम्हणेत्तर समाजातील बुद्धीवंतांचा. हा वर्ग देशातील तमाम शोषित, वंचित, कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधीत्त्व करणारा होता. हा बुद्धिजीवी वर्ग पाश्चात्यवादी, प्रतिगामीवादी तसेच पुरोगाम्यातील सुधारणावादी वर्गापेक्षा भिन्न होता. यांच्या चळवळीचा उद्देश सुधारणावादी नसून भारतीय समाजजीवनात संपूर्ण परिवर्तन घडवून शोषण विरहीत, समताधिष्ठीत, न्यायावर आधारीत लोकशाहीवादी समाज निर्माण करणे हा होता. यांच्या मते भारतास एक सक्षम व एकसंघ देश बनवायचे असेल तर संपूर्ण परिवर्तन घडविणे अनिवार्य आहे. याची पहिली पायरी जातियता संपूर्णत: नष्ट करणे आहे. तसे न केल्यास केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या मागे धावणे अर्थहीन आहे. या संपूर्ण परिवर्तनवादी वर्गाने निर्माण केलेल्या चळवळीस फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ असे संबोधले जाते.

आधुनिक भारतामध्ये संपूर्ण परिवर्तनवादी चळवळीचे प्रणेते म. जोतीराव फुले होते. राष्ट्रिय चळवळीचा लढा हा प्रामुख्याने इंग्रजी सत्ता या बाह्य शक्तीशी होता. तर फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचा लढा हा वसाहतवादी, साम्राज्यवादी शोषण व्यवस्थेपेक्षाही अधिक भयंकर अशा भारतीय ब्राम्हण्यवादी आणि जातीयवादी व्यवस्थेच्या विरोधात होता. या कारणास्तव चळवळीच्या या दुहेरी लढ्यासमोरील आव्हाने अधिक कठीण होती असे दिसते. आधुनिकवादी चळवळीने आपले विचार आणि चळवळ तळागाळापर्यंत नेण्यासाठी पत्रकारितेचा पुरेपुर आधार घेतला. राष्ट्रीय चळवळीचे समर्थक असणारे आणि सवर्ण व तत्सम वर्गचलीत प्रसार माध्यमांनी सामाजिक व आर्थिक विषमते

संबंधित विषयांना आपआपल्या सोयीप्रमाणे बगल देत आपली पत्रकारीता राजकीय विषयांपूरती मर्यादित ठेवलेली दिसते. फक्त इंग्रज प्रणित शोषणावर भर देऊन, ब्राम्हण प्रणित जातीय शोषणाचे प्रश्न गांभीर्याने हाताळलेच नाही असे दिसते.

यामुळे फुले-शाहू-आंबेडकरी वर्गाच्या पत्रकारीतेची जबाबदारी अधिक निर्णायक होती. जाती व्यवस्थेने वंचित ठरविलेल्या समस्त कष्टकरी आणि वंचित वर्गाचा प्रश्न हाच खरा राष्ट्रीय प्रश्न आहे हे ठणकावून निश्चित करण्याची ही जबाबदारी होती. पुन्हा हे सर्व अशिक्षित, अंधश्रद्धाळू, जातीय मानसिकतेच्या गुलामीत अडकलेल्या तमाम कष्टकऱ्यांच्या मस्तकात घालणे ही जबाबदारी होती. या वर्गात नवचेतना निर्माण करून स्वत:च्या हक्कांसाठी विषमतेविरूद्ध, शोषणाविरूद्ध संघटीत राजकीय लढा उभा करण्याचे आणि तसा आत्मविश्वास निर्माण करण्याचीही जबाबदारी होती. म. फुले आणि छ. शाहू महाराजांनी आपल्या लिखाण आणि कर्तृत्वाने चळवळीचा भक्कम पाया निर्माण केला. डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मुकनायक या पाक्षिकापासून चळवळीस अधिक गती प्राप्त झाली. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून वरील पैलुंच्या अनुषंगाने चिकित्सक अभ्यास करण्याचा हेतु आहे.

1917 च्या मॉंटेग्यु-चेम्सस्फोर्ड च्या ऑगस्टच्या जाहिरनाम्यात भारतात 'जबाबदार सरकार' स्थापन करण्याचा ब्रिटिश सरकारचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या जाहीरनाम्यानुसार भारतामध्ये प्रथमत: थेट निवडणुका आणि त्यातुन प्रतिनिधिक संस्था निर्माण होणार होत्या. 1909 च्या मॉर्ले-मिंन्टो राजकीय सुधारणांतर्गत धर्माच्या आधारावर मुसलमानांकरीता स्वतंत्र मतदार संघ बहाल करण्यात आले होते. त्यास 'मुस्लीम लीग' आणि 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' यांनी लखनऊ कराराअंतर्गत संमती दिली. 1917 मध्ये मागील पार्श्वभुमीच्या आधारे भारतातील अस्पृश्यांचे राजकीय भवितव्याचा विषय राजकीय पटलावर अवतरला. महर्षी वि.रा. शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासच्या वतीने कमिनशन समोर अस्पृश्यांचे प्रतिनिधी हे कायदे मंडळाने निवडावे, अशी भूमिका घेतली. तेंव्हा डॉ. आंबेडकरांनी यास 'वरिष्ठ हिंदू अस्पृश्यांवर राष्ट्रीय गुलामगिरी लादू पाहत आहेत, पण अस्पृश्य लोक त्यांचे प्रयत्न हाणून पाडतील' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.[1] डॉ. आंबेडकरांनी स्वत: साऊथब्युरो कमीशनपुढे साक्ष नोंदवित तत्कालीन ब्रिटिश शासन भारतीय जनतेला जे काही देऊ पाहात होते, त्यात बहिष्कृतांच्या वाट्याला काय येईल, असा रोखठोक सवालही केला.[2] डॉ. आंबेडकरांनी टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकात 'महार' या टोपण नावाने 'अ महार ऑन अ होमरूल' हा लेख प्रसिद्ध केला. याद्वारे जातीसंस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या समाजाचा स्वाभीमानी हुंकार त्यांनी जगासमोर मांडला. त्यांच्या मते 'स्वातंत्र्य मिळविणे हा टिळकांचाच नव्हे तर महारांचादेखील जन्मसिद्ध हक्क आहे' असे ठणकावून जाहीर केले.[3]

1920 हे वर्ष म. गांधीजींच्या असहकार चळवळीचे वर्ष होते. गांधीजींच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात खऱ्या अर्थाने याच वर्षी झाली. त्याच वर्षी 21 मार्च 1920 रोजी तत्कालीन कोल्हापूरातील कागल जहागिरीतील माणगाव येथे ऐतिहासिक माणगाव परिषद झाली. परिषदेत छ. शाहू महाराजांनी उपस्थितांना उद्देशून केलेल्या भाषणात, त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या रूपाने खरा पुढारी निवडला या बद्दल अभिनंदन केले. याच सभेत ते एक महत्वाचे भाकित करतात 'माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे, तर एक वेळ अशी येईल की, ते सर्व हिंदूस्थानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगते.'[4] चळवळीकरीता मुखपत्रकाची गरज लक्षात घेऊन छ. शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना 2500 रूपयांची देणगी दिली. 31 जानेवारी 1920 रोजी 'मुकनायक' या पहिल्या पाक्षिकाची सुरूवात झाली. मुस्कटदाबीमुळे, चेपलेल्या, जातिव्यवस्थेने निच ठरवलेल्या आवाजहीन समूहाचा नायक म्हणजेच मुकनायक. मुकनायकातून डॉ. आंबेडकरांनी जातीय विषमतेवर

घणाघाती हल्ले चढवून वंचितांच्या स्वतंत्र राजकारणाची मुहूर्तमेढच रोवली. मुकनायकाने सामान्य दलितांचे जातीय दमन आणि हिंसाचाराच्या घटने संदर्भातील खुले पत्रे छापण्यास सुरूवात केली. या पत्रांमुळे समकालीन दैनंदिन जीवनातील अस्पृश्यांच्या व्यथांना केवळ वाचाच फोडली नाही तर वंचितांचे संरचनात्मक व स्वतंत्र राजकारणास सुरूवात केली.राष्ट्रीय चळवळी संदर्भात मुकनायकात विचार मांडतांना डॉ. आंबेडकरांच्या मते राष्ट्रीय चळवळीने भारतातील जातीय प्रश्नास सार्वजनिक जीवनातून उद्दामपणे अदृश्य केले आहे. त्यांच्या मते भारतीय राष्ट्रावादातून निर्माण होणारी राजकीय जागरूकता ही केवळ बाह्यशक्तींपूरतीच सिमित आहे. राष्ट्रीय प्रगतीस मारक ठरणारी जातीव्यवस्था यामध्ये नाही.[5] मुकनायकातच डॉ. आंबेडकरांनी हिंदू जातीय समाज व्यवस्थेचे वास्तव मांडतांना या व्यवस्थेस बिन पायऱ्यांचा मनोरा असे संबोधले.[6]

डॉ. आंबेडकरांच्या मते घातक सामाजिक परंपरा यांची दखल न घेता नुसत्या संस्कृतीचा गौरव करण्यावर भर देणाऱ्या, सामुहिक ओळख निर्माण करणाऱ्या राजकारणामुळे देशाची निर्मिती करता येत नाही. म्हणून जोपर्यंत सामाजिक आणि आर्थिक भेदभाव आणि जातीसंस्थेचे समूळ उच्चाटन होत नाही तोपर्यंत राष्ट्रवादाची नुसती भाषा करणे दीर्घकाळ टिकणार नाही.[7]

1924 रोजी डॉ. आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हे घोषवाक्य असणाऱ्या 'बहिष्कृत हितकारीणी सभा' या त्यांच्या पहिल्या संघटनेची स्थापना केली. या घोषवाक्यावरूनच चळवळीमध्ये विवेकावर आधारित प्रज्ञेचे स्थान किती प्रबळ आहे हे स्पष्ट होते. संघर्षाला प्रज्ञेची साथ हवी. त्यामुळेच आंबेडकरी चळवळ कधीच हिंसक स्वरूपाची झाली नाही. 1927 च्या महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभुमीवर 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू करण्यात आले. या पत्रकामध्ये महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचा लेखा-जोखा आहे. याखेरीज तत्कालीन भारतीय राजकारणाला कलाटणी देणाऱ्या सायमन कमिशन, नेहरू योजना, गिरणीकामगार-मालक संघर्ष असे घटना व विषय आढळतात.

डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे 14 ऑक्टोबर 1956 रोजी बौद्ध् धम्म् स्वीकारून केलेले धर्मांतर. याची घोषणा 1935 मध्ये येवले मुक्कामी केली होती. यापूर्वीची पार्श्वभूमी बुद्ध, रामानुजाचार्य, साधूसंत आणि एकोणीसाव्या शतकातील सुधारकांच्या कार्याचे मुल्यमापन इत्यादी लेखातून तयार करण्यात आलेली दिसते. सवर्णांच्या अस्पृश्यांप्रतिचा वर-वरचा कळवळा स्पष्ट करणारे 'अस्पृश्य निवारणाचा पोरखेळ' या अग्रलेखात आढळतो.[8] डॉ. आंबेडकर डिसेंबर 1926 रोजी मुंबई प्रांतिक विधिमंडळाचे सभासद झाले. शेतकरी-कामगारांचे, महार वतनाचे, प्रश्न मांडले. सभागृहाच्या बाहेर जनमत आणि प्रबोधन करण्याचे कार्य बहिष्कृत भारतात चालत असे.बहिष्कृत भारताचा प्रश्न हा समस्त भारताचा प्रश्न आहे कारण हा प्रश्न सोडवल्याखेरीज भारताचे प्रश्न सुटणार नाहीत. समस्त भारतीय जनतेस संबोधण्याच्या हेतुने 24 नोव्हेंबर 1930 रोजी 'जनता' पत्रकाची स्थापना करण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य आणि स्वतंत्र भारताची संस्थात्मक संरचना यादृष्टीने यापुढील काळ महत्त्वाचा ठरतो. याचे प्रतिबिंब जनता मध्ये उमटलेले दिसते.1930 ते 1932 हा गोलमेज परिषदेचा कालावधी. गोलमेज परिषदेत अस्पृश्य हिंदू समाज रचनेचा भाग नाहीत म्हणून त्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता त्यांना स्वतंत्र मतदार संघाची आवश्यकता आहे हे मत डॉ. आंबेडकरांनी विद्वत्तापूर्वक मांडले. तर याला विरोधी मत म. गांधीजींनी मांडले. अस्पृश्य हे हिंदू समाजाचा भाग असल्याने त्यांना स्वतंत्र मतदार संघ दिल्यास हिंदूंची एकी तुटेल असा युक्तीवाद त्यांनी मांडला. 1930 रोजी सुरू झालेले काळाराम मंदिर जनआंदोलन तब्बल 5 वर्षे चालले. या आंदोलनाकडे वरील युक्तीवादाचा पोकळपणा जगासमोर आणण्याच्या दृष्टीने

केलेला एक प्रयत्न म्हणून पाहता येते. या दरम्यान गांधी आणि आंबेडकर यांच्या मध्ये तीव्र मतभेद झाले. 1935 ला येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणासुद्धा या संदर्भाने समजते.

अस्पृश्यता, जातीअंतर्गत जातीभेद आणि देशाची सर्वांगीण प्रगती यावरील विवेचन जनता मध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. अस्पृश्यांचा प्रश्न हिंदूंच्या घरचा प्रश्न नाही, तो राष्ट्रीय प्रश्न आहे. एवढेच नव्हे तर तो आंतरराष्ट्रीय प्रश्न आहे. अशी भूमिका डॉ. आंबेडकर मांडतात.[9] पुढे ते म्हणतात अस्पृश्यांमध्ये अंतर्गत पातळयांवर असलेले जातीभेदाचे कारण जातीव्यवस्था हे आहे. म्हणून त्याचा दोष अस्पृश्यांवर येत नाही. असे असले तरी हा अंतर्गत जातीभेद नाहीसा करणे हे त्यांचे पहिले कर्तव्य आहे. असे प्रतिपादन ते करतात. अस्पृश्यता आणि जातीभेद या हिंदू समाजास ग्रासून टाकणाऱ्या कल्पनेस मूठमाती देऊन समाजातील प्रत्येक व्यक्तिस आपल्या बुद्धीचा विकास करण्याची संधी दिल्याशिवाय किंवा जातीभेदाच्या कल्पनेस मुळातच विरोध केल्याशिवाय हिंदू समाजाची सर्वांगीण सुधारणा होणार नाही असा इशाराही भारतवासीयांना त्यांनी दिला आहे.[10] डॉ. आंबेडकरांच्या मते चातुर्वर्ण्य व्यवस्था ही संघटनात्मक नसून ती विघटनात्मक आहे.रॅम्से मॅकडोनाल्डच्या जातीय निवाड्यातून अस्पृश्यांना मिळालेले स्वतंत्र मतदार संघ पुणे करारामुळे गमवावे लागले. त्या बदल्यात राखीव जागा मिळाल्या. त्या पश्चात 1935 च्या कायद्यानुसार भारतामध्ये प्रथमच अस्पृश्य वर्गास मतदान करण्याचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी 1937 साली 'स्वतंत्र मजुर पक्षाची' स्थापना केली. याद्वारे समस्त शोषितांचे प्रश्न हाताळण्यात आले. तरी परंतु 1942 रोजी पुन्हा अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना करावी लागली. भारतीय जातीय व्यवस्थेचा राजकारणावरती पडलेल्या विपरित परिणामांची व्यथा पण जनतामध्ये आढळते.1939 मध्ये दुसऱ्या महायुद्धास सुरूवात झाली. मित्र राष्ट्रांनी स्वातंत्र्य आणि लोकशाहीकरीता लढाई जरूरी आहे अशी भूमिका जाहीर केली. या प्रसंगी काँग्रेस आणि गांधी यांच्या धरसोडीच्या भूमिकेचा रोखठोक समाचार डॉ. आंबेडकरांनी 'हिंदी राजकारणाचा विचका' या लेखमालेत घेतला. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या ब्रिटिशांनी भारतातून जाणे अपरिहार्य आहे असेही स्पष्ट केले.[11]

1917 च्या रशियाच्या क्रांतीमुळे साम्यवादी विचारांचा अधिक गतीने फैलाव झाला. दुसऱ्या महायुद्धास कारणीभूत असणाऱ्या अनेक कारणांपैकी एक कारण साम्यवादी विचारांचा फैलाव हे होते. भारतातपण 1920 पासून रितसर साम्यवादी राजकीय संघटनांची स्थापना झाली. वंचितांचा संभ्रम होऊ नये तसेच भारताच्या अनुषंगाने साम्यवादाच्या मर्यादा विशद करणारे लिखाण जनता मध्ये आढळते. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर रशियन क्रांतीचा दिवस मानवी समाजाच्या विकासाचा इतिहासातील दुसरा टप्पा आहे. तरी ते बजावतात की, भारतीय साम्यवाद्यांनी रशिया सांगेल तो धर्म व रशिया सांगेल ते कर्म अशी अंधभक्ती बाळगता कामा नये.[12]

डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, भारताच्या संदर्भात मार्क्सचा विचार अपुरा पडतो. मार्क्स हा रोजी-रोटी बद्दल बोलतोय पण भारताच्या समस्येच्या मुळाशी ब्राम्हण्यप्रणित जातीवाद आहे. जोवर जातीवाद नष्ट होत नाही तोवर भारताची प्रगती नाही. ब्राम्हण्याचा नाश करणाऱ्या सामाजिक सुधारणेच्या भानगडीत न पडता भाकरीच्या व पोटापाण्याचा वाद हाती घेणाऱ्या तथाकथित ब्राम्हण व तत्सम जातीच्या तरूणांचा ते समाचार घेतात.[13]

स्वातंत्र्योत्तर भारतात देशाची पुन:रचना करण्याचे महत्त्वाचे धोरणात्मक आव्हान होते. यावर भाषावार प्रांत रचना हा तोडगा काढण्यात आला. हा भाषिक राज्य पुन: रचनेचा प्रश्न आला. तेंव्हा डॉ. आंबेडकरांनी छोटी-छोटी राज्ये स्थापन होणे महत्त्वाचे आहे अशी भूमिका मांडली. एका भाषिकांचे एक राज्य ही भूमिका त्यांना मान्य नव्हती. एका भाषिकांचे अनेक राज्ये अशी त्यांची भूमिका होती. मराठी भाषिकांची दोन राज्ये व्हावीत असे त्यांनी मत मांडले.[14]

छोट्या राज्यांमुळे वरिष्ठ जातींचे प्राबल्य कमी होईल व अल्पसंख्य जाती-समूहांना संरक्षण प्राप्त होईल अशी त्यांची धारणा होती.

**निष्कर्ष :**

प्रतिकूल परिस्थितीत अडाणी आणि दारिद्र्यात खितपत दिवस कंठणाऱ्या वंचितांच्या मनात हक्कासाठी चळवळ उभी करण्याची नवचेतना निर्माण करण्याचे काम तसे आव्हानात्मक होते. ते काम आपल्या पत्रकारितेतुन डॉ. आंबेडकरांनी केलेच सोबत संपूर्ण देशाच्या दृष्टीने सारासार विचार करून निरनिराळया समस्या आणि प्रश्नांवर दिशा-दर्शक मार्गदर्शनही केले. डॉ. आंबेडकरांचे विचार केवळ दलित उद्धार यापूरते मर्यादित नव्हते हे त्यांच्या पत्रकारितेचा अभ्यास केल्यास समजते. ते एक दिशादर्शक राष्ट्रनिर्माते ठरतात.

**संदर्भ :**

1. माणगाव परिषद 'सोशल इंजिनिअरींगचा पहिला प्रयोग', दै. लोकसत्ता लेख, दि. 15 मार्च, 2020.
2. कित्ता.
3. टाईम्स ऑफ इंडिया, 16 जानेवारी, 1919.
4. माणगाव परिषद 'सोशल इंजिनिअरींगचा पहिला प्रयोग', दै. लोकसत्ता लेख, दि. 15 मार्च, 2020.
5. पोळ प्रबोधन, लेख दि वायर, दि. 31 जानेवारी 2020.
6. कित्ता.
7. कित्ता.
8. बहिष्कृत भारत, दि. 3 जुन 1927.
9. जनता, दि. 22 फेब्रुवारी 1936.
10. जनता, दि. 11 जुलै 1936.
11. कांबळे अरूण, युगप्रवर्तक डॉ. आंबेडकर, प्रबुद्ध प्रकाशन, 2006, सोलापूर, p. 26.
12. जनता, दि. 9 नोव्हेंबर 1940.
13. जनता, दि. 15 नाव्हेंबर, 1929.
14. जनता, दि. 2 जुन 1956.

# महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान

**प्रा.अरविंद बन्सी इंगळे**
व्ही.जे.शिंदे महिला महाविद्यालय, उस्मानाबाद

**ए**कोणिसावे शतक हे आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये महत्वाचे मानले गेले कारण या शतकात भारतातील तत्कालिन समाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रबोधन घडून आले. परिणामी वेगवेगळे धर्माविषयक उदारमतवादी विचार साहित्याच्या माध्यमातून समाजातील तळागळापर्यंत पोहचविण्याचे कार्य आर्यसमाज, ब्राम्हो समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज इ. चळवळी बरोबरच मोर्चे, आंदोलने, साहित्याच्या माध्यमबतन झाले. तत्कालीन कालखंडात समाज व्यवस्था ही ब्राम्हणांच्या अधिपत्याखाली होती. म्हणून हा समाज चातुर्वर्ण्य व्यवस्थेमध्ये विभागला गेलेला होता. असे असले तरी याच परिस्थितीत महात्मा फुले यांचे लहानपण आणि शालेय जीवन इंग्रजी राजवटीत झाले. सामाजिक वातावरण, समानता, यांचा प्रभाव जोतिरावांवर झाला त्यामुळे शुद्रांची दयनियता, शेतकऱ्यांची दुरावस्था, समाजातील जातीयता, अंधश्रध्दा, दांभिकता, कर्मकांड धार्मिक शोषण, गुलामगिरी, या जोखडेतून समाज भरडून गेला होता. जाचक रुढी–परंपरा, सतीप्रथा, केशवपन हया परंपरा नष्ट करुन त्या हद्दपार केल्या पाहिजेत तसेच समाजात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आपल्या देशाचा खरा इतिहास समाजासमोर मांडून सर्वधर्म समभाव, समनता, बंधूभाव, राष्ट्रप्रेम, समाज, सुधारणा हे विचार त्यांच्या मनात रुजले आणि त्या प्रमाणेच कार्य केले. महत्मा फुले यांनी समाज–सुधारणेचे केलेले कार्य हे क्रांतिकारी, अव्दितीय असे आहे. म.फुलेनी आपले क्रांतिकारी, विचार साहित्यलेखनातून लोकांपर्यत पोहचविले जोतिबा फुलेंच्या साहित्य निर्मितीने मराठी साहित्यला त्या वैज्ञानिक दृष्टीकोन मिळाला. त्यामुळे मराठी साहित्य अधिक लौकिक झाले. त्याचा परिणाम म्हणजे वास्तववादी परंपरा प्रस्थापित झाली.

मराठी साहित्याने प्रस्थापित चौकट बाजूला सारुन साहित्याला लोकजिवनाच्या कक्षेत आणले. मराठीतील नाटयकला तांत्रिक दृष्टया वास्तवाशी जोडून त्यातील कल्पकता नष्ट करुन नाटयसाहित्य जिवनाभिमुख बनविले.

**महात्मा फुले यांच्या जिवना विषयी** :

समाज सुधारणेचे आदय क्रंतिकारक स्त्रियांचे उध्दारकर्ते त्याच बरोबर महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर या नावाने संबोधले जाणारे महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली 'कटगुण' येथे झाला. बहुजन समाजात जन्माला आल्याने सामजिक प्रश्नांची अधिक ज्वलंतपणे जाणीव त्यांना बालपणापासूनच होती. ज्योतिबा फुले यांचा १८४० मध्ये सावित्रीबाई यांच्याशी विवाह झाला. स्त्री शिक्षणाचे महत्व जाणणारे ज्योतिबा यांनी पत्नी सावित्री व मावस बहिण सगुणाबाई यांना शिक्षण देऊन प्रशिक्षित शिक्षिका केले. त्यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य सुरु झाले.

**महात्मा फुले यांचे कार्य :** भारतीय समाज सुधारकांच्या पिढीतील आदय क्रांतिकारक श्रेष्ठ समाजसेवक, गोरगरिबांचे, शेतकऱ्यांचे कामगारांचे कैवारी, दिनदलितांना तारणारे साहित्यिक महात्मा फुले यांचा नामोल्लोख केला जातो तो त्यांच्या पुढील कार्याविरुनच.

**अस्पृश्यांचा उध्दार :**

महाराष्ट्रामध्ये तत्कालिन सामाजिक परिस्थिती चातुर्वर्ण्यव्यवस्थे मध्ये विभागाली होती. समाजामध्ये अस्पृश्यता पसरली होती. तळागळातील लोकांना उच्चवर्णीयाच्या जिवनात कुठलेच स्थान नव्हते. त्यांचा उध्दार करण्याची १८५२ मध्ये वेताळ पेठेत दोन शाळा सुरु केल्या त्याच बरोबर दिन – दलितांना शिकण्यासाठी १८५३ मध्ये शिक्षण मंडळी नावाची संस्था स्थापन केली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या घराजवळील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला त्याच बरोबर गावातील विहीर, तलाव, मंदिरे यामध्ये प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच स्वत:च्या वडिलांच्या श्राध्दाचे जेवन न घालता आंधळया, पांगळया गरिबांना जेवन घातले म्हणून ते गोरगरीबांचे मायबाप झाले.

**स्त्रीयांचा उध्दार :**

आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक, गोरगरिबांच्या तळागळातील अस्पृश्यांच्या मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडी करणारे महत्मा फुले यांनी सावित्रीबाईंना शिकवून पहिली भारतीय महिला शिक्षिका घडविली. स्त्री शिक्षणचा वसा हाती घेऊन १९४८ ला मुलींसाठी पहिली शाळा काढली. प्रतिकूल परिस्थितीमध्ये ही शाळा चालू ठेवली. विधवा स्त्रीयांचा होणारी कुचंबना, विठबंना, दुर्दशा, तिचे होणारे शोषण, केशवपन ही क्रुरता थांबविण्यासाठी विधवाविवाहास पाठींबा दिला. १८६४ मध्ये स्वत: महात्मा फुलेंनी पुढे होऊन विधवांचा पुन:र्विवाह घडवून आणला. विधवा महिलांच्या मुलांसाठी १८६३ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

**शेतकऱ्यांसाठी कार्ये :**

महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग रुढी परंपरेत अज्ञात, अंधश्रध्देमध्ये बुडाला होता. धार्मिकतेच्या वलयाखाली दबला भरडून गेला होता. त्यातच त्यांची उपसमार गरिबी, दारिद्रयात कर्जामध्ये होरपळून गेला होता. याचे ज्योतिबांनी सुक्ष्म निरीक्षण करुन कष्टकरी समाजाच्या दु:खाशी समरस व्हायचे, सावकारी जोखडात शेतकरी वर्ग आडखून बसला होता. त्याचे होणारे शोषण अशा शोषितांच्या जिवनात अमूलाग्र बदल घडवून आणण्याकरिता शेतकऱ्यांची वास्तवबाू परखडपणे मांडणारे समाजचिंतक होते. समाज सुधारण्यासाठी लोकांना साक्षर करणे शिक्षण देणे, गरजचे होते. शिक्षणाशिवाय समाज सुधारणार नाही हे त्यांना माहिती होते. महात्मा फुलेंनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रथांत शिक्षणा अभावी समाजाची कशी अवस्था, दशा होते ते सांगतात.

विधेविना मती गेली ! मतीविना नीति गेली !!
नीतिविना गती गेली ! गती विना वित्त गेले !!
वित्तविना शुद्र खचले ! इतके अनर्थ एका अविद्येने केले !!

त्यांच्या मते शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकावे सरकारने सामन्यांच्या मुलांना मोफत शिक्षण व वस्तीगृहाची सोय करावी अशा मागण्या तत्कालीन प्रशासना समोर त्यांनी मांडल्या १८८२ मध्ये म. फुलेंनी हंटर आयोगा पुढे शेतकरी तसेच शैक्षणिक प्रश्नासंबंधी आपले प्रखर विचार मांडल्यामुळे त्यांच्या बौध्दीक पातळीची खोली पाश्चात्यांना झाली.

**महात्मा फुलेंचे साहित्यिक कार्य :—**

ज्योतिबा फुले यांचे वाचनवेड प्रचंड होते त्याच प्रमाणे त्यांचे लेखन तितकेच आवडीचे होते. त्यांचा लोकसंग्रह प्रचंड होता. म. फुले विद्यार्थी दशेत असताना बऱ्याच प्रमाणात इंग्रजी ग्रंथाचे वाचन करुन त्याचा खोलवर अभ्यास ही त्यांनी केला आहे. थॉमस पेन हे त्यांचे आवडते लेखक होते कारण त्यांनीही हालअपेष्ठा सोसून आपल्या लेखनातून जनजागृतीचे कार्य केले. त्यामुळेच पेन यांचा प्रभाव म. फुलेवर पडला होता. त्यातून त्यांनी भारतीय समाजाचे सुक्ष्म निरीक्षण करुन ग्रंथाचे, वेदाचे, स्मृती— पुराणांचे वाचन केल्याने यातून असा निष्कर्ष निघाला की, जातीभेद खोटा आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सामान्यांच्या हक्कासाठी सामाजिक क्रांतिची आवश्यकता आहे यासाठी लोकांनी शिक्षण घेणे गरजेचे आहे.

महात्मा फुलेंनी बहुजन समजाचा उध्दार करण्याचा वसा घेतला त्यांनी आपल्या लेखणीतून सामाजिक व मानवजाती सबंधी संकल्पना मांडून सामाजिक परिवर्तणाला दिशा दिली 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या ग्रंथामधून मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिध्द केला. रुढी,प्रथा,परंपरा इ.विरुध्द बंड पुकारले जोतिबांनी आपल्या साहित्यातून शिक्षण प्रसाराला प्रथम स्थान दिले आहे. त्यांनी आपल्या ग्रंथातून कर्मकांड, धार्मिकता आणि राज्यकर्ते यांचा शुद्राधितांना कसा विरोध करतात याची कारणमिमांसा प्रकर्षाने केलेली आहे.

**गुलामगिरी :—**

जोतिरावांनी 'गुलामगिरी' या ग्रंथातून समाजक्रांतीचे मूळ तत्व सांगितले आहे. त्याच बरोबर प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे जिवन जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या ग्रंथाचा मुख्य उद्देश हाच की, हजारो वर्षापासून शुद्र,गरिब,सामान्य जनता ही ब्राम्हाणांच्या वर्चस्वाखाली उपेक्षितांचे जिवन जगत अन्याय आत्याचाराला बळी पडला होता. अनेक विविध प्रकारच्या यातनातून दिवस काढत होता त्यांना या दास्यातून कसे मुक्त करता येईल याचे विवेचन या ग्रंथात केले आहे.

**शेतकऱ्याचा आसूड :—**

महात्मा फुले यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ १८८३ ला प्रकाशित झाला. मध्यमवर्गीय आणि सामान्य वर्गातील शेतकऱ्यांच्या दु:खाचे, हालाखीचे चित्र आपल्या ग्रंथातून चित्रीत केले आहे. उच्चवर्णीयाकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक याचे कारण आर्थिक स्वरुपाचे असल्याचे त्यांना प्रकर्षाने जाणवले आणि त्यातून मार्ग काढावयाचा असल्यास शेतकरी सामान्य, दिन दलितांना शिक्षण दिले पाहिजे प्रस्तुत ग्रंथात उच्चवर्णी यांकडून शेतकऱ्यांची, गरिब शुद्रदिची होणारी पिळवणूक अर्थशुन्यत्व असणारे जगणे, दारिद्रय इ. मुद्दयांचा सविस्तर परामर्श, 'शेतकऱ्यांच्या आसूड' मधून केलेला दिसून येतो.

**तृतीय रत्न :—**

तृतीय रत्न (इ.स.१८८५) या नाटकातून, धर्माच्या नावाखाली सामान्य, माणूस, माळी, मांग, महार, कुणबी यांचे शोषण कसे करतात याचे वर्णन 'तृतीय रत्न' या नाटयामधून केले आहे. कुणब्याचे कुटुंब, अज्ञान, कर्जबाजारीपण धर्माचेशोषण इत्यादीचे नाटकातून चित्र साकार केले आहे. याविषयी रायकरांचे मत विचारात घ्यावेसे वाटते ते म्हणतात, "आर्यभट नाना प्रकारच्या अंधश्रध्दा आणि भोळसट समजुती शुद्रावर लादतात व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची नाना प्रकारची पिळवणुक करतात. पांचांग, वृत्ते, तपानुष्ठाने ही भिक्षुकांच्या हातातील शस्त्रे आहेत व ती नष्ट केल्या शिवाय भिक्षुकशाही नामोहरम होणार नाही अशी महात्मा फुले यांना खात्री पटली होती" तसेच कर्मकांड धार्मिकता, मूर्तीपुजा यावरही हल्ला त्यांनी या नाटकातून केला आहे.

**सत्सार :—**

'सत्सार' या नियतकालिकातून तत्कालीन कालखंडात स्थापण झालेले प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज यांच्या भूमिके विषयी विवेचन केलेले आहे. तसेच वेगवेगळया जातीमधील स्त्री व पुरुषांच्या संबंधाने जन्मपावलेल्या संततीचे सामाजिक स्थान आणि आर्यभट्टाची धर्मकल्पना यांचे चित्रण 'सत्सार' या नियतकालिकाच्या पहिल्या अंकात केले आहे. तर दुसऱ्या अंकात ताराबाई शिंदे व पंडित रमाबाई यांना शिक्षणाचा आव आणण्याचा उहापोह एका वर्तमाणपत्रकर्त्यावर टिकास्त्र केले आहे. या दोन्ही महिलांच्या स्त्रीयांच्या सुधारणा कार्याची स्तुती केल्याचे दिसून येते.

**सार्वजनिक सत्यधर्म :—**

'तृतीयरत्न' या नाटकापासून सार्वजनिक सत्यधर्म, या ग्रंथापर्यंत फुलेंच्या लेखनातून सामाजिक प्रबोधनाची विविध अंगे प्रकटलेली दिसून येतात. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा ग्रंथ होता. यामध्ये फुलेंनी आपल्या सर्व तत्वांचा सारांश या ग्रंथात केला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन त्यांचे दत्तक पुत्र यशवंत यांने केले आहे. या ग्रंथामध्ये जवळपास आठ्ठावीस अशा मुख्य विषयांवर सखोल चिंतन केले आहे. या ग्रंथाविषयी एस.एम.भोसले म्हणतात, "महात्मा फुले यांच्या विश्वकुटूंबाचे सम्यक स्पष्टीकरण सांगणारा 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथ आधुनिक काळातील दुसरी फुलेस्मृती आहे. प्राचीन काळतल्या मनुस्मृतीला फुलेस्मृती काटशहा आहे. त्यावरील तो छत्तीसगुणी औषधी मात्रा आहे".

**पवाडा शिवाजी राजे भोसले यांचा :—**

शिवाजी महाराजांच्या प्रेरक प्रतिमा या पवाडयातुन मांडल्या आहेत. १८६९ साली शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित हा पवाडा लिहिला या पवाडयामध्ये शिवरायांचा उल्लेख त्यांनी कुळवाडीभूषन असा केला आहे.

**ब्राम्हणांचे कसब :–**

महात्मा फुले यांनी सामाजिक प्रबोधन आणि सुधारणेचा दृष्टीकोन या पदय ग्रंथातून १८६९ साली प्रकाशित झाला. महार,मांग,कुणब,माळी या वर्गावर धर्मांचे वलय पसरावून भटब्राम्हण अन्याय करतात. या जोखडातून त्यांची मुक्तता व्हावी तसेच त्यांना विधी शिकवावी हया दुहेरी हेतूने हा ग्रंथ लिहिला आहे. म. फुले यांचे लेखन विपूल प्रमाणात आहे त्यांची भाषा शैली वाखनण्याजोगी आहे. असे असले तरी तत्कालीन परंपरागत समाजाला म.फुलेचे विचार पचले नाहीत इंग्रजांनी केलेल्या सन्मानाला ब्राम्हणांनी नकार दर्शिवला त्यांना ब्राम्हणव्देष्ठे, ख्रिस्ताळलेले, इंग्रजधार्जिने असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. परंतू जोतिबांनी बहुजनांना गुलामगिरीचे पाश तोडून अज्ञान दूर सारुन मानवी हक्कासाठी हा मंत्र देणे सुरुच ठेवले.

**संदर्भ ग्रंथ :–**

1. फडके भालचंद्र, दलित साहित्य वेदना व विद्रोह, पुणे – २०००, प्र.क्र.२४
2. उनि फडके भालचंद्र क्र. १७०
3. डॉ. हांडिबाग भारत व डॉ. सरकटे सदाशिव – आधुनिक मराठी वाङ:मयाचा इतिहास
4. फडके भालचंद्र – दलित साहित्य वेदना व विद्रोह पुणे २०००
5. समाज सुधारकांचे मराठी साहित्याला योगदान संपा. जाने – २०१६

# डॉ बी आर अम्बेडकर का आर्थिक विचार और योगदान

**डॉ. अर्जुन मोहनराव मोरे**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर, तेह्सील अंबाजोगाई, जि. बीड, महाराष्ट्र राज्य, ४३१५१९.
ई-मेल:drmoream@rediffmail.com

**सार:**
यह शोधडॉ बाबासाहाब आंबेडकरजी के अर्थशास्त्र विषय पर उन्होने किया कार्य को उल्लेखित करता है।इस शोधपत्र का प्राथमिक लक्ष्य अर्थशास्त्र के क्षेत्र में डॉ अम्बेडकर की प्रतिबद्धता के बारे में सोचना है। यह पत्र उनके विचारों, विचारों, मूल्यांकन और प्रस्तावों से सहमत होने वाले संभावित परिवर्तनों को समकालीन समय सीमा में वित्तीय पहलुओं के क्षेत्र में व्यावहारिक सुधार लाने के लिए उपयोगी होगी। आर्थिक विकास, आधुनिक विकास आदि की दिशा में अम्बेडकरवाद पर आधारित संभावना चिंतन करने के लिए यह लेख उपयोगी होगा। डॉ बाबासाहाब आंबेडकर 1923 - 1956 के समय के दौरान देश के मौद्रिक मुद्दों और राष्ट्र के वित्तीय मुद्दों की देखरेख करने वाले एक विशेषज्ञ अर्थशास्त्री थे। आश्चर्यजनक रूप से डॉ अम्बेडकरजी ने समय से पहले वैश्वीकरण, उन्नति और निजीकरण जैसी मुक्त अर्थव्यवस्था की रणनीति की सिफारिश की थी। जैसा कि 1923 में हुआ था। उस समय से, भारत सरकार ने सितंबर 1991 में इस व्यवस्था को साकार किया है।वह इस बात से चिंतित थे कि रुपये को स्थिर रखा जाना चाहिए, इस तथ्य के बावजूद कि मुफ्त वित्तीय रणनीति को प्रभावी ढंग से प्रेषित किया जाना चाहिए। उन्होंने 'फ्रेमवर्क सिस्टम' की विशालता और आवश्यकता को रेखांकित किया, जो अभी भी सक्रिय रूप से काम कर रहा है। वह कार्य विभाजन के अग्रदूत हैं क्योंकि उन्होंने गतिशील ढांचे को परिभाषित किया और इस क्षेत्र के लिए कुशल व्यवस्था की, बाद में इसे अच्छी तरह से तैयार किया।

**परिचय:**

डॉ बाबासाहब अम्बेडकर अर्थशास्त्र के विषय में औपचारिक उच्च शिक्षा प्राप्त करने वाले शुरुआती भारतीयों में से एक थे। उन्होंने 1917 में कोलंबिया विश्वविद्यालय से अर्थशास्त्र में पीएचडी की पढ़ाई की और बाद में उन्हें 1921 में लंदन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स द्वारा अर्थशास्त्र में डीएससी से सम्मानित किया गया। उन्होंने उस समय भारत में प्रचलित सामाजिक विकृतियों का अध्ययन करने के लिए एक अर्थशास्त्री के रूप में अपने प्रशिक्षण का उपयोग किया और अपने भारत की आर्थिक समस्याओं की गहरी समझ उनके उत्तेजक भाषणों और बयानों में झलकती थी। उनका विश्लेषण तीक्ष्ण था और बड़े पैमाने पर लोगों के कल्याण पर ध्यान देने के साथ व्यावहारिक नीति समाधान के साथ प्रयोग किया जाता था। यह लेख मौद्रिक अर्थशास्त्र, सार्वजनिक वित्त, कृषि अर्थशास्त्र, जाति व्यवस्था के आर्थिक आयामों और अस्पृश्यता, और भारत के समग्र आर्थिक विकास के लिए उनकी रणनीतियों के क्षेत्र में डॉ अंबेडकरजी के योगदान पर प्रकाश डालता है।

**डॉ बाबासाहेब अम्बेडकर और उनका आर्थिक कार्य:**

डॉबाबासाहेब अम्बेडकर ने अर्थशास्त्र में कई डिग्रियाँ प्राप्त कीं। उन्होंने अर्थशास्त्र के प्रोफेसर के रूप में पढ़ाया। वे विदेश में अर्थशास्त्र में डॉक्टरेट प्राप्त करने वाले पहले भारतीय थे।एक अर्थशास्त्री के रूप में, उन्होंने तर्क दिया कि औद्योगीकरण और कृषि विकास भारतीय अर्थव्यवस्था को बढ़ावा दे सकते हैं। उन्होंने भारत में प्राथमिक उद्योग के रूप में कृषि में निवेश पर जोर दिया।डॉबाबासाहेब अम्बेडकर की दृष्टि ने सरकार को अपने खाद्य सुरक्षा उद्देश्यों को प्राप्त करने में मदद की।उन्होंने राष्ट्रीय आर्थिक और सामाजिक विकास का समर्थन किया। बुनियादी सुविधाओं के रूप में शिक्षा, सार्वजनिक स्वच्छता, सामुदायिक स्वास्थ्य, आवासीय सुविधाओं पर जोर दिया। उन्होंने ब्रिटिश शासन के कारण विकास

के नुकसान की गणना की। उन्होंने मुद्रा प्रबंधन और कर ढांचे से लेकर कृषि से लेकर घरेलू और विदेशी विवादों तक कई मुद्दों पर टिप्पणी की है। 1917 - उन्होंने स्टॉक एंड शेयर डिवाइडर नामक एक कंपनी शुरू की, जो व्यापारियों और व्यापारियों को सलाह देती है। हालांकि, जब यह समझा गया कि कंपनी महार व्यक्ति की है, तो लोगों ने सलाह लेना बंद कर दिया और अम्बेडकरजी को अपनी कंपनी बंद करनी पड़ी।

**डॉ बाबासाहाब आंबेडकरजी की तीन किताबें**

उन्होंने अर्थशास्त्र पर 3 किताबें लिखीं।इन किताबों में भारत की आर्थिक व्यवस्था के बारे में उनकी क्रांतिकारी सोच शामिल है। -

1)"भारत में ईस्ट इंडिया कंपनी का प्रशासन और वित्त"

2) "ब्रिटिश भारत में प्रांतीय आर्थिक विकास"

3) "रुपए की समस्या: इसकी उत्पत्ति और इसका समाधान"

कानून मंत्री के रूप में, डॉ बाबासाहेबअम्बेडकर ने अपने शोध प्रबंध, ब्रिटिश भारत में प्रांतीय वित्त का विकास के आधार पर भारत के वित्त आयोग की स्थापना की। इसे बाद में वित्त के ऊर्ध्वाधर और क्षैतिज संतुलन की समस्या के समाधान के लिए संविधान के अनुच्छेद 280 में शामिल किया गया था।

**स्वर्ण मुद्रा विनिमय और भारतीय रिजर्व बैंक की स्थापना पर विचार –**

रुपये की समस्या -इस पुस्तक में, डॉबाबासाहेब अम्बेडकर रुपये के अवमूल्यन पर अपने विचार व्यक्त करते हैं। इसके बजाय, उन्होंनेस्वर्ण विनिमय मानक (गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड)शुरू करने की सिफारिश की। उन्होंने 1925 में स्थापित हिल्टन यंग कमीशन के समक्ष भी गवाही दी। फिर 1935 में भारतीय रिजर्व बैंक की स्थापना हुई। भारत की मूल आर्थिक सोच भी डॉ बाबासाहेब अम्बेडकरजी के आर्थिक विचार पर आधारित थी।उनका लंदन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स में रुपये की समस्याइस प्रबंधपर प्रा. जॉन कीन्स सेविवाद हुआ उनकी इसे असहमति थी। प्रा. कीन्स का मत था कि मुद्रा के मूल्य के लिए स्वर्ण विनिमय प्रणाली को अपनाया जाना चाहिए। गोल्ड एक्सचेंज सिस्टम में, किसी देश की मुद्रा का मूल्य सोने के मूल्य से जुड़ा होता है। इस पद्धति को अपनाने वाले देश अपनी कागजी मुद्रा को एक निश्चित दर पर सोने में परिवर्तित करते हैं। साथ ही ऐसे देशों में सोने की कीमत सरकार तय करती है। हालांकि, स्वर्ण मानक प्रणाली में, वास्तविक मुद्रा में कुछ मात्रा में सोने का उपयोग किया जाता है।

**मुद्रा संकट:** ब्रिटिश सरकार ने मुद्रा संकट के समाधान के लिए रॉयल कमीशन की स्थापना की। इस आयोग के समक्ष बाबासाहब द्वारा दी गई गवाही में हमें केवल दो बातों पर विचार करना है। इससे दो सवाल उठते हैं। एक तो क्या आपको अपनी विनिमय दर तय करनी चाहिए? और यदि हां, तो अन्यों की तुलना में इसका अनुपात क्या होना चाहिए? इस बहस में डॉ बाबासाहब आंबेडकरजीने विनिमय दर तय करने के बजाय मुद्रास्फीति को नियंत्रित करने के महत्व पर जोर दिया।

**घरेलू और विदेशी वस्तुओं पर विचार:**

डॉ बाबासाहेब अम्बेडकरजीके28 फरवरी 1920 को मूकनायक इस पत्रिका में व्यक्त विचार:

स्वदेशी अर्थशास्त्री, जो इस बात पर अड़े हैं कि यह गरीब देश घरेलू वस्तुओं का उत्पादन करके समृद्ध होगा, उन्हें यह ध्यान रखना चाहिए कि विदेशी वस्तुओं के आयात का कारण यह है कि यह कम कीमत पर उपलब्ध है। इसी तरह, देश में माल का उत्पादन नहीं होता है। ऐसा इसलिए है क्योंकि यह अधिक महंगा है, इसलिए यह विदेशी वस्तुओं के साथ प्रतिस्पर्धा नहीं करता है। इसे बनाए रखने के लिए विदेशी सामान बंद करें, इस मंत्र का जाप किया जा रहा है। लेकिन किसने सोचा होगा कि अगर विदेशी सामान बंद कर दिया गया तो लोग महंगे घरेलू सामान खरीदने को मजबूर हो जाएंगे? यह कहने के बजाय कि इससे देश को फायदा होगा, देश के पूंजीपतियों को फायदा होगा। ऐसा इसलिए है क्योंकि गरीबों को अनियंत्रित व्यापार में मिलने वाले सामान के लिए अधिक कीमत चुकानी पड़ेगी। इसमें उनका यह संभावना नहीं है कि वे इस तथ्य से संतुष्ट होंगे कि वे इन प्यारे शब्दों 'स्वदेशी'से भर जाएंगे। समृद्धि का यह स्वदेशी तरीका उन्हें घेर लेगा।

**कर निर्धारण और सरकारों के बीच कर राजस्व का वितरण:**

डॉ बाबासाहेबअम्बेडकरजी ने ब्रिटिश सरकार और प्रांतीय सरकारों के बीच कर निर्धारण और कर राजस्व के वितरण के विषय पर कोलंबिया विश्वविद्यालय में पीएचडी शोध प्रबंध प्रस्तुत किया था। उस शोध प्रबंध में, उन्होंने कर राजस्व के वितरण में सुधार करने के बारे में विचार दिए थे। उनके शोध के आधार पर ही भारतीय कर निर्धारण एवं केन्द्र एवं राज्य में कर राजस्व के वितरण का सूत्र तैयार किया गया है।13वें वित्त आयोग ने अम्बेडकरजी के कर राजस्व वितरण के सिद्धांत पर आधारित नीतियां बनाई थीं।

**जाति व्यवस्था और अस्पृश्यता के आर्थिक आयाम:**

डॉबाबासाहब अम्बेडकरजी के समय में, श्रम विभाजन और व्यावसायिक सिद्धांत के सिद्धांत का उपयोग करते हुए 'वर्ण' प्रणाली का औचित्य अपने चरम पर था। डॉ बाबासाहबअम्बेडकरजी ने अपनी महान कृति, एनीहिलेशन ऑफ कास्ट में, तर्क के माध्यम से ऐसे सिद्धांतों का उपहास किया और बताया कि ऐसी प्रणालियाँ 'श्रमिकों के विभाजन' पर अधिक आधारित थीं। उन्होंने इंगित किया कि जाति व्यवस्था विभिन्न लोगों के व्यवसायों को सौंपने के लिए जिम्मेदार है और यह पूंजी और श्रम की गतिशीलता में बाधा डालती है जो बदले में देश के आर्थिक विकास को बाधित करती है। जबकि आर्थिक विकास परिवर्तन का परिणाम है, जाति व्यवस्था उसी सामाजिक-आर्थिक प्रणाली को कायम रखती है जिससे अर्थव्यवस्था की उत्पादकता पर नकारात्मक प्रभाव पड़ता है। अम्बेडकर अस्पृश्यता के भी घोर आलोचक थे और इसे गुलामी से भी बदतर आर्थिक व्यवस्था मानते थे। व्हाट कांग्रेस एंड गांधी हैव डन टू द अनटचेबल्स (1945) में वे कहते हैं, 'अस्पृश्यता न केवल निरंतर आर्थिक शोषण की एक प्रणाली है, बल्कि अनियंत्रित आर्थिक शोषण की एक प्रणाली भी है'।

**भारत के समग्र आर्थिक विकास के लिए रणनीतियाँ:** डॉ बाबासाहब अम्बेडकर जनता के शोषण पर कार्ल मार्क्स के विचारों से सहमत थे और मानते थे कि भारत के आर्थिक विकास का मार्ग गरीबी और असमानताओं के उन्मूलन और अमीरों द्वारा शोषण का अंत होना चाहिए। हालाँकि उन्होंने एक आर्थिक प्रणाली के रूप में साम्यवाद का समर्थन नहीं किया। अपने निबंध, बुद्ध और कार्ल मार्क्स में, वे बताते हैं कि आर्थिक मकसद मार्क्स द्वारा तैयार की गई सभी मानवीय गतिविधियों का एकमात्र कारण नहीं हो सकता है और इसलिए परिणामी शोषण धार्मिक या सामाजिक भी हो सकता है, खासकर भारत में। डॉबाबासाहबअम्बेडकर लोकतंत्र और मानवाधिकारों के प्रबल समर्थक थे और इसलिए उन्होंने साम्यवाद में तानाशाही और अराजकता की प्रवृत्ति को स्वीकार नहीं किया। उन्होंने संविधान के सिद्धांतों के भीतर सुधार की वकालत की और इसलिए मार्क्स के एक राज्यविहीन समाज के विचार को खारिज कर दिया। अम्बेडकर ने मार्क्स के अधिनायकवादी दृष्टिकोण के विपरीत देश के आर्थिक विकास को चलाने में राज्य की भूमिका का समर्थन किया।

**सारांश:** डॉ बाबासाहबअम्बेडकर उन कुछ आर्थिक सिद्धांतकारों में से एक थे जिनका आर्थिक नीतियों और योजनाओं के प्रति दृष्टिकोण व्यावहारिक और जनहित था। इस प्रकार, चाहे डॉबाबासाहब अम्बेडकर वित्तीय विषयों या मौद्रिक सिद्धांतों पर लिख रहे थे, उनका मूल उद्देश्य उन निष्कर्षों तक पहुंचना था जो व्यावहारिक और सार्वजनिक हित दोनों थे।अर्थशास्त्र के ऐसे विविध क्षेत्रों में उनका योगदान उनकी महानता और बुद्धि का प्रमाण है।यह वास्तव में समग्र रूप से आर्थिक नीति निर्माण के क्षेत्र के लिए एक नुकसान है कि उनके विचारों और दृष्टि को उचित मान्यता नहीं मिली। अर्थशास्त्र के ऐसे विविध क्षेत्रों में उनका योगदान उनकी महानता और बुद्धि का प्रमाण है।

**संदर्भ सूची:**

1. Taxation Theory & Practice For B.B.A Semester IV of Dr. Bhim Rao Ambedkar University Agra - by Dr. H.C. Mehrotra (Author), Dr. S.P. Goyal (Author)
2. “Neglected Economic Thought of Babasaheb Ambedkar.” Economic and Political Weekly 26, no. 15 (1991)– By Jadhav, Narendra.: 980-982.
3. DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol. 6 Compiled by Vasant Moon (487, 671)
4. Administration And Finance of The East India Company by Dr.B.R.Ambedkar.
5. Dr. AMBEDKAR’S THOUGHTS ON INDIAN ECONOMY by C. Muniyandi.

# स्त्री मुक्ती आंदोलनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**प्रा. डॉ. अंकुश मारूती सोहनी**
शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय पाली

**प्रस्तावना**

भारतात पुरुषप्रधान संस्कृती अस्तित्वात आहे. समाजातील प्रत्येक कुटुंबात स्त्रियांचे महत्व अनन्यसाधारण असताना, समाजात स्त्रियांना पदोपदी दुय्यम प्रतीचे स्थान दिले जात असल्याचे अनेक उल्लेख आढळून आले आहेत. अशा परिस्थितीमध्ये अमूलाग्र असे परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्राच्या सामाजिक विकासाच्या जडणघडणीमध्ये ज्या समाज सुधारकांची नावे घेतली जातात त्यात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, ताराराणी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, त्याचप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या जीवनात अमूलाग्र असा बदल घडवून आणलेला आहे.

### संशोधनाचा उद्देश

१. देशाच्या प्रगतीमधील स्त्रियांचे महत्त्व लक्षात घेणे.
२. स्त्रियांच्या अनिष्ट प्रथा, निर्बंधाने विकासातील खीळ
३. प्राचीन, मध्ययुग व आधुनिक काळातील स्त्रियांची परिस्थितीचा अभ्यास करणे

### गृहीतके

१. वैदिक काळातील स्त्रियांना मान होतो.
२. मध्ययुगात स्त्रियांच्यावर निर्बंध लादले.
३. समाजातील स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळू लागल्याने अनेक समाज सुधारकांच्या प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्त्वाचे कार्य केले

### संशोधन पद्धत

मानवी समाजाच्या दृष्टीने स्त्री हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. स्त्रियांचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास होय. अशा स्त्रियांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे प्रयत्न केले ते स्पष्ट करण्यासाठी ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनाचा वापर केलेला आहे.

### वैदिक काळातील स्त्री जीवन

आपल्या भारत देशाला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. अशा प्राचीन भारताचा इतिहास लक्षात घेताना आपल्या असे निदर्शनास येते की, तत्कालीन समाजात स्त्रियांना मोठी प्रतिष्ठा होती. फक्त प्रतिष्ठाच नव्हे तर पुरुषांच्या बरोबरीचे किंबहुना पुरुषांच्या पेक्षा वरचे स्थान होते.प्राचीन काळात स्त्री-पुरुष कुटुंब करून एकत्र वास्तव्य करत असल्याचे आढळून आलेले आहे. हे खरे असले तरी त्यांनी श्रमविभाजनाच्या तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे. स्त्रियांनी घर आणि घरांतर्गत सर्व कार्यभार सांभाळणे, तर पुरुष वर्गाने कुटुंबाच्या उपजिवीकेसाठी लागणाऱ्या जीवनावश्यक बाबी घराबाहेर जाऊन मिळवणे आणि कुटुंबाचा सांभाळ करणे हे खरे असले तरी, स्त्री-पुरुष यांच्यात कसला ही भेद नव्हता.स्त्रियांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सत्ताधीश त्याचप्रमाणे भारतीय समाजसुधारक यांनी तसे प्रयत्न केल्याचे, अनेक उल्लेख आढळले आहेत. हे खरे असले तरी प्राचीन काळात असे प्रयत्न झाल्याचे काही उल्लेख आढळलेले आहेत.गौतम बुद्धाने स्त्रीयांना भिक्षुणी होण्याचा अध्यात्मिक, आत्मिक, स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार दिलेला होता.

### मध्ययुगीन स्त्रीजीवन

वैदिक काळातील स्त्रियांना मानाचे स्थान होते. ही स्त्रियांची परिस्थिती मध्ययुगात राहिलेली नव्हती. इ.स. १००० पासून भारतावर मुस्लीम आक्रमणे फार मोठ्या प्रमाणात होऊ लागली व या काळात आक्रमणाच्या भयाने स्त्रियांवर अनेक निर्बंध लादली गेली. हे खरे असले तरी महानुभाव पंथाचा स्त्रियांच्या संदर्भात दृष्टिकोन हा अत्यंत

सहानुभूतीचा होता. हिंदू धर्माने नाकारलेला मोक्षप्राप्तीचा मार्ग त्यांनी स्त्रियांना खुला केला होता. तसेच भक्तीपंथामध्येही स्त्रियांना सन्मानपूर्वक वागविले जात होते. या शिवाय महत्त्वाचे म्हणजे संत जनाबाई, संत मुक्ताबाई, या सारख्या संतानी स्त्रियांना सतत समतेची वागणूक दिल्याचे काही उल्लेख आढळलेले आहेत.

**शिवकालीन स्त्री जीवन**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात रयतेला जेवढे महत्त्वाचे स्थान होते. त्यापेक्षा जास्त स्त्रियांना महत्त्वाचे स्थान होते. या काळात अशी एक म्हण प्रचलित होती, की "पर स्त्री माते समान" यावरून असे लक्षात येते की, स्त्रीयांचा प्रचंड सन्मान केला जात होता. त्याचप्रमाणे राज घराण्यातील आणि सरदार घराण्यातील स्त्रियांना लेखन, वाचन व शिक्षण घेण्याच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या होत्या.

**पेशवे काळातील स्त्री जीवन :**

पेशवेकाळात रूढी आणि परंपरावर विशेष भर दिला जात होता. धर्माच्या नावाखाली चालत असलेल्या स्त्रियांच्या संदर्भातील कर्मठपणा, सतीप्रथा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, विधवा स्त्रियांची दयनीय स्थिती, कुटुंबांतर्गत होणारी घुसमट, शारीरिक छळ, बलात्कार अशा सर्व अन्यायकारक बाबीमुळे स्त्रिया गांजलेल्या होत्या व हे सर्व अन्याय तसेच अत्याचार स्त्रिया जन्माचे भोग म्हणून निपुटपणे सहन करत होत्या. शिक्षण नाही, इस्टेटीत हक्क नाही, स्वतःचे उत्पन्नाचे काही ही साधन नाही. अशा प्रकारची दयनीय व लाचार अवस्था असल्याचे दिसून येते.

**ब्रिटिश काळातील स्त्री जीवन**

इंग्रजाच्या आगमनाने भारतीय समाजात मोठी जनजागृती घडून येण्यास प्रारंभ झालेला होता.

भारतात स्त्री शिक्षणाचा पाया इंग्रजी मिशनऱ्यांनी रचला. इ.स. १८२८ रोजी अमेरिकन मिशनऱ्यांनी मुंबईमध्ये मुलींसाठी शाळा उघडण्यात आल्या आणि स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली झाली. त्यामुळे अनेक मुलींनी शिक्षण घेऊन समाजात स्त्रियांच्या संदर्भात फार मोठी जनजागृतीला प्रारंभ झालेला होता.विशेषतः या काळात अनेक भारतीयांनी स्त्री शिक्षणाचा हिरिरीने पुरस्कार केलेला होता.तसेच समाजात ज्या काही अज्ञान, अंधश्रद्धा आणि विविध प्रकारचे पारंपरिक कल्पना होत्या. त्या मोडून काढण्यास प्रारंभ झाला. या दृष्टिकोनातून राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर सारख्या समाजसुधारकांनी पुढाकार घेतलेला होता. भारतीय समाजात स्त्री शिक्षणाबद्दलची वाढती आस्था पाहून लॉर्ड डलहौसीने इ.स. १८५० मध्ये ब्रिटिश सरकार भारतात मुलींसाठी शाळा उघडण्याच्या कामात प्रोत्साहन देईल असे जाहीर केले.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री जीवन**

इ.स. १८५१ च्या दशकात महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्व स्तरातील मुलींना मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी पुणे स्थित पहिली मुलींची शाळा सुरू केलेली होती. अशी शाळा सुरू करणारे महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले भारतीय होते. शिक्षणाची सुरुवात तळागाळातून व्हावयास पाहिजे, असे त्यांनी ठामपणे आपले मत मांडले. या त्यांच्या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी मोलाची साथ दिलेली होती. महात्मा फुले यांच्यानंतर स्त्री शिक्षणविषयक कार्य पंडिता रमाबाई यांनी केले. त्यांनी मुंबई मध्ये शारदा सदन स्थापन केले व महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणविषयक जनजागृती निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केलेले होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीचे कार्य:**

गौतम बुद्ध, कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरुस्थानी मानलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या वादळाने क्रांतीकारी विचार प्रवाहाच्या इतिहासाचा त्या इतिहास प्रवाहाचा, त्या विचारांचा पुढचा टप्पा गाढल्याचे स्पष्ट करत स्त्रियांच्या स्वातंत्र्याला खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष कृतीस घटनेचा आधार घेत नवा आयाम देण्याचं महत्त्वाचे काम केलेले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खऱ्या अर्थाने इथल्या पिचलेल्या, दबलेल्या, शोषीत स्त्रियांना आवाज देण्याच काम केल्याचे कोणी ही नाकारू शकणार नाही.

**स्त्री विकासाच्या दृष्टीने त्यांचे हिंदू कोड बिल :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री स्वतंत्र्यविषयक विचार मूलभूत परिवर्तनवादी होते. स्वातंत्र्य, समता आणि न्याय अशा महत्त्वपूर्ण मूल्यांसाठी त्यांनी १९५१ च्या दशकात संघर्ष केला. त्यांचा संघर्ष हिंदू कोड बिलाच्या कायदेशीर स्वरूपात प्राप्त करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होता.

आज अनेक स्त्रिया विविध क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी (माजी पंतप्रधान) राष्ट्रपती पद भूषविलेल्या प्रतिभाताई पाटील (माजी राष्ट्रपती) याशिवाय डॉक्टर, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, वकील, इंजिनिअर अशा विविध क्षेत्रांमध्ये महिला पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून अत्यंत प्रामाणिकपणे आपले योगदान देत आहेत. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते. हे खरे असले तरी भारतीय समाजात स्त्रियांना सतत दुय्यम स्वरूपाचे स्थान दिलेले दिसून येते. परंतु त्यांना सर्व प्रकारचे अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळवून दिलेले आहेत.
प्रामुख्याने असे ते अधिकार आहेत.

1. वडिलोपार्जित संपत्ती मिळवण्याचा अधिकार
2. आंतरजातीय विवाहस परवानगीचा अधिकार
3. स्वतःचा वारसा निश्चित करण्याचा अधिकार
4. मुलीला वारसा घेण्याचा अधिकार
5. दत्तक घेण्याचा अधिकार
6. घटस्फोटाचा अधिकार
7. पोटगी मागण्याचा अधिकार
8. स्त्रियांच्या स्वतःच्या मिळकतीवरील अधिकार

अशा लहान लहान पण अति महत्त्वपूर्ण बाबी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यशस्वीपणे हाताळल्या आहेत.

परंतु सनातनी विचारांच्या लोकांनी हिंदू कोड बिलाला विरोध केल्यामुळे त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलास अपयश आले असले तरी पुढील काही वर्षांमध्ये त्यातील काही बाबींचा स्वीकार सरकारने केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक बाबी सरकारला पटलेल्या असल्यामुळे स्त्रियांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना समतेचा अधिकार मिळाला पाहिजे. तसेच स्त्रियांना शिक्षण, नोकरी, सामाजिक तसेच राजकारणात सुद्धा योग्य ती संधी मिळाली पाहिजे म्हणून सरकार प्रयत्न करीत आहे. त्यामुळे स्त्रियांनी विविध क्षेत्रात भरारी घेऊन आपले महत्त्व समाजापुढे सिद्ध केलेले आहे.

**निष्कर्ष**

समाज व्यवस्थेचा अर्धा घटक मानल्या गेलेल्या स्त्री वर्गावर सतत दुर्लक्ष केलेले होते. दुर्बल कमजोर समजून तिला सतत प्रवाहाच्या बाहेर फेकण्याचे काम जाणून-बुजून केल्याचे सर्वच समतेचा विचार करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या लक्षात आलेले आहे. म्हणून स्त्रियांच्या उन्नतीसाठी विविध समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले आहेत. त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे आणि डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य समता व न्याय मिळण्यासाठी सतत संघर्ष केलेला होता. खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५१ मध्ये संसदेत हिंदू कोड बिल मांडले पण त्याला सनातनच्या विरोधामुळे ते बिल पास झाले नाही. हे खरे असले तरी समतेचा पुरस्कार करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व स्त्री वर्गात एक प्रकारचे चैतन्य निर्माण केलेले होते. म्हणून स्त्रीयांनी विविध क्षेत्रात आपले स्थान सिद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाने स्त्रियांचा प्रचंड विकास झालेला आहे. स्त्रियांचा विकास म्हणजे देशाचा विकास होय.

**संदर्भसूची**

१. जोशी बी. आर. (संपा), तटणीकर सुलभा, जोन्सन बोर्जेस, राऊत गणेश, डायमंड सामाजिक ज्ञानकोश (खंड – ३), डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७
२. देसाई व लिमये, महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास, फडके बुक्ससेल्स कोल्हापूर, १९९२
३. वाघ संदेश व इतर आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास अक्षरलेणं प्रकाशन सोलापूर २०१०
४. जोशी बी आर (संपा), व इतर डायमंड सामाजिक ज्ञानकोश (खंड-१) डायमंड पब्लिकेशन पुणे
५. पोळ अरविंद, डॉ. आंबेडकर लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, सुगावा प्रकाशन, पुणे १९७६
६. जोशी आर एल व इतर (संपा) शोधांकन, प्रथमेश प्रकाशन, अहमदनगर, २०१३
७. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र (खंड-१) १९०१-१९९४, के सागर पब्लिकेशन पुणे २०१३

८. गर्गे स.मा. (संपा) मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, १९९१
९. डांगे सिंधू, बौद्ध धर्म आणि तत्वज्ञान, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २००८
१०. सूर्य अनिल, भारतीय स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे.
११. कुलकर्णी अ. रा., महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड प्रकाशन, पुणे २००८
१२. चाळके शोभा (संपा), निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर, २०२१
१३. वडगबाकर श्रुती श्रीनिवास, मराठातील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास (इ.स.१९१० -१९८५) श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००६
१४. जोशी लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोश (खंड-१), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहू महाराजांचे समाजपरिवर्तनातील शैक्षणिक कार्य

**प्रा.डॉ.खलील न. सय्यद**
सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभागप्रमुख, पंडित दीनदयाल महाविद्यालय, देवणी जि.लातूर
sayyedkhalil42@gmail.com

**प्रस्तावना**
एकोणिसाव्या शतकातील बहुजन समाज अज्ञान व दारिद्र्याच्या अंधारात होता. हे सर्व शिक्षणाच्या अभावामुळे घडले होते. बहुजन समाजात फक्त बोटावर मोजण्याइतके मॅट्रिक पास होते. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या. त्या काळात शिक्षण शिकायचे तर फक्त उच्च वर्गातील धनिक, जमीनदार यांनाच हक्क होता. गरीब, दलित व स्त्री यांनी शिकणे हा गुन्हा आहे, असे त्यावेळी मानले जात होते. शिक्षण हे आपले काम नव्हते ते ब्राह्मण, श्रीमंत, सावकार यांचे कार्य आहे अशी सामान्य माणसांची समजूत झाली होती. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. त्यांची अस्पृश्य समाजासाठी असलेली तळमळ, शेतकऱ्यांच्या उन्नतीचा ध्यास, शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे समाजाच्या जडणघडणीसाठी अत्यंत मोलाचे आहेत. म्हणून प्रजाहितदक्ष आदर्श राजा, बहुजन समाजाचे नेते म्हणून त्यांची लोकप्रियता संपूर्ण महाराष्ट्रभर आहे.

## छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :

### सक्तीचे मोफत शिक्षण :

राजर्षी शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार होणार नाही, हे राजर्षींनी ओळखले होते. म्हणून कोल्हापूर संस्थानात त्यांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. एवढेच नाही तर ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळांची निम्रिती केली. एवढ्यावरच न थांबता राजर्षींनी जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना १ रूपये दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी आपल्या राजयात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

### प्राथमिक शिक्षणाची सुरूवात :

कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याविषयीचा विचार इ.स.१९८२—८३ च्या सुमारास सुरू होता. जोपर्यंत बहुजन समाज साक्षर होणार नाही तोपर्यंत लोकशाहीला डोळसपण येणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणूनच निरक्षर लोक आपल्यापर्यंत नाही तर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. सर्वांच्या विकासासाठी शिक्षण यावर शाहू महाराजांचा भर दिसून येतो. त्यांनी खेडेगाव घटक मानून प्राथमिक शिक्षण प्रसारास सुरूवात केली. २४ जुलै १९१७ साली एक हुकूम काढून प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. या हुकुमाप्रमाणे १५ ऑगस्ट १९१७ सासली ग्रामीण भागाची पाहणी करून अहवाल देण्याचा आदेश काढला होता.

### वसतिगृहाची सुरूवात :

शाहू महाराजांनी १८९६ मध्ये कोल्हापुरात सर्व जाती—जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह सुरू केले आणि ते चालवण्यासाठी एक ब्राह्मण अधिकाऱ्याची नियुक्ती केली. परंतु या वसतिगृहात १० वर्षांत केवळ ब्राह्मणच शिकले हा अनुभव लक्षात घेऊन राजर्षी शाहूंनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केले. तसेच १९०१ मध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस अशा नावाचे वसतिगृह सुरू केले. म्हणून राजर्षी शाहू महाराजांना भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्य जनक म्हणून ओळखले जाते.

### शाळांची स्थापना :

सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहूंनी शाळांची स्थापना केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्य शिकवणाऱ्या शाळा, सैनिक शाळा, संस्कृत शाळा, पुरोहित शाळेत वैदिक परंपरेचा विचार, सैनिक शाळेत मराठा सैनिक चांगला सुशिक्षित व्हावा, संस्कृत शाळेत बहुजन समाजातील मुलांनी संस्कृतचे शिक्षण घ्यावे, असा शाहू महाराजांचा दृष्टिकोन होता.

### माध्यमिक व उच्च शिक्षण :

कोल्हापूर संस्थानात १८६७ मध्ये पहिली इंग्रजी पूर्व माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आली होती. ती 'कोल्हापूर हायस्कूल' या नावाने ओळखली जात असे. पुढे ती राजाराम हायस्कूल या नावाने ओळखली

जाऊ लागली. या शाळेत मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. परंतु पैशाच्या अडचणीमुळे तेथे विद्यार्थी संख्या रोडावली हे जाणून शाहूंनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत केले होते.

उच्च शिक्षणाचा रीतसर प्रारंभ राजाराज महाविद्यालयाच्या स्थापनेपासून झाला. तसेच संस्कृत विषय शिकण्यासाठी सुंस्कृत महाविद्यालय सुरू करण्यात आले होते. महाराजांनी बहुजन मुलांसाठी शेतीविषयक अभ्यासक्रमाची सुरूवात केली होती. त्यांच्या प्रयत्नवादी धोरणामुळेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.

**शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना :**

दलित बहुजन अशा सर्वसामान्य लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्याचबरोबर तलाठी, शेतकरी, तांत्रिक शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांना शिष्यवृत्ती योजना सुरू केली. बहुजन समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देवून त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे, त्यांच्यात शिक्षणाासंबंधी आवड उत्पन्न करण्याचे धोरणही शाहू महाराजांनी आखले. सन १९९१ मध्ये एक जाहीरनामा काढून १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा केली. म्हणून केंब्रीज विद्यापीठाने महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन करून त्यांच्या कामगिरी प्रित्यर्थ त्यांना एल.एल.डी. ही पदवी दिली.

**राखीव जागांची तरतूद :**

मागाासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे, हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून या निधड्या छातीच्या समाजसुधारकाने ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. नुसती घोषणा करून थांबणारे ते राजे नव्हते तर त्वरीत अंमलबजावणी करून संबंधीत अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले. सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी शाहूंच्या या निर्णयाला विरोध केला. राजर्षीवर अनेक प्रकारचे आरोप केले. त्यांनी अस्पृश्यांसाठी राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, सार्वजनिक विहिरी, पाणवठे, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापन केली.

**कला व क्रिडा शिक्षण :**

संगीत कलेच्या शिक्षणासाठी राजर्षींनी १९१३ मध्ये देवल क्लबचा आरंभ केला होता. त्यांनी शाहीर, मल्ल, कलावंत यांना आश्रय दिला होता. शाहू महाराजांनी कलांना आणि कलावंतांना प्रोत्साहन दिले होते. महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहिरीला उत्तेजन दिले, अनेक शाहिरांना सहाय्य केले. यावरून त्यांच्या रसिक मनाची साक्ष पटते. शाहीर, तमासगीर, सत्यशोधक, जलसेवाले नि कवी या सर्वांना त्यांनी सहाय्य केले. त्यामुळेच त्यांच्या कलेचा विकास झाला आणि शैक्षणिकदृष्ट्या बहुजन समाज प्रगतीपथावर आला.

शाहू महाराजांनी जाणले होते की, स्पर्धेशिवाय प्रगती नाही. शाहू महाराजांनी गावोगावी तालमी, आखाडे स्थापन करण्यास मदत केली. जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा, फरीगदगा, बरची, भाला, विटा, बाणा, जंबिया इत्यादीचे शिक्षण तालमीत सुरू झाले. मल्लविद्येबरोबरच शस्त्रविद्येत गावोगावचे तरूण पारंगत होऊ लागले. मल्लांच्या लढती वारंवार करावयाच्या ठरवून जत्रा—उत्सवाच्या व अन्य मंगल प्रसंगी कुस्त्यांचा शौक वाढीस लावला.

**व्यवसायाभिमुख शिक्षण :**

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी औद्योगिक, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणावर त्यांनी भर दिला. त्यासाठी त्यांनी १९१२ साली जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी पारंपरिक शिक्षण देणाऱ्या शाळा व्यतिरिक्त व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या. त्यामध्ये टेक्निकल स्कूल, राधाकृष्ण मंदिरात छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर, पदमाळाची सुरूवात, कलागृह, औद्योगिक स्कूलची स्थापना, दिल्ली दरबार पाटील शाळा, सत्यशोधक शाळासाठी तलाठी स्कूलची स्थापना अशा वेगवेगळ्या व्यवसायाभिमुख शाळांची स्थापना शाहू महाराजांनी केली.

**निष्कर्ष :**

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. शाहू महाराजांनी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यविरांना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. सर्व बाजूंनी विपरित असलेल्या परिस्थितीशी मोठ्या धैर्याने झुंज देत कालचक्रांचे उलट सुलट फिरणारे राजर्षी शाहू महाराजांनी केवळ २८ वर्षांच्या कारकिर्दीत आपल्या संस्थानातील प्रजेलाच नव्हे तर संपूर्ण देशातील जनतेला मार्गदर्शक ठरावे असे कार्य केले.शाहू महाराजांना 'महर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. शाहू राजे हे त्यांच्या कर्तृत्वामुळे नावाप्रमाणे यशवंत राहिले. या व्यापक दूरदृष्टीच्या

राजाने त्याकाळी राजेशाही असतानासुद्धा सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये आजल्या लोकशाहीतील शासनालाही करणे शक्य होत नाही असे अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. शाहू महाराजांनी घेतलेले लोककल्याणकारी निर्णय व योजना या आजच्या काळातही आदर्श ठरलेल्या आहेत असे दिसून येते. तसेच बहुजन समाजाला अज्ञानामधून व दारिद्र्यातून बाहेर काढण्याचे सामाजिक कार्य आजच्या काळामध्ये आदर्श मानावे लागेल. म्हणून राजर्षी शाहूंना लोकांचे राजे, जनसामान्यांचे राजे म्हटले जाते.

**संदर्भ**

१) बाबुल वैशाली, करपे राजेश (२०१२), राजर्षी शाहू महाराज आणि त्यांची ब्राह्मणेत्तर चळवळीतील भूमिका, करपे आर.एन. (संपा.), राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
२) भोसले एस.एस., राजर्षी शाहू : काळ व विचार आणि कार्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर
३) भगत रा.तु. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, सिद्धराज प्रकाशन, पुणे
४) प्रा.गणेश राऊत, प्रा.ज्योती राऊत (२००९), महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण

**Suman Kendre**

**प्रस्तावना:-**

शेकडो वर्षापासून गुलामगिरीच्या जोखडात अडकलेल्या स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ज्या ज्या समाजसुधारकांनी पुढाकार घेतला, भारतातील पुरुष सत्ताक पद्धतीने व सामाजिक व्यवस्थेने स्त्रियांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी दिली नसल्याने तिचा राष्ट्रकार्यात सहभाग अपुरा आहे. वर्णव्यस्थेवर आधारित समाजरचना असल्याने सर्व फायदे वरिष्ठ वर्गीय व पुरुषांना मिळाले तर कनिष्ठवर्ग व स्त्रिया मात्र यापासून वंचित राहिल्या. मनुवाद्यांनी स्त्रियांवर अनेक बंधने लादली.

१९ व्या शतकाच्या आरंभीचे स्त्रीजीवन हे जीवन नसून फक्त जगणे होते. बालविवाह, सतीप्रथा,विधवा विवाह, केशवपन, बहुपत्नीत्व ,शिक्षणावरील निर्बंध इ.प्रथांमुळे स्त्रीचे जगणे विदारक झाले होते. या जवळपास निम्मी लोकसंख्या मौन धारण करून होती. परंतु याच काळात अनेक समाजसुधारक पुढे आले आणि त्यांनी समाजजीवन ढवळून काढले. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आपणास अग्रक्रमाने घ्यावे लागेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, “भारतीय स्त्री ही समाजाची आधारशीला आहे”. म्हणून बुद्धापासून सुरु झालेला स्त्रीमुक्तीचा लढा ज्योतीबानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी गतिमान केला.

**१९ व्या शतकातील स्त्रियांची स्थिती :-**

भारतातील समाज वर्णव्यवस्थेमुळे पोखरलेला तर होताच त्याच बरोबर उच्चवर्णीय स्त्रिया सुद्धा परंपरेच्या बंधनात अडकलेल्या होत्या. लहानवयात पित्याच्या,तरुणपणी पतीचा आणि वृद्धापकाळी मुलाच्या आधाराने तिला जगावे लागे. यासाठी धर्मशास्त्राचा आधार मानला जात होता. स्त्रियांची अवस्था त्यापेक्षा वेगळी नव्हती. पित्याच्या मालमत्तेत तिला कसलाच हिस्सा नव्हता. यावेळी डॉ. आम्बेडकरानी प्रगतीशील विचार मांडले आणि स्त्रीदास्याचा व अस्पृशतेचा पुरस्कार करणाऱ्या मनुस्मृतीचे २५ डिसेम्बर १९२७ रोजी दहन केले. खऱ्या अर्थाने इथूनच स्त्रीमुक्तीच्या पर्वाची सुरुवात झाली. पुरुषाबरोबर स्त्रियांना समान हक्क, न्याय,प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे,हा महत्वाचा विचार त्यांनी मांडला. निरक्षरता हा स्त्री शिक्षणातील सर्वात मोठा अडसर आहे,असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**स्त्री-शिक्षणास प्राधान्य :-**

महात्मा फुल्यांना आदर्श मानणाऱ्या बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. कारण एक पुरुष शिकला तर फक्त ती एकच व्यक्ती सुधारते, परंतु जर का एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुधारते. कुटुंबातून समाज आणि या समाजातून राष्ट्र सुधारेल. हा दृष्टीकोन समोर ठेवूनच त्यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयात जास्त मुलीना येत यावे यासाठी बससेवा उपलब्ध करून दिली. या शैक्षणिक कार्याचा परिणाम म्हणूनच जाईभाई चौधरी या स्त्रीने १९२५ साली संत चोखामेळा ही मुलींची शाळा काढली. तर अंजनाबाई देशभ्रतार यांनी आपल्या पतीसोबत मुलींच्या वस्तीग्रहाची धुरा सांभाळली. तसेच शांताबाई दानी यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेवून स्त्री शिक्षणाला गतिमान केले. आणि महत्वाचे म्हणजे त्यांनी आपली पत्नी रमाबाईस शिकवून तयार केले व स्वतःच्या घरापासून स्त्री शिक्षणाची सुरुवात केली.

देशाच्या प्रगतीला अडसर ठरणाऱ्या लोकसंख्येला आळा बसावा, स्त्रियांना कुटुंबात व समाजात मानाचे स्थान मिळावे,ती घरात आनंदी व निरोगी , तिचे दौर्बल्य नष्ट व्हावे, हे सांगणारे डॉ. आंबेडकर खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती चळवळीचे प्रेरकशक्ती ठरतात. डॉ. आंबेडकरानी स्त्रियांना “शिकवा, चेतवा, संघर्ष करा” हा कानमंत्र दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून देण्याबरोबरच त्यांना सन्मान, शील याचे म्हतवही पटवून देतात.

**सामाजिक चळवळीत स्त्रियांचा सहभाग :-**

डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा परिणाम म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही स्त्रियांनी सहभाग नोंदविला. १९२७ ला डॉ. आम्बेडकराच्या महाड येथील सत्याग्रहावेळी ताराबाई शिंदे यांनी सहभाग घेतला होता. तसेच जेव्हा बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले त्यावेळी ५० पेक्षा अधिक स्त्रिया त्यात सहभागी होत्या. जन्मतः सर्व माणसे समान

आहेत आणि मरेपर्यंत ती समान राहतील,या विचाराचा पुरस्कार डॉ. आंबेडकरानी केला. २७ डिसेम्बर १९२७ रोजी महाडची परिषद संपल्यानंतर बाबासाहेब स्त्रियांना उद्देशून म्हणतात. "घरातल्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्रीपुरुष मिळून सोडवितात त्याप्रमाणे समाजातील अडचणी स्त्री व पुरुषांनी मिळून सोडविल्या पाहिजेत. अस्पृश्य निवारण हा प्रश्न फक्त पुरुषांचा नसून तो स्त्रियांचाही आहे.

**स्त्रियांच्या प्रबोधनासाठी डॉ. आंबेडकरांचे प्रयत्न:-**

बाबासाहेबांनी स्त्रीमुक्ती चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी आणि अस्पृश्य स्त्रियांना जागृत करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेतले. डॉ.आंबेडकरांच्या मते स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडून दिली पाहिजेत. बाबासाहेबांनी "शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा" हा मूलमंत्र देवून त्यांच्यात स्वाभिमान जागृत केला.डॉ. आंबेडकरानी स्त्रियांना त्यांच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. "तुम्ही स्वतःला कमी लेखू नका,स्वच्छ राहा,स्वाभिमान संपादन करा,मुला-मुलीना शिक्षण द्या, लहान वयात लग्ने करू नका, मुलीनी आपल्या जोडीदाराच्या बाजूने ,बरोबरीने नात्याने व मित्र म्हणून उभे रहावे." स्त्रियांमध्ये त्यांच्या हक्काविषयी प्रबोधन घडून यावे यासाठी बाबासाहेबांनी आखिल भारतीय दलित महिला परिषदांचे आयोजन केले.आंबेडकरांचा हा लढा धर्म निरपेक्ष होता. कारण हा लढा केवळ अस्पृश्य महिलासाठी नव्हता तर स्वर्ण, मुसलमान, ख्रिश्चन,व इतर जातीतील स्त्रियांसाठी सुद्धा हा लढा होता. नागपूर येथे भरलेल्या १९४२ मधील अखिल भारतीय दलित महिला परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात २५ हजार महिला जनसमुदायासमोर बोलताना बाबासाहेब म्हणाले होते "एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून करता येते. एवढ्या मोठ्या संख्येने आपण येथे आलात म्हणजे तुम्ही प्रगतीच्या मार्गावर आहात यात शंका नाही." स्त्री शिकली पाहिजे ,ती मोठी झाली पाहिजे यासाठी ते सतत झटत राहिले.

**स्त्री कामगार विषयक धोरण :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९४२-४६ च्या दरम्यान भारताचे कामगार मंत्री होते.त्यावेळी त्यांनी स्त्री कामगारांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. जसे:-स्त्री कामगारांना पृसुतीपूर्व रजा व आर्थिक सहाय्य, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री पुरुषांना समान वेतन. असे स्त्री-पुरुष समान मजुरी तत्व प्रथम कोळसा खाणीतील कामगारांच्या बाबतीत स्वीकारले गेले.कोळसा खाणीतील स्त्रियांसाठी कुलपासह कपाटयुक्त स्नानगृह बांधण्याची मालकावर कायदेशीर बंधने घालण्यासाठी त्यांनी केंद्रीय विधिमंडळ बिल आणले व ते पास करून घेतले. डॉ.आंबेडकरांच्या कार्यामुळे तळागाळातील स्त्रियांना नवा चेहरा मिळाला, स्त्रीमुक्तीला कायद्याचे बळ मिळाले.

**हिंदू कोड बिल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्त्रीमुक्ती आंदोलनाचा सुवर्णकलश म्हणून हिंदू कोड बिल मांडले. प्रकृती बरी नसतानाही प्रचंड मेहनत घेवून त्यांनी हे बिल तयार केले होते. हिंदू स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी,स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी, स्त्रीला संपत्तीत वारसाहक्क ,पोठगी,घटस्फोट दत्तक घेण्याचा अधिकार, आंतरजातीय विवाहास मान्यता,विधवा विवाह आणि विशेषसोयी उपलब्ध करून देण्याची तरतूद यात होती. यास प्रथम नेहरूंचा पाठींबा होता. परंतु स्मृती व धर्म शास्त्र बदलायला डॉ. आंबेडकर निघाले आहेत असा प्रचार कर्मठ ब्राह्मणांनी केला. दुर्दैवाने यावेळी श्रीमती शांतिदेवी या स्त्रीने आमरण उपोषण करून या बिलास विरोध केला. सनातनी स्त्री संघटनांनी या विरोधात प्रचंड मोर्चे आणले. यावेळी बाबासाहेबांना संसदेत व संसदेबाहेर प्रचंड विरोध झाला.जर हिंदू कोड बिल पास झाले तर मनुस्मृतीच्या विद्रूप थडग्यावर आंबेडकर स्मृतीचे सुंदर लेणं कोरले जाईल, ही भीती कर्मठवाद्यांना होती. म्हणून त्यांनी बिल फेटाळले.डॉ. आंबेडकरानी नाराज होऊन २३ सेप्ट.१९५१ रोजी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला.पण बाहेरून त्यांचा लढा चालूच होता. शेवटी १९५५ ला हिंदू hindu marriage act पास झाला. पण यात काटछाट केली गेली.या बिलामुळे संपूर्ण भारतीय स्त्रियांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला.

**सारांश –** २० व्या शतकात डॉ. आंबेडकरानी स्त्रियांच्या आत्म सन्मानाला नवे सामर्थ्य मिळवून दिले. स्त्रीने स्वतःचा उधार, कुटुंबाचा उद्धार,समाजाचा उद्धार डोळसपणे करावा हे त्यांचे स्वप्नं आज प्रत्यक्षात येताना दिसत आहे.आज समस्त मानव जाती पुढे,स्त्रियापुढे अनेक आव्हाने उभे टाकलेली दिसतात पण हे आव्हाने स्वीकारण्याचे बळ बाबासाहेकडून मिळाले असल्यामुळे स्त्रियांची वाटचाल योग्य दिशेने असलेली दिसून येते. अनेक कायदे स्त्रीयासाठी तयार केले जात आहेत व त्याची अंमलबजावणी ही केली जाते. स्त्रिया कायद्या बाबतीत जागरूक झाल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१)हरी नरके व इतर (संपा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड२०,मुंबई २००५.

२)डॉ. डाहाट धनराज (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार,खंड १,संकेत प्रकाशन नागपूर.
३)डॉ. गाठाळ एस.एस.,आंबेडकरी चळवळीचा इतिहास,कैलास पब्लिकेशन ,औरंगाबाद ,२०१०.
४) डॉ.वा. भा.पाटील आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत प्रकाशन, जळगाव.
५) उर्मिला पवार व मीनाक्षी मून,आम्हीही इतिहास घडविला,आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग,मुंबई, १९८९.
६) डॉ. नरेंद्र जाधव, बोल महामानवाचे,ग्रंथाली प्रकाशन ,मुंबई.

# ''महात्मा ज्योतिबा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार''

**डॉ. गव्हाणे रमाकांत बबनराव**
श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय,नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :—**

भारत हा कृषी प्रधान देश म्हणुन ओळखला जातो. त्यामुळे इथला शेतकरी आणि शेती हा देशाचा कणा आहे. प्राचीन काळापासुन भारतीय शेतकरी शेतीचा व्यवसाय करीत असुनही आधुनिक युगामध्ये तो मागासलेला राहिला. समाजात बहुसंख्येने असणारा परंतु अतिशय वाईट अवस्था प्राप्त झालेल्या शेतकरी वर्गाविषयी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी राज्यकर्ते, समाजसुधारक व विचारवंतांना चिंता वाटत होती. शेती आणि शेतीवरती उपजिविका करणारा शेतकरी त्यांच्या आत्मीयतेचा विषय होता. ब्रिटिश सरकारने या शेतकरी वर्गाचे कसे शोषण केले व शेतकरी कसा दयनीय अवस्थेत जिवन जगु लागला. दारिद्रय व कर्जबाजारीपणापासुन शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी कांही राज्यकर्त्यांनी शेतीविषयक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. तर कांही समाजसुधारकांनी शेती व शेतकरी वर्गाचा दर्जा सुधारण्यासाठी आपले विचार मांडुन शेतकऱ्यांसाठी कांही सुधारणा घडवुन आणण्याचा प्रयत्न केला. त्यात महात्मा फुले यांचे नांव आग्रक्रमाने येते.

**शोध निबंधाची उद्दिष्टये :—**

1. भारतीय शेतकऱ्यांच्या मागासलेपणाची माहिती घेणे.
2. भारतीय शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणाची माहिती घेणे.
3. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास महात्मा फुले यांनी ब्रिटिश सरकारला कसे भाग पाडले याची माहिती घेणे.
4. महात्मा फुले शेती व शेतकरी वर्गाची सुधारणा व्हावी. म्हणुन कोणते विचार मांडले याची माहिती घेणे.
5. महात्मा फुलेंच्या शेती व शेतकरी विषयक कार्याची माहिती घेणे.

**शोध निबंधाची गृहितके :—**

1. महात्मा फुले यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले.
2. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची माहिती ब्रिटिश सरकारला दिली.
3. बिटिश सरकारच्या काळात शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक मोठया प्रमाणात झाली.
4. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण शेती मागास राहिली.

**विषय प्रतिपादन :—**

१९ व्या शतकात भारताच्या इतिहासात आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडून आल्या. ब्रिटिशांची भारतावरील जुलमी व अनियंत्रीत सत्तेचा परिणाम म्हणुन भारताची सर्वच क्षेत्रात अतिशय विकलांग अशी अवस्था झाली होती. 'ब्रिटिशांच्या शोषणातून शेतीही सुटू शकली नव्हती. भारतीय शेती व शेतकऱ्यांचे अतिशय नियोजन बध्द शोषण ब्रिटिशांनी सुरू केले. महात्मा फुले यांनी शिक्षणाला महत्त्व देऊन शिक्षणा अभावी शुद्राती शुद्रांचे कसे नुकसान झाले आहे व शेतकरी कसा नागवला जात होता हे सांगण्यासाठी ज्योतीरावांनी 'शेतकऱ्यांचा आसुड' हा ग्रंथ इ.स. १८८३ साली लिहिला.'' [१] व त्याद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारला लक्ष देण्यास भाग पाडले.

**महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार :—**

ब्रिटिश सरकार भारतीय शेतीवर मोठया प्रमाणात महसुल आकारत त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात आर्थिक पिळवणुक झाली. ''सन १८७१ साली महसुल, कृषी व वाणिज्य असे एक स्वतंत्र खाते निर्माण केले.''[२] पण या खात्यांमार्फत सुधारणा ऐवजी फक्त महसुलाच्या रूपात मोठया प्रमाणात कर आकारणी होऊ लागली. ''महात्मा फुले यांनी आपली भाषणे व ग्रंथाद्वारे शेतकरी व कामगार यांची पिळवणुक कशी होते. दारिद्रयाच्या चिखलात कसे अधिकाधिक रूतत चालले आहेत, सामाजिक अन्यायाखाली ते कसे पिचत चालले आहेत हे त्यांना सरकारच्या लक्षात आणुन दयायचे होतो. ''[३] शेतकरी, कष्टकरी, शुद्राती शुद्रांच्या कल्याणासाठी फुलेंनी सर्व स्तरातुन प्रयत्न केले होते. त्यांनी आपल्या कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ''२४ सप्टेंबर १८७३ रोजी ''सत्यशोधक समाजाची'' स्थापना केली. या समाजाचे ध्येय शेतकरी, कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य याच वर्गाच्या प्रश्नासी निगडीत होते.''[४]

''शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापना केलेल्या ''सत्यशोधक समाजाने'' त्या काळात एक निबंध स्पर्धा जाहीर केली. त्यासाठी दोन बक्षीसे ठेवली. 'हिंदी शेतकऱ्यांची सुधारणा कशी करता येईल?.'' हा निबंधाचा विषय होता. ब्रिटन मधील शेतकी पध्दत लक्षात घेऊन हा निबंध लिहायचा होता. या निबंधावरून सत्यशोधक समाजाचे कार्य कोणत्या पध्दतीचे होते आणि महात्मा फुले यांचा दृष्टिकोन कसा व्यापक व विधायक आणि आर्थिक दृष्टया कसा महत्त्वाचा होता. याची कल्पना येते.''[५]

'शेतकऱ्याचा असुड' याच ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे वर्णन केले आहे. ''त्याचे घर एक मजला कौलारू आहे. घराचे पुढचे बाजुस घरालगत आढेमेढी टाकुन बैल बांधण्याकरीता छप्पराचा गोठा केला आहे. त्यात दोन—तीन उठवणीस आलेले बैल रवंथ करीत बसलेले आहेत. व एका बाजुला खंडी—सव्वाखंडीच्या दोन—तीन रिकाम्या कणगी कोपऱ्यात पडल्या आहेत. बाहेर अंगणात उजवे बाजुस एक आठ बैली जुना गाडा उभा केला आहे. त्यावर मोडकळीस आलेला तुरवंठयांचा कुरकुल पडला आहे. डावे बाजुस एक मोठा चौरस ओटा करून एक तुळशी वृंदावन बांधले आहे. व त्यालगत खापरी रांजनाच्या पाणईच्या ओटा बांधला आहे. पाणई शेजारी तीन बाजुला छाट दिवाली बांधुन त्याचे आत ओबाड—धोबाड फरशा टाकुन एक लहानशी न्हाणी केली आहे. तिच्या मोरीवाटे वाहून गेलेल्या बाहेरच्या बाजुस डबके साचले आहे. त्यात किडयांची बुचबुच झाली आहे. त्यांचे पलीकडे पांढऱ्या चाफ्याखाली उघडी—नागडी सर्व अंगावर पांढरे

पाण्याचे ओघळाचे डाग पडलेले असुन, खर्जुली, डोक्यात खवडे, नाकाखाली शेंबडाच्या नाळी पडून घामट अशा मुलांचा जमाव जमला आहे....''[६] अशा प्रकारचे दशावतारी वर्णन ज्योतीरावांनी असुड मध्ये केले आहे.

फुलेंनी शेतकऱ्यांची दुर्दशा संपवण्यासाठी शेती व्यवसायात सुधारणा घडवुन आणण्यासाठी इंग्रज सरकारकडे अनेक मागण्याही केल्या. ''आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपीयन शेतकऱ्यांसारखे विद्याज्ञान देऊन, त्यांस त्यांसारखी यंत्राद्वारे शेती कामे करण्यापुरती समज येई तो पावेतो एकंदर सर्व गोऱ्या लोकांसह मुसलमान वगैरे लोकांनी हिंदुस्थानातील तूर्त गाय बैलासह त्यांची वासरे कापून खाण्याच्या ऐवजी, त्यांनी येथील शेळया, बकरी मारून खावीत, अथवा परमुलखातील गाय, बैल वगैरे खरेदी करून येथे आणुन मारून खावे, म्हणुन कायदा करून अमलात आणल्याशिवाय येथील शुद्र शेतकऱ्यांजवळ बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची मशागात भरपुर करता येणार नाही. व त्यांच्याजवळ शेणखताचा पुरवठा होऊन त्यांचा व सरकारचा फायदा होणे नाही. एकंदर डोंगर पर्वतावरील गवत झाडांच्या पान फुलांचे व मेलेल्या किटक श्वापदांचे मांस, हांडाचे कुजलेले सत्व वळवाच्या पावसाने धुपून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढया खोडयात वाया जाऊ नये, म्हणुन आमच्या उदयोगी सरकारने सोयी सोयीने काळया गोऱ्या लष्करासह पोलीस खात्यातील फालतु शिपायाकडुन जागोजाग तालीवजा बंधारे अशा रितीने बांधावे व वळवाचे पाणी एकंदर शेतातून मुरून नंतर नदी नाल्यास मिळावे, असे केल्याने शेते फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायांस हवाशीर जाग्यात उदयोग करण्याची सवय लागल्याबरोबर त्यास रोगराईची बाधा न होता बळकट होतील.''[७]

शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी ज्योतीरावांनी केलेल्या वरील मागण्या पाहिल्यावर त्यांनी शेतकरी वर्गाच्या उन्नतीचा किती बारकाईने अभ्यास केला होता. याची प्रचिती येते. शेतकऱ्यांचे शोषण थांबुन तो ज्ञानी बनावा, तो आपल्या हक्काविषयी जागरूक बनावा व त्याचे राज्य (बळीचे राज्य) यावे हे ज्योतीरावांचे स्वप्न होते.

**मूल्यमापन :—**

महात्मा फुले यांच्या मते, जो पर्यंत शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताची धोरणे राबविली जाऊ शकत नाहीत तो पर्यंत या देशात कोणतेही मौलिक स्वरूपाचे परिवर्तन होऊ शकणार नाही हे १२० वर्षापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले यांनी आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. परंतु ब्रिटिश कालखंडात शेतकऱ्यांची घोर निराशाच केली ही अत्यंत खेदांची बाब असुन भारताच्या दारिद्रयाचे प्रमुख कारण आहे.महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. शेतकऱ्यांवर होणारे अन्याय दुर करण्याचा प्रयत्न केला. वास्तवाच्या आधारे एखादे गृहीत उभी करण्याची शैली महात्मा ज्योतीराव फुले शिवाय इतर कोणाला साधली नाही. यासाठीच त्यांना देशातील शेती प्रश्नांचे प्रवक्तेपण दयावे लागते.

**संदर्भसूची :—**

१) डॉ. एस. एस. गाठाळ — आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृ.क्र. ३३०
२) पवार जयसिंगराव — आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास — विद्या प्रकाशन, नागपूर. २०००. पृ.क्र.२६२
३) किर धनंजय — महात्मा फुले — पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९९२. — पृ.क्र. १४४
४) पवार जयसिंगराव — आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास — विद्या प्रकाशन, नागपूर. २०००. पृ.क्र.२६२
५) किर धनंजय — महात्मा फुले — पृ. क्र. १६१
६) ज्योतीराव गोविंदराव फुले (संपा, डॉ. एस.एस.भोसले) — शेतकऱ्यांचा असुड, जिजाऊ प्रकाशन, औरंगाबाद. २००१. पृ. क्र. ११
७) महात्मा फुले — समग्र वाङमय — (महाराष्ट्र शासन). पृ. क्र. ३३२, ३३३.

1. ———

# राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री-उद्धारविषयक विचार व कार्य

**श्री. योगेश ज्ञानदेव पाटील.**
संशोधक : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
yogeshpatil5408@gmail.com

**प्रस्तावना :**

जगातील कोणत्याही देशात स्त्रियांना मिळणाऱ्या मानसन्मानापेक्षा अधिक मानसन्मान आपल्या देशामध्ये स्त्रियांना मिळत होता. नंतरच्या काळामध्ये त्यांची जी अवनती झाली, त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदूंना धार्मिक कायदे करून देणाऱ्या 'मनू'ला जबाबदार धरतात. 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' या लेखामध्ये मनुस्मृतीमधील स्त्रियांची अवनती करण्यास जबाबदार असणारे काही कायदे बाबासाहेबांनी आपल्या लेखामध्ये लिहिलेले आहेत. [१]

वैदिक काळामध्ये आश्रमव्यवस्था निर्माण झाली होती. सुरुवातीच्या काळामध्ये उपनयन विधी पूर्ण करून स्त्रियांना आश्रमव्यवस्थेत प्रवेश शक्य होता. त्याकाळी 'मुलींची ब्रह्मचर्यावस्था संपलेली आहे आणि आता ती विवाहाला योग्य झाली आहे' असा उल्लेख अथर्ववेदात आहे. म्हणजेच वैदिक काळात स्त्रियांना आश्रमव्यवस्थेत सहभागी होण्याचा व शिक्षणाचा हक्क होता, हे स्पष्ट होते. स्त्रिया मीमांसा तत्वज्ञानात निष्णात होत्या, हे पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' ग्रंथातील उल्लेखावरून, स्त्रिया गुरुकुलामध्ये अध्यापक म्हणून विद्यार्थिनींना वेद शिकवत होत्या हे पतंजलीच्या 'महाभाष्य' ग्रंथावरून तसेच जनक, याज्ञवाल्क, शंकराचार्य यांसोबत स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी विविध विषयांवर वादविवाद केल्याचे दाखले मिळतात, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे.प्राचीन भारतीय इतिहासामध्ये वैदिक काळापर्यंत स्त्रियांना समाजामध्ये मानाचे स्थान होते. उत्तरवैदिक काळामध्ये स्त्रियांवर बंधने लादली गेली. कालांतराने बंधने वाढतच गेली. शिशुहत्या, बालविवाह, जरठ विवाह, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहास अमान्यता अशा अनेक अन्यायकारक प्रथा धर्माच्या नावावर स्त्रियांवर लादल्या गेल्या. प्राचीन भारत, मध्ययुगीन भारत व आधुनिक भारताच्या आरंभीच्या काळापर्यंत अपरिहार्य परिस्थितीशिवाय स्त्रिया नेतृत्व करताना दिसत नाहीत. इंग्रजांच्या शासनकाळामध्ये पहिल्यांदा राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांच्या सामाजिक हक्कांसाठी संघर्षास सुरुवात केली. लॉर्ड बेंटिंग यांच्या सहकार्याने सतीबंदीचा कायदा आणला. यानंतर अनेक सुधारकांनी स्त्रियांच्या उन्नातीसाठी प्रयत्न केले. या सुधाराकांपैकी राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्री-उद्धारासाठी केलेल्या भरीव विचार व कार्याची ओळख आपण या लेखामध्ये करून घेणार आहोत.

**संदर्भ साहित्याचा आढावा :**

1. राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व कार्य. लेखक : डॉ. जयसिंगराव पवार
2. राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व शिक्षणकार्य. लेखक : प्राचार्य रा. तू भगत
3. राजर्षी शाहू छत्रपती – पत्रव्यवहार व कायदे. संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
4. राजर्षी शाहू छत्रपती – जाहीरनामे व हुकुमनामे. संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
5. राजर्षी शाहू छत्रपती – एक मागोवा. संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
6. राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे. संपादक : डॉ. जयसिंगराव पवार

**सुचनक – शब्द :**

वर्णव्यवस्था, स्त्री-उद्धार, शिक्षण, विवाह, छळवणूक, कायदा, काडीमोड, अनौरस संतती, जोगातिनी, विधवा, वारसा.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महान वारसदारांपैकी एक वारसदार होते, राजर्षी छत्रपती शाहू महाराज ! विसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळामध्ये सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज वगळता जवळपास सर्व संस्थानिक ऐशोआरामात जीवन व्यतीत करत होते. अशा काळामध्ये 'राजा+ऋषी' याप्रमाणे जीवन व्यतीत करणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानामध्ये जनतेच्या कल्याणासाठी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये स्त्रियांच्या उद्धारासाठी कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली. १९१९ साली कुर्मी क्षत्रिय परिषद : राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई अशी उदाहरणे देत शाहू महाराजांनी अनिष्ट पडदा पद्धतीचा निषेध केला. [२]'आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा' राजर्षी शाहू महाराजांनी १२ जुलै १९१९ रोजी लागू केला. [३] १८१८ साली विठ्ठलभाई पटेल यांनी 'आंतरजातीय विवाहास कायदेशीर ठरवणारे बिल मध्यवर्ती कायदेमंडळामध्ये मांडले होते. यावेळी सुधारक व सनातनी यांमध्ये मोठा संघर्ष झाला होता. त्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी केलेला कायदा क्रांतिकारी ठरतो.संस्थानातील हिंदू व जैन या धर्मांच्या लोकांना प्राचीन काळाचा संदर्भ देत आंतरजातीय विवाह करण्याची परवानगी दिली.राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या कायद्यामध्ये शर्त क्र. १ नुसार, 'विवाहाचे वेळी नवरा हयात असता कामा नये.' म्हणजेच विधवा पुनर्विवाहाचा कायदा करवीर राज्यात लागू केला. ब्रिटीश राज्यामध्ये ज्या काळात मुलींचे विवाहयोग्य वय बारा वर्षे असावे हा कायदा होता त्या काळामध्ये सदर कायद्यातील शर्त क्र. २ नुसार, 'स्त्रीचे विवाहयोग्य वय चौदा वर्षे होऊन गेलेले असावे' असा कायदा केला

शर्त क्र. ३ नुसार, 'नवरीमुलीचे वय पूर्ण १८ वर्षांचे झाले नसेल, तर तिने आपला बाप अगर पालन करणारा यांची संमती विवाहास मिळवली असली पाहिजे.' म्हणजेच अठरा वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या स्त्रीस स्वत:चा जोडीदार निवडण्याचे क्रांतिकारी स्वातंत्र्य देणारा हा कायदा होता.'स्त्रियांना क्रूरपणाने वागविण्याचे बंद करण्याबद्दल नियम' हा कायदा राजर्षी शाहू महाराजांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी संस्थानामध्ये लागू केला. ब्रिटीश राज्यामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचारांसाठी कोणतीही शिक्षा नव्हती. या पार्श्वभूमीवर हा कायदा क्रांतिकारी कायदा ठरतो. 'राजाने छळले, पावसाने झोडपले अन नवऱ्याने मारले तर तक्रार करायची कोणाकडे !' अशा हताशावादी विधानांचा वापर जुन्या काळामध्ये होत असे. एका हिंदी चित्रपटगीताप्रमाणे 'सावन जो अगन लगाये तो उसे कोण बुझाये !' अशीच मानसिकता स्त्रियांच्या होणाऱ्या छळाबाबत असे. अशा प्रकारच्या मानसिकतेस शाहू महाराजांनी उत्तर दिलेले आहे.'क्रूरपणाची वागणूक' या शब्दाचा अर्थ सांगताना 'कलम अ' मध्ये शाहू महाराज स्पष्ट करतात, 'तिच्या योगाने अयोग्य प्रकारची अनावश्यक शारीरिक दु:ख अगर पीडा उत्पन्न होते, अगर जिच्या योगाने प्रकृतीस इजा होणेसारखे मानसिक क्लेश होतात, अगर जिच्या योगाने प्रकृतीस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यासारखी, योग्य भीती उत्पन्न होते, ती वागणूक.' सदर कायद्यानुसार अन्यायकर्त्यांस सहा महिनेपर्यंत सक्तमजुरी व साधी कैद तसेच रुपये २००/- पर्यंत आर्थिक दंडाची तरतूद केली होती. [४]

'Hindu law inheritance Amendment Act' हा कायदा १२ जानेवारी १९२० नुसार रोजी तयार करण्यात आला. जातपंचायती गावातील महत्वाचे न्यायनिवाडे करत असत. धार्मिक प्रथा परंपरेचा आधार घेत निवाडे केल्याने पुरुषप्रधान संस्कृतीमुळे प्रसंगी स्त्री-वर अन्याय होत असे. शाहू महाराजांनी अशा पंचायातींकडून घटस्फोट देण्याचा अधिकार काढून घेतला. सर्व वर्णांच्या संततींना घटस्फोटानंतर पूर्वी पतीच्या संपत्तीमध्ये वाटा मिळत नसे. शाहू महाराजांनी वारसा हक्क कायद्यामध्ये दुरुस्त्या करुन घटस्फोटीत स्त्री-च्या अपत्यास जनक पित्याच्या संपत्तीमधून वारसा हक्क देण्याचा कायदा केला. [५]सविस्तर कायदे करण्यासोबत राजर्षी शाहू महाराजांनी वेळोवेळी जाहीरनामे काढूनही स्त्रियांच्या उद्धारासाठी भूमिका घेतलेली दिसते.राजर्षी शाहू महाराजांनी ८ सप्टेंबर १९०६ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यानुसार 'पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कायद्याने वयात आल्याचे समजावे.' असा जाहीरनामा प्रसिद्ध केला. [६] स्त्री व पुरुषांना समान पातळीत आणण्याचा एक प्रयत्न म्हणजेच 'समान नागरी कायदा' म्हणून या कायद्याकडे पाहता येते.संस्थानातील शिक्षण घेणाऱ्या हुशार मुलींना प्रोत्साहन मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी राजकन्या व भावनगर संस्थानाच्या महाराणी यांच्या नावाने इयत्ता चौथीतील मुलींसाठी शिष्यवृत्ती मिळेल, असा जाहीरनामा ५ एप्रिल १९१३ रोजी काढला. [७] या शिष्यवृत्तींची रक्कम दरवर्षी चाळीस रुपये होती.अखिल

भारतीय मराठा परिषद, खामगाव येथे २७ डिसेंबर १९१७ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या भाषणामध्ये 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे!' हा मुद्दा मांडला होता. [८] त्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांनी ८ ऑक्टोबर १९१९ रोजी मागासलेल्या जातीच्या स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करण्याचा जाहीरनामा काढतात. [९] यावरून शाहू महाराजांच्या दृष्टीने स्त्रियांच्या उद्धारासाठी शिक्षणाचे महत्व समजते. शिमग्याच्या सणामध्ये स्त्रियांविषयी बीभत्स भाषा वापरणाऱ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा जाहीरनामा शाहू महाराजांनी २१ मार्च १९२१ रोजी जाहीर केला. [१०] सदर कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांचा सन्मान करण्याची सक्ती राजर्षी शाहू महाराजांनी पुरुषप्रधान संस्कृतीस केली आहे, असे दिसून येते.

प्राचीन भारतीय संस्कृतीतील वर्णव्यवस्थेमध्ये शुद्र पुरुषांना किमान अतित्व होते. स्त्रियांना मात्र वर्णव्यवस्थेमध्ये नाकारले होते. या व्यवस्थेमध्ये उच्चकुलीन स्त्रियांनाही स्थान नव्हते. अशा स्त्रियांसाठी राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथा बंद करण्याबाबत महत्वाची भूमिका घेतली. विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता मिळवून देण्यासाठी पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री पंडित, विरेश लिंगम पंतलू अशा सुधारकांनी प्रयत्न केले. नाना जगन्नाथ शंकरशेठ, महात्मा ज्योतीराव फुले, न्यायमूर्ती रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे अशा सुधारकांनी शाळेची कवाडे उघडली, सामाजिक अनिष्ट रूढी-परंपरा यांविरोधात लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ गणेश आगरकर अशा सुधारकांनी ठोस भूमिका घेतली. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई या स्त्री शिक्षिकांनी समाजाची टीका-टिपण्णी सहन करत स्त्री-शिक्षणाचे कार्य केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे संस्थानामध्ये कायदा करण्याचा हक्क असल्याने त्यांनी पूर्वीच्या सुधारकांच्या कार्यावर आधारित भरीव व ठोस कार्य केले. शिक्षण, कायदे व जाहीरनामे यांच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानामध्ये परिवर्तन घडवले. राजर्षी शाहू महाराजांनी जीवनाच्या अखेरच्या काळामध्ये ज्या युवकास राष्ट्रीय नेता म्हणून जाहीर केले त्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या संविधानामध्ये लिंगभेद नाकारून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीमध्ये उभे केले. या व अशा महान सुधारकांच्या कार्यामुळेच भावी काळामध्ये भारतीय स्त्रिया देशातील राष्ट्रपती, पंतप्रधान अशा सर्वोच्च पदांवर विराजमान झाल्या आहेत.

**संदर्भ :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय गाजलेले लेख. प्रकाशक : रघुवंशी प्रकाशन, मुंबई. पृष्ठ क्र. ४९.
2. पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य. तारराणी प्रकाशन (२०१५), पृष्ठ क्र.११०.
3. पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे. मेहता पब्लिशिंग हाऊस (द्वितीय आवृत्ती, मार्च २०१८), पृष्ठ क्र. ८४.
4. कित्ता, पृष्ठ क्र. ९६.
5. पूर्वोक्त, पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य. पृष्ठ क्र. ११२.
6. पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमनामे. मेहता पब्लिशिंग हाऊस (द्वितीय आवृत्ती, मार्च २०१८), पृष्ठ क्र. ३२.
7. कित्ता, पृष्ठ क्र. ६०.
8. पूर्वोक्त, पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य. पृष्ठ क्र. ११४.
9. पूर्वोक्त, पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमनामे. मेहता पब्लिशिंग हाऊस (द्वितीय आवृत्ती, मार्च २०१८), पृष्ठ क्र. ११७.
10. पूर्वोक्त, पवार, जयसिंगराव. राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकुमनामे. मेहता पब्लिशिंग हाऊस (द्वितीय आवृत्ती, मार्च २०१८), पृष्ठ क्र. १२७.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार

**डॉ. सुरेश त्रिंबकराव सामाले**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमूख स्व. नितीन महाविद्यालय पाथरी.जि. परभणी.
samalesuresh@gmail.com

**प्रस्तावनाः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना “भरतरत्न” हे सर्वोच्च मानाचे प्रमाणपत्र मिळाले. महाराष्ट्रात ज्यांना “भरतरत्न” हा पुरस्कार मिळाला, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे चौथे होते. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी अहोरात्र कष्ट घेतलेले महर्षि धोंडो केशव कर्वे हे “भरतरत्न” मिळणारे पहीले व्यक्तिमत्व, त्यांणा 1958 ला “भरतरत्न” किताव मिळाला. हिंदूधर्म व आर्य संस्कृतीवर 18 खंड लीहणा-या महामहोपाध्याय पा. वा. कोण यांना 1963 साली “भरतरत्न” किताब मिळाला. 1983 ला विनोबाजी भावे यांना “भरतरत्न” किताब मिळाला. तर 1990 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना “भरतरत्न” किताब मिळाला. हे चारही रत्ने कोकणातील आहेत हे विशेष. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण नांव “भिमराव रामजी आंबेडकर” असे होते. ते “बाबासाहेब” या नावानेच परिचित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 ला कोकणातील महू योथे अस्पृश्य समजल्या जाणा-या जातीत झाला. अस्पृश्यतेचे चटके त्यांणा बालपणापासून जाणवले होते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर अर्थशास्त्रज्ञ होते. आर्थिक प्रश्नांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. अर्थशास्त्र हा त्यांचा आवडीचा विषय होता. भारताच्या विकासासाठी आजही त्यांचे आर्थिक विचार उपयुक्त आहेत. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र आणि पब्लिक फायनान्स या विषयांचा विशेष अभ्यास केला होता. कोलंबिया विद्यापीठाच्या एम. ए. आणि पीएच.डी. ह्या पदव्या त्यांणी अर्थशास्त्र या विषयातच मिळवल्या होत्या. तसेच त्यांणी ‘लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स’ च्या एम. एस्सी. आणि डी. एस्सी. ह्या पदव्या अर्थशास्त्रातच मिळवल्या होत्या. प्रो. एडविन आर. ए. सेलिग्मन यांच्यासारखे प्रख्यात अर्थतज्ज्ञ त्यांना कोलंबिया विद्यापीठात शिकवायला होते. यांच्याच मार्गदर्शनाखाली डॉ. आंबेडकरांनी पीएच.डी. पदवी 1916 साली प्राप्त केली. तर ‘Pronincial Development of Imperial Finance in British India’ या विषयावर एम.एस्सी. आणि ‘Problem of the Rupee’ या विषयावर डी.एस्सी. ह्या पदव्या ‘लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्स’ मधून प्राप्त केल्या. यासाठी त्यांना कॅनन यांचे मार्गदर्शन लाभले. दि प्रॉब्लम ऑफ रुपी इटस् ओरिजीन ॲण्ड सोल्यूशन हा डी.एस्सी. च्या पदविसाठी लिहलेला प्रबंध 1923 साली प्रसिध्द झाला. पुढे 1947 साली हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी ॲण्ड बॅकींग या नावाने पुन्हा प्रकाशित करण्यात आला. प्रस्तूत ग्रंथामध्ये रुपयाची उत्क्रांती व भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती? यावर प्रकाश टाकला आहे. भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची विवेचना करताना डॉ. आंबेडकरांनी इतर अर्थतज्ज्ञांनी दुर्लक्षिलेल्या सन 1800 ते 1893 या कालखंडातील भारतीय रुपयाची, चलनाचे परिणाम म्हणून कशी

जडनघडन होत गेली, त्याचे सखोल विवेचन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये तीन वर्ष अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणूनही अध्यापनाचे काम केले. बुध्दिमत्ता आणि परिश्रमाच्या जोरावर त्यांनी फार मोठे यश संपादन केले होते. त्यांची स्मरणशक्ती असाधारण होती. त्यांनी अनेक विषयाचा अभ्यास केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आहल्या ज्ञानशक्तीचा उपयोग दलित-पद्दलितांच्या उत्थानासाठी आयुष्यभर केला. बडोदा सास्थानचे सयाजीराव गायकवाड यांनी स्कॉलरशिप देण्यापूर्वी या विद्यार्थ्याला विचारले होते, "तुला कोणत्या विषयाचा अभ्यास करावासा वाटतो?"  तेव्हा ते म्हणाले होते, "समाजशास्त्र, अर्थशास्त्र, आणि विशेषतः पब्लिक फायनान्स्." महाराजांनी पुन्हा विचारले, " या विषयाचा अभ्यास करुन, तू पुढे काय करणार आहेस?" आंबेडकरांनी उत्तर दिले, " या विषयांच्या अभ्यासाने मला माझ्या समाजाची अवनत अवस्था कशी सुधारावी याचे मार्ग दिसतील व त्या मार्गाने मी समाजसुधारणेचे कार्य करीन." हे उत्तर ऐकून महाराजांनी त्याला अमेरिकेला पाठवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक क्षेत्रात असामान्य कर्तृत्व केले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यानंतर भारतात सामाजिक क्षेत्रात स्वतःची वेगळी छाप पाडणारे ते लोकनेते ठरले. हिंदू धर्मातील गैरसमजुतीवर परखड विचार बाबासाहेबांनी मांडले. जातीप्रथा, मनुस्मृती व चतुर्वर्ण्य पद्धती याचे बाबासाहेबांनी सप्रमाण खंडन केले. हिंदू धर्मातील ताढरता कमी होत नाही हे लक्षात आल्यानंतर बाबासाहेबांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला. यावर त्यांणी सर्व धर्म व धर्मग्रंथांचा सुक्ष्म अभ्यास केला. यावरुन समानतेचे तत्वज्ञान मांडणारा बौद्ध धर्म सर्वतोपरी उचित वाटला त्यानुसार 1965 मध्ये नागपूर येथे धर्मांतर करुन बौद्ध धर्माची प्रथम स्वतः दीक्षा घेतली व तमाम दलीत बांधवांना बौद्ध धर्मात प्रवेश करण्याचा मार्ग खुला केला. त्यानंतर काही महीन्यांच्या कालावधीनंतर त्यांचे मुबई येथे 6 डिसेंबर 1956 रोजी महानिर्वाण झाले. भारत सरकारने मरणोत्तर 'भारतरत्न' किताब देऊन तुंचा गौरव केला. डॉ. बी. आर. आंबेडकरांनी समाज व्यवस्थेचा अभ्यास करतावना माणूस हा केंद्रबिंदू मानला. माणूस हा माणूस बनला पाहिजे असे त्यांना अभिप्रेत होते. राजकीय क्रांतीपेक्षा सर्वप्रथम सामाजिक व सांस्कृतिक क्रांती झाली पाहिजे असा सिध्दांत त्यांनी मांडला. डॉ. आंबेडकरांनांचे विचार थोडक्यात मांडणे अवघड व अशक्य आहे

**डॉ. आंबेडकरांचे भारतीय शेतीविषयक विचारः**

भारतीय शेतीच्या समस्यांचे डॉ. आंबेडकरांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. 'स्टेट ॲन्ड मायनॉरिटीज' या लेखात 1947 मध्ये तसेच 'जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' या नियतकालीकेमध्ये 1918 मध्ये 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया' या लेखामध्ये भारतीय शेतीसंबधी त्यांनी आपली शेतीसंबधीची भूमिका व्यक्त केलेली आहे. भारतातील नागरिकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था अत्याधिक शेतीवरच अवलंबुन आहे. भारतातील कृषीसमस्यांमध्ये कृषी उत्पादन, शेतजमिनीचा आकार किफायतशीर धारणक्षेत्र, जमीन धारणेची कमाल मर्यादा यावर त्यांनी चिंतन केलेले आहे. भारतात धारणक्षेत्राचा आकार उत्तरोत्तर लहान होत असून छोट्या आकाराच्या जमिनी तयार होत आहेत. यावर त्यांच्या मते, 'जेव्हा शेतजमीन हा उपजीविकेचा एकमेव व्यवसाय असतो व वारसा हक्क कायद्यामुळे प्रत्येक वारसाला शेतजमिनीचा हिस्सा कायद्याने दिला जातो तेव्हा शेतजमिनीचे विभजन व अपखंडन होऊन

शेतजमिनीचा आकार लहान बनतो.' भारतातील निरनिराळ्या राज्यात शेतजमीनीचा आकार सरासरीने घटत चलल्याचे डॉ. आंबेडकरांनी निदर्शनास आणून दिले होते. त्यावरुन भारत हा अल्पभूधारक शेतक-यांचा देश आहे असा त्यांनी निष्कर्ष काढला होता. डॉ. आंबेडकरांनी भारतातील कृषिक्षेत्रातील समस्यांच्या उपयांमध्ये औद्योगिकीकरण हे सांगीतले आहे. त्यांच्या मते तुकड्यातुकड्यांत असलेले कृषिक्षेत्र एकत्र करावे. अशा कृषिक्षेत्राजवळ औद्ययोगिकीकरण करावं, त्यातून येणारा पैसा कृषिक्षेत्राच्या विकासासाठी उपयोगात आणावा. ज्यामुळे कृषिउत्पादन आणि जमीन दोन्हीच्या मुल्यामध्ये वाढ होउन शेतक-यांच्या आर्थिक समस्या संपण्यासाठी मदत होईल. तसेच भारताच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाची गती वाढविण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकीच आवश्यकता भरताच्या आर्थिकतेचा पाया असलेल्या कृषिक्षेत्राच्या विकासाची गती वाढविण्याची आहे. कृषिक्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष करुन उत्पादन वाढविण्याची कोणतीही योजना कार्यान्वित करणे म्हणजे सत्यनाश ओढवुन घेणे होय. अशा प्रकारे शेतीक्षेत्राला अनन्यसाधारण असे म्हत्व डॉ. बाबासाहेब आंबेकराणी दीले होते.

सहकारी तत्वावर आधारीत शेती संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या मते, सरकारने ठरवून दिलेल्या परिमाणानुसार सहकारी तत्वावर शेती केली जावी. शेतीचे क्षेत्र आणि मालकी कायम ठेवून ती सहकारी तत्वावर केल्यास अल्पभूधारकांवर आर्थिक ताण पडणार नाही. भागधारक कंपणी सदस्यांप्रमाणे सहकारी तत्वांवरील शेतीमध्ये समाविष्ट होणारा शेतकरी हा भागधारक सदस्य राहील आणि सहकारी शेतीतील नफा-नुकसानीमध्ये सारखाच जबाबदार राहील. डॉ. आंबेडकरांची सहकारी शेतीच्या बाबतची ही कल्पना अफलातून आहे. आजपर्यंत कोणत्याही शासनाने किंवा व्यक्तीने या कल्पनेवर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या मते, शेती विकासाचा संबध हा जमीन धारणेशी, जमिनीच्या मालकीशी जोडला गेला पाहीजे. याचा संबध हा फक्त आर्थिक घटकाशी नसून तो सामाजीक अस्मितेशी आहे. तत्कालीन व्यवस्थेत आणि आजही उच्च वर्गाकडे मोठ्यामोठ्या आकाराच्या जमिनी आहेत. तो वर्ग स्वतः जमीन न कसता मध्यमवर्गाकडून कूळामार्फत कसून घेत. कुळाकडून प्रचंड खंड आकारुन त्यांची पिळवणूक केली जाते.

डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या धरणक्षेत्राबाबत स्पष्ट मत व्यक्त केलेले आहे. त्यांच्या मते, उपभोगापेक्षा उत्पादनाला प्राधाण्य दिले पाहीजे. याबाबत ते म्हणतात किफायतशीर धरणक्षेत्र म्हणजे भूमी, श्रम, भंडवल या घटकाचा असा युक्ततम घटक संयोग, जेथे मिळणारे कृषी उत्पादन सर्वाधिक असेल. या घटक संयोगातील बदल हा कृषी उत्पादनावर प्रतीकूल परिणाम करील. आज देशपातळीवर धारणक्षेत्राचे आकारमान वेगाने कमी हे चलले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, वारसा हक्काने जमिनीचे विभाचन व अपखंडन होत आहे. शिवाय त्यांना इतर कोणताही उदरनिर्वाहाचा मार्ग् उपलब्द नसल्याने आणखी तुकडे पडत आहेत या पर्श्वभूमीवर शेतीच्या उत्पादकतेचा विचार करताना फक्त लहान धारणक्षेत्रच कमी उत्पादकतेसाठी कारणीभूत नसून त्याचबरोबर शेतीत वपरणारे तंत्रज्ञान, हवामान, जमिनीचा कस, पावसाचे प्रमाण, सिंचनाच्या सोयी, शेतमाल किंमत, सरकारी गुंतवनूक ई. घटक विचारात घेणे फार महत्वाचे आहे. असे मुलभूत विचार त्यांणी मांडले. डॉ. आंबेडकरांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते, जातीभेद किंवा इतर कोत्याही घटकांचा आधार न घेता सर्व गावक-यांना सामावून घ्यावे यामध्या कोणीही

जमीनदार, कूळ तसेच शेतमजूरही असणार नाही. अशाप्रकारच्या शेतीप्रकारतून जे निव्वळ उत्पन्न राहील ते गावक-यांनी आपापसात वटून घ्यावे. ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीनूसारच करावी ज्यामुळे कोणावर अन्याय होणार नाही. तसेच शेती हा उद्धोग आसावा. त्यांच्या मते आर्थिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय सामाजिक आणि राजकिय समता प्रस्थापित होणार नाही.

शेतीच्या उत्पादनाबाबत डॉ. आंबेडकरांनाच्या मते, जमिनदरीचे निर्मूलन झाल्यानंतर सरकार जमिनीचे मालक बनेल. यंत्रप्रधान शेतीची वाढ, विस्तृत्व शेती, सहकारी व सामुदायिक शेती आणि मजुरांना किमान वेतन यांचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी धरला. “जर्नल ऑल इंडियन इकॉनॉमिक सोसायटी” या नियतकालिकेत “लहान शेतजमिन आणि त्यावरील उपाय” हा लेख प्रसिध्द केला. त्यात त्यांनी लहान लहान तुकड्यांमुळे शेतीचे नूकसान होते. म्हणून जमिनीचे एकत्रीकरण झाले पाहिजे. शेती सुधारणेसाठी औद्दोगिकरण उपयुक्त आहे. असे त्यांचे मत होते. औद्दौगिकरणामुळे जमीनीच्या एकत्रीकरणाला चलना मिळते. जमिनीवर अवलंबून असणारी अतिरिक्त लोकसंख्या कमी झाली पाहिजे. तुकड्यांचे एकत्रीकरण झाल्यास उत्पादन वाढेल. शेती कसण्यासाठी देताना जातीपातीचा विचार केला जाऊ नये. शेतीच्या मशागतीसाठी पाण्याचा पुरवठा, जनावरे, खते, अवजारे, बी-बियाणे यांच्या स्वरुपात आर्थिक मदत सरकारने द्यावी. मागासलेल्या जाती बहुतांश खेड्यात राहातात म्हणुन शेती ही सरकारी उद्दोग म्हणून मानली जावी. तसेच पडीक व नापिक जमिनीचाही त्यानी विचार केलेला दिसतो. समझोता आयोग स्थापन करुन पडीक विकाउ जमिनी खरेदी करण्याचा अधिकार द्यावा अशा जमिनी विश्वस्थ मंडळ नेमुन त्या मागासवर्गीयांना कसण्यासाठी द्याव्यात ही अत्यंत महत्वाची शिफरस डॉ. आंबेडकरांनी केली, परंतु याकडे सरकारने मुळच लक्ष दिले नाही. यामुळे देशाचे फार मोठे नकसान झाले. अशा जमिनी सरकारने अत्यल्प खंडाने दीर्घमुदतीच्या भाडे पटीने सहकारी सोसायट्यांना विशेषतः समाजातील सर्व वर्गातील शेतमजुरांना कसण्यासाठी द्याव्यात. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांनी भारतातील कृषि विकासासाठी शेती उत्पादन, अल्पभूधारक व त्यावरील उपाय, किफयतशीर धरणक्षेत्र, जमिनीचे यांत्रीकीकरण, सिंचन, अनुदाने, आर्थिक मदत तसेच शेतकरी व शेतमजूर यांच्या सर्वांगीन ऊन्नतीसाठी मोलाचे विचार मांडले आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न केले.

**संदर्भः**

1. पी. आर. कुमानाचे, आर्थिक विचारांचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद
2. माधव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिचिंतन, लोकायत प्रकाशन सातारा.
3. एस. एम. खंदारे, जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद
4. अर्थसंवाद, अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, एप्रिल-जून 2016/खंड 40 अंक 1.
5. पी. आर. कुलकर्णी, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# छत्रपती शाहू महाराज आणि महिला सक्षमीकरण

**डॉ. निलेश गोकुळ शेरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग ता. तुळजापूर, जिल्हा. उस्मानाबाद.

**प्रस्तावना**

महाराष्ट्राची जडणघडण ही फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांनी झालेली आहे. छत्रपती शाहू महाराजांचे वेगळेपण म्हणजे राजा असूनही त्यांनी आपल्या राज्यात दंडाचा वापर प्रत्येक घटकाचा विकास करण्यासाठी केला . तत्पूर्वी महात्मा फुले यांनी महा राष्ट्रात समतेची बीजे पे रली. त्यांनी शूद्रातिशूद्रांना , स्त्रियांना गुलामी मधून आणि अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढण्याचे काम केले . महात्मा फुले यांची ही परंपरा खंडित न होता ती शाहू महाराजांच्या कार्यातून प्रवाहित राहिलेले आपणाला दिसून येते . ब्रिटीशांच्या मांडलिक त्वात छत्रपती शाहू महाराजांनी केलेले कार्य हे संपूर्ण भारतात अभिनव असेच होते . शाहू महाराजांच्या काळातील अनेक समाजसुधारकानी आपापल्या परीने समाजसुधारणेचा प्रयत्न केला.मात्र ते कार्य समाजाच्या वरच्या स्तराच्या सुधारणेचे कार्य होते असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. मात्र छत्रपती शाहू महाराजांनी केलेले कार्य हे सर्व स्तराना स्पर्श करणारे होते.छत्रपती शाहू महाराजांनी दोन पातळयांवर स्त्री सक्षमीकरणाचे कार्य केले एक म्हणजे स्त्री शिक्षित झाली पाहिजे यासाठी प्रयत्न केले . तर दुसऱ्या बाजूला त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले पाहिजे यासाठी त्यांनी काही कायद्यांची निर्मिती केली.

एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये ज्या समाजसुधारणा आणि जाती विरोधी चळवळी उदयास आल्या त्यात मुख्य विषय हा स्त्री सुधारणाचा होता . छत्रपती शाहू महाराजांचा कालखंड म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाचा प्रारंभ होय . छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे वर्णन अगदी दोन शब्दात करायचे झाले तर ते एक मानव मुक्तीचे कार्य होते असे म्हणता येईल . हे मुक्ती जशी वर्णवर्चस्ववादी गुलामगिरीपासून होती तशी ती अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट रूढी, परंपरा आणि धर्मशास्त्राचे अन्याय दंडक या मध्ययुगीन विचारसरणी पासून होती. ज्या बहुजन समाजाला महाराज वर्ण वर्चस्वापासून मुक्त करू पाहत होते त्या समाजातील अधिकाधिक संख्या ही स्त्री वर्गाची होती आणि हा स्त्री वर्ग पुरुषी वर्चस्वाखाली व त्यांनी निर्माण केलेल्या गुलामगिरीत पिचत होता. जो बहुजन समाज वर्णवर्चस्ववाद त्यांच्यापासून मुक्ती मिळु पहात होता त्या समाजाने आपल्या घरातील स्त्रियांना ही आपल्या पुरूषी वर्चस्वापासून मुक्त ठेवले पाहिजे . अशा प्रकारची व्यापक सामाजिक दृष्टी महाराजांना होती . या दृष्टिकोनातूनच महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक स्त्रीमुक्तीचे निर्णय व कायदे केले

**छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील स्त्रियांची स्थिती**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात स्त्रीयांना भेडसावणाऱ्या अनेक समस्या होत्या यामध्ये सती प्रथा, शिक्षणावर बंदी, बालविवाह, विधवा विवाहास बंदी,केशवपण अशा अनेक वाईट गोष्टी समाजात चालू होत्या. यामुळे स्त्रियांच्या जीवनावर अनेक जाचक निर्बंध येत होते बा लहत्या महाराष्ट्रात प्रचलित नव्हती , सतीची चाल ही सर्रास नव्हती मात्र बालविवाह नुसता रोडच नव्हे तर शास्त्रसंमत होता. इतर सर्व प्रांताप्रमाणे पुत्र जन्म हा आनंदाचा आणि कन्येचा जन्म हे मात्र महासंकट अशी भावना येते होती . पण कन्या हत्या विशेष घडत नसत मात्र विधवांचे पाऊल वाकडे पडल्याने भ्रूणहत्या मात्र मोठ्या प्रमाणात घडत असत. कन्या मृत्यू स्थान होण्यापूर्वी तिचे लग्न झालेच पाहिजे असा दंडक होता . दहा वर्षाहून अधिक वयाची एखादी मुलगी कुमारिका राहिल्यास सामाजिक टिकेला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे बालवयातच मुलींचे लग्न उरकण्याची घाई केली जात असे . सात आठ वर्षाचा नवरदेव आणि दिड दोन वर्षाची मुलगी मिरवत लग्न लावल्याच्या वार्ता तत्कालीन वर्तमानपत्रात सर्रास वाचायला मिळत असत.1873 मध्ये पुण्यात तीन आठवड्यात साडेसातशे विवाह झाले. त्यात बहुतेक वधूंचे वय आठ वर्षाच्या आसपास होते. अगदी लहान वयात मुलींना वैधव्य येत असत . तसेच गरी बाच्या मुली पैशाच्या लोभाने श्रीमंत जठार वरांना दिल्या जात. अशा मुली ही अल्पकाळातच विधवा होत असत . तसेच महाराष्ट्रामध्ये कन्या हत्याची माणूस प्रथा देखील महाराष्ट्रामध्ये होती. विधवांचे पाऊल वाकडे पडू नयेत म्हणून भृणहत्या महाराष्ट्रामध्ये केली जात असायची . थोडक्यात तत्कालीन काळात स्त्रियांवर अन्याय होणाऱ्या अनेक प्रताप महाराष्ट्रामध्ये प्रचलित होत्या आणि या मोडीत काढण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केलेले आपल्याला दिसून येते.

**महिला सक्षमीकरणासाठीशाहू महाराजांनी केलेले कार्य**

**स्त्री शिक्षणावर भर**

महाराजांनी आपल्या सामाजिक कार्यात स्त्री शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले. महाराजांनी स्त्री-पुरुष उच्च-नीच असा भेद न करता सर्वांकरिता सर्वसमावेशक , सार्वत्रिक शैक्षणिक कार्यहाती घेतली . महाराजांच्या शिक्षण विषयक सर्वसाधारण सूत्रांमध्ये व्यापक समाज शिक्षण हे प्रमुख सूत्र आहे.शाहू महाराजांनी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेता यावे यासाठी मागास , डोंगरी भागात शाळा सुरू केल्या . एवढेच नव्हे तर जातिभेद ओळखून जातीनिहाय मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या. मुलींची शाळेची संख्या वाढल्यावर शिक्षकांना बक्षिस देण्याची पद्धत त्यांनी सुरू केली होती .स्त्रियांच्या प्रशिक्षणासाठी शाहूमहाराजांनी कार्य केलेले दिसून येते .1919 मध्ये शाहू महाराजांनी मागासवर्गीय स्त्रियांसाठी हुकुम काढून ज्या स्त्रियांना शिक्षण घ्यायचे असेल त्यांची राहण्याची , खाण्याची सर्व सोय राजवाडामार्फत मोफत केली जाईल अशा प्रकारचा वटहुकूम त्यांनी काढला .1919 मध्ये एक जाहीरनामा काढून स्त्री शिक्षण ,लॉजिंग-बोर्डिंग मोफत केले .राजाराम महाविद्यालय शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला .रमाबाई केळवकर यांना स्त्री शिक्षण अधिकाऱ्याचे पद देऊन स्त्री शिक्षणात गती देण्यात आली .महाराजांनी राज परिवाराचा विरोध झुगारुन त्यांच्या विधवा सून इंदुमती देवीला शिक्षण दिले .एवढेच नव्हे तर मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांनी अनेक प्रकारची बक्षिसे व शिष्यवृत्या देण्यास प्रारंभ केला .तसेच मुलींना उच्च शिक्षण घेताना सामाजिक आर्थिक अडसर येऊ नये यासाठी महाराजांनी राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना उच्च शिक्षण मोफत केले होते. थोडक्यात आपल्या संस्थानात स्त्रियांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी छत्रपती शाहू महाराजांनी तळमळीने केलेले कृतिशील प्रयत्न स्त्री शिक्षणाच्या इतिहासात विशेष नोंदवावेत असेच आहेत.

**स्त्री यावरील कौटुंबिक हिंसा विरोधी वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा**

शाहू महाराजांच्या काळात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन चूल आणि मूल या म्हणीप्रमाणे होता .राजश्री शाहू महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या पुरोगामी व लोक कल्याणकारी राज्य कारभाराची एक प्रकारे ग्वाहीच दिली होती . स्त्रीयावर समाजात अन्याय अत्याचार होतात त्याचप्रमाणे ति ज्या कुटुंबाची घटक असते तिथेही तिचा कौटुंबिक छळ केला जातो . या पार्श्वभूमीवर राजश्री शाहू महाराजांनी कौटुंबिक हिंसा विरोधी केलेला कायदा म्हणजे स्त्रियांना न्याय देण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनाचा पुरावा आहे. हा कायदा 2 ऑक्टोंबर 1919 रोजी त्यांनी केला . हा कायदा असे प्रतिपादन करतो की , हिंदुस्तानात पाश्चात्य शिक्षणाचा इतका मंदगतीने प्रसार होत आहे की , त्याचा स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कामी व्हावा तितका उपयोग होत नाही . हिंदू शास्त्रकारांनी कुटुंबातील पुढारी यास प्रसंग विशेष हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली आहे . पण या परवानगीचा परवानाच आपल्याला मिळाला आहे अशी पुरुषांची समजूत झालेली आहे. आणि म्हणून पुरुष वर्गाकडून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारास आळा घालावा म्हणून हा कायदा केला आहे .या बाबतच्या कायद्यात शाहू महाराजांनी केलेले स्पष्टीकरण फारच बोलके आहे.

**बाल विवाहास विरोध**

राजश्री शाहू महाराज यांनी 1991 साली मध्यवर्ती कायदा मंडळाने संमती वयाची बिल पास करून विवाहाचे वय बारा वर्ष असले पाहिजे असा निर्बंध घातला . या कायद्याविरुद्ध त्याकाळी सनातनी नेत्यांनी जोरदार विरोध केला हा धर्मावर हल्ला आहे असे ही म्हटले . त्या काळी सर्व साधारणपणे सात ते आठ वर्ष पर्यंतच्या मुलीचे विवाह होत. वयाची बारा वर्षे म्हणजे फार मोठा आघात सनातन्यांना वाटत होता .मात्र हा सर्व विरोध झुगारून हा कायदा गॅझेटियरमध्ये प्रसिद्ध केला .या कायद्यातील क्रांतिकारी बाब म्हणजे मुलींना स्वतःच्या मतानुसार जोडीदार निवडीची तरतूद होती . विवाहाच्या बाबतीत एका अर्थाने स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य देणारा हा कायदा होता असे प्रतिपादन केले तर वावगे ठरणार नाही.

**आंतरजातीय विवाह कायदा व जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य**

राजश्री शाहू महाराजांच्या काळात आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहशास्त्रसंमत नसल्याने ते बेकायदेशीर ठरवले जात असे. तसेच विवाह एक धार्मिक बाब मानली जाईल. धार्मिक विवाहित स्त्रीला दुय्यम लेखून तिचे शोषण केले जात असे . हे स्त्रीचे होणारे शोषण थांबविण्यासाठी महाराजांनी 12 जुलै 1919 रोजी आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा आपल्या संस्थानात लागू केला . या कायद्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जाती निर्बंध न पडता कोणत्याही धर्माच्या मनुष्याची विवाह करण्याची मुभा देण्यात आली. तसेच 14 वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकांची

संमती आवश्यक असणार नाही.म्हणजेच स्त्रीला आपल्या जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे कलम या कायद्यात समाविष्ट करण्यात आले होते .याच कायद्याअंतर्गत शाहू महाराजांनी आपली चुलत बहीण चन्द्रप्रभा यांचा आंतरजातीय मराठा-धनगर विवाह केला होता.

**विधवा पुनर्विवाह कायदा**

विधवांचा विवाह करणे उच्चवर्णीय व स्वतःला श्रेष्ठ जातीचे मानत असणाऱ्या उच्च बरोबर खास सामाजिक दृष्ट्या हलक्या प्रकारचे काम वाटत असे. त्यामुळे लग्नाचे वय लहान असल्याने व साथीच्या रोगात मृत्यूचे प्रमाण खूप असल्याने अल्पवयातच विधवा होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण हे जास्त असे .धर्मशास्त्रीय नियम आणि सामाजिक चालीरीती मध्ये पुनर्विवा हा स प्रतिबंध घालण्यात आला होता . मात्र शाहू महाराजांनी 1917 मध्ये पुनर्विवाहाचा कायदा करून स्त्रियांना फार मोठा कायदेशीर अधिकार दिला. तसेच कायद्यानुसार विवाहाची नोंदणी ही बंधनकारक केली.

**पडदा पद्धतीस विरोध**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात तथाकथित उच्च कुलीन मराठा व तत्सम समजणाऱ्या वर्गामध्ये स्त्रीयांसाठी मुस्लीम वर्गाप्रमाणे पडदा पद्धत अस्तित्वात होती . राजश्री शाहू महाराजांनी या पडदा पद्धतीस जाहीर विरोध केला. पडद्यामुळे स्त्रियांमधील शूद्रातिशूद्र गुणांचा सर्वथा नाश होतो अशी राजश्री शाहू महाराजांची भावना होती. राजमाता जिजाबाई साहेब , कोल्हापूर राज्य संस्थापक महाराणी ताराबाई , महाराणी अहिल्याबाई यांचे दाखले देऊन महाराजांनी प्रतिपादन केले होते की , या क्षत्रिय स्त्रियांनी राज्याचा गाडा चालवला आहे, रणांगणावर शत्रूशी लढल्या आहेत. हे काम पडद्यात राहून केवळ अशक्य होते असे ते म्हणतात . स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे त्यांच्या कर्तुत्वाचा मुक्त विकास करण्याचा मानवी हक्क आहे. अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच त्यांनी पडदा पद्धतीला विरोध केला.

**घटस्फोट व वारसा हक्क कायदा**

11 जुलै 1919 रोजी राजश्री शाहू महाराजांनी घटस्पोट कायदा केला . आणि पती-पत्नींना परस्परांमध्ये जमत नसेल तर घटस्फोट घेण्याचा अधिकार या कायद्या ने देण्यात आला. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही हा हक्क दिला . नवरा जबर मारहाण करीत असेल , कोणाद्वारे मारहाण केली असेल , महारोगी व नपुसक असेल, नवऱ्याने दोन वर्षाहून जास्त काळ परित्याग केला असेल तर हा घटस्फोट घेण्याची तरतूद या कायद्यात महाराजांनी स्त्रियांसाठी केली. थोडक्यात स्त्रियांना पती व त्यांचे कुटुंबीय यांच्यापासून छळ होत असेल तर तिला घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य देणारा हा एक महत्त्वाचा कायदा होता.

तसेच करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये 17 जानेवारी 1920 रोजी हिंदू वारसा च्या दुरुस्ती चा कायदा या नावाचा एक महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणेचा कायदा प्रसिद्ध करण्यात आला . यानुसार विविध जाती व वर्णाच्या संततीना मिळणाऱ्या वारसा हक्कातील फरक काढून टाकण्यात आला आणि सर्व जातीच्या संततीना जनक बापाच्या मिळकतीत वारसा हक्क प्रदान करण्यात आला . त्या स्त्रीला अमानुष वागणूक मिळू नये जेणेकरून ती प्रतिष्ठित होता कामा नये ,तिला सन्मानाने आयुष्य जगता यावे ,तिला तिचा हक्क मिळावा अशीच या कायद्या पाठीमागची महाराजांची भूमिका होती.

**अनौरस संततीव देवदासी जोगिनी विषयीचा कायदा**

देवाच्या नावावर देवदासी ,मुरळी,जोगिन यासारख्या देवाला मुली सोडण्याच्या अनिष्ट प्रथा तत्कालीन कालखंडामध्ये अस्तित्वात होत्या.अशा अनौरस संतती बाबतचा आणिदेवदासी जो गिनविषयीचा केलेला कायदा एक क्रांतिकारकच म्हणावा लागेल. अनौरस संततीची सतत हेटाळणी समाजात होत असत . त्यात तर ती स्त्री असेल तर अधिकच उपेक्षा होत . देवाच्या नावाने लहानपणी सोडलेल्या या स्त्रियांना पुढे अत्यंत अनैतिक व दयनीय आयुष्य कंठावे लागत असे. तसेच जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडल्या जातात तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या मनात जनक आई-वडिलांच्या मिळकतीत त्यांचा काही वारसाहक्क राहत नसे. पण देवाला सोडल्यामुळे संबंधित देवस्थानात तिला काही परंपरेने चालत आलेले विशिष्ट रक्कम मिळत (मग ते नीच दर्जाचे का असेनात ) असत . महाराजांनी तेच कायद्याने रद्द करून स्त्रियांना आपल्या जनक आई -वडिलांच्या मिळकतीत वारसा हक्क प्राप्त करून दिले. थोडक्यात देवदासी सारख्या अनिष्ट प्रथा स्त्रियांना किती घातक होत्या याबद्दल महाराजांची दृष्टी किती उदात्त होती हे यावरून स्पष्ट होते.

**सारांश**

राजश्री शाहू महाराजांनी स्त्रियांची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सबलीकरण व संरक्षण करण्यासाठी आणि त्यांना त्या काळामध्ये नसलेले मानवी हक्क प्राप्त करून देण्यासाठी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे अनेक कायदे करून,आपल्या पुरोगामी व लोककल्याणकारी राज्यकारभाराची एक प्रकारे ग्वाहीच दिली होती . थोडक्यात शाहू महाराजांनी केलेले कार्य स्त्री उत्क्रांतीच्या दिशेने उचललेले एक क्रांतिकारी पाऊल होते

**संदर्भसूची**

1) नारायण कांबळे,राजश्री शाहू: नव्या दिशा नवेचिंतन,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद 2011.

2) जयसिंगराव पवार,राजश्री शाहू छत्रपती जीवन व कार्य,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

3) गणपतराव सूर्यवंशी,राजश्री शाहू महाराज आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन, इचलकरंजी 1978.

4) उत्तम कांबळे,राजश्री शाहू महाराज आणि महिला मुक्ती,सुगावा प्रकाशन, पुणे 2003.

5) राजश्री शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान,विद्यावार्ता, आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका, 2020.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक आर्थीक विचारांचे अध्ययन

**श्री. एच. व्ही. केळे[१] डॉ. डी. सी. रसाळ[२]**
१अर्थशास्त्र विभाग कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी, जि. उस्मानाबाद.

२अर्थशास्त्र विभाग कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी, जि. उस्मानाबाद

इमेल. harichandra1july@gmail.com

**प्रस्तावना**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, समाजकारण यांवर ज्या लोकांचा प्रभाव पडला त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव हे अग्रस्थानी दिसून येते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाहीचे पुरस्कर्ते, सामाजिक चळवळीचे प्रणेते, ग्रंथवेडे व्यक्तिमत्व , मानवी स्वातंत्र्याचे मुल्य जपणारे, खंबीर पत्रकार अशा वेगवेगळया स्वरुपाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची देशात आपल्या कर्तत्वाचा ठसा उमटिवला आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही क`षी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय शेतीचा चिकीत्सक अभ्यास व्हावा, असे मत आंबेडकरांचे होते. भारतीय शेतीचे स्वरुप, भारतीय शेतीतील पीक पदधती, कोणते पिक किती घ्यावे, जमीन धारणा कशी असावी, शेतसारा किती असावा, शेतीसाठी पतपुरवठा, शेतीसाठीची सावकारी, भाडेपटटीने घेतलेल्या जमीनीचा काळ किती असावा, उत्पादन घटकांचे एकमेकांशी प्रमाण काय असावे. इ. प्रश्नांचा अभ्यास त्यांनी केला. तसेच या प्रश्नांच्या बाबतीत उपाय सुचवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी आपला पी.एचडी शोधप्रबंध हा अर्थशास्त्र या विषयावर लिहीला. त्यांनी शेती आणि शेतकरी याची स्थिती कशामुळे दयनीय आहे, यावर सखोल अभ्यास करुन १९१८ मध्ये The Journal of Indian Economic Society च्या अंकात Small Holdings In India and Their Remidies हा लेख लिहीला. तसेच या लेखात भारताच्या शेती प्रश्नांवरील मुलभूत समस्यांवर भाष्य होते

**उद्यीष्टे**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जमीन धारणा व शेतसारा याविषयीच्या विचारांचा अभ्यास करणे.
२) डॉ. बाबासाहे आंबेडकर यांच्या आर्थीक विचारांचा अभ्यास करणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पध्दती विरुध्द केलेल्या कार्याचा आढावा घेतला.

**संशोधन पध्दती .** प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दु¸यम साधन सामुग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध दु¸यम स्त्रोताचा उपयोग केला आहे. त्यात विविध संदर्भग्रंथ, मासिके, पुस्तके, इंटरनेट, इ. साधनांचा वापर केला.

**शेतसारा .** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरयांकडून वसुल केल्या जाणारया शेतसा-याविषयी आपले विचार व्यक्त केलेले आहे. भारतात त्या काळी जमीनदारी प्रथा अस्तित्वात होती. जमीन कसण्यासाठी कुळाकडे तसेच शेतकरयांकडे दिल्या जात होत्या. शेती ही सरकारी उत्पनाचा विचार न करता कुळ व शेतकरयांकडून मोठया प्रमाणात शेतसारा वसुल केला जात असे. अशाप्रकारे वसुल केला जाणारा शेतसारयास आंबेडकरांचा विरोध होता. शेतसारा वसूल करणे, ठराविक कालावधीनंतर शेतसारा वाढविणे ही शेतकरयांची लुट असून त्यामुळे शेतकरयांच्या विकासात अडथळा येतो असे त्यांनी निदर्शसनास आणून दिले. शेतसारा आकारणी ठरवून देण्यासाठी ब्रिटीश सरकारने '' लॅड रेव्हेन्यू कमीटी '', नेमली. डॉ. आंबेडकरांनी या कमीटीची भेट घेवून चर्चा केली. तसेच १८ ऑगस्ट १९२५ ला शेतकरयांचे प्रश्न, हा लेख केसरीत प्रसिध्द करुन शेतसारा विषयी आपली भुमिका स्पष्ट केली. त्यांनी त्यांच्या या लेखात म्हटले की, शेतीच्या निव्वळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरुन सरसकट शेतसारा आकारणी गैर व अन्यायकारक आहे. खर्च वजा जाता राहील ते उत्पन्न असा ठोकताळा घेतला असला तरी खर्च आणि उत्पन्न यांचे प्रमाण सर्व सारखेच

सापडणार नाही. कधी कधी खर्च खुप मोठया प्रमाणावर करावा लागतो. उत्पन्नानूसार कर लावण्याची पध्दती आणि कायदा असताना शेतसारा आकारणी बेकायदेशीरपणे होत होते, असे मत डॉ. आंबेडकर यांचे होते. सरकार जमीनीवरील उत्पन्नावर कर बसवते की जमीनीवर \ शेतकरयावरील कर की उत्पन्नावर कर \ म्हणून शेतसारा वसूल केला जातो, हे जरा न्यायाने ठरविले पाहिजे. ही त्यांची आग्रही भुमीका होती. सरकारद्वारे लावला जाणारा शेतसारा कमी उत्पन्न असणारया शेतकरयांना न्याय ठरेल यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यासंबंधी उपायही सांगितले आहेत. ही सुधारणा आपल्याकडे घडवून आणण्यासाठी इन्कम टॅक्स ॲक्ट मधील कलम ४, पोटकलम ३, बाब रदद करणे प्राप्त आहे. व तीच कलम ६ मध्ये बाब ७ म्हणून घेतली पाहीजे, असे झाल्यास पाच महत्वाचे फायदे होतील.

१) शेतीचा कर शेतीच्या उत्पन्नावर न बसविता शेतकरयाच्या क्षमतेवर बसवला जाईल

२) कराचे चढते प्रमाण लागू झाल्याने गरीब व श्रीमंत शेतकरयांत जो अन्याय होतो तो टळेल.

३) किमान ऐपतीच्या मर्यादेच्या आतील शेतकरयांची कराच्या बोजापासून सुटका होईल

४) जमीन महसुलाची बाब वसुलीच्या द`ष्टीने जमाबंद न राहता तीच्या जमेत एक प्रकारचा लवचिकपणा दिसेल.

५) लहान धारण क्षेत्र असणारया शेतकरयांची मालकी कायम ठेवून सहकारी तत्वावर शेती करणे बंधनकारक केले पाहिजे.

असा नवा द`ष्टीकोन शेतसारा पध्दतीचा असेल तर त्यातून शेतकरयांना न्याय देता येईल. तसेच गरीब शेतकरयांची पिळवणूक थांबेल अशी भुमीका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती.

**जमीनीचे एकत्रिकीकरण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे निदर्शनास आले की, भारतामध्ये असणारया शेतकरयामध्ये अल्पभुधारक शेतकरी मोठया प्रमाणावर आहेत. त्यामुळे शेती व्यवसाय व शेतकरी यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. आंबेडकरांनी शेतजमीनीच्या बाबतीत असे सांगितले की, भारतात जमीनीवर जगणारया लोकसंख्येचे प्रमाण खुप अधिक आहे. तसेच एकत्रित कुटूंबपध्दतीचा झपाटयाने ह्यास होत आहे. प्रत्येक व्यक्ती पिढयानपिढया वारसाला मिळणारया हक्काविषयी जाग`त असल्याने जमीनीचे कितीही लहान लहान तुकडे होत आहेत. या शेतीजमीनीच्या या लहान तुकडयामुळे शेती उत्पादनाचा खर्च वाढणे, शेतीच्या प्रगतीवर अडथळा येणे, आपआपसांतील वादामुळे कोर्ट कचेरयामध्ये वेळ व पैसा वाया जाणे, शेतजमीनीवर मजुरांकडून जास्तीचे काम न करुन घेता येणे, इ. समस्या निर्माण होतात. हयावर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जमीनीचे एकत्रिकरण पुढील पध्दतीने केले जावे असे सुचविले.

१) स्वंयस्फूर्तीने जमीनीची देवाण घेवाण अथवा खरेदी&विक्री व्हावी जेणेकरुन जमीनीचे लहान लहान तुकडे एकत्रित होतील.

२) जर जमीनीचे लहान लहान तुकडे कोणत्याही कारणांमुळे होत असतील तर त्या जमीनीच्या विक्रीवर अथवा देवाण घेवाणीवर बंधने घालावीत.

३) शेतजमीनीची खरेदी&विक्री होत असताना शेजारी असणारया जमीन मालकालाच जमीन विकण्याचा किंवा घेण्याचा अधिकार असावा.

४) आवश्यकता वाटल्यास शेतजमीनीचे सक्तीने एकत्रिकरण करावे.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी जमीनीच्या एक्त्रिकरणाचे उपाय सुचवित असताना '' आर्थीक गट '' महत्वाचा मानला. एका कुटूंबाला संपुर्ण रोजगार उपलब्ध करुन देवून त्या कुटूंबाची उपजिविका भागवू शकेल एवढा जमीनीचा हिस्सा होय, ही बाब लक्षात घेवून एकत्रिकरणाची प्रक्रिया पुर्ण करावी. शासनाने नेमलेल्या '' बडोदा समीतीने '' जमीनीच्या एकत्रिकीकरणावर शिफारस केली होती. एखादया भागातील अर्ध्यापेक्षा जास्त शेतकरी जोपर्यंत या एकत्रिकीकरणाला आपणहून प्रतिसाद देत नाहीत तोपर्यंत शासनाने एकत्रिकरणाची सक्ती करु नये. जी पध्दत शास्त्रशुध्द असेल त्याच पध्दतीचा कायदा पुढे संमत करुन जमीनीचे एक्त्रिकीकरण घडवून आणावे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते.

**किफायतशीर शेती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी किफायतशीर शेती विषयी मत व्यक्त केले. भारतामध्ये एकत्र कुटूंब पध्दतीमुळे कर्त्या व्यक्तीवर सर्वांना पोसण्याची जबाबदारी असते. त्यामुळे एखादे कुटूंब मोठे असून शकते. अशा मोठया एकत्रित कुटूंबाचा शेतातून मिळणारे उत्पन्न वर्षभर पुरेसे नसेल, ते अपुरे असेल, तर यामध्ये त्या शेतीचा किफातशीर धारणा नाही असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आंबेडकर यांच्या मते शेतीचा उपयोग करीत असताना उत्पादनाच्या घटकांचे प्रमाण उदा. जमीन भांडवल, मजूर इत्यादीचे प्रमाण कसे आहे, याचा शोध घेतला पाहीजे. एका घटकाचे प्रमाण दुसरया घटकांशी किती असावे हे शास्त्रशुध्द पध्दतीनेच ठरविले जावे. त्यामुळे हया घटकांची महत्तम उत्पादन क्षमता वापरता येईल. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढेल व सर्व कुटूंबाच्या गरजाही पुर्ण होतील. महाराष्ट्[a] राज्य तुकडेबंदी धोरण अंमलात आणित आहे. तेव्हा शेती धारणेबाबत वरील तत्वाचा उपयोग करुन शेती एकत्रिकरण व तुकडेबंदी धोरण अंमलात आणले तर निश्चीतच महाराष्ट्रातील शेती उत्पादन क्षमता वाढून अन्नधान्याचा प्रश्न सोडविता येईल.

**शेतीस भांडवल पुरवठा**

शेती व शेतकरी याविषयी सखोल अध्ययन केल्यानंतर याविषयीचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी आंबेडकर यांना शेतीमध्ये अधिक भांडवली गुंतवणूक गरजेची वाटते. शेतीला भांडवलाचा पुरवठा योग्य प्रकारे असेल तर, विकास हा निरंतर होत असतो. जर तो अपुरा असेल तर ती शेतीची एक समस्याच असते. त्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मत व्यक्त करताना म्हटले की, भारतामध्ये रिकामा मजुर आणि निरुपयोगी भांडवल हे दोन्ही महत्वाचे प्रश्न आहेत. परंतू हे दोन्ही प्रश्न एकमेकांपासून भिन्न आहेत. कारण भांडवल नुसते अस्तित्वात असते. तर मजुर मात्र स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी जगत असतो. याचा अर्थ असा कि, भांडवल पडून राहणे म्हणजे काहीही मोबदला न मिळणे, एवढेच नसून त्या भांडवलाला उपभोग्य वस्तुची गरज नसणे उलट मजुर मात्र मजुरी मिळवत असेल अथवा नसेल त्याला जीवण जगण्याला उपभोग्य वस्तू लागतातच म्हणून रिकामा मजुर, कुटूंबावर, देशावर संकट असतो. भांडवल म्हणजे गुंतवणूकीच्या प्रक्रियेतून मिळणारे अधिक्य होय. कुटूंबावर तसेच गुंतवणूकीची प्रक्रियाच योग्य नाही तीथे मिळकत असणार नाही. त्यामुळे साहजिकच भांडवल असणार नाही. या सर्व बाबीचा विचार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती प्रश्नांवर पुढील प्रमाणे उपाय सुचविला आहे. त्याचा उपयोग महाराष्ट्[a] शासनाने शेतीविषयक प्रश्न सोडविताना व शेतीमधून अधिक उत्पादन घेण्याकरीता करावा. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी शेती आधारित उदयोग झपाटयाने वाढवावेत. औदयोगिकरणाला गती द्यावी. शेती आधारित उदयोग आणि इतर पुरक उदयोग शेती व्यवसायाबरोबरच वाढविले तर आपोआपच शेती व्यवसायाचे महत्व वाढेल. शेती उत्पादनाची किंमतही वाढेल. त्यामुळे शेतकरयाचा फायदा होईल. उदयोगाची भरभराट होईल. मोठया प्रमाणावर ग्रामीण भागात रोजगार वाढेल. त्यामुळे ग्रामीण भागातील जनता शहराकडे स्थलांतर करणार नाही. जमीन धारणेच्या एकत्रिकरणाबरोबरच शेती आधारित उदयोग तसेच शेती संलग्न उदयोगाची वाढ करुन औदयोगिकरणास शासणाने प्रोत्साहन देवून नवनवीन उदयोगाची शासणाने उभारणी करावी. त्यामुळे भारतातील शेतीचे प्रश्न सोडविणे शक्य होईल. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करुन शेतीचा विकास घडवून आणता येईल.

**" खोती अधिनियम "**

कोकणातील खोतांनी शेती कसणारया कुळांचे शोषण केले होते. डोंगराळ भागात शेतसारा वसुलीस अडचण असल्याने खोती पध्दत अस्तीत्वात होती. वजनदार आसामी पाहून ही नेमणूक होत असे. खोती पध्दतीत सर्व जमीनी खोतांच्या ताब्यात असे. ब्रिटीशांनी ^^ खोती वतन ^^ अधिनियमाने खोती पध्दतीला मान्यता होती. खोत जमीनीचे हक्कदार असल्याने कुळांकडून व शेतकरयांकडून जमीन कसुण घेणे अशी पध्दती मान्य झाली. गरज पडली तर खोत कुळांना कर्ज देत असत. व्याजाचा दर जबर आणि परतफेडीच्या पावत्या नसल्याने कर्जदार कधीच मुक्त होत नसत. सावकारी कर्ज, शेतसारा, खोतांचा जुलूम यामुळे हे शेतकरी त्रस्त झालेले होते. खोतांच्या शेतात काम करुन कुळांना एकुण उत्पन्नापैकी ४० टक्यापेक्षा कमी हिस्सा मिळत होता. सावकारी कर्ज असेल तर कधी कधी कुळाचे काम करुनही पदरात काहीच मिळत नसे. या सर्व बाबी विरुध्द चरी येथे दिनांक २७ ऑक्टोंबर १९३३ रोजी संपाला सुरुवात झाली. हा संप एकुण सात वर्षे

चालला. या चळवळीचे , संपाचे मार्गदर्शन करण्याचे काम वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले होते. या आंदोलनाच्या परिणामातूनच दिनांक १७ सप्टेंबर १९७३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पध्दती नष्ट करण्याचे विधेयक मुंबई विधी मंडळात मांडले.

दिनांक १० जानेवारी १९३८ रोजी मुंबई कौन्सीलच्या असेंब्लीवर भव्य मोर्चा काढण्यात आला. यामध्ये आंबेडकर यांनी भाषण केले. ते म्हणाले की, '' आपले हितकर्ते कोण आहेत \ आपले शोषण कर्ते कोण आहेत \ सावकार, जमीनदार, खोत, श्रीमंत यांच्यापासून कष्टकरी, श्रमजीवी यांचे कल्याण होणार नाही. मुठभर लोक तुमच्यावर सत्ता गाजवित आहेत त्यांच्या विरुध्द संघटित लढण्याची गरज आहे. सरकारचे साहयय मिळण्याची शक्यता नसल्याने आपण आपली स्वतंत्र संघटना करुन सर्व प्रकारचे भेद विसरुण लढा दिला पाहिजे. यावेळी सरकारकडे मुलभूत अशा चार तर तातडीच्या तेरा मागण्या करण्यात आल्या होत्या. या संपाच्या आणि मोर्चाच्या परिणामामुळे तत्कालीन महसुल मंत्री मोरारजी देसाई यांनी नेमलेल्या समितीने दिलेला अहवाल शेतकरी व खोतांनी स्वीकारला. या प्रदीर्घ संपामुळे १९४८ साली जमीन महसुल संचिता बदलली. खोती निर्मुलन अधिनियम १५ मे १९५० पासून लागू करण्यात आले. त्यानूसार खोती पध्दत नष्ट झाली. पुढे कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ नूसार कसेल त्याची जमीन, हे तत्व लागू करण्यात आले.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थीक विचारामध्ये मोलाची भर घातलेली आहे. हे त्यांच्या आर्थीक विचारातून दिसून येते. त्यांनी शेतजमीनीविषयक विचारांमध्ये शेतसारा, जमीनधारणा, शेतीला आवश्यक भांडवल पुरवठा, जमीनीचे एकत्रिकरण याविषयी सखोल असे विचार मांडलेले आहेत. याबाबत विचार मांडून त्यांनी शेती विषयक असणारया समस्यांवर उपाय शोधून शेतीचा विकास साधण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे. सर्वांगिण विकासासाठी सामाजीक, आर्थीक विषमता कमी होवून समाजातील सर्व घटकांचे आर्थीक शोषणांपासून संरक्षण व्हावे व देशात नियोजनबध्द अशी अर्थव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्या या विचारांशी आज देशाला गरज असलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ. जाधव नरेंद्र (१९९२), ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थीक विचार आणि तत्वाज्ञान'' सुगावा प्रकाशन पुणे. अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विशेषांक.

२) फडके भालचंद्र (१९८५), '' डॉ. बाबासाहेब आंबेडकर '' श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३०.

३) कीर धनंजय (१९८४), '' डॉ. बाबासाहेब आंबेडकर '' पॉप्युलर प्रकाशन, ३५ पं. मालवीय रोड, ताडदेव, मुंबई.

४) डॉ. लुलेकर प्रल्हाद (२०१५) '' अनंत पैलूचा सामाजिक यौध्दा '' सायन पब्लिकेशन प्रा.लि., सदाशिव पेठ, पुणे.

५) तत्रैव खंड – १९, पान ५३

६) तत्रैव खंड – १९, पान ५९

७) प्रा. रायखेलकर ए.आर. (२००५), '' आर्थीक विचारांचा इतिहास '' विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगपुर, औरंगाबाद.

८) डॉ. कविमंडन विजय (१९९३), '' आर्थीक विचारांचा विकास '' श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर.

९) गवळी, टी.एल. (१९५१), ''बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ'' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर.

१०) Kuber W.N. (1978), B.R. Amedkar, Publication Division, Ministrary of information and broadcasting Govt. Of India.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य

**प्रा.तुळशीदास मोकल**
इतिहास विभाग प्रमुख कोकण एज्युकेशन सोसायटीचे, डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय,रोहा-रायगड.

**प्रस्तावना :** ज्या महान नेतृत्वाने आपल्या समग्र कार्यप्रणालीच्या जोरावर आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन आपल्या कार्याचा स्वतंत्र व सार्वत्रिक असा कायमस्वरूपी ठसा उमटविला असे महान नेतृत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. महामानव, विश्वरत्न,भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, प्रख्यात कायदेपंडित, लोकशाहीचे पुरसकर्ते, सामाजिक क्रांतीप्रवाहाचे कृतिशील नेतृत्व,स्त्रीयांना न्याय हक्क मिळवून देणारे स्त्रीउद्धारक,दलित उद्धारक,थोर अर्थतज्ञ, जलतज्ञ, शेतकरी व कामगारांचे आधारस्तंभ, निर्भीड पत्रकार, उत्तम लेखक, ,एक आदर्श प्राध्यापक व प्राचार्य अशा विविधांगी कामगिरीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आपणां सर्वांना परिचीत आहे.अशा महान नेतृत्वाचे एक यापेक्षाही वेगळे कार्य आहे आणि ते कार्य म्हणजे त्यांचे शैक्षणिक विचार व कार्य होय.याचीच माहिती प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण विषयक विचार** :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की प्रत्येक राष्ट्राच्या व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षण हे महत्वाचे असते. म्हणूनच प्रत्येक राष्ट्राने प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे करावे असे केल्याने शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही .त्याचबरोबर हे शिक्षण विद्यार्थ्यांना दर्जेदार कसे मिळु शकेल या साठी प्रत्येक शाळांनी कसोशीने प्रयत्न केले पाहिजे .केवळ लिहिता वाचता येण्यासाठी हे शिक्षण देवू नये तर त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक जडणघडणीस हे शिक्षण उपयुक्त कसे ठरेल यासाठी ते शिक्षण द्यावे.ज्या देशातील शासन अशा प्रकारच्या शिक्षण व्यवस्थेबाबत उदासीन असतो त्या ठिकाणी अशा प्रकारच्या शिक्षण व्यवस्थेसाठी कायदे करणे गरजेचे आहे.थोडक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण विषयक विचारात,सक्ती, कायदा, दर्जेदारपणा व उपयुक्तता या गोष्टींना महत्व दिले आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे उच्चशिक्षण विषयक विचार** : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उच्चशिक्षण विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की,"जे व्यक्तीसमूह उच्चशिक्षणाचा लाभ घेण्यास पात्र आहेत मात्र त्यांच्या बिकट आर्थिक स्थितीमुळे या प्रकारचे शिक्षण घेता येत नाही अशा समूहासाठी विद्यापीठ ही प्राथमिक स्वरूपाची यंत्रणा आहे".म्हणजेच विद्यापीठे ही उच्चशिक्षणाची केंद्र व द्वारे आहेत हे त्यांना या विचारातून स्पष्ट करावयाचे होते.याही पुढे जावून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या शीलान्यास प्रसंगी बोलतांना असे म्हटले होते की," मी हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे मला उच्च शिक्षणाला महत्व किती आहे हे मला माहित आहे.समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानले जाते. पण हे चूक आहे.कारण हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्यूनगंड नाहीसा करणे.हेच खरे उच्च शिक्षणाचे ध्यय आहे.म्हणूनच आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हा एकमेव उपाय आहे".थोडक्यात उच्च शिक्षण विषयक विचार मांडताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणाचे केंद्र असणाऱ्या विद्यापीठीय शिक्षणाचे महत्त्व व उच्च शिक्षण घेत असतांना या समूहातील

विद्यार्थ्यांनी आपल्या मानसिकतेत बदल कसा करावा व आपल्या मनामध्ये निर्माण होणारा न्यूनगंड कसा दूर करावा या बाबत आपले विचार मांडले आहेत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणविषयक विचार :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विज्ञान व तंत्रज्ञान विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की, विज्ञान व तंत्रज्ञान विषयक शिक्षण हे व्यावसायिक शिक्षण आहे हे शिक्षण वंचित व दुर्लक्षित समूहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे घेणे शक्य नाही म्हणून या प्रकारच्या शिक्षणासाठी शासनाने पुढाकार घेवून
अर्थसहाय्य करावे तसेच हे शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती स्वरूपात वार्षिक अनुदान उपलब्ध करून द्यावे. तसेच या प्रकारचे शिक्षण जर हे विद्यार्थी जर बाहेरच्या देशात जावून घेत असतील तर शासनाने अशा विद्यार्थ्यांना अनुदान द्यावे.थोडक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षण विषयक मांडताना हे शिक्षण वंचित व दुर्लक्षित समूहातील विद्यार्थ्यांनी घ्यावे व त्यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी अशी भावना व्यक्त केली आहे .

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विद्यापीठीय शिक्षणाबाबतचे विचार :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठीय शिक्षण विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की, विद्यापीठे ही उच्च शिक्षणाची केंद्रे आहेत.म्हणून विद्यापीठानी आपल्या ध्ययाला व कार्याला अनुसरून काम करावे. विद्यापीठ शिक्षण यंत्रणेत उणिवा असतील तर त्या दुर करान्यात.वेगवेगळया जातीतील विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतिक विचारांची आदानप्रदान निर्माण करण्यासाठी विद्यापीठाने प्रयत्न करावेत व विद्यार्थ्यांमध्ये सळोखायचे वातावरण कसे राहील यासाठी प्रयत्न करावेत. तसेच विद्यापीठाने ग्रंथालयांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे.विद्यापीठ ही फक्त परीक्षा घेणारी यंत्रणा नसावी तर ती शैक्षणिक कार्य करणारी यंत्रणा असावी तसेच पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचे विभाजन न करता दोन्ही ठिकाणच्या शिक्षणाची जबाबदारी विद्यापीठाकडेच ठेवावी या बाबत विचार मांडले.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठात अध्यापनाचे काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या बाबत असे म्हटले आहे की ," प्राध्यापकाने आपल्या अध्ययन व अध्यापनाच्या कामात स्वतःला इतके झोकून द्यावे की त्यांना स्वतः च्या घराकडे पाहण्यासाठी त्यांना सवड मिळू नये.घराची जबाबदारी त्यांनी आपल्या पत्नीकडे सोपवून संशोधन करावे. प्राध्यापक नुसताच विद्वान नसावा तर तो बहुश्रुतअसावा. माहितीपूर्ण, मनोरंजक व उत्साही असावा व त्याच्याकडे धमक असावी."थोडक्यात विद्यापीठ हे उच्च शिक्षणाची प्रमुख केंद्र असल्याने या केंद्रामध्ये ज्ञान,कार्य,समानता व विद्वत्ता या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत असे सुचित करण्याची महत्वपूर्ण भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नैतिक शिक्षणाबाबतचे विचार** :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नैतिक शिक्षण विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की,माणसाच्या आयुष्यात केवळ बौद्धिक शिक्षण महत्वाचे नाही तर बौद्धिक शिक्षणाबरोबर नैतिक शिक्षणही महत्वाचे आहे.नैतिक शिक्षणाने माणसाचे शील व चारित्र्य यांची शुद्धता टिकते व माणसामध्ये विचारांची परिपक्वता निर्माण होते.मनुष्य संस्कारक्षम बनतो.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणाबाबतचे विचार** :डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षण विषयक विचार मांडताना असे म्हटले आहे की,"स्त्री शिक्षण महत्वाचे असून स्त्रियांना शिक्षण द्या.त्यांच्या मनात शिक्षणविषयक महत्वाकांक्षा रुजवा. त्यांच्या मनामध्ये शिक्षणविषयक जागृती निर्माण करा व त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करा.".थोडक्यात स्त्रीशिक्षणाने समाजाची प्रगती साधता येईल असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक कार्य:** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ शिक्षणविषयक विचारच मांडले नाही तर शिक्षण प्रसाराची महत्वपूर्ण भूमिकाही निभावली.शिका,संघटीत व्हा संघर्ष करा हा मंत्र देत असतांना त्यांनी शिक्षण प्रसारासाठी १९४६ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व या सोसायटीच्या

माध्यमातून मुंबईला सिद्धार्थ महाविद्यालय व औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाय सुरू केले.तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून काही ठिकानी दलित विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू केले. याहीपुढे जावून त्यांनी मुंबईत विद्यार्थ्यांना राजकारण, अर्थशास्त्र, अंदाजपत्रक, कामगार संघटना, संसदीय कामकाजविषयक नियम आणि परंपरा यांचे प्रशिक्षण देण्यासाठी आदर्श ट्रेनिंग स्कुल फॉर एन्टरन्स टू पॉलिटिक्स स्थापन केली .

**सारांश** :डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार अत्यंत महत्वाचे आहेत. प्राथमिक शिक्षणाने माणसाच्या शिक्षणाची सुरवात होते म्हणुन हे शिक्षण सक्तीचे व उपयुक्त असावे असे त्यांनी म्हटले आहे. उच्च शिक्षण विषयक विचार मांडताना त्यांनी उच्च शिक्षणाचे केंद्र असणाऱ्या विद्यापीठीय शिक्षणाचे महत्त्व व उच्च शिक्षण घेत असतांना या समूहातील विद्यार्थ्यांनी आपल्या मानसिकतेत बदल कसा करावा व आपल्या मनामध्ये निर्माण होणारा न्यूनगंड कसा दूर करावा या बाबत आपले विचार मांडलेआहेत.तसेच त्यांनी विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षण विषयक विचार मांडताना हे शिक्षण वंचित व दुर्लक्षित समूहातील विद्यार्थ्यांनी घ्यावे व त्यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी अशी भावना व्यक्त केली आहे .विद्यापीठ हे उच्च शिक्षणाची प्रमुख केंद्र असल्याने या केंद्रामध्ये ज्ञान,कार्य,समानता व विद्वत्ता या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत असे सुचित करण्याची महत्वपूर्ण मांडली.तसेच त्यांनी स्त्रीशिक्षणाचे आपल्या विचारातून समर्थन केले.तसेच शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.तसेच सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.आदर्श ट्रेनिंग स्कुल फॉर एन्टरन्स टू पॉलिटिक्स स्थापन केली .वरील सर्व माहितीवरून हे लक्षात येते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे कार्य अत्यंत महत्वाचे होते.

**संदर्भ ग्रंथ:**

१.गाठाळ एस.एस,आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन ,औरंगाबाद.

२.कुबेर वा. ना., डॉ.आंबेडकर विचारमंथन, सुगावा प्रकाशन,पुणे.

३.डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री. भालचंद्र फडके,श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

४.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन,म.श्री.दीक्षित,श्री.गजानन बुक डेपो,पुणे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार

**सहा. प्रा. देवशेट्टे सुरेश मनोहरराव**
इतिहास विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासून भारताचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर भारताची ओळख कृषिप्रधान देश म्हणून आहे. वैदिक कालखंडात वैश्य वर्णियांकडे व्यापार व शेतीविषयक कार्य सोपवलेले होते. मध्ययुगात व ब्रिटीश काळात शासन यंत्रणेचा प्रमुख स्त्रोत जमीन महसूल हेच राहिलेले दिसून येते. त्यामुळे बहुतांशी राज्यकर्त्यांनी अतिरिक्त शेतसारा भारतीय जनतेकडून वसूल केल्याचा उल्लेख इतिहासात सापडतो. आज २१ व्या शतकात भारताचे कृषीक्षेत्र अनेक पातळीवर झगडताना दिसत आहे. अलीकडच्या काळात तर कृषीसारख्या महत्वपूर्ण व जिव्हाळ्याच्या विषयाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. शिवाय सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडत चालल्याने देशातील पाणी व शेतीचा प्रश्न अधिकच गंभीर होत चालला आहे. त्यामुळे शेती क्षेत्र हे अनेक समस्यांनी ग्रासले आहे. म्हणून आधुनिक काळात निर्माण झालेल्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती सुधारनेसंबंधी विचारच कृषीक्षेत्राला तारू शकतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वाक्य मनावर आदळले की, शेवटी बाबासाहेब हे केवळ दलित आणि दलितांचे नेते होते, असा देशातील बहुसंख्य लोकांचा समाज झाला व आजही तो कायम आहे. परंतु वास्तव मात्र वेगळेच आहे. त्यांनी केवळ दलितांसाठी नव्हे तर या देशातील तमाम वंचित व शोषितांसाठी कार्य केले. खासकरून शेतकरी, शेतमजूर व महिलांच्या प्रश्नांची विशेष चिकित्सा करून त्यांनी त्यावर उपाय सुचविले. परंतु त्यांच्या कृषीविषयक विचारांची दखल तत्कालीन राजकीय धुरीणानी घेतली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी शेतक-यांच्या हितासाठी शेतीच्या तुकडीकरणास विरोध, खोती पद्धती नष्ट करण्यासाठी विधेयक, नद्या जोड प्रकल्प, दुर्बल घटकांना शेतजमिनीचे वाटप, पिकविमा योजना अशा प्रकारच्या अनेक योजना आखून त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य करणा-यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अग्रभागी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महु या गावी झाला. भीमाबाई व रामजी हे त्यांचे आई-वडील होते. अस्पृश्यता निवारणाच्या कार्याबरोबरच त्यांनी शेतकरी, कामकरी व मजुरांच्या शोषणाच्या विरोधात अनेक चळवळी केल्या. सामाजिक सुधारणा चळवळीबरोबरच समाज प्रबोधनासाठी व शेतक-यांच्या प्रबोधनासाठी 'मूकनायक', जनता, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत अशा वृत्तपत्रांचा अवलंब केला. सामाजिक सुधारणा चळवळीबरोबरच त्यांनी शेतक-यांच्या हितासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांचे कृषीविषयक विचार आजही उपयोगी पडतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ अस्पृश्यता, शिक्षण व दलितांसाठीच झटत नव्हते. तर भारतातील शेती व्यवसायामध्ये सुधारणा झाली पाहिजे, अशा प्रकारचा तीव्र स्वरूपाचा आशावादही त्यांनी वेळोवेळी व्यक्त केला. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून शेतीच्या विविध प्रश्नाकडे त्यांनी पहिले. त्यांचे कृषीविषयक विचार खालीलप्रमाणे आहेत.

**सामुदायिक शेती पद्धती :-**

बाबासाहेबांच्या मते, शेतजमिनीच्या मालकी हक्क पद्धतीत जी काही गडबड झाली त्यामुळे शेती मागासलेली राहिली आहे. म्हणून त्यांनी जमिनीच्या मालकीत बदल घडून आणण्यासाठी "सामुदायिक शेतीची" म्हणजेच शेतीचे राष्ट्रीयकरण करण्याची संकल्पना मांडली. त्यासाठी शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन त्या विकसित कराव्या, अशा विकसित जमिनी ह्या भूमिहीन शेतमजुरांना काही अटीवर कसण्यासाठी द्याव्यात. कारण त्यांना कुळ-कायद्याचा काहीच फायदा होत नाही. केवळ सामुदायिक शेतीच त्यांना मदत करू शकते. कारण हि पद्धती लोकशाही तत्वावर आधारलेली असते. तसेच या पद्धतीत उत्पादकता व कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेत परिवर्तन करणे शक्य होते. शेतक-यांना राज्य शासनाकडून रासायनिक खते, बी-बियाणे, अवजारे आदीचा पुरवठा केला जाईल. तसेच शेतीत उत्पादित होणारा माल प्रत्येक काम करणा-यांना समान वाटला जाईल. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा हि संकल्पना शेतक-यासाठी किती मोलाची आहे. हे अधोरेखीत होते.

**शेतीच्या तुकडीकरणाची समस्या व उपाय :-**

इ.स. १९१८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील शेती क्षेत्रासमोरील समस्यांचे मूलगामी विश्लेषण "स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया एन्ड देअर रेमिडीज" या शोधनिबंधात केले. भारतामध्ये संततिनियमन अभावी वाढती लोकसंख्या व त्यामुळे शेतीचे तुकडीकरण होऊन शेती क्षेत्र लहान बनल्याने जमीन मोठ्या प्रमाणात पडीक बनली. त्याचा परिणाम भारतात बेरोजगारी वाढून अन्नधान्य उत्पादनात घट झाली. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न घटले व दारिद्र्य वाढले. शेतीच्या तुकडीकरणावर त्यांनी उपाय सांगितलेला आहे. त्यांच्या मते, "शेतक-यांनी आपली मुले शेतीवर अवलंबून न ठेवता त्यांना व्यापार, उद्योग व शिक्षण क्षेत्रात घातले पाहिजे. त्यामुळे शेतीवरचा बोजा कमी होईल." ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते.

**खोती पद्धत नष्ट करण्यासाठी विधेयक :-**

शेतक-यांच्या शोषणाबाबत बाबासाहेबांनी परखड असे विचार मांडले होते. शेतक-यांना शासनाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ न मिळाल्यानेच ते सावकाराचा आधार घेतात. त्यामध्ये ते अडकून पडतात. व शेवटपर्यंत त्यांची सुटका होत नाही. शेतीमध्ये असणा-या जाचक अशा 'खोती पद्धती' बद्दलही त्यांनी कडक शब्दात सुचविले होते. मुंबई व कोकण विभागात हि पद्धत प्रचलित होती. या पद्धतीत शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केली होती. जमिनीतून होणा-या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी हि पद्धत होती. या पध्दती विरोधात कोकणातील शेतक-यांनी इ.स. १९३३ ते १९३९ पर्यंत संप पुकारला. या संपास बाबासाहेबांनी पाठींबा देऊन ठिकठिकाणी अनेक सभा घेतल्या. इ.स. १९३७ साली मुंबई कायदेमंडळात हि पद्धत बंद व्हावी, म्हणून बाबासाहेबांनी एक विधेयक मांडले. यामध्ये जमीनदाराच्या माध्यमातून होणारी शेतक-यांची पिळवणूक थांबवून शेतकरी हिताचे संरक्षण व्हावे. व यामुळे शासन व भूधारक यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होणार होता. सर्व शेतक-यांना व कुळाना संघटीत करून सरकारवर शेतकरी हिताचे धोरण अवलंबविण्याचे तंत्र देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी उपयोगात आणले होते.

**नद्याजोड प्रकल्प धोरणाचे जनक :-**

डॉ. आंबेडकरांनी इ.स. १९४२ ते १९४६ या काळात केंद्रीय पाटबंधारे मंत्री असताना कृषी विकासासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी देशातील मोठ्या नद्या जोडण्याचा विचार मांडून भाक्रा-नांगल प्रकल्पाची पायाभरणी केली. त्यासाठी अमेरिकेतील 'युनायटेड स्टेट्स ब्युरो ऑफ टेक्लमेशन' च्या तज्ञ इंजीनियरांची मदत घेतली. या धरणाची उंची ४८७.६८ मीटर एवढी करून कमाल जलसाठा वाढवला. त्याचा फायदा हरिक्रांतीसाठी झाला. कृष्णा, गोदावरी व तापीचे पाणी समुद्रात वाया जावू नये आणि या नद्या एकमेकांना जोडल्या जाव्यात असेही मत त्यांनी मांडले.

**शेतीसाठी उर्जास्त्रोत उभारणीत योगदान :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम प्रादेशिक पॉवरग्रीडची संकल्पना मांडली. त्यांच्या पुढाकारातूनच प्रादेशिक पॉवरग्रीड विस्तार होऊन केंद्रात उर्जा पुरवठा विभाग सुरु झाला. सेन्ट्रल इलेक्ट्रिसिटी अथोरीटी व केंद्रीय जल आयोग च्या निर्मितीतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली भूमिका महत्वाची ठरलेली दिसून येते. केंद्र सरकारने विद्युत निर्मिती व पुरवठा या क्षेत्रात सहभागी होण्याचा पर्याय ठेवावा, याबाबत ते आग्रही होते. औद्योगिक विकासासाठी देखील शेतमालाची आवश्यकता असते. त्यामुळे शासनाने कृषी विषयक धोरणाकडे विशेष लक्ष देऊन स्थलांतरीतांचा प्रश्न सोडवला पाहिजे. हा त्यांचा विचार ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिशा देणारा आहे.

**शेतीविषयी शेतकरी व राज्यकर्त्यांच्या मानसिकतेत बदल :-**

शेतीबाबत आपल्या देशातील शेतकरी व राज्यकर्ते यांची मानसिकता हि शेती हे केवळ एक उदरनिर्वाहाचे साधन आहे अशी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा या मानसिकतेस प्रकर्षाने विरोध होता. आणि म्हणून ते म्हणत की, शेती केवळ उपजीविकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पन्नाचा स्त्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतक-यासह अनेक भूमिहीनांना व मजुरांना रोजगार देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन असला पाहिजे. याबाबत ते आग्रही होते. शेतीचा सर्वांगीण विकास होऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडेल. देशाची अर्थव्यवस्था हि मजबूत बनेल. इतक्या दूरदृष्टीने बाबासाहेबांनी शेतीकडे बघितले होते. व लोकांचा दृष्टीकोन बदलण्याचा प्रयत्न केला होता.

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या आर्थिक नियोजनाचे आणि आर्थिक विकासात्मक धोरणाचेही शिल्पकार होते. त्यांना भारतीय कृषी व्यवस्थेची देखील चांगली जाण होती. भारतासारख्या कृषीप्रधान देशात पाणी

आणि वीज यांचा समानरीत्या पुरवठा झाला, तर भारत एक समृद्ध देश होण्यास वेळ लागणार नाही. असे त्यांचे मत होते. सामुहिक शेतीचे ते पुरस्कर्ते होते. खोती पद्धती ही एक प्रकारची आर्थिक शोषण करणारी व्यवस्था होती. हि पद्धत नष्ट करण्यासाठी बाबासाहेबांनी कायदे केले होते. भारतात सर्वप्रथम नदीजोड प्रकल्प मांडण्यात व हिराकूड, भाक्रा-नांगल प्रकल्प उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्वाचे असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या अर्थनीतीमध्ये नेहमीच शेती व शेतीविषयक घटकांना प्राधान्यक्रम दिल्याचे दिसून येते. औद्योगीकरण व शेतीशी संबंधित घटकांचा सहसंबंध असावा अशा प्रकारचा विचार त्यांनी नेहमीच केला. एकूणच वर्तमान जागतिकीकरणाच्या युगात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार महत्वपूर्ण ठरतो.

**संदर्भ :-**

१) डॉ. गाठाळ साहेबराव – आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
२) गायकवाड यादव – 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर – जीवन आणि कार्य' कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
३) प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर – 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा'
४) प्रा. डॉ. दीपक शेलार – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार, अंक (२ सप्टे २०१६)
५) रितेश पोपळघट – कृषी परिवर्तनासाठी डॉ. बी.आर. आंबेडकरांच्या विचाराची उपयुक्तता. (दै. लोकसत्ता २० एप्रिल २०१८)
६) प्रा. माधव सरकुंडे – बाबासाहेब आणि शेतकरी (दै. लोकमत १४ एप्रिल २०१६)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**रेवडकर गणेश सुभाष**
संशोधक, वाणिज्य विभाग, भूम

**प्रस्तावना:**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक संशोधक ,पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ, धर्मशास्त्राचे अभ्यासक,संस्कृततज्ञ,कायदेतज्ञ,बौध्द साहित्याचे अभ्यासक,दलित व महिलाच्या अधिकाराचे पुरस्कर्ते,भारतीय सविधांचे जनक व गोरगरिबांचे उद्धारक होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाही प्रणालीला प्रोत्साहन दिले.त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून त्यातून त्यांना न्याय, बंधुता,सामंता या विविध मुल्यांची जोपासना केली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सन 1917रोजी न्यूयार्क मधील कोलंबिया विश्वविद्यालयामधून अर्थशास्त्र या विषयावर पीएचडी पदवी प्राप्त केली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थशास्त्र हा मुख्य व आवडीचा विषय होता.त्यांनी जे आर्थिक विचार मांडले आहेत,ते भूतकाळ,वर्तमानकाळ व भविष्यकाळासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.सध्या सुरु असलेल्या आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी व भविष्यात येणाऱ्या आर्थिक अडचणीवर मात करता यावी याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकरनी स्वतःच्या लेखणीतून आर्थिक विचार हे अत्यंत महत्त्वपूर्ण मांडले.

भारताची आर्थिक सद्य:स्थिती हि ढासळलेली दिसून येते.हि स्थिती प्रगतीच्या दिशेने वाटचाल हवी असेल तर प्रथम शेतीव्यवसाय,शिक्षण व औद्योगिकदृष्ट्या विकास यांच्यात काळ सुसंगत बदल होणे हि काळाची गरज आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले आर्थिक विचार

### कर विषयक माहिती:-

भारतावर ब्रिटिश राजवट असताना शेतकऱ्याकडून शेतसारा हा त्याच्या उत्पादन खर्चापेक्षा जास्त केला जात होता.यामुळे शेतीक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झाला. हि कर प्रणाली शेकऱ्यांच्या दृष्टीने अन्यायकारक असून यामध्ये बदल करण्यात यावा.म्हणजे ठराविक उत्पन्न मर्यादेपर्यंत शेतकऱ्याकडून  कर आकारणी करू नये.करामुळे राहणीमानात प्रतिकूल परिणाम होणार नाही असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

करप्रणाली हि पद्धत प्रगतशील असावी.कराचा भार जास्तीत जास्त श्रीमंत वर्गावर पडावा.कर देण्याची क्षमता विचारात घेऊन कराची आकारणी करण्यात यावी.कर आकारणीवर केंद्र व राज्य सरकार अधिकार असावा.जेणेकरून कारच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत भारीव वाढ होईल.यामुळे सर्वसामान्य जनतेच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होईल.

**अर्थनीती विषयी विचार** :डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांनी “Status and Minorities’” या पुस्तकातून भारताच्या विकासाची अर्थनिती कशी असावी यांची योग्य मांडणी केली आहे.यामध्ये गरिबी हटाव, शोषणमुक्तता,तसेच विषमता निर्मुलन यावर जास्त भर दिला.राज्य सरकारने योग्य पद्धतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करावे.तसेच छोट्या छोट्या उद्योजकाचा विकास व्हावा.शेतीव्यवसायाचा विकास व्हावा यासाठी अर्थनिती व्यवस्थापन करावे असे मत मांडले.

**मिश्र अर्थव्यवस्था विषयी विचार** :भारताची सध्याची अर्थव्यवस्था हि मिश्र स्वरुपाची आहे.यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे खूप योगदान आहे.या मध्ये खाजगी व्यवसायिक हे स्वतःच्या  हितसंवर्धनासाठी आर्थिक निर्णय घेत असतो.यामुळे कामगार वर्गावर याचा विपरीत परिणाम दिसत होता.हा विपरीत परिणाम टाळण्यासाठी देशाच्या आर्थिक बाबीवर सरकारचा हस्तक्षेप असला पाहिजे.थोडक्यात राज्यातील महत्त्वचा संस्थेवर सरकारची मालकी असली पाहिजे.उदा.शिक्षण, आरोग्य सेवा,वाहतूक,वीज,पाणी संरक्षण विभाग इ.

**शेती व शेतमजुर विषयी विचार** डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांनी शेतीपूरक प्रश्न व यावर उपाययोजना मत व्यक्त केले.अ) ग्रामीण भागातील शेतमजुराच्या आर्थिक परस्थिती मध्ये सुधारणा घडून आणण्यासाठी औद्योगिक कामगारांना जे फायदे दिले जातात ते शेतमजुरांना हि मिळाले पाहिजे.ब) भारत देश हा करू प्रधान देश आहे, या देशात जास्तीत जास्त शेती व्यवसाय केला जातो,या मुळे शेती विकासाला चालना दिली पाहिजे.क)लोकसंख्या वाढीमुळे शेतजमिनीचे तुकडीकरनाचे प्रमाण वाढत आहे.यासाठी म्हणून जमिनीच्या विक्रीवर बंदी घालणे.ड)सावकाराकडे जमीन गहाण टाकता येणार नाही.इ)सामुदायिक शेती व्यवसाय करण्यासाठी विविध प्रोत्साहन त्यांनी दिले.

**उद्योगासंबधी विचार :**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला जेवढे महत्त्व दिले आहे,तेवढच महत्त्व उद्योग क्षेत्राला दिले आहे.लोकसंख्या वाढीमुळे शेती क्षेत्रावर परिणाम दिसून येत आहे. हा परिणाम कमी करण्यसाठी भारतातील औद्योगिक विकास झाला पाहिजे.असे मत मांडले.यामुळे बेरोजगारांची संख्या हि कमी होण्यास मदत होईल.

**दारिद्र्य निर्मुलन विषयी विचार :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील असणाऱ्या दारिद्रया विषयी क्जूप चिंता व्यक्त केली.यांच्या मते शेतजमीनचे तुकडीकरण व वाढती लोकसंख्याचा तन हेच खरे शेतकऱ्याचे दारिद्याचे खरे कारण आहे.शेतजमीन वर सामुहिक मालकी असावी तसेच उद्योगधंद्याच विकास झाला पाहिजे.दारिद्र्य निर्मुलन उपाय म्हणून लोकसंख्या कमी करण्याच्या उद्देशाने 19 ऑक्टोबर 1938 ला लोकसंख्या विषयक नियंत्रक प्रस्ताव तत्कालीन,प्रतिकूल परस्थितीत विधानसभेत मांडला. लोकसंख्याला आळा घालण्यासाठी त्यांनी 1938 मध्ये मुबई असेंब्लीत संतती नियमन विधायक मांडले.

**आंतरराष्ट्रीय व्यापर विषयी विचार :** स्वतंत्र्य पूर्वी भारताच्या बाजार पेठेवर ब्रिटिश सरकारचे नियत्रण होते.हि व्यापार पद्धतीवर नियंत्रण योग्य झाले तर हिंदुस्थानातीलदारिद्र्य नष्ट होण्यास मदत होईल.भारतातील उत्पन्न व खर्च यांचे समतोल प्रमाण दिसून येते.व्यापारच्या दृष्टीने देशी माल परदेशी मला पुढे टिकत नाही. यामुळे बाजारपेठेवर नियंत्रित व्यापार असावा असे त्यांचे मत होते.

**निष्कर्ष** :

थोडक्यात सारांश रूपाने असे म्हणता येईल कि ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर,विद्वान,विचारवंत,अर्थशास्त्रज्ञ होते.यांनी “राज्य समाजवादाचा” पुरस्कार केला.तसेच औद्योगिकीकरण ,यांत्रिकीकरण,यांचा पुरस्कार केल्यामुळे देशातील बेकारी कमी होऊन देशाच्या विकासाला चालना मिळेल.अर्थनिती,शेतीविषयक,कर विषयक मांडलेले विचार हे देशाच्या विकासच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.या कार्यातून व विचारातून देशभक्ती दिसून येते. पुरोगामी विचारसरणी व कामगार चळवळीतील त्यांच्या योगदानावरून ते तोलामोलाचे एक विद्वान अर्थशास्त्रज्ञ होते.असे म्हणणे काहीच वावगे ठरणार नाही.

संदर्भ सूची:-

1. Shodhganga.inflibnet.ac.in
2. https://en.wikipedia.org/wiki/B._R._Ambedkar
3. *असे घडले ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर*-व.न. इंगळे,साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
4. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर - नियोजन, जल व विद्युत विकास: भूमिका व योगदान*-सुखदेव थोरात; अनुवाद: दांडगे, काकडे, भानुपते,सुगावा प्रकाशन, पुणे,2005
5. *कीर धनंजय ,विश्वभूषण डॉ.बाबसाहेब आंबेडकर रघुवंशी प्रकाशन,पुणे*
6. *प्रा.सोमवंशी बी सी –अर्थशास्त्रज्ञ :डॉ. बी. आर.आंबेडकर,आनंद प्रकाशन,औरंगाबाद.*
7. *पोल अनुवाद अरविंद ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकसंख्या नियंत्रण वरील विचार.परीचेकर* 1986.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार

**प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे**
सहा. प्रा. अर्थशास्त्र विभाग संताजी महाविद्यालय नागपूर
jagdishwatmode26@gmail.com

**सारांश :—**

शिक्षणातूनच व्यक्तीमध्ये स्वतंत्र विचार करण्याची क्षमता निर्माण होऊन माणसाची सामाजिक, आर्थिक, मानसीक, राजकीय प्रगती होत असते आणि शिक्षणातूनच माणसाला उत्तम जीवन जगण्याचा मार्ग गवसत असतो. तसेच जाती धर्माच्या शृंखला तोडुन विविध समाज बांधवात त्यांचे हितसंवर्धन व सांमजस्याचे वातावरण तयार करण्याची जाणीव ही केवळ शिक्षणाद्वारेच निर्माण केल्या जाऊ शकते अशा व्यापक दृष्टिकोणातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणविषयक विचार प्रस्तुत केले. शिक्षणाला अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजे समान मानून शिक्षणातुनच मानसाला माणूसपण प्राप्त होऊन त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते. अशी उदात्त धारणाा डॉ. आंबेडकरांची होती. त्यामुळेच समाज परिवर्तनाचे एक म्हणत्त्वपूर्ण माध्यम म्हणून शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली व सामाजिक विषमता दुर करण्यासाठी शिक्षणाचा आग्रह धरला. शिक्षणाचा पाया म्हणून प्राथमिक शिक्षणाचे सक्तीकरण व व्यक्तीमत्व विकासासाठी आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी उच्च शिक्षण तसेच स्त्री पुरूष समान तत्वासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारातील मुख्य पैलु आहेत.

**बिज शब्द :—**गुलामगीरी, शिस्त, चारित्र, स्वाभिमान, वैचारीक क्रांती, प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, विशमता निर्मुलन, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, सामाजिक प्रगती.

**प्रस्तावना :—**

ख्रिश्चन मिशनऱ्यानी भारतात खऱ्या अर्थाने स्वताच्या हिताकरीता का असेना पण विशिष्ठ वर्गापुरतेच मर्यादित असणारे शिक्षण सामान्यापर्यंत पोहचवुन बहुसंख्य लोकाकरीता शिक्षणाची दारे उघडली. ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेल्या शिक्षणाच्या माध्यमातूनच देशात राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, गोपाल गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. सारख्या पुरोगामी विचारवंताच्या व्यक्तीमत्वाची जडण घडण होत गेली. या व अशा थोर महापुरूषांनी शिक्षणाची गंगा प्रवाहीत करण्याच्या प्रक्रियेला गतीमानता प्रदान करातांनाच अचेतन समाजात चेतना निर्माण करण्याचे महान असे कार्य केले. अशा असामान्य कार्य करणाऱ्या महानायकांच्या यादीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव हे अग्रस्थानी येते. केवळ अज्ञानापोटीच व्यक्ती व समाजावर कशी नामुष्की ओढावते व बिकट परिस्थिती निर्माण होऊन विकासाचे सर्व मार्ग कसे अवरूध्द होतात याची प्रचिती डॉ. आंबेडकरांना जवळून आल्यामूळे यातून सुटका करण्यासाठी त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला.आयुष्याच्या शेवटपर्यंत डॉ. आंबेडकरांनी अत्यंत कठीण व तीतकीच खडतर ज्ञानसाधना केली होती. या ज्ञानसाधनेत विधीशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, संस्कृत, धर्मशास्त्र, तत्वज्ञान इ. अशा महत्त्वपुर्ण विषयांचा सखोल अभ्यास करून त्यावर प्रभुत्व संपादन केले होते. या प्रभुत्व संपादनामुळेच त्यांनी शिक्षण क्षेत्रात मानवतावादी मुल्ये वर्धीत करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली व त्यातुनच त्यांनी लोकशिक्षक या अर्थाने अनेक शैक्षणीक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार प्रस्तुत मांडले. डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार हे जनसामान्य व वंचित या घटकांच्या जीवनाला प्रामुख्याने अधोरेखीत करणारे आहेत. अस्पृष्य समाज हा शिक्षणामुळेच जागृत होऊ शकतो, त्यांला न्याय व हक्क विषयक जाणीव निर्माण होऊन त्याच्या उन्नती व प्रगतीसाठी शिक्षणाखेरीज अन्य पर्याय नाही असा ठाम विश्वास त्यांना होता. धर्म व जाती व्यवस्थेमुळे इथल्या शिक्षण प्रणालीत विषमता निर्माण झाली आहे. हे त्यांनी स्वत: अनुभवलेले होते. त्यातच ही विषमता समाजात बंधूभाव व ऐकोपा संपवून अन्याय व गुलामगीरीचे समर्थन करते. अशा परिस्थितीत हा अन्याय व गुलामगीरी संपृष्ठात आणन्यासाठी शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही हा सिध्दांत डॉ आंबेडकरांनी मांडला.डॉ. आंबेडकरांना शिक्षण हे भारतातील गोरगरिब, शोषीत, दलीत, वंचित यांच्या मुक्तीची वाट आहे व याशिवाय त्यांच्या जीवनात क्रांती निर्माण होणे अशक्य आहे असे वाटायचे. ज्या समुदायात शिक्षणाचा अभाव आहे. अशा समुदायामध्ये नवविचारांची निर्मिती होत नसल्यामुळे हा समुदाय पशुत्वाच्या पातळीवरच जगत असतो. अशा ज्ञानापासून दुरावलेल्या व संस्कृतीपासून विलग झालेल्या जनसमुदायामध्ये दारीद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, परंपराचा अभाव तसेच मानवी संस्कृतीचा अभाव दिसुन येतो. त्यातच अशा समुदायावर कोणाही सुशिक्षीत वर्गाला राज्य करणे वा त्यांना हिनत्वाची वागणूक देणे सहज शक्य होत असते. अशा होणाऱ्या शोषणातून मुक्ततेकरिता शिक्षण हा सर्वोत्तम पर्याय आहे असे ते सुचवितात.

केवळ अन्याय व शोषनातील मुक्ती यापुरतेच शिक्षण मर्यादित नसुन समाजाची झालेली दुरावस्था व सामाजिक दुखण्यावरसुध्दा शिक्षण हे एकमात्र औषध आहे. हे स्वत: ओळखुन डॉ. आंबेडकरांनी दलित्तोधाराच्या कार्यात शिक्षणाला अग्रस्थानी ठेवले. याची साक्ष ऑक्टोबर १९२७ मध्ये मुंबई विधीमंडळात मुक्त विद्यापीठ कायदा दुरूस्ती विधेयक जेव्हा चर्चेला आले होते. तेव्हा त्यांनी शिक्षणाबद्दल मांडलेल्या भूमिकेतुन दिसून येते. यात ते म्हणतात, ''शिक्षण प्रसाराची गती पाहता असे दिसुन येते. की, शिक्षणाच्या बाबतीत सरकार फार उदासिन दिसते. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचविणे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. म्हणून शिक्षण पध्दतीचा अवलंब करतांना शिक्षण महागडे न बनविता समाजातील तळागाळातल्या गरिबापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे. याची सरकारने दखल घेणे गरजेचे आहे. हे सर्व साध्य करावयाचे असेल तर दलीत वर्गाला शिक्षणासाठी काही खास सवलती देऊन

इतरांच्या बरोबरीने आणावे लागेल. तरच समाजात शैक्षणिक समानता आणण्यास मदत होईल. बहुसंख्याक समाज वर्षानुवर्षे हा शिक्षणापासून वंचीत राहिल्याने त्यांची अवस्था ही गुलामासारखी झालेली होती. या असस्थेमधून अशा पीडीतांना बाहेर काढण्यासाठी षिक्षणाची व्यवस्था करणे हे डॉ. आंबेडकरांना अगत्याचे वाटत होते. शिक्षणाला अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजे समान मानून शिक्षणातुनच मानसाला माणूसपण प्राप्त होऊन त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते. अशी उदात्त धारणाा डॉ. आंबेडकरांची होती. त्यामुळेच ते म्हणतात, ''उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हिनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहील्यास जीवंतपणी गुलाम होतो.'' तत्कालीन ब्रिटीश शासनाने शाळा काढुन काही प्रमाणात का असेना मात्र ठिकठिकाणी शिक्षणाची सोय निर्माण केली. मात्र अशा ज्ञानामध्ये शिकविणारा वर्ग हा अस्पृश्यांना शिकविण्यास तयार नव्हता या वास्तवदर्शी व कटु अनुभवामुळेच त्यांनी १९४५ मध्ये 'पीपल्स ऐज्युकेशन सोसायटी ' ची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य, दलित समाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांच्या समाज क्रांतीची सुरूवात ही शिक्षणापासूनच झालेली होती. समाजात विकृती निर्माण होऊ समाज दिशाहीन होण्यास व समाजाची अधोगती होण्यास शिक्षणाचा अभाव हे मुख्य कारण असल्याचे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. त्यातच देशात शिक्षणा अभावी शुद्राती शुद्रांचा सर्वनाश कसा झाला याचीही ते कारणमिमांसा करतात. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांनी खालच्या समाजाच्या अवनतीचे कारण हे केवळ आर्थिक न मानता त्यातील शैक्षणीक कमतरतेलाही अधोरेखीत करतात. ते म्हणतात. दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांची अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वी सारखेच त्यांना उच्च वर्गीयांची सेवा करायला लावणे होईल. म्हणुनच त्यांच्यातील न्युनगंड नाहीसा करून त्यांच्या न्याय व हक्कासाठी आणि त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने त्यांचे काय महत्त्व आहे. हयाच्या प्रचितीकरीता शिक्षणच हे महत्त्वपुर्ण साधन ठरेल. शिक्षणाला परिर्वतनाचे महत्त्वपुर्ण साधन माननारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिक्षण हेच व्यक्तिच्या जीवनात महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणत असते. शिक्षणामुळेच व्यक्तीला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव निर्माण होऊन त्यांच्यात स्वाभीमानाच्या भावनेचाही विकास होत असतो. शिक्षणातुनच व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साध्य होत असतानांच स्वातंत्र्य, समता, बंधुता, व मैत्रीभाव या मुल्याचाही विकास त्यांच्यात साधला जात असतो. शिक्षणातूनच व्यक्तीमध्ये स्वतंत्र विचार करण्याची क्षमता निर्माण होऊन माणसाची सामाजिक, आर्थिक, मानसीक, राजकीय प्रगती होत असते आणि शिक्षणातूनच माणसाला उत्तम जीवन जगण्याचा मार्ग गवसत असतो. त्यातच शिक्षण हा शोषण मुक्तीचा मार्ग असल्यामुळे व्यक्तीला अन्यायाविरूध्द उठाव करण्याचे सामर्थ्य आणि त्याची जाणीव ही केवळ शिक्षणामुळेच होऊ शकते. अशातच व्यक्ती स्वत:च्या व पर्यायाने समाजाच्या उत्थानासाठी हातभार लावू शकते असे ते म्हणतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोण :—** कोणतीही व्यक्ती ही जन्मताच बुध्दीमान नसते. शिक्षण घेण्याची प्रत्येक प्राणीमात्राची कुवत आहे आणि त्या कुवतीनुसारच शिक्षण घेऊनच प्रत्येक व्यक्ती हा बुध्दीमान होतो. ही प्रमुख बाब व्यक्तीला निदर्शनास आणून देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक तत्वज्ञानातील पुढील महत्त्वपुर्ण व परिणामकारक मुद्दयाचा विचार करता येईल.

**शिक्षणातून समाज परिवर्तन :—** शिक्षण हे समाज परीवर्तनाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे असे डॉ. आंबेडकर म्हणतात. त्यांच्या मत, शिक्षणातून व्यक्ति स्वातंत्र्य आणि त्या माध्यमातुन समाज परिवर्तन या प्रक्रियेला चालना मिळते. त्यामुळेच त्यांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र बहूसंख्यक अशा शोषीत समाजास दिला. सामाजिक क्रांती घडवून आणन्याकरीता शिक्षणाद्वारे त्याची बिजे बालकांच्या मणात बालवयातच बालके वैचारीक क्रांतीने प्रवृत्त झाली तर ते मोठेपणी खरी सामाजिक क्रांती घडवून आणु शकतात. यातुनच एका नव्या समाजाची निर्मिती करता येईल. असा ठाम विश्वास डॉ. आंबेडकरांना होता. कांती आणि परिवर्तन हे शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही हे सांगतांना त्यांना शिक्षण हे समाजपरिवर्तन होय. या शैक्षणीक विचारावर जोर दिला. आणि वैचारीक कांती व समाज परीवर्तनासाठी शिक्षणाचा वापर स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यासाठी केला.

**विषमता निर्मुलनासाठी शिक्षण :—** भारतीय समाजात जाती धर्म पंथ संस्कृती इत्यादी क्षेत्रात प्रंचड प्रमाणात विषमता दिसून येते. या विषमतेमुळेच जनसामान्याची सतत पिळवणुक होत असते. जाती भेदाच्या अस्तित्वामुळेच समाजातील एकोपा नष्ट होऊन एक समाज हा दुसऱ्या समाजापासून दुर जात असतो. धर्मा धर्मातही विषमता पसरविली जाते. हे सांगुन या विषमतेचे उच्चाटन करण्यासाठीच डॉ. आंबेडकरांना शिक्षणाची कास धरणे अगत्याचे वाटते. जाती धर्माच्या शृंखला तोडुन विविध समाज बांधवात त्यांचे हितसंवर्धन व सांमजस्याचे वातावरण तयार करण्याची जाणीव हि केवळ शिक्षणाद्वारेच निर्माण केल्या जाऊ शकते यावर त्यांचा विश्वास होतो. म्हणुनच सर्व प्रकारच्या विषमता नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग ठरू शकतो असे ते म्हणतात.

**विद्या ही शस्त्रासमान :—** डॉ. आंबेडकरांनी मते विद्येला शस्त्राची उपमा दिलेली आहे. त्यामुळे या शस्त्राचा कसाही वापर केला जाऊ नये. कारण हे शस्त्र जीतके प्रभावी तीतकेच धारदार असल्यामुळे अनावधाने याद्वारे कोणाचाही घात ते करू शकते. याकरिताच ते व्यक्तीच्या शीलवान असण्यावर भर देतात. कारण व्यक्ती जर शिलवान असेल तर याद्वारे तो एखाद्याचे संरक्षण करू शकेल पण त्याऐवजी मनुष्य हा शिलवान नसेल तर विद्येच्या शस्त्राने एखाद्याचा घात झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र चारित्र्य संपन्न व्यक्ती विद्या या शस्त्राचा दुरूपयोग करू शकणार नाही. असा व्यक्ती हा या शस्त्राचा उपयोग हा दृष्टांचा संहार करून स्वत:चे रक्षणही करू शकेल असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

**शिस्त व चारित्र्यांची गरज :—** व्यक्ती आणि समाज या दोहोंची प्रगती घडुन येण्यासाठी शिस्तीची नितांत आवश्यकता असते. व्यक्तीच्या जीवनात शिस्त नसल्यास व्यक्तीचे भवितव्य अंधकारमय होत असते. तर समाजात शिस्तीचा अभाव असल्यास अराजकतेची स्थिती निर्माण होण्याचा धोका पुरेपुर असतो. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी अनुशासन व सामाजिक प्रगती करीता शिस्त

निर्माणावर जोर दिला. डॉ. आंबेडकरांनी व्यक्तीच्या जीवनात शिस्त बानवित असतांनाच व्यक्तीच्या चारित्र्य निर्माणावर तेवढाच भर दिलेला आहे. चारित्र्य अर्थात शिल होय. या शिलाशिवाय शिक्षणाची किंमत कवडीमोल आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. त्याचा सदुपयोग करावयाचा किंवा दुरूपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शीलावर अवंलबुन असते. शिक्षणाने व्यक्ती अशिक्षीत होईल मात्र सुशिक्षीत होईलच असे सांगता येणार नाही. त्यामुळे शिक्षणाला चारित्र्याची जोड असावी हे सांगुन चारित्र्यामुळे ज्ञान चांगल्या अथवा वाईट कामासाठी वापरावयाचे की नाही ते ठरविता येते असे ते म्हणतात.

**प्राथमिक शिक्षणाचे सक्तीकरण :–** शिक्षणाचा पाया हा प्राथमीक शिक्षण असल्यामुळे व शिक्षणाची सुरूवात ही खऱ्या अर्थाने प्राथमिक शिक्षणापासून होत असल्यामुळे डॉ. आंबेडरांना प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हा राष्ट्रीयदृष्टया अंत्यत मूलभूत व मोलाचा वाटतो. त्यांच्या मते ज्यांनी आधीच शिक्षणाचा लाभ घेतलेला आहे. त्यांना सक्ती करण्याची गरज नाही. मात्र ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्यांना सक्तीच्या शिक्षणाची गरज असते. प्राथमीक शिक्षण हे मागास वर्गातील निरक्षर लोकांच्या दृष्टिने विशेष महत्त्वाचे व त्यातच राष्ट्रीय इमारीचा पाया आहे. त्यामुळे लोकांच्या इच्छेवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कित्येक वर्ष लागतील म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो असे ते म्हणतात. त्यातच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले पाहीजे आणि ते सर्व समाजाला मोफत मिळावे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**उच्च शिक्षणाची आवश्यकता :–** व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या विकास साधण्यासाठी व लोकशाही बळकट करण्यासाठी उच्च शिक्षण हे सर्वात महत्त्वपूर्ण माध्यम असल्यामुळे उच्च शिक्षणाची संधी मागास वर्गाला व बहूजन समाजाला मिळणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. त्यांच्या मते समाजातील खालच्या वर्गाला त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याकरीता उच्च शिक्षणाच्या प्रसारा खेरीज दुसऱ्या कशानेच साध्य होणार नाही. दलितांच्या सर्व सामाजिक दु:खण्यावर उच्च शिक्षण हे प्रभावी औषध असून अस्पृश्याची गुलामी उच्च शिक्षणानेच नष्ट करता येईल. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून मानाच्या जागा आपल्या हातात येतील आणि शासनकर्ते जमात बनविण्याच्या दृष्टिने समाजात प्रगती करता येईल. असा विचार त्यांनी व्यक्त केला. उच्च शिक्षणाचा प्रसार कसा होईल या संबधीची दक्षता सरकारने बाळगणे आवश्यक आहे. असे मत त्यांनी प्रतीपादन केले.

**स्त्री शिक्षणाचा आग्रह :–** डॉ. आंबेडकर हे स्त्री व पुरूष यांना समान स्थान देतात. त्यांच्या शिक्षणविषयक तत्वज्ञानात स्त्री आणि पुरूष यांच्यातील भेदभावाला मुळीच थारा नाही. मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलीच्याही शिक्षणासाठी धडपड केल्यास आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल. स्त्रियांना शिक्षण उपलब्ध करून देणे म्हणजे एकप्रकारे त्यांचा सन्मान करण्यासारखे आहे. शिक्षणाची संधी सर्वाना असावी. दैव, नशीब आणि धर्मभोळेपणा अशा खुळचट प्रवृत्ती विरूध्द त्यांना अत्यंत चीड होती. या प्रवृत्तीमधून स्त्रीयांना मुक्त करण्यासाठी व तीच्यावरील अन्याय, अत्याचार दुर करून तीला त्यांचे न्याय व हक्क व सामाजात प्रतिश्ठेचे स्थान मिळण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग असल्याचे मत डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात. त्यातच ते स्त्री आणि पुरूषांना एकच शिक्षण दिले पाहीजे असे मत व्यक्त करून सहशिक्षणाचा ते पुरस्कार करतात.

**निष्कर्ष :–**

डॉ. आंबेडकरांचा व्यापक शिक्षण विषयक दृष्टीकोन व्यापक होता. देशातील सर्व सामान्याची शैक्षणिक स्थिती सुधारावी आणि देशाची झपाटयाने प्रगती व्हावी म्हणून समाजातील प्रत्येक घटकांचा योग्यप्रकारे विचार करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला अनुकुल असे वातावरण निर्माण करण्यावर ते जोर देतात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन मानव कल्याणाच्या तत्वास अनुसरून जीवन व्यतीत करणारा समाज डॉ. आंबेडकरांना शिक्षणातून निर्माण व्हावा हे अभिप्रेत होते. म्हणून त्यांनी त्याकरिता सातत्याने कार्यरत राहण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार हे विशेषकरून जनसामान्यासाठी तसेच वंचितासाठी होते. सामाजिक समता, स्वातंत्र्य, यांचे संरक्षण व संवर्धन करणारी शक्ती शिक्षणात आहे. शिक्षण घेण्याचा अधिकार हा सर्वांचा आहे. अस्पृश्य समाजात शिक्षणामुळेच जागृती होऊ शकते. त्यातूनच त्यांची प्रगती निश्चित आहे असे त्यांना वाटत असे. त्यामुळेच ते ज्याप्रकारे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरण व सक्तीकरणाचा आग्रह करतात त्याचप्रकारे उच्च शिक्षणाची उपलब्धता करून देण्याची मागणीसुध्दा ते सरकारला करतात.

## संदर्भ ग्रंथ सुची :–

१) डॉ. सालोटकर अशोक, डॉ. वीखार रवींद्र, आक्टोबंर २०१८, समाजशास्त्राचा परीचय, राघव पब्लिकेशन, नागपूर.
२) डॉ. कऱ्हाडे बि. एम., जुन २०१३, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
३) खरात शंकराव, २००४, डॉ. बाबसाहेब आंबेडकर याचे सामाजिक विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.
४) प्रा. माने माणिक, १९९७, भारतातील समकालीन सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर.
५) डॉ. पानतावने गंगाधर, १९९८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**डॉ. नरसिंग भानुदास देशमुख**
अर्थशास्त्र विभाग महिला कला महाविद्यालय औरंगाबाद-४३१००१
nbd9922@gmail.com

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे क्रांतिकारी व मानवतावादी होते यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचा मुख्य विषय अर्थशास्त्र हा होता या विषयावर त्यांनी मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. आदर्श चलन पद्धती, कृषी उद्योग, खाजगी सावकार, प्रतिबंधक विधेयक , जातीचे अर्थशास्त्र ,आर्थिक पायाभरणी तसेच भारताच्या रिझर्व बँक ऑफ इंडिया स्थापनेच्या वेळी मोठे योगदान आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे राजकीय ,आर्थिक, धार्मिक, शिक्षण तज्ञ, पत्रकार, संसद सदस्य इत्यादी मध्ये मोठे योगदान होते या सर्वांच्या पलीकडे जाऊन त्यांनी समाज सुधारक आणि मानवधिकार रक्षक या नात्याने केलेले कार्य खूप मोठे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कोलंबिया विद्यापीठाची अर्थशास्त्रातील पीएचडी (1917)लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डॉक्टर ऑफ सायन्स ची पदवी घेतली तसेच लंडनमधील ग्रेज इनची बार अॅट लॉ(1923)अशा अति उच्च पदव्या त्यांनी संपादित केल्या दलित समाजातील विद्यार्थ्यांनी त्या काळात अशा प्रतिष्ठेच्या पदव्या मिळवणे ही अद्वितीय बाब होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय लेखणः**

1)एम. ए. ची पदवी संपादन करताना कोलंबिया विद्यापीठात सादर केलेला प्रबंध ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी ,1915

2) जनरल ऑफ दि इंडियन इकॉनॉमिक सोसायटी मध्ये प्रकाशित केलेला प्रबंध, स्मॉल होलर्डिंग्ज इन इंडिया देअर रेडिमिज ,1918

3) पी.एच.डी.साठी सादर केलेला प्रबंध द इव्होल्युशन ऑफ प्रिव्हेन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया ,1925

4) द प्रॉब्लेम ऑफ दि रुपी इटस ओरिजिन अँड सोल्युशन ,1932

5) बहिष्कृत भारत पत्रिकेतील अग्रलेख- महार व त्याचे वर्तन, शेतकरी वर्गाची गुलामगिरी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार**

**कृषी विषयक विचार ;-**

भारतातील लहान धारणा क्षेत्रे ही भारतीय शेतीतील गंभीर समस्या असून भारतातील मोठ्या प्रमाणातील लोकसंख्या शेती व्यवसायावर आधारलेली आहे आणि शेती उत्पादकता खूपच कमी असल्यामुळे कृषी क्षेत्र मागासलेले म्हणून ओळखले जाते .या समस्या दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याबाबत असे स्पष्ट केले की वारसाहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे हे कारण नसून शेतीवर असणाऱ्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार हे मूळ कारण आहे. शेतीशिवाय उत्पादनाचे साधन नसल्यामुळे शेतीचे तुकडीकरण झाले आहे. त्यामुळे शेतीला पूरक व्यवसाय

किंवा औद्योगीकरण केले तर श्रमिकांना शेतीवर जास्त अवलंबून न राहता लोकांना आपल्या उदरनिर्वाह चांगल्याप्रकारे करता येईल आणि शेतीचे तुकडीकरण देखील थांबेल

**चलनविषयक विचार:-**

भूमिहीन शेतमजूर लहान जमिनी, खोती पद्धती, महार वतन, सामुदायिक शेती, जमीन महसूल आणि जमीनदार शाहीचे उच्चाटन या विषयावर त्यांनी अनेक वेळा विचार प्रकट केले. 1947 साली हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती असावी यावर मूलगामी विचार मांडले. त्यावेळी स्वर्ण परिणाम आणि सुवर्ण विनिमय पद्धती अशा दोन्ही पर्याय उपलब्ध होते परंतु प्रा. केन्स या अर्थ तज्ञाने सुवर्ण विनिमय पद्धती लवचिक असल्यामुळे या व्यवस्थेत चलन निर्मिती देशातील सोन्याच्या साठ्यावर अवलंबून नसल्याने ही पद्धत भारतासाठी योग्य आहे असे प्रतिपादन केले परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याला प्रखर विरोध केला त्यांच्या मते या व्यवस्थेत चलन निर्मिती लवचिक असल्यामुळे ती अनिर्बंध होऊ शकते त्यातून भाववाढ निर्माण होऊन रुपयाची किंमत घसरली शकते सुवर्ण विनिमय परिणाम असताना भारतात असे भाववाढ झाली याचे विवेकशील विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले त्यांनी या पद्धतीद्वारे भारतातील किंमती कशा पद्धतीने स्थिर होतात हे देखील सांगितले. चलन विषयक विचार मांडताना त्यांनी सांगितले की RBI वर अंकुश ठेवणे आवश्यक आहे तसेच 1926 मध्ये नेमलेल्या हिल्टन यंग कमिशन यावेळी देखील त्यांनी उल्लेख केला आहे. आजच्या परिस्थितीला देखील हा विचार महत्त्वपूर्ण ठरतो.

**श्रमविभागणी:-**

हिंदू समाजव्यवस्थेतील चातुर्वर्ण्य पद्धती ही विभागणीच्या तत्वावर आधारलेली आहे यावर टीका करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रमविभागणी नसून श्रमाची विभागणी आहे असे म्हटले व ती अमानवी आहे असे स्पष्ट केले. जगात इतरत्र कोठेही श्रमविभागणी नाही त्यामुळे भारताची आर्थिक प्रगती व विकास खुंटला आहे या व्यवस्थेने श्रमशक्ती व भांडवलाची उपयुक्तता ज्या ठिकाणी जास्त आहे त्या ठिकाणी वापरली जात नाही हे स्पष्ट केले.

**अस्पृश्यता एक आर्थिक पिळवणूक:-**

जातीव्यवस्था व अस्पृश्यता या समस्यांच्या बाबतीत महत्वपूर्ण विचार मांडला आहे. त्यांच्या मते स्पृश्यता ही केवळ धार्मिक कारणच नसून गुलामगिरी पेक्षाही भयंकर आर्थिक रचना आहे गुलामगिरीत गुलामाची किंमत कमी होऊ नये म्हणून मालक गुलामांना कपडे-लत्ते देतात खाऊ-पिऊ घालतो पण अस्पृश्यता या रचनेत मालक कोणतीही जबाबदारी न घेता समाजाची आर्थिक पिळवणूक करतात. जो पर्यंत व्यावसायिक स्वरूप प्राप्त होत नाही तोपर्यंत खालच्या लोकांचे पिळवणूक थांबणार नाही त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक स्तरावर मूलभूत संस्थागत परिवर्तन करने आवश्यक मानले.

**सार्वजनिक आयव्यय:-**

ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी व द इव्होलयुशन्स ऑफ प्रोवहिशियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' या दोन्ही प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सार्वजनिक आय-व्यय विषयक विचार मांडला. 1792 ते 1858 या कालावधीत ब्रिटिशांचे भारतात प्रशासन आणि वित्त व्यवस्था कशी अन्यायकारक ठरली आहे हे व्यक्त केले. त्याकाळी ब्रिटिशांनी भारतावर मोठे कर्ज काढून भारत दारिद्र्य बनवला हे देखील यामध्ये व्यक्त केलेले दिसते दुसऱ्या प्रबंधात ब्रिटिश केंद्र सरकार आणि त्या काळातील घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाविषयाचे विचार मांडलेले आहेत. 1830 ते 1921 या प्रदीर्घ कालखंडात हे आर्थिक संबंध कसे विकसित होत गेले ते स्पष्ट केले आहे

**महिलासाठी आर्थिक विकास:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला या घटकाला महत्त्व दिले असून संविधानाप्रमाणे महिलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे तसेच महिलांना स्वतंत्र अधिकार प्राप्त करून दिले आहेत कारण स्वातंत्र्य ,समता, बंधुत्व व न्याय या जीवन मूल्यावर आधारित नवीन समाजरचना तयार व्हावी ही अपेक्षा होती त्यांच्या मते देशातील सक्षम बुद्धिमान कौशल्यपूर्ण मानव संपत्तीच्या निर्मितीमध्ये माणसाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सगळयांसाठी आर्थिक अधिकार ,आर्थिक संरक्षण व मजुरी संबंधित कायद्यात तरतुदी केल्या आहेत यावरून स्पष्ट होते की त्यांनी महिलांना न्याय देण्यासाठी आणि त्यांचा विकाससाठी महत्वपूर्ण विचार मांडलेले आहेत.

**आर्थिक लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे पहिले कायदा मंत्री बनले 1948 ते 49 मध्ये घटना समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय राज्यघटनेला आकार देताना ही त्यांच्यातील अर्थतज्ञ आपणाला दिसून येतो. मानवी अधिकाराचे मुलतत्व म्हणून त्यांनी लोकशाही राज्य व्यवस्थेचा पुरस्कार केला आणि पाठपुरावा केला. समता स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तीन लोकशाही तत्वाचा केवळ राजकीय हक्क असा संकुचित अर्थ लावू नये असे मत मांडले तसेच आर्थिक व सामाजिक लोकशाहीकडे दुर्लक्ष केले तर राजकीय लोकशाही टिकणार नाही असा संदेश देण्यासाठी विसरले नाहीत डायरेक्टिवह प्रिन्सिपल्स ऑफ पॉलिसी यामध्ये अनुच्छेद घटनेत समाविष्ट करून त्यांनी आर्थिक लोकशाहीचा हेतू विषद केला आहे. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांमध्ये पुर्वग्रह न ठेवता किंवा कोणताही स्वार्थ न ठेवता अगदी विवेकशील स्वरूपाचे विचार त्यांनी मांडलेले दिसतात. त्यांच्या जीवनाचा उद्देश असा होता की कमजोर वर्गावर अन्याय होऊ नये तसेच विकासाच्या नैतिकतेचा मापदंड व सामाजिक न्याय याची अंमलबजावणी करून जोपर्यंत देशांमध्ये बहुसंख्य लोकांना रोजगार व रोटी मिळणार नाही तोपर्यंत सामाजिक न्याय हा केवळ देखावा असे म्हणावे लागेल मानवतावादी भावनांच्या प्रत्येक समर्पित असे क्रांतिकारी अर्थतज्ञ होते.

**संदर्भ ग्रंथ:-**

1) प्रा. डॉ. जे. एफ. पाटील,आर्थिक विचारांचा इतिहास फडके प्रकाशन ,कोल्हापूर ,जुलै 2009.

2) प्रा. पी.एन.गवळी ,संपादक ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ ,प्रकाशक ,म .रा. मुंबई 2011.

3) तरुण भारत -डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे भारतीय आर्थिक विचार परंपरेतील योगदान- मुंबई. 6 डिसेंबर 2020.

4) महामानवाचे विचार -भारतकुमार राऊत ,06डिसेंबर 2020.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# जागतिक पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांबद्दलचे असणारे योगदान

**प्रा. गीतांजली शंकरराव चव्हाण**
geetanjalichavan1987@gmail.com

पुरोगामी महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांचे नांव आदराने घेतले जाते ते राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वातंत्र्य, समता, बंधुता त्याचबरोबर उद्योजकता आणि शैक्षणिक क्रांतिचे उद्‌गाते, समाज सुधारक म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राची सर्वांगीन प्रगती विविध क्षेत्रात कशी होईल आणि तळागाळातील माणसे एका स्तरावर कसे येतील याचे स्वप्न या त्रिमुर्तीनी पाहिले. केवळ स्वप्न पाहिले नाही तर ते सत्यात आणण्याचे प्रयत्न त्यांनी कसोशिने केले, आणि त्यामध्ये ते तिघे यशस्वी झाले. त्यामुळेच एकविसाव्या शतकातही महाराष्ट्रातील जनता त्यांना विसरु शकत नाही आजच्या काळातही शाहू, फुले, आंबेडकर एका चळवळीच्या रुपाने एकत्रित आलेले दिसून येतात.

संस्कृती आणि धर्माच्या वर्चस्वाखाली हजारो वर्षांपासून समाजातील विविध घटकांना दाबून ठेवण्यात आले आहे. हा भारत भूमीचा हजारो वर्षांचा इतिहास आहे. या विविध घटकांमध्ये शुद्र, अतिशुद्र, शोषित वंचित या बरोबरच आणखी एका उपेक्षीत घटकाचा समावेश होता. त्या घटकाची सामाजिक स्थिती इतर तत्सम्‌ घटकांपेक्षाही दयनीय अशी होती, तो घटक म्हणजेच या समाज व्यवस्थेतील स्त्रिया! भारतीय समाजाच्या तत्कालीन मनूवादी व्यवस्थेने आणि धार्मिक दांभिकतेने अखिल स्त्री वर्गाच्या स्वातंत्र्यावर जाचक बंधने घालुन तिला गुलामीचे जीवन जगण्यास प्रवृत्त केले. धर्माच्या जाचक बंधनात स्त्रीला जखडले होते. एवढेच नव्हेतर स्त्रीला जास्त स्वातंत्र्य दिले तर ती व्यभिचारी बनेल असे चित्र उभे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फक्त राज्यघटना निर्मिती एवढे मर्यादित नसून त्यांच्या महिलांबद्दलच्या कार्यामुळे आणि विचारसरणीमुळे ग्रामिण, शहरी, सुशिक्षित, भारतीय, विदेशी महिला त्यांच्या विचारसरणीकडे आकर्षित झाल्या आहेत. महिलांमध्ये भौतिक, शारिरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकिय बाबतीत आत्मविश्वास निर्माण करुन सशक्त बनविण्याचा प्रयोग या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जवळ जवळ एका शतकाआधी केला आहे. आज स्त्री स्व:ताच स्व:ताचे निर्णय घेण्यास सक्षम झाली आहे. भारताच्या उभारणीतील डॉ. बाबासाहेबांचे योगदान लक्षात घेता त्यांच्याकडे केवळ दलित नेता म्हणून न पाहता एक राष्ट्रनिर्माता म्हणून पाहिले पाहिजे. सदर लेखनामध्ये जागतिक पातळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांबद्दलचे असणारे योगदान यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

"The Rise and Fall of Hindu Women's"या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचिन काळातील स्त्रियांबद्दलची स्थिती मांडली आहे. प्रचीनकाळी स्त्रियांना अनेक अधिकार होते. उदा. धर्म–तत्वज्ञानावर चर्चा करणे, घटस्फोट घेणे, पुर्नविवाह करणे तसेच उपनयनाचा अधिकारही होता, मात्र मनुस्मृतिने स्त्रियांवर जी बंधने टाकली त्यामुळे स्त्री ही शोषित बनली. म्हणजेच स्त्री अबला आहे. तिने पुरुषांची सेवा करावी, गुलाम म्हणून रहावे. विधवा जीवन, केशवपन, बालजरठविवाह, सतीप्रथा या अनिष्ठ प्रथांना तोंड द्यावे लागले. आजपर्यंत या परिस्थितीमध्ये अनेक बदल झाले असले तरीही फार वेगळे चित्र निर्माण झाले आहे असे दिसून येत नाही. १८ व्या शतकात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखिल स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपली विद्वत्ता, बुद्धीमत्ता व कर्तव्यशक्ती कामी आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. आपल्या सुधारणावादी चळवळीत व प्रभोदनात स्त्रियांच्या प्रश्नांना अग्रस्थान दिले. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे स्त्रियांची गुलामी व्यक्त करणारा, स्त्री हक्क हिरावून घेणारा ग्रंथ म्हणजे 'मनुस्मृती' या ग्रंथांचे दहन केले. स्त्रियांना समान दर्जा मिळावा, त्याच्याकडे पाहण्याचा जो पारंपारिक दृष्टीकोण आहे. तो बदलण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत हिंदू कोड बील मांडले. संविधानाच्या कलम १४ नुसार स्त्री–पुरुषांना समानता आहे. तसेच कलम १५ नुसार स्त्री–पुरुष भेद नष्ट केला आहे. कलम १६ नुसार शासकिय नोकऱ्यांमध्ये स्त्री–पुरुषांमध्ये समानता आणली. त्यामुळेच प्रत्येक क्षेत्रात स्त्रीया या पुरुषांच्या बरोबरीने समानवाटा, वारसाहक्क, अंतरजातीय विवाह करण्याचा हक्क मिळाला व स्त्री फक्त आपल्या देशातच नव्हे तर जागतिक पातळीवर ताठ मानेने उभी राहिली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि सद्‌भावनेमुळेच.

स्त्रियांच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर वाचा फोडण्याचे प्रथम कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. ११ नोव्हेंबर १९३२ रोजी संतती नियमनाचे विधेयक मुंबई प्रांतिक विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यावतीने पी.जी रोहमारे यांनी मांडून क्रांती केली. १९३८ मध्ये कुटूंबनियोजनाचे महत्व पटवून दिले. निरोगी आरोग्याचा विचार मांडला. कामगार कायदा, नुकसान भरपाई, पगारी प्रसूती रजा, गिरण्या, कारखाने, खाणी अशा ठिकाणी मजूर स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघरे

ही कल्पना प्रत्यक्षात उतरवली. गुलामाला गुलाम असल्याची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला; पण हे समजण्यासाठी शिक्षित माणसाची गरज लागते. शिक्षणाशिवाय माणसाला स्वत:ची ओळख होवू शकत नाही. फुले दांपत्यांना गुरुस्थानी मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणानेच जीवनात क्रांती घडू शकते याचे महत्व समाजाला पटवून दिले. यासाठी त्यांना स्त्रियांच्या परिषदा आयोजित कराव्या लागल्या. त्यांचा संघटित शक्तीवर विश्वास होता म्हणून पुरुषांबरोबरच त्यांनी स्त्रियांच्या परिषदाही आयोजित केल्या. स्त्री वर्गात जागृति निर्माण झाली तरच त्यांचा उद्धार होईल व समाजाचीही प्रगती होईल यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.एक स्त्री शिक्षित झाली तर संपुर्ण कुटूंबाचा उद्धार होतो. आज आर्थिक, सामाजिक व राजकिय क्षेत्रात इंदिरा गांधी, जयललिता, मायावती, ममता बॅनर्जी, प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, सुषमा स्वराज, निर्मला सितारामण, सिंधूताई सपकाळ या आणि यांसारख्या इतर स्त्रियांच्या प्रातिनिधिक उदाहरणातून सिध्द् झाले आहे. देशाच्या उन्नतीसाठी व उत्कर्षासाठी स्त्रियांनी जे योगदान दिले, त्यामध्ये पी.टी. उषा, सानिया मिर्झा, पी.व्ही. सिंधू, मिराबाई चानू असो की, शासकिय नोकरीतील किरण बेदी यांसारख्या प्रशासकिय अधिकारी असोत त्यांच्यामुळे देशाची मान जागतीक पातळीवर उंचावली आहे. या सर्व गोष्टीला कारणीभूत आहे संविधानातील महिलांसाठीच्या तरतुदी. भारताचे स्त्री उद्धारक म्हणून फुले दांपत्यांनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घ्यावे लागेल. भारतीय स्त्रीला दुय्यमत्व कसे प्राप्त झाले याची मांडणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिंग समानतेचे कार्य सुरु होते हे विसरुन चालणार नाही. १९२० मध्ये मूकनायक व १९२७ मध्ये बहिष्कृत भारत असे वर्तमानपत्र सुरु करुन त्यांनी भारतीय समाजातील स्त्री—पुरुष यांच्यामधील भेदभावावर लोकांचे लक्ष केंदीत केले.

खरे पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धर्मिक, राजकिय विचार आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्यक्षात आणणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. आज समाजामध्ये विविध समस्या निर्माण झाल्या आहेत त्यावर मात करण्यासाठी आज आपणास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची खुप गरज आहे. एखाद्या विषयाची स्त्रीवादी मांडणी म्हणजे केवळ स्त्रियांच्या कार्यकर्तुत्वाची गोळा बेरीज नसून त्यांच्या कार्यकर्तुत्वामधील अडथळ्यांची कारणे शोधणे, स्त्रियांना दुय्यमत्व का प्राप्त झाले याची कारण मिमांसा करणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय स्त्री विषयक मांडणी पाहता त्यामध्ये स्त्रीवादी दृष्टीकोन प्रत्ययास येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक वेगळेपण आपण लक्षात घेतले पाहिजे त्यांनी जो जीवन मार्ग स्विकारला त्यापासून आपली राजकिय, सामाजिक भूमीका वेगळी ठेवली नाही म्हणून प्रजासत्ताक भारतात कायदामंत्री असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठे कार्य केले आहे. भारतीय महिलांना मतदानाचा अधिकार पुरुषांच्या बरोबरीने मिळाला. परदेशात खास करुन अमेरिका इंग्लंड मध्ये महिलांना मोठा संघर्ष करावा लागला. देशाच्या विविध भागात हिंदूंच्या कौटुंबीक वादाचे खटले वेगवेगळ्या कायद्याद्वारे चालायचे. बहुपत्नीत्वाची परवानगी, बालविवाह अशा अनेक बाबतीत कायदेविषयक सुस्पष्टता नव्हती. म्हणून हिंदुंच्या या कायद्यात बदल करण्याची गरज होती. त्यामुळे हिंदू कोड बिलाला बळ देणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत संसदेत हे विधेयक मांडण्यात आलेत्यावेळी काही पुराणमतवादी खासदारांनी त्याला विरोध केला. तुम्ही तर धर्मांतराच्या बाजुने आहात, धर्मांतराचे समर्थक आहात, तेंव्हा तुम्ही कसे काय हिंदू धर्मात सुधारणा करु शकता असा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विचारण्यात आला. या विधेयका बाबत मतभेद आणि विविध विचार प्रवाह होते. हे विधेयक संमत न झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. विमला बागल (कोल्हापूर) तसेच काही शे. का.प., डाव्या विचारांचे पक्ष, अखिल भारतीय महिला परिषदेच्या महिला पुढारी यांचा हिंदू कोड बिलाला पाठींबा होता. मात्र समर्थकांचा आवाज संसदेत अल्प मतात होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर २५ वर्षात हिंदू कोड बिलातील सुधारणा मंद गतीने होत गेल्या.आज सध्यस्थितीला महिलांना नोकऱ्यांमध्ये ३३ आरक्षण व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० आरक्षण शासनाने दिले आहे. आर्थिक, सामाजिक, राजकिय क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहेत. असे असले तरी महिलांवरील अन्याय, अत्याचारांमध्ये वाढझालेली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आजही स्त्रीयांना कमी लेखण्यात येते. महिलांना आरक्षण, संरक्षण हवेच हे पदोपदी जाणवते मात्र हे देणारी यंत्रणा ही एक व्यक्ती नसून कायदा, पोलिस, न्यायव्यवस्था, प्रशासन या सर्वांचे सक्षमिकरण करणे गरजेचे आहे. समाजात एखादा वर्ग जर सतत दडपला गेला तर तेथे खरी लोकशाही प्रस्थापित होणार नाही. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता सर्वांकरिता प्रस्थापित झाली पाहिजे यात अखिल स्त्रियांना जी दुय्यम वागणूक समाजात मिळते त्यामुळे त्यांची स्थिती अस्पृश्य वर्गाप्रमाणे झाली आहे. स्त्रियांची निरक्षरता हा आपल्या लोकशाहीतला सर्वात मोठा अडथळा आहे. स्त्री वर्गाचे सामाजिकीकरण व अन्याय निवारण करुन महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याबरोबरच अखिल पुरुष वर्गात देखिल स्त्रियांबद्दलचा नकारात्मक दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. असे झाले तरच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री वर्गाबद्दलचे योगदान राष्ट्रीय पातळी बरोबरच जागतिक पातळीवर श्रेष्ठ ठरेल.

**संदर्भ सुची–**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे (१९२० ते १९३६) चरित्र साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, खंड १८, भाग १, पृष्ठ क्र. १४३.
2. लांजेवार ज्योती, फुले आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन नागपूर, आक्टो. २००८.
3. कांबळे सरोज परदेशी, मनुस्मृति स्त्रिया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, २००७.
4. साबणे अरुणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री, आकांशा प्रकाशन नागपूर, २००७.
5. डॉ. गावडे के.एन., गोंदण दिपावली अंक (२०१६), प्रसिद्ध झालेला लेख– स्त्रीमुक्तीचे उद्‌गाते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
6. डॉ. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर (आवृत्ती ४ थी. २००६), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित जातिप्रथेचे निर्मूलन: मानवमुक्तीचा जाहीरनामा

**प्रा. डॉ. शैलजा भारतराव बरुरे**

सहाय्यक प्राध्यापिका राज्यशास्त्र विभाग स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय ,अंबाजोगाई

shailajabarure@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे "ॲनिहीलेशन ऑफ कास्ट" म्हणजे जातिप्रथेचे निर्मूलन हे भाषण आहे. 1936 यावर्षी लाहोरच्या जातपात तोडक मंडळ यांनी वार्षिक परिषदेच्या अध्यक्षपदाचे निमंत्रण देऊन हे भाषण आयोजित केले होते. मात्र त्यातील आशय त्यांना असह्य झाल्याने हे भाषण होऊ शकले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1936 मधेच या भाषणाच्या दीड हजार प्रती स्वखर्चाने छापून वितरित केल्या. ॲनिहीलेशन ऑफ कास्ट हे भाषण म्हणजे भारतीयांच्या मानव मुक्तीचा जाहीरनामा आहे. या भाषणांमध्ये भारतातील जातिव्यवस्थेची मूळ, ती टिकून राहण्याची कारणमीमांसा, जातीव्यवस्था टिकवून ठेवणाऱ्या मानसिकतेची चिकित्सा यामध्ये केलेली आहे. त्याच बरोबर भारतातील जातीमुळे झालेले अस्पृश्य व सवर्ण यांचे नुकसान, व्यक्ती व समाज यांची झालेली अपरिमित हानी, याबद्दलची वर्णनेही येतात. परंतु याच बरोबर भारतातील जातिव्यवस्थेचे निर्मूलन झाल्यानंतर भारतातील अस्पृश्य , सवर्ण ,स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत यांना मुक्त मानव म्हणून जगण्याची संधीही उपलब्ध असल्याचा आशावाद या भाषणांमध्ये आहे. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीयांनी संविधानाचा स्वीकार केला. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांमध्ये समतेच्या अधिकाराला प्रथम स्थान दिले गेले आहे .कारण भारतामध्ये अस्तित्वात असलेली जातिव्यवस्था ही जगभरातील सर्वव्यवस्थापेक्षा अतिशय अमानुष व्यवस्था म्हणून ओळखली गेली आणि याचे पूर्ण श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तर्कशुद्ध अभ्यास व मांडणीकडे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीसुद्धा अनेक समाजसुधारकांनी व मध्ययुगीन कालखंडामध्ये संतांनी जातीव्यवस्था ही मानवासाठी अत्यंत दाहक असल्याचे वर्णन केल्याचे साहित्य व ग्रंथसंपदा उपलब्ध आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये व भारतीय राज्यघटना निर्मिती च्या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध शोध निबंध ,भाषणे, चळवळी ,सत्याग्रह , वृत्तपत्र पाक्षिके यांच्या माध्यमातून व आणि ॲनिहीलेशन ऑफ कास्ट या भाषणाच्या माध्यमातून जाती व्यवस्थेवर कठोर टीका केली आहे .या सर्वांचा परिणाम म्हणून भारतीय संविधानामध्ये कलम सतरा मध्ये अस्पृश्यता निर्मूलन वर्णन करण्यात आले आहे. याबरोबरच जातीयता पाळणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या भेदभाव करणाऱ्या विविध पदव्या यांचे संपुष्टीकरणही करण्यात आले आहे. ॲनिहीलेशन ऑफ कास्ट या भाषणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतामध्ये सामाजिक सुधारणा करावयाच्या असतील तर सर्वप्रथम जातीव्यवस्था संपविणे आवश्यक आहे किंवा जातीनिर्मुलनाशिवाय सामाजिक सुधारणा करता येणे अशक्य असल्याचे मत मांडले होते. भारतीय म्हणून आपण कोणत्याही दिशेने गेलो तरी जातीचा राक्षस आपल्यासमोर उभा राहिल्याशिवाय राहत नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. भारतातील जातीव्यवस्थेने केवळ श्रमाचे विभाजन केले नाही तर श्रमिकांची ही विभाजन केले आहे. हे विभाजन अनेक वेळेला व्यवसायावरून केले गेले असे म्हटले जात असले, तरी ते उत्स्फूर्त किंवा नैसर्गिक नव्हते; तर हे विभाजन सक्तीने लादले गेलेले होते. यामध्ये स्वतःच्या व्यवसायाची निवड करण्याची संधी नव्हती .आपल्या पालकांचा व्यवसाय किंवा त्यांचे सामाजिक स्थान यावरूनच पाल्यांनासुद्धा तोच व्यवसाय करणे भाग होते. जातीव्यवस्था आर्थिक संघटन म्हणून अतिशय हानिकारक अशी व्यवस्था आहे. अनेक वेळा जातीव्यवस्थेला वंशशुद्धी हा मुद्दा जोडला जातो. वंशशुद्धीसाठी जातीयता पाळली जाते, असे वरिष्ठ जाती किंवा उच्चवर्णीयांनी कडून म्हटले गेले आहे .परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सप्रमाण हे दाखवून दिले आहे, की आता जगभरामध्ये कोणताही वंश हा शुद्ध राहिलेला नाही. केवळ सहभोजन केल्याने कोणाचेही रक्त अशुद्ध होत नाही. भारतामध्ये जातिव्यवस्थेने विविध जाती व पोटजाती यांच्यामधील रोटीबेटी व्यवहार पूर्णतः बंद केले होते .यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिव्यवस्था व वंशशुद्धी यावर सखोल अभ्यास करून व शुद्धीसाठी जातीयता टिकवणे अत्यंत मूर्खपणाचे आहे असे म्हटले होते. भारतातील जातिव्यवस्थेने समाजाचे पूर्णपणे विघटन व नैतिक

खच्चीकरण केले आहे . यामुळे अस्पृश्याबरोबर सवर्ण व वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांची मानसिकता सुद्धा अत्यंत खालावलेली आपल्याला पाहायला मिळते. जातीमुळे सार्वजनिक चैतन्य संपले आहे. तसेच जात हे सुधारकांना छळण्याचे एक शस्त्र म्हणून वापरण्यात आले. हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेने भारतीयांची अधोगती केली आहे. कारण संरक्षण व आक्रमण यासाठी समाजातील सर्वांचे ऐक्य होने आवश्यक आहे. मात्र भारतावर झालेली आतापर्यंतची सर्व आक्रमणे व भारतीयांना स्वीकारावे लागलेले इतरांचे साम्राज्य, परकीय सत्ता, पारतंत्र्य यापाठीमागे भारतीय जाती व्यवस्था हेच होते. हिंदूंचे जीवन हे नेहमीच पराभवाचे जीवन राहिलेले आहे ,याचे कारण हिंदु धर्मातील सर्व व्यक्तींना संरक्षणासाठीचे शस्त्र प्रशिक्षण शिक्षण व संपत्ती बाळगण्याचा अधिकार नव्हता . याशिवाय कोणताही सामान्य माणूस सार्वजनिक जीवनामध्ये आत्मविश्वासपूर्ण वर्तन ठेवू शकत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिप्रथेचे निर्मूलन या भाषणांमध्ये एकूण 26 भागांमध्ये जातीप्रथा त्याचे दुष्परिणाम निर्मूलन आणि निर्मूलनानंतर भारतीय समाजावरील परिणाम यांची चर्चा केलेली आहे. जाती प्रथेमुळे एका जातीकडून दुसऱ्या जातीतील लोकांचे गुणवत्ता मारली जाते. या संदर्भात हिंदू लोक हे कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या अत्यंत योग्य अथवा गुणवत्ता असणाऱ्या विद्वान स्त्री-पुरुषाला आपला गुरू म्हणून स्वीकारू शकत नाहीत असा दासबोधाचा दाखला देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एका जातीने दुसऱ्या जातीतील व्यक्तीवर केलेल्या अन्यायाचा उल्लेख केला आहे. यामुळे अंतर्गत गुणवत्ता मारली जाते. माणूस म्हणून जगण्याची संधी हिरावून घेतली. स्वतःला मिळणाऱ्या शारीरिक वांशिकता अथवा स्वकर्तुत्वावर स्थान निर्माण करण्याच्या पद्धतीला धक्का पोहोचतो. केवळ जन्मामुळे व सामाजिक स्थानामुळे एखाद्या व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त होण्याची संधी प्राप्त होते. आणि कोणत्याही व्यक्तीचा जन्म ही त्याच्या स्वतःच्या योगदानाची अथवा स्वतःची निर्मिती असत नाही त्यामुळे जन्माने मिळणारी प्रतिष्ठा मान सन्मान की दुसऱ्या व्यक्तीसाठी एक शोषणाची अथवा अन्याय करणारी गोष्ट ठरते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जन्म व जातीमुळे मिळणारी प्रतिष्ठा निषिद्ध मानली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये राष्ट्रीय काँग्रेस यांनी सामाजिक व राजकीय सुधारणांसाठी प्रयत्न सुरू केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या भाषणांमध्ये काँग्रेसप्रणीत सामाजिक सुधारणा किती तकलादू होत्या हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ विधवा पुनर्विवाह किंवा हिंदू धर्मातील स्त्रियांच्या राहणीमानाच्या पद्धतीसाठी केलेल्या सुधारणा म्हणजे सामाजिक सुधारणा असू शकत नाहीत .जाती व्यवस्थेकडे केले गेलेले दुर्लक्ष ही अक्षम्य गोष्ट असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले होते. सामाजिक परिषदांमध्ये जाती व्यवस्थेची चिकित्सा व जातीव्यवस्था समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. डॉ.आंबेडकर यांच्या मते काँग्रेस मध्ये असणारी त्या काळातील नेतृत्व अथवा समाजधुरीण हे राजकीय सुधारणांसाठी आग्रही होते. मात्र सामाजिक सुधारणा व त्यातही जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी मात्र उदासीन असल्याचे मत मांडले होते. काँग्रेस मधील हा दुटप्पीपणा सामाजिक सुधारणांमध्ये मोठा अडथळा असल्याचे सांगितले. कोणत्याही देशामध्ये राजकीय क्रांती होण्या साठी त्यापूर्वी सामाजिक क्रांती होणे आवश्यक आहे. याची अनेक उदाहरणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि अंनिहीलेशन ऑफ कास्ट मध्ये दिलेली आहेत. अमेरिकेमध्ये स्वातंत्र्ययुद्ध जिंकण्या यापूर्वी सामाजिक सुधारणांसाठीची चळवळ ,मानसिकता व पार्श्वभूमी निर्माण झालेली होती . अरब हे राजकीय सत्ता बनण्यापूर्वी प्रेषित महंमदाने सुरू केलेल्या एका संपूर्ण धार्मिक चळवळीचा परिणाम म्हणून पुढे आले होते. तसेच भारतात चंद्रगुप्ताच्या नेतृत्वाखाली झालेली राजकीय क्रांती हीसुद्धा गौतम बुद्धाचा धार्मिक व सामाजिक क्रांतीचा परिणाम म्हणून घडलेली होती. याचाच अर्थ भारतामध्ये सुद्धा राजकीय स्वातंत्र्य, राजकीय समता, राजकीय न्याय व राजकीय लोकशाही साठी सामाजिक स्वातंत्र्य, सामाजिक समता, सामाजिक न्याय व सामाजिक लोकशाही अस्तित्वात येणे आवश्यक असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भाषणांमध्ये मांडलेले होते. सामाजिक चळवळी शिवाय राजकीय चळवळ यशस्वी होणे अशक्य होते . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेस बरोबरच समाजवाद्यांना सुद्धा भारतातील सामान्य लोकांना राजकीय चळवळ व राजकीय स्वातंत्र्यासाठी सक्रिय करण्यापूर्वी भारतातील जाती व्यवस्था, त्यातून निर्माण होणारी शोषण व्यवस्था ,अंधश्रद्धा, कर्मकांड व मानवाला अमानुष मिळणारी वागणूक संपल्याशिवाय आपण जागतिक पटलावर एक स्वतंत्र देश, राष्ट्र अथवा सत्ता म्हणून उदयास येण्यासाठी अपात्र असल्याचे सांगितले होते. डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते जोपर्यंत "इथे अपमानाच्या आणि एका वर्गाने दुसऱ्या वर्गाला दडपल्या च्या खुणा आहेत तोपर्यंत भारतात आपण मुक्त समाजाची बांधणी करू शकतो यावर विश्वास ठेवता येणार नाही "1. भारतामध्ये धर्म, सामाजिक स्थान आणि कुटुंबाकडे ,व्यक्तीकडे असणारी संपत्ती हे सर्व प्रकारच्या सत्ता व अधिकार

यांची स्त्रोत आहेत. यामुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर किंवा एक व्यक्तिगट दुसऱ्या व्यक्ती गटावर नियंत्रण व वर्चस्व ठेवण्यासाठी या सर्वांचा वापर करीत असतो. विशेषतः भारतातील धर्म व सामाजिक स्थान हे जन्माने मिळतात .त्यात अनेक वेळेला इथल्या जातिव्यवस्थेचा ही सक्रिय सहभाग असतो. भारतामध्ये अस्पृश्य व स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची संपत्ती व सामाजिक स्थान मिळविता येणे अशक्य आहे .आजही पितृसत्ता, पुरुषप्रधानता, जातीयता, धर्मांधता यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षानंतरही दलित व स्त्रियांना दुय्यम म्हणूनच जगावे लागत आहे .

1936 काळी ही परिस्थिती अत्यंत बिकट होती. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते केवळ आर्थिक वर्ग व स्तरांमध्ये समानता व सुधारणा यामुळे भारतातील जातीव्यवस्था कायम ठेवून अस्पृश्य व स्त्रियांची सामाजिक स्थिती किंवा स्थान दर्जा व अधिकाऱ्यांमध्ये बदल होतील अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे .समाजव्यवस्था सुधारल्याशिवाय केवळ आर्थिक सुधारणांवर भर देता येणे अशक्य आहे . त्यातून आर्थिक सुधारणा झाल्या म्हणजेच होणारा अन्याय, अत्याचार ,शोषण संपेल असे नाही. भारतामध्ये केवळ आर्थिकता हा शोषणाचा बिंदू नव्हता तर धर्म व सामाजिक स्थान म्हणजेच जात व जातीतून निर्माण होणारी इथली शोषण व्यवस्था हे भारतीयांच्या व विशेषत: अस्पृश्यांच्या विषमतेचे मूळ आहे .जोपर्यंत भारतातील जातीव्यवस्था संपणार नाही तोपर्यंत विविध वर्गांना पूर्ण समान वागणूक देण्यावर विश्वास ठेवता येणे अशक्य असल्याचे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले होते. युरोपियन समाजवाद व भारतीय समाजवाद यातील हा मूलभूत फरक लक्षात घेणे आवश्यक आहे .युरोपियन समाज वादांमध्ये केवळ आर्थिकते वर आधारलेला वर्ग हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा होता .मात्र भारतात मात्र जन्माने मिळणारी जात व त्याचे निर्मूलन केल्याशिवाय भारतीय समाजवाद यशस्वी होणे अवघड असल्याचे मत डॉ.आंबेडकर यांनी मांडले होते.

भारतातील जातिव्यवस्थेने सर्व भारतीयांना एका क्रूर समाज पद्धतीचा, इतिहासाचा साक्षीदार बनविले आहे. भांडवलशाही व जागतिकीकरणाने जातीयता संपेल असे वाटत असताना सुद्धा अजूनही सामाजिक व्यवहारांमध्ये जाती सूक्ष्म पद्धतीने कार्यरत असताना दिसून येतात. पेशवेकालीन समाजव्यवस्थेमध्ये सार्वजनिक रस्त्यांवरून अस्पृश्यांना चालण्यासाठी कमरेभोवती झाडू वापरावा लागत असे, अथवा आपल्या शरीर व सावलीचा विटाळ होऊ नये याची दक्षता घ्यावी लागत असे .अजूनही भारतामध्ये आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचा ऑनर किलिंग होत असल्याचे आपल्याला पाहायला मिळते. महाराष्ट्र ,हरियाणा राजस्थान या विविध राज्यांमध्ये होणाऱ्या ऑनर किलिंग च्या घटना भारतामध्ये जातीयतेची मुळे किती खोलवर गेली आहेत, याची ही ठळक अशी उदाहरणे आहेत .फार पूर्वीपासून वरिष्ठ जातीतील लोकांनी कनिष्ठांना सामाजिक राजकीय व सांस्कृतिक पातळीवरती कनिष्ठ ठेवण्याचे प्रयत्न केल्याचे आढळून येते. अॅनिहीलेशन ऑफ कास्टमध्ये बलाई लोकांना घालण्यात आलेली अनेक जाचक बंधने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्णन केली आहेत .जरी पाठाच्या पगड्या बांधू नयेत किंवा रंगीत व सुंदर काठ असलेले धोतरे वापरू नयेत तसेच हिंदू नातेवाइकांचे निधन झाल्यानंतर कितीही दूर असले तरी त्यांना ती माहिती कळविणे हे दलितांचेच काम आहे. याशिवाय सर्व हिंदूंच्या विवाह प्रसंगी अथवा सण समारंभांमध्ये बलाई लोकांनी वाद्य वाजविले पाहिजेत .याशिवाय बलाई स्त्रियांनी सोन्या-चांदीचे दागिने वापरू नयेत. हिंदू स्त्रियांचे बाळंतपण बलाई स्त्रियांनी केलीच पाहिजेत. आपल्या कामाचा योग्य तो मोबदला न मागता दिलेले तेवढेच स्वखुशीने स्वीकारले पाहिजेत. अशा जाचक व सक्तीच्या अटी मान्य नसतील तर दलितांनी गाव सोडली पाहिजेत. अशा अनेक गोष्टी दलितांवर लादलेल्या होत्या .

दलितांना त्या काळातही शिक्षण घेण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागलेला आहे .गुजरातच्या कविठा गावाचे उदाहरण देत गावातल्या सामायिक सरकारी शाळांमध्ये अस्पृश्यांनी शिक्षण घेऊ नये, यासाठी तेथील हिंदूंनी दिलेले आदेश अंअॅनिहीलेशन ऑफ कास्ट मध्ये वर्णन केले आहेत. याशिवाय दलित लोकांनी सवर्ण लोका प्रमाणे समारंभपूर्वक भोजन देणे हा सुद्धा गुन्हा मानला होता. तूप खाणे किंवा वाढणे ही सुद्धा केवळ श्रीमंतांची व विशेषतः उच्च सामाजिक जातीतल्या समजल्या जाणाऱ्या लोकांची चैन होती. सामान्य लोकांनी तूप खाणे हा गुन्हा मानला होता. याचा अर्थ भारतातील जातिव्यवस्थेने सामान्य माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करून दिलेली नाही. भारताच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष व चळवळी करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांनी भारतातील जातिव्यवस्थेवर सर्वप्रथम लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे .भारतातील अस्पृश्य यांना मानवतेची वागणूक देण्यासाठी धर्म व सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत. जोपर्यंत सामाजिक दबाव निर्माण निर्माण होणार नाही, तोपर्यंत स्वातंत्र्यलढा अथवा भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये जाती निर्मूलन व त्या अनुषंगाने बंधुता व

एकात्मता निर्माण करणाऱ्या तरतुदी नमूद करणे अशक्य असल्याचे मत डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. राजकीय सुधारणांच्या पूर्वी सामाजिक सुधारणा अत्यंत आवश्यक असल्याचे सांगताना" राजकीय सुधारकांना हव्या त्या दिशेने जाऊ द्या मात्र संविधान तयार करताना प्रचलित समाज व्यवस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नाकडे ते दुर्लक्ष करू शकत नाहीत हे त्यांच्या लक्षात येईल"2 असे मतही डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केले होते आणि एकूणच भारतीय राज्यघटनेच्या निर्मिती नंतर आपण जेव्हा मूलभूत अधिकार आंकडे अभ्यासक या दृष्टीने पाहतो तेव्हा आपल्या असे लक्षात येईल की समतेच्या अधिकारांमध्ये अस्पृश्यता व जाती निर्मुलन आवर्ती दिला गेलेला भर व भारतातील सर्व प्रकारच्या विषमता नष्ट करण्यासाठी केल्या गेलेल्या विविध तरतुदी म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या विधानाचे समर्पकतत्त्व सिद्ध करते .अंनिहीलेशन ऑफ कास्ट मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाति प्रथेचे निर्मूलन झाल्यानंतर एका मुक्त मानवी समाजाचे चित्र पाहिले आहे. ज्यामध्ये ही सर्व माणसं संपर्क व सहवासातून एकमेकांच्या सुख दुःखा मध्ये सहभागी होतील .समाज, देश व राष्ट्र म्हणून जगण्यास पात्र राहतील.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगभरातील विविध विष मतांचा अभ्यास केला होता. या सर्व विषमता मध्ये भारतीय जाती व्यवस्था ही अतिशय अमानुष व क्रूर समाजव्यवस्था असल्याचे म्हटले आहे. युरोपियन राष्ट्रांमध्ये अनेक युद्धे झाली परंतु दोन्ही बाजूने लढलेल्या योद्ध्यांच्या वंशजांनी पुढील पिढ्यांमध्ये आपापसातील वैर किंवा द्वेष न बाळगता समाजाचे घटक म्हणून सहजजीवन जगण्याची उदाहरणे दिली आहेत .मात्र भारतात ब्राह्मणांना त्यांच्या पूर्वजांनी शिवाजीचा अपमान केल्याबद्दल ब्राह्मणेत्तर लोक आजही दोष देतात .यावरून जाती आणि त्यांच्याबद्दलच्या प्रखर जाणिवा यामुळे भूतकाळातील जाती मधल्या वैर भावांचे हस्तांतरण पुढच्या अनेक पिढ्यांनी सुरु ठेवले आहे. यामुळे भारतीय समाजाच्या ऐक्य, बंधुता आणि नैतिकतेला तडा गेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते जोपर्यंत जाती शिल्लक असणार आहेत .तोपर्यंत ही वैरभावना संपुष्टात येणार नाही. तसेच प्रत्येक विवेकी हिंदूला जातिव्यवस्थेमुळे अस्पृश्य व आपले स्वतःचे नुकसानही झालेले कळते. मात्र जेव्हा जेव्हा त्याला विवेकी अथवा कर्तव्यभावनेने सामाजिक जीवनामध्ये वावरायचे असते तेव्हा जाती त्याला असे करण्यापासून प्रतिबंधित करत असतात. म्हणून जातीयता नष्ट झाल्याशिवाय ऐक्य, बंधुभाव , समता निर्माण होणार नाही व लोकशाही जिवंत राहण्यासाठी आपण सर्वजण एक आहोत , आपण सर्व जण परस्परांची बंधू-भगिनी प्रमाणे वर्तन ठेवले पाहिजे ही भावना प्रबळ होणार नाही आणि लोकशाही यशस्वी होणार नाही .जोपर्यंत जाती आहेत तोपर्यंत वरिष्ठ जाती कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींना सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय समान पातळीवर ती येण्यासाठी प्रतिबंध करत राहतील आणि हजारो वर्षापासून निर्माण झालेली ही विषमता पुढील अनेक पिढ्यांपर्यंत हस्तांतरित होण्याची शक्यता आहे. जर जाती नष्ट झाल्या तर सर्व समाजातील व्यक्तींना स्वकर्तृत्वावर सामाजिक योगदान देता येणे शक्य आहे. सामाजिक ,आर्थिक, सांस्कृतिक पातळीवर ती स्वतःचा ठसा व प्रभाव निर्माण करता येणे शक्य आहे .

संपर्क व सहवासातून आपण एक आहोत ही भावना निर्माण करता येणे शक्य आहे. यासाठी आंतरजातीय व्यवहार व रोटी व्यवहार यावर ती भर दिला गेला पाहिजे त्याच प्रमाणे सर्व जीवना मधून शास्त्रांचा आधार स्पष्ट केला पाहिजे व शास्त्रांमधून जन्मामुळे निर्माण झालेले यावर ती भर दिला गेला पाहिजे त्याच प्रमाणे सर्व जीवनामधून शास्त्रांचा आधार स्पष्ट केला पाहिजे व शास्त्रांमधून जन्मामुळे निर्माण झालेले अधिकार व शोषण व्यवस्था ही नष्ट केल्या पाहिजेत अधिकार व शोषण व्यवस्थाही नष्ट केल्या पाहिजेत. सामाजिक व्यवहारातून जाती हद्दपार केल्या तर आपण या देशाचे जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य भावनेने परस्परांना सहकार्य व शांततामय सहजीवन जगता येणे शक्य आहे. मागील अनेक पिढ्यांच्या वैर भावाचे विस्मरण झाले तरच पुढच्या भावी पिढ्यांमध्ये प्रेम, आपुलकी, जिव्हाळा व सामाजिक अभिसरण निर्माण होणार आहे. लोकशाहीसाठी सर्व प्रकारचे सामाजिक अभिसरण अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय पूर्वीच्या काळी अस्पृश्य व दलितांना स्वतःच्या मूलभूत गरजांसाठी म्हणजेच अन्नधान्य किंवा संरक्षणासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागायचे आजही स्त्रियांच्या बाबतीमध्ये असे परावलंबन आपल्याला दिसून येते. जाती नष्ट झाल्या तर दलित व स्त्रियांचे हे परावलंबन संपून त्यांना एक माणूस म्हणून जगण्याची संधी मिळणार आहे. पाऊस रूपाने असे म्हणता येईल की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी 1936 मध्ये मुद्रित केलेले हे भाषण भारतीयांसाठी मानवमुक्तीचा जाहीरनामा आहे. यामध्ये हिंदू धर्मातून आलेली चातुर्वर्ण व्यवस्था व त्यातून आलेल्या जाती ,जातीमुळे निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या विषमता व त्याचे दुष्परिणाम, जाती टिकून राहण्याच्या विविध कारणांचा मागोवा घेतला आहे .जातिनिर्मूलन झाल्यानंतर

भारतीय समाज हा मानवतेच्या दिशेने अग्रक्रम करणारा समाज म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवणारा आशावादही व्यक्त केला आहे.

**संदर्भ सूची**

1) एक एक डॉक्टर आणि एक संत- अरुंधती राय- मधुश्री पब्लिकेशन -पृष्ठ क्रमांक 203

2) एक डॉक्टर आणि एक संत- अरुंधती राय –मधुश्री पब्लिकेशन- पृष्ठ क्रमांक 199

3) जाति प्रथेचे निर्मूलन- डॉ. बाबासाहेब आंबेडकर -प्रबुद्ध भारत प्रकाशन ,नागपूर

4 )समकालीन भारत: जातीअंताची दिशा -दिलीप चव्हाण -हरिती प्रकाशन, पुणे

# म. जोतीबा फुले यांचे समताविषयक विचार

**प्रा. मनोहर आनंदराव गुडधे**
सहयोगी प्रा. अर्थशास्त्र विभाग चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
manojgudadhe5@gmail.com

**सारांश :—**

उदारमतवादी विचाराने भारावलेल्या व्यक्तीमत्वाचे म. जोतीबा फुले यांनी नैसर्गिक हक्काच्या संकल्पनेचा पुर्रस्कार करून समाजात शुद्रातीशुद्र व स्त्रिदास्यत्व यांच्या मुक्ततेसाठी समतेच्या तत्वांचा ध्यास घेतला. भारतीय समाजात असलेली वर्णव्यवस्था व त्यातून निर्माण करण्यात आलेली जातीव्यवस्था ही ईश्वर निर्मीत नसून ती मानव निर्मित आहे. असा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन त्यांनी प्रतीपादन करून या व्यवस्थेमुळे सामाजिक विषमता वाढण्यास मोठया प्रमाणात हातभार लागला असे मत मांडुन वर्णव्यवस्थेवर जोरदार हक्का चढविला. समतेच्या तत्वाची मांडणी करतांना त्या तत्वाला त्यांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीची दिलेली जोड हे समताधीष्ठीत समाजरचना निर्माण करण्याच्या दिशेने केलेली पायाभरणी ठरते. माणसाचे माणुसपण नाकारण्याचा कोणालाही अधिकार नाही या तत्वावर त्यांनी जातीभेद, अस्पृश्यता तसेच स्त्रियांच्या गुलामगीरीवर कडाडुन टिका केली. या सर्वामुळे समाजातील बहूसंख्यक वर्गाची कशी अपरिमीत हानी होत आहे. याचे विविध दाखले देऊन स्पष्टता करतांनाच त्यांनी शिक्षण, प्रबोधन, कायदे, व्यवसाय स्वातंत्र्याच्या माध्यमातून जातीव्यवस्था व अस्पृश्यातेचे समुळ उच्चाटनासाठी चळवळ उभारली. एकूणच समतावादी विचारांचा पुर्रस्कार करून समताधीष्ठीत समाजाची निर्मिती करण्यासाठी म. फुले यांनी धर्मविषयक विचारांची चिकित्सा करून धर्माशी निगडीत असणाऱ्या अनिष्ट चालीरीती व जाचक प्रथा या समतेच्या मार्गाला अवरूध्द करतात व त्यातूनच सामाजिक विषमतेला खतपाणी मिळते असे मत प्रतिपादन केले.

**बिज शब्द :—**धर्म, शेतकरी, शुद्रातीशुद्र, अधीकार, एकेश्वरवाद, समता, समाजरचना, निर्मिक, गुलामगीरी, सत्यशोधक, मुक्तता.

**प्रस्तावना :—**

सामाजिक विषमतेच्या भींती तोडुन व समता मुलक समाजाची उभारणी करण्यासाठी महाराष्ट्राच्या भूमित ज्या ज्या थोर महापुरूषांनी आपले आयुष्य वेचले त्यात म. फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. समताधीष्ठीत समाजाच्या निर्मितीसाठी केवळ सुधारणावादी विचारांची मांडणी करून न थांबता त्या विचारांना म. फुल्यांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. त्यांचा पिंडच हा मुळात कृतीशील क्रांतीकारकाचा होता. समाजातील दलीत, शोषीत, वंचीत घटकांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या न्याय व हक्कासाठी आपले संपुर्ण जीवन समर्पीत करणारे ते थोर महापुरूष होते. ज्या काळात धर्मातील रूढी, प्रथा व परंपरांचा पगडा मानवी मनावर अत्यंत प्रभावी ठरला असतांना त्या काळात म. फुल्यांनी आधुनिक विचारांची बिजे पेरली. ऐवढयावरच न थांबता शेतकरी, कामगार, गरीब व होतकरू अशा वर्गातील लोकांच्या होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठवून त्यांच्या अज्ञानरूपी अंधकारमय जीवनात ज्ञानाच्या प्रकाशाच्या साहाय्याने त्यांचे संपुर्ण जीवनच प्रकाशमान करण्याचा प्रयत्न शेवटपर्यत केला. त्यांच्या या महानकार्यामुळेच म. फुले यांना आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतीकारक म्हणून ओळखले जाते.

भारतातील ख्रिश्चन मिशनरीचे कार्य व मी जगात सेवा करून घेण्यासाठी आलो नाही तर इतरांची सेवा करण्यासाठी आलो आहे. हया मिशनरीतील घोषवाक्याने ते प्रभावित झाले होते. त्यातच ख्रिश्चन व मुस्लीम धर्मातील एकेश्वर वादाच्या संकल्पनेचाही ज्योतीबाच्या मनावर खोलवर परिणाम झाला. पाश्चात्य विचारवंत थॉमस पेन यांच्या 'मानवाचे हक्क या ग्रंथाचे वाचन केल्यावर मानसाच्या जन्मासिध्द अधिकाराचे महत्त्व व्यापक अर्थाने लक्षात आले.' भारतातील जाती व्यवस्थेने भारतीय समाजात निर्माण केलेली उच्च—निचतेची भावना, अस्पृश्यतेचे पालन, शुद्रातीशुद्र व समाजातील बहूसंख्यक अशा घटकाला शिक्षणासारख्या महत्त्वपुर्ण अधिकारापासुन वंचित ठेवून त्यांना नाकारण्यात आलेल्या विकासाच्या विविध संधी या पार्श्वभूमिवर 'जन्मसिध्द मानवी अधिकार' या आधुनिक काळातील संकल्पनेने जोतीबांना विशेष प्रभावित केले. जन्मत:च मानसाला काही अधिकाराची प्राप्ती होत असते मात्र भारतातील सामाजिक परीस्थिती , अनिष्ट प्रथा व परंपरा, उच्च—निचतेची भावना यामुळे काही विशीष्ट लोकांनाच या हक्काची प्राप्ती होते आणि समाजातील बहुसंख्यक घटक अशा अधिकारापासून वंचीत असतो. अशा परिस्थितीत बंहूसंख्यक घटकांची या अनिष्ट प्रथा व पंरपरेतून सुटका केल्याशिवाय व्यक्तीची व पर्यायाने समाजाची प्रगती होणार नाही अशी व्यापक जाणीव ज्योतीबाची झाली व या जाणीवेतूनच त्यांनी समतेच्या तत्वांचा पुरस्कार करून आपल्या समताविषयक समग्र आणि साक्षेपी विचाराची मांडणी केली व त्याला व्यावहारीक स्वरूपही प्राप्त करू दिले.

**जन्मसिध्द अधिकराचे महत्त्व :—**

थॉमस पेन यांनी लिहलेल्या 'मानवी हक्क' या ग्रंथाचे वाचन केल्यावर म. फुले यांच्या मनात 'जन्मसिध्द मानवी हक्क' या संकल्पनेविषयक आकर्षण निमाण झाले. भारतीय समाजातील जातीव्यवस्था व त्यातुन निर्माण झालेली उच्च निचता, शुद्रातीशुद्र वर्गाची निर्मिती व त्यांच्यावर होणारा सामाजिक अन्याय हे सर्व अनर्थ केवळ मानवी हक्काच्या अभावामुळे वा त्यांना मानवी हक्क नाकारण्यात आल्यामूळे ओढावलेले आहे. अशी त्यांची धारणा झाली. सर्व मानव प्राण्यांना जन्मत:च काही अधिकरांची प्राप्ती होत असते. मात्र सामाजिक परिस्थती, समाजातील प्रथा व पंरपरा भेदभाव इ. मुळे बहुसंख्यक लोकांना या अधिरापासून वंचीत राहावे लागते. अशा परिस्थितितुन या वंचीत लोकांची सुटका केल्याशिवाय व्यक्तीची व पर्यायाने समाजाची सर्वांगीण प्रगती होणार नाही

याची वास्तविक जाण म. फुले यांना आली आणि या व्यापक जाणीवेतूनच त्यांनी समाजातील बहुसंख्यक लोकांना त्यांचे नैसर्गिक अधिकार मिळवून देण्यासाठी समतेच्या तत्वाचा पुर्रस्कार केला.

माणसाचे माणूसपण नाकारण्याचा कोणलाही अधिकार नाही असे ठाम मत म.फुले यांनी प्रतीपादन केले. देशाची प्रगती होणे ही काळाची गरज आहे. मात्र ही प्रगती साध्य करतांना माणुसकीचा बळी दिला जाता कामा नये. यावर फुल्यांनी विशेष भर दिला. जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रियांची गुलामगीरी याचा कडाडुन विरोध करतांनाच त्यांनी शिक्षण, प्रबोधन, कायदे, व्यवसाय, स्वातंत्र्य इ. मार्गानी पांरपारीक विषमता नष्ट करून एक नवा समताधीष्ठीत समाज निर्माण कसा करता येईल यासाठी त्यांनी चळवळ उभारली. ब्राम्हणी आणि वर्णश्रेष्ठत्वाचा पुर्रस्कार करून असमानतेच्या तत्वाला खतपाणी घालणाऱ्या विचार प्रणालीला समतावादी विचार प्रणालीचा पर्याय देण्याचा पहिला प्रयत्न म. ज्योतीबा फुले यांनी केला. यासाठी त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेत रूढ असलेली व टिकुन असलेली सामाजिक विषमता याचा सखोल अभ्यास करून या विषमतेची कारंणमीमासा ज्योतीबांनी केली. कारमीमांसा करतांना ज्योतीबा फुले म्हणतात, ''कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही. आणि चातुर्वण्य व जातीभेद ही निर्मिती माणवाचीच आहे''. ईश्वराच्या नावावर विषम समाजरचना निर्माण करण्यात येऊन येथील मुळ रहिवांशावरच आर्यभटानी ज्ञानबंदी आणि स्पर्शबंदी लादून विषमतेवर आधारीत समाजरचना निर्माण केली. धर्माचे प्रभाक्षेत्र वाढवून धर्माचे अवास्तव स्तोम माजवीण्यात आले व याप्रकारे शुद्रातीशुद्राना ज्ञानार्जन व घनसंचय करण्याकरीता अयोग्य ठरवून त्यांना कायमस्वरूपी परावलंबी करण्यात आले. अशी भारतीय विषम समाजरचनेची कारंमीमांसा म. फुले यांनी केली.

**समतेसाठी समान हक्काचे प्रतिपादन :—**

निसर्गातल्या सर्व गोष्टी सर्वांना मुक्तपणे वापरता याव्या यासाठी निर्मिकाने त्या निर्माण केल्या आहेत. पृथ्वीतलावरील सर्व मानव प्राण्यांना सारखीच पंचेद्रीये व विचारशक्ती दिली आहेत याचे स्मरण करून देवून ते सर्व माणसांनी परस्परांशी समतेचा व्यवहार करावा असे ते म्हणतात. आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतांना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण होणार नाही किंवा त्याचे हक्क बाधीत होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे. निर्मिकाने सर्वांना दिलेले मानवी अधिकार सर्वांना उपभोगता न येणे हे त्यांना आपल्या समाजरचनेचे सर्वात आक्षेपार्ह वैगुण्य वाटत होते. आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने सर्व प्राणीमांत्राना उत्पन्न वा निर्माण करतेवेळी मनुष्यास जन्मता स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात साऱ्या हक्काचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे. त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणुस म्हणुन प्रतिष्ठा देणारा धर्म साकारायचा होता. त्यासाठी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात आमुलाग्र बदल घडवुन आणायवा होता त्यासाठी त्यांनी विपूल असे लेखन कार्यही केलेत. मानवी जीवनाला उपदेश करतांना ते लिहतात,

सर्वाचा निर्मिक आहे एक धनी ।।
त्याचे भय मनी ।। धरा सर्व।।
न्यायाने वस्तुचा उपभोग घ्यावा ।।
आनंद करावा ।। भांडु नये ।।
धर्मराज्य भेद मानवा नसावे
सत्याने वर्तावे ।। ईशासाठी ।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा जी मागतो।।
आर्यास सांगतो ।। जोती म्हणे ।।

सर्व मानव प्राणी एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे त्यांचे सर्व हक्कही समान असले पाहीजेत. सर्व जगाचा नियंता व सर्वसाक्षी जो परमेश्वर (निर्मिक) आहे. त्यानेच सर्व मणुष्य मात्रास हक्क दिले आहेत. निर्मिकाने दिलेले हक्क हिरावून घेण्याच्या अधिकार कोणालाही नाही. निर्मिक हा न्यायी व समदृष्टी असणारा आहे त्याने सर्व माणसांना समान स्वरूपाचे अधिकार दिले आहेत. सर्व प्राणीमात्रांना समान अधिकार असल्यामुळे त्यांच्या परस्परात विविध आधारावर भेदभाव करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणूनच म. फुले म्हणतात, ''निर्मिकाने सर्व प्राणीमात्रास निर्माण करतेवेळी मणुष्याला जन्मत:च स्वतंत्र प्राणी बनवीले आहे. स्वातंत्र्य हा माणसाचा जन्मसिध्द अधिकार आहे. म्हणून एका वर्गापुरता म्हणजे केवळ उच्चभ्रु लोकांपुरता स्वातंत्र्याचा अधिकार मर्यादीत ठेवणे हे अन्यायकारक ठरते.'' एकूणच प्रत्येक मानवाला जन्मत:च प्राप्त होणारे नैसर्गिक अधिकार हा जोतीबांच्या सामाजिक विचारांचा केंद्रबिदु आहे. या अधिकारामुळेच मानवाला स्वत:चे अस्तित्व सिध्द करण्यासाठी पोषक स्थिती निर्माण होत असते. किबंहुना ती उपलब्ध होत असते. त्यामुळेच मानवी हक्क हे मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता व पर्यायाने समाजाच्या विकासाठी सर्व मानवांना प्राप्त होणे गरजेचे आहेत असे ते म्हणतात.

**सार्वजनिक सत्यधर्म व समतेच्या तत्वाचा पुर्रस्कार :—**

सामाजिक विषमतेला कारणीभुत असलेली वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यांना हिंदू धर्मग्रंथाचा व धार्मिक रूढी, परंपरेचा आधार आहे. भारतीय समाजात याद्वारे निमाण झालेली उच्च निचता, भेदभाव, शोषण नष्ट करून समता निर्माण करावयाची असेल तर धर्मग्रंथाची चिकीत्सा करणे आवश्यक आहे. या विचारातून म. फुले यांनी आपल्या सार्वजनीक सत्यधर्म या ग्रंथातून धर्मविषयक विचार शास्त्रीय व युक्तायुक्तांच्या निकषावर आधारलेले आहेत. ते ईश्वरसाठी निर्मिक शब्द वापरतात आणि म्हणतात, ''जर सर्व निर्मिती ही ईश्वराने (निर्मिक) केली असेल तर 'शुभ' आणि 'अशुभ' असे काहीच असु शकत नाही.'' हिंदूच्या प्रचलित विषमतामुलक धर्माचरणाऐवजी सर्वधर्मसमभाव व धर्माचरणाची प्रतिष्ठापणा व्हावी असे त्यांनास वाटायचे. सत्यधर्म ही म. फुले यांनी मांडलेली संकल्पना त्यातुनच उभी राहिली आहे. प्रत्येक धर्मीयांना आपापल्या धर्माचे स्वतंत्ररित्या पालन केले तरी असे पालन

करतांना परंस्परांचा द्वेष केला जाऊ नये या तत्वावर जोर देऊन ते एकाच कुंटुबातील माणसांनी विविध धर्माची उपासना करावी असा आदर्श उभा करतात. सत्यधर्म हा सर्व धर्मापेक्षा श्रेष्ठ असुन समतेच्या ध्येयाची प्राप्ती त्यांच्या आधारेच होऊ शकते असा ते विश्वास व्यक्त करतात. व समताधिष्ठीत समाजाच्या निर्मितीवर विशेष जोर देतात.

**वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेच्या वैगुण्यावर कठोर प्रहार :–**

हिंदू धर्माचा अविभाज्य भाग असलेल्या व उच्चनिचता आणि विषमतेची बिजे असलेल्या वर्णव्यवस्था या संकल्पनेवर म. फुल्यांनी जोरदार प्रहार केला. ते म्हणतात, ''वर्णव्यवस्था ही ईश्वर निर्मित नसून ती मानव निर्मित आहे. उच्चवर्णीयांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी केलेला मुळच्या रहिवाशांना गुलामगीरीत डांबुन ठेवण्यासाठीच आर्यांनी त्याचा 'शुद्र' हा चातुर्वण्य व्यवस्थेतील चवथा वर्ण बनविला'' वर्णव्यवस्थेमुळे चवथा वर्ण म्हणुन संबोधल्या गेलेल्या शुद्रांना अत्यंत हीन दर्जाचे व पराकोटीचे जीणे आले. त्यांना पशुपेक्षाही तुच्छ लेखुन त्यावर अनन्वीत अत्याचार सुरू झाला. म्हणूनच वर्णव्यवस्था ही समाजाच्या विकासात एक मोठा अडथळा म्हणून समोर आली. माणसाची बुध्दीमता किंवा कर्तुत्व हे त्याचा कोणत्या एका वर्णात किंवा कुळात जन्म झाला यावर अवलंबुन नाही. उच्चवर्णीयांना गुणसंपन्न समजणे आणि व्यक्तीगत गुणवत्ता न तपासता सर्व शुद्रादीकांना जबाबदारीच्या व अधिकाराच्या स्थानापासुन दुर ठेवणे हे अन्यायकारक आहे असे म. फुले म्हणतात.समाजाची उच्च–निच, श्रेष्ठ–कनिष्ठ या आधारावर विभागणी करून विषमतेला संजीवणी प्रदान करणाऱ्या जातीव्यवस्थेवर म. फुले यांनी अतिशय कठोर शब्दात हल्ला चढविला. ते म्हणतात,'' जाती संस्था म्हणजे केवळ श्रमविभागणी नव्हे, या व्यवस्थेत उच्च वर्णीयांचा स्वार्थ दडलेला आहे. हिंदू धर्मग्रथांनी जातीव्यवस्थेचे समर्थन करून उच्चवर्णीयांचे हितसंबध सुरक्षित राखण्याची खबरदारी घेतली'' जातीव्यवस्थेच्या आधारावर अस्पृश्य म्हणून हिनल्या गेलेल्या समाजाचे प्रंचड प्रमाणात शोषण करण्यात येऊन त्या समाजाची हानी करण्यात आली. त्यामूळे असा समाज हा सामाजिक आर्थिक सांस्कृतीक राजकीय इ. क्षेत्रात मागासलेला राहीला हा विचार त्यांनी मांडला.

**स्त्री – पुरूष समतेचा पुर्रस्कार :–**

म. फुले यानी स्त्री दास्याच्या कारणांचा अत्यंत खोलवर जाऊन शोध घेतला. समाजातील जाचक प्रथा व पंरपरामुळे स्त्रीयांवर गुलामगीरी लादण्यात आली. पीतृसत्ताक व पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने निर्माण करून तीचे कार्यक्षेत्र मर्यादीत व अत्यंत संकुचित करण्यात आले. जेव्हा या अत्याचाराला धर्माची जोड मिळाली तेव्हा स्त्री दास्यत्वाने उग्ररूप धारण केले. यातून म. फुले यांनी हिंदु संस्कृतीचा आणि विषम समाजरचनेचा एक अविभाज्य भाग म्हणून स्त्रियांच्या गुलामगीरीचा विचार केला. त्यामुळेच त्यांनी स्त्रीयांची बंधनेतुन व गूलामगीरीतुन मुक्तता करण्यासाठी सामाजिक पर्यावरण बदलविण्यावर व कुटुंबरचनेची अधिकसत्तावादी चौकट मोडण्यावर भर दिला. स्त्री – पुरूष यांच्या समतेचा पुर्रस्कार करतांना म. फुले म्हणतात की, स्त्री आणि पुरूष यांना दोघांनाही एकाच निर्मिकाने निर्माण केले असून त्यांना सारखेच अधिकार दिले आहेत. त्यामुळे स्त्री आणि पुरूष असा भेद करणे काहीच संयुक्तीक नाही. म्हणून ते स्त्रीयांकरिता वेगळे नियम व पूरूषाकरीता वेगळया नियमांची व्यवस्था असण्याचा प्रखर विरोध करतात. याविषयी फुले म्हणतात, ''स्त्री आणि पुरूष एकसारखे सर्व मानवी हक्काचा उपभोग घेण्या दोघेही सारखेच पात्र असतांना स्त्रियांना एक तऱ्हेचा नियम लागू करणे आणि लोभी पुरूषाला त्या नियमापासुन सूट देणे हा केवळ पक्षपात आहे.'' रोटी–बेटी व्यावहारातून स्त्रि–पुरूष विषमता ही अधिक प्रमाणात वाढु लागली. त्यातच स्वजातीच्या समुहातच विवाह संपन्न ही प्रथा रूढ करण्यात आली त्यामुळेच स्त्रियांचे गौणत्व सुचित कसे होईल याला एक प्रकारचे पाटबळच मिळाले. या सर्वावर पर्याय व उपाय म्हणूनच म. फुले यांनी सत्यशोधक विवाह पध्दतीची शिफपारस केली.

**निष्कर्ष :–**

म. ज्योतीबा फुल्यांच्या समतावादी विचारावर पाश्चिमात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव आहे. हा प्रभाव असला तरी त्यांनी समाजधीष्ठीत समाजरचना निर्माण करतांना इथल्या परिस्थितीचा विचार करून उदारमतवादी सूधारकापेक्षा वेगळया मार्गाचा अवलंब केला. म. फुले यांनी समाजविषयक विचारात वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद यावर आधारीत सामाजिक व आर्थिक विषमताचे निराकरण करण्यावर विशेष भर दिलेला आहे. समताधीष्ठीत समाजाची उभारणी करतांना म. फुले हे मानवी हक्काच्या संकल्पनेवर अधीकाधीक भर देतात. मानवाच्या नैसर्गीक हक्कातुनच व्यक्ती व पर्यायाने समाजाची प्रगती शक्य आहे असे सांगून समतेसाठी मानवी हक्काचे प्रतिपादन करतात. शुद्रातीशुद्र व स्त्री यांची दास्यातून मुक्तता करण्यासाठी त्यांनी सवांगीण दास्यमुक्तीचा लढा उभारला. प्रचलीत विषम धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था, आणि आर्थिक विषमता या तीन्ही गोष्टीचे उच्चाटन झाल्याखेरीज नवा समाज उभा राहू शकणार नाही हे ज्योतीरावांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी शुद्रातीशुद्र व स्त्रियांना जाणीव जागृत करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला व त्यांची जाचक रूढी व प्रथा व त्यातुन निर्माण झालेली बंधने यातून मुक्ततेसाठी समतेच्या विचाराची कास धरली.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

1. यादव विरेद्रसिंह, २०११, समतामुलक समाज एंवम सामाजिक परिवर्तन के युग पुरूष : डॉ. भीमराव आंबेडकर, ओमेगा पब्लीकेशन, दिल्ली.
2. पवार दया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ. म. रा. प्रकाशन, मुबंई.
3. डॉ. कुलकर्णी बी. डी व डॉ. ढमढेरे, २००८, आर्थिक विचार व विचारवंत, डॉयमंड पब्लीकेशन, पुणे.
4. काकडे दिलीप, मुक्त अर्थव्यवस्थेत बहूजन समाजाचे भवितव्य, टेहलणी प्रकाशन, पीपंरी पुणे–११.
5. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, आधुनिक भारतातील राजकीय वारसा,२००२.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# म. जोतीबा फुले यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

**प्रा. विजय शामराव कांडलकर**
राज्यशास्त्र विभाग संताजी महाविद्यालय नागपूर
vijay30kan@gmail.com

**सारांश :—**

समाजातील स्त्री व शुद्रातीशुद्रांची झालेली दुर्दशा आणि या दुर्देशाचे मुख्य कारण त्यांचे केवळ अज्ञान आहे. त्यामुळे हे अज्ञान दुर करण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार व प्रसार होणे गरजेचे आहे. हा व्यापक दुष्टिकोन ठेवूनच त्यांनी आपले विचार व कार्याला चालना दिली. मं. फुले यांनी केवळ शिक्षणविषयक विचार न मांडता त्या विचारांना त्यांनी प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन अनेक शिक्षणविषयक कार्याची त्यांनी पुर्ततासुध्दा केली. हे सर्व करतांना बहूसंख्यक समाजाची धार्मिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील गुलामगीरीतून सूटका करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय अन्य मार्ग नाही हे म. फुल्यांनी ब्रिटीश राज्यकर्त्यांना वेळोवेळी निदर्शनास आणून दिले. त्यांचे शैक्षणिक विचार व कार्य हे स्त्री शिक्षण, प्राथमिक शिक्षण, ग्रामीण भागातील विद्यार्थ्याकरीता विशेष शिक्षणाची व्यवस्था, शिष्यवृत्ती व वसतीगुहाची व्यवस्था, व्यवसायभीमुख शिक्षण, राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रातीशुद्रांना शिक्षण, शिक्षण पध्दतीत वेळोवेळी सुचविलेल्या सुधारणा अशा विविध महत्त्वपुर्ण पैलुला अधोरेखीत करणारे आहेत. एकूणच म. फुले यांनी शिक्षणाला तिसरा डोळा मानुन शिक्षणावर व्यापक प्रकाश टाकला.

**बिज शब्द :—**शिक्षण, गुलामगीरी, शेतकरी, स्त्रिशिक्षण, समता, पाझर, शुद्रातीशुद, शिष्यवृत्ती, वस्तीगृह.

**प्रस्तावना :—**

समाजातील शोषीत, पीडीत, वंचित घटकांच्या उथ्थानासाठी आपले आयुष्य वेचणारे म. ज्योतीबा गोविंदराव फुले हे खऱ्या अर्थाने कृतीशील सुधारक होते. राजकीय गुलामगीरीपेक्षा सामाजिक गुलामगीरी अधिक भंयकर आहे. त्यामुळे बहूजन वर्गाच्या गुलामगीरीच्या बेडयाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी शिक्षणाखेरीज कोणताही सर्वोत्तम पर्याय नाही असे त्यांचे ठाम मत होते. हिंदू समाजातील शुद्रातीशुद्रांच्या गुलामगीरीला पुरोहीत वर्गाचा स्वार्थ, अदुरदृष्टी, आणि असहिष्णुता कारणीभूत असून हिंदू धर्मग्रंथातील रूढीवादी व सनातनी विचारामूळेच सामाजिक विषमतेला नियीमतपणे खतपाणी घालण्याचे काम झाले आहे असे परखड विचार त्यांनी वेळोवेळी व्यक्त केले. त्यांच्या काळात प्राचीन हिंदु परंपरेची गोडवी गाणारा जहाल संप्रदाय व दुसऱ्यावर कुणालाही न दुखवता नव्या जुण्याचा समन्वय करीत सुधारणा घडवून आणणारा असे दोन मतप्रवाह कार्यरत होते. या दोन्ही मत प्रवाहांना डावलुन आपल्या चिकीत्सक वृत्तीने तर्कशुध्द व विज्ञानवादी विचारांची पेरणी करून शुद्रातीशुद्राची स्थिती सुधारण्यावर जोर दिला. ज्या १८ व्या शतकात मानवाचा सामाजिक दर्जा हा त्याच्या जाती व धर्मानुसार ठरविला जात होता त्या काळात म. फुले यांनी जातीवर घणाघाती प्रहार करीत शास्त्रीय व युक्तायुक्तांच्या निकषावर आधारीत अशा धर्म विषयक विचारांची मांडणी केली. ते म्हणतात, मानव हा जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो. ईश्वर (निर्मीक) एक असुन तो सर्वव्यापी निर्वीकार, निर्गुण व सत्यरूप आहे. सर्व मनुष्य व मनुष्योत्तर प्राणी त्याची लेकरे आहेत. ईश्वरासाठी ते निर्मिक हा शब्द वापरतात. विश्वाची निर्मिती जर त्या निर्मिकाने केली असेल तर शुभ, अशुभ असे काहीच असु शकत नाही. सर्वसामान्य गरीबांची पीळवणूक करून सावकार बनलेले मंदीर उभारतांना आघाडीवर असतात. लोकांना लुबाडुन केलेल्या दान धर्माला धर्मकृत्य कसे म्हणता येईल? असा परखड सवाल ते विचारतात. अशा निर्भिड विचारांना आपल्या कृतीची जोड देऊन म. फुले यांनी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक गुलामगीरीतून समस्त मानवाला बाहेर काढण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची ज्योत पेटविली.

म. फुले यांच्या विचारावर पश्चिमात्य विचारवंत थॉमस पेन यांच्या उदारमतवादी विचारांचा प्रभाव अधिक दिसुन येते. थॉमस पेन यांचा 'The right of man' या ग्रथांच्या वाचनाने त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. निग्रो लोकांचे अंधकारमय जीवन, त्यांच्यावर लादलेली गुलामगीरी व त्यांचे करण्यात आलेले शोषण व त्यातुन त्यांचे होत असलेले हाल म. फुलेच्या मनात गर्दी करू लागले. यातूनच मानवी स्वातंत्र्याचा आणि समतेचा ध्येयवाद त्यांच्या मनात आकार घेऊ लागला. निग्रो समाजासारखीच स्थिती भारतातील अस्पृश्य म्हणुन गणल्या गेलेल्या समाजाची असल्यामुळे त्यांची या जाचातून सुटका होणे गरजेचे आहे व त्यासाठी आपल्या बांधवाचे अज्ञान दुर करून त्यांच्यात न्याय व हक्काची जाणीव निर्माण होण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. हे त्यांच्या कर्त्या दुरदृष्टीने हेरले. समाजपरिवर्तनासाठी शिक्षणाचा प्रचार व प्रसार होणे अगत्याचे आहे ही खुणगाठ त्यांनी मनात बांधली व येथुनच त्यांनी समाज प्रबोधनासाठी शिक्षण या पवित्र मार्गाचा अवलंब केला. आणि स्त्रिया आणि शुद्रातीशुद्र यांच्यासाठी ज्ञानाचे दरवाजे उघडण्याकरिता त्यांनी शैक्षणिक क्रांतीची मशाल हाती घेतली.

**म. फुले यांचे शिक्षणविषयक विचार :—**

मानवतावादी विचारांचे पुरस्कर्ते म. फुले यांचे शैक्षणिक विचार हे केवळ तात्वीक विषयावर न थांबता त्या तात्वीकतेला प्रत्यक्ष कृतीची जोड दिल्यामुळे ते वास्तवदर्शी वा व्यावहारीक ठरतात. त्यांचे शिक्षणविषयक विचार हे स्वातंत्र्य समता आणि बंधुता या त्रिसुत्रीवरच आधारीत आहेत. वर्षानुवर्षे गुलामीत खीतपत पडलेल्या बहुसंख्यक समाजाची केवळ शिक्षणाच्या अभावामुळेच कशी दुरावस्था झाली व त्या समाजाचे कसे अपरिमीत नुकसान झाले याचे वर्णन ते स्वरचीत काव्यातून करतात.

'विद्येविना मती गेली' । मतीविना निती गेली ।।
नितीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।।
वित्तविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले '।।

शिक्षणामुळे बहुजन समाजाची झालेली हानी, त्यांची एकंदरीत झालेली अधोगती थांबविण्यासाठी म. फुले यांनी अवघा बहुजन समाज व विशेषत: स्त्रिया यांच्या शिक्षणाचा वसा त्यांनी हाती घेतला. म. फुल्याच्या या कार्याला त्याकाळातील कर्मठ व सनातन्यांच्या प्रखर विरोधाला सामोरे जावे लागले. मात्र न डगमगता व विरोध पत्करून त्यांनी त्यांचे कार्य हे अविरत चालु ठेवले. शिक्षणाच्या प्रचार व प्रसारासोबतच त्यांनी समाज प्रबोधनाचे कामही नेटाने पुढे घेवुन गेलेत. त्यासाठी म. फुले यांनी मेळा, जलसे, नाटके उभे केलेत व शैक्षणिक कार्याला गतीमानता प्रदान केली.

**समाज जीवनाच्या विकासाकरिता शिक्षण :—**

भारत देशाची तुलना ही पाश्चात्य देशाशी केली असता पाश्चिमात्य देशाची प्रगती ही झपाट्याने झालेली दिसते. हा विकास होण्यामागे सर्वात प्रमुख भूमिका ही शिक्षणाची आहे. आर्थिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात या देशांनी प्रगती साध्य करण्याचे एकमेव कारण हे त्यांची ज्ञानोपासना हेच आहे. त्यामुळे भारतीय समाजाला सुध्दा पाश्चात्य देशाप्रमाणे प्रगती साध्य करावयाची असेल तर शिक्षणाची कास सर्वानी धरायला पाहिजे असे ज्योतीरावांनी प्रतिपादन केले. शेतकऱ्याची दैंनावस्था त्यांचे अज्ञानपण, धर्मभोळेपणा, अन्याय सहन करण्याची त्यांची प्रवृत्ती याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्यांतील अशिक्षितपणा आहे. त्यातच ग्रामीण भागात बहुसंख्येने राहणाऱ्या बहुजन समाजाविषयी त्यांना विशेष चिंता होती. ते म्हणतात, ''आपली बहुतांश जनता ही खेडयात वास करते. त्याकरीता शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्याच्या उध्दारासाठी शिक्षण हा एकमेव उपाय आहे.'' अशा समाजाची धार्मीक, आर्थिक, सामाजिक क्षेत्रातील गुलामगीरीतुन सुटका करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही याची जाण ज्योतीरावांनी ब्रिटीशांना करून दिली. त्याकरीताच त्यांनी शिक्षणाची दारं सर्वासाठी खुली झाली पाहीजे यावर अधिक भर दिला.

**स्त्री शिक्षणाचा आग्रह :—**

समाजात संख्येने पुरूषाऐवढीच टक्केवारी असतांनाही अगदी सुरूवातीच्या काळापासुनच स्त्रियांवर मोठया प्रमाणात अत्याचार करण्यात आला. त्यातच स्त्रियांना देण्यात येणाऱ्या वागणूकीला जेव्हा धर्मातील निती नियमांची जोड देण्यात आली तेव्हा या अन्यायाने परिसीमा गाठली. एकूणच भारतीय समाजात स्त्रियांची फार उपेक्षा करण्यात आली. तीला स्वातंत्र्य व समता यापासुन वंचित ठेवण्यात आले. त्यामुळेच ज्योतीरावांनी त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी व तीचे जीवन विकसीत करण्यासाठी शिक्षणाला प्रमुख साधन मानुन स्त्री शिक्षणाचा जोरदार पुर्रस्कार केला. स्त्री ही कुटुंबाचा मुळ आधार असल्यामुळे तीचे शिक्षण म्हणजेच पर्यायाने मुलांचे शिक्षण, तिच्या कुटुंबाचे शिक्षण होय. याकरिताच म. फुलेनी आपल्या ब्राम्हण मित्र असलेल्या भिडे यांच्या वाडयात मुलीची शाळा काढली. ही शाळा महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपुर्ण देशातील पहीलीच शाळा होती. ही घटना म्हणजे महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तभेठ ठरली. ज्योतीरावांच्या या सुधारक विचार व कार्याला त्याकाळातील सनातनी लोकांकडुन विरोध झाला नसता तर नवलच. मात्र या रोष व विरोधाला न जुमानता ज्योतीरावांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवून शिक्षिका म्हणुन त्यांची नेमणूक केली. त्यांच्या या कार्याला एकीकडे काही निवडक सनातन्यांचा विरोध असतांना मात्र समाजाच्या विविध स्तरातून प्रतिसाद मिळत होता. या सकारात्मक प्रतिसादामुळेच फुल्यांनी पुण्याच्या इतर भागातही मुलीसाठी शाळा सुरू केल्या. एकूणच स्त्रियांची पदोपदी होणारी उपेक्षा, त्यांची अवहेलना, त्यांचा हीन दर्जा त्यांची अज्ञातता व त्याचे शारिरीक आणि मानसीक हाल हयांच्या विरोधात आवाज उठवून त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराचा आग्रह धरला. त्यामुळे त्यांस स्त्रिमुक्तीचा आदयप्रवर्तक म्हटले जाते.

**मेकॉलोच्या पाझर सिध्दांताचा विरोध :—**

समाजातील प्रस्थापीत गुलामगीरीचा विरोध करून सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. ज्योतीराव फुले हे महापुरूष होते. वरिष्ठ वर्गातील लोकांसाठी शिक्षणाची व्यवस्था केल्यावर ते खालच्या स्तरातील लोकांना शिक्षण देतील म्हणून लार्ड मेकॉलोने प्रथम वरचा वर्ग शिकला पाहीजे व त्यानंतर खालचा वर्ग शिकवावा यावर भर दिला. जसे पाणी उंच सखल भागावर टाकले असता ते झिरपत झिरपत खालच्या भागात पोहचते या तत्वावर या सिध्दातांचा पाया होता. मात्र 'शिक्षण हे वरच्या वर्गपासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत वा झिरपत आले पाहिजे' या मेकॉलोच्या तत्वाचा फुल्यांनी कडाडुन विरोध केला. आधी कळस व मग पाया असे न होता आधी पाया मग कळस या तत्वावर शिक्षणाची उभारणी असावी असे परखड शब्दात ब्रिटीशांना सुनावले. म्हणुन त्यांनी अगोदर उपेक्षितांना व त्यानंतरच अपेक्षीतांना शिक्षण' हे सुत्र अंमलात आणावे या तत्वावर त्यांनी भर दिला. याविषयक ते म्हणतात. ''भारतात वरिष्ठांनी कनिष्ठांना शिक्षण देण्याची पंरपरा नाही त्यामुळे असे शिक्षण खालच्या स्तरापर्यंत येणेच शक्य नाही.'' शिक्षण ही कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी न बनता त्याची उपलब्धता ही सर्वासाठी व्हावी असे मत त्यांनी प्रतीपादन केले.

**हंटर कमिशनला निवेदन सादर :—**

शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन असणाऱ्या म. फुले यांनी भारतात शिक्षणाची व्यवस्था करतांना इथल्या समाजजिवनाचा विचार करूनच शिक्षणाची सोय करण्यात यावी या विषयक वेळोवेळी आपले मत मांडले. यातच शिक्षण विषयक पाहणी करून सुधारणा करण्याच्या उद्देशाने लार्ड रिपन यांच्या कार्यकाळात सर विलीयम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नेमणुक करण्यात आलेली होती. हा आयोग हंटर आयोग म्हणून ओळखला जातो. या आयोगासमोर साक्ष देतांना म.फुले म्हणतात. ''इग्रंज सरकार उच्चभ्रु जातीची मर्जी सांभाळीत सुधारणेचे धोरण अवंलबीत आहे., म्हणून येथील सुशिक्षीतांची संख्या सुक्ष्मदर्शकातून बघावी लागेल. उच्चभ्रु जातीच्या दुराग्रहामुळे इग्रंज सरकार शुद्रातीशुद्रांच्या शिक्षणाची अक्षम्य हेडसांड करीत आहे.''हंटर कमिशनला दिलेला निवेदनातुन फुले यांनी ग्रामीण भागात आणि बहुजन व मागासलेल्या वर्गातील मुलांच्या शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे अशी मागणी केली. यातच व्यवहार उपयोगी शिक्षणाची उपलब्धता करून व त्यानुसार अभ्यासक्रमाची आखणी करून शिक्षण पुर्ण झाल्यानंतर शुद्रतिशुद्रांना अग्रक्रमाने नोकऱ्या द्याव्यात याकडे त्यांनी सरकारचे विशेष लक्ष वेधले होते. त्यांनी प्रस्तुत केलेल्या निवेदनात १२ वर्षे वय असलेल्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, आदिवासी जाती जमातींना शिक्षणात प्राधान्य देण्यात यावे, लोकल सेस फंडापैकी जास्त भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा इ. अशा प्रमुख मागण्या सादर केल्या होत्या.

**प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे ही भूमिका :–**

तत्कालीन समाजात बहूसंख्यक वर्ग हा शिक्षणापासुन वंचित राहण्यास अनेक कारणांपैकी एक कारण हे शिक्षणाची उपलब्धता मर्यादीत प्रमाणात असणे हे एक होते. प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास हयाच बहूसंख्यक वर्गाला शिक्षणाची उपलब्धता होऊन बहुसंख्यक विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होणची शक्यता होती म्हणूनच म. फुले यांनी प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे असे मत व्यक्त करून या स्तरावरील शिक्षण हे मोफत व सक्तीचे करण्याची भूमिका घेतली. प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि त्यामुळे या शिक्षणाची उपलब्धता होणे हे महत्त्वाचे आहे. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे या विचारांचा पुरस्कार करणारे म. फुले हे प्रथम भारतीय नागरीक होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे त्यांसाठीच दर्जेदार शिक्षण देण्याकरिता प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी प्रतिपादन केले. सरकारी नोकऱ्यामध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी त्यांना दिसून आली. शिक्षण हे खालच्या तळागाळातील मिळावे म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर अधिक भर दिला. ते म्हणतात, ''प्राथमिक शिक्षक शेतकरी वर्गातीलच व प्रशिक्षीत असावेत. अभ्यासक्रमात मोडी, बाळबोध वाचन, हिशेबाची माहिती, इतिहास व भूगोल यांचे ज्ञान व त्याचबरोबर शेतीचे प्राथमिक ज्ञान, आरोग्य व नीती यांचा समावेश असावा.'' दर तीन महिन्यानी या शाळांची तपासणी युरोपीयन तपासणीयांच्या देखरेखीखाली व्हावी अशा सूचनाही ते करतात.

**शिकणाऱ्याच्या सोयीनुसार शिक्षणाची उपलब्धता :–**

शिक्षणाची आवड असणाऱ्या समाजातील सर्व घटकांना त्यांच्या सोयीनुसार शिक्षणाची व्यवस्था करणे अनिवार्य असल्याच्या मताचा त्यांनी पुरस्कार केला. शुद्रातीशुद्र, कष्टकऱ्यांच्या मुला–बाळांना त्यांच्या फुरसतीच्या वेळेत शिकावे लागेल यांचा सांगोपांग विचार करून त्यांनी रात्रपाळीच्या शाळेची व्यवस्था केली. बहूजन समाजाचे वास्तव्य हे ग्रामीण भागात अधिक असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाविषयी म. फुले हे अधिक सजग दिसून येतात. या जाणीवेतुनच त्यांनी प्रौढ शिक्षण, अनौपचारीक शिक्षण समाज शिक्षण या आधुनिक संकल्पनाची बिजे त्या काळात पेरली. तसेच सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागास मागासलेल्या अनाथांच्या शिक्षणासाठी सुविधाही उपलब्ध करून दिल्या. समाजातील बहूसख्यंक वर्गापर्यंत शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच ग्रामीण भागातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणुन वस्तीगृहाची संकल्पना त्यांनी मांडली. त्यातच फुल्यांनी गरीब, होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वस्तीगृहाची सुविधा देण्यावरही भर दिला.

**व्यावसायीक शिक्षणावर भर :–**

सर्वसामान्य लोकांना केवळ शिक्षणाची उपलब्धता करून दिल्यावर त्यांच्या समस्यांचे निराकरण होणार नाही यांची कल्पना त्यांना होती. मिळालेल्या शिक्षणाचा फायदा त्यांना त्यांच्या वैयक्तीक जीवनात करता आला पाहीजे किंवा झाला पाहिजे यावरही त्यांचा विशेष कटाक्ष होता. म्हणुनच त्यांनी नोकऱ्यांच्या बाजारात सुशिक्षीतांची भाऊगर्दी वाढत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षण हे व्यावहार उपयोगी नाही. असे मत त्यांनी मांडले. याकरिताच ते उद्योग प्रदान किंवा आधूनिक पध्दतीने शेती करता येण्यासारखे शिक्षण द्यावे व अभ्यासक्रमही तसाच आखावा यावर भर दिला. शिक्षण म्हणजे केवळ लिहता वाचता येणे ऐवढाच मर्यादीत विचार न करता मिळालेले शिक्षण हे व्यवहारात प्रत्यक्ष कसे अमलांत आणता येईल व त्याचा वापर करून व्यक्ती व समाज जीवनाचा विकास कसा साध्य करता येईल अशा व्यापक अर्थाने त्यांनी शिक्षणाची संकल्पना साकारण्याचा प्रयास केला.

**निष्कर्ष :–**

म. फुले यांच्या काळातील शिक्षण पध्दती ही बहूजन समाजाला शिक्षणापासुन वंचित ठेवणारी होती. त्यातच मिळणारे शिक्षण हे जीवनात उपयोगी पडेलच असेही नव्हेत. या स्थितीत त्यांनी शिक्षणाच्या मोफत व सक्तीच्या तत्वांचा जोरदार पुरस्कार केला नव्हे तर मिळालेले शिक्षण हे व्यवहार उपयोगी कसे पडेल यावरही अधिक भर दिला. समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची उपलब्धता कशी होईल यांची सोयसूध्दा म. फुले यांनी केली. शिक्षण मिळावे, शिक्षणाचा प्रसार व प्रचार होऊन ज्ञान व विचारांची वृध्दी व्हावी यासाठी मं फुले यांची शिक्षणविषयक दुरदृष्टी व विचार म्हणूनच केवळ आजच्या आधुनिक युगातच नव्हे तर भविष्यकालीन समस्यांचे निराकरण करण्यासाठी व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतात. म. ज्योतीराव फुले हे आपले संपुर्ण जीवन बहूजनांच्या उध्दारासाठी व त्यांच्या प्रगतीसाठी खर्ची घातले समाजसेवेकरिता ध्येयाने भरून जाऊन आपले सर्व जीवन समर्पीत करणारे ते महापुरूष होते. म्हणूनच शिक्षण व समता या दोन शब्दातच त्यांच्या या कार्याचे यथोचीत वर्णन करता येईल.

**संदर्भ ग्रंथ सुची :–**

1. काणे प. सी., १९९८, प्रमुख भारतीय व पाश्चिमात्य राजकीय विचारक, पीपंळापूरे ॲण्ड पब्लीशर्स, नागपूर.
2. श्री. यादव आनंद, २००२, आधुनिक भारतातील राजकीय वारसा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ नाशिक.
3. प्रा. डॉ. नांदेडकर व. गो., २००७, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लीकेशन, पूणे.
4. भोळे भा. ल., १९९८, भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, पीपंळापूरे ॲण्ड पब्लीशर्स, नागपूर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# विचारवंत आणि सुधारक : छत्रपती राजर्षी शाहू महाराज

**डॉ. मधुकर श्रीरंग पवार**
छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर
madhukar_pawar@yahoo.in

**प्रस्तावना –**
भारताच्या भू-प्रदेशावर आजवर अनेक राजे होऊन गेले. यातील बहुतांश राजांच्या प्रगतीचा अथवा ऱ्हासाचा इतिहास नोंदविण्याचा तसा प्रश्नच उद्भवला नाही. कारण अशा राजांचा कारभार हा एका विशिष्ट चाकोरीतून चालत होता, अशा राज्यांचा जसा झपाट्याने विकास होत गेला, त्यापेक्षा अधिक वेगाने ऱ्हास सुध्दा होत गेला, त्याची कारणे जवळपास सारखीच असावीत असे वाटते, स्वभाविकपणेअसे वाटते की, राजाच्या सेवेला अनेक नोकर-चाकर, पुष्कळ संपत्ती, एकधिकारी सत्ता, यामुळे तत्कालिन राजाची प्रजेकडे अथवा राज्यातील लोकांकडे पाहण्याची दृष्टीच केवळ शोषणाची,भोगाची आणि जुलुम-अन्यायाची बनत असे, याचा परिणाम लोकांच्या प्रति-राजांच्या विषयी घृणा-तिरस्कार आणि असहकार निर्माण होत होता, म्हणून असे कित्येक राजे उदयाला आले खरे, पण काळानेच त्यांना कायमची मूठमाती दिली. अशा राजांच्या संबंधीत अनुषंगिक असा एखादा पूरावा सुध्दा जीवंत राहिला नाही. देशाच्या इतिहासात त्याच्या नावाचा फारसा उल्लेखही कुठे केला जात नाही. पण हाताच्या बोटावर मोजावेत असे काही राजे होऊन गेले, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे ठसे काळाच्या छाताडावर उमटले आणि त्यांची कारकीर्द काळालाच पूरुन उरली. असे राजे महान झाले... अजरामर झाले... म्हणून आसे वाटते की, जोपर्यंत याभागावर जीव-जगत आहे, तोपर्यंत या राजांचा गुण-गौरव होत राहाणार, हे निर्विवाद सत्य आहे.

असा राजा म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज होय, त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन जगणाऱ्याअनेक पिढ्याचा अभ्युदय झाला. सर्वसामान्य माणसाला माणूस, म्हणून जगण्यासाठी लागणारी व्यवस्था स्थापित करणारा राजा म्हणून शाहू महाराज, आधुनिक काळाला पाहायला मिळाले.इंग्रजांच्या काळात व्यक्ति स्वातंत्र्याला अधिक महत्त्वमिळाले, याचा परिणाम असा झाला की या कालखंडात बहुजन समाजाला पुरोगामी विचारांची दिशा देणाऱ्या- महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महामानवांनी संपूर्ण महाराष्ट्राला सामाजिक मूल्य विचारांचा चेहरा दिला. यात प्रामुख्याने माणसा-माणसात विषमतेची दरी निर्माण करणारी ही जातीयता शोषणाभिमूख आहे. याची जाणिव लोकांपर्यंत जाऊन पोहोचली. याचे दूरगामी परिणाम बहुजन समाजात दिसू लागले. अज्ञानी, अशिक्षित लोकांसाठीराजकारणापेक्षा समाजसुधारणांचीगरज आहे हे या तीघांच्या कार्यातूनप्रकर्षाने जाणवू लागले. महात्मा फुले यांच्या समाजकार्याने प्रभावित झालेले छत्रपती शाहू महाराज पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे हा समाजकार्याचा वारसा सुपुर्त करतात.हजारो वर्षापासूनची प्रचलित आसलेली जुलमी राजसत्ता माणसाला दास्य बनवणारी, गुलाम करणारी होती. अशा राजसत्तेचा बीमोड झाला पाहिजे, यासाठी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारातून घडणाऱ्यासमाजकार्यांने फार मोठे बदल घडून आले. शाहू महाराजांनी डोळसपणे सभोवतालचे जनजीवन काळजीपूर्वक व बारकाईने अनुभवले होते, त्यादिशेने केलेल्या समाज चिंतनातून दलित,उपेक्षित, गरीब शेकतरी, मागासलेले मजुर,भटक्या-आदिवासी बहुजन समाजाचा उत्कर्ष होत गेला.

**विचारवंत - छत्रपती शाहू महाराज:**

शाहू महाराजांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात २६जून १८७४ साली झाला. कोल्हापूर संस्थानचे चौथे राजे शिवाजी महाराज यांच्या मृत्युनंतर यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी दहा वर्षाच्या यशवंतरावांना दत्तक करुन घेतले त्यांचे शाहू असे नामकरण केले. अगदी लहान वयात यांच्यावरसंस्थानाची मोठी जबाबदारी आली. शाहू महाराजांनी धारवाड येथे शिक्षण घेतले, शाहू महाराज सतरा वर्षाचे आसतानाच बडोद्याच्या खानविलकर घराण्यातील बारा वर्षाच्या लक्ष्मीबाईशी त्यांचा विवाह झाला, यानंतर त्यांनी अठ्ठावीस वर्षे कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार पाहिला, शाहू महाराजांची ओळख कोल्हापूर संस्थानचे छत्रपती, राजर्षि शाहू महाराज, चौथे शाहू

आणि भारतीय समाजसुधारक या पध्दत्तीने प्रचलित होती, महात्मा ज्योतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विचारवंतांच्या विचारांना जोडणारा एका संस्थानचा राजा हे चित्र त्याकाळात अलैकिक होते.

फ्रेजर या इंग्रजी युरोपियन विद्वानाच्या मार्गदर्शनाखाली शाहू महाराजाच्या विचाराचा पिंड पोसला होता, यामुळे युरोपात रुजलेली वैज्ञानिक दृष्टी स्वाभाविकपणे त्यांच्या व्यक्तीमत्वात मिसळून गेली. या विषयी प्रा.कमलाकर दीक्षित म्हणतात, " शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दित केलेल्या कृती या वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आधारे केलेल्या होत्या. असा दुसरा संस्थानिक भारतात झाला नाही."राजकोट आणि धारवाड येथे महाराजांनी आठ वर्ष युपोपियन शिक्षकांच्या सहवासात राहून उच्च शिक्षण घेतले, चांगली बाजू म्हणजे युरोपियन लोकांमध्ये काही विपरीत असलेल्या संस्काराचा प्रभाव महाराजांवर पडला नाही. त्याचे कारण असे असावे, शाहू महाराजांच्या लहानपणीच आईचे निधन झाले, वडीलांनी दुसरा विवाह केला आणि त्यांनाजडलेली मद्यपानाची सवय या दोन्ही गोष्टी शाहू महाराजांना अप्रिय होत्या, त्यामुळे पाश्चात्यांच्या सहवासात राहूनहीत्यांच्या विचारावर अयोग्य संस्कारांचा परिणाम झाला नाही. वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तर चळवळ, महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ आणि आर्य समाज या सामाजिक चळवळीला विचाराचे पाठबळ दिले.१९२० साली कर्नाटकमध्ये ब्राह्मणेत्तर सामाजिक परिषद या विषयी मोलाचे विचार महाराजांनी मांडले, ब्राह्मणांनी धार्मिक ग्रंथात बनावटी कथा घालून हिंदूधर्माचे अध:पतन केले आहे. त्यामुळे हिंदू समाजाची मानसिक, शारीरिक आणि बौध्दिक अवनती झाली.१९१७ साली खामगाव येथे झालेल्या मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात शिक्षणासंबंधी शाहू महाराज विचार मांडताना म्हणतात, " शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढव्वये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे."मानतावादी विचारांनी भारावून गेलेला आधुनिक काळातील हा पहिलाच संस्थानिकअसावा असे वाटते.

**सुधारक - छत्रपती शाहू महाराज :**

सभोतालचा बहुजन समाज असाक्षरतेमुळे अज्ञानी राहिला आहे, त्याला शिक्षण देणे आद्यकर्तव्य आहे. म्हणून शिक्षणाचा प्रसार करण्यावर अधिक भर दिला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जो कोणी शिक्षणापासून दूर राहिल अशा पालकांना एक रुपया दंड केला, एवढेच नाही तर स्त्रीयांना शिक्षण मिळावे यासाठी सरकारी हुकुम काढला, या बरोबरच बहुसंख्य आसलेला अस्पृश्य समाज प्रचलित प्रवाहाच्या बाहेर राहून कधीही उन्नत होणार नाही म्हणून, सवर्णांची मूले व अस्पृश्यांची मूले एकाच वर्गात बसून शिक्षण घेतील असा आदेश काढला. एक हजार ते पाचशे लोकवस्तीच्या ठिकाणी शाळा सुरु केली. तसेच भरभक्कम पायावर उभी आसलेली जातीव्यवस्था मूळासकट उखडून टाकण्यासाठी आंतरजातीय विवाहाला कायदाचे संरक्षण दिले. त्याकाळात लहानपणीच मूलींची लग्ने होत असत, जर यावेळी एखाद्या मूलीच्या पतीचे अकाली निधन झाले तर तिला आयुष्यभरविधवेचे जीवन जगावे लागत होते, ही गोष्ट दु:ख- वेदना देणारी होती म्हणून,शाहू महाराजांनी विधवाझालेल्या मूलींच्या पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा १९१७साली आमलात आणला.आदिवासी भटक्या जाती-जमातीवर गुन्हेगारीचा सीक्का पूसुन काढण्याचे काम शाहू महाराजांनी केला. इंग्रजी राजवटीत 'सेटलमेंट'धोरणाच्या पार्श्वभूमीवर मानवतावादी दृष्टीने विचार करुन महाराजांनी या आदिवासी भटक्या समाजाला दिलासा दिला, त्यांना गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर लादलेल्या व्यवस्थेतून भटक्या-आदिवासी समाजाला मुक्त केले.फासेपारधी डोंबारी, रजपूत भामटा,अशा आदिवासी-भटक्या जमातीला जवळ केले. शेतकऱ्याच्या शेतीला पाणी आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी 'राधानगरी धरण ' बांधले. शेतकऱ्यांचा विकासाकरिता सहकाराची चळवळ उभी केली. याचा फायदा शेतकरी वर्गाला झाला.

अस्पृश्योध्दारासाठी शाहू महाराजांनी भरीव कार्य केले, कित्येक शतकापासून अस्पृश्य समाज ब्राह्मणांच्या वर्चस्वाखाली आपला स्वाभीमान गमावून बसला होता. परंतु महाराजांनी या अस्पृश्य समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने तो स्वाभीमान परत मिळवून दिला. सवर्ण लोक अस्पश्याच्या हातचे अन्न घेत नाहीत, त्यांना अपमानाची वागणूक देतात, शाहू महाराजांनी अस्पृश्य दलित समाजातीलगंगाराम कांबळे या दलिताला चहाचे दुकान काढून दिले आणि स्वत: दररोज त्यांच्या हातचा चहा घेऊ लागले, याचा परिणाम सवर्ण समाजातील लोकावर पडला. अशा पध्दतीने शाहू महाराजांनी फार मोठे समाजकार्य केले य.दि.फडके म्हणतात"शाहू महाराजासारखे अस्पृश्योध्दाराचे कार्य दुसऱ्या कोणी खऱ्यातळमळीने केले नाही." जातीव्यवस्थेत जातीमुळे काही जनांना एकादे तरी जगण्याचे साधन मिळाले, पण अशा काही जाती होत्या, त्यांना कसलेही जगण्याचे साधन मिळाले नाही, अशा समाजाने दोनवेळच्या पोटाची खळगी भरण्यासाठी एक तर भीक मागावी, नसेल तर चोऱ्यामाऱ्या करुन, दरोडे घालून जगावे, अशी विपरीत चाल रुढ झाली होती. एकदा चोरी करताना पकडून आणलेल्या चोरालाशाहू महाराजांनी शिक्षा न करता त्याच्याकडे तिजोरीच्या चाव्या दिल्या, असा किस्सा सांगितला जातो. या पध्दतीने जगणारा फार मोठा समाज पिचलेल्या, दबलेल्याअवस्थेत जगताना दिसत होता, असा उपरा समाज मूलभूत विकासापासून फार पाठीमागे राहिला, त्याला इतर समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी देशाच्या पातळीवर पहिल्यांदा आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शाहू महाराजांनी घेतला. मागासवर्गाला आरक्षण देणारा लोकनेता राजा म्हणून म्हणून महाराजांची सर्वत्र नोंद घेतली जाते. शाहू महाराजांनी केलेल्या समाजकार्याची दखल केवळ मराठी माणसानेच घ्यावी असे नाही, तर देशातल्या प्रत्येक समाज घटकाने शाहू महाराजांचे ऋण मानले पाहिजेत असे वाटते.

**निष्कर्ष –**

शाहू महाराजांना सुखसंमृध्दी मिळत होती. इतर राजाप्रमाणे त्यांनाही ऐशारामी जीवन जगता आले असते, परंतु शाहू महाराजांनी अशा क्षणभंगूर सुखाच्या पलीकडे पसरलेला अथांग जनसेवेचा सागर पाहिलाआणि त्यांचे अश्रू पुसण्याचे काम आजन्म करत राहिले म्हणूनच ते अजरामर झाले. शाहू महाराज हे एक थोर विचारवंत व सुधारक होते, आधुनिक काळातील समाजसेवक, राष्ट्रभक्त,समाजाप्रती आसलेली निष्ठा जपणारा,समाजाला मानव्याच्या दिशाने घेऊन जाणारा,लोककल्याणकारी संस्थानिक, वैज्ञानिक दृष्टीकोन ठेऊन भैतिक साधन-सामुग्रीची निर्मिती करणारा, अंधश्रध्द, गुलामगीरी, जुलुमशाही, अन्याय, अत्याचार याला कायदाच्या धाकाने संपविणारा, शेतकरी बांधवासाठी सहकाराची चळवळ नव्याने मांडणारा असामान्य व्यक्तिमत्वाचा, आगळावेगळा राजा म्हणून आजही चिकित्सक अभ्यासक शाहू महाराजांकडे पाहतात. यांच्या विषयीडॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात " शाहूराजे हे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ होते." आरक्षण देऊन पाठीमागे राहिलेला वर्गाला आपल्या बरोबरीने आणण्यासाठी धोरणांचा अवलंब करणारा संस्थानिक- छत्रपती शाहू महाराज महान राजा होऊन गेला.६ मे १९२२ रोजी अशा थोर विचारवंताचे, समाज सुधारकाचेमहानिर्वाण झाले.

**संदर्भ –** राजर्षि शाहू स्मारक ग्रंथ – संपादक डॉ.जयसिंगराव पवार

# स्त्री मुक्ती चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**प्रा. धर्मदास वि. घोडेस्वार**
सह. प्रा. समाजशास्त्र विभाग चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
dvg1202@rediffmail.com

**सारांश :—**

स्त्रिविषयक असलेला संकुचित दृष्टिकोन नाहीसा व्हावा, तिच्याविषयक असलेल्या भ्रामक समजुती दुर व्हाव्या, स्त्रिला स्वातंत्र्य मिळावे व पुरूषाप्रमाणेच तीला सुध्दा न्याय व हक्काची प्राप्ती व्हावी याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ स्त्रिविषयक उदारमतवादी विचारांची मांडणी करण्यावरच समाधान मानला नाही तर ते विचार वास्तवात येण्यासाठी चळवळही उभारली. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतीत अशा विविध पातळीवर दर्जाहीन जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करून त्यातून त्यांची सूटका करण्याकरिता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्षाची मशाल हाती घेतली. स्त्रियांवरील होणारा अन्वीत अत्याचार नाहीसा व्हावा, तिला तिच्या दास्यत्वातून सुटका मिळावी व एकूणच समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी तिच्या न्याय, हक्क व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा हिंदू कोड बिल प्रतिगाम्यांनच्या विरोधामूळे वास्तवात येऊ शकला नसला तरी पुढे जाऊन याच बिलाच्या आधारावर शासनाला स्त्री संबधात विविध कायद्याची तरतूद करणे भाग पाडले. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांना बहाल करण्यात आलेले विषेश अधिकार म्हणजेच स्त्रीयांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व एकूणच समाज परिवर्तनासाठी मोकळी करून देण्यात आलेली वाट व यशाचा मार्ग सुध्दा आहे.

**बिज शब्द :—** परीवर्तन, स्त्रिशिक्षण, उदारमतवाद, हिंदू कोडबिल, समानता, राज्यघटना, कायदे.

**प्रस्तावना :—**

हजारो वर्षापासून चालत आलेल्या समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा व परंपरांचे, भेदभावाचे, उच्च निचतेचे आणि एकूणच समाजिक विषमतेचे समुळ उच्चाटन करून स्त्रियांची स्त्री दास्यत्वातून मुक्तता करण्याकरीता व तीला पुरूषाबरोबर स्थान मिळवून देण्याकरीता ज्या महान थोर पुरूषांनी स्वतःचे आयुष्य खर्ची घातले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान शिर्षस्थानी येते. दलीत, शोषीत, वंचीत म्हणून केवळ शुद्रातिशूद्र यांच्या करीताच त्यांची लढाई नव्हती तर समाजाच्या प्रत्येक अवस्थेतील तीच्या न्याय, हक्कापासुन कोसो दुर ठेवण्यात आले होते अशा स्त्री जातीच्या मुक्तीसाठीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळ उभारली व त्या चळवळीचे यशस्वी नेतृत्वही केले. स्त्रीला सन्मानपुर्वक जीवन प्रदान करण्याच्या उद्देशाने त्यांनी जे कार्य केले व जातीयवादी, शोषणकारी भारतीय समाजाच्या विरोधात परीवर्तनाची क्रांतीज्योत लावली त्यामुळेच त्यांना सामाजिक क्रांतीचे युग पुरूष म्हणुन मानले जाते. हिंदू धर्मातील चार वर्णातील शेवटचा वर्ण म्हणून शुद्रांना मानुन त्यांची अत्यंत पराकोटीच्या हलाकीची अवस्था करण्यात आली होती. तशीच दयनीय स्थीती ही भारतीय समाजात स्त्रीयांच्याही वाटयाला आली होती. स्त्रीला गुलाम, दासी उपभोगाचे साधन म्हणून संबोधण्यात येत असे. सतीप्रथा, केशवपण, बालविवाहाची प्रथा अशा अघोरी प्रथाच्या नावाखाली स्त्रीचे जीवन नरकमय करण्यात आले होते. तीचे कार्यक्षेत्र संकुचीत म्हणण्यापेक्षा अगदी बंदीस्त करण्यात येऊन कोणत्याही निर्णयात स्वतःचे मतसुध्दा मांडण्याचा अधिकार तीला नव्हता. धर्माच्या नावावर तर तीला अनेक जाचक बंधनाला सामोरे जावे लागले. समाजविकासाच्या प्रत्येक टप्यात तीला तीच्या विविध अधिकरा पासुन वंचित ठेवण्यात आले होते. अशा पध्दतीने सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतीत अशा विविध पातळीवर दर्जाहीन जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करून त्यातून त्यांची सूटका करण्याकरिता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघर्षाची मशाल हाती घेतली.

वर्षानुवर्षे चालत आलेल्या स्त्री दास्यत्वाला ब्रिटीश राजवटीत काही प्रमाणात का असेना मात्र ख्रिश्चन मिशनरी, त्यांनी केलेले कायदे, शिक्षण प्रसार इ. मुळे खिडांर पडली. ब्रिटीशांची उदारमतवादी विचारसरणी, आधुनिक वैज्ञानीक दृष्टिकोन स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांची व मुल्यांची त्याद्वारे झालेली ओळख यामुळे भारतात नवविचाराचे वारे वाहु लागले. यातूनच स्त्री सुधारणेच्या कार्याला गती प्रदान झाली. असे असुनही या सुधारणेचे कार्यक्षेत्र मात्र हे विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादीत होते. या सुधारणा विशेषताः उच्च वा वरिष्ठ जातीतील स्त्रीयासाठीच होत्या. तरीही सुधारणांचा प्रभाव इतर वर्गातील स्त्रियांवर पडण्यास प्रारंभ झाला. स्त्रिविषयक असलेला संकुचित दृष्टिकोन नाहीसा व्हावा तिच्याविषयक असलेल्या भ्रामक समजुती दुर व्हाव्या. स्त्रिला स्वातंत्र्य मिळावे व पुरूषाप्रमाणेच तीला सुध्दा न्याय व हक्काची प्राप्ती व्हावी अशा जाणीवा वृध्दिगंत व्हायला लागल्या. या जाणीवा प्रगल्भ करण्यासाठी राजाराममोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर, स्वामी विवेकानंद, आगरकर, वि. रा. शिंदे, म. ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज अशा थोर महापुरूषांनी समाज सुधारणेचा विडा हाती घेतला. त्या सुधारणांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कृतीशील प्रयत्नातून गतीमानता प्रदान केली व कायद्याच्या पाटबळातुन स्त्री दास्यत्वास कारणीभूत असलेल्या अनिष्ट चालीरीती व परंपरांचा समुळ उच्चाटनास प्रांरभ झाला. भारतीय समाजरचनेच्या अत्यंत शेवटच्या टोकाला असलेल्या स्त्रिच्या वाटयाला कोणत्याही प्रकारचा कायदेशीर अधिकार नव्हता. अशातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात स्त्री — पुरूष समानतेवर आधारीत नव्या समाजाच्या उभारणीच्या दिशेने हिंद कोडबिलाच्या माध्यमातुन उचलेले पाऊल अत्यंत महत्त्वाचे होते. हिंदू कायद्याच्या संहिते संबधीचे हे विधेयक म्हणजे भारताच्या कायदेमंडळाच्या इतिहासातील समाज सुधारणा घडवुन आणण्याचा सर्वात मोठा प्रयत्न होता. या बिलाद्वारे स्त्रियांना मुख्यत्वे वारसा हक्क आणि घटस्फोटाचा अधिकार, पोटगी, विवाह, दत्तकविधान, पालकत्व इ. अधिकारांची प्राप्ती होणार होती. या अधिकारांची प्राप्ती म्हणजे स्त्रियांची जाचक बंधनातुन मुक्तता असा ठाम

विश्वास आंबेडकरांना होता. म्हणून बिल तयार करण्यासाठी त्यांना अथक परिश्रम घ्यावे लागले व याकरीता त्यांना ४ वर्ष, १ महिना व २६ दिवस ऐवढा कालावधी खर्ची घालावा लागला. स्वतःचे सारे पांडीत्य त्यांनी हिंदू कोड बिलासठी पणाला लावले.

स्त्री–पुरूष समानता प्रस्तापीत करण्यासाठी जुन्या कायद्याची संहिता अगोदर बदलायला पाहीजे व ती संहिता स्त्री केंद्री बनविली पाहीजे हा मुळ हेतू हिंदू कोड बिला मागे होता. त्यामुळे हिंदू कोड बिलाच्या संबधात आपली भूमिका स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''समाजातील वर्गावर्गातील असमानता, स्त्री–पुरूष असमानता तशीच अस्पर्शीत राहु देऊन आर्थिक समस्याशी निगडीत कायदे करणे वा संमत करणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे होय. म्हणजेच शेणाच्या ठीगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे होय.'' तत्कालीन कायदेमंत्री असलेले डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाला कायदेशीर चौकटीत बसविण्याचे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक, सचोटीने व काळजीपूर्वक केलेत. हिंदूचा कायदा हा सर्वांच्या हिताचा व्हावा म्हणून प्रत्येक कलम व त्यातील भागाची चिकीत्सा करून त्यांची पुन्हा तपासणी करून घेतली. अशा पध्दतीने स्त्रीच्या सन्मानासाठी व समान दर्जासाठी डॉ. आंबेडकरांनी आवश्यक असलेल्या मुद्यांचा समावेश करीत हिंदू कोड बिलाची पध्दतशीर पुर्नरबांधणी करून १२ ऑगस्ट १९४८ रोजी हिंदू कोड बिल सादर केले. हिंदू कोड बील सादर केल्यावर या बिलाच्या विरोधात समाजाच्या विविध स्तरातुन सकारात्मक व नकारात्मक प्रतिक्रीया उमटू लागल्या मात्र यात गंभीर बाब म्हणजे ज्यांच्यासाठी हे बिल तयार करण्यात आले होते. त्याच स्त्रिया विरोधात सक्रिय झाल्या. हया स्त्रिया हिंदू कोडबिलास साथ न देता विरोध करणाऱ्या गटाचीच अधिक पैरवी करून त्याचे समर्थन करण्यात धन्यता मानली. संसदेत निवडुन आलेल्या स्त्री प्रतिनिधीत्वांनी सुध्दा याविषयक कोणतीही भूमिका घेतली नाही. एकूणच स्त्रियांच्या सर्वस्वी हिताच्या बिलासाठी सुधारकांचा हेका मीरविणाऱ्या पुरूष मंडळीनी या बिलाचा प्रंचड विरोध केलाच मात्र स्त्रियांनीही या बिलाच्या समर्थनार्थ कोणतेही पाऊल उचलले नाहीत. या सर्वाची परिणीती म्हणजे शेवटी या बिलास केराची टोपली दाखविण्यात आली. या बिलाच्या मंजुरीसाठी झटणाऱ्या व अहोरात्र मेहनत घेणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करतांना उद्गारले' '' माझा स्वतःचा मुलगा वारला असता तर जेवढे दुःख नसते झाले त्यापेक्षा अधिक दुःख हिंदू कोड बिलाच्या शेवटाने झाले''.

हिंदू कोंड बिल भारतीय संसदेत पारीत होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले असते तर या कायद्याद्वारे भारतीय स्त्रीला न्याय, स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्वाची हमी प्राप्त होणार होती. स्त्रीयांचे अज्ञान, अवहेलना, जाचक प्रथा व परंपरेमुळे स्त्रीची होत असलेली अधोगती व यातून समाजाची होत चाललेची दूरावस्था या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातुन डॉ. आंबेडकराना दूर करावयाची होती. त्यावेळेला डॉ. आंबेडकराच्या हिंदू कोड बिलाला डावलण्यात जरी आले असले तरी पुढे याच बिलातील तरतूदींना राज्यघटनेतील दुरूस्ती पध्दतीद्वारे क्रमबध्द करने भाग पडले. म्हणजेच याच बिलातील तरतूदी टप्प्याटप्प्याने सरकारला पारीत कराव्या लागल्या व स्त्रियांना त्यांचे अधीकार बहाल करावे लागले. हिंदू स्त्रियांच्या कौटुंबिक जीवनातील दर्जा उंचावणारे हिंदू विवाह कायदा वारसा हक्क कायदा, अज्ञान व पालकत्वाचा कायदा, हिंदू दत्तक विधान व पोटगी कायदा इ. चा यात प्रामुख्याने समावेश आहे. हे सर्व कायदे मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलातीलच आहेत. समग्र स्त्री जीवनाचा विकास हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा व सामाजिक चळवळीचा मुख्य भाग होता. त्यांना उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्गातील स्त्री अशी विभागणी व त्यानुसार तिच्या कार्याचे विभाजन मान्य नव्हते. त्यामुळेच त्यांनी व्यक्त केलेला स्त्रीविषयक दृष्टिकोन व त्याचे विचार म्हणजे स्त्री विकासाचा दीपस्तंभ आहे. समाजातील सर्व वर्गातील स्त्री विकासाचे मार्गदर्शक तत्व आहे. भारतात बालविहिासारखी अघोरी प्रथा अस्तित्वात होती व त्यामुळे स्त्रियांचे क्षेत्र संकुचित राहिले व या कारणात्सव युरोपातील स्त्रियांप्रमाणे त्यांचा विकास होऊ शकला नाही. हा अत्यंत महत्त्वाचा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. जुलै १९४२ मध्ये नागपूर येथे दलित स्त्रियांची परिषद आयोजीत करण्यात आली असतांना या परिषदेत त्यांनी केलेले विधान हे स्त्री विकासाच्या अनूषगांने अत्यंत मार्मिक ठरते. त्यात ते म्हणतात की, ''स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झालेली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो,'' याच भाषनात त्यांनी लग्न झालेल्या मुलींना महत्त्वपूर्ण असा उपदेश करतात. या विषयक ते म्हणतात. लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीन म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करावे, मात्र गुलामासारखे वागविल्यास तीने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. स्त्री – पुरूष समानतेच्या व्यापक दृष्टिकोनातून आंबेडकरांनी बालविवाह आणि जाती अंतर्गत तसेच विजोड विवाहाविरूध्द आवाज उठविला. राष्ट्रीय एकात्मता आणि हिंदू समाजाचे संघटन समताधिष्टीत होण्यासाठीच त्यांनी मिश्र विवाहाचे जोरदार समर्थन केले. अशा विवाहाच्या माध्यमातून सामाजिक सबंधाचा व ऐक्याचा निकटचा व नाजूक धागा निर्माण होतो याची त्यांना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जाणीव होती. बालविवाह प्रथेचा व समाजात रूढ असलेल्या जाचक प्रथांचा खरपूस समाचार घेतानांच डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांना स्वाभीमानाने जगा हा संदेशच दिला नाही तर त्यासाठी त्यांचे प्रेरणा होऊन संधी उपलब्ध करून दिली. महाडच्या चवदार तळयाचे सत्याग्रहात त्यांनी ५० स्त्रीयांना सहभागी करून घेतले. चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या सबंधात घेतलेल्या सभेत स्त्रियांना संबोधतांना ते म्हणतात, '' झगमग दागीने घालण्यापेक्षा एखादा सोण्याचा दागीना घाला, स्वच्छता पाळा, घरात अमंगल घडु देऊ नका, दारूबाज पुरूषाला घरात घेऊ नका, मेलेल्या जनावरांचे मास खाऊ नका, स्वाभीमानाने जगा, स्त्री म्हणून तुमच्यात काहीही कमी नाही.'' सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने स्त्रियांनीही नेतृत्व करावे म्हणून चळवळीत प्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या स्त्रियांना त्यांनी विचार मंच मिळवून दिलीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अगदी लहान लहान गोष्टीतसुध्दा स्त्रियांच्या प्रगतीचा विचार करत असत. समाजाच्या प्रत्येक घटकातील स्त्रियांनी शिकावे, उच्च वर्णीय स्त्रियाप्रमाणे विचार करावा, वागावे व दिसावे या मताचा ते पुरस्कार करित. शिक्षणाची संधी सर्वानाच असावी या सर्वसमावेशक दृष्टिकोनातूनच ते स्त्री शिक्षणाचा आग्रह धरतात स्त्री शिक्षणामुळेच नव्या समाजाची निर्मिती होऊ शकेल यावर आंबेडकरांचा गाढा विश्वास होता. मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलीच्यांही शिक्षणासाठी धडपड केल्यास आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल असे ते म्हणतात. स्त्रियांना शिक्षण उपलब्ध करूण देणे म्हणजे एकप्रकारे त्यांचा सन्मान करण्यासारखे आहे. ते म्हणतात की, ''उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास माणुस हतबल होऊन तो अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जीवंतपनीच तो दुसऱ्याचा गुलाम होतो,'' त्यामुळेच त्यांनी गुलामीतून स्त्रिची मुक्तता करण्यासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता प्रतीपादन केली. स्त्रियांचे जीवन फक्त घरापुरतेच मर्यादीत नसावे, त्या व्यक्तीमत्व व कौटुंबिक व्यवस्थेला सुयोग्य संस्कार देऊन निट

वळण लावू शकतात. म्हणून स्त्रियांना शिक्षण द्यावयास हवे असे त्यांचे मत होते. मुलतः स्त्रियाविषयी त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी दिसतो. शिक्षणामुळे स्त्रियांचे बौध्दीक गुण विकसीत होतील त्याकरिता स्त्रियामध्ये शिक्षणाबाबत जागृती घडवावी असे ते आग्रहाने सांगतात. स्त्रियांनी वस्त्रे प्रावरणे व आभुषणे यापेक्षा शिक्षण व कलागुणांचा विकास करण्याकडे अधिक लक्ष द्यावे असे ते म्हणतात. भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे काम सुध्दा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केले. राज्यघटनेची एकूणच बांधणी ही स्वंतत्र्य, समता, बंधुता या मुलतत्वावर आधारीत आहे. भारतीय राज्यघटनेने कायद्यापुढे स्त्री आणि पूरूष या सर्वांना समान संधी दिलेली आहे. घटनेच्या १५.३ कलमात स्त्रिया व बालके यांच्याकरीता विशेष तरतूदी करण्यात आली आहे. या द्वारे स्त्रीयांना मिळालेल्या समान संधीमुळे व अर्थाजनामुळे स्वावलबंन येऊन स्त्रियांचे सक्षमिकरण घडुन येईल असे त्यांचे मत होते. घटनेच्या ३९ व ४२ व्या कलमान्वये स्त्रियांना मानसिक, आर्थिक शारिरिक विकासाची तरतूद करण्यात आली. कुटुंब नियेजनाच्या बाबतीत स्त्रियांचे आरोग्य व कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच संबधीत आहे असे त्याचे मत होते. भारतीय संविधानात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदी यातूनच डॉ. आंबेडकरांच्या स्त्रिविषयक उदारमतवादी व सुधारणावादी दृष्टीकोनाचा प्रत्यय येतो. महिलांना संघटना बनविण्याचा हक्क, नोकरीमध्ये पुरूषाप्रमाणे समान संधी, प्रसुतीकाळात स्त्रियांना औषधोपचार व विश्रांतीचा हक्क, नशा व दारूबंदी करण्याच्या मागणीचा स्त्रियांचा हक्क या व अशा इतर तरतूदीवरून समाज उभारणीत स्त्रियांची जोड व्हावी म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नाची साक्ष पटते.

**समारोप :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्तुत केलेल्या हिंदू कोड बिलास विरोधकांच्या कृतीमुळे आपयश आले असले तरी यानंतरच्या काळात विविध कायद्याच्याद्वारे त्यातील अनेक तरतूदी स्वीकारण्यात आल्या. आज सरकार स्त्रियांचा विकास व्हावा, त्यांना पुरूषांच्या बरोबरीने समान अधिकार प्राप्त व्हावे याकरीता वेगवेगळे कायदे अंमलात आणत आहे. महिलासाठी शिक्षण, नोकरी, राजकीय क्षेत्र याठीकाणी आरक्षण देण्यात आले आहे. विविध कायद्याद्वारे भारतीय स्त्रियांना सर्वच प्रकारची सुरक्षीतता प्रदान करण्यात आलेली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आज स्त्री सन्मानाने जगत असतांनाच गरूड भरारी घेत आहे. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेतसुध्दा स्त्रियांना सहभागी करून घेतले जात आहे. शिक्षण व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या पुढे जात आहेत. आज प्रत्येक स्त्री ही स्वतःच्या प्रगतीसाठी होणाऱ्या विकासातील बदलातील स्वतः तयार होत आहे व येणाऱ्या आवाहनांना तोंड देण्यासाठी मोठया धैर्याने प्रयत्नशील आहे. या सर्वात सविधानाने दिलेल्या समतेच्या हक्काचा सिंहाचा वाटा आहे. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या गुलामीचा अंत करण्यासाठी आवश्यक असे तत्वज्ञान आपल्या लिखानाद्वारे स्त्री चळवळीला दिले.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

1. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, २००२, लेखन आणि भाषणे, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
2. गायकवाड प्रदिप, डॉ. आंबेडकर बाबासाहेब, दलितांचे शिक्षण, संपादक, क्षितीज प्रकाशन, नागपुर.
3. प्रा. गायकवाड यादव, भारतरत्न, डॉ. आंबेडकर बाबासाहेब (जीवन आणि कार्य)
4. काणे प. सी. २००८, प्रमुख भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारक, पिंपळापुरे ॲण्ड पब्लीशर्स, नागपुर.
5. भारतीय राजकीय विचारवंत, डॉ. पी. डी. देवरे, २००९, प्रशांत प्रकाशन –प्रधान ग. प्र., 'डॉ. आंबेडकर त्यांच्याच शब्दात' सुगावा प्रकाशन, पुणे.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# राजर्षी शाहू महाराजांचे सर्वसमावेशक विकास विषयक विचार

**प्रा. यादव जे. बी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज

यक्तींनी समाज बनतो व घडतो; पण प्रत्येक व्यक्ती समाज घडवीत नसते. समाजाची जडणघडण व विकास करणारी व्यक्ती लाखात, करोडोत एखादीच निर्माण होत असते. अशी समाज घडविणारी, समाजात रचनात्मक कामे करणारी व समाजाच्या प्रवाहास वळण देवूण त्याच्या जिवनात प्रकाश आणणारी व्यक्तीच अजरामर होत असते. ती अजरामर होते कारण प्रत्येक पिढीवर तिच्या कार्याचा प्रभाव पडलेला असतो. अशा व्यक्तीच्या कार्याचा वसा आपण घेवून तो पुढच्या पिढीला दिला पाहिजे. छत्रपती शाहू महाराज अशा समाजाची जडणघडण करणाऱ्या आणि त्यांच्या निधनानंतरही पुढच्या पिढयांवर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तीपैकी एक होते. शाहू महाराजांमुळे करवीर राज्याची कष्टप्रद व अंधकारमय वाटचाल संपुष्टात येवून नव्या पुरोगामी युगाचा प्रारंभ झाला तर; महाराष्ट्राला समाजपरिवर्तन व अर्थक्रांती करण्याची ताकद असणारा एक थोर समाजक्रांतीकारक व अर्थतज्ञ राजा लाभला. त्यामुळेच अखंड महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाला प्रारंभ झाला.

**अभ्यास विषयाची निवड :**

राजर्षी शाहू महाराजांनी सन १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थानाचा कारभार पाहिलात्र त्यांनी या कालखंडात आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता शेती, उद्योगधंदे, सहकार जलव्यवस्थापन, बाजारपेठ, दुष्काळ निवारण इत्यादी बाबत राबविलेली आर्थिक धोरणे ही सर्वसमावेशक विकासाची नांदी ठरली. त्यांनी आर्थिक विकास धोरणे राबविताना त्या धोरणांचा सर्वसामान्य माणसाला कसा लाभ देता येईल या बाबींचा विचार केलेला आहे. आर्थिक विकासाचा लाभ हा सर्वसमावेशक असावा याचा विचार व प्रत्यक्ष अंमलबजावणी शाहू महाराजांनी केलेली आहे. या संबंधी त्यांच्या कार्याचे व धोरणाचे महत्व स्पष्ट करण्यासाठी या अभ्यास विषयाची निवड केलेली आहे.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

1. शाहू महाराजांनी स्त्री सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
2. शाहू महाराजांनी मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
3. महाराजांनी संस्थानाच्या सर्वांगिण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**अभ्यास विषयासाठी निवडलेली गृहीतके:**

1. सर्व समावेशक विकास म्हणजे सर्व वर्गाचा व सर्व क्षेत्राचा समन्यायी विकास.
2. महाराजांनी स्त्री सक्षमीकरणासाठी स्त्री शिक्षणावर जास्त भर दिलेला आहे.
3. शाहू महाराजांनी मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी धार्मिक बाबीवरील खर्च कमी करुन तो शिक्षणाकडे वळविला.
4. म्हाराजांनी संस्थानाच्या विकासासाठी आधुनिकतेची कास धरली.

**संशोधन पध्दती :**

या अभ्यास विषयाच्या संदर्भातील माहिती संकलन करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, गौरव ग्रंथ, पुस्तके, मासिके व इंटरनेट या द्वितीयक साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**महिला सक्षमीकरण :**

राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन कार्याचे वर्णन करावयाचे म्हटले तर ते एक मानव मुक्तीचे कार्य होते असे म्हणता येईल. ही मुक्ती जशी वर्ण वर्चस्वाची होती तशी ती अज्ञान, अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी व परंपरा आणि धर्मशास्त्राचे अन्यायी दंडक या विचारसरणीपासून होती. याच बहुजन समाजातील स्त्री वर्ग पुरुषी वर्चस्वाच्या गुलामगिरीत होता. या स्त्रियांनाही आपण पुरुषी वर्गवर्चस्वापासून मुक्त ठेवले पाहिजे अशा प्रकारची व्यापक सामाजिक दृष्टी महाराजास होती. या विचारसरणीतून महाराजांनी सर्वसमावेशक विकासासाठी स्त्रीमुक्तीचे अनेक निर्णय व कायदे केले.

**स्त्री शिक्षणास प्रोत्साहन :** महाराजांनी स्त्री शिक्षणास प्रोत्साहन व प्रसार करण्यासाठी २१ सप्टेंबर १९१७ रोजी कायदयान्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. तसेच ११ ऑक्टोबर १९१९ रोजी जाहीरनामा काढून स्त्रीशिक्षण, राहणे व जेवण मोफत केले. राजाराम महाविद्यालयातील मुलींना उच्च शिक्षण मोफत करण्यात आले. रखमाबाई केळवकर यांना स्त्री शिक्षण अधिकाऱ्याचे पद दिले. महाराजांनी राज परिवाराचा विरोध झुगारुन त्यांनी त्यांची विधवा सुन इंदूमती देवीला शिक्षण दिले.

कोल्हापुरात फिमेल ट्रेनिंग स्कूलची स्थापना केली. मुलीना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व प्रोत्साहन देण्यासाठी अनेक बक्षिसे व शिष्यवृत्ती सुरु केली. तसेच अनेक शाळा व संस्थाची स्थापना केली.

**स्त्री अत्याचार प्रतिबंध कायदा :** शाहू महाराजांनी स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे करुन आपल्या पुरोगामी व सर्वसमावेशक कल्याणकारी राज्यकारभाराची सुरुवात केली होती. महाराजांनी स्त्री अत्याचार कमी करण्यासाठी १९१९ मध्ये नियमश कायदा मंजूर केला. एकूण ११ कलमाच्या या कायदयान्वये स्त्रीला क्रुरपणे वागणूक देणाऱ्याला ६ महिन्याचा कारावास व २००रु दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली होती.

**स्त्री पुरुष समानता :** शाहू महाराज विषमतेचे विरोधक व समतेचे पुरस्कर्ते होते. महाराजांनी स्त्री पुरुष असा भेदाभेद केला नाही. जानेवारी १९२० च्या वारसा हक्काच्या कायदयात महत्वाच्या दुरुस्त्या करुण केवळ स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला नाहीतर त्यांनी स्त्रियांना पुरुषांपेक्षा उच्च प्रकारचा दर्जा मिळवून देवून स्त्री सक्षमीकरणाचा स्विकार केलेला आपणास दिसून येतो.

**बालविवाहास विरोध :** महाराजांनी १२ जुलै १९२९ रोजी बालविवाह प्रतिबंध कायदा करुन यानुसार वधूचे विवाह वय १४ वर्ष व वराचे विवाहाचे वय १८ वर्ष असणे बंधनकारक केले. या कायदयान्वये मुलीला स्वत:च्या मतानुसार जोडीदार निवडीची तरतूद होती. विवाहाच्या बाबातीत एक अर्थाने स्त्रीयांना पूर्ण स्वातंत्र्य देणारा हा कायदा होता.

**आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह कायदा :** महाराजांनी सर्व समावेशक विकासासाठी १२ जुलै १९१९ रोजी आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह व नोंदणी पध्दतीस मान्यता देणारा कायदा लागू केला. या कादयाचा एक महत्वपूर्ण पैलू म्हणजे या कयदयातील कलम तीन नुसार ज्या मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाले आहे तिला तिच्या आवडीनुसार कोणत्याही जातीच्या व धर्माच्या मुलांशी कायदेशीर व कोणत्याही पध्दतीने विवाह करता येईल. व विवाहाचे नोंदणीकरण सक्षम आधिकाऱ्यासमोर झाले पाहिजे विवाह नोंदणी सक्तीचे केल्याने त्या स्त्रीला पुढील वैवाहीक वाटचालीत तिच्या विवाहबंधनास कायदेशीर हक्काचे संरक्षण दिले गेले होते.

**मुस्लीम समाजात शिक्षणा विषयी जागृती :** तत्कालीन समाजात ब्राम्हणाशिवाय इतर सर्वच जाती व धर्म शैक्षणिकदृष्टया मागासलेला होता. आणि म्हणूनच या विविध जाती धर्मांत शिक्षणा विषयी जागृती व्हावी हा वर्ग संपन्न व्हावा अशी महाराजांची धारणा होती. एकूण लोकसंख्येत मोठया प्रमाणात आसणारा मुस्लीम समाजही शिकून उन्नत व्हावा व त्यातून मुस्लीम महिलांचे सक्षमीकरण व्हावे असे त्यांना वाटत होते. सन १९०२ साली महाराज इंग्लंडच्या दौऱ्याहून परतल्यावर कोल्हापुरातील मुस्लीमांनी एक समारंभ आयोजीत केला होता. त्या समारंभात महारांजानी मुस्लीम पुढाऱ्यांना समाजाच्या शिक्षणासाठी शैक्षणीक संस्था उभ्या करण्यात व त्यासाठी दरबाराकडून पूर्ण अर्थसहायय मिळेल, असे आश्वासन दिले होतो. परंतू यास मुस्लीम समाजाकडून काहीही प्रतिसाद मिळाला नाही परंतु महाराजांनी मुस्लीम समाजातील दहा विदयार्थ्यांना व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगमध्ये प्रवेश देवून संस्थानातील मुस्लीम शिक्षणास सुरुवात केली. उपरोक्त दहा विदयार्थ्यांना कर्नाटकातील अथणी गावच्या शेख महंमद युनूस अब्दुल्ला या विद्यार्थ्याला ग्रॅज्युएट झाल्यावर त्यास महाराजांनी आपल्या संस्थानात मामलेदार म्हणून नियुक्त केले.

सन १९०६ साली महाराजांनी मोहमेडन एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली. महाराज स्वत: अध्यक्ष व मोहमंद अब्दुला कार्यावाह बनले. महाराजांनी अनेक वस्तीगृहे व मुस्लीम बोर्डिंग सुरु केले. संस्थानातील मुस्लीम देवस्थानांची उत्पन्ने या बोर्डिंगच्या संस्थेला जोडण्यात आली. देवस्थानचे उत्पन्न संस्थेला देणारा महाराजांचा एक वटहुकुम उपलब्ध आहे. त्यात ते म्हणतात की, कोल्हापुरात मागासलेल्या लोकांची बोर्डिंग स्थापन झाली आहेत. मुसलमानांच्या बोर्डिंगशिवाय इतर जातीची बोर्डिंग चांगल्या प्रकारे चालतात. मुस्लीम बोर्डिंगची सांपत्तीक स्थिती चांगली नाही. इतरांप्रमाणे मुसलमान लोक सुशिक्षित होणे इष्ट आहे. त्यांचे संस्थेस पैशाची सोय झाल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारेल असे वाटत नाही. सबव कसबा रुकडी, पेटा हातकणंगले येथे श्री हजरत पिराचे प्रस्थानाकरिता दर्ग्याचे दुरुस्ती करिता वै. ५००रु ठेवून बाकीची सर्व रक्कम सेक्रेटरी टू दि किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर याजकडे दरसाल पाठविणे मंजूर केले आहे. सदरची रक्कम सोसायटी नियमाप्रमाणे खर्च होण्याची आहे. २८ जुन १९१९ अशाच प्रकारे कोल्हापूर शहरातील निहाल मसिद, घोडापिर, बाबुजमाल व बराईमाम या देवस्थानची उत्पन्नही मुस्लीम बोर्डिंगला देण्यात आली.

महाराजांनी चौफळयाच्या माळावर मराठा बोर्डिंग जवळच २५ हजार चौरस फुटाची मोकळी जागा साडेपाच हजार रुपये देणगी व संस्थानातल्या जंगलातून मोफत सागवान देण्यात आले. महाराजांनी या संस्थेस दरबाराकडून २५०रु वार्षिक अनुदान व सहा सात हजार रुपये उत्पन्न येईल ऐवढया जमीनी बहाल केल्या. महाराजांनी मराठा बोर्डिंग पेक्षा जास्त दान मुस्लीम बोर्डिंगला केले होते. महाराजांनी हिंदू–मुस्लीम ऐक्यावर भर दिला सर्वसामान्य मुस्लीमांना कुराणातील धर्मतत्वांचा अर्थबोध झाला पाहिजे यासाठी त्यांनी २५०००रुपये खर्च करुन कुराणाचे मराठीत भाषांतर करण्याचे कामही सुरु केले. परंतु दुर्दैवाने महाराजांच्या अकाली निधनाने हे काम पूर्ण झाले नाही. महाराजांनी मुस्लीम मशिदीसाठी अर्थसहाय्य, जागा व देणग्या दिल्याचे अनेक दाखले आढळतात.

**अस्पृश्यता निर्मुलन :** सर्वसमावेशक विकसासाठी महाराजांनी जातीभेदाबरोबर अस्पृष्यता नष्ट झाली पाहिजे यासाठी निरनिराळया सभा व संमेलनात आपली मते व विचार मांडले या संबंधी ठरावा बरोबरच ते कृती करत होते. शुद्रती शुद्र व अस्पृष्यांना शिक्षण दयावे व आपला दर्जा वाढवावा यासाठी त्यांनी त्यांना सोयी सवलती दिल्या. स्पृश्यांच्या व अस्पृष्यांच्या शाळा वेगवेगळया यास त्यांचा विरोध होता. समतेच्या तत्वावर सर्वांना एकत्र शिक्षण दयावे यासाठी त्यांनी हुकुम काढले. सन १९०७ साली मिस क्लार्क हॉस्टेल हे अस्पृष्यांसाठी वस्तीगृह स्थापन केले.

**कृषी उ़द्योग व सहकार :** आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे, सेवा व सहकार या क्षेत्रात अग्रेसर आहे. तसेच हा जिल्हा आर्थिकदृष्टया संपन्न आहे कारण स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजांच्या कारकिर्दीत या प्रगतीची पायाभरणी झाली होती. शेतकरी व कष्टकऱ्यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी महाराजांनी सन १९०२ साली सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक करण्यात आली. या खात्यामार्फत प्रत्येक गावातील जलसाठयात वाढ करण्यात आली. कोल्हापूरच्या पश्चिमेस सहयाद्रीच्या घाटात भोगावती नदीवर राधानगरी धरणाची निर्मिती केली. सन १९०९ ते सन १९१८ या कालखंडात चौदा लाख रुपये खर्च करुन धरणाचे ४० फुटापर्यंतचे काम पूर्ण झाले. व त्यातुन ६०० दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध झाले. धरणाचे उर्वरित काम सन १९५७ साली पूर्णत्वास गेले. संस्थानात सुधारीत शेतीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात किंग एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टिटयूट ही संस्था स्थापन केली. तसेच आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियम सुरु करण्यात आले. सन १९०६ साली दि शाहू छत्रपती स्पिनींग ॲड विव्हींग मिल्स या गिरणीची स्थापना केली. या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, शेजारचे पाण्याचे तळे आणि ५०००० रुपयाचे भांडवल उपलब्ध करुण दिले. शेतकऱ्यांच्या उन्नती व रोजगार निर्मितीसाठी कापड गिरणीची स्थापना करणयात आली. उभारलेले उद्योग भांडवलदाराच्या हातात जावू नयेत यासाठी महाराजांनाी सहकार तत्वाचा पुरस्कार केला. त्यासंबंधी महाराज म्हणतात, समाजात शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग सुरु करण्याऐवजी लोकांनी सहकारी तत्वार उद्योग तत्वावर उद्योग सुरु करावेत आज सहकारी तत्वावर चालणाऱ्या विविध उद्योग व्यवसायामुळे कोल्हापूर जिल्हा हा हरितक्रांती व धवलक्रांतीत अग्रेसर आहे.

राजर्षी शाहू महाराज हे दुरदृष्टीने समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या संस्थानात स्त्रीया, शेती, उद्योग, सेवा, सहकार, व वंचित घटकाच्या विकासावर भर देवून सर्वसमावेशक व सर्वांगिण विकासाची मुहर्तमेढ रोवली. केवळ मुठभर लोकांचा विकास हा विकास नसून राज्यातील सर्व वंचित, अस्पृष्य, मुस्लीम, धनगर, डोंबारी, भटके विमुक्त, ओबीसी, आदिवासी व सर्वसामान्य माणसाला केंद्र बिंदू मानुन आपल्या संस्थानाचा विकास केलेला आढळून येतो. सर्वसामान्य समाजाला अंधाराकडून प्रकाशाकडे घेवून जाणारे शाहू महाराजांचे धोरण होते. महाराजांनी मानवाच्या सर्वांगिण व सर्वसमावेशक विकासावर भर दिला होता. महाराजांनी पारंपारिक बाबींबरोबर आधुनिकतेचा स्विकार केलेला आढळून येतो. महाराजांच्या विचारात व कृतीत मानवतावादी, समतावादी, व लोकशाही तत्वे दिसून येतात. छत्रपती शाहू महाराज हिंदू राजे असले तरी त्यांनी इतर सर्वधर्माचा आदर व त्यांच्या विकासावर भर दिला होता. महाराजांनी आपल्या संस्थानाबाहेरच्या लोकांनाही नोकऱ्या दिल्या होत्या. महाराज कला व गुणवान माणसांचा आदर करुन त्यांच्या कला व गुणांना वाव देत असत. महाराजांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार अतिशय प्रभावशाली व परिणामकारक स्वरुपाचे होते. महाराजांनी आपल्या संस्थानात मानवी मुल्य रुजविले महाराजांनी आपल्या विचारांतून व कृतीतून सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी मोलाचे कार्य केले आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1. जयसिंगराव पवार, संपा राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर (२००७).
2. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
3. नारायण भोसले, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणांचे सत्ताकारण, द ताईची प्रकाशन पूणे, २००८
4. पानसरे गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, तृतीय आवृत्ती २००६.
5. गणपतराव सुर्यवंशी, राजर्षी शाहू महाराज आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा फुले यांच्या कृषी विषयक विचारांचे विश्लेषण

**प्रा. डॉ. डी. डी. भोसले**
अर्थशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड

आजच्या काळत भारतामध्ये घडून आलेल्या सामाजिक क्रांतीचे जनक केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील जेष्ठ समाज सुधारक समाज प्रबोधक म्हणून महात्मा फुले सर्वांच्या परिचयाचे आहेत ते जरी अर्थशास्त्रज्ञ नसले तरी त्यांनी 1883 सली लिहिलेला शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ याचबरोबर गुलामगिरी हा ग्रंथ शेती व शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आणि ही दयनीय अवस्था निर्माण होण्यासाठी जबाबदार असलेली कारणे याच बरोबर शेतकऱ्यांच्या अवस्थेमध्ये कशी सुधारणा करता येईल याविषयीचे एक मार्गदर्शक दीपस्तंभच आहेत म्हणून महात्मा फुले यांचे कृषी विषयक विचार अभ्यासणे अगत्याचे वाटते महात्मा फुले यांच्या मते कोणत्याही देशाचा विकास शेतकरी सैनिक आणि प्रशासकीय वर्ग या तीन आधार स्तंभावर अवलंबून असतो तत्कालीन कालखंडातील सैनिकांना नियमित पगार मिळत असे सरकारी अधिकाऱ्यांना पगार बरोबरच अनेक सवलती मिळत असत म्हणून या दोन्ही घटकांची स्थिती चांगली होती पण भारत हा कृषिप्रधान देश असून देखील शेती व शेतकऱ्यांच्या अवस्था फारच दयनीय होती , मोठ्या प्रमाणात दारिद्र्य होते ही सर्व स्थिती दूर व्हावी म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहून त्यामध्ये आपला कृषी विषयक दृष्टिकोन मांडला आहे या दृष्टिकोनात त्यांनी भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या समस्या यांचा सविस्तर आढावा मांडून या समस्या दूर करण्यासाठी उपाय सुचविले आहेत यांच्या कृषी विषयक दृष्टीकोनाचा,विचारांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल

**संशोधनाची उद्दिष्टे**

i) महात्मा फुले यांचे कृषी विषयक दृष्टिकोन अभ्यासणे.
ii) महात्मा फुले यांनी अधोरेखित केलेल्या शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेणे.
iii)महात्मा फुले यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या वर सांगितलेल्या उपाययोजनाचे विश्लेषण करणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन समस्येचे विश्लेषण करण्यासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे संशोधन विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेले ग्रंथ , महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांचा ‘आसूड’ आणि ‘गुलामगिरी’ हा ग्रंथ, विभिन्न नियतकालिकांमध्ये प्रकाशित करण्यात आलेले लेख याचबरोबर विभिन्न संकेतस्थळांचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन समस्येचे विश्लेषण -** प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महात्मा फुले यांचे कृषी विषयक दृष्टिकोन पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची करणे**

**संस्थानिकांचा अस्त होणे :** महात्मा फुले यांच्या मते ब्रिटिशांच्या भारतात आगमनापूर्वी भारतातील राज्य आणि संस्थानिक यांच्या सैन्यामध्ये शेतकरी नोकरीला जात होते याच बरोबर प्रशासकीय खर्च स्वतः संस्थानिक करत असत परंतु त्यांचं राज्य लयाला गेल्यामुळे ब्रिटिशांनी हा सर्व खर्च शेतकऱ्यांकडून कराच्या रूपात वसूल केल्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली.

**जमिनीचे विभाजन आणि तुकडीकरण :** वारसा हक्काने मिळणारी संपत्ती याचबरोबर कुटुंबाच्या विभाजनामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात विभाजन आणि तुकडीकरण होत आहे परिणामी शेतीचा पोत आणि उत्पादकता कमी होत आहे.

**शेतकऱ्यांचे विविध मार्गांनी होणारे शोषण:** महात्मा फुले यांच्या मते ब्रिटिश शासन ,संस्थानिक ,मध्यस्थ , सावकार आणि धार्मिक कर्मकांड याचबरोबर चुकीच्या कुप्रथा यामुळे भारतीय शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत आहे म्हणूनच त्यांची अवस्था दयनीय झाली आहे.

**ब्रिटन मधून वस्तूंची केली जाणारी आयात:** ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूं यंत्रावर तयार होऊन येत असत म्हणून त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात भारतात होत असे परिणामी भारतीय मालाची मागणी कमी झाली यामुळे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे.

**दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्ती:** भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळाच्या वेळेस भारतीय शेतीची अवस्था अत्यंत दयनीय होते 1977- 78 मधील दुष्काळामुळे खऱ्या अर्थाने भारतीय शेतकरी गरीब झाले.

**धार्मिक विधी व कर्मकांड:** भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची असताना देखील धार्मिक विधी आणि कर्मकांडं यासारख्या बाबीवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असे यामुळे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली.

**सावकारांची कूटनीती:** शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व ,निसर्गाचा लहरीपणा ,वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांना आपला उदरनिर्वाह पार पडण्यासाठी सावकारी कर्ज घ्यावे लागत असे सावकार यांच्या कूटनीती मुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेत जमिनी गहाण झाल्या तर अनेकांच्या विक्री निघाल्या परिणामी शेतकरी दारिद्र्यात गेले.

**जागतिक महामंदी:** इ.स.वी.सन 1890 मध्ये जागतिक महामंदी आली होती परिणामी ब्रिटिशांनी कृषिमालाच्या भावामध्ये मोठ्या प्रमाणात कपात केली परंतु करांच्या दरांमध्ये कपात केली नाही म्हणून भारतीय शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला.

**शेतकऱ्यांचे अज्ञान:** भारतीय शेतकरी निरक्षर असल्यामुळे त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन धार्मिक कर्मकांड आणि कुप्रथा आणि परंपरा मध्ये त्यांना अडकून ठेवण्यात येते परिणामी भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात वाढ झाली.

**जुलमी कर प्रणाली:** राजेशाही याचबरोबर ब्रिटिश शासन प्रणाली अंतर्गत शेतीवरील कर प्रणाली अत्यंत जाचक स्वरूपाची होती शेतकऱ्यांना त्यांच्या एकूण उत्पन्नापैकी 76 टक्के कर अर्थात शेतसारा शस्ती भरावी लागत असे ही भरण्यासाठी अनेक वेळा शेतकर्यांना सावकारांकडून कर्ज घ्यावे लागत असे परिणामी त्यांच्या जमिनी सावकारांच्या कडून गहाणखत करून बळकावल्या जात असत.

**शेती आणि शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी उपाय-योजना -** महात्मा फुले यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी पुढील उपाय-योजना सुचविल्या आहेत

**शेतीसाठी सिंचनाची सुविधा:** महात्मा फुले यांच्या मते बागायती शेती करण्यासाठी बारमाही सिंचनाची आवश्यकता असते म्हणून नदी वर छोटे बंधारे बांधण्यात यावेत त्याचबरोबर तलावांची रचना करण्यात यावी व सिंचन सुविधा वाढ करावी.

**खाते गाळ गळ मोफत देण्यात यावा:** शेतीची सुपीकता शेतीमध्ये उपलब्ध असलेल्या खनिजद्रव्ये,जीवनसत्त्वंवर आधारित असते शेती हजार वर्षापासून कसल्या जात असल्यामुळे तिच्यामधील सुपीकता दिवसेंदिवस कमी होत आहे शेतीची सुपीकता पुन्हा प्राप्त करण्यासाठी शेतकऱ्यांना खते गाळा मोफत देण्यात यावा.

**शेती पूरक व्यवसाययांना चालना देण्यात यावी:** शेतकऱ्यांच्या उत्पादनात ,उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यात यावी शेतीवर आधारित असलेले दुग्ध व्यवसाय ,कुक्कुटपालन, वराह पालन यासारखे व्यवसाय त्याचबरोबर तेल घाना , गुळ उत्पादन, फुल शेती यांना प्राधान्य देण्यात यावे.

**उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा:-** भारतीय शेती परंपरागत तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे मागासलेली आहे म्हणून महात्मा फुले यांच्या मते भारतीयांनी विलायती प्रमाणे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून शेती करावी.

**शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण द्यावे: -** शेतकऱ्यांचे पुढची पिढी म्हणजे त्यांची मुले आहेत या मुलांना शेतीविषयक कामाचे प्रशिक्षण व शिक्षण देण्यात यावे याच बरोबर शेती व्यवसायाचे ज्ञान देणाऱ्या पुस्तकांचे वाटप करण्यात यावे यामुळे निश्चीता भारतीय शेतीमध्ये आधुनिक दृष्टिकोन निर्माण होईल.

**कृषी रक्षक योजना राबविण्यात यावी: -** वन्य प्राणी आणि पाळीव प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रत्येक गावांमध्ये कृषी रक्षक योजना राबविण्यात यावी .

**इतर उपाय योजना** - शेती शिक्षण आणि प्रशिक्षण वर्ग राबविण्यात यावेत,खरेदी-विक्री व्यवहार यावर सरकारचे नियंत्रण असावे,शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करणारी यंत्रणा असावी,शेतकऱ्यांचे अज्ञान व अंधश्रद्धा दूर करण्यात याव्यात, वृक्षतोडी विरोधात कायदा करण्यात यावा, पीक रक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदुकीचे परवाने देण्यात यावे, शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे.

**निष्कर्ष :** उपरोक्त विवेचनावरून असा निष्कर्ष किंवा सारांश निघतो की महात्मा फुले यांनी भारतीय शेती आणि शेतकऱ्यांची दयनीय अवस्था याविषयीचे सविस्तर विवेचन केले आहे त्यांच्या मतानुसार शेतकरी हा समाजातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे त्याच्या सुस्थितीवर आणि प्रगतीवर समाजाची व देशाची स्थिती अवलंबून आहे म्हणून शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून सर्व नियोजन झाले पाहिजे असे झाले नाही तर शेतकऱ्यांच्या विकास व भारतासारख्या कृषिप्रधान देशाचा सर्वांगीण विकास साध्य होणार नाही. थोडक्यात त्यांनी सुचवलेल्या उपाययोजना आजदेखील कृषी क्षेत्राला लागू पडतात

**संदर्भ ग्रंथ;**

1) डॉ. विजय कविमंडन ;आर्थिक विचारांचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन. नागपूर

2) डॉ. सदानंद मोरे; समाजसुधारक, सकाळ प्रकाशन.

3) डॉ. सदानंद मोरे; महात्मा फुले यांचे वैचारिक चरित्र ,सकाळ प्रकाशन.

4) प्रा. रायखेलकर ए.आर.,डॉ.दामजी बी.एन.;आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स,औरंगाबाद.

5) महात्मा फुले; शेतकऱ्याचा असूड ,चक्रधर प्रिंटिंग प्रेस, नागपुर

6)संकेतस्थळ: https://www.dnyansagar.in/2020/12/krushi-sahitya.html

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे धोरणात्मक आर्थिक विचार

**प्रा.डॉ.सुरेश चंद्रकांत मेहेत्रे**
सहयोगी अधिव्याख्याता व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बी.रघुनाथ महाविद्यालय, परभणी. ( महाराष्ट्र )

**गोषवारा : (Abstract)**

महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे विचार आधुनिक महाराष्ट्राच्या बदलास कारणीभूत ठरतात. असे म्हटले जाते की, महात्मा ज्योतिबा फुले यांचे अपूर्ण राहिलेले कार्य तितक्याच समर्थपणे चालवण्याचा मान छत्रपती राजर्षी शाहू महाराजांकडे जातो. म्हणूनच शाहू महाराजांना महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा वारसदार म्हणून समजले जाते. केवळ सामाजिक सुधारणाच नाही तर मानवी जीवनाच्या कृषी, उद्योग, व्यापार, नाट्य, साहित्य, धर्म अशा अनेक क्षेत्रांमध्ये शाहूंनी महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. भारतातील बहुजन वर्गातील समाजाचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास घडवून आणण्याचे काम शाहूंनी केलेले आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सर्व समाजाचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न सोडवण्यासाठी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. यामागे अंधश्रद्धा, विषमता, अस्पृश्यता कमी करण्याचा उद्देश होता. ब्राह्मणेत्तर चळवळ, वेदोक्त प्रकरण, कामगार सुधारणा, स्त्री-विषयक सुधारणा, वसतीगृह चळवळ, आरक्षण, माणगाव परिषद अशा विविध क्षेत्रातील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. म्हणून बहुजन हिताय बहुजन सुखाय राज्याची निर्मिती आणि राजसत्तेचा उपयोग आपल्या रयतेच्या उद्धारासाठी करणारा राजा म्हणून छत्रपती राजर्षी महाराजांना ओळखले जाते.

**सूचनक शब्द : (Keywords)**कल्याण (Welfare) , आर्थिक कल्याण (Economic Welfare), सक्षमीकरण Empowerment

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या काळात त्यावेळच्या भारतातील आर्थिक विचारांच्या प्रवाहाची सूत्रे गुजरात, बंगाल आणि महाराष्ट्रातून हलवली जात असत. महाराष्ट्रात घडून येणाऱ्या आर्थिक क्रियांचे पडसाद संपूर्ण भारताच्या अर्थकारणावर पडत असत. रमेशचंद्र दत्त, दादाभाई नवरोजी, सुब्रम्हण्यम अय्यर, व्यंकटेश जोशी अशा नामवंत आर्थिक विचारवंतांच्या संपर्कात शाहू महाराज राहात असत. ज्या परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली त्यावेळी महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थिती बिकट होती. राज्यकारभार करत असताना त्यांनी जो जाहीरनामा प्रसिध्द केला त्यात त्यांनी सर्व जनतेला आर्थिक विकासासाठी सहाय्य करावे असे आवाहन केले होते. दारिद्र्य, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचे समाजातून समूळ उच्चाटन होत नाही तोपर्यंत आर्थिक विकासाचे उद्दिष्ट्य गाठता येणार नाही हे त्यांनी त्या काळातच जाणले होते. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी जे धोरणात्मक आर्थिक विचार मांडले होते त्याचा अभ्यास या संशोधनपर लेखात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्ट्ये : (References)**

1. छत्रपती शाहू महाराजांच्या तत्कालीन आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.
2. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी राबवलेल्या वेगवेगळया आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे.
3. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या धोरणात्मक आर्थिक विचारांचे स्पष्टीकरण सविस्तर समजून घेणे.

**संशोधन पद्धती : (Research Methodology)**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे धोरणात्मक आर्थिक विचार पाहण्यासाठी संशोधनासाठी वापरण्यात आलेली माहिती ही द्वितीयक सामग्रीतून घेतलेली आहे. उद्दिष्ट्याना अनुसरून अभ्यास करण्याकरिता वर्णनात्मक, विश्लेषणात्मक अशा द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. मासिके, साप्ताहिके, पुस्तके, संपादित पुस्तके, संशोधनपर लेख, अशा विविध माध्यमांचा वापर केला आहे.

**छत्रपती राजर्षी शाहूंचे धोरणात्मक आर्थिक विचार :**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना जनतेचे सर्वांगीण कल्याण साध्य करायचे होते. त्यासाठी त्यानी राज्यकारभार हाती घेतल्या बरोबर संस्थानिकांचा दौरा करून जनतेच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी केली. सरकारच्या खर्चात काटकसर करणे, भ्रष्टाचार व लाचलुचपत नष्ट करणे यासाठी शाहू महाराजांनी ठळक, आदर्श आणि कडक असे नियम घालून दिले होते. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या काळात जे धोरणात्मक आर्थिक विचार मांडले त्याचा प्रामुख्याने उद्दिष्ट्याना अनुसरून खालील प्रमाणे मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करून आढावा घेता येतो.

**छत्रपती शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार :**

देशाच्या आणि मानवाच्या आर्थिक विकासामध्ये शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणामध्ये जलनीती हा घटक अत्यंत महत्वाचा मानला गेलेला आहे. शाहू महाराजांना शेतीमध्ये सुरुवातीपासूनच आवड होती. शेती ही कनिष्ट आहे आणि शेती करणे कमीपणाचे लक्षण आहे असे आपल्या प्रजेला वाटत असेल तर अशा विचारांचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे असे स्पष्ट मत राजर्षी शाहू महाराजांचे होते. शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम आपल्या कोल्हापूर संस्थानातील समाज जीवनाचे अत्यंत बारकाईने आणि सूक्ष्मपणे निरीक्षण केले. यावरून महाराजांच्या असे निदर्शनास आले की, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, शैक्षणिक अज्ञान हे शेतकरी वर्गाचे दोन प्रमुख शत्रू आहेत. भारतीय शेतकरी हा सामाजिक मागासलेपण आणि दारिद्र्यातून आलेले भौतिक मागासलेपण अशा कात्रीमध्ये सापडला होता. यामध्ये आणखी दुष्काळाची भर पडत असल्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे जीवनच उध्वस्त होते, ही सर्व परिस्थिती जाणून घेवून छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी १९०२ साली युरोपचा दौरा केला आणि त्यानी केलेल्या प्रगतीचा विस्तार पाहून युरोपातील धरणे, पाटबंधारे, पाहून अशी प्रगती आपण आपल्या देशात का करू शकत नाही असा विचार करायला सुरुवात केली आणि त्याची अंमलबजावणी देखील करायला सुरुवात केली. याची पहिली पायरी म्हणजे वारंवार पडणाऱ्या भारतातातील दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी एक पायाभूत स्वरूपाची योजना तयार केली आणि आपल्या राज्यासाठी सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. जुन्या नव्या विहिरी, कालवे, लहान-मोठे तलाव, बंधारे यांची नोंद घेतली आणि त्यांच्या दुरुस्तीचे काम सर्वप्रथम हाती घेतले. दुष्काळावर मात करण्यासाठी आणि पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी आणि भविष्यात शेतीला निश्चित आणि कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्हावा यासाठी १९०९ मध्ये कोल्हापूरच्यानजीक भोगावती नदीवर महाराणी लक्ष्मीबाई या नावाने धरण बांधले जे की आज 'राधानगरी' धरण म्हणून ओळखले जाते. या धरणाच्या प्रकल्पामुळे राज्यात बारमाही हिरवीगार शेती फुलू लागली आणि हरितक्रांतीची सुरुवात झाली. यासोबतच छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानातच शेतीच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु केली. सुधारित शेती पद्धतीचा विस्तार करण्यासाठी अग्रीकल्चरल संस्थेची स्थापना केली. शेतीमध्ये केवळ पारंपारिक पिकेच न घेता विविध पिके घेतली पाहिजेत आणि त्यातून शेतमाजुरानादेखील रोजगार मिळाला पाहिजे असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. याबरोबरच शेतीला पूरक असे दुग्ध-व्यवसाय, पशुपालन, मधुमक्षिकापालन, कोंबडी व बदके पालन, फलोत्पादन असे विविध जोडधंदे सुरु

करावेत असे स्पष्ट मत शाहूंचे होते. आपल्या संस्थानातील तसेच देशातील शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शेतीविषयक प्रदर्शने त्यानी भरवली. ज्यामुळे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग होवून लोक आधुनिक शेतीकडे वळतील असे त्यांचे स्पष्ट मत होते. अशाप्रकारे शाहू महाराजांनी शेती कशी करावी, उत्पादन कोणकोणते कसे, किती घ्यावे, जोडधंदे कसे करावेत, पाणी पुरवठ्याच्या सुविधा कशा असाव्यात, शेतीमध्ये कोणकोणती पिके घ्यावीत अशा चौफेर बाजूनी शेतीविषयक विचार मांडून आपल्या देशाच्या आर्थिक विकासाला शेतीचा कसा आधार होईल यासाठी शाहूंनी अतोनात प्रयत्न केले असे लक्षात येते. म्हणजेच शाहू महाराजांचे शेतीविषयक जे आर्थिक विचार होते ते धोरणात्मक स्वरूपाचे होते.

**छत्रपती शाहू महाराजांचे उद्योग आणि सहकारविषयक विचार :**

देशाच्या आर्थिक विकासात जेवढे महत्त्व शेतीला आहे तेवढेच महत्त्व उद्योगांनादेखील आहे असे मत राजर्षी शाहूंचे होते. त्यांच्या मते भारतासारख्या विकसनशील देशात उद्योगांचा विकास झाला तरच आर्थिक विकास होईल. शाहूंचा असा ठाम विस्वास होता की, भारताचा भविष्यकाळ हा उद्योगप्रधानतेचा असेल. जनतेने केवळ आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून केवळ शेतीवरच अवलंबून न राहता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योगधंद्याच्या क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे. शाहू महाराजांनी आपल्या दोन्ही राजपुत्रांना शेती, व्यापार आणि उद्योगधंद्यात घेतले. महाराजांनी कोल्हापूरमध्ये शाहूपुरी ही गुळाची नवीन बाजारपेठ वसवली जी आज भारतात सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. आपल्या संस्थानातील लोकांना लहान मोठे उद्योग सुरु करण्यासाठी शाहूंनी प्रोत्साहन तर दिलेच त्यासोबत अर्थसहाय्य देखील केले. ग्रामीण भागातील लोकांना त्याचवेळी रोजगार प्राप्त होईल ज्यावेळी छोटे-छोटे उद्योग हे ग्रामीण भागात स्थापन केले जातील असे शाहूंचे ठाम मत होते. परिणामी ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागाकडे होणारे स्थलांतर थांबेल. उद्योगांचे विकेंद्रीकरण करावे असे ते म्हणत. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ शेती आधारित उद्योगच नाही तर स्वतंत्र उद्योगदेखील स्थापन करावेत, छोट्या उद्योगांना संरक्षण द्यावे, स्पर्धेवर आधारित उत्पादन तंत्र उद्योगांनी वापरावे, उद्योगातील कामगारांना सवलती द्याव्यात, उद्योग प्रवर्तकांनादेखील मदतीचा हात दिला पाहिजे असे शाहू महाराजांचे मत होते. या सर्व मतांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शाहूंनी १९०६मध्ये छत्रपती शाहू मिल्स ही कापड गिरणी, १९१२-१३ मध्ये पहिली ऑईल मिल , पहिली सा मिल, पहिली इलेक्ट्रिक कंपनी स्थापन केली. १९१३ मध्येच राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल, कोल्हापूर अर्बन कॉ-ऑप. सोसायटी लि. ही पहिली सहकारी संस्था स्थापन करून सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले. याचा परिणाम म्हणून शेती आणि उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली, वाहतूक व्यवसायात सुधारणा घडून आली, लोकांचे उत्पन्न वाढून आर्थिक परिस्थिती सुधारली. थोडक्यात असे म्हणता येते की, शेती, उद्योग, व्यापार क्षेत्रात जी प्रगती झाली या प्रगतीचा पाया ख-या अर्थाने छत्रपती शाहू महाराजांनीच रचला होता. शाहू महाराजांनी सहकारी तत्वावर अनेक उत्पादन संस्था, बँका, वित्त संस्था, सोसायटी, साखर कारखाने काढल्याचे दिसून येते. यावरून शाहू महाराजांचे धोरणात्मक विचार किती दूरदृष्टीचे होते हे दिसते.

**छत्रपती शाहू महाराजांचे व्यापार आणि वाहतुकविषयक विचार :**

कोणत्याही देशात व्यापारात होणा-या आणि वाहतूक दळणवळणविषयक सुविधांमध्ये होणा-या वाढीवर त्या देशातील कृषी आणि उद्योग तसेच आर्थिक विकास अवलंबून असतो. उद्योगांमध्ये आणि शेतीमध्ये निर्मित वस्तूंना योग्य अशी बाजारपेठ उपलब्ध व्हावी असे शाहूंचे मत होते. त्यांच्या मते उद्योगाचा विकास आणि व्यापार याबाबी परस्परावलंबी आहेत. शाहूंच्या काळात निपाणी याठिकाणी मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. तेथील व्यापा-यांनी कोल्हापूर येथे येवून व्यापार करावा यासाठी त्यानी कोल्हापूर येथे बाजारपेठ वसवून व्यापा-यांना सवलती देवून त्यांना व्यापारासाठी आकर्षित केले. म्हणूनच शाहूपुरीचा विकास घडून आला.

या सर्व व्यापारासाठी रस्त्यांचे महत्त्व लक्षात घेवून आपल्या कालखंडात शाहूंनी १८५ मैल लांबीचे रस्ते तयार केले होते. अनेक खेडी शहरांना जोडल्याने खेड्यांचा शहरांशी संपर्क वाढला. १८८८ मध्ये कोल्हापूर ते मिरज या सरकारी रेल्वे मार्गाचे काम सुरु केले. व्यापाराच्या विकेंद्रीकरणाचा हेतू समोर ठेवून गडहिंग्लज येथे गुळ, जयसिंगपूर येथे तंबाखू याची बाजारपेठ स्थापन केली. अशाप्रकारे शाहू महाराजांनी व्यापाराच्या विकासासाठी वाहतूक व दळणवळणाच्या सेवेला महत्त्व दिले. शाहूंची व्यापार आणि वाहतूक दळणवळण विषयक बाबतीत असलेली भूमिका ही नम्र, विधायक आणि उत्कार्षाप्रत नेणारी होती.

**छत्रपती शाहू महाराजांचे रोजगारविषयक विचार :**

आपल्या संस्थानातील आणि देशातील कामगारांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी शाहू महाराजांनी रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सरकारी आणि निमसरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खर्च केला. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे यासाठी शाहूंनी पायाभूत सोयी-सुविधा, अनुदाने देण्याचे ठरवले होते. त्याबरोबरच पूर्ण रोजगार आणि अर्थपूर्ण रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न केले. कृषी क्षेत्रात अतिरिक्त ठरणा-या मजुरांना कारखाने आणि इतर उद्योगधंद्यात सामील करून घेण्याचे धोरण त्यानी आखले होते. आपल्या संस्थानात सर्वच लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येणार नाही म्हणून महाराजांनी ठेकेदारामार्फत कॅम्पभोवती दगडी तट बांधण्याचे काम करून घेतले. म्हणून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला. यावरून असे स्पष्ट होते की शाहू महाराजांनी प्रसंगानुसार कामापेक्षा रोजगाराला अधिक महत्त्व दिले.

**छत्रपती शाहू महाराजांचे जलसिंचन आणि दुष्काळविषयक विचार :**

शेतक-यांचे दारिद्र्य नष्ट व्हावे, शेती उत्पादन वाढावे, शेतक-यांनी सुशिक्षित व्हावे असे शाहू महाराजांना वाटत होते. कारण त्यावेळी कोल्हापूर संस्थानातील शेतक-याची स्थिती फारच दयनीय होती. शेती आणि शेक-यांच्या जीवनामध्ये सुधारणा व्हावी यासाठी त्यानी अधिकाधिक जमीन पाण्याखाली आणण्यासाठी १९०७ मध्ये भोगावती नदीवर एक बंधारा बांधला जो आज राधानगरी धरण म्हणून प्रसिध्द आहे. जलसिंचनाचे महत्त्व शाहूंनी लोकांना त्याकाळी पटवून दिले म्हणूनच आज कोल्हापूर परिसर कृषी विकासाच्या बाबतीत देशामध्ये अग्रेसर असल्याचे दिसून येते. पाणीपुरवठ्याबरोबरच शेती उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीला बारमाही पाणी पुरवठा व्हावा जेणेकरून लोकांचे उत्त्पन्न वाढेल, दारिद्र्य, दुष्काळ, अज्ञान दूर होईल यासाठी शेततळी, विहिरी, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले. भारतात विशेषतः कोल्हापूर परिसरात इ.स. १८९६ ते १९१९ पर्यंत मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडत होता. या काळात शाहू महाराजांनी जनकल्याणाच्या अनेक योजना राबवल्या. या योजनाची सांगड कायमस्वरूपी रोजगारासाठी व्हावी म्हणून तलाव, विहिरी, रस्ते दुरुस्ती, झाडे लावणे, रस्त्याच्या बाजूनी नाल्या खोदणे ई. कामे हाती घेतली. आरोग्य केंद्रे उभारणे, अन्नछत्र, स्वस्त दरात धान्य वाटप करणे, जनावरांच्या चा-याची व्यवस्था करणे ई. तातडीच्या उपाययोजना शाहू महाराजांनी दुष्काळ निवारण्यासाठी अवलंबिल्या होत्या. अशाप्रकारची जलसिंचन आणि दुष्काळ निवारण्यासाठी केलेली कार्ये म्हणजेच आजच्या आधुनिक सरकारला मार्गदर्शक तत्त्वेच आहेत असे दिसून येते.

**निष्कर्ष :**

1. छत्रपती शाहू महाराजांची तत्कालीन परिस्थिती बिकट होती त्यातून त्यानी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.
2. छत्रपती शाहू महाराजांनी राबवलेली आर्थिक धोरणे ही धोरणात्मक आणि आदर्शवत आहेत.
3. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची आर्थिक धोरणे ही समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण करणारी आहेत.

## सारांश: (Conclusion)

अशाप्रकारे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सत्तेवर येण्या अगोदर तसेच सत्तेवर आल्यानंतरदेखील अनेक प्रकारच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक , शैक्षणिक कार्याबरोबरच धोरणात्मक अशी आर्थिक कार्ये देखील पार पाडली. म्हणूनच श्रेष्ठ चरित्रकार धनंजय कीर यांनी शाहू महाराजांना 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत' असे म्हटले आहे. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या धोरणात्मक आर्थिक विचारांच्या माध्यमातून आपले कोल्हापूर संस्थान आणि बाहेर स्वतंत्र अशी समाजवादी अर्थव्यवस्था उभी केली असे दिसून येते. म्हणूनच आधुनिक विकसनशील अर्थव्यवस्थेचा प्रणेता आणि समाजवादी मुत्सद्दी शाहू महाराजांच्या रुपात आपणाला दिसून येतो. त्यानी ज्या ज्या योजना मग त्या शेती, उद्योग , व्यापार, दळणवळण, वाहतूक, जलसिंचनविषयक सुधारणा राबवल्या त्या शाहूंच्या आधुनिक अशा समाजवादी अर्थशास्त्रीय सिद्धांतावर आधारित आहेत. त्यांच्या योजना आजही महत्त्वाच्या दिसून येतात. एवढा दुरदृष्टीपणा छत्रपती शाहू महाराजांच्या अंगी होता.

## संदर्भग्रंथ: (References)


1. धनंजय कीर : राजर्षी शाहू महाराज – एक समाज क्रांतिकारी राजा: पौप्युलर प्रकाशन, मुंबई -१९८८
2. साळुंखे पी. बी.( संपादकीय) : राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : मुंबई द्वितीय आवृत्ती १९८८
3. फडके य. दि. : व्यक्ती आणि विचार : १९८५
4. डॉ. जयसिंगराव पवार (संपादकीय) : राजर्षी शाहू महाराज ग्रंथ 2001
5. लत्ते आ. बा. : श्री शाहू छत्रपती यांचे चरित्र ; कोल्हापूर १९२५
6. डॉ. अनिल कठारे : सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास .
7. प्रा. डॉ. बी. के . शेप (संपादकीय) : राजर्षी शाहू महाराज: सामाजिक सुधारणा व सद्यस्थिती.
8. प्रा.डॉ. राहुल म्होपरे : राजर्षी शाहू महाराजांची आर्थिक धोरणे आणि कार्यक्रम (पीएच. डी. प्रबंध. कोल्हापूर विद्यापीठ)

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# अम्बेडकर का आर्थिक चिंतन एवं वर्तमान में उसकी प्रासंगिकता

**डॉ. सुरेखा पिपलानी**
एसोसिएट प्रोफेसर अर्थशास्त्र विभाग जी०यू०(पी०जी०) कालेज, बहेड़ी (बरेली)

**प्रस्तावना:—**

भारत रत्न डॉ. भीम राव अम्बेडकर (१४ अप्रैल १८९१—६ दिसम्बर १९५६) का व्यक्तित्व विद्वता, संगठन कौशल और प्रभावी नेतृत्व जैसे गुणों का अनूठा संगम है । भारतीय संविधान के निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाने के साथ—साथ वह एक महान राष्ट्रवादी, राजनैतिक चिंतक, अर्थशास्त्री, विधिवेत्ता शिक्षाविद और, समाज सुधारक भी थे। यद्यपि अर्थशास्त्र पर उनका चिन्तन मौलिक था और इस क्षेत्र के विभिन्न पहलुओं पर उनके शोध उल्लेखनीय थे फिर भी एक अर्थशास्त्री के रूप में उनकी चर्चा कम ही होती है, क्योकि १९२३ में भारत लौटने के बाद वह देश की सामाजिक एवं राजनैतिक व्यवस्था को बदलने के लिये जुट गये थे और आर्थिक समस्याओं पर अपना शोध जारी नही रख पाये। यदि स्वतन्त्रता प्राप्ति के पश्चात उन्हें समय मिलता तो निश्चित रूप से एक अर्थशास्त्री के रूप में उनकी सेवाओं का विस्तृत लाभ मानव जाति को मिल पाता। डॉ. अम्बेडकर बचपन से ही अत्यन्त योग्य एवं प्रतिभावान थे। विद्यार्थी जीवन से ही अर्थशास्त्र विषय उनको अत्यन्त प्रिय था। उन्होंने स्नातक से लेकर डॉक्टरेट तक की उपाधि विश्व के श्रेष्ठतम् विश्वविद्यालयों से अर्थशास्त्र विषय में ही प्राप्त की है। अर्थशास्त्र के विभिन्न पहलुओं पर उनके शोध उल्लेखनीय हैं। इस लेख में डॉ. अम्बेडकर के आर्थिक विचारों पर प्रकाश डालने का प्रयास किया गया है।

**अम्बेडकर का आर्थिक क्षेत्र में योगदान**

आर्थिक क्षेत्र में अम्बेडकर द्वारा किये योगदान को दो भागों में बाँटा जा सकता है—
१) शैक्षणिक योगदान
२) प्रशासक के रूप में दिया गया योगदान
शैक्षणिक योगदान :

आर्थिक जगत में उनके शैक्षणिक योगदान में तीन कार्य अत्यन्त महत्वपूर्ण हैं—

पद्ध ईस्ट इण्डिया कम्पनी का प्रशासन और वित्तीय प्रबन्ध
पपद्ध ब्रिटिश भारत में प्रान्तीय वित्त व्यवस्था का विकास
पपपद्ध रूपये की संमस्या— उद्भव और समाधान

डॉ. अम्बेडकर द्वारा लिखित शोध पत्र श्ईस्ट इण्डिया कम्पनी का प्रशासन एवं वित्तीय प्रबन्धश की तुलना दादा भाई नौरोजी द्वारा लिखित पुस्तक श्पावर्टी एण्ड अनब्रिटिश रूल इन इण्डियाश से भी की जाती है। इस पुस्तक को ब्रिटिश राज में हुई भारतीय सम्पदा की लूट का विश्लेषण करने वाली पहली प्रमुख पुस्तक माना जाता है। डॉ. अम्बेडकर ने अपने शोध लेख में ब्रिटिश सरकार की गलत नीतियों का उल्लेख करते हुए यह स्पष्ट किया कि किस तरह उनके द्वारा अपनायी गयी भेद भाव पूर्ण नीतियों के कारण भारत में निरन्तर गरीबी का प्रसार हो रहा था। भारतीय धन सम्पदा लगातार बाहर जा रही थी। यहाँ का औद्योगिक ढाँचा लगातार ध्वस्त हो रहा था और हम सिर्फ कच्चे माल की आपूर्ति करने वाला देश बन कर रह गये थे। भारत में मूल आधार भूत आर्थिक संरचना, शिक्षा, स्वास्थ्य इत्यादि पर कम खर्च करके उसे ब्रिटेन में साम्राज्यवादी युद्धों के लिये सेना पर खर्च करना ब्रिटिश सरकार की प्रमुख भेद भाव पूर्ण नीति थी, जिसके कारण भारत के आर्थिक विकास का मार्ग बाधित हो रहा था। इस शोध पत्र में डॉ. अम्बेडकर द्वारा प्रस्तुत किये गये तर्क उनकी अद्वितीय बौद्धिक प्रतिभा एवं तार्किक क्षमता का प्रतीक है। जिस तरह उन्होंने इस लेख में ईस्ट इण्डिया कम्पनी के हाथों भारतीय जनता के शोषण को ठोस तर्कों के आधार पर साबित किया है वह उनकी देशभक्ति का अतुलनीय उदाहरण है।
डॉ. अम्बेडकर ने १९१७ मे कोलम्बिया विश्वविद्यालय में जो शोध प्रबन्ध प्रस्तुत किया था वह १९२५ में एक पुस्तक के रूप में प्रकाशित भी हुआ। श्ब्रिटिश भारत में प्रान्तीय वित्त व्यवस्थाश

के नाम से प्रकाशित इस पुस्तक का लोक वित्त के क्षेत्र में महत्वपूर्ण योगदान है, विशेष रूप से संघीय वित्त के क्षेत्र में। इसमें उन्होंने १८३३ से १९२१ के बीच की अवधि में ब्रिटिश इण्डिया में केन्द्र और राज्य सरकारों के वित्तीय सम्बन्धों की समीक्षा की है और इसके लिये उन्होने १७९२ से आँकड़ों का संकलन और विश्लेषण किया है। नि:सन्देह आधुनिक भारत की वित्तीय प्रबन्धन व्यवस्था, करारोपण के सिद्धान्त, प्रान्तीय राजस्व की समस्या और केन्द्र तथा राज्यों के वित्तीय सम्बन्धों पर उनका यह कार्य अत्यन्त महत्वपूर्ण है। डॉ. अम्बेडकर की यही विशेषज्ञता संविधान निर्माण में भी सहायक बनी। उनहोंने पुन: स्पष्ट किया कि ब्रिटिश शासन की कर प्रणाली सिर्फ गरीब और किसानों पर राजस्व का भार डालती थी और जनकल्याण के स्थान पर जमींदारों संभ्रान्त वर्ग तथा ब्रिटिश शासन को पोषित करने के कार्य करती थी। इस पुस्तक के लेखन की प्रशंसा करते हुये कोलम्बिया विश्वविद्यालय में राजनैतिक अर्थशास्त्र के प्रोफेसर एवं प्रबुद्ध अर्थशास्त्री एडविन राबर्ट सैलिगमैन ने कहा था कि उन्होंने इस विषय पर इससे अधिक गहरा और व्यापक अध्ययन कहीं नहीं देखा है। इस पुस्तक में केन्द्र और राज्यों के वित्तीय सम्बन्धों के विषय में जो विचार व्यक्त किये गये हैं उसे स्वतन्त्रता प्राप्ति के बाद भारत में केन्द्र और राज्यों के आर्थिक सम्बन्धों की रूपरेखा तैयार करने के दृष्टिकोण से अत्यन्त प्रासंगिक माना जाता है। कई विद्वानों का तो यह मानना है कि भारत में वित्त आयोग के गठन का बीज डॉ. अम्बेडकर की इसी पुस्तक में निहित है।

एक अर्थशास्त्री के रूप में डॉ. अम्बेडकर की सबसे चर्चित पुस्तक श्रूपये की समस्या—उद्‌भव एवं समाधानश १९२३ में प्रकाशित हुई। अपनी इस पुस्तक में उन्होंने १८०० से १९२० की समयावधि के मध्य भारतीय करेन्सी के लिये उत्पन्न समस्याओं के साथ—साथ भारत के लिये उपयुक्त करेन्सी व्यवस्था का चित्र भी प्रस्तुत किया। उन्होंने मुद्रा के मूल्य की स्थिरता को अति आवश्यक माना है और वित्तीय नीति के आय वितरण एवं विषमता पर पड़ने वाले प्रभाव को स्पष्ट किया है। उन्होंने तर्क सहित स्पष्ट किया कि सरकार की नोट मुद्रित करने की शक्ति सीमित होनी चाहिये अन्यथा की स्थिति में मुद्रा के मूल्य में गिरावट को रोका नही जा सकता। इस पुस्तक की भूमिका प्रसिद्ध अर्थशास्त्री एडविन केनन ने लिखी है। १९२९—३० में जब पूरे विश्व को भयंकर मंदी का सामना करना पड़ा तो इस मन्दी के कारण ब्रिटिश सरकार के समक्ष भी गंभीर चुनौतियाँ उपस्थित हुईं विशेषकर उन उपनिवेशों में जहाँ स्वतन्त्र होने की माँग जोर पकड़ रही थी ऐसे देशों में ओपनिवेशिक सरकार की मजबूती के लिये वहाँ की स्थानीय समस्याओं का समाधान आवश्यक हो गया था इसलिये भारत की मुद्रा प्रणाली का अध्ययन करने के लिये १९२५ में ब्रिटिश सरकार ने श्रॉयल कमीशन ऑन इण्डियन करेन्सी एण्ड फाईनेन्सश का गठन किया था। इस आयोग में सम्मिलित ४० अर्थशास्त्रियों में डॉ. अम्बेडकर का भी नाम था। आयोग के सामने उन्होंने अपने विचारों को पूर्ण दृढ़ता के साथ प्रस्तुत किया। यद्यपि ब्रिटिश सरकार ने अम्बेडकर के आर्थिक विचारों को नहीं अपनाया लेकिन भारतीय करेन्सी व्यवस्था का जो चित्रण उन्होंने प्रस्तुत किया उसे दृष्टिगत रखते हुये ही १९२६ में इस आयोग ने अपनी रिपोर्ट प्रकाशित की तथा उनकी अनुशंसाओ के आधार पर बाद में भारतीय रिर्जव बैंक की स्थापना की गयी। रिर्जव बैंक की अभिकल्पना, रूपरेखा, कार्यशैली और नियम सभी कुछ अम्बेडकर के शोध श्रूपये की समस्या—उद्‌भव और समाधानश पर आधारित हैं। वर्तमान समय में जब भारतीय अर्थव्यवस्था के समक्ष मुद्रा के अवमूल्यन और मुद्रा स्फीति की समस्या उत्पन्न होती है तो ऐसे में उनके शोध के परिणाम न सिर्फ समस्याओं को समझने में महत्वपूर्ण हो सकते हैं बल्कि वह उनके समाधान को लेकर आगे का मार्ग भी प्रशस्त कर सकते हैं।

इण्डियन इकॉनोमिक सोसायटी के जर्नल में कृषि जोतों के आकार पर १९१८ में प्रकाशित उनका लेख श्भारत मे छोटी जोतें और उनके उपचारश आज भी सार्थक हैं। उसमें उन्होंने कृषि योग्य भूमि के छोटी—छोटी जोतो में बँटी होने के कारण उत्पन्न समस्याओं पर प्रकाश डालते हुए कहा था कि कृषि क्षेत्र में वैज्ञानिक उपलब्धियों के साथ—साथ भूमि सुधार की भी अत्यन्त आवश्यकता है। उनका मानना था कि कृषि की उत्पादकता जोतों के आकार के साथ—साथ उत्पादन के अन्य अनेक कारकों पर भी निर्भर करती है इसलिये भारत में इस क्षेत्र में पूँजी निवेश की अत्यन्त आवश्यकता है क्योंकि ब्रिटिश शासन में इस क्षेत्र में पूँजी निवेश में गिरावट आयी

है। अम्बेडकर के इन सुझावों को स्वतन्त्रता के बाद ही प्रयोग में लाया गया। भारत सरकार द्वारा कृषि में पूँजी निवेश को प्रोत्साहित किया गया साथ ही कृषि उत्पादकता में वृद्धि के लिये हरित क्रान्ति को अपनाया गया। उन्होंने स्पष्ट किया कि कृषि क्षेत्र में आवश्यकता से अधिक लोगों के लगे होने के कारण छिपी हुई बेरोजगारी का सामना करना पड़ रहा था। विशेष बात यह है कि अम्बेडकर ने इस छिपी हुई बेरोजगारी की अवधारणा को उस समय स्पष्ट किया जब इस अवधाराणा के सम्बन्ध में विश्वभर में कोई स्पष्ट विचारधारा भी निर्मित नहीं हो पायी थी। लगभग तीन दशक बाद अर्थशास्त्र की मुख्य धारा में यह अवधारणा प्रचलित हुई जब नोबेल पुरूस्कार विजेता आर्थर लुईस ने इसे प्राचारित किया। उनके अनुसार इस छिपी हुई बेरोजगारी की समस्या का एक ही समाधान है— औद्योगीकरण। औद्योगीकरण को बढ़ावा देकर कृषि में लगी अतिरिक्त श्रम शक्ति को सार्थक रोजगार प्रदान किया जा सकता है और साथ ही साथ राष्ट्रीय उत्पादन की मात्रा में भी वृद्धि की जा सकती है। एम०एस० स्वामि नाथन कमीशन की सिफारिश आने के दशकों पहले उन्होंने सुझाव दिया था कि कृषि उपज का न्यूनतम समर्थन मूल्य लागत से कम से कम ५० प्रतिशत अधिक होना चाहिए।

**प्रशासक के रूप में आर्थिक योगदान:**

डॉ. अम्बेडकर ने न सिर्फ शैक्षणिक रूप में आर्थिक जगत में उल्लेखनीय योगदान दिया है अपितु स्वतन्त्रता के बाद एक प्रशासक के रूप में भी उनका योगदान सराहनीय रहा है। उनकी गहरी आर्थिक सूझबूझ का लाभ देश को मिला है। श्रम कानूनों से लेकर नदी घाटी परियोजनाओं और देश के अधिकांश हिस्सों में बिजली पहुँचाने के लिये आवश्यक बुनियादी ढाँचे के विकास तक कई कार्य डॉ. अम्बेडकर के दिशानिर्देशन में प्रारम्भ हुए। वे नदी घाटी परियोजनाओं एवं जल प्रबन्धन के उचित रखरखाव में उच्च कोटि की वैज्ञानिक तकनीक अपनाने के पक्षधर थे। दामोदर घाटी परियोजना एवं अन्य नदी घाटी परियोजनाओं के सफल क्रियान्वयन में उनकी भूमिका बहुत महत्वपूर्ण थी और दूरगामी सोच के कारण आज भी ये सही तरह से काम कर रही हैं। देश में बिजली के ढाँचे के विकास का स्वरूप १९४० में उस समय तैयार किया गया था जब डॉ. अम्बेडकर श्पॉलिसी कमेटी ऑन पब्लिक वर्क्स एण्ड इलैक्ट्रिक पॉवरश के चेयरमैन थे। उनका मानना था कि देश के औद्योगिक विकास हेतु पर्याप्त और सस्ती बिजली उपलब्ध कराना आवश्यक है और इसके लिये एक केन्दीकृत व्यवस्था होनी चाहिये। देश में सेन्ट्रल वाटर कमीशन और सेन्ट्रल इलैक्ट्रीसिटी अथॉरिटी जैसी संस्थाओं की स्थापना भी उनके नेतृत्व में हुई थी। देश के आर्थिक विकास में महिलाओं के योगदन की भूमिका को स्पष्ट करने का भी कार्य डॉ. अम्बेडकर ने उस दौर में किया था जब लोग इस विषय को बहुत कम महत्व देते थे। महिलाओं को आर्थिक कार्य शक्ति का अभिन्न अंग बनाने के लिये मातृत्व अवकाश जैसी आवश्यक अवधारणा को भी डॉ. अम्बेडकर ने ही कानूनी रूप दिया था। श्रमिकों को सरकार की तरफ से बीमा लाभ दिये जाने और श्रमिकों से जुड़े आँकड़ों के संकलन और प्रकाशन का विचार भी मूल रूप से डॉ. अम्बेडकर ने ही दिया था। इसके अतिरिक्त गरीबी उन्मूलन, शिक्षा, औद्योगीकरण, और बुनियादी सुविधाओं की जरूरत जैसे कई विषयों पर देश को डॉ. अम्बेडकर के अनुभव और एक अर्थशास्त्री के रूप में उनके ज्ञान का लाभ मिला है। इस प्रकार चाहे अम्बेडकर वित्तीय विषयों पर लिख रहे हों या मौद्रिक सिद्धान्तों पर उनका मूल लक्ष्य ऐसे निष्कर्षो तक पहुँचना था जो व्यवहारिक और लोकहितकारी दोनों हों।

**निष्कर्ष:**

अम्बेडकर का पूरा जीवन एक महागाथा है। अर्थशास्त्री के रूप में उनके योगदान को एक लेख में आँकना असम्भव है। अर्थशास्त्र के क्षेत्र में उनकी विद्वता का अनुमान लगाने के लिये नोबेल पुरूस्कार बिजेता अमर्त्यसेन का कथन भी सहायक हो सकता है। २००७ में दिये गये व्याख्यान में अर्थशास्त्र के क्षेत्र में अम्बेडकर की गुरूता को स्वीकारते हुए इस महान अर्थशास्त्री ने कहा था कि:— ष्अम्बेडकर अर्थशास्त्र के क्षेत्र में मेरे आर्दश हैं उन्हें जो भी मान—सम्मान मिला है वे उससे कहीं ज्यादा के हकदार हैं। अर्थशास्त्र के क्षेत्र में उनका योगदान बेहद शानदार रहा है, उसे हमेशा याद किया जाना चाहिये।ष

**सन्दर्भ सूची :**

1. Jadhav Narendra Dr. Ambedkar's Economic Thought and Philosophy Bombay Popular Prakashan
२ण हर्ष हरदान डॉ. भीमराव अम्बेडकर जीवन और दर्शन पंचशील प्रकाशन, जयपुर
3. Limaye Madhu Manu, Gandhi And Ambedkar Gyan Publishing House, New Delhi
4. Kallur M.S Dr. Ambedkar's Economic Philosophy: A Few Reflections
5. Dr.(smt.) Degaonkar C.K Dr. Ambedkar on Indian monetary system
6. https://www.deshbandhu.co.in
7. https://www.satyahindi.com
8. https://www.jagran.com

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य आणि विचाराचा मराठी कवितेवरील प्रभाव

**डॉ. वैशाली विजय जावळेकर**

मराठी विभाग प्रमुख डी .जी.रुपारेल महाविद्यालय, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे संचालित मुंबई, माहिम

मराठीतील 1960 नंतरच्या मराठी कवितेच्या प्रवासात मार्क्सवाद आणि डॉ. भीमराव आंबेडकरप्रणीत आंबेडकरी विचारव्यूहाचा मराठी कवितेवर प्रभाव दिसतो.

1. १९६० च्या नंतरबाबासाहेब आंबेडकरप्रणीत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्रिसूत्रीला आधारभूत मानून सत्ताशास्त्रीयदृष्ट्या सर्वांत खालच्या पायरीवर असलेल्या लोकसमूहातील तरुण शिक्षित होऊन कलात्म सर्जनाच्या दिशेने कार्यरत झाला. दलित कवींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या जीवनदृष्टी आणि काव्यनिर्मितीचे प्रेरणास्थान मानले.
2. १९८० नंतरच्या काळात जाती अंत न घडता उलट जात-अस्मितांचा संघर्ष सुरु झाला.लोकशाहीची मूल्य , सामाजिक न्याय याविषयी सजग राहणे त्यासाठी 'संविधान' जपण्याची कृती'करणे'हे करताना महात्मा फुले ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार वारसा जपणे ही प्रेरणा दलित कवितेत प्रामुख्याने दिसते.तर आदिवासी ,ग्रामीण आणि स्त्री कवितेतही कमी-अधिक प्रमाणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो..

भारतीय समाजव्यवस्था ही जातींवर आधारलेली असून ती जातिजमातींमधील श्रेणिव्यवस्थेचा अवलंब करते. तसेच ही व्यवस्था जन्मासोबत व्यक्तीच्या वाट्याला येते. त्यामुळे जे लोकसमूह जातीच्या उतरंडीवर सर्वांत खालच्या पायरीवर होते ते दैनंदिन गरजांसोबत विकासाच्या समान संधीपासूनही वंचित राहिले.त्याचबरोबर त्यांचे 'माणूस' असणेही समाजाने कसोशीने नाकारले. त्यामुळे त्यांना आत्मविकासाच्या सर्वस्तरीय संधींना, स्व-उन्नतीसाठीच्या सामाजिक-आर्थिक लाभाला कायमच वंचित राहावे लागले. या प्रकारच्या जडीभूत समाजस्थितीत स्थित्यंतर घडवून आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.महाड येथील चवदार तळयावरील संघर्ष आणि काळाराम मंदिर प्रवेश या क्रांतिकारक घटना सर्वपरिचित आहेत. त्यानंतर दलित-पददलितांच्या मानवी हक्काच्या प्राप्तीसाठी तसेच त्याच्या संरक्षणासाठी संघर्षगर्भ लढा सुरूच राहिला. त्यातूनच स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या चतु:सूत्रीचा उदय झाला. या चतु:सूत्रीनेच आंबेडकरवाद ही संकल्पना जन्मास घातली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश तरुणांना दिला त्या संदेशाचे एक सर्जनशील रूप दलित कवितांमधून प्रकटते प्रत्यक्षात महात्मा फुले,राजश्री शाहु महाराज यांच्या सामाजिक चळवळीचा वारसा घेत आंबेडकरी जलसे आणि आंबेडकरी शाहिरी कविता १९६०पूर्वी मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आली होती. त्यामुळे १९६०पूर्वीपासूनच दलित कविता प्रकटू लागली होती. १९६०नंतर मात्र मराठी काव्यप्रवासात दलित कविता प्रभावीपणे आपले वाङ्मयीन व वाङ्मयेतर योगदान भरभरून देऊ लागली. नवशिक्षित दलित सर्जक तरुणांना प्राप्त झालेल्या शिक्षणामुळे त्यांना 'स्व'च्या व स्व-समाजाच्या शोषणव्यवस्थेचे स्वरूप उमगू लागले. जातविरहित विकासाची समानसंधी, व्यक्ती म्हणून असलेले मूलभूत हक्क याविषयी तीव्र भान आले. ते मिळविण्यासाठी 'दलित पँथर' या राजकीय चळवळीचा उदय झाला. आणि त्यातून साहित्यलेखनास वेग प्राप्त झाला.दलित साहित्यलेखन हे विशिष्ट जीवनजाणिवेतून तसेच एक व्यक्ती म्हणून मूलभूत हक्कांच्या दाव्यातून निर्माण झालेले आहे. त्यामुळे ते अंगभूतपणे सामाजिक व राजकीय साहित्य ठरलेले आहे.दलित सर्जनशील व्यक्तींनी विषमताग्रस्त, शोषणाधिष्ठित अमानुष व्यवस्थेविरुद्ध कलात्म पातळीवर लढा देण्याचे एक अस्त्र म्हणून साहित्यनिर्मितीकडे पाहिले. परिणामी प्रस्थापित कालबाह्य मूल्यांना नकार देणे, प्रस्थापित विषम व्यवस्थेची निर्मिती ईश्वराने केली या अवैज्ञानिक विधानास कडवा विरोध करून ईश्वराचे

अस्तित्व नाकारणे, स्वत:च्या व स्वसमाजाच्या हालअपेष्टांना काव्यपातळीवर मूर्त करणे आणि त्यातून आपले 'माणूस' असणे सिद्ध करणे, साहित्य हेच सामाजिक न्याय मिळविण्याचे एक माध्यम आहे, याची सर्व समाजाला जाणीव करून देणे ही दलित साहित्यलेखनामागील उद्दिष्टे राहिलेली दिसतात. त्यामुळे प्रस्तुत साहित्याने दलितेतर वाचकाच्या अभिरुचीस व साहित्यिक संकेतव्यूहांना धक्का देण्याचे वाङ्मयीन कार्य प्रत्यक्षात केले असे म्हणायला हरकत नाही.

**प्रमुख दलित कवी आणि त्यांच्या कवितेचे आंबेडकरवादी जीवनजाणिवेशी नाते -**

दलित पँथर या राजकीय चळवळी बरोबरच आपल्या कवितांमधून आंबेडकरवादी,मार्क्सवादी जाणिवा व्यक्त करणारे कवी म्हणून कवी नामदेव ढसाळयांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. विशेषत: 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' (१९७५ 5) या कवितासंग्रहात ही विचारसरणी प्रामुख्याने व्यक्त झाली आहे. भारतात रूजून दृढमूल झालेली जातव्यवस्था आणि भांडवलशाही व्यवस्था संसदीय लोकशाहीतही सर्व पातळीवरील सर्वहारा वर्गाचे शारीर, मानसिक व आर्थिक शोषण करीत राहाते, हे वास्तव त्यांच्या कवितांमधून वारंवार उघड होताना दिसते. या प्रकारच्या त्यांच्या कवितांनी दलित कवितेलाच नव्हे तर एकूण मराठी कवितेलाच नवे व विस्तृत परिणाम प्राप्त करून दिले.दया पवार यांच्या  कोंडवाडा (१९७४)संग्रहातील कविता स्थलांतरित दलित तरुणाचा शहरात स्थिर होण्यासाठीचा संघर्ष आणि अनुभवाला येणारा जातियवाद व्यक्त करते.त्यांच्या 'पाणी कुठंवर आलं ग बाई' (१९९८ ) या संग्रहातील 'बाबा, काल परवाची गोष्ट' या कवितेत कवितागत 'मी' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी संवाद साधतात. डॉ. आंबेडकर यांनी दलितांना आत्मसन्मानाने जगता यावे म्हणून गावगाड्यातून मुक्तीचा मार्ग सुचवताना शहराकडे चला असा सल्ला दिला. शहरामध्ये धर्मांधता नाही, कर्मकांड नाही, अस्पृश्यतेच्या इंचू-इंगळयाचे पेव (असणार) नाही (पाणी कुठंवर आलं ग बाई, पृ. 6) असा विश्वास डॉ. आंबेडकर यांना वाटत होता त्यांनी दिलेला हा व्यक्तिविकासाचा, समान संधी प्राप्त करून घेण्याचा सल्ला स्वीकारून खेड्यापाड्यातील विषमताग्रस्त दलित समाजाने शहराची वाट धरली.शहरात स्वविकासाची संधीही मिळाली.मात्र १९८० नंतरच्या काळातील राजकीय-सामाजिक स्थित्यंतरामुळे  दलित समाज  दंगल,सामूहिक अत्याचार ,धर्मांधता अशा समाजवास्तवाला तोंड द्यावे लागत होते.  या पार्श्वभूमीवर 'पाणी कुठंवर आलं ग बाई' संग्रहातील कविता 'मानवतावादा'च्या रूजवातासाठी संवेदनशील, मानवहितैषी व्यक्तींने क्रांतिकारक होण्याची शक्यता सुचविते. १९९१साली त्यांनी 'धम्मपदा'चे केलेले काव्यात्म गेयरूप भाषांतर हे मानवधर्माची कास धरणारे आहे.केशव मेश्राम यांच्या आरंभ ते शेवटच्या संग्रहातील कवितांमधून वर्ग बदल  जातीला दूर सारता न आल्याने निर्माण झालेले द्वंद्व व्यक्त करते.उत्खनन (१९७७  )या कवितासंग्रहातील ‘एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली.(पृ.७४ ) कविता पारंपरिक धर्मव्यवस्थेतील परमेश्वराला नकार देते.कवी यशवंत मनोहर यांच्या काव्यनिर्मितीमागे जीवनवादी तत्त्ववेता चार्वाक, अहिंसा, करुणा यांची सखोल ओळख करून देणारे गौतम बुद्ध, आर्थिक विषमतेविरुद्ध तात्त्विक भूमिका घेणारे कार्ल मार्क्स  आणि सामाजिक न्यायासाठी, माणसातले माणूसपण जागविण्यासाठी लढा देणारे डॉ. भीमराव आंबेडकरप्रभृतींचे प्रगत विचारव्यूह असलेले दिसतात. त्यांचा 'उत्थानगुंफा' हा पहिला कवितासंग्रह १९७७ मध्ये प्रकाशित झाला. या कवितासंग्रहानंतर त्यांचे एकूण दहा कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'काव्यभीमायन' (1992), 'मूर्तिभंजन' (1995), 'जीवनायन' (2001), 'प्रतिक्षायन' (2006), 'युगांतर' (2015), 'युगमुद्रा' (2016) आदी कवितासंग्रह होत.यशवंत मनोहर यांच्या काव्यप्रतिभेने अन्य समकालीन दलित कवींप्रमाणे जातव्यवस्थेतील अन्याय्य बाबी उघड करणे, प्रस्थापित जातधारित जीवनधारणेला तीव्र विरोध दर्शविणे, ईश्वर कल्पनेला नकार देत नास्तिक वृत्तीला चालना देणे आदी अंगांनी व्यक्त होणे स्वीकारलेले दिसते. त्यांची प्रतिभा 'उत्थानगुंफा' ते 'युगमुद्रा' हा दीर्घ प्रवास

सदर संदर्भ सामावून घेत टप्प्याटप्प्याने बदलत्या सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक संदर्भांकडे सूक्ष्मपणे लक्ष पुरवू लागलेली दिसते.

हिरा बनसोड ,ज्योती लांजेवार ,प्रज्ञा पवार या स्त्रीकवींच्या कवितांमधून आंबेडकरवादी सामाजिक न्याय या संकल्पनेचा पुरस्कार दिसतो.त्याचप्रमाणे दलित समाजातील अनिष्ट बाबींवर टीकाही करण्याचे धाडस दिसते.स्त्रीवाद आणि आंबेडकरवादी अशा दुहेरी विचार प्रणालीने संघर्षोन्मुख झालेल्या स्त्रीकवींच्या कवितेत बंडखोरीचा विद्रोहाचा परिवेश दिसतो.१९८० च्या दशकातील आंबेडकरी चळवळीने जे स्वरूप धारण केले होते, त्यामुळे चळवळ सकारात्मक दिशेने जाणे थांबले होते. त्याऐवजी गटातटाचे राजकारण विकोपाला पोहचले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर अनेकांनी तत्पूर्वी आणि नंतरही मानवमुक्तीचा जो संकल्प उभारला होता त्यालाच छेद जात होता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे घटनाकार डॉ. आंबेडकर हे राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्व होते याचा विसरच दलित नेतृत्वाला पडू लागला होता. परिणामी डॉ. आंबेडकर बरोबर विशिष्ट जातीचे नेतृत्व असे समीकरण दृढमूल होऊ लागले होते.कवी बळवंत कांबळे यांनी आपल्या कवितेतून या परिस्थितीचा'निषेध(१९८१)' व्यक्त केलेला दिसतो..दलित चळवळीच्या ऱ्हासाला ते आपल्या काव्यटीकेचा विषय करतातत्यांच्या 'देव मायनस धर्म' (१९९७ ) या दीर्घ कवितेत धर्म, वेदशास्त्रे, ईश्वर, मंदिर, मठ, मठाधिपती, ईश्वराला शरण गेलेला जनसमूह यांबरोबर धर्मशास्त्राचा आधार देत दगडाच्या मूर्तीसमोर माणूस, पशू यांचे बळी देणे आदीविषयी परखड संश्लेषण, विश्लेषण करणारा 'मी' निर्माण करतात. एकीकडे वर्षानुवर्षे बिनदिक्कतणे शोषणाच्या अनेकांगी पद्धती आपल्या अंतरंगात सामावून घेणाऱ्या व्यवस्थेचे व व्यवस्था राबविणाऱ्या धुरिणांचे अंतर्बाह्य स्वरूप उघड करणारा हा दीर्घकवितेतील 'मी' डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांना व अखिल मानवजातीला मानवमुक्तीसाठी मार्गदर्शक ठरलेले तथागत गौतम बुद्ध या दोघांना उद्देशून त्यांच्याशी संवाद साधताना दिसतो. या संवादात त्यांच्याविषयीची कृतज्ञता जशी व्यक्त केली जाते तशी त्यांच्या एकूण कार्याची कृतज्ञतापूर्वक व अतिशय नम्रतेने ओळख करून दिली जाते. सर्व प्रकारच्या शोषितांना 'माणूस' होण्याच्या प्रक्रियेत दाखल करून घेणाऱ्या या दोन महामानवांच्या कार्याची ही काव्यात्म ओळख विचारशील, संवेदनशील वाचकाला मानवमुक्तीचे सारतत्त्व समजावून सांगणारी ठरते. कारण या दीर्घ कवितेतील 'मी' वेळोवेळी परात्म पावून स्वधर्म म्हणजे माणूसधर्म विसरलेल्या जनसमूहातील व्यक्तिव्यक्तीला त्यांनी व्यवस्थांचे भक्ष्य-लक्ष्य ठरू नये यासाठी आवाहन करताना दिसतो. राम दोतोंडे ,लहू कानडे यांच्या कवितांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विसाव्या शतकातील विचारवंताविषयी, समाजसुधारकाविषयी कृतज्ञता व अनन्य भक्तिभाव व्यक्त झालेला आहे. मात्र त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना दलित राजकीय चळवळ आणि सामाजिक न्यायाच्या शासकीय योजना ,भूमिकांचे परीक्षण ते करतात. हेही 'गल्ली बदलेला मोर्चा' या संग्रहातील 'मी, जात आणि ते' (पृष्ठे 55 ते 58) आणि 'मी, जात आणि बाबासाहेब' (पृष्ठे 58 ते 61) या दीर्घ कवितांमधील विश्लेषण मूल्यात्मक ठरते..

१९९० नंतरच्या काळातील धर्मांधता ,भ्रष्ट राजकारण या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटनाकार म्हणून कर्तृत्वआणि महत्व मानवमुक्तीचा लढा देणाऱ्या प्रत्येक सामाजिक चळवळीच्या कार्यकर्त्याला समजू लागले. नेते, महापुरुष यांच्याविषयी वैचारिक श्रद्धाभाव बाळगणे, म्हणजे त्यांच्या विचारधारेला समजून घेणे. 'नागरिकत्वा'चे समाजभान जागृत ठेवणे हीच 'लोकशाही', 'संविधान' जपण्याची कृती होय. याविषयीचे भान एकूण 'वंचित', सर्वहारा 'वर्गा'तील, समाजातील कवींना आलेले दिसते. दलित कवितेला 'दलित' न म्हणता 'आंबेडकरी' तत्त्वज्ञानाची, विचारधारेची कविता म्हणायला हवे अशी गरज याच काळात व्यक्त होऊ लागली. दलित चळवळीला वास्तव परिस्थितीचे आकलन करून घेण्याची धडपड राजकीय भान प्राप्त झालेला कवी करताना दिसतो. सामाजिक

क्रांतीचे समूहगान आपल्यालाच रचावे लागेल याची जाणीव झालेले कवितागत 'मी' हा राजकीय 'धुरिणत्वा'चे आणि समाजरचनेचा निर्माता होण्याचे बळ बाळगतो असे रविचन्द्र हडसनकर यांच्या कवितेत दिसते. 'स्वातंत्र्याची सकाळ आलीच नाही आमच्या दारात' असे म्हणणारा कवितागत 'मी' 'अत्तदीप' अवस्थेला आल्याचे दिसते.दलित किंवा एकूणच वंचित भारतीय समाज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे  एका स्थित्यंतराला सामोरा जात असताना या परिस्थितीचे विश्लेषण कवी अरुण काळे आपल्या कवितेतून करतात.त्यांच्या 'नंतर आलेले लोक' (२००६ ) या संग्रहातील 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' (पृ. 37) या कवितेतील कवितागत संगणकीय परिभाषेत 'आंबेडकरप्रणीत विचारप्रणाली'च मानवमुक्ती चळवळीचे ऊर्जास्रोत ठरते हे पटवून देतो. तसेच जात-वर्गमुक्तीचे स्वप्न पाहाणारी ही विचारप्रणाली अजूनही आपले ध्येय पूर्ण करू शकली नाही हे खरे असले तरी ही लढाई निर्णायक टप्प्यावर आली आहे असा विश्वास व्यक्त करतो. एकूण व्यवस्थेतून पुढील काळातही दलितांना 'डि-लिट' करता येऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून अॅन्टी-व्हायरसची खबरदार घेतली आहे, असे हा कवितागत 'मी' म्हणतो आणि कार्यकर्ता असलेला तो 'आज'च्या काळातील त्याच्यासमोरील आव्हाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत शेअर करताना दिसतो.

अरुण काळे यांच्याप्रमाणेच बाबुराव बागूल यांनी 'वेदाआधी तू होतास' (२००४ ) या कवितासंग्रहातील कवितांमधून आंबेडकर यांच्या जीवनकार्याची, विचाराची 'आज'च्या संदर्भात सांगड घालण्याची भूमिका घेतलेली दिसते. गौतम बुद्धांनंतर महात्मा फुले यांना माणूस हा 'निर्मिकाचा प्रजाजन दिसला. 'स्त्री शरीराचा अपमान करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध लढण्याचे बळ' स्त्रीला प्राप्त झाले असल्याचा निर्वाळा त्यांच्या कवितेतून महात्मा फुले देतात. बाबुराव बागूल यांच्या कवितांमधील कवितागत 'मी' भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न पाहतात. (सिद्धार्थ गौतम बुद्धा, पृ. 53), 'बुद्ध-फुले-आंबेडकर' (पृ. 55) या कवितेत 'चरथि भिकवे चरीकम, बहुजन हिताय बहुजन सुखाय, लोकनुकंपाय' या जीवनसंदेशांचा ते पुनरुच्चार करतात.

कवी धम्मापाल रत्नाकर यांचा 'सैतानाच्या खांबावर' (२००३ ) या कवितासंग्रहातील कवितांमधील कवितागत 'मी' सभोवतालच्या तरुण पिढीचे निरीक्षण करतात. मानवमुक्तीसाठी झटणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वामागील मौलिकता स्पष्ट करताना 'तुझ्या पश्चात कुठलीच चळवळ अजूनही नाही धरत तग' असा स्पष्ट कबुलीजबाब देतात आणि आंबेडकर यांच्या नावावर केवळ राजकीय सौदाबाजी होत आहे हे उघड करतात. धम्मपाल यांच्या कवितांमधील कवितागत 'मी' पुढच्या पिढीचे निरीक्षण करतात तेव्हा त्यांना ही पिढी प्रवाहपतीत, अंधारयात्रिकच वाटू लागते एकूणच उपरोक्त विवेचनातून हे स्पष्ट होते की प्रस्तुतच्या दशकातील दलित कवींनी आत्मपरीक्षण, स्वसमाजपरीक्षण आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदलणाऱ्या सभोवतालच्या स्थितिगतीचे सूक्ष्म अवलोकन करणे आणि परीक्षणाअंती, अवलोकनाअंती हाती येणारे समाजवास्तवाविषयीचे निष्कर्ष काव्यात्म रूपात व्यक्त करण्याची जबाबदारी पार पाडलेली दिसते. आंबेडकरवादी विचारपरंपरेतला दलित कवी सातत्याने स्त्रियांच्या संदर्भातील समतावादी विचार अभिव्यक्त करताना दिसतो. वेगवेगळया दशकांमध्ये स्त्रविषयक चळवळी, स्त्रियांच्या हक्कासंदर्भातील लढे, कायदे आणि स्त्रियांशी संबंधित वैचारिक अभिसरणाचे विविध प्रयत्न घडत असताना त्यांची दखल प्रस्तुतच्या दोन दशकातील काही दलित कवींनी घेतलेली दिसते.

मराठीतील आदिवासी कवितेच्या प्रवाहातील  कवी दलित चळवळीशी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगमनशील विचारांची कस धरून आपल्या सामाजिक न्यायाच्या लढाईला दिशा देण्याचा प्रयत्न करतात. भुजंग

मेश्राम,वाहरू सोनावणे,आणि प्रभु राजगडकर,उषाकिरण अत्राम ,माधव सरकुंडे,कृष्णकुमार चांदेकर यांच्या कवितेत . बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेमहात्मा गांधी , नेल्सन मंडेला यांच्याकडून गुलामगिरीविरुद्ध लढण्याचे वैचारिक बळ प्राप्त करतात.गावातील गावगाड्याने जातीपातींच्या भिंती इतक्या खोलवर पक्क्या केल्या आहेत की नव्या शतकातही जातींच्या भिंती ओलांडून सामाजिक समता अंगिकारावी ही ग्रामीण समाजाला शक्य न झालेली गोष्ट आहे. ग्रामीण कवितेतील परंपराधिष्ठित वास्तव हे वांशिक श्रेष्टता ,पुरुषप्रधानता यावर भर देणारे दिसते.

ग्रामीण कवी नारायण कुलकर्णी कवठेकर यांच्या कवितेत अपवादात्मक 'गढी कोसळावी'अशी इच्छा दिसली तरी ग्रामीण कविता कुठल्याही परिवर्तनशील विचारप्रणालीचा पुरस्कार करत नाही.१९९०च्या दशकातील ग्रामीण कवितेमधून स्त्रीविषयक जाणिवांची अभिव्यक्ती संवेदनशीलतेने घडताना दिसते.हे स्त्रीविषयक संवेदन अभिव्यक्त करताना अजय कांडर यांची भूमिका पुरोगामी दिसते.याच पुरोगामी भूमिकेतून अजय कांडर यांचा'युगानुयुगे तूच' (२०१९ ) या कवितासंग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संवाद घडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीच्या लढ्यासोबत स्त्रीस्वातंत्र्याचा जाहीरनामा लिहिला त्याविषयीचा ऋणभाव ही कविता व्यक्त करते. त्याचप्रमाणे जात-धर्म आणि वर्ग यांच्यातील द्वंद्वात्मकतेला ओलांडून गौतम बुद्धांच्या मानवतावादी जीवनवास्तवाला जाऊन भिडण्याची दृष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीने दिली, याचे भान ही कविता व्यक्त करते.

उपरोक्त मांडणीवरून हे ध्यानात येते की मराठी कवितेतील सर्वस्तरीय विषमतेचे भान आलेल्या दलित कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून वर्ण-वर्गाने प्रस्थापित केलेल्या सामाजिक,राजकीय आणि सांस्कृतिक मूल्यांसमोर समताधिष्ठित मानवतावादी दृष्टिकोनातून अनेक प्रश्न उभे केले.हे प्रश्न उपस्थित करण्याचे वैचारिक सामर्थ्य डॉ.भीमराव आंबेडकर प्रणीत प्रगमनशील ,मानवतावादी विचारांनी दिले . दलित कवितेत जातिअंताचा ध्यास हे दलित कवितेचे मुख्य सूत्र राहिले. आत्मपरीक्षण, स्वसमाजपरीक्षण आणि एकूण हिंदू समाजसंस्कृती, धर्मसंस्कृती आदींचे सूक्ष्म परीक्षण करणे या पद्धतीने आविष्कृत होणारी दलित कविता कित्येकदा वैचारिक पातळीवर निरपेक्षपणे जहाल भूमिका घेते.त्याचप्रमाणे अपवाद वगळता एकूण मराठी कविता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि दिशादिग्दर्शक विचारांचे ऋण मानते.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक सुधारणामधील योगदान

**डॉ. जयश्री बारई**
सहा. अधिव्याख्याता पुरुषोत्तम थोटे कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपूर.
jayashribarai2@gmail.com

**पार्शवभूमी :**

छत्रपती शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूरचे शाहू व चौथे शाहू नावाने प्रसिद्ध, हे एक भारतीय समाजसुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती (इ.स. १८८४-१९२२ दरम्यान) होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहूराजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात.

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील समाज सुधारक-राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२) : राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुन १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडील राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई हिने १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व ते कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज झाले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई वय १२ वर्षांहून कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. अगदी लहान वयातच ते शेतकरी, कष्टकरी अशा सामान्य माणसातच रमले. हे माणूसपण त्यानी अखेरच्या क्षणापर्यंत जपले. १८९४ मध्ये त्यांच्या राज्यारोहणाचा सोहळा झाला. कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे शाहू राजांकडे सोपविण्यात आली. कनवाळू, दिलदार, सत्यनिष्ठ, सेवाभावी, उदार आणि उमदा असा राजा जनतेला मिळाला. शाहू महाराजांचे वेगळेपण हे, की ते माणसातले राजे होते आणि राजांमध्ये माणूस होते! एका विख्यात संस्थानाचे अधिपती असूनही, एका निष्ठावान कार्यकर्त्याच्या तळमळीने, समर्पित निष्ठेने त्यांनी सामान्यांसाठी जो संघर्ष केला, त्याचे मोल अनन्यसाधारण आहे. ज्या काळात शाहू राजे होऊन गेले त्या काळातील संस्थानिक आपापली संस्थाने टिकविण्यासाठी, ब्रिटिश राज्यकर्त्यांची थुकी झेलण्यासाठी धडपडत होते. आणि आपल्या जनानखान्यात अंगवस्त्रे बाळगण्यात आणि रोल्स राईस गाड्या उडविण्यातच आपले आयुष्य सार्थकी लावीत होते. शाहूराजांनी मात्र आपल्या सत्तेचा, संपत्तीचा उपयोग सामाजिक संघर्षासाठी तर केलाच, पण सच्च्या देशभक्ताच्या निष्ठेने इंग्रज राज्यकर्त्यांशी मुत्सद्दीपणाने चाली खेळून राजकीय संघर्षासाठीही केला, याचीही नोंद इतिहासकारांनी घेणे आवश्यक आहे. 'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या

संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.

**छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक सुधारणात्मक कार्य :-**

1. इ. स.१९०१ मध्ये त्यांनी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' ची स्थापना केली. त्यांनी कोल्हापुरात निरनिराळया जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली.
2. इ. स. १९०२ मध्ये राजर्षी शाहूंनी आपल्या राज्यातील सरकारी नोकऱ्यांत मागास वर्गांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला.
3. इ. स. १९०६ मध्ये शाहू महाराजांनी 'शाहू छत्रपती स्पिनिंग आणि विव्हिंग मिल' चा पाया घातला.
4. इ. स. १९०७ मध्ये सहकारी तत्वावर एका कापड गिरणीची त्यांनी उभारणी केली.
5. इ. स. १९०७ मध्येच शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कोल्हापुरात 'मिस क्लार्क बोर्डिंग' या नावाचे वसतिगृह उघडले.
6. इ. स. १९०७ मध्ये कोल्हापूरच्या पश्चिमेला सुमारे ५५ कि.मी. अंतरावर दाजीपूरजवळ भोगावती नदीला बंधारा घालून जमिनीला पाणीपुरवठा करण्याची योजना त्यांनी आखली. ती इ. स. १९०८ मध्ये अमलात आणून त्या बंधान्याला 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव' असे नाव देण्यात आले.
7. इ.स. १९११ मध्ये शाहू महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची पुन: स्थापना झाली.
8. १९१३ मध्ये शाहूंच्या आदेशानुसार खेड्यांमध्ये चावडी, धर्मशाळा, मंदिरे व होते. या इमारतींमधून शाळा सुरू झाल्या.

9. इ. स. १९१६ मध्ये बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी निपाणी येथे डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली.
10. इ. स. १९१७ मध्ये शाहूंनी प्राथमिक शाळेतील फी माफीची घोषणा केली. २१ नोव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यानुसार कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले.
11. इ. स.१९१७ मध्येच त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळून दिली.
12. इ. स. १९१८ मध्ये शाहूनी आपल्या संस्थानातील महार वतने रद्द केली आणि जमीन अस्पृश्यांच्या नावावर रयतवारीने करून दिल्या. अस्पृश्यांकडून वेठबिगारी पद्धतीने कामे करून घेण्यास कायद्याने बंदी घातली.
13. इ.स. १९१८ मध्येच शाहूंनी आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला तसेच त्यांनी स्वतः असे काही विवाह घडवून आणले.
14. इ.स. १९१८ मध्येच शाहूंनी वतनदारांच्या जाचातून शेतकन्यांची मुक्तता करण्यासाठी खेड्यातील कुलकर्णी वतने रद्द केली आणि त्या जागी पगारी तलाठी नेमण्याची व्यवस्था केली..

**सारांश :-**

छत्रपतींचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करताना काही प्रश्न उपस्थित होतात. छत्रपती साहू महाराजांनी पुकारलेली सामाजिक समता अद्यापही पूर्णपणे प्रस्थापित झालेली नाही. आजही साठ-पासष्ठ टक्के जनता निरक्षरच राहिली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजातील सधन, प्रतिष्ठित वर्गाने अधिकाराच्या, मानाच्या जागा, नातेवाइकांसाठी नोकऱ्या मिळविल्या. त्यासाठी त्यांना फुले-शाहूंची नावे उपयोगी पडली आणि जमेल तेवढे आणि जमेल त्या प्रकारे त्यांनी पदरात पाडून घेतले, पण बहुजन समाजातील गरीब, कष्टकरी जनतेच्या स्थितीत मात्र फारसा फरक पडलेला नाही. बहुजन समाजातील सधन, प्रतिष्ठित, सरदार, जमीनदारवर्ग, आमदार-खासदार वर्गात रूपांतरित झाला आहे. मात्र गरीब, कष्टकरी शोषित वर्ग शोषणगर्भच राहिला आहे. त्याचे लोकशाहीत शोषण चालूच आहे. शाहूराजे राजेशाहीचे प्रतिनिधी होते. पण त्यांनी राजेशाहीत लोकशाहीची बीजे पेरली होती. आज लोकशाहीत राजेशाहीची बीजे पेरली जात आहेत. मतदारसंघाच्या संस्थानात हे राजे पुत्रपौत्रांसह देवदुर्लभ ऐश्वर्याचा उपभोग घेत आहे. छत्रपती शाहूंविषयी कृतज्ञता व्यक्त करताना लोकशाहींची मूल्ये रुजविण्याऱ्या या माणसातल्या राजाची आणि राजांमधल्या माणसाची विचारप्रणाली जागविण्याची म्हणूनच खरी गरज आहे.

**संदर्भ:-**

1. घुमटकार चंद्रकांत : "महाराष्ट्रातील समाज प्रबोधनाचे प्रणेते " स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.
2. https//:inmarathi.net
3. https//:www.mahasarav.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी**
श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
Email - giridharsomwanshi@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय समातावादी चळवळीचे प्रमुख प्रणेते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा सामाजिक आणि शैक्षणिक विषमतानिर्मूलनाचा वारसा पुढे चालू ठेवून सामाजिक क्रांतीचे कार्य अधिक सक्षम बनवले. शिक्षणाचे महत्त्व अधीर अधोरेखित करण्यासाठी त्यांनी शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा महत्त्वाचा संदेश भारतीय समाजाला दिला. शिक्षण हा सर्वांचा अधिकार आहे म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत तसा कायदा केला व हजारो वर्षाची शैक्षणिक मक्तेदारी मोडून काढली. शिक्षणाचा उद्देश स्वविकास आणि सामाजिक उन्नती असला पाहिजे असे त्यांचे मत होते. आपल्या देशातील शोषित आणि पददलित समाजाच्या हीन दैनीयतेला नष्ट करणारा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण होय असे त्यांना वाटत होते

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण म्हणजे पुढील अर्थपूर्ण अभिप्राय अपेक्षित होता.**

१) व्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण होय.

२) शिक्षण ही शोष मुक्तीची पायवाट आहे.

३) सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे [१]

**शैक्षणिक विचार**

शिक्षणातून स्वत्वाची ओळख होते**.** "व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण होय". अशी शिक्षणाची व्याख्या डॉ.आंबेडकरांनी केलेली आहे. शिक्षणामुळे मनुष्याला स्वत्वाची ओळख होते त्यामुळे त्याचा स्वविकास होतो. त्यातून समाज विकास होतो व त्यामुळेच देशाची उन्नती होते. शिक्षणा अभावी माणूस म्हणजे निव्वळ पशु असे त्यांचे मत होतं याही पुढे असेही म्हटले आहे की 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाचा अभावी निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो'.[२]

**शिक्षण एक शस्त्र आहे.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला शस्त्राची उपमा दिली आहे. दिनांक १३ जून १९५३ रोजी रावळी कॅम्प मुंबईच्या भाषणात ते म्हणतात. 'ज्ञान हे तलवारीसारखे आहे समजा एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे तिचा सदुपयोग व दुरुपयोग करायचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करेल किंवा एखाद्याच्या बचावही करेल ज्ञानाचे तसेच आहे'[३]. ज्ञानाने दुष्टांचा संहार करता येतो व दुष्ट पासून रक्षण ही करता येते तसेच शिक्षण व्यक्तीला आत्म स्वातंत्र्यासाठी ही वापरता येते. म्हणून डॉ.आंबेडकरांनी शिक्षणाला शस्त्र म्हटले आहे.

**विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाहीसाठी शिक्षण**

सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केली होते. समाजातील जात, धर्म, पंथ, लिंग, वंश याच्या आधारे शोषण रोखण्यासाठी शिक्षण हे प्रमुख साधन आहे असे आंबेडकरांना वाटत होते. भारतामध्ये जातीभेद टिकून राहण्यासाठी प्रमुख दोन कारणे आंबेडकर देतात एक तर सर्वांना शस्त्र वापरण्याची परवानगी नव्हती आणि दुसरी गोष्ट अज्ञान आहे.

**संघटन व संघर्षासाठी शिक्षण**

शिक्षण हा शोषण मुक्तीचा मार्ग होय असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत असे. भारतातील पददलित व स्त्रिया जे दैनीय जीवन जगत आहेत. त्यांचे दैनंदिन शोषण केले जाते यापासून मुक्त व्हायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही अशी त्यांची धारणा होती. निरक्षर जनता गाढ झोपेत असल्याचा त्यांना भास होताना दिसत असे. 'शिक्षण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे प्रबोधन, संघटन म्हणजे जनसामान्यांचे संघटन आणि संघर्ष म्हणजे सर्वसामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध पुकारावा याचे बंड होय'[४].

**समतेसाठी शिक्षण**

समाजात दिवसेंदिवस असमता दिसत असल्याबद्दल डॉ.आंबेडकरांना खंत वाटत होती. त्यांचे मतानुसार शिक्षण प्रत्येकाच्या आवाक्यात आणता आले पाहिजे. म्हणून निम्नस्तरीय वर्गासाठी शिक्षण जेवढे स्वस्त व सुलभ करता येईल तेवढे करता आले पाहिजे. तत्कालीन शासनाला त्यांनी मागासवर्गीय समाजाला आपुलकीची वागणूक देण्याचे आव्हान केले होते. याबाबत युक्तिवाद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात 'की सर्व जातीजमातींना एक समानतेच्या पातळीवर आणायचे असेल तर त्यावरील एकमेव उपाय म्हणजे समतेचे तत्व नाकारणे आणि जे त्या पातळीखाली आहेत त्यांना आपुलकीची वागणूक देणे. जे लोक सर्व गोष्टीमध्ये समतेच्या तत्त्वावर जोर देतात ते सोयीस्करपणे विसरतात की पाच आणि दहा या आकड्यांना जर दोन हा समान घटक याने गुणले तर त्यांचा गुणाकार अनुक्रमे दहा आणि वीस येतो आणि त्या दोन्ही बाबतीत तो वीस येत नाही म्हणून आंबेडकर म्हणत असत की समतेचा अर्थ म्हणजे निम्नस्तरीय वर्गांची पातळी उच्च स्तरीय वर्गांच्या पातळीपर्यंत आणणे'[५].म्हणूनच खालच्या पातळीचे लोकांना शिक्षण घेण्यासाठी विशेष सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते.

**चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा याचा सुरेख संगम होय. शिक्षणाचा परिणाम शील आणि चारित्र्य ची निर्मिती करणे असा असावा हा त्यांचा आग्रह होता. दिनांक १३ जून १९५३ रोजी रावळी कॅम्प मुंबई च्या भाषनात ते म्हणाले होते 'आपण शिकलो म्हणजे सर्वकाही झाले असे नाही मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शील सुधारले पाहिजे. शीला शिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे'[६].डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते चरित्र यामुळे ज्ञान चांगल्या अथवा वाईट कामासाठी वापरायचे की नाही हे ठरवता येते. 'मानवी सभ्यता व संस्कृती चा खरा पाया म्हणजे शिक्षण होईल त्यासाठी चारित्र्य आणि एकता याची गरज भासते'[७] सुशिक्षिताकडे चरित्र असेल तर त्याचा प्रगतीसाठी अथवा वंचित व दुर्बल घटकांसाठी हितकारक अशा ज्ञानाचा वापर करता येण्याजोगा आहे.चारित्र्य संवर्धनात प्रज्ञा,करुणा, शील आणि मैत्री या गुणांचा समावेश होतो. या पंच तत्त्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले चारित्र्य बनवली पाहिजे यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कटाक्ष असे.

**शिक्षण मूल्याधिष्ठित असावे.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण मूल्याधिष्ठित असावी बालकाच्या मनावर शिक्षणाचा प्रभाव योग्यप्रकारे झाला पाहिजे. शिक्षणने त्याग, मानवता, विनम्रता, दुसऱ्याची जाणीव, नैतिकता यासारखी मूल्य

बालमनावर रुजवली पाहिजेत यामुळे बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकेल. डॉ.आंबेडकर ना शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजेच उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावी असे वाटत होतं. जी व्यक्ती आपल्या पत्नी आपत्य या पेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करते त्या व्यक्तीला शिक्षण प्रेम म्हणावे हे सांगताना त्यांनी शिक्षणाचा शिस्त, विकास आणि समाज नियंत्रणासाठी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते 'लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता / समाज नैतिक मूल्यधिष्टीत शिक्षणाद्वारे संस्कारित असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षण - नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही, ही सर्वाधिक यशस्वी किंवा हमखास यशस्वी ठरु शकेल.'[८]

**शिक्षण हे समाज परिवर्तनाची व क्रांतीचे साधन**

सामाजिक क्रांती घडवून आणायचे असेल तर त्याची बीजे बालवयातच पेलली पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय येऊ शकणार नाही हे क्रांतीचं गतीविज्ञान त्यांना अभ्यासांती कळालं होतं. शिक्षण हे परिवर्तन त्यांच्या शैक्षणिक विचाराचा मुख्य सूत्र होतं. 'शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यायला होऊन असा त्यांचा आग्रह होता'[९].बाल वयात बालके वैचारिक संस्कार आणि प्रवाह प्रवर्तित झाली तर ते मोठेपणी खरी सामाजिक क्रांती व सामाजिक परिवर्तन घडवून आणू शकतात. असे केल्याने शिक्षणामुळे नवसमाज निर्माण होऊ शकेल यावर डॉक्टर आंबेडकरांचा गाढ विश्वास होता.

**प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व सक्ती**

प्राथमिक शिक्षण सर्वसामान्य जनतेला मिळावे यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व सक्ती करावे यावर अधिक जोर दिला होता. इ. स. १९२७मध्ये प्राथमिक शिक्षणाची प्रगती फारच मंद होती अशी खंत डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केली होती. ते म्हणाले होते की ज्या रीतीने शिक्षणाची प्रगती होत होती त्याच त्याच वेगाने जर ती चालू राहिली तर शिक्षणाच्या कक्षेत आणण्यासाठी शाळेत जाणाऱ्या मुलांना चाळीस वर्षे व मुलींना तीनशे वर्षे लागतील ते म्हणाले की शिक्षणावर प्रत्येक व्यक्ती मागे फक्त चौदा आणे खर्च केले जात होते. शिक्षणावरील कमी खर्च आणि शिक्षणाच्या प्रक्रियेतील गळतीचे प्रमाण यामध्ये सरळ दुवा होता. यावर त्यांनी प्राथमिक शिक्षणावरील अधिक खर्चासह, सक्ती हा उपाय सुचवला.

**स्त्री शिक्षणावर जोर**

स्त्री शिक्षणावर विशेष जोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. शिक्षणाची संधी प्रत्येकान साधावी असा सल्ला त्यांनी आपल्या सर्व कार्यकर्त्यांना दिला संधीचा सदुपयोग करणे हे वचन त्यांच्या जीवन शिक्षणाचे मुख्य सूत्र होतं. डॉ. आंबेडकरांनी देव दैव आणि धर्मभोळेपणा नशीब या प्रवृत्तीविरुद्ध घणाघाती हल्ला केला. ते म्हणाले 'आई बाप मुलांना जन्म देतात कर्म देत नाहीत हे म्हणणे ठीक नाही आईबाप मुलांच्या आयुष्यात वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या हि शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल.'[१०] दिनांक १३ जुलै १९४१ रोजी मुंबई येथील कावसजी जहांगीर हॉलमध्ये मुन्सिपल कामगार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभेत ही डॉ.आंबेडकरांनी आपल्या भाषणात म्हणतात 'तुम्ही तुमच्या मुलांना व मुलींना शिक्षण देऊन तुम्ही जे काम करतात त्या कामात त्यांना पडू न देण्याची खबरदारी घ्या'.[११] दिनांक २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडीया डिप्रेस्ड क्लासेस वेईमेन्स कान्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले 'स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो'.[१२]

**निष्कर्ष :**

१) शिक्षण म्हणजे जाणीव देते ते, शिक्षण म्हणजे शोषण मुक्तीचा मार्ग, शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक विचारांची मुख्य सूत्र होते.

२) डॉ. आंबेडकरांना जीवनदायी, मानवतावादी, समाजहितकारी, शील आणि प्रज्ञा यांचा सुवर्ण संगम साधणारे शिक्षण अभिप्रेत होते.

३) समतेसाठी शिक्षण आणि शिक्षणामध्ये विशेष सवलती दिल्या पाहिजेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते

४) शिक्षणातून चारित्र्य संवर्धन व मूल्याधिष्ठित शिक्षणावर ती त्यांनी विशेष जोर दिला होता.

५) प्राथमिक शिक्षणनाचे सार्वत्रीकरण व सक्ती यावर भर देऊन शिक्षणावरील खर्च वाढविण्याची तरतूद त्यांनी केली होती

६) शिक्षणातील समान संधी व स्त्री शिक्षणावर विशेष जोर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. अहेर, डॉ. हिरा, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर १९९५ पृ.१८६
2. घोरमाडे, डॉ. के. यु. घोरमाडे, डॉ.कला कृष्णा, शैक्षणिक विचारवंत भारतीय आणि पाश्चिमात्य, विद्या प्रकाशन, नागपूर २००५ पृ.४२
3. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर(संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,१९९३ पृ.४२५
4. घोरमाडे, डॉ. के. यु. घोरमाडे, डॉ.कला कृष्णा, उपरोक्त पृ.४२
5. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर((संपा, उपरोक्त पृ.४१४
6. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर((संपा, उपरोक्त पृ.४२.४
7. घोरमाडे, डॉ. के. यु. घोरमाडे, डॉ.कला कृष्णा, उपरोक्त पृ.४४
8. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर(संपा), उपरोक्त पृ.४२४
9. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर(संपा), उपरोक्त पृ. ४२३
10. मेश्राम केशव, कल्याणकर बा.ह. आणि इतर(संपा), उपरोक्त पृ.४२१
11. मनु वसंत, नरके हरी आणि इतर(संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग २, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र -साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, २००२ पृ.३७७
12. मनु वसंत, नरके हरी आणि इतर(संपा), उपरोक्त पृ. .४२६

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# ”महात्मा फुले यांचे विचार आणि भटक्या विमुक्त जाती — जमातीतील स्त्रिया“

**प्रा.सचिन बबन साळवे[१] सौ.शेख शबाना.एम[२]**
[१]सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग,एस.जी. के. कॉलेज पुणे.
[२]ग्रंथपाल, एस.जी. के.कॉलेज पुणे.

**प्रस्तावना—**

भारतात जवळपास निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. सिंधू संस्कृतीत स्त्रियांना महत्त्वाचे स्थान होते, हे तेथे उत्खननात मिळालेल्या आदीमातांच्या मूर्तीवरून दिसून येते. वैदिक हिंदू संस्कृतीत स्त्रियांचा दर्जा खालावत गेला. त्यांच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष झाले. स्त्रियांना शूद्र वर्णात ढकलण्यात आले. ”भट दृ ब्राम्हणांनी आपल्या ब्राह्मण स्त्रियांचाही खूप छळ केला. आज भारतात जवळपास ४५ कोटी स्त्रिया आहेत. त्यापैकी दहा कोटी मुली शाळा—कॉलेजात शिकू शकतात. परंतु आजही ८० टक्के मुली शिक्षणापासून वंचित आहेत. उच्च समाजातील महिला शिकलेल्या आहेत.“(घ) परंतु ब्राह्मणेतर बहुजन समाजातील व भटक्या विमुक्त जाती जमातीतील ९८ टक्के महिला अशिक्षित आहे. बहुसंख्य ब्राह्मणेतर महिला हलाखीचे जीवन जगत आहे असे प्रा. मा. म देशमुख हे आपल्या ”महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन“ या ग्रंथात सांगतात. यामध्ये गावगाड्यच्या परिघा बाहेरील भटक्या विमुक्त जाती जमातीतील महिलांची परिस्थिती तर यापेक्षा भयानक आहे हे आपल्याला स्वातंर्त्योत्तर भारतात आजही पाहायला मिळते. महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले हे स्त्री स्वातंर्त्याचे खंदे पुरस्कर्ते होते. पुरुषप्रधान समाजात स्त्रीला नेहमी दुय्यम स्वरूपाचे स्थान मिळाले. त्याच्या विरोधी महात्मा फुले यांनी आवाज उठवला. स्त्री शिक्षणासाठी मुलींच्या शाळा काढल्या या त्यांच्या क्रांतिकारी कार्यास त्यांच्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मोलाचे योगदान दिले. महात्मा फुले यांचे कार्य आणि स्त्री विषयक विचारांचा प्रभाव आजच्या गावगाड्य बाहेरील भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रियांची गुलामीतून मुक्तीसाठी वरदान ठरले गेले. महात्मा फुले यांचे विचार आणि भटक्या जमातीतील स्त्री जीवन याचे अवलोकन आपण करणार आहोत.

**उद्दिष्टे—**

१) महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक विचारांचे अवलोकन करणे.
२) महात्मा फुले यांच्या विचारांचा भटक्या—विमुक्त महिलांच्या दृष्टीने अभ्यास करणे.
३) भटक्या विमुक्त जातीतील महिलांचे प्रश्न व महात्मा फुले यांचे विचार आणि कार्याचा त्यांच्यावरील प्रभाव अभ्यासणे.
४) महात्मा फुले यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून भटक्या विमुक्त जातीतील महिलांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जे विचार सांगितले ते अभ्यासणे.

**संशोधन पद्धती—**

या संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक , वर्णनात्मक , विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा तसेच प्रकाशित पुस्तके , वृत्तपत्रे , संदर्भ ग्रंथ महात्मा फुले यांचे साहित्य याचा उपयोग करण्यात आला आहे.

**गृहितके—**

१) महात्मा फुले हे एक समाजसुधारक आणि विचारवंत होते.
२) महात्मा फुले यांनी सर्वप्रथम स्त्री मुक्तीसाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग भारतातील स्त्रियांना खुला केला.
३) भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रियांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव आपल्याला पहायला मिळतो.
४) भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रियांना खर्‍या अर्थाने त्यांचे हक्क मिळून देण्यास महात्मा यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले—**

दि. घघ एप्रिल घ*ह्मक्त रोजी पुणे येथे महात्मा फुले यांचा जन्म झाला.या वेळी पेशवाई संपली होती. इंग्रज राजवटीची स्थापना झाली होती. तरी देखील सामाजिक परिस्थितीत बदल झाला नव्हता. समाजात आणि शासनात सुद्धा ब्राह्मणांचे वर्चस्व कायम होते. ब्राम्हणी जुलूम आणि अन्याय अत्याचाराला विरोध करण्याची संधी मात्र इंग्रज राजवटीत मिळाली होती. म्हणून ” इंग्रज आहेत तोपर्यंत ब्राह्मणेतरांनी भट ब्राह्मणांच्या दश्यातून मुक्त व्हावे“ (ह्म) असे महात्मा फुले सांगतात. यावरून स्पष्ट होते की, इंग्रज राजवटीत ब्राह्मण फक्त इंग्रजांचे गुलाम होते. परंतु ब्राह्मणेतर बहुजन समाज व भटक्या जमाती हा इंग्रज आणि ब्राह्मण त्या दोघांचाही गुलाम होता. या काळात खरेतर बहुजन ब्राह्मणेतर आणि ब्राह्मण स्त्रियांची ही स्थिती चांगली नव्हती. महात्मा ज्योतिराव फुले स्त्री स्वातंर्त्याचे खंदे पुरस्कर्ते होते. स्त्री व पुरुष हे प्रथमतरू मानव आहे. लिंगभेद मुळे त्यांच्यात जरी फरक असला तरी अन्य बाबतीत ते निसर्गतः समान आहेत. पुरुष प्रधान समाजात

स्त्रीला नेहमी दुय्यम स्वरूपाचे स्थान मिळाले. या विरोधी महात्मा फुले यांनी आवाज उठवला. " स्त्री शिक्षणासाठी मुलींच्या शाळा काढल्या , विधवा विवाहास प्रोत्साहन दिले ,बालविवाह , बालजरठविवाह , बहुपत्नीकत्व, केशवपण ,नियोग , वेशागमन यावर कठोर प्रहार केले ' (f)' स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात ते उभे राहिले. स्त्रियांना सर्व प्रकारच्या संधी पुरुषांच्या बरोबरीने मिळाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. पुरुषाला एका बाजूला अनेक सवलती देत असताना स्त्रियांना मात्र अनेक बंधनांनी जखडून टाकलेले होते. त्यांच्या स्त्रीमुक्ती विषयक विचार व कार्य यांचा आढावा आपल्याला त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये पाहायला मिळतो. महात्मा फुले यांचे साहित्य म्हणजे स्त्रीमुक्ती तिचा हक्क आणि स्वातंर्त्याचा एक खूप मोठे तत्त्वज्ञानच होय.

**महात्मा फुले यांचे साहित्य व भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्री जीवन—**

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणा बाबत मांडलेली भूमिका अत्यंत चांगली होती. कारण सत्य व असत्य यामधील फरक समजण्यासाठी शिक्षणाची फार मोठी गरज असते. त्या दृष्टीने स्त्री शिक्षणाचा विचार व्हावा लागतो. स्त्री शिक्षणाने कुटुंब ही शिक्षित होते. " त्यादृष्टीने विचार करता आजच्या समाजात चार पैकी तीन स्त्रिया निरक्षर आहेत, ही शोभादायक बाब नाही.' (†) ग्रामीण भागात तर हे प्रमाण आणखीनच वाईट आहे असे मत डॉ.भालबा विभुते आपल्याला महात्मा फुले विचारधन या ग्रंथात व्यक्त करतात. आज स्वतंर्त्योत्तर भारतातही भटके विमुक्त जाती जमातीतील महिला शिक्षणापासून वंचित आहेत. अजूनही या समाजातील महिलांच्या शोषणाचे मुख्य घटक म्हणजे निरक्षरता आहे असे आपल्याला प्रथमदर्शनी पाहायला मिळते.

स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांना फसवता येणार नाही, त्यांच्यावरील अन्याय कमी होतील अशी महात्मा फुले यांची धारणा होती. बऱ्याच वेळा स्त्रियांनीच अन्यायास, जुलमास निमंत्रण दिलेले असते. त्यांना शिक्षणाच्या अभावामुळे हक्क समजले नाहीत आणि अशा प्रकारे मानवी हक्काबद्दल जागरूकतेचा अभाव आपल्याला या भटक्या जमातीच्या स्त्रियांमध्ये पाहायला मिळतो. दुसरे म्हणजे भटक्या जमातीतील महिलांचे शोषण खऱ्या अर्थाने कुटुंबातूनच सुरू होते कारण पितृसत्ताक कुटुंब पद्धती, देवभोळेपणा, कर्मकांड आणि हिंदू धर्मातील चुकीच्या पद्धती, सामाजिक दबाव, निरक्षरता ,आर्थिक दुर्बलता ही भटक्या—विमुक्तांची महिलांचे शोषणाचे मूळ कारण आहेत. त्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन आणि शोषणाची सुरुवात खऱ्या अर्थाने कुटुंबातूनच सुरु होते. अधिकाराची जाणीव होऊ नये व हसवा फसवी करता यावी यासाठी स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले गेले. त्या शिकल्या तर त्यांना कोणीही फसवू शकणार नाही असे म्हटले जाते. " निरक्षता, दारींर्द्य, आणि अंधश्रद्धा हे स्त्रियांचे प्रमुख शत्रू आहेत. म्हणून ज्योतीबांनी स्त्री शिक्षणाला अग्रस्थान दिले. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित बनते असे ते म्हणत "जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती असावी सुशिक्षित आणि सुविचारी " (ह्न) हा विचार कोणीही नाकारू शकत नाही. परिवर्तन विरोधक मंडळींना मात्र हे मान्य नाही कारण, स्त्रिया शिकल्या तर काय होईल हे सांगताना महात्मा फुले म्हणतात—

" आर्य ग्रंथकारांच्या पुस्तकातील कृत्रिम लबाड्य भट— ब्राह्मणांचे लेकी दृ बाळींच्या लक्षात आल्याबरोबर, त्या एकंदर सर्व देवळातील पुरानीकांची फटफजिती करून त्यांची रेवडी रेवडी करून टाकतील "(ˆ) जर स्त्रीला शिक्षण मिळाले तर ती आपल्या हक्कांविषयी जागृत होईल. भटक्या जमातीच्या महिलांच्या बाबतीत आपल्याला महात्मा फुले यांचे शब्द आजच्या घडीला लागू पडतात हे दिसून येते. महात्मा फुले यांनी मांडलेल्या शिक्षण विषयक सिद्धांत चांगला आहे. तथापि शिक्षणाची भूमिका मन परिवर्तनाची व समाज परिवर्तनाची आहे. याची जाणीव निर्माण होऊ शकली नाही. ती जर निर्माण झाली तर बदल आवश्यक घडतील. याच दृष्टीने स्त्री शिक्षणाकडे पहावयास हवे. यासाठी स्त्री व पुरुष दोघांचीही शिक्षणाची गरज आहे. तरच भटक्या—विमुक्त जाती जमातीत मधील स्त्री स्वातंर्त्याचा प्रश्न सुटू शकेल.

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेलेय
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."(क्त)

वरील काव्यपंक्तीत महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे. प्रत्येक स्त्रीला उच्चशिक्षण दिले असते तर आज भटक्या जमातीतील महिला डॉक्टर, इंजिनीयर ,शास्त्रज्ञ, म्हणून महत्त्वाच्या पदावर कार्यरत असत्या. प्रत्येक कुटुंब सुशिक्षित आणि सुस्थितीत आढळले असते. आजही या जमातीमधील महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवले गेले आहे.

"स्त्री आणि पुरुष एक सारखे एकंदर सर्व मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास पात्र असतात स्त्रियांना एक तऱ्हेचा नियम लागू करणे व लोभी धाडसी पुरुषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय"(*) असे महात्मा फुले यांचे मत होते. यामुळेच स्त्रियांच्या प्रश्नाकडे महात्मा फुले यांनी पहिल्या पासून लक्ष दिल्याचे दिसून येते. एकूण परिस्थिती पाहता समाजात पुरुषाला नेहमी श्रेष्ठ स्थान मिळाले आहे व स्त्रीला कनिष्ठ लेखले गेले आहे. " स्त्रीला मनुस्मृतीने स्वातंर्त्य नाकारले. लहानपणी वडिलांच्या छत्राखाली, लग्न झाल्यावर नवऱ्याच्या आज्ञेत, नवरा मेल्यावर मुलांच्या आज्ञेत, स्त्रीने जगले पाहिजे. स्वतंत्र कधीही नसते. असे

मनुस्मृति सांगते. कांडा, रांधा, वाढ हीच स्त्रीची भूमिका पहाण्यास मिळते. पुरुषी वर्चस्वाखाली तिने आपले जीवन व्यतीत करणे एवढेच तिचं कर्तव्य मानले गेले आहे".(४) एका बाजूला " नारीने जनम दिया पुरुषोको " म्हणायचे म्हणजेच स्त्री श्रेष्ठ म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला तिची मुस्कटदाबी करायची ही परंपरा आजही सुरू आहे. एक उपभोगाची वस्तू एवढीच तिची किंमत मानली जाते. अशाप्रकारे मानवप्राण्यात स्त्री श्रेष्ठ असूनही ती कनिष्ठच राहिली, तिला दुय्यम दर्जा मिळाला. कारण " स्त्रियांची जात अबला असल्यामुळे लोभी पुरुषांनी त्यास मानवी हक्क समजून देऊ नये या इराद्याने त्यास विद्या शिकविण्यास प्रतिबंध केला" (घ॰) महात्मा फुले यांचे उपरोक्त कथन भटक्या जमातीतील स्त्रियांना लागू होते. आजही भटक्या जमातीमधील स्त्रिया चूल आणि मूल या पूर्तृयाच मर्यादित राहिले आहेत. कुटुंबात त्यांना जन्मापासून ते मृत्यूपर्यंत पुरुषांच्या बंधनात राहावे लागत आहे. पुरुषापेक्षा स्त्री कशी श्रेष्ठ आहे हे सांगताना महात्मा फुले आपल्या "सत्सार दोन" मध्ये म्हणतात दृ " सारासार विचार करून पाहिल्याबरोबर स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहशी,क्रूर, व नित्य नवीन जास्ती भयंकर धाडसी दृष्ट कर्मे अचरणारे आहेत . ' लग्नाची पहिली बायको आवडीनाशि झाली की, दुसरी तिसरी चौथी करून पुरुष वर्ग मजा मारतो '. हे सांगितल्यावर महात्मा फुले म्हणतात. " परंतु स्त्रीचे लग्न होताच तिचा नवरा दुर्वर्तनी  नीपजल्यास देखील तिने याचे उरावर दुसरा नवरा करून त्याच घरात रात्र दिवस संसार प्रपंच करून रहावे,, म्हणून आर्य पुरुषांनी केलेल्या ग्रंथात कोठे लेख सापडत नाहीत".(घघ) उपरोक्त महात्मा फुले यांच्या कथनात आपल्याला महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार खूप महत्त्वपूर्ण दिसून येतात. परंतु आज सद्यकालीन परिस्थिती मध्ये भटक्या जमाती मधील महिलांना असा विचार करणे सुद्धा चुकीचे वाटते. कारण भटक्या जमाती हिंदू धर्माशी निगडित आहेत त्यानुसार जीवन जगतात. हिंदू धर्म आणि आर्यांनी लिहिलेल्या धर्मग्रंथांचा प्रभाव आपल्याला त्यांच्यावर पाहायला मिळतो. पुढे जाऊन ' शेतकयाचा आसूड ' या आपल्या ग्रंथात महात्मा फुले ब्राह्मणेतर बहुजन समाजातील बाल विवाह आणि बहुपत्नीत्व यावर सुद्धा आपला आसूड हाणताना लिहितात की "त्यांनी एक मागे एक दोन तीन चार पटाच्या बायका कराव्यात, या जुलमी न्यायला म्हणावे तरी काय?? माझ्या मते त्याने पाचवी पटाची बायको करावी, म्हणजे त्याच्या म्हढ्यापुढे गाडगे धरण्याच्या पेचातून त्याची मुले मुक्त होतील".(घह्य) भटक्या विमुक्त जमाती मध्ये बाल विवाह आणि बहुपत्नीत्व प्रामुख्याने आढळून येते. अशा वाईट प्रथा मुळे या समाजातील महिलांचे जीवन अतिशय शोषणिय आणि हलाखीच्या स्थितीमध्ये पहायला मिळते. या सर्व गोष्टीवर आज पर्यंत अंकुश नाही लावला गेला. आजही आपल्याला हुंडाबळी, विधवांचे प्रश्न, वयोवृद्ध महिलांचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांना भटक्या विमुक्तांच्या महिलांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व गोष्टींन मधून मुक्तीसाठी महात्मा फुले यांचे साहित्य व विचार महत्त्वपूर्ण ठरतात.

अंधश्रद्धा मुळे भारतातील बहुजन समाजाची जेवढी हानी झाली तेवढी इतर कोणत्याही गोष्टीमुळे झाली नाही. या अंधश्रद्धा वरही महात्मा फुले यांनी फार मोठा प्रहार केला. सत्य धर्म आणि भोंदू धर्म यातील फरक ही समजावून घेतला पाहिजे. हा फरक सामान्य जनास कळवा त्यांचे शोषण होऊ नये यासाठी महात्मा फुले यांनी " सत्यशोधक समाजाची" स्थापना केली. सत्यशोधक समाजाची स्थापना का केली याबाबत त्यांनी मार्मिकपणे लिहिले आहे ते असे म्हणतात— " ब्राम्हण, भट, जोशी, उपाध्याय इत्यादी लोकांच्या दश्यात्वतून शूद्र लोकांना मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत यास्तव सदुपदेश व विद्या द्वारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजावून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहार संबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यास मुक्त करण्याकरता काही सुज्ञ मंडळींनी हा समाज सत्यशोधक समाज २४ सप्टेंबर १८७३ इसवी रोजी स्थापन केला."(घर्) सत्यशोधक समाज मानवतावादाचा पाया घेऊन जन्माला आला आहे त्यामधील महत्वाची मुद्दे'

१. निर्मिक एकच आहे
२. निर्मिकाला मध्यस्थाची गरज नाही.
३. स्त्री व पुरुष निर्मिकास तेवढीच महत्त्वाची आहेत.
४. निर्मिकला जातिभेद मान्य नसून तो गुणांची कदर करतो.

भटक्या जमाती खूप मोठ्य प्रमाणात धार्मिक कर्मकांड याने ग्रासलेल्या आहेत. या जमातीत महिलांचे शोषणाचे आणि विकासामधील सर्वात मोठा अडथळा म्हणजे धार्मिक कर्मकांड आहे. या जमातीमधील महिलांनी सत्यधर्म आणि भोंदू धर्म यातील फरकही समजून घेतला पाहिजे. सत्यशोधक धर्माचा स्वीकार करून धर्माच्या नावाखाली होणारे आपले शोषण यापासून संरक्षण केले पाहिजे असे महात्मा फुले म्हणतात.

महात्मा फुले यांनी केवळ ब्राह्मण—ब्राह्मणेतर विषमतेवर प्रहार केला नाही तर स्त्री—पुरुष यांच्यातील विषमतेच्या ही जाणीव त्यांना होती. स्त्री ही मानवाची जन्मदात्री आहे. महात्मा फुले सांगतात की, ' एका पत्नीचा अपवाद सोडला तर सर्व स्त्रिया पुरुषांच्या माता, भगिनी, मुली आहेत. ब्राह्मणी धर्माने संपूर्ण स्त्री समाजच शुद्र वर्णात ढकलला आहे. विद्या बंदी, बालविवाह, विधवा विवाह बंदी, विधवा केशवपन, वारसा हक्क नाही, पडदा पद्धत, तोंडावर पदर, परपुरुष संभाषण बंदी, पादत्राणे बंदी, बांगड्य, मंगळसूत्र, कुंकू अशा अनेक दास्य शृंखला मध्ये स्त्री ही अडकलेली होती हे सांगितले. " बाल विवाह मुळे बाल विधवा जास्त ब्राह्मणांमध्ये पुनर्विवाह बंदी म्हणून विधवांनी केशवपन करावे. परंतु केशव पण केले तरी तारुण्यसुलभ काम

त्रस्त करणारच. ' डोकं बोंडल परंतु काही नाही सोडलं ' असे प्रसंग वारंवार येऊ लागले. गर्भपात, बाल हत्या, आत्महत्या होऊ लागल्या. अशा महिलांसाठी ज्योतीबांनी १८६३ मध्ये ' बाल हत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. विधवा विवाहाची चळवळ सुरू केली. स्त्रियांसाठी शाळा काढल्या. स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. पुरुष शिकला तर एकटाच शिक्षित होतो , परंतु स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. ती गृहशोभा आहे. अशी शिकवण दिली." (घ†) महात्मा फुले यांनी विपुल आणि विविध प्रकारची ग्रंथ निर्मिती केली— श्तृतीय रत्न नाटक', श शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा' , 'ब्राह्मणांचे कसब', श्गुलामगिरी', श्हंटर शिक्षण आयोगाला सादर केलेले निवेदन' ' शेतकऱ्यांचा आसूड', 'सत्सार भाग १ व २,' इशारा', श्सत्यशोधक समजोकात मंगलाष्टका सह सर्व पूजा विधि', श्सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक', महात्मा फुले यांच्या या ग्रंथ संपदेत सामजिक, अर्थिक, धार्मिक, राजकिय, शैक्षणिक आणि संस्कृती या समाजाच्या प्रमुख अंगांचा सखोल विचार केला आहे. स्त्रीमुक्तीसाठी आणि स्त्रियांच्या शोषनिय जीवनाबद्दल आपल्या साहित्यामध्ये विपुल लेखन केले आहे. त्यांनी भारतीय स्त्रियांना या आपल्या ग्रंथाच्या माध्यमातून परिवर्तनाची दिशा दाखवली आहे. महात्मा फुले यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून भटक्या विमुक्त जाती—जमातीच्या महिलांच्या शोषणाबद्दल आवाज उठवला. त्यांच्या शोषणाची कारणे विशद केली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आणि सत्यधर्माचा अवलंबन करून या सामाजिक गुलामीतून मुक्त होण्याचे आव्हान केले आहे.

**निष्कर्ष—**

महात्मा फुले यांचे स्त्रीमुक्तीसाठी मोलाचे योगदान आहे. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून श्री शोषणाचे, अत्याचाराची, गुलामी ची कारणे आणि या गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी मार्ग सांगितला आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा भटक्या विमुक्त जाती जमातीतील महिलांवर चांगला प्रभाव पडला आहे. स्वातंर्त्योत्तर काळात कुठे तरी महात्मा फुले यांच्या विचारावर आणि कार्यामुळे या जमातीतील महिला समाजाच्या मुख्य प्रवाहात येताना दिसत आहेत. निश्चितपणे महात्मा फुले यांचे विचार या जमातीमधील महिलांना मार्गदर्शक म्हणून महत्वपूर्ण आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुकरण भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रियांनी करणे जसे महत्त्वपूर्ण आहे तसेच पुरुषांनीही अनुकरण करून आपल्या समाजाचा विकास घडून आणणे महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ ग्रंथ—**

1. प्रा.मा. म. देशमुख,श्महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन', शिवभरती प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती मे १९९७, पृ. क्र.२४.
2. कित्ता,श्महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन', पृ. क्र.२१
3. डॉ.भालबा विभुते,श्महात्मा फुले विचारधन', नूतन विभुते, निगुडकर प्रिंटर, सदाशिव पेठ पुणे, प्रथामावृत्ती १९९१, पृ. क्र.५९
4. कित्ता,श्महात्मा फुले विचारधन', पृ. क्र.६१
5. कित्ता,' महात्मा फुले यांचे समाजप्रबोधन ' पृ. क्र. ४०.
6. किर धनंजय,श्महात्मा फुले समग्र वांग्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, द्वितीय आवृत्ती १९८०, पृ. क्र.२९६
7. कित्ता,श्महात्मा फुले समग्र वांग्मय', पृ. क्र.१८९.
8. किर, मालशे,श्महात्मा फुले समग्र वांग्मय' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, द्वितीय आवृत्ती १९८० , पृष्ठ क्र.३६३.
9. कित्ता,श्महात्मा फुले विचार धन', पृ. क्र.१०
10. कित्ता,श्महात्मा फुले समग्र वांग्मय', पृ. क्र.३५९.
11. कत्ता, महात्मा फुले समग्र वांग्मय" पृष्ठ. क्र.२९९.
12. कित्ता,श्महात्मा फुले समग्र वाडमय', पृ. क्र.३५२.
13. सरदार ग.बा., महात्मा फुले व्यक्तिमत्व आणि विचार', ग्रंथाली, मुंबई,१९८१, पृ. क्र.६७
14. कित्ता,श्महात्मा फुले यांचे समाज प्रबोधन', पृ. क्र.६१.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

**डॉ. प्रभाकर रघुनाथ जगताप**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे
ई-मेल prabhat044@gmail.com

**गोषवारा**

भारतात सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक विषमता, संपुष्टात आणायची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. भारतात शिक्षण घेणाचा अधिकार विशिष्ठ वर्गापर्यंत मर्यादित होता इतरांना तो अधिकार नव्हता. तो अधिकार इतरांना प्राप्त व्हावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाबाबत विचार मांडत नाही तर प्रत्यक्ष महाविद्यालयांची सुरुवात करून शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याचे काम करतात. वंचित समाजाला अन्न, वस्त्र, निवारा आणि उच्च शिक्षण देऊन चालणार नाही तर वंचित समाजातील न्यूनगंड नाहीसा करायचा असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही असा उद्देश डोळयाससमोर ठेऊन तळपातळीतील समाजामध्ये मोठा बदल घडवण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात.

**उद्देश :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन अभ्यासणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, दलितांचा सर्वच क्षेत्रात विकास करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. तसेच प्रत्येक घटकांपर्यंत शिक्षण कशा पद्धतीने जाईल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शिक्षणातून होणारा विकास याकडे त्यांनी डोळसपणे पाहिले होते. 'ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया होय. आणि बुद्धीचा विकास करायचा असेल तर कोणत्याही परिस्थितीत आपण शिक्षण मिळविले पाहिजे व ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे.

विकास करणे हा प्रत्यकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळेच तो विकास साधता येतो. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही त्यांना होती. "पालक मुलाच्या जन्माचे साथी आहेत कर्माचे नाही" "व्यक्तीला जाणीव करुन देते ते म्हणजे शिक्षण" "शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करुन आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे' अशा विचारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाविषयी गोरगरिबांना तळमळीने विनंती करतात."डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव हे रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे आहे. त्यांचे वडिल लष्करात असताना त्यांचा जन्म हा महू येथे झाला. त्यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतील एलफिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये झाले. पदवी नंतर त्यांना बडोदे संस्थानांची शिष्यवृत्ती मिळाली व ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया येथे गेले होते. मुंबईत सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी केली. काही काळानंतर राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी लंडन विद्यापीठाची डी.एससी. ही पदवी संपादून ते बॅरिस्टर झाले" आज जे यश बाबासाहेबांनी संपादन केले ते त्यांच्या शिक्षणाच्या जोरावच केले. म्हणूनच सर्वांनी शिक्षण घेतलेच पाहिजे. "शिका आणि संघटित व्हा" असा मूलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील वंचित घटकांना दिला होता. समाजाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उन्नती करायची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. विद्या म्हणजे एक प्रकारची तलवार आहे. या तलवारीने दुष्टांचा संहारही करता येतो आणि स्वतःचे संरक्षण ही करता येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाज परिवर्तनाचा विचार हा शिक्षणापासून सुरू होतो. प्रतिकूल परिस्थिती असली तरीही शिक्षण सर्वांनी ग्रहण केले पाहिजे असे ते म्हणत. भारतीय समाजातील जातीव्यवस्था आणि विषमता दूर करायची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणूनच उच्च शिक्षण घेऊन स्वतःची उन्नती केली पाहिजे त्याचबरोबर समाजाचीही उन्नती केली पाहिजे. वंचित समाजाला अन्न, वस्त्र, निवारा आणि उच्च शिक्षण देऊन चालणार नाही तर वंचित समाजातील न्यूनगंड नाहीसा करण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच शासनाने शैक्षणिक कार्य वाढवले पाहिजे. यात विशेषतः मागासलेल्या वर्गात प्रथम सवलत देऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजात केवळ ब्राह्मण समाजास शिक्षणाची परंपरा आहे. ती परंपरा मोडीत काढून तळपातळीपर्यंत शिक्षण आणणे आवश्यक आहे. वंचित घटकात प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हा महत्त्वाचा आहे. वंचित घटकांची शिक्षणाची परंपरा आणि शिक्षणाचे महत्त्व नसल्याने तो समाज मुलांना शाळेत पाठवत नाही. या घटकास शिक्षण सक्तीचे आणि मोफत दिले पाहिजे. म्हणूनच प्राथमिक शिक्षणावर शासनाचा ताबा असला पाहिजे. शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा असावा म्हणून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याची आवश्यकता आहे. तसेच शिक्षणाच्या माध्यमातून

समाजाचे सर्वांगीण परिवर्तन होऊ शकते आणि यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1945 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्याचबरोबर 1946 ला मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज आणि 1950 मध्ये औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास वेळी संवाद साधताना म्हटले होते की, मी हिंदू समाजाच्या तळपातळीतून म्हणजे खालच्या थरातून आल्यामुळे मला शिक्षणाचे महत्त्व कसे आणि किती आहे हे मी जाणतो. असे म्हटले जाते की समाजाची उन्नती साधायची असल्यास प्रश्न आर्थिक असल्याचे मानले जाते. परंतु माझ्या मते भारतातील समाजाची उन्नती करायची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था आणि कायदे करणाऱ्या संस्थांमध्ये मागासवर्गीयांना स्थान मिळणे आवश्यक आहे. कारण समाजातील बहुतांश घटक मागे रहाण्याचे कारण म्हणजे उच्चवर्गातील लोकांनी मागासवर्गीयाप्रति चांगुलपणा दाखवलेला नाही. म्हणून हा वर्ग पाठीमागे राहिला. म्हणूनच विद्यापीठाच्या प्रतिनिधीसभेत स्थान मिळणे आवश्यक आहे.

शिक्षणाच्या बाबतीत हैदराबाद संस्थान मागासलेले आहे. या संस्थानाचे क्षेत्रफळ 84 हजार चौरस मैल आहे तर लोकसंख्या 1 कोटी 60 लक्ष आहे. मार्च 1949 मध्ये या संस्थांनात 17 महाविद्यालये होती. तर या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 7 हजार 615 होती. म्हणजे या आकडेवारीनुसार मुंबई राज्यांमधील शिक्षणाची तुलना करता येते. मुंबई राज्याचा विस्तार हा 1 लक्ष 15 हजार 570 चौ. मैल आहे आणि लोकसंख्या 3.23 कोटी आहे. तर 31 मार्च 1950 मध्ये महाविद्यालयांची संख्या 90 होती. तर महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 50 हजार 356 होती. या आकडेवारीच्या माध्यमातून बाबासाहेबांना हे सांगायचे होते की, हैदराबाद संस्थान शिक्षणाच्या बाबतीत किती मागे आहे. या संस्थानात त्यावेळी सर्वात जास्त महाविद्यालये हे हैदराबाद या शहरात होती. परंतु इतर शहरात ती नव्हती. म्हणून बाबासाहेबांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून शैक्षणिक कार्यास चालना दिले. या महाविद्यालयात फक्त मुलांना शिक्षण दिले जाणार नाही तर मुलींनाही शिक्षण दिले जातील. तसेच या महाविद्यालयातील प्राध्यापक हे सर्व धर्माचे आणि जातीचे होते. हे सर्व प्राध्यापक महाविद्यालयाचा उद्देश सफल करतील असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होता. तसेच महाविद्यालयाचा उद्देश फक्त विद्यार्थ्यांनाच शिक्षण देणे हा नव्हता तर सर्वसामान्य जनतेसही शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. जसे की, "अन्नधान्य आणि जनता" हा युनोस्कोने सुचविलेल्या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वसामान्य जनतेस प्रबोधन करण्याचे कार्य या महाविद्यालयाच्या माध्यमातून होते. याच माध्यमातून मराठवाड्याच्या शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्वपूर्ण कामगिरी केली. तेव्हाचे हैद्राबाद संस्थांनात शैक्षणिक सवलतीची असमाधानकारक व असमर्थनीय विभागणी जे काही थोडे बहुत शिक्षण होते ते फक्त हैद्राबाद शहारालगतच होते. परंतु इतर ठिकाणी आपणास पूर्णत: असमाधानकारक चित्र दिसते. म्हणूनच ही शिक्षणाची उणीव भरुन काढण्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत औरंगाबाद या शहराची निवड केली. स्वत: साहेबांना खूप अभिमान वाटत होता की, आपण केलेली औरंगाबादची निवड ही सार्थक झाली. औरंगाबाद मध्ये विशेष म्हणजे मुलांबरोबर मुलीही शिक्षण घेण्यासाठी येत आहे. परंतु आज या महाविद्यालयाची परिस्थिती पाहिली तर आपणास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेलं स्वप्न हे लोप पावतानाही आपणास दिसते. या महाविद्यालयाच काम चालू असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: खुर्ची टाकून बसत असत परंतु आज आपणास तेथील चित्र वेगळच दिसते.सद्यस्थितीत शिक्षण संस्था म्हणजे कधीही न अटणारी दुभती गाय या प्रकारची धारणा सध्याच्या स्थितीमध्ये निर्माण झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय हातात येणार नाही म्हणून राजकारणात आपणास भक्कमपणे यश प्राप्त करायचे असेल किंवा घट्ट स्थान निर्माण करायचे असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण आणि विद्या याशिवाय आपला विकास आणि उद्धार होणार नाही. राजकारणात माझा बहुतांश वेळ गेला राजकारणाच्या दोऱ्या उच्चवर्णीयांच्या हातामध्ये आहे. त्या दोऱ्या आपल्याच हातात ठेवण्यासाठी उच्चवर्णीयांचा प्रयत्न सुरू आहे.

"विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन केले पाहिजे एका दिवसात जवळ जवळ एक पुस्तक किंवा अर्धे पुस्तक तरी वाचले पाहिजे. या समाजास मानाचे स्थान हे कायद्याने मिळणे आवश्यक आहे. आणि ते मिळविण्याकरिता दलित वर्गात स्वाभिमान उत्पन्न करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता आहे व तो स्वाभिमान त्यांना मिळाला पाहिजे. राजकीय प्रगतीने जीवनातील प्रश्न सुटणार नसून त्यासाठी शिक्षणच आवश्यक आहे. गेली कित्येक वर्ष मी राजकारणात काम करीत आहे. परंतु माझ्या अनुभवानुसार मला असे वाटते की, शिक्षणच जीवनातील महत्त्वाची बाब आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते की, सर्वसामान्य व्यक्तींनी शिक्षणाकडे वळले पाहिजे आणि शिक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शूर आणि धैर्यशील व्हावे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील तळपातळीतील समाजास शिक्षण मिळावे, ते विद्याविभूषित व्हावे यासाठी प्रयत्न केला असे नाही तर शिक्षण घेणारा हा सर्व विद्यार्थी वर्ग शिक्षण घेतल्यानंतर काय करतो? याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. जसे की, 20 जुलै 1952 संगमनेर

वसतिगृहाच्या इमारत फंडास शुभेच्छा प्रकट करताना बाबासाहेबांनी म्हटले होते की, आपण तळमळीने तळपातळीतील समाजाच्या मुलांना स्वतः खस्ता खाऊन शिक्षण देण्याचे कार्य करतात आणि ही मुले शिक्षण संपादन केल्यानंतर तुमच्या समाजाच्या उन्नतीसाठी काही करणार आहेत का? आपण त्यांच्याकडून याबाबतची एखादी प्रतिज्ञा किंवा लेख लिहून घेता का? बाबासाहेबांना नाही हे उत्तर मिळाल्यानंतर बाबासाहेबांनी पुन्हा म्हटले की, मी तळपातळीतील मुलांना शिक्षण मिळावे, ते शिक्षित व्हावे म्हणून सिद्धार्थ कॉलेज काढले. परंतु मला जो अनुभव आला तो अनुभव हा फार कटू आहे. शिक्षण घेतल्यानंतर तो विद्यार्थी एखादी मोठी नोकरी मिळवतो आणि त्यास वाटते आता आपले काम झाले, मी कोण आहे, मला शिक्षण कोणी दिले, कसे दिले, त्यांनी किती मेहनत घेतली, याबाबतची तिळमात्र जाणीव न ठेवता हे लोक आपल्या या समाजास विसरतात. म्हणून आपण शिक्षणाबाबत जी मेहनत घेता ती फुकट आहे असे मला वाटते. म्हणून शिक्षण घेणाऱ्यावर काहीतरी बंधने घाला म्हणजे ते समाजासाठी काम करतील.

आजचा विद्यार्थी ज्या विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षण घेतात त्या विद्यापीठाच्या कारभाराकडे कोणाचेच लक्ष नाही. विद्यार्थ्यांनी काय शिकले पाहिजे हे विद्यापीठ ठरवित असले तरी ते आपल्यासाठी योग्य आहे का? हे विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. जीवनाची उभारणी शिक्षणाच्या माध्यमातून होत असते, त्याचबरोबर तो विद्यार्थी देशाचा एक आदर्श नागरिक होणार की त्या विद्यार्थ्यांचे जीवन संघर्षमय किंवा विफल होणार? हे शिक्षणक्रम ठरवत असल्याने विद्यार्थ्यांनी याकडे डोळेझाक न करता विद्यापीठाच्या प्रत्येक भूमिकेवर लक्ष ठेवले पाहिजे. परंतु आजच्या विद्यार्थ्यांमध्ये त्याबाबत जागरूकता दिसत नाही.अलिकडील विद्यार्थी शिक्षणापेक्षा राजकारणातच जास्त दंग असलेले दिसून येतात. शिक्षण घेवून राजकारणापासून अलिप्त राहण्यासाठी अस्पृश्य विद्यार्थ्यांनी एक स्वतंत्र संघटना स्थापन करावी. आजची परिस्थिती वेगळी आहे. दलितांच्या संघटना आहे परंतु त्यांचे संघटन राहिले नाही. या पक्षातून त्या पक्षात आणि त्या पक्षातून या पक्षात असेच चालू आहे. कोणतीही संघटना किंवा पक्ष समाजभिमूख काम करताना दिसत नाही.

भारतातील मागासलेल्या निरक्षर जनतेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गाढझोपेतून जागे करावयाचे होते. समाजाच्या उच्चस्तरावर आपली प्रगती आणि एकता व्हावी म्हणून आणि मानव प्राणी म्हणून आपली योग्यता आणि आपली शक्ती वंचित जनतेने पुन्हा प्राप्त करावी म्हणून अविरत संघर्ष करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान हे अंगीभूत मुरलेल्या शक्ती मुक्त करते आणि पशुतुल्य अस्तित्वाच्या पातळीवरुन ते त्याग विशुद्धता सद्गुण आणि सात्विकता यांच्या पातळीपर्यंत उन्नत करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अग्रह होता की, 'जातीव्यस्थेच्या तटबंद्यावर जाहीरपणे हल्ला करण्यासाठी शिक्षण घेतलेच पाहिजे. डुकरासारखे आपले पोट भरण्यासाठी जगू नका, परंतु सांस्कृतिक विकासासाठी मानवी प्राणी म्हणून जगा. अशा विविध उपदेशाच्या माध्यमातून भारतीय समाजास विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे मोठे सामर्थ्य पेलले आहे. आपण राजकीय चळवळीला जितके महत्व देतो तितके महत्व शिक्षण घेण्याला आणि प्रसारालाही दिले पाहिजे. कारण शिक्षणाशिवाय आपल्या मोक्याच्या जागा काबीज करता येणार नाही. वास्तविक शिक्षणाची तरतूद प्रांतिक शासनाने केली पाहिजे परंतु तसे दिसत नाही. अशा पद्धतीने समाजाचे प्रबोधन डॉ. बाबासाहेब आंबेडकर करत असे.

**सरांश/निष्कर्ष :**

सारांशरूपाने सांगावयाचे झाल्यास समाजाचा योग्य दिशेने विकास घडवन्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन महत्वाची भूमिका बजावतो. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यामुळे दलितच नाही तर उच्च समाजातही परीवर्तन झाले व वंचित समाजात परिवर्तन करण्यासाठी आणि त्या समाजास योग्य दिशा प्राप्त करून देण्यात 'शिक्षण' अग्रस्थानी असते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यातून शिद्ध केले.

**संदर्भ :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 18, भाग 3, 1946 ते 1956, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, म.रा. शासन मुंबई, पृ. 86.
2. उपरोक्त, पृ. 259.
3. पवार दया व इतर संपा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, डिसेंबर 1993, पृ. 423-424.
4. टी.ए. गवळी व इतर संपा., बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल 1991, पृ. 372.
5. सरोज आगलावे, कर विकोसोन्मुख हवेत, लोकराज्य, मुंबई, एप्रिल 2015, पृ. 12-13.
6. ग्रिबल डेव्हिड (अनु.) चापेकर वृंदा, ख-या शिक्षणाच्या शोधात, मनोविकास प्रकाशन, पुणे, 2014.
7. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, 2004.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक विचार

**डॉ. अनंत दादाराव मरकाळे**
इतिहास विभागप्रमुख यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड.

आपला देश हा कृषीप्रधान देश समजला जातो. कारण आजही बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तेव्हा शेतीचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार, पर्यायाने देशाचा उद्धार, हे सूत्र ध्यानात घेऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या. त्याला जोड म्हणून नवनवीन उद्योगधंदे सुरू केले आणि या उद्योगधंद्यांना सहकार तत्वाची ऊर्जा दिली. शेतकऱ्यांना बियाण्यांच्या खतांच्या, पैशांच्या स्वरूपात मदत केली. तसेच शेतीमध्ये संशोधनाला चालना दिली. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण स्वत: दरबारातर्फे वेगवेगळया लागवडीचे सतत प्रयत्न केले. निधी उभे करून व्यावहारिक व तात्विक संशोधनाला गती दिली. संस्थानतर्फे आदर्श शेती सुरू केली. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. लोकांना उत्तेजनार्थ बक्षिसे दिली. हरितक्रांती घडवून आणण्यासाठी पाटबंधाऱ्याच्या योजना आखल्या असे सर्वांगीण प्रयत्न राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत समाजकल्याण आणि आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता निश्चित अशा स्वरूपाचे पूरोगामी आर्थिक धोरण आखले. तेव्हा कोल्हापूर संस्थानात मध्यवर्ती बॅक किंवा रियासतीचे स्वत:चे चलन अस्तित्वात नव्हते. वित्तीय व्यवहार इंपिरियल बॅक ऑफ इंडिया व इंग्रज सरकारच्या भारतीय चलनाद्वारेच होत असत. करवीर संस्थानचे परप्रांताशी व्यवहारी संबंध मर्यादीत व जुजबी स्वरूपाचे होते. त्यामुळे कोल्हापूर दरबाराला कोणतेही चलन व व्यापारविषयक अर्थपूर्ण धोरण आखणे व अमलात आणणे याची क्वचित गरज पडत असे. साहजिकच करवीर रियासतीत जे काही आर्थिक धोरण होते ते अंतर्गत वित्तव्यवस्था व नियंत्रण नितीपुरतेच मर्यादीत राहिले होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी या धोरणाची पूरोगामी आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे प्रथम स्पष्टपणे ठरवून त्यांचा उभ्या हयातभर पाठपुरावा केला. इतर क्षेत्रातील कार्य पार पाडीत असतांनाच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या प्रजेची आर्थिक भरभराट व्हावी म्हणून प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानचा संपूर्ण कायापालट करण्याचे श्रेय राजर्षी शाहू महाराजांकडे जाते. सध्या कोल्हापूर जिल्ह्यात अस्तित्वात आलेल्या अनेक चळवळीचे, संस्थाचे, हरित क्रांतीचे, जागृतीचे बीज आपणाला राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत सापडते.

छत्रपती शाहू चरित्र अभ्यासक घुगे विठ्ठल बाबूराव राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, त्यातून व्यक्त होणारे त्यांचे धोरण आणि परिणामांची व्याप्ती आणि स्वरूप यांचा अभ्यास करून म्हणतात, "मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या किंवा समाजवादी देशात सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टासंबंधीत ज्या कल्पना पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर प्रस्तुत झाल्या त्या वस्तुत: किती तरी आधी राजर्षी शाहू महाराजांनी एक जिवीत कार्य म्हणून जाणीवपूर्वक आपल्या डोळयासमोर ठेवल्या होत्या. त्याचप्रमाणे सामुदायीक गरज आणि हस्तक्षेपादी विचारसरणी यावर आधारलेला 'सार्वजनिक कुटुंबाचा' आधुनिक आर्थिक सिद्धांत त्याच्या आर्थिक धोरणांना लागू पडतो, असेही दिसून येते."[१] सुरक्षा कार्य आणि राजर्षी शाहू महाराजांचा व्यक्तिगत खाजगी खर्च यासारखा अनुत्पादक खर्च कडक आर्थिक शिस्त आणि नियमन यांच्या योगाने अगदी किमान गरजेच्या पातळीवर आणून ठेवण्यात आला होता. त्यामुळे सहाजिकच उत्पादक खर्चात द्रुतगतीने वाढ होत गेली. इ. स. १८९४ मध्ये अनुत्पादक खर्च एकूण खर्चाच्या ६४.४ टक्के होता तो इ. स. १९२२ मध्ये ४१.७ टक्क्यांवर आला, तर उत्पादक खर्चात त्याच काळात ३५.६ टक्क्यावरून ५८.३ टक्क्यापर्यंत वाढ झाली. खर्चाच्या आकृतीबंधात घडून आलेला हा बदल विकासाच्या आणि महसुलाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण होता. त्यामुळे शैक्षणिक संस्था,

कला कौशल्य इतकेच नव्हे तर औद्योगीक आणि व्यापारी संस्थांनाही चालना मिळत गेली. सार्वजनिक क्षेत्रात झालेल्या खर्चामुळे रोजगारात मोठया प्रमाणात वाढ झाली. इ. स. १८९४ मध्ये एकूण लोकसंख्येत रोजगाराचे प्रमाण ३.५ टक्के होते, तर इ. स. १९०१ साली आणि इ. स. १९११ मध्ये अनुक्रमे ४.६ टक्के आणि ६.० टक्के झाले. रोजगारासंबधी शाहू महाराजांच्या धोरणाचे आणखी एक समाजवादी वैशिष्ट्य म्हणजे सार्वजनीक क्षेत्रात मागासलेले वर्ग आणि अस्पृश्य यांच्यासाठी राखुन ठेवलेल्या ५० टक्के जागा आणि त्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक सुधारणांमुळे समाजातील श्रमीक वर्गाला चलनशीलतेची संधी उपलब्ध झाली आणि बौद्धिक अभिसरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. जात अथवा धर्म याचा विचार न करता सवेतन नोकरी देण्याचे राजर्षीचे धोरण सामाजिक गतीमानतेला कारणीभूत ठरले. त्याचबरोबर गरीब आणि पददलित जनतेला नोकरी धंद्याची संधी प्राप्त झाली. खेडयातील कारभाराची कार्यक्षमता वाढली. त्याचप्रमाणे एकंदर समाजाचा दर्जाही वाढला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज केवळ १४ वर्षाचे असतांना त्यांनी आपल्या संस्थानात सुरू होणाऱ्या रेल्वेच्या बांधकामाचे उद्‌घाटन केले होते. त्या प्रसंगी ते म्हणाले होते, “रेल्वे ही अतिशय महत्त्वाची आहे. औद्योगीक विकासाकरीता आणि सपत्तीच्या वृद्धीकरीता रेल्वेचे महत्त्व आहे.” [२] राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे हे छोटेसे भाषण म्हणजे त्यांच्या भविष्यकाळातील आर्थिक विचाराचे सुचक होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी राज्यसत्ता हाती घेण्याच्या अगोदर आपल्या संस्थनचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले होते की, आपल्या राज्यातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती आहे. शेती ही पुर्णपणे निसर्गावर अवलंबुन आहे. निसर्गाच्या अनिश्चीततेचा परीणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. त्यामुळे आपल्या राज्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती वाईट झाली आहे. परिणामी राज्याचीही स्थिती वाईट झाली आहे. तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना लोकांच्या सामाजिक व धार्मिक स्थितीत सुधारणा करायची होती. त्यासाठी लोकांना अगोदर आर्थिकदृष्टया सक्षम करणे आवश्यक होते. म्हणून लोकांना दारिद्रयातून बाहेर काढण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टिने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सुरूवातीपासूनच आपले धोरण राबवले.

कॉम्रेड गोविंद पानसरे म्हणतात, “राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची समाजातील प्रतिमा समाजसुधारक अशी आहे आणि ती बरोबर आहे. परंतु या प्रतिमेमुळे त्यांच्या व्यवहारातील आणि विचारातील इतर सुधारणांकडे दुर्लक्ष होते. शाहू महाराजांचे आर्थिक धोरण आणि त्यांचे आर्थिक विचार समाजापर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचले आहेत असे मात्र नाही. त्यांच्या जुन्या नव्या चरित्रकारांनी त्यांचा काही आढावा घेतला आहे.” [३] राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी भारताच्या आर्थिक उन्नतीचे अत्यंत महत्त्वपुर्ण असे विचार मांडले आहेत. त्याचबरोबर प्रत्यक्ष प्रयत्न करून आर्थिक उन्नतीचे उदाहरण घालून दिले आहे. १९ एप्रिल १९१९ मध्ये कानपूर येथील अखिल भारतीय कुर्मी क्षत्रियांच्या तेराव्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते, “आपला विवाह कृषी कर्मावर विशेषकरून होतो. हे ऐकून मला मोठा आनंद होतो. कृषी कर्म इतके पवित्र आहे की वैदिक काळात, वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्री हे कृषी कर्माची उन्नती करण्याकरिता नांगर हाकीत असत. ज्याच्या योगाने भूमीमध्ये एक दाणा टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते, ते कृषी कर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानीत नाही.” [४] राजर्षी शाहूंनी आपल्या युवराजांना कृषी विद्या शिकण्याकरीता विलायतेला व अलाहाबादला कृषी स्कुलमध्ये पाठवले होते. त्याच भाषणात शाहू महाराज म्हणतात, “आपल्याला माहितच आहे की कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख होऊन सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्माशी पशुपालन व रक्षण यांचाही संबंध येतो. याकरिता पशुपालना संबंधीही पुष्कळ काम करावयाचे आहे. दूध तूप वगैरेची समृद्धी देशोदेशामध्ये झाली पाहिजे. कृषी कर्म करतांना क्षात्रतेजाला बाध येतो असे नाही. ज्यावर मनुष्य समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे, ते कर्म करणारे नीच आहेत हे म्हणणे मुळीच पटत नाही.” [५] छत्रपती शाहू

महाराज यांना शेतकऱ्यांच्याविषयी आदर होता कुठे शेतकऱ्यांचा आदर होत असेल तर त्यांना आनंद होत असे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्याच्या आर्थिक व्यवहाराला शिस्ती आणली. "शाहू महाराजांच्या कारकीर्दीतील पहिले अंदाजपत्रक त्यांच्यासमोर मंजुरीसाठी आले. ते तुटीचे होते. ते त्यांनी नामंजूर केले. बिनातुटीचे नवीन अंदाजपत्रक समोर आल्यावरच ते मंजूर केले."[६] अशारीतीने संस्थानच्या आर्थिक व्यवहाराचा पाया त्यांनी आधुनिक अर्थशास्त्राच्या नियमानुसार घातला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या मते समाजाला नुसते शिक्षण देऊन अगर जागे करून भागणार नाही. तर त्यांची आर्थिक स्थितीही सुधारली पाहीजे. शिक्षण जागृतीबरोबर समाजाच्या आशा आकांक्षा वाढू लागतील हे जाणून राजर्षींनी त्या दृष्टीनेही प्रयत्न केले होते. आजच्या महाराष्ट्राची आखणी छत्रपती शाहू महाराजांनी तेव्हाच केली होती. राजर्षी शाहू महाराजांनी शाहूपूरी, जयसिंगपूर, वडगाव वगैरे महत्त्वाच्या ठिकाणी बाजारपेठा वसवून सुरूवातीला व्यापारी लोकांना मदत व सवलतीही दिल्या. आज या पेठातून कोटयावधी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात होत आहे. त्याचे श्रेय राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना जाते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आर्थिक क्षेत्रातील कामगिरीचे मूल्यमापन करतांना आपल्याला महाराजांचे कार्य एका बाजूला व दूसऱ्या बाजूला आधुनिक अर्थशास्त्राच्या कसोटया असे करून चालणार नाही. महाराजांनी काळाच्या ज्या चौकटीत काम केले ती चौकट विचारात घेणे महत्त्वाची आहे. ज्या पार्श्वभूमीवर महाराजांनी कार्य केले ती विसरून चालणार नाही. किंबहूना तीच प्रथम विचारात घेतली पाहिजे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अंगिकारलेले आर्थिक धोरण आणि त्यासाठी अनुसरलेले प्रत्यक्ष मार्ग यामुळे त्यांना आर्थिक विकास करणे शक्य झाले. सार्वजनीक आणि खाजगी क्षेत्रात किफायतशीर रोजगार, शेतकरी, कारखानदार आणि गरीब कारागीरांच्या उत्पन्नात वाढ करणे शक्य झाले. तसेच गरीब व श्रीमतांच्या संपत्ती आणि उत्पन्न यांच्यातील विषमतेला आळा घालणे, त्यांनी स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्था उभी केली होती. त्यांनी आपल्या संस्थानात ज्या ज्या सुधारणा राबविल्या, त्या त्या आधुनिक समाजवादी अर्थशास्त्रीय सिद्धांतावर आधारलेल्या होत्या. आधुनिक विकसनशील अर्थव्यवस्थेचा प्रणेता आणि समाजवादी मुत्सद्दी राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने आपणांस दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य जगतात नवीन अर्थशास्त्रीय विचारांचा उगम होण्यापूर्वीच ते विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणारे संस्थानिक म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्थान महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना त्यावेळी भांडवलाची अत्यंत कमतरता पडत होती. ती दूर करण्यासाठी संस्थानतर्फे वेगवेगळया निधीमार्फत महाराजांनी शेतकऱ्यांना भांडवल पुरवण्याची व्यवस्था केली. शेतमालाच्या विक्रीसाठी संघटनेचा अभाव असल्याने ब्रिटिशांच्या धर्तीवर महाराजांनी सहकारी पतपेढया स्थापन करायला प्रोत्साहन दिले. शेतीचा आकार लहान असल्यामुळे शेती किफायतशीर होत नव्हती. त्याला मुख्यकारण म्हणजे वारसाहक्कच अशा तऱ्हेचा होता की, सगळया वारसामध्ये जमिनीचे समान तुकडे होत असत. यावरचे उपाय संस्थानच्या हातात नव्हते. तरी सुद्धा महाराजांनी एक अतिशय धाडसी उपाय योजला होता. तो म्हणजे त्यांनी संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य ठरविली होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराज तांत्रीक अर्थाने अर्थशास्त्रज्ञ नव्हते. परंतु आर्थिक समस्याच्या बद्दल त्यांच्या निश्चीत अशा कल्पना होत्या. आर्थिक विकासातील त्यांच्या कल्पना ह्या आज देखील महत्त्वाच्या आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील दारिद्र्य, बेरोजगारी, अवर्षण, जलसंधारण आणि शेती उत्पादन इत्यादी गंभीर स्वरूपाच्या समस्या आजही आहेत. राजर्षी शाहू महाराजांनी त्यावेळी या समस्यांवर आपल्या विचार व कार्याच्या माध्यमातून मात केली होती. म्हणून आज या समस्यांवर उपाय करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक विचार व्यवहारात आणले तर या समस्यांची सोडवणूक होणे कठीण नाही. आजही कोल्हापूर संस्थानाचा परिसर कृषी, उद्योगधंदे,

व्यापार आणि व्यवसाय इत्यादी विविध क्षेत्रात पुढारलेला आहे. त्याचे सर्व श्रेय राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनाच आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या भाषणामध्ये अनेक ठिकाणी आपले आर्थिक विचार व्यक्त केले होते. त्यावरून आपल्याला त्यांच्या आर्थिक विचाराची कल्पना येते.

**संदर्भ :**

१ घुगे, विठ्ठल बाबूराव, छत्रपती शाहू महाराजांची अर्थरचना, जाधव, डॉ. रमेश (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्रराज्य मंत्रालय, २०१६, पृ. क्र. १७८.

२ कुलकर्णी, प्रा. सौ. मीना आणि प्रा. ब. शि. कुलकर्णी, श्री राजर्षी शाहू छत्रपतींचे अर्थकारण, कोल्हापूर, गौरीनंदन प्रकाशन,
१९७५, पृ. क्र. ६३.

३ पानसरे, कॉ. गोविंद, राजर्षी शाहू : वाद आणि वास्तव, इस्लामपूर, नाग—नालंदा प्रकाशन, २०१२, पृ. क्र. ३०.

४ भोसले, डॉ. एस. एस. (संपा.), क्रांतिसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
२००६, पृ. क्र. १११.

५ भोसले, डॉ. एस. एस. (संपा.), क्रांतिसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
२००६, पृ. क्र. १११.

६ पवार, डॉ. जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, २००९, पृ. क्र. ४१४.

| **Chief Editor** | **Editor** |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot<br>No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

## Editorial Board

Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]
Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]
Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]
Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]
Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]

guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam
Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]
Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]
Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]
Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]

Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]
Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]
Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]
Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]
Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102